इ. ग्रंथ. २०३

ग्रा११७

88024

मोक्षमूलरकृत
धर्मविषयक व्याख्याने

(६८)

धा
११८

ॐ

भट्ट मोक्षमूलरकृत

# धर्मविषयक व्याख्यानें.

[ ह्मणजे धर्माची उत्पत्ति व वृद्धि यांचें आर्यावर्तातील धर्मानुसारें उद्घाटन. ]

मूळ इंग्रजीवरून

**गोविंद वासुदेव कानिटकर,**

बी. ए. एल्. एल्. बी., हायकोर्टाचे वकील,

यांनीं

भाषांतर केलें.

तें

**...रामजी मेरवानजी मलबारी**

यांनीं

मुंबईंत

..." छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

सन १८८३.

(...र्वाधिकार स्वाधीन.)

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088025

*To*

*H. H. MAHARAJA SAYAJIRAO,*

*Gaikwad of Baroda.*

*May it please your Highness,*

*I take the liberty of dedicating to your Highness this Maráthi translation of Max Müller's Hibbert Lectures, in the hope that, resting awhile from the cares of State, your Highness may turn your thoughts to this luminous and masterly exposition, in your native tongue, of a subject which, remaining perhaps for ever a problem and a mystery, will ever continue to engage the deepest interest of the Indian thinker.*

*May it be the privilege of these pages to strengthen your Highness's ideas of Law and Order, to help you to a clearer conception of the Infinite and the Eternal, and by leading you to a study of your own true Self, may they bring you face to face with the Highest, the Universal Self, inspiring a life of unselfish usefulness.*

*This Maráthi volume could not be presented to a worthier patron of literature than the First Marátha Prince in India; nor could it be thus tendered by a more loving and devoted son of Baroda than your Highness's sincere well-wisher,*

*BEHRAMJI M. MALABARI.*

*August, 1st 1883.*

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड

संस्थान बडोदें

यांस.

महाराज,

पूर्वपक्षावस्थेंतच व चिरकाळ दुर्बोध असाच कदाचित् राहण्याचा ज्याचा संभव आहे, व या भरतखंडांतील प्रत्येक विवेकसंपन्न मनुष्याचें लक्ष नित्य वेधून घेण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य आहे, अशा विषयाचें स्वदेशभाषेंत अति सुंदर व सुबोध विवरण ज्यांत आहे अशा या ( मोक्षमूलरच्या हिबर्ट व्याख्यानांचें मराठी भाषांतर ) ग्रंथाकडे राजकार्यव्यवसायांनीं किंचित् श्रांत झाल्यासारखें वाटेल तेव्हां विश्रांतिकालीं महाराजांनीं क्षणभर लक्ष पुरवावें या आशेनें हा ग्रंथ धाष्टर्याचा अवलंब करून मी नजर करतों.

न्याय व व्यवस्था एतद्विषयक महाराजांचीं जीं मतें आहेत त्यांस पुष्टि आणण्याची व नित्य अनंत वस्तूच्या सुव्यक्त धारणेस मदत करण्याची सेवा या ग्रंथापासून घडो. आत्मस्वरूपाचा दृढ परिचय करून देण्यास साधनीभूत होऊन सर्वातिशायी सर्वांतर्यामित्वेंकरून राहणारें जें परमात्मस्वरूप त्याच्या साक्षात्काराचें निमित्त हा ग्रंथ होवो. स्वहितनिरभिलाष असून लोकहित तत्परत्वें जें वर्तन त्याची प्रेरणा महाराजांच्या अंतरांत या ग्रंथानें होवो.

भरतखंडांतील महाराष्ट्र राजांमध्यें अग्रगण्य जे आपण त्यांहून श्रेष्ठ विद्येच्या अन्य आश्रयदात्याचें दुर्लभत्व जाणून महाराजांच्या राजधानीच्या भक्तिमान् व प्रीतिमान् पुत्रांपैकीं परम प्रीतिमान् व भक्तिमान् पुत्र व महाराजांचें मनापासून अभीष्टचिंतन करणारा बहिरामजी मेरवानजी मलबारी यानें हा महाराष्ट्र भाषेंतील ग्रंथ नजर केला असे.

# PUBLISHER'S NOTICE.

Much time has elapsed since the issue of the Gujarati translation owing to unforeseen difficulties. But I am thankful this second stage has at last been reached towards the goal. The Sanskrit and the Bengali translations will, I trust, follow in quick succession.

The financial progress has been very tedious, and in many cases very discouraging. But I have no cause for despair.

My best thanks are due to the Government of Bombay, to their Highnesses the Maharajas of Indore, Dhar and Rutlam, and the Chiefs of Sangli and Miraj, for their generous support and encouragement.

I am also indebted to Mr. Kashinath T. Telang for a general supervision of part of this Marathi translation.

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

उपोद्घात .................................... १–२

भट्ट मोक्षमूलर यांच्या चरित्राचा सारांश ............ २–६

पहिल्या दोन व्याख्यानांचा सारांश.................. ६–२३

व्याख्यान तिसरें– आर्यावर्तातील प्राचीन ग्रंथसंग्रह... २३–५४

तिसऱ्या व्याख्यानाची पुरवणी.................. ५४–६४

व्याख्यान चवथें–स्पृश्य, अर्ध-स्पृश्य व अस्पृश्य पदार्थांची पूजा .................................. ६४–१२२

व्याख्यान पांचवें–अनंतत्व व सृष्टिनियम या दोन कल्पना .... ................................ १२२–१५८

व्याख्यान सहावें–इष्टेश्वरमत, अनेकेश्वरमत, एकेश्वरमत व निरीश्वरमत .... ...................... १५८–२१६

व्याख्यान सातवें–धर्म व तत्त्वविज्ञान ................ २१६–२७०

उपसंहार .................................... २७०–२९०

LIBRA
SATARA

# प्रस्तावना.

भट्ट मोक्षमूलर हे मूळचे जर्मन असून हल्लीं इंग्लंडांत बहुत वर्षें पाठशाळेंत संस्कृताचे गुरु या नात्यानें काम करीत आहेत. यांनीं इंग्रजी भाषेंत बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. हे संस्कृतांत फारच निष्णात आहेत. यांनीं अनेक भाषांचा चांगला अभ्यास केला आहे. कांहीं वर्षां पूर्वीं मि. रॉबर्ट हिबर्ट नांवाच्या कोणी उदार व विद्यासंपन्न साहेबानें मोठमोठ्या पंडितांकडून धर्मविषयक व्याख्यानें देण्यांत यावीं अशी कांहीं एक व्यवस्था केली. त्या व्यवस्थेस अनुसरून भट्ट मोक्षमूलर यांनीं आर्यावर्तांतील प्राचीन धर्मग्रंथांच्या आधारानें धर्मविषयक व्याख्यानें दिलीं. हीं व्याख्यानें फारच महत्वाचीं व विद्वज्जनांस मान्य होण्यासारखीं आहेत असें वाटल्यावरून, मि. बहिरामजी मलबारी या पारशी गृहस्थांनीं त्या व्याख्यानकारांच्या परवानगीनें एतद्देशीय भाषेंत त्या व्याख्यानांचें भाषांतर करण्याचा यत्न आरंभिला. त्यांनीं स्वतां गुजराथींत भाषांतर केलें व मला मराठींत भाषांतर करण्याविषयीं विनंति केली. माझ्या मनांत ही गोष्ट बरेच दिवसांपासून घोळत होतीच; तेव्हां त्यांच्या ह्या बोलण्यास मान द्यावा असें वाटलें तर खरें. पण विषय पडला गहन व अशा कठीण विषयावर लिहिलेल्या ग्रंथाचें भाषांतर करण्याची छाती एकाएकीं होईना. पण अल्पशक्ति असें ह्मणत बसून कार्य उलगडतें कसें व आमच्या लोकांच्या हातून देशकल्याणाचीं कामें पार पडतात कशीं, असें मनांत येऊन बांधिली कंबर, केला निश्चय. मला मराठी लिहिण्याची संवय पडली थोडी; पण संस्कृताच्या परिचयामुळें थोडासा धीर आला.

या व्याख्यानांत आलेले विषय मी स्वतां थोडेसे पाहिलेले होते. शिवाय माझे मित्र **रा. रा. जनार्दन स० रानडे** यांनीं होईल तेवढी मदत करण्याचें अभिवचन दिलें व तें त्यांनीं पूर्णही केलें. या व इतर कारणांमुळें काम तर हातीं घेतलें. पण, करितों आहें हें अम्मळ साहस आहे अशी माझ्या मनाची आरंभापासून समजूत असून काम केलें आहे. एकंदर ग्रंथ तयार झाल्यावर असा कांहीं योग घडून आला कीं मी मे महिन्याच्या सुटींत पुण्यास गेलों. त्या वेळीं पुण्यग्रामवासी प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न **पंडिता रमाबाई सरस्वति** यांस मी हें भाषांतर दाखविलें. त्यांनीं ह्या भाषांतराचें अवलोकन करून मला कांहीं योग्य सूचना केल्या त्यांजबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. प्रस्तुतस्थलीं मला प्रांजल बुद्धीनें हेंही कबूल करणें योग्य दिसतें कीं, या कार्यास जितका अवकाश पाहिजे होता तितका मिळाला असता तर या विदुषी बाईच्या साहाय्यानें व माझ्या इतर संस्कृतज्ञ व महाराष्ट्रभाषाभिज्ञ मित्रांच्या मदतीनें या ग्रंथाला फार उपकार होऊन ह्या भाषांतरांत बरीच सुधारणा करितां आली असती. पण या ग्रंथाचें प्रकाशन करण्याची त्वरा **मि. मलबारी** यांस असल्यामुळें भाषांतर जितकें चांगलें उतरावयास पाहिजे होतें तितकें उतरलें नाहीं अशी माझी समजूत आहे. तथापि या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघण्याचा अनपेक्षित प्रसंग कधीं काळीं जर आलाच तर हा माझा मनोरथ पूर्ण करतां येईल, अशी आशा आहे. **भट्ट मोक्षमूलर** यांच्या आंग्लभौम वाणीस हा मराठी पेहराव देण्याचा यत्न मी केला आहे. तो कितपत सुरेख दिसतो हें पाहाणें वाचकांकडे आहे.

भाषांतर कर्ता.

## भट्ट मोक्षमूलर यांच्या चरित्राचा सारांश.

(मि. बाहिरामजी मलबारी यांच्या मूळ गुजराथीवरून.)

भट्ट मोक्षमूलर यांचा जन्म शार्मण्य ऊर्फ जर्मनी देशांत १८२३ सालीं झाला. यांच्या बापाचें नांव उल्हेम् मूलर. हेही मोठे प्रख्यात कवि होऊन गेले. यांची पत्नि, ह्मणजे भट्ट मोक्षमूलर यांची मातोश्री, ही थोर कुळांतली होती. मोक्षमूलर हे लहानपणापासूनच मोठे उद्योगी व चपळ असत, व त्यांस गायनाची मोठी अभिरुचि असे. सन १८४३ सालीं, ह्मणजे मोक्षमूलर हे वीस वर्षांचे असतां, त्यांनीं लिप्झीक नांवाच्या पाठशाळेंत "डाक्टर आफ् फिलॉसॉफी" ह्मणजे 'तत्वविज्ञानवेत्ते' अशी पदवी मिळविली. आणि पुढें त्यांनीं त्याच पाठशाळेंत यहुदी, आरबी, व संस्कृत या भाषांचा अभ्यास केला. दुसऱ्या वर्षी आमचे तरुण पंडित जर्मनी देशाची राजधानी बर्लिन् येथें तत्कालीन महापंडित शेलिंग् व बॉप् यांचें वक्तृत्व श्रवण करावें या हेतूनें मोठ्या प्रयासानें गेले. बर्लिन् येथें यांचा व प्रख्यात सृष्टिविज्ञानवेत्ते हुमबोल्ट व बीक यांचा परिचय झाला. सन १८४५ सांत फ्रान्स येथील पाठशाळेंतील विद्यागुरु युजीन बुरनुफ् यांच्या पांडित्याची कीर्ति श्रवण करून भट्ट मोक्षमूलर फ्रान्स देशाची राजधानी प्यारीस् येथें गेले. बरनुफ् यांनीं मोक्षमूलरभट्टांची तीव्रबुद्धि पाहून आपण ऋग्वेदसंहिता छापून प्रसिद्ध करावी असा त्यांस आग्रह केला. हा त्यांचा हेतु तडीस न्यावा असा निश्चय करून १८४६ सांत परत इंग्लंडास आले. इतक्यांत असा कांहीं योग घडून आला कीं नामदार ईस्ट इंडिया कंपनी बहादूर यांनीं आपल्या खर्चानें ऋग्वेदसंहिता छापविण्याचा उपक्रम केला. आणि त्या कामाची देखरेख करण्यासाठीं आमचे व्याख्यानकर्ते भट्ट मोक्षमूलर यांची योजना केली व त्यांनीं ऑक्सफर्ड (उक्षतरण) या शहरांतच राहावें असा ठराव केला. ऋग्वेद

छापविण्याचें हें प्रचंड काम इंग्लंडा खेरीज दुसऱ्या कोणत्याही देशा-कडून होण्यासारखें नव्हतें. शाबास! विद्येस उत्तेजन देणारा इंग्लंड देश धन्य होय! आणि ह्मणूनच तो देश दिवसानुदिवस उत्कर्ष पावत आहे यांत काय आश्चर्य? १८५४ सालीं मोक्षमूलर ऑक्सफर्ड् येथील मोठ्या पाठशाळेंत अर्वाचीन युरोपियन भाषांचे गुरु झाले. १८५८ त अनेकभाषाविज्ञानाचा एक नवा वर्ग तेथें स्थापित झाला त्यावर त्यांस शिक्षक नेमिलें.

मोक्षमूलर यांचा पहिला ग्रंथ हितोपदेशाचें भाषांतर होय. तें त्यांनीं १८४० सांत छापून प्रसिद्ध केलें. १८४३ सालीं त्यांनीं कवि-कुलगुरु श्रीकालिदास यांचें प्रसिद्ध महाकाव्य मेघदूत याचें जर्मन भाषेंत भाषांतर केलें. त्यांत त्यांनीं मूळ संस्कृत छंदाला अनुरूप असा जर्मन भाषेंतील एक छंद शोधून काढिला. त्यावरून त्यांच्या बुद्धिवैभवाची परीक्षा झाली एवढेंच नव्हे, पण संस्कृत आणि जर्मन या दोन भाषांचा निकट संबंधही त्यांनीं दाखविला. १८५९ त "प्राचीन संस्कृत साहित्याचा इतिहास" या नांवाचें पुस्तक त्यांनीं रचून प्रसिद्ध केलें.

१८६१ सालीं त्यांनीं "भाषाशास्त्रविषयक व्याख्यानें" या नांवाचा ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला. या व्याख्यानमालेंत ९ व्याख्यानांचा समावेश केला आहे. पुढें १८६४ त आणखी बारा व्याख्यानें प्रसिद्ध करून घेतलेला विषय समाप्त केला. या ग्रंथाच्या बऱ्याच आवृत्ति झाल्या. त्याचप्रमाणें फ्रेंच, जर्मन, इतालियन, रशियन, इत्यादि भाषांत त्या ग्रंथाचीं भाषांतरेंही झालीं. या शिवाय मोक्षमूलर यांनीं दुसरीं अनेक पुस्तकें रचलीं आहेत. त्या सर्वांचा उल्लेख या लहानशा निबंधांत स्थलसंकोचास्तव करितां येत नाहीं.

मोक्षमूलर यांनीं आपल्या जन्माची सार्थकता होण्यासारखें असें एक काम केलें. तें कोणतें ह्मणाल तर ऋग्वेदप्रकाश हें होय. त्या ग्रंथाचे मोठमोठे सहा भाग आहेत. त्यांत सायणाचार्यांची टीकाही आहे. हे सहा भाग सन १८३९ पासून १८६५ च्या दरम्यान

प्रसिद्ध झाले. या प्रचंड पुस्तकाविषयीं विद्वान् डा० मार्टिन हौग हे लिहितात कीं १८६२ सालीं पुणें शहरांत ७०० विद्वान् ब्राह्मणांची एक सभा भरवून त्या पुस्तकाची परीक्षा करविली. तेव्हां त्या ७०० ब्राह्मणांनीं असा अभिप्राय दिला कीं, आमच्या हस्तलिखित ग्रंथापेक्षां या पुस्तकाचा मूळ लेख अधिक शुद्ध आहे, असें ह्मणून त्यांनीं या नव्या ग्रंथाच्या आधारानें आपापल्या पोथ्याही शुद्ध करून घेतल्या.

हल्लीं ते "पूर्वेकडील धर्म" या नांवाची ग्रंथमालिका प्रसिद्ध करण्यांत गुंतले आहेत. यांत ब्राह्मण, बौद्ध, जरथोस्ती ( पारशी ), चिनई व महमदी इतक्या धर्मांचे ग्रंथ आले आहेत. प्रत्येक भाग किंवा ग्रंथ मोठमोठ्या विद्वानांकडे सोंपविला आहे व त्या सर्वांचे मुख्य एडिटर स्वतां भट्ट मोक्षमूलर हे असून त्यांचें काम ग्रंथ तयार झाल्यावर तो सुधरून छापवावा हें आहे. या ग्रंथकर्त्यांत आमचे परम सन्मान्य मित्र वे. शा. सं. रा. रा. काशिनाथ त्रिंबक तेलंग व भट्ट रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट होय. या एकंदर मालिकेंत ग्रंथांची संख्या चोवीसांहून जास्त होईल असें सांगतात.

भट्ट मोक्षमूलर यांचे वडील कवि होते हें वर सांगितलेंच आहे. हे स्वतांही कवि आहेत, ह्मणजे यांनीं स्वतां कांहीं काव्यें रचिलीं आहेत असें नव्हे, तर यांच्या प्रत्येक ग्रंथांत अथवा लेखांत कवित्वशक्ति परिस्फुट होते. विषय कितीही गहन असो, त्याचें विवेचन पंडितराय करूं लागले ह्मणजे भाषा कशी सरळ, मनोरम व कवित्वचमत्कृतिपरिपूर्ण, अशी लिहितात. वाचण्यास गोड लागते. आणि त्यांत विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, अशी सुंदर भाषा ते आपल्या अज्ञानावर झांकण घालण्याच्या उद्देशानें कधींही वापरीत नाहींत.

व्याख्यानकारांस वादविवाद करण्याची फारशी गोडी नाहीं. कारण त्यांचा स्वभाव फार शांत, गंभीर व दयाळू असून दुसऱ्याचें मन न दुखविण्याविषयीं ते नेहेमीं फार काळजी घेतात असें सांगतात. थोर पुरुषाच्या स्वभावाचें लक्षणच हें ! कोणताही धर्म असो, त्यांत थोडा

तरी सत्याचा अंश असतोच असतो, अशी त्यांची समजूत आहे. तथापि जेव्हां वादविवाद करणें भागच पडतें, तेव्हां ते कोणासही न भितां मोठ्या उत्साहानें वाद करितात व प्रतिपक्षाचा पराभव केल्याशिवाय कधीं रहात नाहींत. भट्ट मोक्षमूलर हे युरोप खंडांत जितक्या विद्वान् लोकांच्या मंडळ्या आहेत तितक्या साऱ्यांचे सभासद आहेत. प्रशिया देशानें यांस नाइट असा किताब दिला आहे. इंग्लंडानें तर त्यांस हा आपला एक प्रियपुत्र आहे असें मानून व त्यांस आश्रय देऊन आपल्या विद्वज्जनसमूहांत त्यांची योजना केली आहे. तेथील विद्वान् मंडळींत यांची इतकी मान्यता आहे कीं ते त्यांस सोडीत नाहींत. तेथील पराक्रमी पुरुषांच्या मंडळांत हे प्रमुख आहेत. हे इंग्लंडांत जन्मले नसून इंग्रेजी भाषा इतकी उत्कृष्ट लिहितात कीं मोठमोठे इंग्रेजी ग्रंथकारही यांच्यापुढें फिके पडतात. हजारों विद्वान् आणि लाखो विद्यार्थी सर्व विद्यासंपन्न देशांत यांची प्रशंसा करितात. शब्दशास्त्राचे तर हे केवळ उत्पादक ह्मटलें तरी चालेल. या नव्या पण अतिउपयुक्त शास्त्रांत यांची बरोबरी करणारा दुसरा पंडितच नाहीं, असें सांगतात. धर्मशास्त्र व भाषाशास्त्र या दोन शास्त्रांत तर यांची बुद्धि केवळ अप्रतिम आहे. प्रस्तुत 'हिबर्ट लेक्चर्स' या नांवाचीं जीं यांचीं व्याख्यानें आह्मी महाराष्ट्र भाषेंत छापून प्रसिद्ध केलीं आहेत, त्या व्याख्यानांवरून लोकांस त्यांच्या अलौकिक बुद्धीची व विद्वत्तेची बरीच कल्पना करितां येईल. हीं व्याख्यानें व्याख्यानकारांनीं आपल्या परलोकवासी कन्येला अत्यंत करुणवाणीनें येणेप्रमाणें अर्पण केलीं आहेतः—

"जिच्या प्रिय स्मरणानें हीं व्याख्यानें मी लिहीत असतां मला उत्तेजन दिलें, मार्ग दाखविला, व अतिशय साहाय्य केलें, तिला हीं व्याख्यानें पितृवात्सल्याचें स्मारक समजून मी अर्पण केलीं आहेत."

# पहिल्या दोन व्याख्यानांचा सारांश.

(मि. बहिरामजी मलबारी यांच्या मूळ गुजराथीवरून.)

## धर्म.

धर्म ह्मणजे काय? कोणत्याही विषयाच्या संबंधानें वादास आरंभ करण्या पूर्वी तो विषय व त्या वादांत अवश्य लागणाऱ्या ज्या परिभाषा असतील त्यांचा अर्थ, या दोन गोष्टी दोन्ही पक्षांस मान्य झाल्या पाहिजेत ही गोष्ट अवश्य आहे. ह्मणून धर्म ह्मणजे काय, या प्रश्नाचाच अगोदर विचार करूं. धर्म शब्दाची व्युत्पत्ति पहातां त्याचा मूळ अर्थ, धृ=धारण करणें ह्यापासून आहे. जो धारण करितो, किंवा उद्धार करितो, किंवा पडणाऱ्यास आश्रय देतो, त्याचें नांव धर्म. इंग्रजी भाषेंत धर्म या अर्थाचा शब्द "रिलिज्यन्" हा आहे. तो लॅटीन भाषेंतील क्रियापद Religio, Religere, ह्मणजे बांधणें, एकत्र करणें, विचार करणें, मनन करणें, इत्यादि अर्थाचा आहे. हा धर्म या शब्दाचा मूळ अर्थ झाला. पण या अर्थाचा व आजकाल धर्म या शब्दाची जी व्याख्या लोक करितात तिचा मेळ कसा घालितां येईल हें पाहूं. कोणताही शब्द फार दिवस आपला मूळ अर्थ धरून रहात नाहीं. ज्याप्रमाणें मनुष्याची स्थिति दिवसानुदिवस बदलत जाते, त्याप्रमाणें भाषेंतही कालमानानें पुष्कळ बदल होत जातो; ह्मणजे, शब्दाचे अर्थ बदलत जातात. तथापि धर्म या शब्दाचा प्रथम अर्थ 'धरणारा' असा असून मग 'पडणाऱ्यास हात देणारा' असा झाला. या दोन्ही अर्थांत फारसा भेद दिसत नाहीं. तथापि धर्म या शब्दाचा हल्लींचा अर्थ व पूर्वीचा अर्थ यांत पुष्कळ भेद दृष्टीस पडतो. 'धारण करणें,' 'विचार करणें,' 'मनन करणें' किंवा 'मानणें,' हे एकाच मानसिक क्रियेचे निरनिराळे प्रकार आहेत. 'धारण करणें' हा जणूं एक नदीचा लहानसा उगम होय; पुढें 'विचार

करणें ' ही एक त्या उगमापासून झालेली नदी होय; ' मनन करणें ' आणि ' मानणें ' किंवा ' श्रद्धा ठेवणें ' हे त्या नदीचे विस्तार पावलेले फांटे होत. हे वाढतां वाढतां पुढें महासागरास जाऊन मिळाले. पण या महासागराचें मूळ पाहिलें तर पहिला लहानसा झरा होय.

या व्यवस्थेला किंवा क्रियेला पंडितांनीं ' वृद्धि,' ' प्रसारण,' ' प्रकाशन,' ' विकास,' अशीं नांवें दिलीं आहेत. भट्ट मोक्षमूलर ' परिणाम ' असें नांव देतात. धर्म शब्दाचा मूळ अर्थ याप्रमाणें झाल्यावर, आतां धर्म ह्मणजे हल्लीं लोक काय समजतात, याचा विचार करूं. धर्म या अगाध विषयावर साऱ्या माणसांचे विचार एकसारखेच असणें हें अगदीं असंभाव्य आहे. तथापि कांहीं कांहीं विद्वान् लोकांचे या संबंधानें काय विचार आहेत, हें पहाण्याचा यत्न केला असतां आपला हेतु बराच सफळ होईल. एकंदर विचार करितां, धर्म ह्मणजे श्रद्धा, भक्ति, पूजा, नीति, आनंदप्रदर्शन, भीति, तर्क, किंवा जें कांहीं अज्ञात तें समजून घेण्याची किंवा कळण्याची मनुष्यास जी इच्छा होते ती. अशा अनेक गोष्टींचा समावेश धर्म या शब्दाच्या व्याख्येंत होतो.

धर्म हा खटला फार पुरातन आहे. त्याप्रमाणें धर्माचें शास्त्रही जुनें आहे. जेथें जेथें माणसें आहेत, संसार आहे, तेथें तेथें धर्म आहे. आणि जेथें जेथें धर्म आहे तेथें तेथें धर्म आला कोठून, हा प्रश्न उत्पन्न झालाच पाहिजे. मुलें एकदां प्रश्न विचारूं लागलीं ह्मणजे प्रत्येक गोष्टीचा खडान्खडा विचारतात व हवे ते प्रश्न करितात. अमुक पदार्थ कुठून आला, कां आला, कसा आला, याप्रमाणें मुलें आईबापांस किंवा मोठ्या माणसांस विचारून विचारून पुरेसें करतात. या न्यायानें तत्वविज्ञानांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचा सूचक मूळ धर्मच झाला असावा, अशी माझी समजूत आहे.

कित्येक लोकांच्या भाषेंत धर्म या अर्थाचा शब्दच नाहीं. तथापि ते लोकही कांहीं एक अज्ञात वस्तूची पूजा करितात असें दृष्टीस पडतें. जॉन् स्टुअर्ट मिल्ल् ह्मणे कीं ' पौराणिक देव आणि जगत्कारण सृष्टिकर्ता ईश्वर, या दोन्ही भ्रमात्मक निवळ कल्पना आहेत.' परंतु तो

देखील एका अत्यंत बुद्धिवान् अशा स्त्रीस परमपूज्य मानून तिच्या कर्तृत्वाविषयीं व अलौकिक बुद्धिसामर्थ्याविषयीं परम विश्वास प्रकट करी. त्याचें मत असें होतें कीं बुद्धीनें श्रेष्ठ असा मनुष्यमात्र पूजा करण्यास योग्य होय; एकंदर मनुष्यसमुदायाचें किंवा मानवजातीचें होईल तेवढें कल्याण व्हावें, एतदर्थ मनुष्यानें आपल्या सर्व मानसिक व शारीरिक शक्तींचा उपयोग करणें हाच धर्म. अशी गोष्ट असतांही जॉन् स्टुअर्ट मिल्ल यास कांहीं धर्मच नव्हता व तो धर्महीन मनुष्य होता, असें ह्मणणें रास्त आहे काय? मला वाटतें कीं असें ह्मणणें योग्य नाहीं. तेव्हां आपणांस असें मानणें भाग आहे कीं, त्याच्याही मागें एका प्रकारचें धर्मवेड लागलेंच होतें. कारण, हा धर्म नव्हे तर दुसरें त्यास काय ह्मणावें? ब्राह्मण देवांस मानीत होते, बौद्ध देवांस मानीत नव्हते; एवढ्यावरून बौद्धांस धर्मच नव्हता, असें ह्मणतां येईल काय? खरें पाहूं गेलें असतां लाखामध्यें सुद्धां धर्मविहीन असा एक देखील मनुष्य सांपडणें कठीण. ज्याच्या बुद्धीस चांगला संस्कार झाला आहे, ज्यास शास्त्रदृष्टि आहे व ज्याचें मन ज्ञानानें उज्वल झालें आहे, असा पुरुष ज्या अनंतशक्तीचें मनन करितो तो धर्म; त्याचप्रमाणें अत्यंत बुद्धिहीन, दुर्बल, असा रानटी मनुष्य, ज्याची स्थिति वानरापेक्षां फारशी चांगली नाहीं, तो एखाद्या लांकडाची किंवा धोंड्याची पूजा करितो, त्याचेंही नांव धर्मच होय.

कॉण्ट् नांवाचा अर्थशास्त्री होता त्याचें मत असें आहे कीं, धर्म ह्मणजे नीति; जो मनुष्य आपलें वर्तन, आपला आचारविचार ईश्वराज्ञेनुसार आहे असें समजतो किंवा ठेवण्याचा यत्न करितो, तो त्यासच धर्म असें मानितो.

फिश्टे नांवाचा दुसरा एक पंडित या विरुद्ध आपलें मत देतो. तो ह्मणतो कीं, शुद्ध व्यवहारांत केवळ नीतीची मात्र अपेक्षा आहे: जे लोक दुराचारी किंवा कुव्यसनी असतात त्यांस मात्र धर्माची अपेक्षा आहे. फिश्टे यांचें ह्मणणें 'धर्म ह्मणजे ज्ञान.' हें मत कांहीं अंशीं आमच्या वेदांती व नैयायिक लोकांच्यासारखें आहे. कारण त्यांचेंही ह्मणणें

'ज्ञानाखेरीज हृदयशुद्धि नाहीं, व हृदयशुद्धी खेरीज मोक्ष नाहीं' असेंच आहे. या दोन पंडितांतच इतका मतभेद पडला, तेव्हां आतां दोघांमधला खरा कोण? आमचे व्याख्यानकार भट्ट मोक्षमूलर ह्मणतात कीं, दोघेही एका अंशीं खरे व एका अंशानें खोटे. प्रत्येक मतवादी ह्मणेल कीं धर्माविषयीं माझी कल्पना अमुक व धर्म ह्मणजे माझ्या मतानें अमकीच एक गोष्ट; धर्म ह्मणजे सुनीति, सद्व्यवहार व तो करण्याविषयीं ईश्वराज्ञा आहे असें मानणें हा धर्म. असें कोणाचें मत असणें किंवा त्याच्या दृष्टीनें त्यास असें वाटणें हें ठीक आहे, त्यास ना नाहीं. पण प्रत्येकानें हें मात्र पक्कें लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, हें मत सार्वजनिक किंवा सर्वमान्य आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं. धर्म ह्मणजे कसा असावा त्याची कल्पना प्रत्येक पंडितानें आपापल्या इच्छेप्रमाणें व बुद्धिवैभवाप्रमाणें हवी तशी करावी. पण धर्म ह्मणजे काय आहे किंवा काय होता, ह्या गोष्टीच्या संबंधानें वरील निरनिराळ्या पंडितांचीं मतें आपल्या उपयोगाचीं नाहींत.

श्लीयरमेकर नांवाचा दुसरा एक प्रसिद्ध पंडित ह्मणतो कीं, धर्म ह्मणजे 'पूर्ण पराधीनता.' या व्याख्येची पूर्तता करण्याकरितां फाँइरब्याँक् नांवाचा पूर्वी सांगितलेला पंडित ह्मणतो कीं, 'पराधीनतेबरोबर लोभही आला पाहिजे. अर्थात् मनुष्य आपलें तन, मन व मुख्यत्वेंकरून मन, ज्या शक्तीस तो मानितो त्या शक्तीच्या आधीन करितो. त्याचप्रमाणें पूजा करण्यामध्यें त्याचा कांहीं तरी स्वार्थ असला पाहिजे. ईश्वराची स्तुति केल्यापासून मनुष्यास कांहीं तरी फलप्राप्तीची आशा असतेच. पूजकास किंवा भक्तास कांहीं लाभ व्हावा अशी इच्छा असणें साहजिक आहे.' हें फाँइरब्याँक्चें ह्मणणें विचार केला असतां खरेंच आहे.

पण हेगल् नांवाचा दुसरा एक पंडित विनोदानें ह्मणतो कीं, श्लीयरमेकरच्या ह्मणण्याप्रमाणें जर धर्म ह्मणजे केवळ पराधीनताच असेल, तर मग कुतऱ्यासारखा धार्मिक दुसरा कोणीच जगांत सांपडणार नाहीं! कारण, कुतरा जितका आपल्या धन्यावर अवलंबून असतो

किंवा धन्याच्या आधीन असतो, तितका कोणताही मनुष्य आपल्या देवाच्या आधीन असेल काय ? श्लीयरमेकरच्या मताचा असा उपहास करून हेगल् आपलें मत सांगतो कीं, धर्म ह्मणजे 'पूर्ण पराधीनता' नसून उलटी 'पूर्ण स्वतंत्रता' असा मानिला पाहिजे. धर्म ह्मणून ज्यास ह्मणतात त्यांत परतंत्रतेची कल्पना नसून उलट शुद्ध स्वतंत्रतेची कल्पना असावी. आतां या दोन विद्वानांच्या मतांत केवढा भेद पडला पहा ! तथापि दोघांचेंही ह्मणणें भिन्न भिन्न दृष्टया बरोबर आहे असें ह्मटलें पाहिजे.

फॉइरब्यॉक् व कॉम्प्ट यांनीं असें लिहिलें आहे कीं, मनुष्यास मनुष्य स्वभावाहून दुसऱ्या कोणत्याही अधिक उदात्त अशा वस्तूची कल्पना करण्याचें सामर्थ्यच नाहीं. तेव्हां धर्म ह्मणजे मानव पूजा, ह्मणजे प्रत्येक मनुष्याची पूजा नाहीं, तर जी एकंदर मनुष्यजाति तिची पूजा अथवा सेवा. माणसांचा मनुष्यत्व हा जो गुण, तोच या धर्माची पूज्यदेवता होय. फॉइरब्यॉक् याचें दुसरें असें ह्मणणें आहे कीं, अहंभाव किंवा आत्मप्रीतिशिवाय धर्म संभवतच नाहीं. हेंही अंशतः खरें आहे.

हरडर् नांवाचा पंडित ह्मणतो कीं, पृथ्वींतील जें उत्तमोत्तम ज्ञान त्याचें बीज, ग्रंथानें किंवा मुखानें एकापासून दुसऱ्यास अशा परंपरेनें प्राप्त झालेल्या धर्मज्ञानांत असतें. फॉइरब्यॉक् ह्मणतो कीं, धर्म हा एक मनुष्यस्वभावास लागलेला मूळरोग होय. मनुष्याचें रोगी अंतःकरण हेंच त्याच्या धर्माचें मूळ आहे. एवढेंच नव्हे, पण त्याच्या सर्व विपत्तींचेंही कारण आहे. हिरॉक्लिटस् याचें ह्मणणें असें आहे कीं, धर्म हा एक प्रकारचा रोग आहे; इतकेंच कीं तो रोग पवित्र असा आहे. शिलर् ह्मणतो, 'मला तर कोणचाच धर्म मान्य नाहीं. आणि कोणताच धर्म मान्य नसण्याचें कारण, माझा स्वतांचा धर्म हें होय !' ह्मणजे ज्यांस खऱ्या धर्माचें ज्ञान झालें आहे त्यांस लौकिक धर्माचा स्वीकार करण्यांत अर्थ वाटत नाहीं. हें देखील खरेंच आहे.

एक ह्मणतो, 'मनुष्यानें आपल्या अंतःकरणांत केलेली जी गुप्त प्रार्थना तोच त्याचा धर्म.' दुसरा विचारतो, 'अहो, ह्मणून काय झालें,

कांहीं तरी कर्ममार्ग पाहिजेना? त्याशिवाय धर्म कसचा?' तिसरा ह्मणतो, 'तुह्मी दोघेही चुकतां. अंतःकरणांतील गुप्त प्रार्थना असो कीं कर्मकांड असो; दोन्हीही केवळ भ्रांत्यात्मक आहेत. धर्म ह्मणून मुळीं कांहींच नाहीं!'

याप्रमाणें धर्म शब्दाची व्याख्या पहातां पहातां आपण थकून गेलों. तरी देखील कांहीं एक नक्की असें ठरलें नाहींच. तेव्हां खरी गोष्ट अशी दिसते कीं, धर्म ह्मणजे काय, हा प्रश्न विचारण्यासारखाच नाहीं. आणि या प्रश्नाचें एकच उत्तर आजपर्यंत मिळालें नाहीं व मिळणारही नाहीं. धर्म ह्मणजे अमुक एक गोष्ट असें सांगतां येत नाहीं. तेव्हां आमचे श्रोते असें पुसतील कीं, तर मग इतका वेळ एवढी मोठी खटपट केली ती कशाकरितां? त्याचें उत्तर हेंच कीं, ही खटपट फुकटाफुकटी नाहीं. तर हे अनेक पंडितांचे विचार मी एकत्र केले आहेत, त्यांपासून आपणांस शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. धर्म ह्मणजे काय हा प्रश्न जरी फारच कठीण आहे, तरी या खटपटीनें आपल्या अज्ञानाचें निरसन झालें. आपण धर्म ह्मणजे अमुकच एक गोष्ट असा वृथा अभिमान धरून बसतों ही आपली मोठी चूक आहे असें आपणांस समजलें, तर हें काय थोडें झालें?

पण 'अंतर्धर्म' याचा अर्थ भट्ट मोक्षमूलर काय करितात पाहूं. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, मनुष्यमात्रांत अशी एक कांहीं भावनाशक्ति आहे कीं जिच्या योगानें त्यास त्या अनंत वस्तूचें आकलन करितां येतें. तिचें नांव अंतर्धर्म किंवा श्रद्धा होय.

आतां ही भावनाशक्ति ह्मणजे काय याविषयीं विचार करूं, ह्मणजे धर्म ही कल्पना निष्पन्न झाली कशी तें समजेल. एकंदर मतवादी पंडित इतकी गोष्ट खास स्वीकारतील कीं, मनुष्यास इंद्रियें व बुद्धि या दोन गोष्टी आहेत व तीं दोन्हीं आपापलीं कार्यें करितात. आणि सर्वांस एवढेंही कबूल केलें पाहिजे कीं, इंद्रियें हीं नैसर्गिक आहेत. ह्मणजे तीं आपणाबरोबरच जन्मास आलेलीं आहेत.

बुद्धि हा इंद्रियज्ञानाचाच परिणाम होय. ह्मणजे इंद्रियें ज्या क्रिया क-

रितात त्यांचें फळ हेंच बुद्धीला कारण होतें. आपण जें कांहीं पहातों, किंवा ऐकतों, त्या पहाण्याच्या किंवा ऐकण्याच्या क्रियेचा परिणाम मनावर होऊन पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टीचा अनुभव आपणांस प्राप्त होतो. इंद्रियजन्य जें ज्ञान त्यास **भासना** असें नांव देऊं व इंद्रियजन्य ज्ञानाचें जें फळ किंवा त्याचा जो परिणाम त्यास **भावना** असें ह्मणूं. **भावना** ही **भासनेचें** फळ होय असें ह्मटलें तरी चालेल.

पण ही सान्त वस्तूची गोष्ट झाली. अनंत वस्तूची काय व्यवस्था आहे, ती आतां पाहूं. व्याख्यानकार ह्मणतात कीं, या ठिकाणीं एक तिसरी शक्ति तिसरी क्रिया करिते. ही तिसरी शक्ति, श्रद्धा अथवा अंतर्धर्म होय. या तिसऱ्या शक्तीस अनंत वस्तूचें ग्रहण करण्याची योग्यता आहे. या शक्तीचें जें फळ तो सर्वोत्कृष्ट परिणाम होय. प्रथम इंद्रियांच्या योगानें आपणास सान्त वस्तूचें ज्ञान होतें; मग बुद्धीच्या बळानें त्या अनन्त वस्तूचा अनुभव होऊन त्या वस्तूची कल्पना बनते. आणि शेवटीं, ह्मणजे **भासना** व **भावना** हे दोन्ही प्रकार झाल्यानंतर, तिसरा प्रकार घडतो. तो असा कीं, श्रद्धा हा जो एक मानसिक धर्म किंवा ही जी एक शक्ति, तिच्या योगानें सान्त पदार्थाच्या कल्पनेवरूनच अनंत वस्तूचा विचार करण्याचें सामर्थ्य येतें. १ इंद्रिय, २ बुद्धि, ३ श्रद्धा, असे हे तीन प्रकार किंवा ह्या तीन पायऱ्या, अनंताप्रत नेणाऱ्या आहेत. आतां यांपैकीं श्रद्धा ह्मणजे दुसरें कांहीं नाहीं, तर इंद्रियें व बुद्धि या दोघांच्या परस्पर केवळ संयोगानें झालेला परिणाम. हा 'अंतर्धर्म' किंवा श्रद्धारूप ही विलक्षण शक्ति मनुष्यांत येते कशी? **मोक्षमूलर** ह्मणतात कीं, विलक्षण ह्मणण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. त्यांत कांहीं नवें नाहीं. बुद्धि व श्रद्धा यांत भेद तर खरा, पण भेद सर्वांत आहेच. इंद्रियजन्य ज्ञान व बुद्धि यांत कांहीं थोडा भेद आहे? आपण डोळ्यांनीं पहातों व कानांनीं ऐकतों हें कसें, कशाकरितां, कोणत्या साधनानें, वगैरे प्रश्न किती उत्पन्न होतात? ही क्रिया किंवा हा इंद्रियव्यापार कसा होतो ही गोष्ट सर्वांत मोठी आहे. तथापि या गोष्टीचा विचार करितो कोण? या गोष्टी नेहमींच्या अनुभवाच्या होऊन गेल्या

आहेत. डोळ्यांस पहाण्याची शक्ति आहे व कानास ऐकण्याची शक्ति आहे, हें सिद्ध असून स्वाभाविक आहे असें मानणें भाग पडतें. आणि असें जर आहे तर, धर्मज्ञान किंवा श्रद्धा ही इंद्रियजन्य ज्ञान व बुद्धि या दोहोंचा परिणाम आहे, या गोष्टीचा विस्मय कां वाटावा? कांहीं कारण नाहीं. बुद्धि ही इंद्रियजन्य ज्ञानाचा परिणाम आहे असें ह्मणणें पुष्कळ पंडित कबूल करितात.

आतां आपण सान्त व अनंत या दोन शब्दांचा विचार करूं. सान्त वस्तू तिला ह्मणतात कीं जी इंद्रियगम्य होय व बुद्धीस जिचें आकलन करितां येतें. याकरितां अनंत शब्दाचा अर्थ 'अंताशिवाय' ह्मणजे ज्यास अंत नाहीं असा नव्हे. तर 'अंताच्या बाहेरचा किंवा पलीकडचा ( विषय )' एवढाच अर्थ केला पाहिजे. हा भेद फारच अगत्याचा असून नेहेमीं चांगला लक्षांत ठेविला पाहिजे. कारण, शब्दाचा खरा अर्थ समजून घेतल्याखेरीज असा गहन विषय कधींही समजणार नाहीं.

जे लोक असें समजतात कीं, धर्म ह्मणून कांहीं पदार्थच नाहीं व असण्याचा संभवही नाहीं, त्या लोकांचा मुख्य वाद असतो तो असा : 'आपलीं इंद्रियें व बुद्धि आपापलीं कामें करीत असतात. आणि या दोहोंच्या साधनानें किंवा सांहाय्यानें मनुष्याचीं सर्व कार्यें पार पडतात. तेव्हां या दोहोंशिवाय तिसरें धर्मज्ञान, किंवा श्रद्धा ह्या शक्तीची किंवा अशा कांहीं एक गुणाची कल्पना करणें मौर्ख्य होय. इंद्रियें व बुद्धि या दोहोंपासून मनुष्यांत धर्मवृत्ति किंवा श्रद्धा हा गुण उत्पन्न होण्याचा संभवच नाहीं.'

भट्ट मोक्षमूलर या मतवाद्यांस उत्तर देतात : 'तुमचें ह्मणणें स्वीकारून मी असें सिद्ध करून देतों कीं, जर इंद्रियें आपापले व्यापार करीत आहेत व त्यांच्या आश्रयानें किंवा आधारानें बुद्धिही आपले व्यापार करीत राहील, तर ह्या दोन्ही व्यापारांच्या परिणामा ऐवजीं श्रद्धा ह्मणून तिसरा एक गुण उत्पन्न होण्याचा संभव आहे. एवढेंच नव्हे; तर ही श्रद्धा आपल्यांत अवश्य उत्पन्न होणारच होणार! इंद्रियें व बुद्धि जर आप-

त्यापाशीं आहेत तर धर्मज्ञान झालेंच पाहिजे, श्रद्धा उत्पन्न झालीच पाहिजे. तुह्मीं हवें तें करा, नियत गोष्ट घडून येणारच, असा माझा सिद्धांत आहे. धर्मवृत्ति किंवा श्रद्धा अशा प्रकारची कांहीं एक शक्ति मनुष्यांत आहे असें सिद्ध करण्यास आपणास एकाच गोष्टीची जरूर आहे. ती ही कीं इंद्रियज्ञान. तें आमच्या प्रतिपक्षानीं कबूल केलेंच आहे. इंद्रियज्ञान प्राप्त झालें कीं त्याबरोबर धर्मज्ञान आपण होऊनच येणार. कांकीं, दुसरा प्रकार पहिल्याचाच परिणाम होय. या धर्मज्ञानाच्या मुळाचा शोध करितां कांहीं एक नवी शक्ति किंवा गुप्त, अव्यक्त अशी कांहीं एक वृत्ति परिस्फुट होते, असें मानण्याची गरज नाहीं. त्याचप्रमाणें श्रुति, किंवा ईश्वरवाणी, किंवा दैविक प्रेरणा ( Revelation ) इत्यादि कल्पावयाची जरूर नाहीं. इंद्रियज्ञान गृहीत केलें कीं केवळ इतिहासाच्या आधारानें धर्मवृत्ति किंवा श्रद्धा सिद्ध होणार.'

मोक्षमूलर यांचें आणखी असें मत आहे कीं, मनुष्यांत निराळी अशी कांहीं एक धर्मवासना अथवा शक्ति आहे असें नाहीं. किंवा अमुक एक मनुष्यास किंवा राष्ट्रास धर्म ह्मणून एक चीज नवी ताजी बनवून ईश्वरानें उचलून त्याला दिली आणि ह्मटलें कीं 'घ्या बाबानों हा धर्म' अशी कांहीं गोष्ट नाहीं. धर्म हा एक इंद्रियें व बुद्धि यांचा परिणाम आहे. सान्त वस्तूचें ज्ञान होण्यास इंद्रियें व बुद्धि यांचे ठिकाणीं पूर्ण सामर्थ्य आहे. याच्या पलीकडची जी अनंत वस्तु किंवा जो अनंत भाग त्याचें ज्ञान करून देणें हा धर्माचा गुण होय. याचेंच नांव धर्म व हेंच धर्माचें मूळ होय.

पण आपण जें जें पहातों, जें जें ऐकतों, तें सर्व सान्त किंवा समर्याद आहे काय? नाहीं. नेत्रांनीं पाहिलें किंवा सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिलें किंवा दुर्बिणीनें पाहिलें तथापि जें कांहीं सान्त आपल्या अवलोकनांत येतें त्याच्या पलीकडे अनंत असा भाग आहेच आहे. प्रत्येक बिंदूच्या पलीकडे दुसरा एक बिंदु आहेच आहे. सूक्ष्माहून सूक्ष्म, स्थूलाहून स्थूल, असा प्रकार विश्वरचनेंत आहे. खरोखर, ज्यास आपण मर्यादा, किंवा हद्द, अथवा अंत असें ह्मणतों त्या शब्दावरूनच ही क-

ल्पना स्पष्ट दिसते कीं त्या हद्दीच्या किंवा अंताच्या पलीकडे कांहीं तरी हद्दी शिवाय, अमर्याद, अंत रहित, अनंत आहेच. नाहीं तर अंत हा शब्द व ती कल्पना आली कोठून?

पण आतां असा प्रश्न निघेल कीं, मनुष्यास त्याच्या पंचेंद्रियांनीं सान्त वस्तूचें ज्ञान होतें, हें उघडच आहे; तथापि अनंताचें ज्ञान त्यास होतें हें कशावरून व कसें होतें? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, ज्या इंद्रियांच्या द्वारा मनुष्यास सान्त वस्तूचें ज्ञान होतें त्याच वेळीं त्यास अनंताचेंही भान होतें. 'अमुक पदार्थाचा अंत अजून मला कळत नाहीं' असें ज्यास वाटतें, त्याच्या मनांत अनंताची भावना उतरली असें समजलें पाहिजे. आणि त्या अनंतास पहात असतां त्याची गणना किंवा त्याचें मापन जरी आपणांस करितां येत नाहीं, तरी अनंत म्हणून कांहींएक भाग आहे अशी आपली समजूत होते. त्या अनंताचें ज्ञान आपणांस होतें एवढेंच नव्हे, तर त्याचा स्पर्शही आपणास होतो. तें येऊन आपणास जणों बिलगतें! कारण, आपल्या सभोंवतीं सूक्ष्म दृष्टीनें पहातां सर्व कांहीं अनंतानेंच भरलें आहे. वस्तुतः अदृश्य हें अनंताचें दुसरें नांव आहे. तें अदृश्य आपणास दिसतें. आपण विचाराल "काय हो चमत्कार हा! अहो, अदृश्य म्हणजे न दिसणारें जें, तें दिसतें असें तुम्ही म्हणतां, त्या तुम्हांस वेड तर लागलें नाहींना! अशी अघटित गोष्ट होईल कशी?" आमचें उत्तर हें कीं, खरोखरच असा चमत्कार घडतो. प्रथमदर्शनीं हा एकप्रकारचा विरोधाभास* वाटतो. पण त्याचें निरसन कसें होतें ऐका. अदृश्य आपल्या डोळ्यांत, कानांत, भरून राहिलें आहे; आणि सांगत आहे कीं, अहो! हें मी अदृश्य येथें आहें पहा! सारांश काय कीं नेत्र, कर्ण, इत्यादि इंद्रियें ज्या क्षणीं सान्त वस्तूला पहातात, ऐकतात, त्याचक्षणीं तीं इंद्रियें अनंतासही पहातात, ऐकतात, वगैरे सर्व प्रकार तसेच होतात.

---

* विरोध + आभास = विरोध आहे, असा भास मात्र व्हावा व पुढें त्याचें निरसन व्हावें. संस्कृत अलंकारशास्त्रांत विरोधाभास या नांवाचा एक अलंकार आहे. तोच शब्द प्रस्तुतस्थळीं इष्टार्थद्योतनार्थ घातला आहे. भा. क.

आणि एवढेंच नव्हे. घटकाभर अशी कल्पना करूं कीं, एक मनुष्य एका उंच पर्वतावर, किंवा एका विस्तीर्ण मैदानांत, किंवा एखाद्या बेटावर उभा आहे. हें बेट एका अफाट समुद्राच्या मध्यभागावर आहे; आणि त्याच्या डोक्यावर आकाशाचा प्रचंड व विशाळ घुमट ठेऊन दिला आहे. माझी तर खात्री आहे व आपणही असें पक्कें समजा कीं, अशा ठिकाणीं उभा राहिलेला जो मनुष्य, त्यास अगोदर त्या अनंताचें ज्ञान होईल आणि मग सान्त पदार्थांचें होईल. आतां आपण अत्यंत सूक्ष्म पदार्थांचा विचार करूं. सान्त वस्तूच्या पलीकडचा जो भाग तो सर्व अनंताचा भाग होय. जें मर्यादित, त्याच्या भोंवतालचें जें कांहीं, तें सर्व अनंतस्वरूप होय. या सृष्टीमध्यें अशी लहानांत लहान वस्तूच नाहीं, कीं ती आहे त्याहून लहान करितां येणार नाहीं. आपणांस ठाऊक आहे कीं काळा हा रंग अमुक व गोरा हा अमुक. पण, त्या काळ्या रंगाचा काळा रंग किंवा काळेपणा कमी होतां होतां त्याचा गहिरा किंवा फिकट रंग झाला असें केव्हां व कुठें ह्मणावें, अथवा त्या गहिऱ्या रंगाचा गहिरेपणा कमी होतां होतां पांढरा झाला कुठें ह्मणावें, ही गोष्ट आपणांस नुसत्या डोळ्यांनीं किंवा सूक्ष्मदर्शक यंत्रानें तरी खास सांगतां येईल काय? अनेक जातीचे रंग सुद्धां पूर्वींपासून लोकांस ठाऊक नव्हते. प्रथम मनुष्यांस दोनच रंग ठाऊक असावेत असें वाटतें. एक काळा व दुसरा पांढरा. या दोन रंगांच्या न्यूनाधिक्यानें, ह्मणजे एकांत दुसरा मिसळल्यानें, किंवा एकांतून दुसरा काढून टाकिल्यानें, इतके हे तऱ्हेतऱ्हेचे रंग झाले आहेत. इतकें तर खचित आहे कीं, निळा किंवा ज्यास अस्मानी रंग ह्मणतात, तो आपणांपैकीं बहुतेकांस चांगला ठाऊक असतो. पण त्याविषयीं वेदामध्यें किंवा पारशांचा धर्मग्रंथ जो झंद अवेस्ता त्यामध्यें, किंवा युनानी लोकांच्या धर्मपुस्तकांत, या अस्मानी रंगाला शब्दच नाहीं! ग्रीक लोकांचा प्रसिद्ध कवि जो **होमर** त्याच्या महाकाव्यांत निळ्या किंवा अस्मानी रंगाचा उल्लेखच नाहीं. तसाच नव्या करारांतही नाहीं व जुन्या करारांतही नाहीं. आपणांस हें ऐकून फार आश्चर्य वाटेल यांत संशय नाहीं. पण प्राचीनकाळच्या माणसांस हा निळा रंग ठाऊक नव्हता असें

२

खास दिसतें. निदान त्या रंगास निराळा शब्द त्यांच्या भाषेंत नव्हता हें भट्ट मोक्षमूलर यांच्या मताप्रमाणें निर्विवाद आहे. तर आतां आपणांस असें ह्मणण्यास कांहीं एक अडचण नाहीं कीं, अनंताशिवाय सान्त वस्तूची कल्पना होत नाहीं व या अनंताच्या भावनेंत किंवा कल्पनेंत आपणास मनुष्यधर्माच्या ऐतिहासिक परिणामाचें मूळ सांपडतें.

मोठमोठ्या विद्वानांस आपण असें बोलतांना पुष्कळ वेळ ऐकिलें असेल कीं, सान्त अथवा मर्यादित अशा या अल्पसामर्थ्य बुद्धीस अनंत वस्तुविषयीं विचार करण्याचें सामर्थ्य नाहीं. याकरितां आपल्या धर्मपुस्तकावरच आस्था किंवा श्रद्धा ठेऊन निर्वाह करावा हेंच योग्य. पण खरोखर हें मत आपल्या ज्ञानास व आपल्या बुद्धीस अगदीं उचित नाहीं, असें ह्मणावें लागतें. कारण, मनुष्यास शोधकबुद्धि असणें, किंवा जिज्ञासा असणें, यासारखें उन्नतिप्रद दुसरें काय आहे ?

आपणांस विचार करितां करितां एवढें समजलें कीं मनुष्यास जें इंद्रियजन्य ज्ञान होतें, त्याच्यापासूनच पुढें श्रद्धा उत्पन्न होणें हा एक त्या ज्ञानाचा अवश्य परिणाम होय. आणि ही श्रद्धा ह्मणजे, सर्व सान्त पदार्थांस व्यापून त्यांच्या पलीकडेही पसरलें आहे असें जें अनंत, त्याची कल्पना अथवा भावना असें समजावें.

आपल्या पूर्वजांस त्या अनंताची कल्पना होण्यापूर्वीं सान्त वस्तूंचें ज्ञान झालें असावें. त्या अनंताचें ज्ञान प्रथमतः त्यांस पर्वत, किंवा नद्या, किंवा झाडें; सूर्य, पर्जन्य, विद्युत्, किंवा आकाशांतील मेघगर्जना, इत्यादिकांवरून झालें असेल. त्या अनंताला आपल्या पूर्वजांस कांहीं एक नांव देतां येईना. आणि कांहीं एक नांव तर दिलें पाहिजे. ह्मणून प्रथम त्यास ते 'गर्जना करणारा,' 'प्रकाश देणारा,' 'आयुष्य देणारा' असें ह्मणत. पाठीमागून त्या अनंताशीं त्यांचा अधिक निकट संबंध झाल्यामुळें, त्यांनीं त्यास कर्ता, राज्यकर्ता, आश्रयदाता, राजा, पिता, पति, अधिपति, देव, देवाधिदेव, कारण, कारणाचें कारण, अशीं नांवें दिलीं. आणि जसजशी त्या द्रष्ट्याची बुद्धि अनुभवानें अधिकाधिक विकास पावत चालली तसतशीं त्या अनंताला

'अविनाशी,' 'अज्ञान' व सरतेशेवटीं, 'अज्ञेय,' अशीं नांवें मिळत गेलीं.

तेव्हां एकंदरींत काय दिसतें? मनुष्यांत इंद्रियें, बुद्धि व श्रद्धा हे जे तीन प्रकार आहेत त्यांच्या योगानें एकामागून एक अशा परंपरेनें तो अनंत वस्तु ओळखण्यास समर्थ झाला. ही अनंत वस्तु ओळखण्याची शक्ति कांहीं अघटित, अकस्मात् होणाऱ्या गोष्टीसारखी नव्हे. तर ही गोष्ट केवळ उत्तरोत्तर होणाऱ्या क्रियांचा परिणाम होय. या विश्वांत सर्व पदार्थ उत्पन्न होतात व वृद्धि पावतात. त्याप्रमाणें धर्मही उत्पन्न होऊन वृद्धि पावला आहे. सर्व लोकांच्या धर्माचें कारण एकच. तें हें कीं त्या अनंत वस्तूचें ज्ञान होण्याची इच्छा. पण धर्माची वृद्धि मात्र निरनिराळ्या लोकांत निरनिराळ्या रीतीनें झाली. ही वृद्धि आर्य लोकांत कशी झाली, तें भट्ट मोक्षमूलर यांच्या या पुढील व्याख्यानांवरून कळून येईल. धर्म ह्मणून कांहीं आहे, धर्म असण्याचा संभव आहे व धर्म अवश्य आहे. इतक्या गोष्टी आपणांस कळल्या. अनंत वस्तूची भावना हेंच कोणी बीज. त्यापासून धर्मरूप हें कोणी लहानसें झाड प्रथम उत्पन्न झालें. हजारों वर्षे तें वाढत गेलें व हल्लीं त्याचा एक मोठा भव्य वृक्ष आपणांपुढें उभा आहे!

ही धर्माची रचना एकंदर सृष्टिनियमास अनुसरूनच आहे. यांत अतर्क्य, अलौकिक, किंवा अद्भुत कांहीं नाहीं. मनुष्यांचा उद्धार यांत होईल कीं नाहीं, या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांतून मुक्त होण्याला मार्ग यांत आहे किंवा नाहीं, माझा धर्म खरा आणि तुमचा खोटा असा वृथा अभिमान धरून मनुष्यानें परस्परबंधुत्व तोडून टाकावें किंवा कसें, इत्यादि मोठ्या महत्वाचे जे अनेक प्रश्न निघतात ते प्रस्तुत विषयास सोडून आहेत. तेव्हां त्यांचीं उत्तरें प्रत्येक वाचकानें आपापल्या बुद्धीप्रमाणें व अनुभवाप्रमाणें देऊन आपलें समाधान करून घ्यावें हें बरें.

## भट्ट मोक्षमूलर यांच्या मताचा सारांश.

( मि. बहिरामजी मलबारी यांच्या मूळ गुजराथीवरून. )

भाषा व धर्म यांची उत्पत्ति व वृद्धि यांजविषयीं व्याख्यानकारांचे विचार विलक्षण आहेत. त्यांचें मत खरें किंवा खोटें हें वाचकांनीं विचार करून पहावें. परंतु यांचे विचार बहुधा सयुक्तिक असून कोणीही समंजस मनुष्य त्यांस हरकत करील असे ते नसतात. वृक्षाच्या बीजामध्यें त्याच्या सर्व जीविताचें मूळ असतें हें आपण जाणतों. एका लहानशा बीजामधून मोठें झाड उत्पन्न होतें व त्यावर फळें व पानें येतात, हेंही आपणांस आपल्या अनुभवावरून समजतें. आणि सिद्धपदार्थशास्त्रावरून आपणांस हें माहित झालें आहे कीं पदार्थमात्र परमाणूंचा बनला आहे. याच न्यायास अनुसरून भट्ट मोक्षमूलर ह्मणतात कीं, भाषा ही अजमासें चारपांचशें धातूंपासून बनली आहे. हे धातु भाषेचीं मूलतत्वें होत. ह्मणजे, मनुष्यमात्र हल्लीं जी जी भाषा बोलतो आणि जे जे विचार प्रदर्शित करण्याकरितां त्या भाषेचा उपयोग करितो, त्या सर्वांचें मूळ पाहिलें तर या वर सांगितलेल्या धातूंच्या अल्पसंख्येंत आहे. त्यांपैकीं प्रत्येक धातु कांहीं एकच पृथक् विचार दर्शवीत नसून एकच प्रकारचे अनेक उदात्त विचार दर्शवितो. सारांश, या मूलतत्वांवर सर्व भाषांचा पाया रचला आहे. व्याख्यानकार इंग्रजी, शब्द ( Man ) व संस्कृत शब्द मनुष्य, या दोन्ही शब्दांचें मूळ मनु या शब्दांत आहे, असें ह्मणतात. मनु ह्मणजे 'विचार करणारा.' विचार करणें ही शक्ति मनुष्यांतच आहे, पशूंमध्यें नाहीं. प्रस्तुत विषयाच्या संबंधानें व्याख्यानकार व मि. डारविन् या दोघांच्या मतांत मोठा विरोध आहे. सृष्टशास्त्रज्ञ मि. डारविन् यांचें मत असें आहे कीं, मनुष्याची प्रस्तुत स्थिति ही

पशुस्थितीचा परिणाम असून त्याची उत्पत्ति वानरापासून आहे. या मताचें खंडन भट्ट मोक्षमूलर यांच्या मतानें सहज होतेंच. आतां वर सांगितलेले जे चार पांचशें धातु, हे मूळ कसे झाले या प्रश्नाचें उत्तर व्याख्यानकार असें देतात कीं, त्यांची उत्पत्ति मनुष्यजन्मापासूनच आहे. पशूपेक्षां अधिक असे मनुष्यांत जन्मापासूनच जे जातिगुण ह्मणून आहेत, त्यांपैकींच हा एक आहे असें समजावें. मनुष्यवाणीचा जसजसा विस्तार होत गेला, तसतसा या मूळ धातूंचाही लोप होत गेला. आरंभीं मात्र त्यांची अपेक्षा होती. व्याख्यानकार यांचें आणखी असें मत आहे कीं, भाषा तेथून सर्व एकाच मुळापासून उत्पन्न झाली असेल या गोष्टीचा फार संभव आहे. कारण कीं आर्यन्, तुरेनियन् व सिमेटिक् हे जे भाषेचे तीन मोठे वर्ग, त्यांतील कित्येक मूळ धातु तिहींस सामान्य आहेत.

वर सांगितलेले धातु प्रथम मनुष्याच्या उपयोगीं पडले असतील, हें तर खरें. पण या धातूंपासून मोठमोठ्या भाषा—संस्कृत, झन्द, हीब्री किंवा यहुदी व लॅटिन्, इत्यादि—केव्हां व कशा झाल्या असतील हें सांगणें कठीण आहे. पूर्व व पश्चिम अशा या पृथ्वीच्या दोन भागांतील बहुतेक अर्वाचीन भाषा वर सांगितलेल्या मोठ्या भाषांमधूनच निघालेल्या आहेत. पण या मूळ भाषांपासून अन्य भाषांचा उत्पत्तिकाल निश्चयानें सांगणें फारच कठीण आहे. भाषेची उत्पत्ति व वृद्धि या संबंधानें व्याख्यानकारांचा जो तर्क आहे, त्याप्रमाणेंच धर्माविषयींही आहे. समग्र धर्म एका लहानशा मुळापासून उत्पन्न झाला असून तें मूळ, त्या अनंत वस्तूचें ज्ञान करून घेण्याची मनुष्यांत जी ग्राहकशक्ति आहे तीच होय. या विषयावर पुढील भागांत व्याख्यानकारांनीं अधिक विस्तारानें लिहिलें आहे. प्रस्तुतस्थलीं वाचकांस हें कळविलें पाहिजे कीं, पदार्थपूजा हें सर्व धर्मांचें आदिस्वरूप होय, असें जें कित्येक विद्वानांचें मत आहे त्या मताचें खंडन करण्याकरितां व्याख्यानकारांनीं एका ठिकाणीं बरेंच विस्तारपूर्वक लिहिलें आहे.

व्याख्यानकार संस्कृतांत आपलें नांव "भट्ट मोक्षमूलर" असें लिहितात. आम्हीही त्याच नांवाचा उपयोग ठिकठिकाणीं केला आहे. मोक्षमूलर हें नांव संस्कृताच्या सरणीनें पहातां फार सुरेख दिसतें व त्याच्या रचनेंत बरेंच चातुर्य दृष्टीस पडतें. मोक्षमूलर या शब्दाचा अर्थ पाहिला तरः—मोक्ष ह्मणजे आत्म्याची मुक्तता—आणि मूलर ह्मणजे त्याच्या मुळांत वास करणारा, ह्मणजे आत्मविमोचनामध्येंच आनंद मानणारा, असा आहे. खरोखर, साहेबांनीं आपल्याइकडील ब्रह्मानंद किंवा दयानंद या नांवाचीच हुबेहूब नक्कल उतरली आहे!

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



# व्याख्यान तिसरें.

## आर्यावर्तांतील प्राचीन ग्रंथसंग्रह.

### ग्रंथोपलब्ध धर्मांचें ज्ञान व त्यांचा उपयोग.

धर्मांची उत्पत्ति झाली कशी? या प्रश्नाचें उत्तर देतांना आफ्रिका, अमेरिका, आणि ऑस्ट्रेलिया या देशांविषयीं विचार करण्यापेक्षां, ज्या देशांत धर्माचीं मुळें फार खोल गेलेलीं आहेत अशा देशांचा विचार करणें हें मला फार प्रशस्त वाटतें. आतां या प्रकारचा विचार करीत असतांही अनेक अडचणी येतात, हें मला ठाऊक आहे. परंतु केवळ रानटी लोकांच्या धर्माविषयीं विचार करण्यापेक्षां ज्या देशांत धर्मरूप वृक्ष फार जुन्या काळचा असून, त्याचीं मुळें व फांद्या फार विस्तार पावलीं आहेत, अशा ठिकाणीं परिश्रम केले असतां आपला यत्न बराच सफल होईल अशी माझी समजूत आहे.

कोणत्याही एका धर्माचे ग्रंथ आपण वाचले असतां त्या धर्माचा इतिहास थेट मुळापर्यंत आपणास चांगला कळेल असें नाहीं, ही गोष्ट खरी आहे. धर्मरूप नदीचा मूळ उगम कोठें आहे तो आपणांस कळावा अशी आपली इच्छा असते खरी. परंतु जों जों आपण त्या उगमाच्या जवळ जवळ जातों, तों तों धर्मग्रंथ हे आपल्या अगदीं उपयोगीं पडत नाहींत असें दिसतें. या गोष्टीस इलाज नाहीं. कारण, कोणत्याही धर्माचें महत्व प्रथमारंभीं त्या काळच्या लोकांस अगदींच वाटत नाहीं.

जोंपर्यंत कोणताही एक विवक्षित धर्म, मूळ संस्थापक व त्याचे इतर शिष्य यांच्या खेरीज दुसऱ्या कोणास ठाऊक नसतो, तोंपर्यंत भोंवतालच्या इतर लोकांचें लक्ष त्या धर्माकडे मुळींच जात नाहीं. माझ्या दृष्टीनें मला एकंदरींत धर्माचे दोन प्रकार आढळतात. पहिल्या प्रकाराचें नांव मी 'सार्वजनिक धर्म' असें ठेविलें आहे व दुसऱ्या प्रकारास 'व्यक्तिविशिष्ट धर्म' असें नांव दिलें आहे.

प्रथम कित्येक वर्षें अशीं जातात कीं धर्माला सार्वजनिकपणा येतच नाहीं. आरंभींच त्याचीं अमुक एक मतें, किंवा अमुक एक विधि, अशी कांहीं व्यवस्था होत नाहीं. त्या धर्माला कांहीं नांवही दिलेलें नसतें. कोणताही धर्म जगांत बहुमान्यतेस किंवा प्रसिद्धीस येण्यापूर्वी प्रथम त्यास थोडथोडें महत्व प्राप्त होऊन कांहीं काळानें त्यास दृढता यावी लागते. पुढें अशीं कांहीं माणसें निपजतात किंवा अशी एक मंडळी निघते कीं, त्या धर्माची मूळ उत्पत्ति कशी झाली व पुढें त्याचा लागलाच प्रसार कसकसा होत गेला या गोष्टींविषयीं त्यांपैकीं ज्याला जी कांहीं माहिती असेल, ती एकत्र करून तो ती चांगली राखून ठेवतो. यामुळें सर्व धर्मांच्या मूळ आरंभाविषयीं माहितीचा जेवढा भाग असतो तेवढा बहुधा सर्वत्र दंतकथांनीं भरलेला असतो, ह्मणजे, त्यांत खरोखर ऐतिहासिक तत्व फार थोडें असतें असें दृष्टीस पडतें. हा प्रकार विलक्षण किंवा अलौकिक ह्मणण्यासारखा आहे असें नाहीं. तर असें होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. मनुष्यस्वभावाचे जे कांहीं नियम आहेत त्यांपैकीं एका नियमास अनुसरूनच ही गोष्ट घडते.

### यहुदी, झोरोआस्टर् (पारशी) इत्यादि धर्मांत धर्मविषयक कल्पना कसकशा वाढत गेल्या.

आतां धर्माच्या पायाचा मूळ आरंभ होतो तो कोठें व कसा हें सविस्तर कळण्याचें साधन जरी कोणत्याही ठिकाणीं सांपडत नाहीं तरी इतकें खरें कीं, कांहीं देशांत धर्मविषयक कल्पनांची वृद्धि उत्तरोत्तर कशी होत गेली हें समजण्यास बरीच सामग्री सांपडते. पण ही गोष्ट आफ्रिका, अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांतील रानटी लोकांच्या संबंधानें पाहतां केवळ अशक्य आहे. कारण तेथील लोकांचा धर्म मुळारंभीं कसा होता किंवा एक हजार वर्षां पूर्वींची त्याची काय स्थिति होती, हें कांहीं एक कळण्यास अगदीं मार्गच नाहीं असें ह्मटलें असतां चालेल.

M1a 2E04
CCO24

ग्रांथिक धर्म किंवा ग्रंथगत धर्म असें ज्यास म्हणतात, त्या धर्माच्या संबंधानेंही अशाच अनेक अडचणी येतात. उदाहरण:—

यहुदी धर्मांतही वृद्धि व नाश हीं तत्त्वें आहेतच. पण त्याचा शोध लावण्यास दृढ अभ्यास केला पाहिजे व बुद्धीची स्थिरता विशेष पाहिजे. जुन्या करारांतील बहुतेक अध्यायांच्या कर्त्यांचा हेतु यहुदी धर्माची वृद्धि व विनाश हीं दाखविणाऱ्या गोष्टी झांकून ठेवण्याचा दिसतो. यहुदी धर्म जणों मुळापासूनच सर्वप्रकारें परिपूर्ण असून देवानें अगदीं कोरा करकरीत तयार करून माणसांच्या हातांत दिला व त्यांत घालमिल होण्याचा संभव असला तथापि त्यांत अधिक सुधारणा करतां येऊंच नये अशा प्रकारचा आहे, असें दाखविण्याचा यत्न त्यांनीं केला आहे. यहुदी धर्मांत एकेश्वरी मत निघण्याच्या अगोदर अनेकेश्वरी मताचें प्राबल्य होतें, यांत शंका नाहीं व ही गोष्ट बहुतेक पंडितांस आलीकडे मान्य झाली आहे. देवास कोणत्या प्रकारचा बळी किंवा यज्ञ आवडतो, याविषयीं यहुदी धर्मपुस्तकांत दोन ठिकाणीं दोन मतें आढळतात. " कारण. यज्ञानें तुला आनंद होत नाहीं. जर तुला आनंद होता तर मी हवन अर्पण केलें असतें. अग्नीस अर्पण केलेल्या द्रव्यांनीं तुला आनंद होत नाहीं. ईश्वरप्रीत्यर्थ जो यज्ञ करणें तो पश्चात्तापदग्ध अशा आत्म्याचा होय. अनुतापानें दग्ध व छिन्नभिन्न झालेलें हृदय हाच आमचा यज्ञ. हे देवा! त्याचा तूं अवमान करणार नाहींस." (नवा करार. गीत ९१, ओंवी १६). या ठिकाणीं उघड उघड धर्माची वृद्धि दिसते. कांहीं पंडितांस 'ईश्वरदत्त धर्म' व त्यांत 'वृद्धि' या दोन गोष्टी अगदीं परस्पर विरुद्ध वाटणार आहेत. तथापि त्यांत खरें पाहूं गेलें असतां गोष्ट अशीच आहे. ह्यावरून काय अनुमान निघतें हें ज्याचें त्यानें पहावें.

मोझेस्च्या धर्माची जी गोष्ट तीच झोरोआस्टर्च्या धर्माचीही आहे. आपला धर्मही पहिल्यापासून अगदीं परिपक्व व सर्वगुणसंपन्न आहे अशी पूर्वीपासून त्या धर्मानुयायी लोकांची (पारशांची) समजूत आहे. तो धर्म अहुर्मझ्द यानें प्रकट केला व झॉरातुस्त्र यानें प्रसिद्धीस आणिला. गाथा या नांवाचा जो त्यांचा धर्मग्रंथ आहे त्यांत कांहीं

कांहीं ठिकाणीं धर्माचा पुरातन असा भाग दृष्टीस पडतो. परंतु अवेस्तामध्यें अशा प्रकारच्या धर्मवृद्धीचीं कांहीं चिन्हें दिसत नाहींत.

ग्रीस व इटली या देशांतील पुराणकथा व धर्म यांचा विचार करितां, त्यांची बालदशा कोणची, तरुणदशा कोणची, व परिपक्कदशा कोणची, हें समजण्याची मोठी मुष्कील पडते. ग्रीक भाषेंतलि आधुनिक किंवा अर्वाचीन ग्रंथांत आढळणाऱ्या कल्पना होमर कवीच्या प्राचीन काव्यांत सांपडत नाहींत हें आपणांस ठाऊक आहे. तथापि एवढ्यावरूनच त्या कल्पना किंवा ते विचार पुरातन काळचे नसून फार अर्वाचीन काळचे असतील असें ह्मणवत नाहीं. एकेक कथा एकेका लोकसमूहाच्या संबंधाची असेल; एका देवाचें पूजास्थान किंवा त्याच्या मुख्य आराधनेची जागा, एका विवक्षित स्थळींच असेल. तेव्हां त्याच्या संबंधाची माहिती जर पुढच्या एखाद्या कवीपासून आपणांस मिळाली तर तेवढ्यावरूनच ह्मणजे त्यांची पश्चादुत्पत्ति सिद्ध होते असें नाहीं. शिवाय ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ग्रीक व रोमन् लोकांच्या धर्माचें यथार्थ ज्ञान होण्यास दुसरी एक मोठी अडचण येते. ती कोणची ह्मणाल तर, त्यांच्यांत खरोखर अमुक एक धर्मपुस्तक किंवा पवित्र ग्रंथ असें कांहींच नाहीं. यामुळें त्यांच्या धर्माची सविस्तर माहिती मिळण्याचें एक मुख्य साधनच नाहींसें झाल्यासारखें आहे.

## आर्यावर्तांत धर्माची वृद्धि.

धर्माची उत्पत्ति व वृद्धि, यांचें खरें ज्ञान होण्यास आर्यावर्तांत जशी सोय आहे तशी दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं. मी 'इतिहास' असें न ह्मणतां 'वृद्धि' ह्मणून मुद्दाम ह्मटलें आहे. याचें कारण, सामान्यतः इतिहास ह्मणून ज्यास आपण ह्मणतों, त्या प्रकारचा इतिहास संस्कृत ग्रंथांत बहुतकरून नाहींच ह्मटलें तरी चालेल. पण आर्यावर्तांत धर्मसंबंधाची माहिती मिळण्याचीं साधनें बरींच आहेत; त्यांचा अन्य देशांत अभाव आहे. धर्मविषयक विचार व धर्मविषयक भाषा हीं मूळ उत्पन्न झालीं कशीं, त्यांस जोर येऊन तीं वाढत गेलीं कशीं, पसरलीं

कशीं व त्यांचा क्रम एकाच्या मुखांतून दुसऱ्याच्या मुखांत, एकाच्या मनांतून दुसऱ्याच्या मनांत असा होतां होतां त्यास भिन्न भिन्न स्वरूपें प्राप्त झालीं कशीं, आणि इतकें असून मूळ ज्या उगमापासून त्यांचा प्रादुर्भाव झाला त्या उगमाची थोडी तरी ओळख पदोपदीं त्यांनीं राखली कशी, इत्यादि गोष्टी समजण्याचें साधन जसें आर्यावर्तांत आहे तसें अन्य देशांत नाहीं.

तेव्हां धर्म या एकंदर विषयाचें ज्ञान आपणांस करून घेणें असेल तर आणि मुख्यत्वें धर्माची उत्पत्ति व वृद्धि यांचें ज्ञान व्हावें हा हेतु असेल तर, तो हेतु पूर्ण होण्यास आर्यलोकांचे प्राचीन व पवित्र ग्रंथ फार उपयोगाचे व महत्वाचे आहेत. मानवी भाषेची उत्पत्ति व वृद्धि, हा विषय शिकण्यास आर्य लोकांची संस्कृत भाषा हें बलवत्तर साधन आपणांस सांपडलें व त्या साधनाचा पुष्कळ उपयोग झाला, यांत संशय नाहीं. त्याप्रमाणेंच प्रस्तुत विषयाची गोष्ट आहे. ही माझी अतिशयोक्ति आहे असें नव्हे तर मी ह्मणतों याप्रमाणें माझी स्वतांची पक्की खातरी झाली आहे. धर्माची उत्पत्ति व वृद्धि यांविषयीं माझी जी कल्पना आहे तिचें स्पष्टीकरण करण्याकरितां इतिहासांतील जीं उदाहरणें मी दिलीं आहेत तीं सर्व आर्यावर्तांतील पुरातन धर्मापैकींच आहेत. ही कल्पना मला सुचली कशी ह्मणाल, तर मी आर्यावर्ताच्या पवित्र ग्रंथाचा अभ्यास बहुतेक जन्मभर करीत आलों आहें, त्यामुळें ती मला सुचली. तेव्हां या कल्पनेचा पाया दृढ आहे, एवढी गोष्ट खरी. आतां त्या पायावर मी आपल्या बुद्धीनें जी इमारत बांधली आहे, ती होईल तेवढी बळकट करण्याची जबाबदारी मी आपल्या शिरावर घेऊन काम केलें आहे. तें बरें वाईट ह्मणणें आपणांकडे आहे.

## धर्मविज्ञानाच्या संबंधानें वेदाचें खरें महत्व.

आर्यावर्तांत धर्माच्या उत्पत्तीचा व वृद्धीचा जसा प्रकार घडला तसाच सर्वत्र घडला पाहिजे असें माझें ह्मणणें मुळींच नाहीं. प्रस्तुत ठिकाणीं भाषाविज्ञानाच्या संबंधाची एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

ती ही कीं भाषाविज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांस ज्या मोठमोठ्या अडचणी येतात त्या अडचणी दूर करण्याचें बलवत्तर साधन संस्कृताचें मार्मिक ज्ञान संपादन करणें हेंच होय. अन्य नाहीं. एवढेंच नव्हे, पण मी तर असें ह्मणतों कीं अन्य भाषांच्या रचनेस लागणारीं जीं साधनें व जो मार्ग, त्यांचें यथार्थ ज्ञान होण्यास संस्कृत भाषेची व्यवस्था समजणें, फार उपयुक्त आहे व अत्यंत अवश्य आहे ह्मटलें तरी चालेल. परंतु *बॉप् याला मलया, पॉलेनेशियन्, कॉकेझन् इत्यादि अगदीं जंगली भाषांमध्यें सुद्धां संस्कृतांतील शब्द किंवा रूपें आहेत असें वाटलें. हें मात्र अगदीं चुकीचें आहे अशी माझी समजूत आहे. त्याचप्रमाणें आर्यभाषेमध्यें व्याकरणाचे जे नियम व ज्या प्रक्रिया दृष्टीस पडतात त्यांच्याखेरीज मनुष्यप्राण्यांची भाषा अन्य साधनांनीं होणारच नाहीं असें ह्मणणें हाही मोठाच भ्रम आहे.

तेव्हां हीच गोष्ट जगांतील धर्मांचा विचार करितांना आपल्या लक्षांत पक्की बाळगली पाहिजे. ह्मणजे भाषाविज्ञानाप्रमाणें धर्मविज्ञानांतही आपले विचार हवे तितके वेड्यासारखे भडकूं न देण्याची खबरदारी आपणांस आरंभापासून ठेविली पाहिजे. आर्यावर्तांतील पूर्वकालीन लोकांच्या मनांत धर्मविषयक कल्पना आल्या कशा, त्या पुढें कालेंकरून वाढत गेल्या कशा, बदलल्या कशा व त्यांस मलीनत्व प्राप्त झालें कसें, या गोष्टी आपणांस एकदां कळल्या ह्मणजे कदाचित् दुसऱ्या लोकांसही अशाच कल्पना प्रथम सुचल्या असाव्या व त्यांत कालेंकरून असाच बदल झाला असावा, असें आपणांस ह्मणतां येईल. पण याच्यापेक्षां अधिक कांहीं सांगतां येणार नाहीं. नाहीं तर ऑफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशांतील अगदीं जंगली लोकांत पदार्थ पूजा आहे असें पाहून, प्रत्येक मनुष्यजातीच्या अज्ञानावस्थेंत धर्मविषयक कल्पनांचा आरंभ पदार्थ पूजेपासूनच झाला असावा, असा विलक्षण सिद्धांत काढण्याचें साहस करण्याचा दोष आपल्यावर येणार आहे.

---

* एक जार्मण्य भाषाशास्त्रवेत्ता.

तर मग आर्यावर्तातील अतिप्राचीनकाळच्या आर्यलोकांमध्यें धर्माची उत्पत्ति व वृद्धि कशी झाली, हें समजण्यास कोणत्या ग्रंथाचा आधार किंवा कोणत्या कागदपत्राचा पुरावा मिळत आहे, या गोष्टीचा आतां विचार करूं.

## संस्कृतग्रंथमालिकेचा शोध.

आर्यावर्तातील प्राचीनग्रंथसमूहाच्या शोधाचें वर्णन किंवा इतिहास ऐकून 'ही आरबी गोष्टींतील एक गोष्टच आहे,' असें पुष्कळांस वाटेल. आणि खरोखर चमत्कार असाच आहे. या गोष्टीच्या खरेपणाबद्दल आजपर्यंत कित्येकांस मोठा संशय होता व कदाचित् अजूनही असेल, या गोष्टीचें मला नवल वाटत नाहीं. ज्यांच्या पोथ्या अजूनपर्यंत उपलब्ध आहेत, अशा स्वतंत्र संस्कृत ग्रंथांची संख्या १०,००० दहा* हजारांवर असेल असा अजमास आहे. अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर बादशाह, यानें आर्यावर्तावर स्वारी करण्यापूर्वी कांहीं वर्षें अगोदर तो देश (आर्यावर्त) शोधून काढिला होता, त्या वेळीं त्या बादशहाचे स्वदेशीय पंडित प्लेटो व आरिस्टॉटल् यांस जर कोणी सांगितलें असतें कीं, 'बाबानों! आर्यावर्तांत असे एक एक चांगले चांगले प्राचीन ग्रंथ आहेत कीं त्यांच्या तोडीचें या तुमच्या ग्रीस देशांत कांहींच नाहीं!' तर ते काय ह्मणाले असते बरें?

त्या वेळीं प्राचीन ग्रंथाभ्यासाच्या संबंधानें बरीच चळविचळ झाली असावी असें वाटतें. पहिली भाषा बदलून गेली. पूर्वींच्या धर्माचीं रूपांतरें होतां होतां अगदींच एक नवा धर्म उत्पन्न झाला. कारण,

---

* बंगालचे प्रसिद्ध पंडित **राजेंद्रलाल मित्र** यांनीं **एशियाटिक् लायब्ररी** ह्मणून बंगाल्यांत एक नामांकित ग्रंथालय आहे, त्यांत संग्रह केलेल्या संस्कृत पोथ्यांची याद, १८७७, प्रस्तावना, पृष्ठ १ पहा. इंग्लंडांतील **इंडिया ऑफिस्** नांवाच्या पुस्तकालयांत ४९३ निरनिराळे संस्कृत ग्रंथ आहेत. **बॉडलेयन्** येथें ८५४ व **बर्लिन्** येथें तितकेच आहेत. **तंजावरकर महाराजांच्या** पुस्तकालयांत १८,००० व काशी येथील संस्कृत पाठशाळेंत २,००० आहेत. कलकत्ता येथें **एशियाटिक् सोसायटीच्या** पुस्तकालयांत ३,७०० व तेथील संस्कृत पाठशाळेंत २,००० आहेत.

ब्राह्मणांच्या पवित्र संस्कृत ग्रंथांच्या जुनेपणाविषयीं आपणांस कितीही संशय असला तरी एवढी गोष्ट खास निर्विवाद आहे व ती अर्थात् आपणांस कबूल केली पाहिजे कीं " सांड्रोकोटस् " किंवा ज्यास आर्यलोक चंद्रगुप्त असें ह्मणतात हा राजा, ग्रीक इतिहासकारांच्या ह्मणण्याप्रमाणें, ज्या वेळीं शिकंदर बादशहानें आर्यावर्तावर स्वारी केली त्या वेळीं अगदीं लहान होता. शिकंदर बादशहा या स्वारीहून ग्रीस देशास परत आल्यानंतर सांड्रोकोटस् हा " पालिबोथ्रा " किंवा पाटलीपुत्र या नगरांत राज्य करीत होता. हा राजपुत्र व संस्कृत ग्रंथांतरीं वर्णिलेला " पाटलीपुत्र " नगरीचा राजा चंद्रगुप्त हे एकच होत. या चंद्रगुप्त राजाचा वंश पुढें मोठा वाढला. बौद्ध धर्मानुयायी प्रसिद्ध राजा अशोक याचा चंद्रगुप्त हा आजा होय. बौद्ध धर्माचा एवढा प्रसार होण्यास अशोक राजाच कारण झाला व त्यानें ख्रिस्ती शका पूर्वी २४२ किंवा २४५ व्या वर्षीं बौद्धांची एक मोठी सभा भरविली होती, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. या अशोकाच्या वेळचे खडकावर खोदलेले लेख अद्यापि आर्यावर्तांत ठिकठिकाणीं सांपडतात. हे लेख शुद्ध संस्कृत भाषेंत लिहिलेले नाहींत. हल्लींची इटालियन् व पूर्वींची लाटिन् यांत जसें अंतर पडलें आहे तशाच प्रकारचें अंतर संस्कृतांत व या कोरींव लेखांच्या भाषेंत आढळतें. या सर्व गोष्टींवरून इतकें सिद्ध होतें कीं, ख्रिस्ती शका पूर्वी तिसऱ्या शतकाच्या अखेरीस संस्कृतभाषा बोलण्याचा प्रचार बंद झाला असावा. अशोक ज्या धर्माचा होता तो बौद्ध धर्म व पुरातन वैदिक ब्राह्मण धर्म, या दोहोंचा संबंध " इटालियन् " व " लॅटिन् " किंवा " प्रॉटेस्टन्ट " व " रोमन् क्याथलिक् " यांच्यासारखा आहे. बौद्ध धर्म ब्राह्मण धर्माच्या विरुद्ध आहे. आर्यावर्तांतील संस्कृत विद्या ही सारी झूट आहे असें मानणारे व धडधडीत आपल्या डोळ्यांनीं दिसतात अशा गोष्टींवरही विश्वास न ठेवणारे जे आह्मी, त्या आमची पक्की खात्री करण्यासारख्या आर्यावर्ताच्या प्राचीनइतिहाससंबंधाच्या दोनच गोष्टी सांगतों. त्या ह्या कीं, ख्रिस्ती शकापूर्वी तिसऱ्या शतकांत जुनी संस्कृत भाषा

बदलून तिला प्राकृताचें रूप आलें व पुरातन वैदिक धर्म बदलून त्यानें बौद्ध धर्माचें रूप धारण केलें. आणि चंद्रगुप्ताचा नातू जो अशोक राजा त्याच्या अमलांत, बौद्ध धर्म हा राजमान्य धर्म होऊन गेला.

## वेद ईश्वरप्रणीत आहेत अशी प्रसिद्धि.

बौद्ध धर्माच्या व ब्राह्मण धर्माच्या मतभेदांपैकीं मुख्य भेद असा आहे कीं एक ह्मणतात—वेद पवित्र व ईश्वरप्रणीत आहे. दुसरे ह्मणतात कीं वेद पवित्र व ईश्वरप्रणीत नाहींत. आर्यावर्तांतील प्राचीन देवताशास्त्राच्या वृद्धीचा विचार करितांना या मतभेदाचें इतिहासदृष्ट्या इतकें महत्व आहे कीं, या मतभेदाचें खरें तत्व समजण्याचा यत्न करणें जरूर आहे. जरी बौद्ध लोक बहुतेक गोष्टींत ब्राह्मणच होते तरी, वेद ईश्वरप्रणीत आहेत ही गोष्ट त्यांस कबूल नव्हती. ज्या अर्थीं वेद अप्रमाण आहेत असें बौद्ध धर्मी लोक ह्मणूं लागले त्या अर्थीं असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं कीं, बौद्ध धर्म उत्पन्न होण्याच्या पूर्वीं वेदांच्या ईश्वरप्रणीतत्वाबद्दल बरीच वाटाघाट झाली असावी. वेद ईश्वरप्रणीत अतएव अमोघ* आहेत, असें सिद्ध करण्याचा यत्न ब्राह्मणांनीं केव्हां केला हें सांगणें कठीण आहे. वेदाच्या ईश्वरप्रणीतत्वाची ही कल्पना अर्थात् हळू हळू दृढ होत चालली असावी व शेवटीं या मताचें एक मोठें शास्त्र बनून राहिलें असावें असें वाटतें. कारण इतर धर्मांचीही गोष्ट अशीच आहे. वेदकवि किंवा मंत्रकर्ते आपल्या काव्याविषयीं अनेक प्रकारें बोलतात. कांहीं ठिकाणीं असें सांगतात, कीं मंत्र आह्मी केले; कांहीं ठिकाणीं आपलें कवन, सुतार, किंवा वस्त्रें विणणारा, किंवा लोणी काढणारा, किंवा नौका चालविणारा यांच्या कामासारखें आहे असें मानतात (ऋ० १०.११६.९). अन्यत्र ठिकाणीं, यापेक्षां उदात्त विचार दृष्टीस पडतात. 'हे मंत्र आह्मीं हृदयानें बनविले (१.१७१.२; २.३५.२.) किंवा मुखानें उच्चारिले,' असेंही ह्मणतात (६.३२.१.) त्यांतील एखादा कवि ह्मणतो कीं, हा अमुक मंत्र मला

* कधीं न चुकणारे, सत्य, निर्दोष, प्रमादरहित.

सांपडला (१०.६७.१.) दुसरा ह्मणतो, सोमरस यथेच्छ प्राशन केल्यावर मला उत्कृष्ट प्रेरणा झाली ( ६.४७.३. ), आणि मी आपलें कवन, ढगापासून फुटून बाहेर येणारी पावसाची जी सर, तिच्याप्रमाणें समजतों (७.९४.१.). अथवा वायु जसा जोरानें अभ्रांस वाहून नेतो (१.११६.१) त्याप्रमाणें कोणी कवि आपलें कवन मानितो. कांहीं काळानंतर 'मंत्रांत प्रदर्शित केलेले विचार अंतःकरणांतच उत्पन्न होतात व ते ईश्वरदत्त आहेत, असें मानूं लागले ( १.३७.४. ). कवींच्या बुद्धीस देव जागृत करीत अशी त्यांची कल्पना असे (६.४७.१०). देव कवींस साहाय्य करीत व ते आपले मित्र आहेत असें मानीत (७.८८.४; ८.९२.४.) व शेवटीं शेवटीं देव स्वतांच द्रष्टे व कवि आहेत असें समजूं लागले (१.३१.१). कवींनीं देवांस उद्देशून आपल्या कवनांत ज्या प्रार्थना केल्या आहेत, त्या जर सफळ झाल्या तर त्या मंत्रांत किंवा कवनांत कांहीं एक अद्भुत किंवा दैविक अंश आहे अशी कल्पना सहज निघे. मग देव व माणसें यांचा प्रत्यक्ष व्यवहार चालतो असा समज अर्थात् लोकांचा झाला ( १.१७९.२; ७.७६.४. ). याप्रमाणें ईश्वरी प्रेरणेची कल्पना सिद्ध झाली व देव माणसांशीं स्वतां बोलतात अशी भावना पुरातन ब्राह्मणांच्या मनांत हळू हळू उत्पन्न होऊन ती दृढ होत गेली.

त्याच वेळीं, ह्मणजे पूर्वीपासूनच त्यांच्या मनांत संशयही येऊं लागले व नास्तिकपणा आस्तिकबुद्धिबरोबरच वाढला. आपल्या प्रार्थना व आपले मंत्र देवता ऐकत नसतील; कारण, वसिष्ठ व विश्वामित्र यांजमध्यें जेव्हां कलह उत्पन्न झाला त्या प्रसंगीं ज्या शत्रूंनीं इतर देवांची प्रार्थना केली त्यांसच जय प्राप्त झाला; तेव्हां अर्थात् संदेहात्मक विचार सुचूं लागले. ते इतके कीं, सर्व देवांत जो लोकप्रिय व श्रेष्ठ देव इंद्र त्याच्यावरही धाड पडून 'तो नाहींच' असे उद्गार कांहीं मंत्रांत ऋषि उघड बोलून दाखवूं लागले. तथापि जर वेदांचें ईश्वरप्रणीतत्व मंत्ररूप काव्याच्या बाहेर फारसें निघालें नसतें, तर त्यांच्या संबंधानें इतकें वैमनस्य किंवा इतका विरोध उत्पन्न होण्याचें कारणच नव्हतें. पण वेद अमोघ व ईश्वरप्रणीत आहेत, असें जेव्हां

दुराग्रहानें ब्राह्मण ह्मणूं लागले, व असें मत ज्यांत प्रतिपादन केलें आहे अशीं जीं ब्राह्मणें, ह्मणजे ब्राह्मण नांवाचे ग्रंथ, ते देखील वेद ईश्वरप्रणीत व अमोघ आहेत असें प्रतिपादन करूं लागले, तेव्हां सहज बौद्ध पंथासारखा एखादा विरुद्ध पंथ उत्पन्न होण्याची अवश्यकता इतिहासदृष्ट्या स्पष्ट दिसते. ही गोष्ट विशेषेंकरून सूत्र ग्रंथांच्या वेळेस घडून आली असावी असें वाटतें. यद्यपि ब्राह्मणग्रंथांत वेदाचें ईश्वरप्रणीतत्व सिद्ध असल्यासारखें मानिलें आहे असें आढळतें, तथापि मला वाटतें कीं, एकंदर सर्व आक्षेपांचें निरसन किंवा सर्व विरोधांचा परिहार करणें अवश्य वाटण्यापुरती बळकटी या मताला आली होती असें दिसत नाहीं. वेदग्रंथ व वेदांगभूत इतर ग्रंथ यांस 'श्रुति' अशी संज्ञा दिली आहे. ह्या श्रुतीचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मण, अध्याय ७९, या ठिकाणीं केला आहे. तरी त्या स्थळीं एकंदर संशयाचा किंवा विरोधाचा परिहार करण्याची योग्यता 'श्रुति' या शब्दास अजून आली नव्हती असें दिसतें.

जुन्या उपनिषदांत वेदनिर्दिष्ट मंत्र व यज्ञविधि हे निष्फळ व निरर्थक आहेत व त्यांहून ऋषिप्रणीत परमार्थज्ञान हेंच श्रेष्ठ होय, असें प्रतिपादन केलें आहे. तरी वेद ह्मणजे निवळ ढोंग आहे असें ह्मणण्यापर्यंत अद्यापि मजल येऊन पोंचली नव्हती. परंतु सूत्रकालांत हा विरोधभाव पूर्णपणें दृष्टीस पडतो. निरुक्तामध्यें (१.१५) यास्क ऋषि, वेदमन्त्र अर्थरहित आहेत असें कौत्स ऋषीचें मत सांगतात. आतां कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, कौत्स या नांवाचा ऋषि खरोखर कोणीही नसून कौत्स हें एक काल्पित नांव आहे. अशी जरी कल्पना केली, तरी वेदांविषयीं जो अत्यंत पूज्यभाव, तो यास्क व पाणिनी या दोहोंच्या पूर्वी बरेच दिवसांपासून कमी कमी होत आला होता, हें निर्विवाद आहे. आणि इतकेंही खचित आहे कीं, बौद्ध धर्माचा संस्थापक जो बुद्ध गौतम हा, वेदांची पवित्रता व वेदांचें प्रामाण्य नाकबूल करणाऱ्यांपैकीं एक होता. वेदाच्या आधारावर अवलंबून असणारे ब्राह्मणांचे इतर हक्क नाकबूल करणाऱ्यांपैकीं हाच पहिला किंवा हा एकटाच होता असें नाहीं. इतर देशांप्रमाणें आर्या-

र्तातही पाखंडमताचा इतिहास पूर्वापार समजण्याची मोठी मुष्कील पडते. नास्तिकमताचा पुरातन आचार्य जो बृहस्पति, ज्याचें नांव अर्वाचीन तत्वज्ञानविषयक संस्कृत ग्रंथांत वारंवार येतें, त्याचे ग्रंथ अद्यापि सांपडले नाहींत. हा नास्तिकाचार्य बृहस्पति कोणत्या काळीं होऊन गेला हें मला ठाऊक नाहीं. तथापि प्रस्तुत स्थळीं बृहस्पतीच्या नांवानें प्रसिद्ध अशा कांहीं मतांचें दिग्दर्शन मात्र करितों. त्यांवरून आपणांस इतकें स्पष्ट समजेल कीं, वेदांच्या ईश्वरप्रणीतत्वाविषयीं ब्राह्मणांचा मोठा कटाक्ष असून त्या संबंधाची मोठीच वाटाघाट होऊन कितीएक दिवस वाद चालू होता.

सर्वदर्शनसंग्रह या नांवाचा एक प्रसिद्ध ग्रंथ संस्कृतांत आहे. त्यांत आत्मज्ञानविषयक अनेक विचारांचा इतिहास दिला आहे. याचें इंग्रजी भाषांतर प्रोफेसर कौवेल् यांनीं केलें आहे. यांत प्रथमारंभीं ज्या दर्शनाचा इतिहास दिला आहे, त्यास चार्वाकदर्शन असें नांव आहे. हा चार्वाक बृहस्पतीच्या मताचा अनुयायी होता. या पंथाच्या अनुयायी लोकांस लोकायतिक अशी संज्ञा आहे; ह्मणजे, इहलोक मात्र खरा, मरणोत्तर कांहीं नाहीं, असें मानणारे हे लोक होते. त्यांचें मत असें आहे कीं 'चार महाभूतां खेरीज जगांत दुसरें कांहीं नाहीं. या चार महाभूतांचा कांहीं एक परिणाम होऊन हें सेंद्रिय शरीर उत्पन्न होतें. मग त्याच्या ठिकाणीं चैतन्य हा गुण उपजतो. आणि कांहीं विवक्षित पदार्थ किंवा द्रव्यें एकत्र केलीं असतां त्या मिश्रणाच्या ठिकाणीं जसा एक मादक धर्म उत्पन्न होतो, त्याप्रमाणें चैतन्य हा देहाचा धर्म होय. आत्मा ह्मणजे चैतन्यविशिष्ट शरीर. कारण, आत्मा ह्मणजे देहाहून भिन्न अशी कांहीं एक वस्तु आहे, असें मानण्यास कांहीं प्रमाण नाहीं. ज्ञान केवळ इंद्रियद्वारा होतें, अन्य साधनांची अपेक्षा त्यास नाहीं. यालोकीं सुखोपभोग मिळणें हाच मनुष्याचे जीविताचा मुख्य हेतु होय.' यावर प्रतिपक्षी असा आक्षेप करितात कीं, मोठमोठे शहाणे व

---

* शांकरशारीरकभाष्य. अ. ३ पा. ३ सूत्र ५३. पहा.—भा. क.

विद्वान् मानिलेले लोक अग्निहोत्र व इतर वैदिक विधि कां करितात? याचें उत्तर चार्वाक असें देतात:—

'अहो! हा तुमचा आक्षेप बरोबर नाहीं. कारण, आह्मी ह्मणतों कीं अग्निहोत्रादिक हीं केवळ निर्वाहाचीं उत्तम साधनें आहेत. वेदावर मोठे असे तीन दोष येतात. पहिला, खोटेपणाचा; दुसरा, स्वयं-विरोध; तिसरा, चर्वितचर्वण किंवा पुनरावृत्ति. आह्मांस वेदाचें ज्ञान आहे, असें ह्मणणारे जे दांभिक व ढोंगी पंडित व कर्मनिष्ठ ब्राह्मण, त्यांच्यांतच परस्पर विरोध आढळतो. कारण, उपनिषद्भागांत उपदिष्ट जें ज्ञानकांड त्यास जे प्रमाण मानितात त्यांस, वेदमंत्र व ब्राह्मणग्रंथ यांत सांगितलेल्या कर्मकांडास प्रमाण मानणारे लोक पराजित करतात. आणि ज्ञानकांड खरें मानणारे कर्मकांडाचा अभिमान बाळगणाऱ्यांशीं भांडतात. फार काय, तीन वेद हे लुच्चे लोकांचे असंबद्ध प्रलाप आहेत व लौकिकांत ह्याप्रमाणें एक ह्मणही आहे, ती अशी:—

'अग्निहोत्र, तीन वेद, संन्याशाच्या तीन यष्टि व अंगाला भस्म फांसणें हीं, ज्यांस पौरुष नाहीं किंवा बुद्धि नाहीं अशा लोकांस केवळ निर्वाहाचीं साधनें आहेत, असें बृहस्पति ह्मणतात.'

**बृहस्पतीचीं अशींही वचनें आहेत:—**

१. 'ज्योतिष्टोम विधि करितांना तत्प्रीत्यर्थ मारिलेला पशु स्वर्गास जातो असें असेल तर, यज्ञकर्त्यानें यज्ञांत आपला बापच कां बळी न द्यावा!'

२. 'श्राद्धाच्या वेळीं पितरांस ह्मणजे मेलेल्या माणसांस दिलेला पिंड त्यांस पोंचतो व तो सेवन करून ते तृप्त होतात, असें असेल तर जे प्रवासास जातात त्यांच्याबरोबर प्रवासासाठीं शिधासामग्री देण्याची काय जरूर आहे?'

३. 'स्वर्गस्थ पितरांची श्राद्धसमयीं पिंडानें तृप्ति होते असें आहे, तर छपरावर उभें राहणाऱ्यास खालीं भुईवर उभें राहणाऱ्या लोकांनीं दिलेलें अन्न कां न पोंचावें?'

४. 'तस्मात् जीव आहे तोंपर्यंत मनुष्यानें सुखांत रहावें व कर्ज

काढून देखील तुपपोळी खावी; कारण, एकदां या देहाचें जळून भस्म झालें, मग पुनः येणें (पुनर्जन्म) कोठलें?'

५. 'हा देह सोडून जर प्राणी स्वर्गास किंवा तुमच्या ह्मणण्याप्रमाणें परलोक जिथे कोठें असेल तेथें जातो, तर मग त्यानें कधीं कधीं इष्टमित्रांस प्रीतीनें भेटण्यास यावें कीं नाहीं?'

६. 'यावरून एवढें स्पष्ट आहे कीं, ब्राह्मणांनीं मेलेल्या माणसांच्या संबंधानें जे अनेक विधि सांगितले आहेत, त्यांचा हेतु निर्वाहाचें साधन होय. पोटाकरितां केलेलीं ढोंगें: त्यांचें फळ दुसऱ्यांस कोठून मिळणार?'

७. 'ज्यांनीं तीन वेद केले ते मूर्ख, लबाड व पिशाच होते. कारण, असे हे वेडगळ व अर्थहीन मंत्र 'जर्फरी तुर्फरी इ०' शहाणा माणूस कसा करील? याप्रमाणेंच अश्वमेधांत सांगितलेले भयंकर विधि आणि भिक्षुकांस व उपाध्यायांस द्यावीं ह्मणून सांगितलेलीं अनेक दानें, यांचा विचार केला असतां, हें सर्व मूर्ख लोकांचें काम आहे असें स्पष्ट दिसतें. इतकेंच नव्हे तर मांसाहार करण्यासही ज्यांनीं आज्ञा दिली त्यांस पिशाच किंवा राक्षस ह्मणण्यास काय हरकत आहे?'

आतां हे ब्राह्मणधर्मावर केलेले कांहीं आक्षेप अगदीं आलीकडचे असतील. पण त्यांपैकीं बहुतेक बौद्ध मतवाद्यांचे आहेत. प्रोफेसर बुर्नुफ् यांनीं आपल्या ग्रंथांत स्पष्ट लिहिलें आहे कीं 'यज्ञांत मारिलेल्या पशूंस स्वर्गप्राप्ति होत असेल तर एखाद्यानें आपला बापच यज्ञांत बळी कां न द्यावा?' हा आक्षेप स्पष्ट बौद्ध मतवाद्यांचा आहे. जरी खिस्ती शतकाच्या तिसऱ्या शतकांतच बौद्ध धर्म अशोक राजानें सार्वजनिक व राजमान्य धर्म करून टाकला, तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, लोकांच्या मनांवर त्याच्या पूर्वीं कित्येक वर्षें ह्या धर्माचा ठसा वठत होता. आणि बुद्ध केव्हां मरण पावला याविषयीं खात्रीपूर्वक कांहीं सांगवत नाहीं, तरी त्याच्या नांवानें प्रसिद्ध जो शक तो खिस्ती शकापूर्वीं ५४३ वर्षांचा आहे. यावरून इतकें स्पष्ट दिसतें कीं बौद्ध धर्माची उत्पत्ति खिस्ती शकाच्या पूर्वीं ६०० वर्षें झाली.

माझ्या मताप्रमाणें, या काळापूर्वींचा जो ग्रंथसमूह तो इतिहाससंबं-

धानें फारच महत्वाचा आहे. एवढ्यावरून कालिदासकृत शाकुंतल नाटकाचें काव्यसौंदर्य कमी आहे असें माझें ह्मणणें नाहीं. याच कवीचें मेघदूत नांवाचें काव्य शाकुंतल नाटकापेक्षांही अधिक स्तुतीस पात्र आहे, असें मला वाटतें. कारण, त्यांत कवीची कर्तबगारी किंवा निपुणता विशेष दिसून येते. नलराजाची कथाही कांहीं भाग खेरीज करून फार मनोरंजक आहे. पंचतंत्र किंवा हितोपदेश यामध्येंही कांहीं कांहीं गोष्टी फार चुटकेदार आहेत. पण हा सगळा ग्रंथसमूह अगदीं आधुनिक आहे. हे ग्रंथ आलंकारिक व मनोरंजन करणारे आहेत इतकें मात्र ह्मणतां येईल. याहून त्यांची योग्यता अधिक नाहीं. सर विलियम् जोन्स व कोल्ब्रूक् यांस फुरसतीच्या वेळीं घटकाभर करमणूक करण्यास हे ग्रंथ ठीक होते. परंतु आपलें सर्व आयुष्य त्यांच्या अध्ययनांत घालण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं.

## वेदाच्या भाषेचें इतिहासदृष्ट्या महत्व.

तीच वेदग्रंथाची गोष्ट अगदीं निराळी आहे. एक तर इतिहास समजण्यास वेदभाषेचा फार उपयोग होतो. वेदभाषा ही साधारण संस्कृत भाषेहून फार भिन्न आहे. वेदभाषेंत असे कांहीं शब्द आहेत व अशीं कांहीं रूपें आहेत कीं तीं आलीकडच्या संस्कृतांत मुळींच आढळत नाहींत. पण तींच रूपें ग्रीक व दुसऱ्या आर्यभाषा यांमध्यें सांपडतात. ज्यास आपण इंग्रजी व्याकरणांत विध्यर्थ किंवा संकेतार्थ ह्मणतों, हें क्रियापदाचें रूप आलीकडच्या संस्कृतांत मुळींच नाहीं. भाषाशास्त्रवेत्त्यांनीं असें अनुमान केलें होतें कीं, हें रूप संस्कृतांत खास असलें पाहिजे; आणि खरोखर वेदाचा शोध लागून त्याचा अर्थ कळूं लागला तेव्हां त्यांत अशीं शेंकडो रूपें सांपडलीं. साधारण संस्कृतांत स्वर नसतात. वैदिक संस्कृतांत स्वर असून त्या स्वरपद्धतीचे जे कांहीं मुख्य नियम आहेत ते व ग्रीक भाषेच्या स्वरपद्धतीचे एकच आहेत असें आढळतें. एक उदाहरण देतों, ह्मणजे वैदिकसंस्कृत व ग्रीक या दोन भाषांचा निकट संबंध स्पष्ट होईल. ग्रीक "ड्यूस्" हा शब्द

व संस्कृत 'द्यौस्'=आकाश, हे दोन्ही शब्द मूळ एकच आहेत. परंतु आलीकडच्या संस्कृतांत "द्यौस्" हा शब्द स्त्रीलिंगी मात्र आहे. पण वेदांत हा शब्द ग्रीक "झ्यूस्" प्रमाणें पुल्लिंगी आहे एवढेंच नाहीं, तर ग्रीक व ल्याटिन् भाषेंत देवाधिदेवाला दिलेलें जें संयुक्त नांव त्या नांवाच्या दोन अवयवांपैकीं एक अवयव याच शब्दाचा आहे असें आढळतें. ज्युपिटर, किंवा "झ्यूस्पेतर" हाच शब्द वेदांत "द्यौष्पितर्" असा आहे. ग्रीक भाषेंतील "झ्यूस्" या शब्दाची प्रथमा विभक्ति 'झौ' अशी आहे ह्मणजे त्यांत विसर्ग नाहीं. पण संबोधनार्थी रूप होतें तें 'झौस्' असें रूप होतें, ह्मणजे विसर्ग लागतो. त्याचप्रमाणें वेदांतील "द्यौ" (आकाश) या शब्दाची व्यवस्था आहे. पण ग्रीक वैय्याकरणांस 'झौ' शब्दाचे संबोधनास विसर्ग कां लागतो, हें सांगतां येत नाहीं. आणि संस्कृत वैय्याकरण या गोष्टीची उपपत्ति स्वरोच्चाराचे नियमानुसार उत्तम रीतीनें करितात. मला तर, संबोधनार्थी हा 'द्यौस्' शब्द अतिउत्तम कारागिरांनीं अतिउत्तम कोंदणांत बसविलेलें, अति मूल्यवान् एक रत्नच आहे असें वाटतें. नुकतेच कांहीं वर्षांपूर्वी डॉक्टर श्लीमान्* यांनीं आपल्या अलौकिक प्रयत्नानें फार प्राचीनकाळचीं युनानी किंवा ग्रीक लोकांचें अत्यन्त कौशल्य दाखविणारीं जुनीं भांडीं हिसरलिक् व मैकिनी या ठिकाणीं शोधून काढलीं. तीं पाहून आजकाल प्रत्येकजणास मोठें आश्चर्य वाटत आहे. पण यांत मला स्वतांला फारसें आश्चर्य वाटत नाहीं. कारण, ग्रीस देशाच्या इतिहाससंबंधानें मी या जुन्या भांड्यांचें किंवा पदार्थांचें महत्व कमी आहे असें ह्मणत नाहीं; पण क्षणभर विचार करा, कीं "द्यौस्" या संबोधनार्थी शब्दाशीं त्यांची तुलना केली तर त्या शब्दापुढें एखादा भोंक पाडलेला किंवा घांसून तयार केलेला दगड, किंवा एखादें पाणी पिण्याचें भांडें, किंवा एखादी ढाल किंवा शिरस्त्राण, अथवा एखादा सोन्याचा मुकुट कां होईना, या जड पदार्थांची काय मोठी प्रतिष्ठा आहे? ज्याच्यांत फारसें कौशल्य किंवा कारागिरी दिसत नाहीं असे जड धातूचे भांडीं वगैरे पदार्थ कोठें व अत्यंत कुशलतेचें काम

---

* एक शार्मण्यभाषाशास्त्रवेत्ता.

ज्यांत दिसत आहे व ज्याची घडण फारच सुबक असून सुवर्णापेक्षांही अधिक मौल्यवान् पदार्थ जो मानसिक विचार त्याचा घडलेला असा दागिना कोठें? मिसर देशांतील मोठमोठे पिरामिड् ( दगडाच्या इमारती ) बांधण्यास व त्यांवर नक्षी काढण्यास हजारीं, कदाचित् लाखों माणसें लागलीं, असें ह्मटलें तर हेंही लक्षांत आणलें पाहिजे कीं 'द्यौस्' किंवा 'झ्यूस्' किंवा 'ज्युपितर,' ज्याचा मूळ अर्थ 'प्रकाशक' असा असून पुढें हळू हळू ज्याचा अर्थ 'ईश्वर' असा झाला, त्या ह्या एका चमत्कारिक शब्दाची घडणही कोट्यावधि माणसें करीत होतीं. आणि अशा इमारती वेदांत बहुत आहेत व वेदभूमीवर अशीं दिव्य रत्नें सर्वतो पसरलीं आहेत, ही गोष्ट विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपणांस ही जमीन खणण्यास व तीं रत्नें जमा करून त्यांचें वर्गीकरण करण्यास आणि त्यांची परीक्षा करण्यास श्रम करणारीं माणसें मात्र पाहिजेत. एवढें साधन उपलब्ध होईल तर मनुष्याचें मन हीच कोणी एक हिऱ्याची खाण, त्या खाणींतील फार खोल जागेंतले थर फोडून त्यांच्या पोटांतील रत्नसंपत्ति सहज काढितां येईल यांत संशय नाहीं!

या गोष्टी केवळ ऐकून घेऊन ही मोठी मौज आहे असें मानून "वा! एकूण असें आहे आँ?" असें ह्मणून सोडून देण्यासारख्या नाहींत. ह्या "द्यौ" शब्दाच्या संबोधनाचा ध्वनि एखाद्या सजीव देहाप्रमाणें आहे. अजून त्यांत हलनचलनादि क्रिया चालत असून भाषाशास्त्रवेत्त्यांच्या सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं त्याची सजीवता स्पष्ट भासत आहे! त्यांत अद्यापि जीव आहे. या सजीवतेस पाहिजे तर 'ऐतिहासिक सजीवता' असें ह्मणा. रोमन् लोकांचा इतिहास कळल्याशिवाय जसा इंग्लंडचा इतिहास पूर्णपणें समजणार नाहीं, किंवा ग्रीक लोकांच्या इतिहासाशिवाय रोमन् लोकांचा इतिहास समजणार नाहीं; त्याचप्रमाणें आमची आलीकडे अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, यापुढें जगाचा समग्र इतिहास चांगला समजण्यास, वेदग्रंथांत उपलब्ध होणारा आर्यकुटुंबचरिताचा जो प्रथम अध्याय, त्याचें यथार्थ ज्ञान अत्यंत

आवश्यक आहे. त्याशिवाय जगाच्या इतिहासाची पूर्तता होणें अशक्य आहे. माझी अशी समजूत झाली आहे कीं, आमच्या पाश्चात्य पंडितांचें लक्ष कालिदास व भवभूति यांच्या काव्यांचा रसास्वाद घेण्याकडे व वैष्णव आणि शैव यांच्या धर्माच्या भयंकर स्वरूपाकडे प्रथम गेलें, हें आमचें खरोखर मोठें दुर्दैव होय. माझी आणखी अशीही समजूत आहे कीं संस्कृत ग्रंथांपैकीं खऱ्या महत्वाचा, खरा उपयुक्त, ज्याचें अध्ययन एकसारखें आयुष्यभर करावें अशी ज्याची योग्यता, आणि ज्याचा अभ्यास पंडित व विद्वान् लोकांनीं हल्लींपेक्षां अधिक लक्षपूर्वक केला पाहिजे असा भाग ह्मटला ह्मणजे बौद्ध धर्माच्या उत्कर्षाच्या पूर्वींचा होय. कारण, त्या वेळीं संस्कृत भाषा प्रचारांत असून शैव पूजेचे किंवा पंथाचें कोणास नांव देखील माहीत नव्हतें.

---

# वैदिक ग्रंथसमूहाचे चार काल.

## सूत्रकाल ( ख्रि० पू० ६०० )

बौद्ध धर्मापूर्वींचा जो काळ त्या काळच्या ग्रंथसमूहाचे चार भाग करितां येतात, त्यांपैकीं पहिल्यास मी सूत्रकाल असें नांव देतों. या भागाचा विस्तार बौद्धांच्या काळापर्यंत जाऊन पोंचतो. हा काळ त्याच्या लक्षणावरून स्पष्ट कळण्यासारखा आहे. हीं सूत्रें फार संकुचित असून अल्पाक्षरी मंत्रासारखीं आहेत. टीकेच्या साहाय्याशिवाय त्यांचा अर्थ समजतच नाहीं. मला त्याचें वर्णन करतां येत नाहीं. कारण, दुसऱ्या कोणत्याही भाषेंत या सूत्रग्रंथाच्या तोडीचें कांहीं माझ्या आढळण्यांत आलें नाहीं. पण ब्राह्मणांची एक प्रसिद्ध ह्मण आहे त्यावरून आपणांस कांहीं कल्पना होईल. ती ह्मण ही कीं ' सूत्रकारास सूत्राचें एक अक्षर कमी झाल्यापासून जितका आनंद होतो तितका पुत्रजन्मापासूनही होत नाहीं.' आतां या ह्मणीचें महत्व किती आहे याचा विचार

करितांना, ब्राह्मण आपल्या मरणोत्तर क्रिया करण्यास व पिंड देण्यास जर पुत्र नाहीं तर मनुष्यास स्वर्गप्राप्ति नाहीं असें मानीत, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

आतां हीं सूत्रें सूत्रकारांनीं का केलीं असा सहज प्रश्न निघतो. या सूत्रांचा हेतु, जुन्या ब्राह्मणांच्या वसाहती किंवा ज्यांस 'परिषद्' असें ह्मणत त्यांच्यामध्यें पसरलेल्या ज्ञानाचा संग्रह करून ठेवणें हा होय. या सूत्रग्रंथांत यज्ञाचे नियम, स्वरशास्त्र, शब्दव्युत्पत्ति, व्याकरण, वृत्तशास्त्र, धर्म व व्यवहार, भूमिति, ज्योतिष, तत्वचिन्ता, या विषयांचें निरूपण आहे. यांपैकीं प्रत्येक विषयाच्या संबंधानें स्वतंत्र विचार व स्वतंत्र कल्पना सूत्रग्रंथांत सांपडतात. त्यांची योग्यता एवढी आहे कीं या विषयांचें ज्ञान प्राप्त करून घेणारांस या सूत्रग्रंथांचें अवलोकन केल्याशिवाय परिणामच नाहीं.

आजकाल संस्कार किंवा विधिशास्त्र शिकण्याची पंडितांस विशेष गोडी लागत नाहीं. तथापि यज्ञयागांची उत्पत्ति व अभिवृद्धि या विषयींचा भाग मनुष्याच्या मनोवृत्तीचा इतिहास समजण्यास फार महत्वाचा असून हा भाग आर्यावर्ताशिवाय इतर देशांत चांगला समजण्याचें साधनच नाहीं.

स्वरशास्त्राची उत्पत्ति आर्यावर्तांत लेखनविद्या नव्हती अशा काळीं झाली. त्यासमयीं आपल्या आवडत्या मंत्रांचा शुद्ध व यथार्थ वर्णोच्चार करतां येण्याचें उत्तम साधन करून ठेवणें ब्राह्मणांस अत्यंत महत्वाचें वाटलें. माझी अशी खातरी झाली आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकांत, ह्मणजे सुमारें २,४०० वर्षां पूर्वीं, आर्यावर्तांत जे स्वरशास्त्री होऊन गेले त्यांनीं भाषेच्या अवयवांचें जें पृथक्करण केलें त्या कामीं त्यांचा हात धरणारा आजपर्यंत कोणीही झाला नाहीं. आमच्या इकडचे हेम्‌होल्ट्झ, एलिस् व इतर स्वरशास्त्रनिष्णात, यांच्यानेंही हें माझें ह्मणणें नाकबूल करवणार नाहीं.

व्याकरणसंबंधानें मी असें ह्मणतों कीं भगवान् पाणिनीनीं केलेल्या व्याकरणाप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही भाषेचें व्याकरण, इतकें उत्तम व परिपूर्ण, कोणीही विद्वानानें केलें आहे, असें कोणत्याही पंडिताची

पुढें येऊन ह्मणण्याची प्राज्ञा नाहीं. संस्कृतासारख्या प्रचंड भाषेचें बंधन सूत्रजालानें करून ज्यानें तिला सर्वथा नियंत्रित केली, व तिच्या भिन्न भिन्न अवयवांचें यथार्थ वर्गीकरण केलें, त्याचें बुद्धिसामर्थ्य काय सांगावें? वृत्तशास्त्र संबंधानें पाहिलें तर पुरातन आर्यग्रंथकर्त्यांनीं ज्या संज्ञा किंवा व्याख्या केल्या आहेत व या विषयावर जे विचार प्रदर्शित केले आहेत, त्या संज्ञा व ते विचार, आमच्या आधुनिक वृत्तशास्त्र्यांच्या कल्पनांशीं बरोबर जुळतात. आलीकडची समजूत अशी आहे कीं, वृत्तें हीं मुळारंभीं नृत्य व संगीत यांजपासून उत्पन्न झालीं. निरनिराळ्या वृत्तांचीं जीं नावें आढळतात, त्यांचा विचार केला तर ही कल्पना फार सयुक्तिक दिसते. 'छंदस्' ह्मणजे वृत्त. याचा ल्याटिन् भाषेंतील 'स्क्यान्‌डेरी' या शब्दाशीं निकट संबंध आहे व त्याचा अर्थ 'पाऊल टाकणें' असा आहे. वृत्त हा शब्द 'वृत्,' ल्याटिन् 'व्हर्टो,' ह्मणजे 'फिरणें,' 'वळणें' याजपासून झाला आहे. याचा मूळचा अर्थ 'नाचण्याच्या गतीचीं शेवटचीं तीन किंवा चार पाउलें' असा आहे. नाचाच्या वेळीं ज्या प्रकारचें गाणें गावयाचें असेल व त्यांत जो ताल असेल त्याप्रमाणें नाचणाऱ्याचीं पाउलें पडणें अवश्य आहे. वेदांत 'त्रिष्टुभ्' या नांवाचें वृत्त पुष्कळ ठिकाणीं आढळतें. 'त्रिष्टुभ्' याचा अर्थ 'तीन पाउलें' असा आहे; कारण, त्यांत तीन 'वळणें' किंवा 'वर्तनें' आहेत, तीं अशीं: ⏑ — —.

आर्यज्योतिष व आर्यभूमिति, यांजविषयीं माझ्यानें खात्रीपूर्वक कांहीं बोलवत नाहीं. पण यांजविषयीं कांहीं माहिती जुन्या सूत्र ग्रंथांतून सांपडते. आतां ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे कीं आलीकडे आलीकडे आर्य लोकांनीं या विषयाच्या संबंधानें ग्रीक लोकांचें शिष्यत्व पतकरिलें होतें. पण माझा जो एकदां ग्रह होऊन गेला तो अद्यापि फिरविण्यास मला कांहीं कारण दिसत नाहीं. तो ग्रह हा कीं, पुरातन आर्य लोकांचें स्वतंत्र ज्योतिष सत्तावीस नक्षत्रांच्या आधारानें केलेलें होतें; व यज्ञकुंडांच्या परिखांची रचना करण्याच्या कामीं प्राचीन आर्यांनीं निर्मिलेली स्वदेशी स्वतंत्र भूमिति असावी. शुल्व सूत्रांत असा

एक सिद्धांत आढळतो कीं वर्तुळाकार वेदीच्या बरोबर मापाची चतुष्कोण वेदी बांधणें आहे ती कशी बांधावी. अर्थात् ही व्यवहारांत येणारी अडचण दूर होण्याकरितां या विषयाकडे, ह्मणजे भूमितीकडे त्यांचें लक्ष लागलें असावें व त्यांणीं वर्तुळाचा चतुष्कोण कसा करावा हा सिद्धांत सिद्ध करण्याचा पहिला यत्न केला असावा असें स्पष्ट अनुमान होतें. या सूत्रांत ज्या परिभाषेची योजना केली आहे ती परिभाषा स्वतंत्र व स्वदेशीय किंवा स्वयंभू अशी आहे, असें माझें मत आहे. तेव्हां अर्थात् गणितशास्त्राचा मूळ पाया प्रथमारंभीं कोणी घातला हें ज्यांस समजण्याची इच्छा असेल त्यांनीं या सूत्रांकडे अवश्य लक्ष पुरवावें. व्यवहारसंबंधी नियम व विधि, ह्मणजे जन्म, उपनयन, विवाह, शिक्षणपद्धति, प्रेतसंस्कार, भिन्न भिन्न देशरूढी, दायभाग ह्मणजे वारसांचे हक्क वगैरे, मालमत्तेच्या संबंधाचे हक्क, सरकार देणें, राज्यव्यवस्था, हे विषय गृह्य व धर्मसूत्रांत फार उत्तम रीतीनें सांगितले आहेत. आलीकडील पद्यात्मक धर्मग्रंथ ह्मणजे कायद्याचीं पुस्तकें, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, पाराशरस्मृति वगैरे, यांचा मूळ पाया गृह्य व धर्मसूत्रें होत.

याच सूत्रांतला कांहीं भाग तत्वज्ञानविषयक आहे. याचा प्रथमारंभ उपनिषदांत असून पुढें सहा शास्त्रांच्या सूत्रांचा जो मोठा संग्रह केला आहे, ज्यास षड्दर्शनसंग्रह हें प्रसिद्ध नांव आहे, त्यांत त्या विषयांचा मोठा विस्तारपूर्वक विचार केला आहे. हीं सूत्रें बरींच आलीकडच्या काळचीं असावींत.* पण तीं केव्हांचीं कां असेनात; इतकी गोष्ट सिद्ध आहे कीं, आत्मविज्ञान या विषयावर आर्यावर्तांतील प्राचीन लोकांनीं जो विचार केला आहे, त्याच्यापुढें आजकालच्या आमच्या तत्वज्ञानी पंडितांभीं विस्मयानें व लज्जेनें खालीं मान घातलीच पाहिजे. कोझि ह्मणून फ्रेंच तत्वज्ञानी होता तो ह्मणे, "हें आर्य लोकांचें षड्दर्शनसंग्रह ह्मणजे, एका लहानशा डबींत एकंदर आत्मविचार किंवा तत्वज्ञान भरून ठेविल्यासारखें आहे!"

---

* **सांख्यकारिका.** (कपिलदर्शन.) याचें भाषांतर चिनी लोकांनीं आपल्या भाषेंत खि० शकानंतर, ह्मणजे सन् ५६० या वर्षी केलें.

२ ब्राह्मणकाल ( ख्रि० पू० ६००–८०० पर्यंत ). संस्कृत ग्रंथांच्या संबंधानें सूत्रकालाचा आपण विचार केला. त्या कालाच्या पूर्वी दुसरा एक काल आहे त्याचें नांव ब्राह्मणकाल. हे ग्रंथ गद्यात्मक असून त्यांची लिहिण्याची तऱ्हाही सूत्रग्रंथांहून अगदीं भिन्न आहे. त्यांतील भाषाही कांहीं निराळी आहे, आणि त्यांचा हेतूही निराळा आहे. हीं ब्राह्मणें स्वरसंयुक्त आहेत. सूत्रांस स्वर नाहींत. ब्राह्मण हे ग्रंथ निरनिराळ्या ऋषींनीं रचले आहेत व त्यांत यज्ञसंबंधानें मोठमोठे वाद आहेत. त्यांचा मुख्य हेतु ह्मटला ह्मणजे यज्ञाचें वर्णन व यज्ञव्यवस्था, हा होय. पण मधून मधून इतर मनोरंजक विषयांवरही लेख आहेत. सूत्रग्रंथांत वारंवार ब्राह्मणग्रंथाचा उल्लेख आढळतो. फार काय, सूत्रग्रंथ बरोबर समजण्यास ब्राह्मण ग्रंथ समजणें अगदीं अवश्य आहे. या ब्राह्मणग्रंथाचा बराच भाग आरण्यक नांवाच्या ग्रंथांनीं भरला आहे. वानप्रस्थास किंवा जंगलांत रहाणाऱ्यांस विहित असा विधि, ह्मणजे शुद्ध मानसपूजा किंवा मनोयज्ञ, याचा विचार या आरण्यकांत केला आहे.

सूत्रकाल जर ख्रिस्ती शकापूर्वी ६०० वर्षें झाला अशी कल्पना केली, तर ब्राह्मणकाल त्याच्या पूर्वी २०० वर्षें तरी झाला असें समजलें पाहिजे. कारण त्याच्या उत्पत्तीचा व वृद्धीचा विचार केला व त्यांत प्रमाण ह्मणून दिलेल्या प्राचीन आचार्यांच्या संख्येचा विचार केला ह्मणजे निदान दोनशें वर्षांची तरी कालमर्यादा कल्पिणें योग्य दिसतें. पण ही कालमर्यादा केवळ तारतम्यार्थ व तिच्या उपयुक्ततेस्तव मानिली आहे ही गोष्ट खरी. दुसरा तिचा मोठासा उपयोग नाहीं. मुख्य गोष्ट ध्यानांत ठेवण्याची ती ही कीं, सूत्रकालाच्या खालीं दुसरा एक मोठा थर आहे तो ब्राह्मणकालाचा होय व त्या थराखालींही तिसरा एक थर आहे, त्याचें नांव मी मंत्रकाल असें ठेविलें आहे.

३ मंत्रकाल ( ख्रि० पू० ८००–१,००० पर्यंत ). हा वर्ग झाला कसा? माझ्या मतानें या काळीं ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदांच्या संहितांत आढळणाऱ्या वैदिक मंत्रांचा संचय

झाला व त्यांची शिस्तवार व्यवस्था लागली. या चार मंत्रसंचयांचा हेतु याज्ञिकसंबंधाचा आहे; प्रत्येकांत असे मंत्र आहेत कीं ते विवक्षित उपाध्यायांनीं विवक्षित यज्ञाच्या वेळीं ह्मणवित. सामवेद संहितेंतील मंत्र उद्गातृ नांवाच्या गायक उपाध्यायांनीं गावेत. यजुर्वेदांतील मंत्र यज्ञ चालविणाऱ्या ब्राह्मणांनीं ह्मणवित. त्यांस अध्वर्यु अशी संज्ञा आहे. या दोन्हींच्या संहितांची व्यवस्था कांहीं यज्ञांच्या व्यवस्थेस अनुसरून केली आहे. ऋग्वेद संहितेंतील मंत्र जे ह्मणत त्यांस होतृ अशी संज्ञा आहे. पण ऋग्वेदांत खरोखर काय आहे ह्मणून पाहिलें तर पवित्र व लोकप्रिय अशा कवनांचा केवळ संचय असून, त्यांतील व्यवस्थेचा किंवा मंत्रक्रमाचा कोणत्याही यज्ञाच्या व्यवस्थेशीं कांहीं संबंध दिसत नाहीं. अथर्ववेदसंहिता ही बाकीच्या तिन्ही वेदसंहितांच्या आलीकडची दिसते. त्यांत ऋग्वेदांतील बहुतेक मंत्र असून खेरीज मंत्रतंत्र, जादू, जारणमारण, बीरविद्या, इत्यादि भोळवट व अडाणीपणाचे प्रकार ज्यांत दिसतात अशीं कवनें आहेत.

या ठिकाणीं एकंदर याज्ञिकाचा खटला आहे. उपाध्येपणाचा एक निराळा धंदा होऊन याज्ञिक चालवूं पहाणाऱ्या लोकांनीं यज्ञयागाचें हें एक प्रचंड व निबिड जाळें विणलें आहें असें दिसतें. प्रत्येक यज्ञांत निरनिराळ्या माणसांकडे निरनिराळीं कामें लाऊन दिलीं आहेत. कोणी मंत्र गावे, कोणी कांहीं करावें, कोणी कांहीं करावें, याप्रमाणें व्यवस्था होऊन यज्ञयागाचा एक मोठा खटलाच माजला.

पण आमच्या सुदैवानें अशी गोष्ट घडून आली कीं त्या वैदिकांतच अशा एका प्रकारचे लोक निघाले, कीं त्यांस एकंदर पुरातन कविताबद्ध ग्रंथाचें भांडार मुखोद्गत करावें लागलें. अमुक यज्ञांत अमुक मंत्र अमक्यानें ह्मणवित अशी जी कांहीं ज्याच्या त्याच्या पुरतीच व्यवस्था होती त्याहून ही दुसरी अगदीं निराळी व्यवस्था करावी लागली. त्यामुळें काय झालें, कीं जिच्याशीं केवळ यज्ञकर्माचाच संबंध नाहीं, अशी आर्यावर्तांतील पुरातन कविता बरीच परंपरेनें चालत येऊन तिचें संरक्षण झालें. तात्पर्य हें कीं, शेवटीं पुरातन कवितांचा मोठा संग्रह होऊन तो आज या तारखेस आपणांस उपलब्ध होत आहे. तोच हा ऋग्वेद होय. वा-

स्तविक पाहिलें तर, जरी वेद या नांवानें प्रसिद्ध असे इतर पुरातन ग्रंथ आहेत, तरी आपणांस प्राचीनकाळचा खरा इतिहास समजण्याचें साधन एक ऋग्वेद मात्र होय, असें मला वाटतें.

या वेदाचे दहा भाग आहेत, प्रत्येक भाग हा एक ऋचांचा किंवा मंत्रांचा स्वतंत्र संग्रह आहे. तथापि एकंदर दहा भागांची व्यवस्था कोणी तरी एकानेंच लाविली आहे, असें दिसतें. ही संहिता, ह्मणजे हा मंत्रसंग्रह, अगदीं पूर्वीं थोडथोडा निरनिराळ्या कुटुंबांत होऊन सरतेशेवटीं त्याची एक थोरली गाथा झाली*. मंत्रांची संख्या १,०१७ किंवा १,०२८ इतकी आहे.

या जुन्या मंत्रांचा संग्रह करण्यास जितका काळ लागला व निरनिराळ्या यज्ञांत निरनिराळीं कर्में चालविण्याकरितां ऋत्विगादि चार प्रकारचे वैदिक होऊन त्यांच्याकरितां त्या मंत्रांतील वेंचे निवडून काढण्याच्या खटपटीस जो काळ लागला त्याचें नांव मी मंत्रकाल असें ठेविलें आहे. या काळाचा विस्तार ख्रिस्ती शका पूर्वीं १००० पासून ८०० पर्यंत असावा.

## ४ छंदकाल ( ख्रि० पू० १०००. )

तेव्हां ख्रिस्ती शकापूर्वीं एक हजार वर्षांच्या पलीकडल्या काळांत वेदरूप काव्यें रचिलीं असावींत असें दिसतें. हीं काव्यें ऋग्वेदांतील ऋचा व मंत्र होत. त्याचप्रमाणें त्या कालीं वैदिक धर्माचा उत्तरोत्तर प्रसार होऊन मुख्य मुख्य वैदिककर्में व यज्ञयाग, यांची व्यवस्था लागली असावी, असेंही अनुमान होतें. या छंदकालाचा विस्तार त्याच्याही मागें कोठवर गेला असेल हें कोणी सांगावें? कांहीं विद्वानांचें मत आहे कीं, छंदांचा काल ख्रिस्ती शका पूर्वीं दोन किंवा तीन हजार

* आपल्यांत अजून देखील आड्यापणड्याच्या वेळचे देवांतील टीक किंवा बाण किंवा दुसरी अशीच कांहीं वडिलोपार्जित पवित्र ‘ इस्टेट ’ घरांत मोठ्या काळजीनें राखून ठेवण्याची चाल असून लोक त्याचा मोठा अभिमान बाळगतात. असाच कांहीं प्रकार ऋग्वेदांतील मंत्रसंग्रहाच्या संबंधानें फार प्राचीनकाळीं झाला असावा, असा **भट्ट मोक्षमूलर** यांचा अभिप्राय आहे.—भा० क०

वर्षांपलीकडचा असावा. हें कसेंही असो. एवढी गोष्ट खरी आहे कीं वैदिक धर्माची उत्पत्ति होण्यास कारणीभूत झालेले जे विचार, ते कसकशा प्रकारानें निघाले किंवा सुचले, हें दाखविलें असतां त्या काळाच्या दीर्घत्वाची कांहीं कल्पना आपणांस करितां येईल. अमुक वर्षें किंवा अमुक शतकें झालीं, असें सांगण्याचा यत्न करण्यापेक्षां, वर सांगितल्याप्रमाणें त्या काळाच्या दीर्घत्वाचें केवळ दिक्दर्शन करणें हें बरें. कारण, त्या काळाची निश्चित मर्यादा सांगणें ह्मणजे केवळ कल्पित कादंबरी होणार!

या काळाचें खरोखर ज्ञान व्हावें असें ज्यास वाटेल त्याला तें खालीं लिहिलेल्या गोष्टींवरून होण्याचा संभव आहे. वेदांतल्या वेदांतच भिन्न भिन्न स्थळीं भाषा व वृत्तें यांत भेद दिसतो; स्थलांतरही झालेलें आढळतें; ह्मणजे, वायव्य दिशा सोडून आग्नेयी दिशेस मंत्रकर्ते आले होते असें कांहीं मंत्रांवरून स्पष्ट दिसतें; वेदकवींनीं स्वतांच्या कवितांत ठिकठिकाणीं जुन्या व नव्या कवितांचा उल्लेख* केलेला आढळतो; राजे व सेनाधिपति यांच्या पिढ्यांच्या पिढ्या वर्णिल्या आहेत; अत्यंत कृत्रिम ह्मणजे ज्यांत अतिशय खटाटोप आहे अशा यज्ञयागांची हळू हळू लागलेली व्यवस्था दृष्टोत्पत्तीस येते; व शेवटीं, आलीकडच्या कांहीं मंत्रांत मात्र उपलब्ध होणाऱ्या अशा चार जाति आपणास दृष्टिगोचर होतात; या सर्व गोष्टींचा नीट विचार केला ह्मणजे त्या होण्यास बहुत काळ लागला असावा असें स्पष्ट दिसतें. ऋग्वेद व अथर्ववेद यांची तुलना करून पाहिली असतां चांगलें लक्षांत येतें कीं, ऋग्वेद सर्वांत जुना असून त्यांत प्रदर्शित केलेले जे प्राथमिक किंवा पूर्वकालीन विचार, त्यांचाच विस्तार पुढें अथर्ववेदांत व यजुर्वेदाच्या उत्तरभागांत केला आहे. तात्पर्य, वेदकाव्यामध्यें पूर्वकालीन माणसांच्या मानसिक स्थितीचा इतिहास जुळावा असा

* ऋग्वेदाच्या आरंभींच 'अग्निमीळे' हा जो मंत्र आहे, त्यांतच ह्याचें उदाहरण सांपडतें: 'अग्निः पूर्वेभिः ऋषिभिः ईड्यो नूतनैः उत'=ह्मणजे ह्या अग्नीची स्तुति, जुन्या व नव्या, दोन्ही प्रकारच्या कवींनीं केली आहे.—भा० क०.

चांगला जुळतो व तो आपणांस चांगला कळतो; ह्मणून त्यावर श्रद्धा बसते हें सहजच आहे.

इतकें वरीक खास आहे कीं, केवळ आर्यावर्तांतच नव्हे, पण ज्या ज्या ठिकाणीं आर्यप्रजेचा विस्तार आहे तेथें तेथें ऋग्वेदाहून अधिक प्राचीन व अधिक जुना असा ग्रंथच नाहीं! आणि ज्या अर्थी आपण, ह्मणजे इंग्रज, जर्मन इत्यादि यूरोपस्थ लोक मूळचे आर्य आहोंत, (कारण या गोष्टीची साक्ष आपली भाषा व आपले विचारच देत आहेत) त्या अर्थी आपणांस देखील ऋग्वेद हा आपला अतिप्राचीन ग्रंथ आहे असें मानणें भाग पडतें.

आतां एक मोठी आश्चर्यकारक गोष्ट मी आपणांस सांगतों. आज तीन किंवा चार हजार वर्षें लक्षावधि व कोट्यावधि लोकांच्या धर्माची व नीतीची इमारत ज्या पायावर रचली गेली तो पाया ऋग्वेद होय. तो ऋग्वेद आजपर्यंत कोणीही छापून प्रसिद्ध केला नाहीं. आणि दैवयोग असा कांहीं विचित्र घडून आला कीं, हें प्रचंड काम हातीं घेण्याचें श्रेय माझ्या नशीबीं आलें व तें काम मी पूर्णतेसही नेलें. ह्मणजे या पवित्र व अतिप्राचीन अशा ऋग्वेदाची संहिता व तिच्या वेदावर प्रमाणभूत मानलेली सायणाचार्यांची टीका हीं दोन्हीं मी छापून प्रसिद्ध केलीं.

ऋग्वेदांतील एकंदर मंत्रांची संख्या १०१७ किंवा १०२८ इतकी आहे. त्या प्रत्येक मंत्रांत सुमारें दहा पद्यें आहेत. तद्देशीय पंडितांचें असें ह्मणणें आहे कीं, ऋग्वेदांतील एकंदर शब्दांची संख्या १,५३,८२६ आहे!

## वेद मुखद्वारा परंपरेनें कसा आला.

'पण हा पुरातन ग्रंथसंचय आजपर्यंत राहिला कसा?' असा प्रश्न आपण कराल. आजकाल आपणांस वेदाच्या लिहिलेल्या पोथ्या सांपडतात ही गोष्ट खरी. पण आर्यावर्तांत आजपर्यंत जितक्या जुन्या पोथ्या उपलब्ध आहेत त्यांपैकीं कोणतीही पोथी खिस्ती शकानंतर, ह्मणजे सन् १०००, या काळापलीकडची आढळत नाहीं. बौद्ध धर्माचा आरंभ होण्यापूर्वीं ह्मणा, किंवा प्राचीन वैदिक ग्रंथसंग्रहाच्या अखे-

रीपर्यंत ह्मणा, आर्यावर्तांत लेखनकला ठाऊक होती अशाबद्दल कांहीं एक प्रमाण सांपडत नाहीं. तेव्हां ही शंका सहजच निघते कीं ह्या फार जुन्या ऋचा, हे मंत्र, हीं ब्राह्मणें, हीं सूत्रें, हीं सारीं इतके दिवस सुरक्षित राहिलीं कशीं? या प्रश्नाचें उत्तर असें: या सर्वांचें उत्तम संरक्षण, लोकांनीं केवळ उत्तम प्रकारचा संस्कार जिला मिळाला आहे अशा स्मृतीच्या द्वारानें केलें. आर्यावर्त जितक्या दिवसांपासून आपणास ठाऊक आहे, तितक्याच काळाचा विचार केला तर असें दिसतें कीं, जें वय हल्लीं आपण शाळेंत व कालेजांत घालवितों तें वय ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या तीन वर्णांतील मुलगे गुरुमुखापासून पवित्र ग्रंथांचें अध्ययन व पठण करण्यांत घालवीत. हें कर्तव्य प्रत्येक ब्राह्मणाच्या मार्गी लाऊन दिलेलें होतें व त्यांत जो कोणी चुकेल त्यास लोकबाह्य राहून भ्रष्ट होण्याची भीति असे. स्मृति कशी सुधरावी, वेदपठण कसें करावें, या गोष्टींचे नियम बांधून टाकिलेले असत. लेखनकला निघण्यापूर्वी धर्मग्रंथांचें किंवा इतर ग्रंथांचें संरक्षण करण्यास मार्गच नव्हता. तेव्हां अर्थात् लोकांस केवळ स्मरणशक्तीवर अवलंबून रहावें लागलें व त्यामुळें धर्मग्रंथांचा बचाव होण्याकरितां जितकी व्यवस्था व जितका बंदोबस्त होण्यासारखा होता तितका त्यांनीं केला.

आतां कांहीं लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, आर्यावर्तांत वैदिक धर्म हल्लीं चालत नसून लयास गेल्यासारखा आहे व बौद्धधर्मानें त्याचा जो एकदां पराभव केला, त्यानंतर वैदिक धर्माचें आजपर्यंत पुनरुज्जीवन झालेंच नाहीं. आलीकडच्या धर्मांत पूज्य देव ब्रह्मा, विष्णु, शिव, हे प्रधान असून इतर भयंकर व बीभत्स अशा मूर्तींची पूजा त्यांत आहे.

आतां हें या लोकांचें ह्मणणें जरी केवळ वरवर विचार करणाऱ्यास खरें वाटण्यासारखें आहे, तरी तद्देशीय लोकांशीं ज्या विद्यासंपन्न इंग्लिश लोकांचें दळणवळण आहे त्या लोकांचें व तद्देशीयां पैकीं जे विद्वान् लोक कधीं कधीं इंग्लंडास येतात त्यांस विचारलें, तर त्यांचेंही मत अगदीं निराळें पडतें. ब्राह्मण धर्माचा पराभव बौद्ध धर्मानें कांहीं दिवस केला खरा; पण कांहीं काळ लोटल्यावर बौद्धधर्मानें

कालानुसार वर्तन ठेऊन आर्यावर्तांत ब्राह्मणधर्मस्थापनेच्या पूर्वींपासून चालत आलेले कित्येक उपासनेचे मार्ग तसेच राहूं दिले, आणि मागाहून हळू हळू ब्राह्मणांनीं बौद्धधर्माचा पराभव केला, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

ब्राह्मणधर्माचा प्रसार होण्यास किंवा त्याचें प्राबल्य होण्यास राजसत्तेचा जोर फारसा त्यांजवळ नव्हता. धर्मश्रद्धेचें एकीकरण करण्यास किंवा धर्मसंबंधानें एकमत स्थापन करण्यास किंवा पाखंड मताचा निग्रह करण्यास अवश्य अशीं साधनें त्यांजपाशीं नव्हतीं. आर्यावर्तांत नुकताच मोठा दुष्काळ पडला होता त्या वेळेस शेंकडो लोक भुकेनें मेले पण त्यांनीं म्लेच्छांच्या किंवा बाटलेल्या लोकांच्या हातचें अन्न †भक्षण केलें नाहीं हें कसें?

आमच्या या यूरोप खंडांत किंवा दुसऱ्या कोणच्या देशांत लोक मरणास राजी होतील पण धर्माध्यक्षाची आज्ञा मोडणार नाहींत, असे कोणी धर्माध्यक्ष किंवा पाद्री आहेत काय? त्यांच्या शब्दाचा किंवा अधिकाराचा जोर असा आहे काय? सारांश, लोकरूढी व धर्मभोळेपणा या गोष्टी आर्यावर्तांत अद्यापिही बऱ्याच प्रबळ असून धर्मोपदेशकांचें वजनही त्या लोकांत अजून पुष्कळ आहे. आतां हीं वर सांगितलेलीं जीं माणसें सांप्रत तेथल्या लोकांना धर्मोपदेश करीत असतात व धर्मसंबंधानें लोकांत ज्यांचें फार वजन असतें व ज्यांच्या हातीं लोकांचें सर्वथा बरें वाईट करण्याचें पुष्कळ असतें, अशींच माणसें वेदाचें परमप्रामाण्य मानणारीं आहेत.

कोणतीही गोष्ट, कोणा विवक्षित मनुष्याच्या मतावर अवलंबून असो किंवा देशाचार, पुराणें, तंत्रें किंवा मनुस्मृति यांसारख्या धर्मग्रंथांवर अवलंबून असो, ती गोष्ट जर वेदप्रमाण नसली, वेदवाक्यास जर

† दुष्काळाच्या प्रसंगीं सुद्धा म्लेंच्छ किंवा अतिशूद्र मानिलेल्या लोकांच्या हातून घेतलेलें अन्न भक्षण करूं नये ही लोकांची जी समजूत आहे तिला शास्त्राचा कांहींएक आधार नाहीं. एवढेंच नव्हे तर **श्रुति** व **स्मृति** या दोहींचेंही मत या समजुतीच्या अगदीं विरुद्ध आहे. ही फार आश्चर्याची गोष्ट होय!

ती यत्किंचित् बाधक अशी दिसत असली, तर तिचा तत्काळ त्याग करावा लागतो. ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. तात्पर्य, धर्म व आचारविचार यांचा पाया ह्मटला ह्मणजे काय तो वेद, अशी आर्यावर्तवासी लोकांची समजूत आहे. पण असले ब्राह्मण, या कलियुगीं म्लेंच्छांचें प्राबल्य असतांही कलकत्ता येथील टौलेजंग बंगल्यांत व मोठमोठ्या दिवाणखान्यांत दृष्टीस पडावयाचे नाहींत. ते खेड्यांतच रहातात, लोकांपासून भिक्षा मागून त्यांजवर आपला उदरनिर्वाह करितात, आणि पाठशाळेंत राहून अभ्यास करितात. वेदनिंदकाशीं किंवा म्लेच्छाशीं संभाषण केल्यानें किंवा नुसता त्याचा स्पर्श झाल्यानें आपण भ्रष्ट झालों असें त्यांस वाटतें. पवित्र संस्कृत भाषा जाणणारा एखादा युरोपियन् पंडित पाहिला ह्मणजे त्यांस आश्चर्य वाटतें. अशा प्रसंगीं अम्मळ आग्रह धरला व वेदविद्येविषयीं आपला पूज्यभाव दाखविला तर त्यांची हृदयरूप किंवा मुखरूप पेटी उघडली जाऊन तिच्यांतील पुरातन विद्येचें तें रत्नभांडार परदेशस्थांच्या दृष्टीस पडण्याचा योग येतो. ते फारकरून इंग्रजी किंवा बंगाली भाषेंत बोलत नाहींत. संस्कृत बोलतात आणि संस्कृतच लिहितात. त्यांपैकीं कित्येकांकडून मजला वारंवार पत्रेंही येतात. त्यांतला मजकूर फारच सोज्वळ व शुद्ध अशा शब्दांनीं प्रदर्शित केलेला असतो.

माझी गोष्ट अजून संपली नाहीं. मला हें पक्कें ठाऊक आहे कीं या लोकांस ऋग्वेद समग्र पाठ येतो. तीन चार हजार वर्षांपूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांप्रमाणें या हल्लींच्या लोकांसही ऋग्वेद मुखोद्गत असतो. त्यांच्याजवळ पोथ्या असतात व क्वचित् कोणाजवळ छापखान्यांत सुंदर ठशांनीं छापलेली ऋग्वेदसंहिताही असते. तथापि ही पवित्र विद्या त्या छापील ग्रंथावरून ते कधीं शिकत नाहींत. हजारों वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज जसे शिकले, त्याचप्रमाणें वेदशिक्षेचा क्रम*

---

* या वेदशिक्षणाच्या पद्धतीचें वर्णन ऋग्वेदाच्या प्रातिशाख्यामध्यें सविस्तर केलें आहे. तें खिस्तीशकाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकांतलें असावें. ब्राह्मणांत पुष्कळ ठिकाणीं त्याचा उल्लेख केला आहे. परंतु याच्याही पलिकडच्या काळचें तें असावें असें

पूर्वापार अव्याहत चालावा या हेतूनें ते आजकाल देखील वेदविद्या गुरुमुखापासूनच शिकतात. ब्राह्मणांच्या दृष्टीनें मुखद्वारा शिकविणें व शिकणें हें काम एकाद्या महायज्ञाच्या योग्यतेचें आहे. आणि पूर्वीपेक्षां हल्लीं अशा तऱ्हेनें वेद शिकणाऱ्यांची संख्या जरी कमी आहे तरी जे शिकतात त्यांचें वजन, त्यांची योग्यता व त्यांचा धर्माधिकार हीं अजून पूर्वप्रमाणेंच आहेत ह्मटलें असतां चालेल. हीं माणसें आपल्या या इंग्लंडास येत नाहींत. कारण, त्यांस समुद्राचें उल्लंघन करितां येत नाहीं व ते करण्यास इच्छित नाहींत. पण त्यांच्या शिष्यवर्गापैकीं ज्यांस अर्धा तो व अर्धा हा, ह्मणजे इंग्रजी संस्कार लागला आहे, ते मात्र समुद्र उल्लंघन करण्याविषयींचा प्रतिबंध मानीत नाहींत. वेदांतील पुष्कळ मंत्र ज्यांस पाठ येतात अशा बऱ्याच तद्देशीय लोकांची व माझी भेट झाली आहे. ज्यांचें वय बारा किंवा पंधरा वर्षांचें असतां ऋग्वेद ज्यांस समग्र पाठ येत होता अशा लोकांचा व माझा पत्रव्यवहार झाला आहे.

ते दररोज थोडथोड्या ओळी शिकतात, ह्मणजे त्यांची प्रथम संथा घेऊन मग प्रहर दोन प्रहर घोकीत बसतात. तें इतकें कीं, सारें घर दणदणाऊन सोडतात. याप्रमाणें होतां होतां त्यांची स्मरणशक्ति इतकी प्रबळ होऊन जाते कीं गुरूपाशीं राहून त्यांची वेदविद्या पुरी झाली ह्मणजे तीं माणसें आपलीं शुद्ध छापील पुस्तकेंच समजावीं ! हवीं तेव्हां उघडून पहावीं, ह्मणजे हवा तो मंत्र, हवी ती ऋचा, हवा तो शब्द, हवा तो स्वर त्यांत सांपडतो. तद्देशीय विद्वानांपैकीं शंकर पांडुरंग या नांवाचे एक गृहस्थ आहेत त्यांचें एक पत्र मला आलें होतें त्यांतील मजकूर येणेंप्रमाणें:—

---

वाटतें. कारण, ऋग्वेदाच्या एका सूत्रांत (मं० ७, १०३) या स्थळीं वर्षाऋतूचें पुनरागमन, मंडूकांचा हर्ष व 'डरांव् डरांव्' असा शब्द याचें वर्णन करित असतां ह्मटलें आहे: 'एकजण दुसऱ्याच्या शब्दाचा पुनरुच्चार करितो; शिष्य जसा गुरूच्या शब्दाचा करितो तद्वत्.' शिष्याला 'शिक्षमानः,' गुरूला 'शक्तः' अशीं नांवें दिलीं असून आलीकडल्या काळीं स्वरशास्त्राची ठरीव पारिभाषिक संज्ञा 'शिक्षा' तिचाही उल्लेख त्यांत केला आहे. ऋग्वेदाच्या श्रावणीचे वेळीं उपाध्याय श्रावणी करणारांस 'अथ शिक्षां प्रवक्ष्यामि—इत्यादि ? (चिराद्दिष्) [illegible]' असे शब्द शिकवितात ते आमच्या वाचकांस आठवत असतीलच.—भा. क.

'तारीख २ मार्च सन १८७९. आपल्या छापील ऋग्वेद संहितेच्या पुस्तकाशीं आमच्या इकडील हालणाऱ्या चालणाऱ्या पोथ्यांपैकीं कांहींचे निरनिराळे पाठ मी ताडून पहात आहें. या निरनिराळ्या पाठांत पुष्कळ ठिकाणीं मला बराच भेद सांपडतो. थोडक्याच दिवसांत हे भिन्न भिन्न पाठ मी बारीक रीतीनें तपासून पहाणार आहें. हा माझा शोध जर कदाचित् प्रसिद्ध केला तर त्यापूर्वीं अर्थात् मी आपल्याकडे ते पाठ अगोदर लिहून पाठवीन. मी लिहीत बसलों आहें. यावेळीं माझ्याजवळ एक वेदवेत्ता ब्राह्मण आपण छापिलेल्या ऋग्वेदाच्या पुस्तकाचें अवलोकन करीत आहे. त्याजपाशीं एका अंगास त्यानें स्वतां लिहिलेली पोथी पडलेली आहे, परंतु ती देखील उघडून ठेविलेली नाहीं. गरज लागली तर मात्र उघडतो. त्याला सगळी संहिता आणि पदें तोंडपाठ येतात. आतां हा ब्राह्मण माझ्या तंबूंत उकिडवा बसला आहे, त्यानें गळ्यांत यज्ञोपवीत धारण केलें आहे, एकच धोतर नेसला आहे, त्यामुळें आमच्या प्राचीन ऋषींपैकींच हा एकजण आहे काय, असा भास होतो.

आपणांकडे त्याचा एक फोटोग्राफ् काढून पाठवावा असें माझ्या मनांत आहे. गुरुपासून शिष्यास या क्रमानें तीन किंवा चार हजार आजपावेतों चालत आलेले व स्मृतिद्वारा रक्षिलेले पवित्र मंत्र ह्मणणाऱ्या एखाद्या आर्याविषयीं कल्पना करा. त्याच्या आंगावर धड वस्त्रही नाहीं व आकाशावांचून त्यास दुसरी सांवलीही नाहीं. जरी लोकांस लिहिण्याची कला आजपर्यंत ठाऊक नसती, मुद्रणकला जरी मुळींच निघाली नसती व आर्यावर्तांत इंग्रजांचें राज्य जरी झालें नसतें, तरी ब्राह्मणांचे लहान लहान मुलगे, आणि तद्देशीय अन्य सहस्रावधि लोक बहुतकरून सरस्वती नदीच्या व पंजाबांतील इतर नद्यांच्या कांठीं वसिष्ठ, विश्वामित्र, श्यावाश्व, इत्यादिकांप्रमाणें ते साधे मंत्र तोंडपाठ करण्यांत व शिकण्यांत निमग्न होऊन गेले असते. आतां येथें आपण या वेस्ट मिन्स्टर्च्या सभामंडपांत जमलों आहों; हें स्थळ साऱ्या युरोपांतील, किंबहुना साऱ्या जगांतील विद्वत्तेचें आद्यपीठ. येथें आपण

येऊन तेच पवित्रमंत्र एकाग्रतेनें ऐकून त्यांच्या अर्थाचें ज्ञान होण्याकरितां यत्न करीत आहों. त्यांचा अर्थ समजणें कधीं कधीं फारच कठीण असतें. तथापि त्यांपासून मनुष्याच्या हृदयांतील परम गूढ आशयांचें ज्ञान करून घेण्याची आशा आपण बाळगतों. आपण एकमेकांपासून कितीही दूर गेलों, आणि दोघांमध्यें कालाचें आणि स्थलाचें, तसेंच वर्णाचें आणि धर्माचें कितीही अंतर पडलें तरी मनुष्याचें अंतःकरण तेथून सर्वत्र सारखेंच.

माझ्या मनांत हीच गोष्ट तुह्मांस आज सांगावयाची होती. तुह्मांपैकीं कित्येकांस हें वर्णन खचित एखाद्या कल्पित कादंबरीसारखें वाटत असेल; परंतु इतकें लक्षांत असूंद्या कीं या गोष्टींत जितका अक्षरशः खरेपणा आहे, तितका खरेपणा चालू इतिहासाच्या एकाही भागांत आढळावयाचा नाहीं.

---

## तिसऱ्या व्याख्यानाची पुरवणी.

प्राचीन संस्कृत विद्या तोंडानें शिकविण्याची आणि शिकण्याची चाल परंपरेनें आजपर्यंत तशीच चालू आहे असें मी ह्मटलें, तें कित्येकांना कांहीं अंशीं खोटें वाटलें असावें असें दिसतें. ह्मणून ऋग्वेदप्रातिशाख्यांतील कांहीं वेंचे मी उतरून घेतले आहेत. ते पाहिले ह्मणजे असें कळून येईल कीं, खिस्ती शका पूर्वी कांहीं नाहीं तरी निदान ५०० वर्षां पासून वेद तोंडानेंच शिकविण्याची चाल चालत आली आहे. आणि तद्देशीय दोघां पंडितांकडून पत्रें आलीं आहेत तीं पाहिलीं ह्मणजे तोंडानें वेद शिकविण्याची पुरातन पद्धति आज तागायत तशीच कशी चालली आहे हें कळून येईल.

ऋग्वेदाची प्रतिशाखा हा ग्रंथ आणि त्या ग्रंथाचें जर्मन भाषेंत भाषांतर मी १८५६ सालीं प्रसिद्ध केलें. त्या ग्रंथांत वेदाक्षरें उच्चारावीं कशीं याजबद्दलचे नियम दिले आहेत.

हें प्रातिशाख्य सर्वांपेक्षां प्राचीन असून तें यास्क आणि पाणिनी यांच्या मध्यंतरीं, ह्मणजे खिस्ती शकापूर्वी ९ व्या आणि ६ व्या शतकाच्या मध्यतरीं, लिहिलेलें असावें असें मला वाटतें. हा काल खोटा आहे असें सिद्ध करण्यास आजपावेतों कित्येकांनीं कांहीं प्रमाणें दाखविलीं. परंतु त्याहून बलवत्तर प्रमाणें माझ्या दृष्टीस पडत तों पर्यंत हाच काल खरा असें मी ह्मणणार. आर्यावर्तांतील त्या काळच्या शाळांतून शिकविण्याची पद्धति कशी असे, तिचें वर्णन प्रातिशाख्याच्या १५ व्या अध्यायांत आपल्या दृष्टीस पडतें. यांत असें लिहिलें आहे कीं मान्य झालेले अवघे ग्रंथ गुरूला येत असावेत व ब्रह्मचारीपणाचीं अवघीं कर्में त्याच्या हातून घडलीं पाहिजेत. असें नसेल तर त्याला गुरुपणा मिळूं नये. आणि ब्रह्मचर्य व्रत संभाळणाऱ्या शिष्यांस मात्र त्यानें शिकवावें. त्यानें योग्य ठिकाणीं जाऊन राहिलें पाहिजे. शिष्ये एक किंवा दोघेच असले तर त्यांनीं गुरूच्या उजव्या अंगास बसावें. जास्त असल्यास, जशी जागा सांपडेल तसें बसावें. प्रत्येक पाठाचा आरंभ करितांना शिष्ये गुरूच्या पायां पडून ह्मणतात, ' महाराज, सांगा ' नंतर गुरूजी ह्मणतात, 'हां, ह्मणा ओम्.' आणि मग दोन शब्द सांगतात किंवा समास असल्यास एकच शब्द सांगतात. गुरूजींनीं एक किंवा दोन शब्द सांगितले ह्मणजे पहिला शिष्या पहिला शब्द ह्मणतो, परंतु न समजण्याजोगें त्यांत कांहीं त्यास आढळलें तर तो शिष्या गुरूला 'गुरूजी, हें असेंच काय? ' असें विचारतो. आणि त्याची समजूत पडली ह्मणजे गुरू ह्मणतो, ' होय असेंच.'

एक प्रश्न समाप्त होई तोंपर्यंत हा क्रम चालतो. बहुधा तीन पंक्तींचा एक प्रश्न होतो. चाळिसांपासून बेचाळीस अक्षरें एखाद्या पंक्तींत असल्यास तसल्या दोनच पंक्तींचा एक प्रश्न होतो. जर त्या पंक्ति चाळीसापासून बेचाळीस अक्षरांच्या असल्या तर दोन किंवा तीन मिळून एक प्रश्न होतो. जर एकाच श्लोकाचा एखादा मंत्र असला तर त्याचाही एक प्रश्न झाला असें ह्मणतात. एक प्रश्न समाप्त झाला ह्मणजे त्यांना तो आणखीं एकदां ह्मणावा लागतो. आणि नंतर उंच स्वरानें प्रत्येक

वर्णावर्णाचा उच्चार करीत तोंडपाठ शिकावा लागतो. गुरूनें उजव्या आंगच्या शिष्याला एक प्रश्न सांगितला ह्मणजे त्याच्या उजव्या आंगचे अवघेजण तोच ह्मणत जातात व सारा अध्याय किंवा व्याख्यान संपेतोंपर्यंत असेंच चालतें. एका अध्यायांत बहुधा साठ प्रश्न असतात. शेवटली अर्ध ऋचा ह्मटली ह्मणजे गुरू ह्मणतात, 'हां चालूं द्या' आणि शिष्या ह्मणतो, 'ओम्' आणि अध्यायाच्या अखेरीस जे मंत्र ह्मणावयाचे ते पुनः ह्मणतो. यानंतर शिष्ये गुरूच्या पायां पडतात आणि मग त्यांना सुटी होते.

अध्ययनक्रमाचें हें एक साधारण बाह्य स्वरूप झालें, परंतु याहूनही बारकाईचे अनेक नियम त्या प्रातिशाख्यांत दिलेले आहेत. उदाहरण, लहान लहान शब्दांची हयगईनें हेळसांड होऊं नये ह्मणून ज्या शब्दास एकच उंच स्वर असतो, किंवा एकच स्वराचा जो शब्द असतो तो गुरूला दोनदा ह्मणावा लागतो. लहान लहान पुष्कळ शब्दांस 'इति' हें पद लावावें लागतें. दुसऱ्यांनाही 'इति' हें पद लावून त्यांचा पुन्हा उच्चार करावा लागतो. उदाहरण 'च इति च.'

हीं व्याख्यानें वर्षांतून सुमारें सहा महिने चालत आणि त्यांचा आरंभ बहुतकरून वर्षाऋतूच्या आरंभापासून होत असे. तथापि अनध्यायाचे दिवसही पुष्कळ असत, आणि त्या दिवशीं पढणें होत नसे. गृह्यसूत्रांतून आणि धर्मसूत्रांतून याजबद्दलचे फार बारीक नियम सांगितले आहेत.

ख्रिस्ती शकापूर्वी ६०० वर्षांमागें आर्यावर्तांत काय काय चाललें होतें त्याची माहिती होण्यास इतका वेळ केलेलें वर्णन पुरें आहे. त्या प्राचीन पद्धतीपैकीं अद्यापि काय राहिलें आहे तें आपण आतां पाहूं.

"षट्दर्शनचिंतनिका" या नांवाचें मासिक पुस्तक चालविणाऱ्या *पंडिताकडून पुणें मुक्कामाहून तारीख ८ माहे जून सन् १८७८ या मितीचें मला पत्र आलें आणि त्यांत असें लिहिलें आहे:—

'ऋग्वेदाच्या एका शाखेचा अभ्यास करणारा जर तीव्र बुद्धीचा

* प्रोफेसर महादेव मोरेश्वर कुंटे.

आणि मेहनती असला, तर दशग्रंथ शिकण्याला त्याला सुमारें ८ वर्षे लागतात. हे दहा ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

१ संहिता किंवा मंत्र.

२ ब्राह्मण=यज्ञविषयक गद्यात्मक निबंध.

३ आरण्यक=वन-ग्रंथ.

४ गृह्यसूत्रें=गृहाचार व गृहव्यवस्था यांचे नियम.

(५-१०) सहा अंगें :- १ शिक्षा=वर्णोच्चारविषयक ग्रंथ; २ ज्योतिष=खगोलशास्त्र; ३ कल्प=आचारविचार; ४ व्याकरण; ५ निघंट आणि निरुक्त ह्मणजे शब्दसिद्धिज्ञान; आणि ६ छंद ह्मणजे वृत्तरचना.

'शिष्या आठ वर्षे पावेतों वर्ज्य किंवा अनध्यायाचे दिवस खेरीज करून दररोज पढतो. चांद्र मानाच्या एका वर्षाचे ३६० दिवस असतात; या मानानें आठ वर्षांचे २,८८० दिवस होतात. यांतून एकंदर ३८४ वर्ज्य दिवस वजा केले ह्मणजे आठ वर्षांत अभ्यास करावयाचे २,४९६ दिवस बाकी रहातात. आतां दशग्रंथांत अदमासें २९,५०० श्लोक आहेत. ह्मणजे त्या मानानें ऋग्वेद पढणाऱ्याला रोजचे १२ श्लोक शिकावे लागतात. ३२ अक्षरांचा एक श्लोक होतो.

'ही माहिती मला कोठून मिळाली तें मला तुह्मांस कळविलें पाहिजे. वेदशास्त्रोत्तेजक या नांवाची पुण्यामध्यें एक मंडळी आहे. अलंकारशास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र; पद, क्रम, घन, जटा, अशा चार भेदेंकरून वेदाचा पाठ; आणि न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, वेदान्त; इतके भाग संस्कृत विद्येंत विशेष महत्वाचे आहेत. या सर्व विषयांत, आणि ब्राह्मण ऋग्वेदी असल्यास, मी वर सांगितलेल्या दशग्रंथांत त्यांची परीक्षा घेऊन ही सभा त्यांस बक्षिसें देते. बक्षीस कोणाला द्यावयाचें तें एक परिक्षकमंडळी ठरविते. प्रत्येक विषयाची तीन प्रकारची परीक्षा वेतात. ह्मणजे, त्या विषयाची तोंडची माहिती (प्रक्रिया), विषयाची साधारण माहिती ( उपस्थिति ), आणि वर दिलेल्या विषयांवरील सर्वमान्य अशा ग्रंथांतील वाक्यांचा अर्थ लावणें (ग्रंथार्थपरीक्षा). पुण्यांतील मोठमोठे सभ्य लोक या परिक्षेच्या संबंधानें सुमार

एक हजार रुपये वांटतात. गेल्या मे महिन्याच्या ८ व्या तारखेस ही सभा भरली होती; ते वेळीं पंडित व वैदिक मिळून एकंदर सुमारें पन्नासांवर लोक आले होते. ही जी मला माहिती मिळाली ती पुण्यामध्यें मान्य अशा एका वयोवृद्ध वैदिकाच्या तोंडची आहे. ती त्यानें या जमलेल्या पंडितांच्या आणि वैदिकांच्या समक्ष मला सांगितली.'

प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. यांचा एक लेख माझ्या पहाण्यांत आला आहे. त्यांत तेथील विद्येच्या स्थितीचें मोठें सुरस वर्णन केलें आहे. इंडियन् आंटिक्वरी १८७४ पृष्ठ १३२, या ठिकाणीं ते लिहितात :—

'ब्राह्मणाच्या कुटुंबांत प्रत्येकाला कोणचा तरी एक वेद पढावा लागतो. आणि त्या वेदाची एक नियमित शाखा पढावी लागते. त्या त्या वेदाच्या सूत्रांत सांगितलेल्या आचारांप्रमाणें कुलाचार आणि संस्कार त्यास करावे लागतात. त्या नियमित वेदाचे अवघे ग्रंथ पाठ केले ह्मणजे वेदाध्ययन संपतें. उत्तर हिंदुस्थानांत शुक्लयजुर्वेदाचें प्राबल्य आहे, आणि मध्यंदिन ही शाखा प्रबल आहे. परंतु तेथें वेदाभ्यास बहुतेक नाहींसाच झाला आहे. कांहीं कांहींसा काशींत मात्र दृष्टीस पडतो. कारण, त्या क्षेत्रीं हिंदुस्थानांतील गांवोगांवचीं ब्रह्मवृंदें येऊन राहिलीं आहेत. थोडासा गुजराथेंतही चालू असलेला आढळतो. परंतु महाराष्ट्र देशांत मात्र बराच आहे. जन्मभर याच वेदाचा अभ्यास करणारे ब्राह्मण तैलंगणांत पुष्कळ आहेत. दक्षिणा मिळावी या उद्देशानें पुष्कळ तैलंगण ब्राह्मण देशोदेशीं हिंडतात व खाऊन पिऊन दोन पैसे बाळगणाऱ्या गृहस्थांकडे जाऊन वेदाचा कांहीं भाग ह्मणतात, ह्मणजे ते त्यांची शक्त्यनुसार पाठवणी करितात. हे जो वेद ह्मणतात तो बहुतकरून कृष्ण यजुः असून त्यास आपस्तंभ सूत्र असतें. या मुंबईंत मजपाशीं दक्षिणेच्या आशेनें एखादा तरी तैलंग आल्यावांचून एक आठवडाही जात नाहीं. तें माझे घरीं आले ह्मणजे त्यांना जें येत असेल तें मी त्यांचेकडून ह्मणवून घेत असतों, आणि तें त्यांचें ह्मणणें माझेजवळ छापील पोथ्या असतात त्यांच्याशीं ताडून पहातों.'

'प्रत्येक वेदाच्या ब्राह्मणांमध्यें बहुतकरून दोन वर्ग असतात. गृहस्थ आणि भिक्षुक. गृहस्थ लोक संसार चालविण्यासाठीं कोणता तरी एक उदीम किंवा धंदा करितात, व भिक्षुक लोक पवित्र ग्रंथांचा अभ्यास करण्यांत आणि आपले धर्मसंबंधी संस्कार व आचार चालविण्यांत आपले दिवस घालवितात.

'या दोन्ही वर्गांतील लोकांस दररोज सांजसकाळ संध्यावंदनें करावीं लागतात. वेद जसजसा निराळा असेल तसतसा संध्येचा प्रकारही निरनिराळा असतो. परंतु 'तत्सवितुर्वरेण्यं' इत्यादि ह्या गायत्रीमंत्राचा पांच, दहा, अठ्ठावीस, किंवा १०८ वेळ जप सार्‍यांना करावा लागतो. सार्‍या संध्येंत याच मंत्राचें महत्व विशेष आहे.

'कित्येकांना याखेरीज आणखीं दररोज ब्रह्मयज्ञ करावा लागतो. कांहीं प्रसंगीं सर्वांनीं तो केलाच पाहिजे. ऋग्वेदी ब्राह्मणांनीं ब्रह्मयज्ञ करतेवेळीं पहिल्या मंडळाचा पहिला मंत्र, ऐतरेय ब्राह्मणांतील आरंभींचीं वाक्यें, ऐतरेय आरण्यकाचे पांच भाग, यजुःसंहिता, सामसंहिता, अथर्वसंहिता, आश्वलायन कल्पसूत्र, निरुक्त, छंद, निघंट, ज्योतिष, शिक्षा, पाणिनी, याज्ञवल्क्यस्मृति, महाभारत, कणाद, जैमिनी, व बादरायणाचीं सूत्रें इतकें पठण केलेंच पाहिजे.

'पण ज्यांस सगळा वेद पाठ येतो असे भिक्षूक पहिल्या मंत्रापुढें अधिक येत असेल तेवढें ह्मणतात. त्यांच्या मर्जीस येईल तेवढाच ते ह्मणतात. 'स यावन्मन्येत तावदधीत्य'—**आश्वलायन.**

'कांहीं भिक्षुक असतात त्यांना याज्ञिक असें ह्मणतात. ते बहुधा उपाध्येपणाचें काम करितात व पवित्र कर्मे व संस्कार चालविण्यांत फार कुशल असतात.

'परंतु भिक्षुकांचा यापेक्षांही जास्त महत्वाचा एक वर्ग आहे त्यांना वैदिक असें ह्मणतात. कांहीं वैदिक याज्ञिकही असतात. वेद तोंडपाठ करून स्वरांत देखील चूक होऊं नये अशा प्रकारें तो चांगला बिनचूक ह्मणणें हेंच काम ते जन्मभर करितात. उत्तम ऋग्वेदी वैदिकाला संहिता, पद, क्रम, जटा, घन, ऐतरेय ब्राह्मण व आरण्यक,

आश्वलायनाचीं कल्प व गृह्यसूत्रें, निघंट, निरुक्त, छंद, ज्योतिष, शिक्षा, आणि पाणिनीचें व्याकरण, इतकीं मुखोद्गत करावीं लागतात. माझ्या मतें वैदिक ब्राह्मण हें एक चालतें बोलतें पुस्तकालयच आहे !

'मंत्रांतील शब्दांच्या निरनिराळ्या प्रकारच्या रचनेला **संहिता**, **पद**, **क्रम**, **जटा**, **घन**, अशीं निरनिराळीं नांवें दिलीं आहेत.

'**संहिता** ग्रंथांत सारे शब्द संस्कृत भाषेंतच उपलब्ध होणाऱ्या स्वरांच्या नियमांप्रमाणें जोडलेले असतात.

'**पद** ग्रंथांत शब्द वेगळाले केलेले असतात आणि समासही सोडविलेले असतात.

'**क्रम** ग्रंथाची रचना खालीं लिहिल्याप्रमाणें असते. असें समजा कीं अकरा शब्दांची एक पंक्ती आपणापुढें आहे, तर ते शब्द खालीं लिहिलेल्या क्रमानें जुळवावे आणि जुळवितांना स्वरसंधी आणि अक्षरसंधी या दोहोंकडे पूर्ण लक्ष द्यावें :—

१, २, २, ३, ३, ४, ४, ५, ५, ६, ६, ७, ७, ८.

'या क्रमानें प्रत्येक ऋचेच्या आणि प्रत्येक अर्ध ऋचेच्या शेवटल्या शब्दापुढें 'इति' (वेष्टन) हें पद लावून तो शब्द पुनः ह्मणावा.

'संहिता, पद आणि क्रम या तिन्ही ग्रंथांत कृतीचें असें काडीमात्रही नाहीं. ऐतरेय आरण्यकांतूनही त्यांचीं नांवें आलीं आहेत. तीं दिसण्यांत मात्र निराळीं आणि जास्त जुनीं अशीं दिसतात. संहिता ग्रंथाला 'निर्भुज' (वांकलेलें) असें नांव आहे. कारण त्यांतलीं पहिलीं आणि शेवटलीं अक्षरें वांकलेलीं असतात. पद ग्रंथाला (प्रतृण्ण)ह्म०'तोडलेलें' असें नांव आहे. क्रम ग्रंथाला 'उभयम् अंतरेण' (दोघांच्या मधलें,) असें नांव आहे.

'जटा पद्धतींत शब्दांची रचना खालीं लिहिल्याप्रमाणें असते:–१, २, २, १, १, २; २, ३, ३, २, २, ३; ३, ४, ४, ३, ३, ४; इत्यादि. प्रत्येक ऋचेचा व तसाच अर्धऋचेचा शेवटला शब्द 'इति' (वेष्टन) हें पद लाऊन पुनः ह्मणावयाचा असतो.

'घन पद्धतींत शब्दाची रचना पुढें लिहिल्याप्रमाणें असते:– १, २, २, १, १, २, ३, ३, २, १, १, २, ३; २, ३, ३, २, २, ३, ४, ४, ३, २, २, ३; २, ३, ३, २, २, ३, ४, ४, ३, २, २, ३, ४; ३, ४, ४, ३, ३, ४, ५, ५, ४, ३, ३, ४, ५; प्रत्येक ऋचेच्या तसेच अर्धऋचेच्या दोन शब्दांनंतर 'इति' (वेष्टन) हें पद लावून ते शब्द पुनः ह्मणावयाचे असतात. उदाहरण.–७, ८, ८, ७, ७, ८, ८ इति ८, आणि पुन्हा १०, ११, ११, १०,११, ११ इति ११. समासही सोडवावे लागतात ( अवग्रह ).

'अशा भिन्न भिन्न प्रकारें शब्दांची रचना करण्यांत एवढाच हेतु दिसून येतो कीं, त्या वेदग्रंथाचा पाठ अक्षरशः यथास्थित कायम रहावा. आणखीं तो पाठ केवळ मंत्रासारखा तोंडानें ह्मणावयाचा नसतो, तर अंत्य आणि आद्य अक्षरांच्या संधिनियमानुरूप बदलणाऱ्या रूपांकडे सतत लक्ष ठेवावें लागतें, आणि स्वरही फिरवावे लागतात. मन्त्रांचा उच्चार करितांना मंत्र ह्मणणारे ब्राह्मण कंठानें स्वरभेद दाखवितात, त्यांवरून निरनिराळे स्वर स्पष्टपणें ऐकण्यांत येतात. तैत्तिरीय ब्राह्मणांची ह्मणण्याची रीत ऋग्वेदी, काण्व, आणि अथर्ववेदी ब्राह्मणांच्या रीतीहून अगदीं निराळी आहे. मध्यंदिन शाखेचे ब्राह्मण आपला उजवा हात कांहीं प्रकारानें हालवून स्वरभेद जाणवितात.

'ऋग्वेदी ब्राह्मणांत बहुतकरून घनापावेतों शिकण्याची चाल नाहीं. संहिता, पद, आणि क्रम, हे तीन प्रकार येते झाले ह्मणजे त्यांना बहुतकरून पुरेसेंच वाटतें. तरी तैत्तिरीय शाखेचे बरेच वैदिक घनापावेतों शिकसात; कारण, त्यांच्या शाखेचे ब्राह्मण व आरण्यक हे दोनच ग्रंथ त्यांना आणखी शिकावयाचे असतात. तैत्तिरीय प्रातिशाख्यही कांहीं लोक शिकतात, परंतु वेदांगें तर त्या शाखेंतला एकही ब्राह्मण शिकत नाहीं. तीं फक्त ऋग्वेदीच शिकतात. मध्यंदिन शाखेचे ब्राह्मण संहिता, पद, क्रम, जटा, आणि घन इतकें शिकले ह्मणजे अध्ययन सोडतात. सगळा शतपथ ब्राह्मण तोंडपाठ ह्मणणारा एक देखील मिळावयाचा नाहीं. पुष्कळ जणांना थोडथोडे भाग मात्र येत असतात. या

मुंबई इलाख्यांत अर्थवेदी ब्राह्मण तर फारच थोडे आहेत. साम वेदाचा अभ्यास करणारे ब्राह्मण असंख्य रीतीनीं सामगायन करितात. ते आपलीं ब्राह्मणें व उपनिषदें ही पाठ करितात.

'वेदाचें अध्ययन करणाऱ्यांपैकींच श्रोत्रिय ह्मणून आणखी एक वर्ग आहे, त्यांना लोक बहुतकरून श्रौती किंवा श्रोत्रिय असें नांव देतात. मोठमोठाले यज्ञ करण्याचे कामांत ते निष्णात असतात. बहुतकरून ते चांगले वैदिक असतात आणि कल्पसूत्रें व प्रयोग (हस्तकृति) एवढीं जास्त त्यांना येत असतात. तसले लोक थोडेच असतात. गांवोगांवीं एखादे ठिकाणीं तरी अग्निहोत्री दृष्टीस पडतात. ते यज्ञसंबंधी तीन अग्नि बाळगतात, पंधरा पंधरा दिवसांनीं इष्टी (यज्ञ) करितात, आणि चातुर्मास्य (चार चार महिन्यांनीं करावयाचे) यज्ञ करितात. कधीं कधीं मोठ मोठे सोमयागही करितात, परंतु सामर्थ्य-नसल्यामुळें तसले यज्ञ अर्थात् वारंवार होत नाहींत.'

एखादी प्राचीन विद्या सुरक्षित राखण्याच्या कामीं केवळ स्मृति किती उपयोगी पडते हें, मी वर दिलेले वेंचे वाचले ह्मणजे ध्यानांत येईल. आज मितीला आपणापाशीं जे वेद विद्यमान आहेत ते पूर्वापार इतके अक्षरशः अचूक चालत आले आहेत कीं, कितीही प्रती पाहिल्या तरी अवघ्या ऋग्वेदांत एकही पाठांतर दृष्टीस पडत नाहीं; अथवा संशयास्पद किंवा अनिश्चित असा एक स्वरही आढळत नाहीं! मूळ संहितेच्या पोथ्यांतून कोठें कोठें अपभ्रंशमात्र आढळतात; पण ते हुशार आणि दक्ष शोधकाच्या सहज लक्षांत येण्यासारखे असतात. परंतु ज्या काळीं संहितेचीं मूळ अक्षरें अमूकच आहेत असें ठरलें त्या दिवसापासूनच हे अपभ्रंशाचे पाठ सर्वमान्य झाले असावेत असें वाटतें. त्यांपैकीं कांहीं निरनिराळ्या शाखांतून आहेत, आणि त्यांची ग्राह्याग्राह्यता प्राचीन ग्रंथकारांनीं वादविवादानें फारच अक्कल लढवून स्थापित केली आहे.

आर्यावर्तांत धर्माच्या संबंधानें वाद उपस्थित झाला असतां तत्संबं-धानें वेद मुख्य प्रमाण होय असें पूर्वी मानीत असत, तोच प्रकार अ-द्यापीही चालू आहे. इतर धर्मांतील प्रमाणभूत ग्रंथांना खोटे ह्मणणारे

पुरुष जसे निपजले, तसे वेदग्रंथ खोटा असें ह्मणणारे पुरुष झाले नाहींत असें नाहीं. परंतु जसे आपण आपला धर्मग्रंथ बैबल सर्वोत्कृष्ट आणि ईश्वरप्रणीत आहे असें मानितों व मुसलमान किंवा महम्मदी धर्माचे लोक कुराण सर्वोत्कृष्ट आणि ईश्वरप्रणीत आहे असें समजतात, त्याच प्रकारची निष्ठा वेदावर ठेवणारे आजकाल हजारों लोक आहेत.

# व्याख्यान चवथें. (ता. ९२९ ८ मार्च)

## स्पृश्य, अर्धस्पृश्य व अस्पृश्य पदार्थांची पूजा.

आतां असा विचार करूं कीं, आपण निघालों ते कोणच्या मुकामापासून, आपली कोणच्या मुकामास पोंचण्याची इच्छा आहे, आणि त्या मुकामास पोहोंचण्याला वाट कोणची? धर्मविषयक कल्पना जेथून प्रथमारंभीं निघाल्या तेथें आपणास जाणें आहे ही गोष्ट तर खरी. पण त्या ठिकाणीं नेलेले जुने दोन रस्ते होते हें आपणांस ऐकून ठाऊक असेलच. पैकीं एक डावीकडे जातो व दुसरा उजवीकडे जातो. हे दोन रस्ते ह्मणजे एक पदार्थपूजा (Fetish Worship) व दुसरा आगम किंवा आप्तोपदेश हे होत. पण आपल्यास तर हे दोन्ही रस्ते पसंत नाहींत. तेव्हां आतां आपण एक तिसराच निराळा रस्ता शोधून काढून त्या रस्त्यानें जाऊं— हा रस्ता मूळ जेथें फुटतो, तेथें एक चौकी आहे. ती कोणची ह्मणाल तर पंचेंद्रियांपासून होणारें ज्ञान. अर्थात् हें ज्ञान प्रत्येकास ग्राह्य असलेंच पाहिजे असें धरून चालूं.— तेव्हां ह्या पंचेंद्रियजन्य ज्ञानापासून जो रस्ता निघतो त्याच रस्त्यानें थेट सरळ जाऊं.— जातां जातां हळू हळू पर्यवसानीं केवळ इंद्रियांपासून सर्वथा सिद्ध न होणारें ह्मणजे अनंत, अदृश्य किंवा दिव्य अशीं भिन्न भिन्न रूपें धारण करणारें असें वस्तु-विशेष जेथें सांपडेल त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचूं.

## धर्माचें प्रमाण सर्वथा इंद्रियगम्य नसतें.

सर्व धर्मांचा इतर गोष्टींत कितीही मतभेद असला, तरी एका गोष्टींत सर्वांचें ऐकमत्य दिसतें. ती गोष्ट ही कीं, धर्माचें प्रमाण सर्वथा इंद्रियजन्य ज्ञानावर अवलंबून नसतें. हा नियम ज्यास इंग्रजींत (Fetish Worship) पदार्थपूजा ह्मणतात त्याला सुद्धां लागतो; कारण कीं, एकादा रानटी मनुष्य आपल्या भक्तीच्या पदार्थांची पूजा

करितो त्यवेळेस हा एक साधारण क्षुल्लक दगड आहे असें मानून तो त्या दगडाची पूजा करितो असें नाहीं. ज्यास स्पर्श करतां येईल, व जो हातांत घेतां येईल, असे हे दोनच गुण ज्यांत आहेत अशा दगडास तो खास पुजीत नाहीं. तर आपले हात, कान व डोळे या इंद्रियांस गोचर नाहीं असें कांहीं तरी त्या दगडांत आहे असें मानून तो त्याची भक्ति व पूजा करितो.

असें कशावरून ? हा काय चमत्कार आहे कीं, जें कांहीं आपणांस इंद्रियांच्या द्वारानें समजतें त्याशिवाय इंद्रियाग्राह्य, इंद्रियज्ञानातीत दुसरें कांहीं अदृश्य असें आहे, अशी माणसांच्या ठायीं भावना होऊन पुढें थोडक्याच काळांत ते त्यास अनंत, अद्भुत व दिव्य अशीं नांवें देतात! याची उपपत्ति कशी ? आतां कदाचित् असेंही संभवेल कीं, माणसें ज्यास अनंत, अदृश्य व दिव्य असें ह्मणतात, तें त्यांचें ह्मणणें अगदीं चुकीचें असून केवळ भ्रमात्मक असेल. पण असें जर असेल तर हेंही जाणणें आपणांस फार उचित आहे कीं, या जगाच्या आरंभापासून तों आजपर्यंत जीं माणसें बाकीच्या पुष्कळ गोष्टींत दिसण्यांत शहाणीं दिसतात तीं या एकच गोष्टींत वेडीं कशीं बनलीं ? हें असलें वेड उपजलें कसें ? या प्रश्नांचें उत्तर आपणांस मिळणें अवश्य आहे. जर न मिळेल तर धर्माचें यथाशास्त्र प्रतिपादन करणें केवळ अशक्य होय, असें ठरविणें भाग पडेल.

## बाह्य* प्रतिपत्ति किंवा आगम.

केवळ शब्दांनींच आपलें काम होईल असें असतें तर असें ह्मटलें असतां चालेल कीं, इंद्रियजन्य ज्ञानाच्या मर्यादेपलीकडच्या अशा या धर्मसंबंधी कल्पनांची किंवा भावनांची उत्पत्ति बाह्य प्रतिपत्तीपासून झाली. हें बोलतांना ठीक दिसतें आणि खरोखर अशा प्रकारचा कांहीं हक्क न सांगणारे

* **बाह्य प्रतिपत्ति**= [बाहेरून कोणी येऊन सांगणें, कळविणें, प्रकट करणें; बाहेरून झालेलें ज्ञान, बाह्याभिव्यक्ति, बाह्य प्रबोध, बाह्य-शिक्षा, आकाशवाणी, बाहेरून आलेली ईश्वराज्ञा.] यांच्या उलट=अतःप्रतिपत्ति, अंतर्ज्ञान.

धर्म जगांत थोडेच आहेत. पण हें ह्मणणें युक्तीस कितपत जुळतें हें पाहणें असल्यास तें पदार्थपूजकांच्या विचारांशीं ताडून पहावें, ह्मणजे आपली खात्री होईल कीं, धर्मविषयक विचारांचें मूळ व वृद्धि ह्यांच्या इतिहासाचा अभ्यास करितांना ज्या ज्या अडचणी येतात त्या त्या अडचणी बाह्य प्रतिपत्तीच्या कल्पनेनें दूर होतात असें नाहीं. समजा कीं, 'आशान्टी' नांवाच्या जंगली लोकांच्या धर्मगुरूस विचारलें कीं 'अरे, तुझ्या भक्तीचा विषय हा जो दगड तो एरवींच्या दगडासारखाच एक दगड नसून ह्यांत कांहीं विशेष आहे असें तुला कसें समजलें रे?' समजा कीं, या प्रश्नाचें उत्तर त्यानें प्रामाणिकपणानें असें दिलें:— 'बाबा, ह्या पूज्य पदार्थानेंच, मला मी फलाणा मनुष्य आहें ह्मणून माझ्या कानांत सांगितलें किंवा स्वप्नांत येऊन सांगितलें.' तर या बोलण्यास आपण काय जबाब द्यावा? तेव्हां सिद्ध काय कीं, तुह्मी हवें तें ह्मणा. ईश्वरप्रणीत धर्माच्या कल्पनेचा मूळपायाच हा आहे. या उपपत्तीखेरीज दुसरी उपपत्तीच नाहीं.

सृष्टींत देव आहेत असें मनुष्यांस कशावरून कळलें? याचें उत्तर— देवांनीं स्वतःच 'आम्ही आहों' ह्मणून माणसांस सांगितलें. ही कल्पना अत्यंत सुधारलेल्या किंवा अत्यंत निकृष्ट मानवकोटींत सारखीच आढळते. आफ्रिकेंतील लोकांत अशी एक नेहेमींची ह्मण आहे कीं, 'हल्लींपेक्षां पूर्वी स्वर्ग माणसाला अधिक जवळ होता. त्यावेळीं सर्वांत मोठा देव, ह्मणजे सृष्टिकर्ता, स्वतांच माणसांस शहाणपणाच्या गोष्टी शिकवीत असे; पण तो कांहीं काळानें त्यांस सोडून त्यांच्यापासून दूर गेला व हल्लीं तो आकाशांत फार लांब व एकीकडे राहतो.' *आर्य लोकांचेंही असेंच ह्मणणें आहे व ग्रीक लोकही आर्यलोकांप्रमाणें असेंच सांगतात कीं 'देवांसंबंधीं आमची जी कांहीं माहिती आहे ती सर्व आमच्या पूर्वजांपासून आह्मांस मिळाली आहे. आमच्या पूर्वजांचा व देवांचा आह्मापेक्षां विशेष निकट संबंध होता.'

---

* पहा— ऋग्वेद १, १७९, २. ७, ७६, ४.

पण मुख्य प्रश्न असा आहे कीं, देवांविषयींची कल्पना किंवा आपणांस दिसतें त्याच्या पलीकडच्या गोष्टींविषयींची कल्पना, अगदीं पूर्वीच्या माणसांच्या किंवा त्यांच्या वाडवडिलांच्या तरी मनांत प्रथम आली कशी? त्या कल्पनेचें बीज काय व तिची उत्पत्ति कशी? विचार कर्तव्य आहे तो हा आहे. 'ईश्वर' ही भावना मनुष्याच्या डोक्यांत आली कोठून? 'देव' हा शब्द किंवा हें नांव त्यास सुचलें कसें? कारण, हें नांव कोणत्याही दृश्य किंवा अदृश्य पदार्थास लावण्यापूर्वीं माणसांस तें सुचलें पाहिजे हें उघड आहे.

## अंतःप्रतिपत्ति किंवा अंतर्ज्ञान.

बाह्य साधनानें किंवा द्वारानें, अनंत, अदृश्य अथवा दिव्य अशा वस्तूची कल्पना मनुष्याच्या मनांत प्रथम आली हें ह्मणणें सोपपत्तिक नाहीं, असें जेव्हां ठरलें, तेव्हां हीअडचण दुसऱ्या एखाद्या शब्दानें दूर करितां येईल कीं काय, असा प्रश्न निघाला. कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, मनुष्याच्या अंतःकरणांत धर्मविषयक विचारांची प्रेरणा करणारी एक शक्ति आहे, तिला धर्मवासना असें ह्मणावें; तिच्या योगानें अनंत, अदृश्य व दिव्य असें जें कांहीं तद्विषयीं विचार करण्याचें सामर्थ्य इतर प्राण्यांस नसून मनुष्यास मात्र असतें. आतां ही उपपत्तीही पदार्थ-पूजकाच्या ह्मणण्याशीं ताडून पाहतां उपपत्ति सांगणाराचा वेडेपणा मात्र सिद्ध होतो. तो कसा पहाः

पुनः आपला तो जंगली आशान्टी घ्या. जर तो असें ह्मणूं लागला कीं 'माझ्या पूज्य पदार्थांत (धोंड्यांत) साधारण धोंड्याहून अधिक असें मला कांहीं दुसरें दिसतें, कारण तें दुसरें पाहण्याची माझ्यांत कांहीं विशेष शक्ति आहे.' तर युरोपियन शिक्षणाचा जो प्रताप, ह्मणजे निवळ पोकळ पांडित्य, त्यांत तो बेटा मोठा निपुण झाला आहे असें आपण ह्मणाल व त्याचें वाक्पटुत्व पाहून आपणांस फार तर मोठें नवल वाटेल, एवढेंच. परंतु त्या असंस्कृत व वेडप्या रानटी माणसाचें साहाय्य मानसशास्त्राच्या फारसें उपयोगी पडेल किंवा त्याच्या त्या पो-

कळ बडबडीपासून मानसशास्त्राचें कांहीं तरी हित होईल असें आपणास वाटेल काय? धर्मविषयक कल्पनांची उत्पत्ति झाली कशी,धर्म हा मूळ निघाला कोठून, या गोष्टींच्या उपपत्त्यर्थ धर्मवासना किंवा 'धर्मस्फूर्ति' ह्मणून कांहीं एक निराळी मानसिक शक्ति आहे, अशी कल्पना करणें ह्मणजे भाषेची उत्पत्ति समजण्यासाठीं भाषाज्ञान होण्याची एक शक्ति कल्पिणें किंवा मनुष्यांत गणकशक्ति कोठून आली या प्रश्नाचें समाधान 'जन्मादारभ्य मनुष्याच्या अंगीं गणकशक्ति ह्मणून एक शक्तिच असते' असें ह्मणून करण्यासारखेंच आहे. वैद्यकसंबंधानें औषधांचीही अशीच एक गोष्ट आहे: 'बोवा, अमक्या औषधानें झोंप कां हो येते?' असें विचारलें असतां कारण सांगतात तें कोणचें? 'अहो, त्या औषधाच्या अंगीं झोंप आणण्याचा गुणच आहे!'—अशा उपपत्तीनें जिज्ञासकाचें समाधान होईल काय? असो. अशा बोलण्यांत कधीं कधीं कांहीं सत्याचा अंश असतो हें खरें. मी कबूल करतों. पण असत्याच्या राशींत सत्याचे कण सांपडले, तरी फार थोडे सांपडतात आणि तेही फार युक्तीनें शोधून काढावे लागतात. बाह्य प्रतिपत्ति किंवा आगम ह्मणजे काय व अंतःप्रतिपत्ति अथवा धर्मबुद्धि किंवा धर्मस्फूर्ति ह्मणजे काय, यांची स्वच्छ व्याख्या आपण एकदां केली ह्मणजे मग त्या परिभाषांचा उपयोग सर्वत्र करणें हें ठीक दिसतें. तथापि त्या शब्दांचा उपयोग करण्यास मोठी भीति वाटते. कारण, त्यांनीं आजपर्यंत तत्वविज्ञानचिंतनिकेंत व धर्ममीमांसेंत अनेक वेळां मोठा घोटाळा करून सोडला आहे. यामुळें यापुढें त्यांचा उपयोगच न करणें हें मी शहाणपणाचें काम समजतों. असो. आतां याप्रमाणें आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या अनेक अडचणींतून सहज रीतीनें पार पडून जाण्याचे जुने पूल तर आपण मोडून टाकिले. तेव्हां आतां धर्मविषयक विचारांचें किंवा कल्पनांचें मूळ समजण्याचा आपण यत्न करूं ह्मटलें तर आधारा ऐवजीं एवढेंच शिल्लक रहातें. तें हें कीं, आगम ह्मणजे प्राथमिक 'ईश्वरोपदेश' किंवा 'धर्मस्फूर्ति' या दोहोंतून एकाच्याही साहाय्यावांचून त्या धर्मविषयक विचारांचें आदिकारण शोधून काढण्याचा यत्न करावा. मग हा यत्न व तदर्थ होणारे आपले परिश्रम

कितपत फलप्रद होतात तें पहावें. आपणापाशीं आपलीं पंचेंद्रियें तर कायम आहेतच व आपल्या समोर हें विस्तीर्ण जगत जसेंचें तसेंच पडलें आहे, या गोष्टीची साक्ष आपलीं इंद्रियेंच आपणांस देतात. आतां प्रश्न हा आहे कीं, या दृश्य इहलोकापलीकडचें ह्मणजे परमार्थाचें ज्ञान आपणास होतें कसें—अथवा असें कां ह्मणाना—कीं, आपले पूर्वज जे आर्य त्यांस तरी तें ज्ञान प्राप्त झालें असेल कसें ?

## आपलीं इंद्रियें व त्यांची साक्ष.

आतां आपण पहिल्यापासूनच आरंभ करूं.– आपल्या पंचेंद्रियद्वारें आपणास जें समजतें त्यास आपण " वास्तविक " किंवा " स्पष्ट " असें ह्मणतों. निदान बहुतेक रानवट माणसांची तरी अशी समजूत असते. आतां आपल्या इंद्रियांपासून जें ज्ञान होतें तें खरें कशावरून? असा जो दुसरा प्रश्न निघतो त्याचें निराकरण करण्याची गरज सध्यां नाहीं. प्रस्तुत आपणास बर्क्ले व ह्यूम, तसेच एंपिडोक्लीस व झेनोफॉनीस यांच्या सारख्या मोठमोठ्या तत्वज्ञांचा विचार करणें नाहीं, तर जंगलांत किंवा डोंगराच्या एकाद्या गुहेमध्यें रहाणाऱ्या अशा अगदीं रानवट प्राचीन माणसांचा विचार कर्तव्य आहे. अशी कल्पना करा कीं, तो एखादें हाडूक हातांत घेऊन पाहतो, किंवा त्याची रुचि घेऊं शकतो व जरूर वाटल्यास तें फोडतो, तेव्हां त्याच्या त्या फुटण्याचा शब्द तो ऐकतो. हें मी हातांत घेतलें आहे, हें हाडच खरें याविषयीं त्याला अगदीं संशय वाटत नाहीं. अशाप्रकारें मनुष्य प्राण्याच्या या पूर्व स्थितींतच इंद्रियांचे दोन वर्ग स्पष्ट करितां येतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ह्मणजे, एका वर्गांत स्पर्शेंद्रिय, घ्राणेंद्रिय व रसेंद्रिय, किंवा ज्या तीन इंद्रियांस क्वचित् 'जुनी' किंवा 'मूळ' इंद्रियें असेंही ह्मणतात, तीं आहेत. सर्व इंद्रियांपेक्षां प्रथम सांगितलेलीं जीं तीन इंद्रियें त्यांजपासून भौतिक प्रतीति ( जड पदार्थांच्या अस्तित्वाचें ज्ञान ) निश्चयात्मक होते व शेवटल्या दोहोंत एखाद्या प्रसंगीं संशय राहतो, ह्मणजे त्यांचें कार्य ( दृष्ट किंवा श्रुत ) पूर्वोक्त तीन इंद्रियांच्या साहाय्यानें ताडून पहावें लागतें.

स्पर्शेंद्रिय हें मनुष्यास जड पदार्थांची अत्यंत दृढ प्रतीति देतें असें दिसतें. हें इंद्रिय बाकीच्या साऱ्यांपेक्षां क्षुद्र आहे व एकाद्या विवक्षित कामाकरितां असा याचा थोडाच उपयोग करितां येतो. इतरांपेक्षां याचें कार्यही थोडेंच आहे व *परिणामवादाच्या आधारें पहातां सर्वांहून पुरातन असें हें गणलें आहे. यानंतर अमुक एक कार्यास बरींच उपयोगीं पडणारीं अशीं इंद्रियें घ्राण व रस ( जिव्हा ) हीं आहेत. कोणत्याही वस्तूबद्दल खात्री करून घेण्याच्या कामांत प्राण्यांस यांपैकीं पहिल्याचा ह्मणजे घ्राणेंद्रियाचा व बालकांस दुसऱ्याचा ह्मणजे जिव्हेचा उपयोग होतो. श्रेष्ठ वर्गांत गणलेल्या प्राण्यांतील बहुतेकांस बाह्य वस्तूच्या परीक्षणार्थ घ्राणेंद्रिय फारच अवश्य आहे असें कळतें व मानवी प्राण्यांस, त्यांत मुख्यत्वेंकरून सुधारलेल्या मानवी प्राण्यांस तर या इंद्रियापासून होणारा फायदा दिवसानुदिवस उलटा कमी कमी करून घेतां येतो असें दिसतें. लहान मुलें एकाद्या पदार्थाच्या अस्तित्वाची प्रतीति करून घेण्याच्या कामांत घ्राणेंद्रियाचा उपयोग फारसा करीत नाहींत. मुलें प्रथम दृष्टीस पडेल त्या पदार्थास हात लावतात आणि घालतां येईल तर तो हात तोंडांतही घालतात. जसजसे आपण प्रौढ होत जातों तसतशी ही दुसरी रीत सोडून देतों; तथापि खात्री करून घेण्यासाठीं हस्तस्पर्शानें पदार्थाचें ज्ञान करून घेण्याची संवय तशीच कायम रहाते. हल्लीं देखील जो पदार्थ आपल्यास स्पर्शानें कळत नाहीं तो वस्तुतः नाहींच, असें ह्मणणारे पुष्कळ लोक निघतील. तथापि तितक्याच निश्चयानें त्यांस असें मात्र ह्मणतां येणार नाहीं कीं, ज्या वस्तु खरोखरी आहेत त्या सर्वांस गंध व रस असलेच पाहिजेत.

---

* उत्तरोत्तर पदार्थांचे धर्म वाढत जाणें किंवा गुणांची अधिकाधिक वृद्धि होत जाणें हा नियम सृष्टींत आहे असें आधुनिक पदार्थवेत्ते ह्मणतात. देवानें सृष्टींतील भिन्न भिन्न प्राणी एकदम उत्पन्न केले नसून अगदीं क्षुद्र प्राण्यापासूनच अत्यन्त उन्नत स्थितीचे असे मनुष्यप्राणी उत्पन्न झाले आहेत असें बहुतेक सृष्टिशास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. या मताचें नांव **परिणामवाद.** हें मत मुख्यत्वेंकरून नुकतेच परलोकवासी झालेले सृष्टिशास्त्रज्ञ मि. **डार्विन्** यांनीं स्थापन केलें. वेदांतांत **परिणामवाद** ह्मणून जो एक वाद आहे तो निराळा. दोहोंत अर्थसादृश्य आहे, पण तें फार अल्प आहे.—भा. क.

## " व्यक्त " किंवा " स्पष्ट " या शब्दाचा अर्थ.

भाषाविज्ञानही या गोष्टीच्या दृढीकरणार्थ साक्ष देत आहे. जेव्हां एखाद्या गोष्टीच्या खरेखोटेपणाविषयीं योग्य रीतीनें संशय घेतां येत नाहीं असें आपणांस ह्मणावयाचें असतें, तेव्हां आपण त्या वस्तूस 'स्पष्ट' किंवा 'व्यक्त' असें ह्मणतों. जेव्हां रोमन् लोकांनीं हें विशेषण योजिलें तेव्हां त्याचा अर्थ त्यांच्या मनांत काय होता व पदार्थास ' व्यक्त ' ह्मणण्याचा उद्देश कोणता हें ते चांगलें जाणत होते. ते Manifest ( स्पष्ट ) शब्दाचा अर्थ ' हातानें ज्याला स्पर्श करितां येईल किंवा मारतां येईल अशी वस्तु ' असा करीत. ' फेन्डो ' Fendo हें एक जुनें लॅटिन् क्रियापद आहे व त्याचा अर्थ 'मारणें' किंवा 'ठोकणें' असा होतो. तेंच क्रियापदाचें रूप Offendo किंवा Defendo ह्मणजे दुसऱ्याला आपल्यापासून धक्का मारून दूर करणें ' किंवा ' मारणें ' या शब्दांत अजून कायम राहिलें आहे. जसें Fus-tis ह्मणजे काठी. हा शब्द Fos-tis, Fons-tis, Fond-tis या अर्थी योजितात, तसेंच Festus हा एक जुना अनियमित धातुसाधित शब्द Fend व Tus हीं दोन पदें मिळून झाला आहे. ज्या मुळामधून Fendo, Fustis, व Festus हे शब्द निघाले आहेत तें निराळेंच आहे. तें संस्कृत 'धन्' (dhan) किंवा 'हन्' ( han ) या धातूपासून झालें आहे. याचा अर्थ ' मारणें,' ' तोडून टाकणें ' असा होतो व तें ग्रीक शब्द ' थीनीज '=मारणें, ' थीनार '=तळहात,–संस्कृत ' हन् '=मारणें, ' निधन '=मृत्यु, इत्यादि शब्दांत दिसतें.

या पृथ्वीवर प्राचीनकाळीं वसणारे लोक ज्या पदार्थास ' स्पष्ट ' किंवा ' वास्तविक ' मानीत त्याचविषयीं आपण पुढें विचार करूं. दगड, हाडें, शिंपा, झाडें, डोंगर, नद्या व जनावरें किंवा मनुष्यप्राणी या सर्व पदार्थांची गणना ' वास्तविक ' किंवा ' स्पष्ट ' या कोटींत करीत. कारण या सर्वांस हातानें स्पर्श करतां येतो. खरें पाहतां जे साधारण पदार्थ इंद्रियजन्य ज्ञानानें समजतात ते मात्र त्यांच्या समजुतीप्रमाणें त्यांस खरे वाटतात.

## इंद्रियज्ञेय पदार्थांचा स्पृश्य व अर्धस्पृश्य असा दोन प्रकारचा भेद.

तथापि मूलज्ञानाच्या ह्या जुन्या संग्रहाचे आपणास दोन विभाग करितां येतील :

( १ ) कित्येक पदार्थ, ह्मणजे दगड, अस्थि, शिंपा, फुलें, फळें, झाडांच्या फांद्या, पाण्याचे थेंब, मातीचे ढीग, जनावरांचीं कातडीं, हे चोहोंकडून स्पृश्य, ह्मणजे ज्यांची हस्तस्पर्शानें सर्व बाजूंनीं चांगली परीक्षा करितां येते असे आहेत. हे पदार्थ चक्क आपल्यापुढेंच असून ते आपल्या हातांतून खास निसटून जाणार नाहींत असे आहेत. त्यांच्यांत अज्ञात किंवा अज्ञेय असें कांहीं नाहीं. वर सांगितले हे पदार्थ अत्यंत प्राचीन माणसांच्या उत्तम माहितीचे व गृहकृत्याच्या उपयोगाचे आहेत.

( २ ) परंतु झाडें, डोंगर, नद्या किंवा पृथ्वी यांची गोष्ट निराळी आहे. ह्मणून यांचा स्वतंत्र दुसरा वर्ग केला आहे.

### झाडें.

पुरातन प्रचण्ड अरण्यांतील एखादें जुनाट राक्षसी झाड—पाहणाऱ्यांस थक्क करून टाकणारें व त्यांच्या मनांत भीति व चमत्कार उत्पन्न करणारें—अशा झाडाचा क्षणभर विचार करा.—त्याचीं तीं फार खोल गेलेलीं मुळें आपणांस दिसत नसून त्याचा विस्तार आपल्या मस्तकावर फार उंच गेलेला असतो. अशा वृक्षाखालीं आपण उभें राहिलों असतां त्यास हातानें स्पर्श करितां येतो. आपण मान वर करून त्याला पाहूं शकतों. असें असतांही तो समग्र आपणांस दिसत नाहीं—ह्मणजे त्याचे एकंदर भाग एका कालींच आपल्या ध्यानांत येत नाहींत. आपण जरी ह्मणतों कीं वृक्षास जीव असतो, तथापि घराचें वहाल निर्जीव असतें असें आपण समजतों. प्राचीनकाळच्या लोकांची सुद्धां अशीच समजूत असे. असें नसतें तर झाड हा जिवंत पदार्थ आहे असें त्यांच्यानें ह्मणवतेंना. आणि ते झाडाला जीव आहे असें ह्मणत, तेव्हां त्या झाडाच्या अंगीं श्वासोच्छ्वास करण्याची शक्ति आहे किंवा त्याच्या नाड्यांतून रुधिराभिसरण होत

आहे, असें समजत नसत. पण एवढें ते पक्कें समजत कीं, जें झाड त्यांच्या दृष्टीसमोर अंकुर येऊन वाढतें व ज्याला फांद्या, पानें, फुलें व फळें येतात, थंडीच्या दिवसांत ज्या झाडावरचीं पानें गळून पडतात आणि शेवटीं जें झाड कापलें असतां मरून जातें, अशा त्या झाडाच्या अंगीं आमच्य इंद्रियांस अगम्य व अज्ञात–परंतु ज्याच्या अस्तित्वाची दृढ प्रतीति होते–असें कांहीं आहे. झाडाच्या ठिकाणीं हें अज्ञात, अगम्य, परंतु अंशतः प्रतीयमान, असें जें कांहीं त्याच्याविषयीं विचारी व तीव्र दृष्टीच्या लोकांस निरंतर आश्चर्य वाटत असे. झाडाचा कांहीं भाग मात्र त्यांच्या इंद्रियवर्गास पूर्णत्वानें कळे; परंतु कांहीं भाग आह्मांपासून जणूं निसटून जात आहे–जसा गारोडी तमाशा पहाणारांची नजरबंद करून पदार्थ नाहींसे करितो व त्यांस चमत्कार दाखवितो–तद्वत् झाडाचा कांहीं भाग आमच्या ग्राहकशक्तीच्या बाहेर लपवून ठेविला आहे असें त्यांस वाटे.

## पर्वत.

याचप्रमाणें पर्वत, नद्या, समुद्र व पृथ्वी इत्यादिकांच्या अवलोकनानें आश्चर्य उत्पन्न होतें. जर आपण एखाद्या पर्वताच्या पायथ्याशीं उभे राहून वर दृष्टि करून मेघमंडळास स्पर्श करणाऱ्या शिखराकडे पाहिलें, तर एखाद्या राक्षसासारख्या भव्य पुरूषापुढें आपण ठेंगू भालदाराप्रमाणें किंवा कुबड्याप्रमाणें उभे आहों असें आपणास वाटतें. असे कांहीं पर्वत आहेत कीं, त्यांस उल्लंघून जातां येतच नाहीं. त्या पर्वताच्या एका खोऱ्यांत राहणाऱ्या लोकांस तो पर्वत त्यांच्या त्या लहानशा जगताची मर्यादा आहे असें वाटतें. अरूणोदय, सूर्य, चंद्र व नक्षत्रें या पर्वतांतूनच निघतात अशी त्यांची समजूत असते व त्याच्या

---

* वड, पिंपळ, उंबर इत्यादि मोठमोठ्या झाडांची पूजा करण्याची चाल जी आह्मांत अद्यापि चालू आहे तिचा हेतु हाच होय हें वाचकांच्या लक्षांत येईलच. **कबीरवड** ह्मणून आमच्या देशांत जो एक प्रचण्ड, पुरातन वृक्ष आहे, जो हजारों किडे, पशु, पक्षी व पांथस्त यांचें वसतिस्थान होऊन राहिला आहे, व ज्याचा विस्तार आसमंतात् कित्येक मैलपर्यंत पसरलेला आहे, तोही प्रस्तुतस्थळीं ध्यानांत आणण्यासारखा आहे.
भा. क.

शिखरांनीं हें आकाश सांवरून धरिलें आहे असें त्यांस वाटतें. त्या पर्वताच्या सर्वांत उंच अशा शिखराकडे दृष्टि फेंकली तर परलोकाच्या उंबरठ्यांतच आपण उभे आहों कीं काय, असा भास होतो. येथें इतकें मात्र लक्षांत ठेवा कीं, लोकवस्तीनें गच्च भरून गेलेल्या युरोपखंडाविषयीं, किंवा हिमाच्छादित सर्वप्रसिद्ध आल्प्स् पर्वताविषयींही विचार करावयाचा नाहीं; तर ज्या भूमीवर वेदाच्या आद्य ऋचा गाइल्या गेल्या व ज्या ठिकाणीं डाक्टर * हूकर यांनीं एका स्थळीं उभे राहून हिमाच्छादित अशा पर्वताचीं वीस शिखरें पाहिलीं, तीं अशीं कीं ज्या शिखरांपैकीं प्रत्येक शिखर २०,००० फूट उंच असून ज्यांवर १६० अंशांपेक्षां अधिक लंबायमान अशा क्षितिजाचा निळा घुमट ठेऊन दिल्यासारखा भासत आहे! तेव्हां अशा स्थळाचा विचार करूं लागलों ह्मणजे अशा या शोभायमान मंदिरांत त्या अनंत स्वरूपाची प्रत्यक्ष मूर्त्ति डोळ्यांपुढें उभी आहे, असें पाहून मोठ्या धीट व दिलदार पुरुषाचेंही हृदय गडबडून जाईल किंवा नाहीं याचा आपणच विचार करा.

## नद्या.

हा विचार पर्वतांचा झाला. आतां पाण्याचे मोठे धबधबे आणि नद्या ह्यांचा विचार करूं. नदीचा विचार करितांना असें समजलें पाहिजे कीं, 'नदी' अशा नांवाचा कांहीं पदार्थ नाहीं. तर आपण जो पाण्याचा स्रोत आपल्या घराच्या बाजूनें वाहत आहे असें रोज पाहतों, त्या स्रोताचें किंवा जलसमुच्चयाचें नांव नदी होय. पण तीच नदी समग्र आपल्या दृष्टीस कधीं पडत नाहीं. ती नदी किती वेळां जरी पाहिली असली तरी तिचा उगम किंवा तिचें मूळ आपणांस ठाऊक नसतें. त्याचप्रमाणें तिचा शेवट कुठें होतो हेंही कळत नाहीं. त्यामुळें आपल्या पंचेंद्रियांनीं होणाऱ्या ज्ञानापलीकडे तिचा कांहीं भाग आहे असें आपणांस वाटतें. तेव्हां अशा ठिकाणीं अनंताची भावना उत्पन्न होण्यास काय उशीर!

---

* एक विद्वान् **आंग्लभौम** देशपर्यटन करणारा किंवा प्रवासी.

२६ ८८०२ ७६

सेनेका आपल्या एका पत्रांत लिहितो कीं, आपण मोठमोठ्या नद्यांच्या उगमाविषयीं विचार करूं लागलों ह्मणजे मनांत एका प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न होतो. जो लहानसा ओढा आपल्यास न समजतां मोठ्या वेगानें एकाद्या अंधारमय गुहेंतून बाहेर पडतो त्याचेसाठीं आपण कुंड किंवा गायमुख बांधितों, कढत पाण्याच्या झऱ्याची आपण पूजा करितों व कांहीं सरोवरें आपल्या पूर्ण माहितीचीं नाहींत अथवा तीं फार खोल आहेत, एवढ्याच कारणाकरितां आपण त्यांस पवित्र मानतों. नदीतीरवासी लोकांस नदीपासून अनेक लाभ होतात. नदीच्या पाण्यामुळें त्यांचीं शेतें वगैरे पिकतात, जनावरांस चारा मिळतो व शत्रूपासून त्यांचें संरक्षण किल्ल्यापेक्षांही तिच्या योगानें जास्त होतें. त्याचप्रमाणें एखाद्या क्रुद्ध झालेल्या नदीच्या पुरानें कसकसे अनर्थ होतात, पुरांत सांपडून बुडाल्यानें किती लोक प्राणास मुकतात—या गोष्टी तर एकीकडे ठेऊं. पण एखादा परका मनुष्य आला कोठून व जाणार कोठें हें जसें आपणांस समजत नाहीं, तसें तिच्या प्रवाहाचें अवलोकन करून या भूपृष्ठावर प्राचीनकाळीं वसणाऱ्यांच्या मनांत एक चमत्कारिक विचार उत्पन्न होत असे. तो हा कीं, ज्या पृथ्वीच्या सूक्ष्म भागास आम्ही आमचें गृह ह्मणून समजतों त्याच्या चारी बाजूंस अनंत, अदृश्य व दिव्य अशा शक्ति अपरंपार भरून राहिल्या आहेत!

## पृथ्वी.

आपण ज्या पृथ्वीवर उभे राहतों, तिच्या शिवाय या विश्वांत दुसरा अधिक खरा किंवा व्यक्त पदार्थ नाहीं असें आपणांस वाटणें सहज आहे. परंतु जर आपण एखादा वाटोळा धोंडा हातांत घेतला किंवा एखादें नारिंग घेतलें तर त्याचें जसें पूर्ण ज्ञान आपणांस होतें त्याच तोडीचें किंवा तितक्याच योग्यतेचें ज्ञान पृथ्वीचें होतें काय? नाहीं. कारण आपलीं इंद्रियें दुर्बल पडलीं. त्यांस समग्र पृथ्वीचें ज्ञान होत नाहीं. त्याचप्रमाणें अत्यंत प्राचीनकाळीं भाषाकारांचीं इंद्रियें हीं समग्र पृथ्वीच्या पर्यालोचनाविषयीं असमर्थ होतीं. त्यांच्यापाशीं ‘पृथ्वी’ किंवा असें

दुसरें कांहीं नांव मात्र होतें. परंतु त्या नांवात जेवढें समर्याद, किंवा दृश्य=क्षितिजापर्यंत चारी बाजूंनीं परिवेष्टित दिसतें, तेवढ्याचाच समावेश होत नसे. तर त्याच्याही पलीकडे विस्तीर्ण असा जो कांहीं भाग–किंचित् दृश्य व स्पष्ट, परंतु बहुधा अदृश्य व अस्पष्ट–त्याचाही समावेश होई.

अगदीं पुरातन काळीं प्राचीन माणसांनीं बांधलेल्या या कल्पना किंवा हे पहिले विचार कदाचित् आपणांस क्षुल्लक व पोरकट असे वाटतील. परंतु या कल्पना ज्या दिशेस उद्देशून बांधल्या होत्या ती दिशा लक्षांत आणिली तर हे विचार फारच योग्य व स्वाभाविक होते, असें लक्षांत येईल. याप्रमाणें हळू हळू त्याच विचारपद्धतीच्या योगानें, सान्त पदार्थांचें, ह्मणजे जे पदार्थ दिसत व ज्यांस स्पर्श करितां येई, त्यांचें ज्ञान प्रथमत: होऊन मग पुढें त्याच ज्ञानापासून जें अनंत, जें हातांनीं मोजतां न येणारें व जें अति दीर्घदर्शनाच्याही पलीकडचें, सारांश, जें सर्वथा इंद्रियातीत–त्याचें आकलन करण्याचें सामर्थ्य शेवटीं मनुष्याच्या अंगीं आलें.

या रीतीनें सृष्टींत जें कांहीं अनंत व अज्ञात, त्याचा व इंद्रियांचा संन्निकर्ष होतांच ज्या परात्परस्थानाप्रत पोंचण्याची उमेद मानवांच्या मनाला निरंतर असते त्या अनंत, दिव्य धामाची कल्पना मनुष्यास व्हावी अशाप्रकारची त्याच्याठायीं प्रथम स्फूर्ति झाली व इष्ट स्थानाप्रत जाऊन पोंचण्याची खरी दिशा त्यास कळली.

## अर्धस्पृश्य पदार्थ.

इंद्रियगम्य पदार्थांच्या या दुसऱ्या वर्गास मीं अर्धस्पृश्य असें ह्मणतों. याचें कारण एवढेंच कीं, पहिल्या वर्गास आपण आपल्या सोईकरितां ‘ स्पृश्य कल्पना ’ किंवा ‘ स्पृश्य पदार्थांच्या कल्पना ’ असें नांव दिलें असतां त्यांपासून हा दुसरा वर्ग निराळा ठेवितां यावा. हा दुसरा वर्ग फार मोठा आहे व या वर्गांतर्गत जे इंद्रियगम्य पदार्थ त्या परस्परांत बराच भेद आहे. उदाहरणार्थ, एक फूल किंवा लहानसें

झाड घ्या. हें या वर्गांतलें आहे असें क्वचितच वाटेल. कारण, या दोहोंत इंद्रियाला अगम्य किंवा अज्ञेय असा अंश फारच थोडा आहे. आणखी अशाही वस्तु आहेत कीं, त्यांत स्पष्ट किंवा दृश्य अंशापेक्षा गुप्त अंश अधिक असतो. उदाहरणार्थ, ही पृथ्वीच घ्या. हिचें ज्ञान इंद्रियांनीं आपणांस होतें. ह्मणजे हिचे गंध, रस, स्पर्श, रूप व शब्द हे आपणांस कळतात; परंतु कसें झालें तरी तिच्या संबंधानें कळतो असा भाग फार थोडा असतो व कळत नाहीं असा भाग पुष्कळ असतो. याकरितां आद्यकालीन मनुष्यांस तर समग्र पृथ्वीची कल्पना क्वचितच कारितां आली असेल. त्यांच्या नित्य दृष्टीस पडणारे पदार्थ कोणते ह्मणाल तर, घरासमोरचें अंगण, शेतांतलें गवत, क्वचित् एखादें अरण्य व क्षितिजावर दिसणारे पर्वत, हे होत. त्याच्या दृष्टिमर्यादे पलीकडचा अमर्याद, विस्तृत, असा जो भाग असतो तो न पाहतां त्याला दिसतो असें ह्मटलें पाहिजे; ह्मणजे तो त्याच्या केवळ मनश्चक्षुस मात्र गोचर होतो.

असें ह्मणण्यांत ह्मणजे कांहीं शब्दश्लेष आहे असें नाहीं, किंवा हें बोलणें केवळ अलंकारिक आहे असें नाहीं. तर आपणांस ज्याची सत्यता सिद्ध करून दाखवितां येईल अशी ही गोष्ट आहे. जेव्हां आपण एखाद्या उंच पर्वताच्या शिखरावर चढून आसपास पाहूं लागतों तेव्हां आपली दृष्टि एका टोंकावरून दुसऱ्या टोंकावर व एका ढगा, वरून दुसऱ्या ढगावर जाते. त्या प्रांता पलीकडे आपली मजल जात-नाहीं याचें कारण दुसरें कांहीं पहायाचें तेथें उरत नाहीं, हें नव्हे, तर आपली दृष्टि आणखीं पुढें जातच नाहीं, हें होय. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, पलीकडच्या अंगास अनंत असा जो भूविस्तार किंवा भूमिभाग असतो तो केवळ आपणांस तर्कानें समजतो. परंतु वस्तुतः अशी गोष्ट नाहीं. आपल्या इंद्रियांचा व त्या भागाचा खरोखर संन्निकर्ष होऊन त्याला आपण पाहतों व जाणतों. आपल्या इंद्रियांच्या सामर्थ्याला किंवा ज्ञान शक्तीला मर्यादा आहे असें जें वाटणें त्यावरूनच पलीकडच्या अंगास एक दुसरें जग आहे अशी आपली खात्री

होते. प्रथम त्या मर्यादेचें ज्ञान होऊन त्या मर्यादेच्या पलीकडे जें असतें त्याचेंही ज्ञान आपणांस होतें.

या गोष्टी आपणांस ढळढळीत दिसत असतां त्यांतील खरें तत्व उघड कबूल करून त्याचा होईल तेवढा खुलासा केला पाहिजे, त्यांत अनमान होतां कामास नये. आपल्यापुढें, ह्मणजे आपल्या इंद्रियांपुढें, दृश्य व स्पृश्य, अनंत भरून राहिलें आहे. कारण, अनंत ह्मणजे ज्याला अंत अथवा मर्यादा नाहीं इतकाच अर्थ समजूं नये; तर, ज्याची मर्यादा किंवा सीमा आपणास किंवा आपल्या अतिप्राचीन पूर्वजांस कळत नाहीं किंवा कळली नाहीं, तेंच अनंताचें खरें स्वरूप होय, असें समजावें.

## अस्पृश्य पदार्थ.

असो आतां आपण असेंच पुढें चालूं. हे सर्व अर्धस्पृश्य ह्मटलेले पदार्थ आपल्यास वाटेल तर आपल्या कांहीं इंद्रियांनीं निश्चित करतां येतात. या प्रत्येक पदार्थाचा अगदीं नाहीं तरी कांहीं भाग हाताच्या स्पर्शानें कळतो.

पण आतां आपणांस एका तिसऱ्याच प्रकारच्या पदार्थाविषयीं विचार कर्तव्य आहे. त्यांत इतकें देखील करतां येत नाहीं. जरी हे पदार्थ पहातां येतात किंवा ऐकूं येतात तरी हातास लागत नाहींत. त्यांच्याविषयीं आपली कल्पना काय असते तें पाहूं.

दृश्य आहेत परंतु स्पृश्य नाहींत, असे पदार्थ असतील कसे? या गोष्टीचें अपणांस आश्चर्य वाटतें. पण या जगांत असे पदार्थ पुष्कळ आहेत. दुसरें असें कीं, प्राचीनकाळच्या जंगलांत रहाणाऱ्या माणसांस ते पदार्थ पाहून मुळींच आश्चर्य वाटत नसे असें दिसतें. लोकांस आभाळांत जे ढग दिसतात ते धरितां येत नाहींत. आणि जर या ढगांची गणना (मुख्यत्वेंकरून डोंगराळ देशांत) कदाचित् अर्धस्पृश्य पदार्थांत करावी असें ह्मणाल, तर सूर्य, चंद्र व नक्षत्रें हे पदार्थ असे आहेत कीं, त्यांपैकीं एकास देखील कधींही हात लावतां येत नाहीं. ह्मणून या तिसऱ्या वर्गास मी 'अस्पृश्य' अशी एक सांकेतिक संज्ञा दिली आहे.

याप्रमाणें विचाराअंतीं पदार्थांचे तीन वर्ग आपण शोधून काढिले. ते आपल्या इंद्रियांस कळतात व आपल्या मनावर ते आपल्या वस्तुत्वाचा किंवा खरेपणाचा तीन भिन्न प्रकारें ठसा उठवितात.

( १ ) स्पृश्य पदार्थ. उदाहरण दगड, शिंपले, हाडें, इत्यादि. एकंदर धर्माचा मूळ आरंभ पदार्थपूजा हा आहे असें मानणारे पंडित बरेच आहेत व ते असें प्रतिपादन करितात कीं, धर्मसंबंधाची प्रथम स्फूर्ति केवळ सान्त पदार्थांपासून उत्पन्न झाली असावी.

( २ ) अर्धस्पृश्य पदार्थ—उदाहरण, झाडें, डोंगर, नद्या, समुद्र, पृथ्वी इत्यादि. ज्या वर्गास मी पुढें कांहीं कारणाकरितां 'अर्धदेवता' ह्मणणार त्या वर्गांत यांचा समावेश होतो.

( ३ ) अस्पृश्य पदार्थ—उदाहरण, आकाश, तारे, चंद्र, सूर्य व अरुण किंवा उषा. ज्या पदार्थांस पुढें 'देवता' ही संज्ञा मी देणार आहें त्या सर्वांचें मूळ याच पदार्थांत आहे.

## प्राचीनकाळच्या मनुष्यांची त्यांच्या देवांच्या स्वरूपाविषयीं साक्ष.

प्राचीन ग्रंथकारांचे त्यांच्या देवांच्या स्वरूपाविषयीं काय विचार असत याची कल्पना त्यांच्या लिहिलेल्या कांहीं ग्रंथांवरून करितां येते. एपिचारमॉस् ह्मणतो, 'वायु, उदक, पृथ्वी, सूर्य, अग्नि व नक्षत्रें हे देवच होत." प्रोडीकॉस् ह्मणतोः—'सूर्य, चंद्र, नद्या व झरे आणि बहुतेक जे सर्व पदार्थ आपल्या उपयोगाचे आहेत, त्या सर्वांस प्राचीन लोक देव मानीत. मिसर देशचे लोक नील नदी हें एक दैवतच कल्पीत. याच कारणास्तव भाकरीला देमेतर, दारूला दायोनीसॉस्, पाण्याला पोसिडॉन् व विस्तवाला हेफीसॉस् अशीं नावें देऊन त्यांची पूजा करीत.' जर्मन लोकांच्या धर्माविषयीं लिहितांना सीझर असें ह्मणतो कीं, 'ते सूर्य, चंद्र व अग्नि यांची पूजा करीत.' हिरॉडोटस् इराणाविषयीं लिहितांना असें ह्मणतो कीं, 'ते सूर्य, चंद्र, अग्नि, पाणी, पृथ्वी व वायु यांची पूजा करीत असत. सेल्सस् असें सांगतो कीं 'ते

पर्वतांच्या शिखरावर जाऊन आकाशचक्राची पूजा करीत.' तो आणखीं असें सांगतो कीं, ' डिस् नामक पुरुषाला डिस् ( परमश्रेष्ठ ) किंवा झ्युस्, एडोनाय्, सेबाओथ, ऍमोन किंवा सिथियन् लोक ज्यास पापा असें ह्मणतात्र यापैकीं कोणतेंही नांव दिलें तरी एकच.' क्विंटस् कार्शियस् यानें इंड्यन् लोकांच्या धर्माचें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलें आहेः–

' ज्या पदार्थास ते सन्मान देत त्यास ते देव असें ह्मणत. मुख्यत्वेंकरून झाडांनाही देव ह्मणत व झाडांस दुखापत करणें ह्मणजे पाप होय असें मानीत.'

## वेदाची साक्ष.

शिकंदर बादशहाबरोबरच्या लोकांनीं व त्याच्या मागून ज्या लोकांनीं आर्यावर्तावर स्वाऱ्या केल्या, त्यांनीं आर्यधर्माचें जें वर्णन केलें आहे तें खरेंखोटें पहाण्याकरितां आपणांस वेदाच्या प्राचीन मंत्रांचेंच पर्यालोचन केलें पाहिजे. आर्यावर्तांतील अतिप्राचीन मनुष्यांनीं केलेल्या काव्यसंग्रहापैकीं अद्यापि अवशिष्ट राहिलेले व मोठ्या काळजीनें सुरक्षित ठेविलेले जे हे मंत्र, त्यांचा विषय दगड किंवा लांकडें नाहीं; तर नद्या, पर्वत, अभ्रें, पृथ्वी, आकाश, अरुणोदय व सूर्य, या सृष्टपदार्थांसच उद्देशून केलेले ते मंत्र आहेत. ह्मणजे, स्पृश्य ह्मटलेल्या पूज्य पदार्थ-पर (Fetishes) ते मंत्र नसून ज्या पदार्थांची अर्धस्पृश्य किंवा अस्पृश्य या दोन वर्गांत आपण गणना केली आहे त्याच पदार्थांचें वर्णन त्या वेदमंत्रांत केलें आहे.

खरोखर हें प्रमाण मोठ्या महत्वाचें आहे व तेंही असें आहे कीं शंभर वर्षांच्या पूर्वीं त्याचीं कल्पना कोणाच्या स्वप्नीं सुद्धां आली नसेल. कारण, शिकंदर बादशहाच्या इतिहासकारांनीं आर्यावर्त व तेथील लोक, यांच्या संबंधाचे लिहिलेले जे लेख ते, समकालीन प्रमाणानें व शिकंदराची आर्यावर्तावर स्वारी होण्यापूर्वी निदान १००० वर्षें रचलेले जे जुने ग्रंथ त्यांच्या प्रमाणानें, खोटे ठरतील असें शंभर वर्षांपूर्वीं कोणाला तरी वाटलें असेल काय?

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



पण आपणांस याच्याही पलीकडे जातां येईल. कारण कीं, आर्यावर्तांतील आर्यलोकांच्या भाषेची तुलना ग्रीस, इटली व युरोपखंडाच्या इतर देशांतील आर्यलोकांच्या भाषेशीं केली तर आर्यप्रजेच्या मूळ कुटुंबाचे विभाग होऊन त्याच्या शाखा पृथक् पृथक् होण्याच्या अगोदर जी भाषा ते बोलत होते, तिचें अंशतः तरी पुनरुज्जीवन आपणास करितां येईल.

## अविभक्त आर्यभाषेची साक्ष.

नद्या व पर्वत, पृथ्वी व आकाश, अरुणोदय व सूर्य, या सृष्ट पदार्थांविषयीं आर्यलोकांच्या काय कल्पना असत व या पदार्थांपैकीं जे त्यांस इंद्रियगम्य असे वाटले त्यांजबद्दलचे त्यांचे विचार कसे असत, हें आजकाल देखील थोडेंसें अदमासानें आपणांस सांगतां येईल. कारण, आर्य लोकांनीं त्या त्या पदार्थांस काय काय नांवें दिलीं आहेत तीं आपणांस माहीत आहेत. हीं नांवें त्या आर्यांनीं त्या त्या पदार्थांस त्यांच्या क्रियाशक्तीचे किंवा कर्तृत्वाचे प्रकार ओळखून दिलीं असावीं व त्या क्रियाशक्तीची माहिती त्यांस चांगली असावी असें दिसतें. उदाहरणार्थ, मारणें, लोटणें, घांसणें, मोडणें, जोडणें, या प्रकारच्या हलनचलनादि क्रिया सृष्टींत पाहून, त्या पहाणाऱ्याच्या मुखांतून यदृच्छेनें आपल्या आपणच जे ध्वनि निघत त्यांचीं स्वरूपें हळू हळू बदलून व्याकरणांत किंवा भाषाशास्त्रांत ज्यांस 'धातू' अशी संज्ञा आहे, त्यांचें रूप त्यांस प्राप्त झालें असावें.

माझी अशी समजूत झाली आहे कीं, साऱ्या भाषेचें व तत्वविचारांचें मूळ काय तें हेंच आहे. आणि मोठमोठ्या ग्रंथकारांच्या तर्कास व सिद्धांतांस न भितां प्रोफेसर् नोयर् यांनीं या गोष्टीचें उत्तम प्रतिपादन करून दाखविलें एवढ्याच करितां त्या पंडिताची प्रसिद्धि विद्वज्जनांत झाली आहे, असें मला वाटतें.

## भाषेची उत्पत्ति.

भाषेचें प्रथम स्वरूप क्रिया होय. कांहीं अति स्वल्प क्रिया– जसें मारणें, घांसणें, धक्का देणें, फेंकणें, कापणें, जोडणें, मोजणें,

नांगरणें, विणणें, इत्यादि—करतांना अनेक प्रकारचे कांहीं ध्वनि मनुष्याच्या मुखांतून आपोआप निघतात. हा अनुभव पूर्वीच्या लोकांसच होता असें नाहीं, तर हल्लींही आपणांस येतो. हे ध्वनि प्रथमतः अस्पष्ट व अनिश्चित असून पुढें अधिक अधिक निश्चित होत जातात. प्रथम या स्वयमेव मुखावाटे निघणाऱ्या ध्वनींचा संबंध केवळ क्रियेशीं असतो; उदाहरणार्थ, 'मर्' असा ध्वनि, घांसण्याची किंवा दगड साफ करण्याची किंवा शस्त्रांस धार देण्याची क्रिया करीत असतां उत्पन्न होतो असें समजा. बोलणारा किंवा तिऱ्हाईत यास त्या शब्दाचा किंवा ध्वनीचा कांहीं एक उद्देश अ वा हेतु कळत नसतो. समजा कीं, एखाद्याचा बाप स्वतां कांहीं काम करण्यास, अथवा कांहीं दगडाचीं हत्यारें घांसून त्यांस धार लावण्याकरितां निघाला आहे. अशा प्रसंगीं त्या घांसण्याच्या किंवा धार लावण्याच्या क्रियेचा बोध व्हावा ह्मणून तो 'मर्' शब्दाचा उपयोग करील हें उघड आहे. कांहीं एक निश्चित अर्थनिष्पत्ति . खास व्हावी अशा प्रकारचा उच्चार करून व कांहीं एक प्रकारचे हावभाव करून या 'मर्' शब्दाच्या ध्वनीनें तो बाप स्वतां काम करीत असतां आपल्या मुलास व चाकरांस 'अरे, दगड घांसून ठेवा; आळशी बसूं नका रे?' अशा अर्थाचा बोध करूं शकेल. अशा समयीं 'मर्' धातूचें रूप आज्ञार्थी होईल व त्यापासून आज्ञार्थाचा चांगला बोधही होईल, कारण आपण कल्पना करितांना अशी कल्पना केली आहे कीं, आरंभापासून 'मर्' या शब्दाचा किंवा ध्वनीचा उच्चार एकच माणसानें केला असें नाहीं; तर एकाच उद्योगांत गुंतलेलीं अनेक माणसें त्याचा उच्चार करीत आलीं आहेत. कांहीं काळानें त्यांत एक अधिक सुधारणा होईल. ती अशी कीं, आपणा स्वतांस व दुसऱ्यांस आज्ञार्थ सुचविण्यास 'मर्' शब्द उपयोगीं पडूं लागेल. जसें 'मर!'='चला आपण काम करूं!' पण जे दगड साफ करावयाचे असतील ते एका जागेंतून दुसऱ्या जागेंत—समुद्रतीरापासून एकाद्या गुहेजवळ किंवा खडूच्या खाणीपासून तों झोंपडी समोर—घेऊन जावयाचें असल्यास तें 'मर' शब्दानें दर्शवितां येईल. इतकेंच नव्हे, तर जे दगड

साफ करण्यासाठीं व घोटण्यासाठीं आणले असतील ते व दुसरे जे दगड कापण्याच्या, घांसण्याच्या व घोंटण्याच्या कामाला उपयोगीं पडतील ते सुद्धां दर्शवितां येतील. याप्रमाणें 'मर्' शब्दाचें आज्ञार्थी रूप बनून त्याचा उपयोग त्या एकाच कामांत न करितां त्याच कामाच्या अंगभूत भिन्न भिन्न कर्मै स्पष्ट रीतीनें समजण्याच्या कामीं करितां येईल.

तथापि 'मर्' सारख्या एकाच ध्वनीचा उपयोग याप्रमाणें अनेक प्रकारानें होऊं लागला ह्मणजे गोंधळ झाल्यावांचून राहणार नाहीं. मग हा गोंधळ किंवा ही अडचण दूर करण्यास कांहीं तरी उपाय योजण्याची इच्छा मनुष्यांस सहजच उत्पन्न होईल.

तेव्हां 'मर्' ह्मणजे 'चला आपण दगड घोटूं' व 'मर्' ह्मणजे 'अरे! घोंटावयाचे दगड कोठें आहेत?' या दोहोंत भेद रहावा, असें वाटून तो भेद राखण्याचे अनेक मार्ग सुचले असतील. सर्वांत सोपा मार्ग सुचला असेल तो हा कीं, बोलतांना स्वर बदलावा व निरनिराळ्या प्रसंगीं त्या शब्दाचा निरनिराळा उच्चार करावा. एकच शब्द भिन्न रीतीनें उच्चारिल्यामुळें भिन्न भिन्न अर्थ होणाऱ्या चिनी व दुसऱ्या एकाक्षरी भाषांत हा प्रकार फार उत्तम रीतीनें दृष्टीस पडतो.

दुसरी एक अशाच प्रकारची साधी युक्ति होती ती ही कीं, बोटांनीं दाखविण्याच्या खुणा होत्या. ज्याला वैयाकरण सर्वनामाचे प्रत्यय असें ह्मणतात त्या खुणा 'मर्' सारख्या शब्दाशीं योजिल्यानें दोहोंतील भेद समजत असे. उदाहरणार्थ, 'येथें घांसणारा' याचा अर्थ 'जो दगड घांसतो तो मनुष्य' असा होईल आणि 'तेथें घांसलेला' ह्मणजे 'घांसण्याचा प्रयोग ज्यावर घडत आहे तो दगड' असा अर्थ होईल.

ही क्रिया फार सोपी दिसते. परंतु याच क्रियेनें मनुष्यास प्रथम कर्ता व कर्म यांतील भेद समजला. एवढेंच नव्हे तर याच क्रियेनें क्रिया, कर्ता व क्रियमाण हा भेद समजला. जिच्या योगानें कर्ता, क्रिया व कर्म किंवा क्रियेचा परिणाम, या त्रिविध प्रकारांतील भेद जाणतां आला अशी युक्ति त्यांस हळू हळू सुचली. भासनादर्शक

शब्दांपासून भावनादर्शक शब्द कसे उत्पन्न झाले, त्याचें खरें कारण किंवा त्याची खरी प्रक्रिया आजपर्यंत कोणालाही शोधून काढतां आली नाहीं. परंतु नोयर्च्या बुद्धिकौशल्यानें या गोष्टीची उपपत्ति आतां फार चांगली करण्यांत आली आहे. वारंवार घडणाऱ्या कामाबरोबर सहज रीतीनें उत्पन्न होणारे उच्चार, पहिल्यापासूनच मनानें ग्रहण केलेल्या भावनांचे दर्शक असतात. हे ध्वनि किंवा उच्चार स्वरभेदानें किंवा दुसऱ्या कांहीं बाह्य चिन्हांनीं बदलून अगदीं भिन्न रूपाप्रत पावतात व तेणेंकरून क्रियेचा कर्ता अथवा तिचें कारण, स्थळ, काळ, किंवा तिचा हेतु जाणवितां येतो. तसेंच या सर्व शब्दांचें सामान्य तत्व, ज्यास 'मूळ धातु' असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे, तें उत्पन्न होतें.

वास्तविक पाहिलें तर हे विचार भाषाशास्त्रास लागून आहेत. तथापि धर्मशास्त्राच्या संबंधानें बोलत असतां भाषाशास्त्र आपणांस समूळ सोडून देतां येत नाहीं.

## प्राचीन कल्पना.

प्राचीन काळचे लोक नदीविषयीं बोलूं लागले ह्मणजे तिजविषयीं त्यांच्या काय कल्पना असत, हा प्रश्न जर कोणी केला तर त्याचें उत्तर हेंच कीं, त्यांच्या मनांत नदीविषयीं जसजशा कल्पना येत तशीं तशीं नावें तिला ते देत. जसें–धांवणारी (सरित्), गर्जना किंवा गोंगाट करणारी ( नदी किंवा धुनी ), किंवा जर सरळ वाहात जाणारी असली तर नांगरणारी किंवा नांगर ( सीरा=नदी, सीरा=नांगर ) किंवा बाण. शेताचें जर तिजकडून पोषण होत असलें तर मा ( मातर्=आई ). जर एका देशास दुसऱ्या देशापासून वेगळें करून त्याचें संरक्षण करीत असली तर संरक्षण करणारी ( सिंधु, सिध्, सेधति,=दूर करणें ). यावरून तुह्मीं विचार कराल तर असें दिसून येईल कीं, 'नदी' ह्मणजे कांहीं एक कृति करणारी अशी कल्पना पूर्वीच्या लोकांची असे. मनुष्य ज्याप्रमाणें धांवतो त्याप्रमाणेंच नदीही

धांवते. मनुष्य जसा ओरडतो तशी नदीही ओरडते, मनुष्य नांगरतो तशी तीही नांगरते, असें समजत. मनुष्य जसें कोणाचें संरक्षण करितो तशीच नदीही संरक्षण करिते. नदीला प्रथम 'नांगर' असें ह्मटलें नाहीं, तर 'नांगरणारी' असें ह्मटलें आहे; इतकेंच नव्हे, तर खुद्द नांगरालाच बहुत दिवस 'नांगरण्याचें साधन' असें न ह्मणतां 'नांगरणारा' असें ह्मणत. नांगराला सुद्धां 'भेद करणारा,' 'फाडणारा' किंवा 'लांडगा' असें नांव होतें. बिळांत राहणारा डुक्कर किंवा फाडून खाणारा लांडगा यांस जें नांव आहे तेंच नांव बहुत ठिकाणीं नांगरासही दिलें आहे असें आढळतें.*

## प्रत्येक पदार्थ क्रियावान् आहे अशी कल्पना.

आतां आपणांस इतकें समजलें कीं, प्राचीन मनुष्याच्या आसपास जी समग्र सृष्टी होती तिजविषयीं त्यानें कसकशा कल्पना बांधल्या–ह्मणजे जीं जीं कामें किंवा ज्या ज्या क्रिया तो करी तीं तीं कामें किंवा त्या त्या क्रिया आपल्या सभोंवती सर्वत्र त्यास दिसत. त्या क्रिया पाहून जे शब्द किंवा ध्वनि त्याच्या स्वतांच्या कृतिपासून निघत अथवा उत्पन्न होत, त्याच शब्दांची किंवा ध्वनींची योजना ते आपल्या भोंवतालच्या सर्व क्रियावान् पदार्थांशीं करीत. शरीराभिवृद्धीचें व सजीवतेचें मुख्य कारण आत्मा आहे असें मत, आत्माच जीव असून ईश्वराचे अंगीं मनुष्याचे विकार आहेत असें मत, Anthropopathism=ईश्वराचें स्वरूप व गुण मनुष्यासारखेच आहेत हें मत, इत्यादि मतांचें खरें मूळ भाषारूप जमिनींत फार खोल गेलें आहे. हीं वर सांगितलेलीं मतें, भाषा व विचार या दोहोंच्या संबंधानें अवश्य होणाऱ्या गोष्टी आहेत असें मानिलें पाहिजे. भाषा बनल्यानंतर बऱ्याच दिवसांमागून होणाऱ्या कवींच्या शुद्ध कल्पनांपासून हीं मतें निघालीं, असें मानणें सयुक्तिक दिसत नाहीं. ज्या समयीं माणसानें स्वतां घडवून तयार केलेला व धार लावलेला जो दगड, त्याला तो आपला प्रतिनिधीच मानी; ह्मणजे, दगड हा एक

* वेदांत 'वृक' याचा अर्थ 'नांगर' किंवा 'लांडगा' असा होतो.

कापण्याचें कांहीं साधन आहे असें न समजतां आपल्या हाताखालचा कोणी चाकर आहे असें मानी व त्याला 'कापणारा' असें ह्मणे—ज्या समयीं त्यानें मोजण्याच्या काठीस 'मापणारा,' नांगरास 'विदारण करणारा,' नौकेस 'उडणारी,' किंवा 'पक्षी,' अशीं नावें दिलीं, त्या समयीं नदीला 'गर्जना करणारी,' पर्वतास 'रक्षण करणारा,' चंद्राला 'मोजणारा' अशीं नावें दिलीं यांत फारसें आश्चर्य नाहीं. हा चंद्र, आपल्या दैनंदिन गमनानें, ह्मणजे दररोज वाढणाऱ्या ज्या त्याच्या कला, त्यांसह त्याचें जें अधिक अधिक वर येणें, त्यामुळें आकाशमार्ग कापीतच जातो आहे असा त्यांस भासला. त्याचप्रमाणें प्रत्येक चांद्रमासाचें परिवर्तन ह्मणजे आठवडा, पंधरवडा, महिना इत्यादि कालमानाचा बोध होण्यास तो ( चंद्र ) मनुष्याच्या फार उपयोगी पडतो, हेंही त्यांच्या ध्यानांत आलें. मनुष्य व चंद्र दोघेही मिळून बरोबर मोजण्याची क्रिया करतात व संगतीनें काम करितात. आणि जसा एखादा मनुष्य शेत किंवा मेढेंसें लांकूड मोजण्यास मदत करतो त्यास 'मापणारा' हें नांव देतां येईल, (मा+स) (मा=मोजणें, करणें, यावरून) तसेंच चंद्रास सुद्धां मास=मोजणारा असें नांव त्यांनीं दिलें. ग्रीक भाषेंतील 'मेईस्' लाटीन भाषेंतील 'मेन्सीस्,' इंग्रेजी भाषेंतील 'मून,' या शब्दांचा संस्कृतांतील 'मास'=चंद्र, या शब्दाशीं अति निकट संबंध आहे, हें उघड आहे.

यावरून भाषारचनेच्या या अगदीं आरंभींच्या पायऱ्या आहेत असें उघड होतें. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून आपलें क्षणभरही चालणार नाहीं. या पायऱ्या अनेक कारणांनीं बहुत वर्षें मळीण झाल्यामुळें जरी स्पष्ट दिसेनाशा झाल्या आहेत तरी युक्तीनें पाहूं गेल्यास त्या आपल्या स्पष्ट दृष्टीस पडण्याजोग्या आहेत यांत कांहीं संशय नाहीं. मनुष्याच्या भाषेची व विचाराची वृद्धि कसकशी होत गेली, या गोष्टीचा शोध आपणांस क्रमाक्रमानें, पायरी पायरीनें, लावीत गेलें पाहिजे, ही गोष्ट मात्र पक्की लक्षांत ठेवणें फार अवश्य आहे.

क्रियाशक्ति किंवा कांहींएक क्रिया करण्याचें सामर्थ्य, मनुष्यांसच आहे असें ते मानीत नसत. चंद्रास 'मोजणारा' किंवा 'सुतार' अशीं नावें

दिलीं आहेत, यावरून प्राचीन लोकांस चंद्र व मनुष्य या दोन व्यक्तींमध्यें कांहींच भेद दिसला नाहीं, असें समजणें मोठी चूक आहे. आतांच्या आपल्या विचारांपेक्षां प्राचीन मनुष्यांचे विचार अगदीं भिन्न होते हें खरें आहे. परंतु ते वेडगळ होते, अशी कल्पना आपणांस क्षणभर सुद्धां मनांत आणतां येत नाहीं. त्यांस आपल्या स्वतांच्या कृतींत आणि नदी, सूर्य, चंद्र, पर्वत व आकाश, यांच्या कृतींत कांहींएक प्रकारचा सारखेपणा दिसला, ह्मणून मनुष्याची कृति दाखविणारीं जीं जीं नांवें होतीं तीं तीं नांवें त्या त्या पदार्थांस त्यांनीं दिलीं. तेव्हां अर्थांतच मनुष्यप्राण्यास व चंद्रास त्यांनीं 'मोजणारा' हें साधारण नांव दिलें. प्रत्यक्ष आईला व नदीला 'मा' ह्मणत, एवढ्यावरून मनुष्य व चंद्र, आई व नदी, या दोहोंत त्यांना कांहींच भेद दिसत नसे असें मानणें अत्यंत मौर्ख्य नव्हे काय?

ज्या वेळीं जी जी वस्तु ह्मणून ठाऊक होती व जिला जिला ह्मणून नांव दिलें ती ती वस्तु क्रियासमर्थ आहे, असें समजून तदनुसार तें नांव दिलें आहे. आणि पदार्थ क्रियासमर्थ असेल तर तो पुरुषवाचक आहे असें समजत. ज्या वेळीं दगडाला 'कापणारा' असें ह्मणत, दांताला 'दळणारा' किंवा 'खाणारा' असें ह्मणत, व गिरमिटाला 'विंधणारें' असें ह्मणत, त्या वेळीं 'मोजणारा' व 'चंद्र' या दोघांतील भेद स्पष्ट करण्यास फारच अडचण पडली असेल यांत संशय नाहीं. पदार्थांस दिलेला कर्तृत्वाचा गुण काढून टाकण्याचें काम फारच कठीण झालें असावें. ह्मणजे, क्रियासमर्थ पदार्थांस कर्तृत्वशक्तिहीन करण्यास, हत्यार, हात व ज्याला हात आहे तो मनुष्य, यांतील स्पष्ट भेद जाणण्यास, व दगड ह्मणजे आपल्या पायाखालीं चेंगरून जाणारी एक वस्तु आहे असें मानण्यास, फारच आयास पडले असतील. पदार्थांवर सचेतनत्वाचा आरोप करण्यास किंवा व्यक्तिविशिष्टधर्माचा अध्यास करण्यास कांहीं आयास पडले नाहींत. यावरून काय झालें कीं, धर्माचा इतिहास व पुराणांचा इतिहास जाणणाऱ्या पंडितांस हें एक मोठें गूढ पडलें कीं, पूर्वकालीन लोकांनीं सचेतनत्वाचा आरोप अचेतन पदार्थांवर

केला कसा! या गोष्टीचें आपणांस प्रस्तुतकाळीं आश्चर्य वाटत नाहीं. आपणांस उलटें दुसऱ्या गोष्टीचें आश्चर्य वाटतें–ती ही कीं, एकदां सचेतनत्वाचा आरोप अचेतन पदार्थांवर करण्याचें सामर्थ्य भाषेच्या अंगीं आलें असतां तें सामर्थ्य पुढें नाहींसें झालें कसें?

### व्याकरणांतील लिंगभेद.

साधारणतः असा समज आहे कीं, व्याकरणांतील लिंगभेद, अचेतन वस्तूस सचेतनत्व देण्यास कारण झाला. पण लिंगभेद हें कारण नसून केवळ परिणाम आहे. व्याकरणसंबंधीं भेद जिच्यांत पूर्णपणें निश्चित झालेले आहेत अशा भाषेंत, व त्यांतही मुख्यत्वेंकरून भाषेच्या उत्तर अवस्थेंत, अचेतन पदार्थांस सचेतन रूप देणें कवींस फार सुलभ पडतें. पण आपण प्रस्तुत फार प्राचीन काळाचा विचार करीत आहों. ज्या भाषांमध्यें लिंगभेद आढळतो, त्याच भाषांमध्यें कांहीं काळापूर्वीं हा लिंगभेद मुळींच नव्हता. व्याकरणांतील लिंगभेदाचा विचार जींत एवढ्या पूर्णत्वानें केला आहे अशी जी आर्यभाषा, तिच्यांत सुद्धां अतिप्राचीन असे कांहीं शब्द लिंगरहित आहेत. पेतर् (pater)= बाप, हा शब्द जसा पुल्लिंगी नाहीं तसाच मेतर(mater)=आई हाही स्त्रीलिंगी नव्हे. याचप्रमाणें नदी, पर्वत, वृक्ष किंवा आकाश यांचीं अतिप्राचीन नामें व्याकरणांतील लिंगचिन्हांपैकीं एकही बाह्य चिन्ह दर्शवीत नाहींत. परंतु जरी हीं सर्व नामें लिंगचिन्हरहित होतीं, तरी तीं सर्व क्रियादर्शक होतीं. भाषेची अशा प्रकारची स्थिति असतां, क्रियादर्शक किंवा पुरुषवाचक नव्हेत अशा वस्तूंविषयीं बोलणें बहुतेक अशक्यच होतें. प्रत्येक नाम कांहीं तरी क्रियासमर्थ वस्तूचा बोध करीत असे. जेव्हां 'कॅाल्कूस' (Calx) पायांची टांच, याचा अर्थ 'लाथ मारणारा' असा झाला, तेव्हां 'कॅाल्कूस' चा अर्थ 'दगड' असाही होई. त्या वस्तूला नांव देण्याचा दुसरा कांहीं मार्गच नव्हता. पायांची खोंट जर दगडास लाथ मारते, तर दगडही खोंटेला लाथ मारतो असें म्हणण्यास काय हरकत आहे? तेव्हां ते दोघेही 'कॅाल्क्स' होत. वेदांत

'वी' शब्दाचा अर्थ 'पक्षी' किंवा 'उडणारा' असा होतो, पण या शब्दाचा अर्थ 'बाण' असाही होतो. 'युध्' या शब्दाचा अर्थ 'लढणारा,' 'हत्यार' व 'लढाई' असा होई.

तथापि 'एथें–लाथ' व 'तेथें-लाथ,' 'लाथ मारणारा' व 'लाथ खाणारा' या नामांतील व शेवटीं सजीव व निर्जीव नामांतील भेद जेव्हां बाह्य चिन्हांनीं दाखवितां येऊं लागला, तेव्हां भाषेचें एक पाऊल पुढें पडलें असें ह्मटलें पाहिजे. बहुतेक भाषांचें पाऊल या मर्यादे पलीकडे पडलेंच नाहीं असें आढळतें. पण आर्यभाषेनें एक पाऊल पुढें टाकलें होतें असें दिसतें. तें कोणतें ह्मणाल, तर सजीव पदार्थांमध्यें पुल्लिंग व स्त्रीलिंग असे दोन भेद करणें. लिंगभेद पुरुषवाचक नामांच्या संग्रहामुळें झाला असें नाहीं. तर हा भेद स्त्रीलिंग नामांच्या संग्रहानें झाला. ह्मणजे, स्त्रीवाचक नामांसाठीं एक वेगळाच प्रत्यय ठेवल्यानें उत्पन्न झाला. असें झाल्यानें बाकी राहिलेले सर्व शब्द पुल्लिंगी झाले. याहूनही अधिक प्राचीनकाळीं ज्या वस्तु नपुंसकलिंगी होत्या, ह्मणजे पुरुषवाचक किंवा स्त्रीवाचक नसून त्यांच्यासाठीं कांहीं रूपें निराळींच राखून ठेवावीं लागलीं त्यांचा उपयोग प्रथमा व द्वितीया या विभक्तींत मात्र करीत. यावरून व्याकरणांतील लिंगभेदाचा उपयोग जरी प्राचीन पौराणिक काव्यांत बराच झाला आहे, तथापि त्याची खरी चालकशक्ति अन्यत्र उपलब्ध होते. ही चालकशक्ति वास्तविक पहातां भाषा व विचार यांच्या अंगभूतच आहे, ह्मणजे त्यांच्यांतच तिची उत्पत्ति आहे. आपल्या स्वतांच्या क्रियांचा बोध दुसऱ्यास करण्याचें आद्यसाधन माणसाजवळ असतें. तें कोणचें तर, वाणीच्या खुणा.* आपल्या कृत्यांसारखीं कृत्यें आपल्या सभोंवतालच्या बाह्य सृष्टींत मनुष्यास आढळतात. मग मनुष्य आपल्या वाणीच्या खुणांनीं जगांतील अनेक वस्तूंचें ग्रहण करण्यास समर्थ होतो. नदीला 'संरक्षणकर्त्री' असें ह्मटलें, एवढ्यावरून नदीला हस्तपादादि अवयव

* भिन्न भिन्न पदार्थांचा बोध होण्यास वाणीचीं अनेक चिन्हें, ह्मणजे अनेक प्रकारचे ध्वनि मुखानें काढणें, हीं मुख्य साधनें होत.

असून तिच्याजवळ दुसऱ्याचें रक्षण करण्याचीं शस्त्रें आहेत; किंवा चंद्र आकाशाचे विभाग पाडून त्याचें माप घेतो असें ह्मटलें, एवढ्यावरून चंद्र सुतार आहे अशी कल्पना प्रथम त्यांच्या स्वप्नीं देखील आली नसेल. एतद्विषयीं अनेकप्रकारचे गैरसमज व भ्रांत्यात्मक विचार फार मागून–ह्मणजे या निर्दिष्ट स्थितीनंतर बरेच दिवसांनीं–उत्पन्न झाले. तितकी मजल पोंचण्यास बराच काळ लागला. प्रस्तुत आपण मानवी विचाराच्या अगदीं आरंभींच आहों असें ह्मटलें असतां चालेल.

## साहाय्यकारक क्रियापदें.

आपणांस असें वाटत असतें, कीं वाक्यांवांचून भाषा होणार नाहीं, व संयोगी शब्दांवांचून वाक्यें होणार नाहींत. ही कल्पना एका अर्थी खरीही आहे व एका अर्थी खोटीही आहे. कशी ती पहा:

वाक्य या शब्दाची व्याख्या जर 'ज्या शब्दोच्चारापासून अर्थज्ञान होतें तें' अशी केली तर वर सांगितलेली कल्पना खरी आहे. पण जर वाक्य या शब्दाची व्याख्या 'बरेच शब्द, ह्मणजे कर्ता, कर्म, क्रियापद,– किंवा नाम, विशेषण व संयोगी शब्द, मिळून केलेला शब्दोच्चार' अशी केली तर वर सांगितलेली कल्पना खोटी आहे. कारण, या व्याख्येप्रमाणें आज्ञार्थबोधक असा एक शब्द देखील वाक्य होऊं लागेल. त्याचप्रमाणें क्रियापदाच्या प्रत्येक रूपास 'वाक्य' ही संज्ञा देतां येईल. ज्यास आपण आतां नाम ह्मणतों तें पूर्वी एक प्रकारचें वाक्यच होतें. त्यास एक तर मूळ धातू असून दुसरा प्रत्यय ह्मणून मानिलेला एक शब्द, असे दोन अवयव त्यास असत. त्या दोन्ही अवयवांपासून मूळ धातूनें निर्दिष्ट केलेल्या वस्तूचा बोध होई. त्याचप्रमाणें एक विशेषण व एक विशेष्य यांचा संयोग केला असतां निराळ्या संयोगी शब्दाची अपेक्षा वस्तुतः रहात नसे; आणि खरा प्रकार ह्मटला तर असाच होता. आपले पूर्वज संयोगी शब्दाचा उपयोग मुळींच करीत नसत. त्यांना त्याची गरजच पडत नसे. इतकेंच नव्हे तर, अत्यंत प्राचीन भाषांमध्यें संयोगवाचक शब्दांची योजना केवळ असंभव असे. ल्याटीन् 'व्हिरबोनस्' ( Vir

Bonus =चांगला मनुष्य ) या प्रयोगाच्या ऐवजीं 'व्हिर् एस्ट बोनस्' (Vir est Bonus=मनुष्य चांगला आहे) असा प्रयोग करण्याचें सामर्थ्य भाषेच्या अंगीं येणें, ह्मणजे मनुष्यवाणीनें अतिअर्वाचीनकाळीं केलेल्या मोठमोठ्या पराक्रमांपैकींच हा एक पराक्रम होय! मागच्या व्याख्यानांत ही गोष्ट आपणांस कळली आहेच कीं, प्राचीन आर्यांस हरएक वस्तु क्रियासमर्थ आहे, ह्मणजे कांहीं तरी क्रिया करण्याची शक्ति तिच्या ठाईं आहे, असें वाटे. आणि असें वाटणें अत्यंत स्वाभाविक आहे. ही अमुक वस्तु केवळ 'आहे' किंवा 'होती' असें ह्मणण्याला, ह्मणजे तिच्या नुसत्या अस्तित्वाबद्दल बोलण्याला देखील त्यांना अतिशय अडचण पडे. याप्रमाणें त्या लोकांस केवळ अस्तित्वाचा बोध करण्याची मोठी पंचाईत पडून प्रथमतः अशा प्रकारचा बोध करणें तर काय करावें लागे कीं, आपण स्वतां केलेली जी कांहीं क्रिया ती बाह्य सृष्टींतील अमक्या पदार्थानें केली असें ह्मणावें लागे. असें ह्मणण्या खेरीज त्यांस दुसरी गतीच नव्हती. आतां प्रत्येक मनुष्यमात्रास करितां येण्यासारखी क्रिया कोणची तर, 'श्वासोच्छ्वास करणें.' आपण आज जसें अमुक वस्तु 'आहे' असें ह्मणतों त्या ऐवजीं तत्कालीन आर्य लोक 'अमुक वस्तु श्वासोच्छ्वास करीत आहे' असें ह्मणत!

### अस्=श्वासोच्छ्वास करणें.

अस् धातु, जो हल्लीं इंग्रजी (He is) या वाक्यांत आढळतो, हा फार जुना आहे. मूळ आर्य कुटुंबाची फुटाफूट होण्यापूर्वींच हा शब्द व त्याचा मूळ अर्थ त्यांस ठाऊक होता. तथापि आपणांस एवढें माहीत आहे कीं (अस्) या धातूचा अर्थ 'होणें' असा होण्यापूर्वी 'श्वासोच्छ्वास करणें' असा होत होता.

'अस्'पासून निघणारा फारच प्राचीन व शुद्ध असा साधित शब्द असु (अस्+उ)=प्राण किंवा जीव हा होय. या संस्कृत अस् धातुपासूनच झालेला दुसरा एक शब्द (असु+र) ह्मणजे 'जे श्वासोच्छ्वास करि

तात,' 'जे जीवंत आहेत,' 'जे आहेत ते'; व शेवटीं 'सजीव पदार्थ' किंवा 'देव' अशा भिन्न भिन्न अर्थांचा वाचक, हा असुर शब्द, वैदिक शब्दांपैकीं फार जुना शब्द आहे.*

## भू=उत्पन्न होणें, वाटणें.

जेव्हां 'अस्' हा धातु, झाडांस किंवा जे दुसरे पदार्थ श्वासोच्छ्वास करीत नाहींत अशी त्यांची समजूत असे त्यांस, लावतां येत नाहीं असें वाटलें, तेव्हां दुसऱ्या एका धातूची योजना त्यांनीं केली. तो धातु 'भू'=होणें, असणें. याचा मूळ अर्थ 'उत्पन्न होणें' असा होता. आणि जो ग्रीक 'फुओ' व इंग्रजी To be 'टु बी' या शब्दांत हल्लीं चालू आहे तोच 'भू' या शब्दाचा मूळ अर्थ होता. हा शब्द प्राणिवर्गास लावीत एवढेंच नव्हे, तर सर्व वनस्पतिवर्गास व प्रत्येक उत्पन्न होणाऱ्या वस्तूस लावीत. खुद्द पृथ्वीलाही हें नांव त्यांनीं दिलें. पृथ्वीला भू ह्मणजे 'उत्पन्न होणारी,' 'असणारी' अशा अर्थानें तो शब्द लाऊं लागले.

## वस्=रहाणें.

शेवटीं जेव्हां याहूनही अधिक विस्तृतार्थ किंवा अधिक व्यापक अशा शब्दाची आवश्यकता दिसून आली त्या वेळीं 'वस्' धातूचा उपयोग करूं लागले. या धातूचा मूळ अर्थ 'वसणें,' 'रहाणें' असा होता. हा शब्द

---

* संस्कृत 'असु' शब्द झेंद मधील 'अहु,' होय. त्याचा अर्थ **अवेस्तांत** 'सदसद्विवेक करणारा आत्मा' किंवा 'जगत्' असा होतो. (डॉरमेस्तेतरचें पुस्तक '**ओर्मझ्द व एहरीमन्**' पृष्ठ १४७ पहा.) जरी झेंद भाषेंत 'अहु' शब्द 'खावंद,' 'साहेब' अशा अर्थाचा असला तरी तेवढ्यावरून 'अहुर्—मज़्द' शब्दांतील 'अहुर्' चा अर्थ देखील 'साहेब,' 'खावंद' असा होतो आणि तो शेवटीं एक प्रत्यय 'र' जोडल्यानें होतो असें ठरत नाहीं. जसे 'रतु' शब्दाचे 'आज्ञा' व 'आज्ञा करणारा' असे दोन अर्थ होतात. त्याप्रमाणें झेंद भाषेंत 'अहु' चे अर्थ 'श्वास' आणि 'साहेब' किंवा 'महाराज' असे दोन होत असतील. परंतु झेंदांत 'अहु' शब्दाचा अर्थ 'साहेब' असा होतो, ह्मणून संस्कृतांत 'असुर' शब्दाचा देखील तोच अर्थ असला पाहिजे, ही कल्पना मान्य करण्याजोगी नाहीं.

संस्कृत 'वस्–तु'=ह्मणजे 'गृह' व ग्रीक 'आसृतु'='शहर' या शब्दांत दिसून येतो. इंग्रजींत 'आय् वॉझ' ( I was ) यांत देखील त्याचीं कांहीं चिन्हें हल्लीं दिसतात. जो पदार्थ 'वाढणें' या अर्थाचा किंवा 'श्वासोच्छ्वास करणें' या अर्थाच्या धातूनें दर्शवितां येत नाहीं त्याच्यासाठीं या 'वस्' धातूची योजना करीत. जड, निर्जीव पदार्थाचा भाव दर्शविण्याचे कामांत या 'वस्' धातूचा फार उपयोग पडला असें दिसतें. खरें पाहिलें तर, पुरुषवाचक, स्त्रीवाचक व नपुंसक या तीन प्रकारच्या नामांचा या तीन साहाय्यकारक क्रियापदांच्या योजनेशीं एका प्रकारचा चमत्कारिक संबंध दिसून येतो !

## भाषेचा मूळ आरंभ.

प्राचीन आर्यलोक सूर्य, चंद्र, आकाश, पृथ्वी, पर्वत व नद्या यांविषयीं कांहीं बोलूं लागल्यास त्यांच्या त्या बोलण्यांत वर सांगितलेला प्रकार कितपत दिसून येतो किंवा कितपत खरा आहे तें आतां पाहिलें पाहिजे. जेव्हां आपण चंद्र आहे, सूर्य आहे, वारा वाहतो, पाऊस पडतो, असें ह्मणतों; त्या ठिकाणीं ते आर्य लोक असें ह्मणत कीं, सूर्य श्वास घेतो=( सूर्योऽस्ति ), चंद्र वाढतो=( मा भवति ), पृथ्वी राहते=( भूर्वसति ), वायु किंवा फुंकणारा फुंकतो=( वायुर्वाति ), पर्जन्य पडतो=( इंद्र उनत्ति, किंवा वृषा वर्षति किंवा सोमस्सुनोति. )

मनुष्याच्या डोळ्यांपुढें सृष्टीचे जे जे खेळ होत, त्यांची कल्पना मनांत आणण्याचा व ती कल्पना शब्दांनीं दर्शविण्याचा यत्न प्राचीनकाळचे लोक कसा करीत, या गोष्टीचा विचार आपण येथें करीत आहों. संस्कृताच्याही अगोदरची जी भाषा तिचीं वळणें कसकशीं होतीं तीं केवळ दर्शविण्यापुरताच मात्र आपण संस्कृताचा विचार करीत आहों. कोणत्याही पदार्थाची प्रथमतः कल्पना कशी उत्पन्न झाली, पुढें ती दर्शविण्याकरितां शब्दयोजना कशी करावी लागली, ही शब्दयोजना एकदां ठरल्यावर त्याचें शास्त्र कसें बनलें व पुनः अर्थवाद कसे निघाले—असा चमत्कार होतां होतां पुढें त्यांतूनच प्राचीन पुराणोक्त इतिहासा-

चा संग्रह कसा झाला इत्यादि प्रश्न यद्यपि प्राचीनकाळच्या विचारांस अनुलक्षून आहेत; तथापि या गोष्टींचा निर्णय करावयाचा तो प्रस्तुतस्थळी करितां येत नाहीं. या संबंधानें एक गोष्ट मात्र पक्की लक्षांत बाळगण्यासारखी आहे. ती ही कीं, प्राचीन आर्यलोक सूर्याच्या प्रभावावरून किंवा त्याच्या निरनिराळ्या कृत्यांवरून सूर्यास ओळखीत. कारण कीं, सूर्यास प्रकाश देणारा, उष्णता देणारा, उत्पन्न करणारा, किंवा पालन करणारा, असें ह्मणत. ते चंद्राला 'मोजणारा,' अरुणोदयाला 'जागृत करणारा,' मेघध्वनीला 'गर्जना करणारा,' पर्जन्याला 'वर्षविणारा' व अग्नीला 'वेगानें धांवणारा' असें ह्मणत. एवढ्यावरून ते या सर्व वस्तूंस हातापायांचीं माणसेंच कल्पीत, असें मानणें बरोबर नाहीं. 'सूर्य श्वासोच्छ्वास करितो' असें जेव्हां ते ह्मणत, त्या वेळेस सूर्य हा फुप्फुस व मुख यांच्या साहाय्यानें श्वासोच्छ्वास करणारा एखादा मनुष्य किंवा एखादा प्राणी आहे, असा त्यांच्या ह्मणण्याचा भाव नसे. आपले गुहावासी पूर्वज मूर्खही नव्हते व कवीही नव्हते. 'सूर्य किंवा पोषण करणारा श्वासोच्छ्वास करितो' असें ह्मणण्यांत, सूर्याला गति आहे, तो चपळ आहे, तो आपल्याप्रमाणेंच हालतो चालतो एवढें दर्शविण्याखेरीज त्यांचा दुसरा कांहीं हेतु नव्हता. प्राचीन आर्यांस चंद्राला दोन डोळे, एक नाक किंवा एक तोंड हा चमत्कार अजून दिसूं लागला नव्हता; किंवा वारा सुटला ह्मणजे—आकाशांत चार कोंपऱ्यांत चार मुलगे उभे आहेत, ते आपले लठ्ठ गाल फुगवून तोंडानें वारा फुंकीत आहेत, असेंही त्यांना अजून वाटूं लागलें नवतें. हा काव्याचा सर्व प्रकार आपण ज्या काळाचा विचार प्रस्तुत करीत आहों त्या नंतर बऱ्याच काळानें घडला. माणसें जेव्हां अगदीं पहिल्यानेंच विचार करूं लागलीं, तेव्हां त्या स्थितींत हा प्रकार मुळींच नव्हता.

### पूर्वी सादृश्य निषेधानें दाखवीत.

ज्या काळाचा विचार आपण आतां करीत आहों त्या काळीं आपले पूर्वज ज्या पदार्थास आपण स्पृश्य किंवा अस्पृश्य असें नांव दिलें

आहे त्यांचें जीविकरण, चेतनीकरण, किंवा मानुषीकरण, करण्याचा यत्न करीत नव्हते एवढेंच नव्हे, तर उलटे त्या पदार्थांत व आपल्या स्वतांत भेद पाहून त्यांस फार आश्चर्य वाटे.

या मताच्या पुष्टीकरणार्थ एक चमत्कारिक गोष्ट वेदांतच मला आढळली आहे. ती कोणती हें मी तुह्मांस आतां सांगतों. ज्यास आपण हल्लीं सादृश्य किंवा उपमा ह्मणतों, ती वेदांतील अनेक मंत्रांत निषेधानें दाखविली आहे. आपण जेथें 'अमुक पदार्थ खडकासारखा दृढ आहे[1]' असें ह्मणतों त्या ठिकाणीं वेदकवि 'दृढ असा खडकच नव्हे काय!' असें ह्मणत; ह्मणजे, साम्य दर्शविण्यास वैषम्याचा किंवा भिन्नत्वाचा उल्लेख त्यांस करावा लागे. 'ते देवाला स्तुतिप्रचुर गाणें अर्पितात, मिष्टान्न नव्हे काय[2]!' या वाक्याचा अर्थ 'स्तुतिप्रचुर गाणें मिष्टान्नासारखें होय' असा होतो. 'नदी घों घों शब्द करीत जवळ येते, बैल नव्हे काय!' ह्मणजे, 'बैलासारखी' असा अर्थ. 'मरुत् किंवा वादळाचे देव स्वभक्तांस आपल्या बाहूंनीं आलिंगन देत आहेत' असें ह्मणतांना[3] 'एखादा पिता पुत्रास नव्हे काय!' ह्मणजे, 'जसा एखादा पिता पुत्रास आपल्या बाहूंनीं आलिंगन देतो तद्वत्' असा अर्थ होतो. याचप्रमाणें 'चंद्र, सूर्य हे इकडून तिकडे फिरतात, पण प्राणी तर नव्हत.' 'नद्या गर्जना करितात व भांडतात पण त्या माणसें तर नव्हत!' 'पर्वत चुरडून जाण्यासारखे नाहींत, पण हे योद्धे तर नव्हत!' 'अरण्यांस अग्नि खाऊन टाकितो, पण हा सिंह तर नव्हे!'

वेदांतील अशा वाक्यांचा अर्थ करतेवेळीं 'न'=नाहीं, या प्रत्ययाचा अर्थ आधुनिक संस्कृतांत उपमार्थीं 'इव' या शब्दाचा करितात तसा आपण 'सारखें' या शब्दानें नेहमीं करीत असतों. पण एवढें सांगणें अवश्य आहे कीं, वेदकवींस पदार्थांचें सादृश्य पाहून इतकें आश्चर्य वाटत नसे. तर पदार्थांचें वैषम्य पाहून फार आश्चर्य वाटे.

---

१ ऋग्वेद १-५२-२ "सः पर्वतः न अच्युतः" १. ६४. ७ "गिरयः न स्वतवसः"
२ ऋग्वेद. १. ६१. १.
३. कित्ता. १. ३८. १.

## गुणवाचक कांहीं नामें.

फार प्राचीनकालापासून कवींच्या मनांवर या सृष्टींतील अनेक स्थूल पदार्थ पाहून कांहीं विलक्षण प्रकारचा ठसा उठला असावा व त्यांचें वर्णन करितांना कांहीं विशेषणांचा किंवा गुणदर्शक नामांचा उपयोग त्यांनीं पुनः पुनः केला असावा, असें मला वाटतें. हे सृष्टींतील पदार्थ परस्परभिन्न होते. तथापि त्यांच्यांत कांहीं गुण साधारणही होते. त्याचमुळें त्यांस सर्वसाधारण असें एक नाम देतां आलें. पाठीमागून प्रत्येक गुणाचा एकेक वर्ग होऊन त्या वर्गांत ते ते पदार्थ सामील होत गेले. अर्थात् हें संभवण्यासारखें आहे, एवढें मात्र तर्त ध्यानांत ठेवा. आतां खरोखर काय प्रकार घडला तें आपण पाहूं.

वेदावरून आपणांस असें दिसून येतें कीं, प्राचीन ब्रह्ममीमांसकांच्या मताप्रमाणें, वेदांतील एकंदर मंत्र कोणत्या तरी देवांस उद्देशून केलेले आहेत. 'देव' हा शब्द आपल्या 'डीइटी' ( Deity ) शब्दाशीं बरोबर मिळतो. तथापि, वेदमंत्रांत 'देव' हा शब्द, इंग्रजी 'डीइटी' शब्दाचा जो अर्थ आहे त्या अर्थानें मुळींच योजिलेला नाहीं. 'देव' शब्दाचा हल्लीं जो अर्थ आपण करितों त्याची कल्पना अजूनपर्यंत उत्पन्न झाली नव्हती. प्राचीन आर्य टीकाकारांनींही असें सांगितलें आहे कीं, 'देवता' हें नांव वेदमंत्रांत ज्या पुरुषाची किंवा पदार्थाची स्तुति केली असेल त्याचें होय. तो मंत्र उच्चारणारास किंवा गाणारास, किंवा स्तोत्यास ते ऋषि* असें ह्मणत. याप्रमाणेंच ज्याचा बळी द्यावयाचा असेल त्यालाही वेदमंत्रांत 'देवता' असें ह्मणत. बळी किंवा हवनद्रव्यें अर्पण करण्याच्या कामीं उपयोगीं पडणारीं पात्रें, रथ, युद्धांतील परशु, ढाल यांविषयीं बोलूं लागले ह्मणजे त्या पदार्थांसही 'देवता' असें ह्मणत. वेदसूक्तांत आढळणाऱ्या कांहीं संवादांवरून असें दिसतें कीं मंत्रकर्त्यास 'ऋषि' व ज्याला उद्देशून ती उक्ति असेल त्याला 'देवता' असें ह्मणत. खरें पाहतां 'देवता' हा एक पारिभाषिक शब्द झाला आहे. त्याचा अर्थ, वेदाच्या आधारावरून

---

* अनुक्रमणिका: 'यस्य वाक्यम् स ऋषिः, या तेनोच्यते सा देवता, तेन वाक्येन प्रतिपाद्यं यद्वस्तु सा देवता.'

असा दिसतो कीं, ज्या वस्तुविषयीं कवि बोलला असेल ती वस्तु. याखेरीज दुसरा कांहीं नाहीं. जरी ऋग्वेदसूक्तांतून 'देवता' ( Deity ) हा शब्द भाववाचक आहे असें दिसून येत नाहीं, तरी आर्यावर्तांतील आद्यकवींनीं ज्या ज्या पदार्थांस उद्देशून मन्त्र ह्मटले त्यांपैकीं बहुतेकांस ' देव ' ही संज्ञा दिली आहे. जर युनानी (ग्रीक) लोकांस आपल्या भाषेंत या ' देव ' शब्दाचा अर्थ करावा लागला असता तर, ज्याप्रमाणें आपण ग्रीक शब्द 'थिऑस्' चा अर्थ फारसा विचार केल्यावांचून एकदम 'देव' असा करितों, तसा त्यांनीं बहुतकरून थिऑई हा शब्द योजिला असता. वेदकाळचे कवि 'देव' शब्दाचा काय अर्थ करीत याजबद्दल आपण आपल्या मनाशींच विचार करून पाहूं लागलों तर, आपणांसही असें दिसून येईल कीं, ग्रीक थिऑस् किंवा इंग्रजी 'गॉड' (God) शब्दानें जो अर्थ परिस्फुट होतो त्याहून तो अर्थ फार भिन्न असे. शिवाय वेद, ब्राह्मण, आरण्यकें व सूत्रग्रंथ यांवरूनही या 'देवता' शब्दाचा अर्थ कालवशात् एकसारखा वाढत व बदलत गेला आहे असें दिसून येईल. 'देवता' शब्दाचा खरा अर्थ पाहणें असेल तर त्याच्या मूळ उत्पत्तिपासून तों थेट हल्लींच्या काळापर्यंतचा त्याचा समग्र इतिहास समजला पाहिजे. मूळ शब्दाचा अर्थ दिव्=प्रकाशणें, या धातूपासून 'तेजस्वी' असा झाला. शब्दकोशांत याचा अर्थ 'ईश्वर किंवा ' ईश्वरी ' असा दिलेला आहे. पण वेदसूक्तांचें भाषांतर करतेवेळेस जर आपण नेहेमीं 'देव' शब्दाचा अर्थ 'ईश्वर' ( Deus ) असा करूं लागलों, तर १००० वर्षांच्या कालगणनेंत आपण फार चुकलों असें होईल. ज्या कालाचा विचार आपण आतां करीत आहों, त्या कालीं ' देवता ' शब्दाचा अर्थ हल्लीं आपण करितों तसा होत नसे. त्याचा प्रस्तुतचा अर्थ हळू हळू प्रचारांत आला. ह्मणजे, ' देव ' हा शब्द व तद्विषयक प्रस्तुतच्या कल्पना प्रचारांत येण्यास फार काळ लागला. सृष्टपदार्थांचा विचार करीत असतांच मनुष्यांस ईश्वरविषयक विचारही सुचत होते. वेदसूक्तांचें खरें महत्व याच दृष्टीनें आहे.

हेझियड्* नांवाचा ग्रीक इतिहासकार आपणांस ग्रीक देवांच्या वंशाचा प्राचीन इतिहास सांगतो त्याचवेळीं वेदग्रंथ उघडून पहावा तों त्यांत देवांचा सारा वंशचावंश मूर्तिमंतच दृष्टीस पडतो व त्यांची उत्पत्ति व वृद्धि सर्व कांहीं समजते. शिवाय प्राचीन (काळानें प्राचीन नसल्यास व्यवस्थेनें तरी प्राचीन) अशा सूक्तांतून देवताविषयक कल्पनांची क्रमाक्रमानें होणारी उन्नतदशाही आपल्या दृष्टीस पडते.

ऋषींनीं ज्या सृष्टपदार्थांस उद्देशून मंत्र रचले आहेत त्यांत दिसून येणारा सामान्य गुण दर्शविण्यासाठीं, जो शब्द प्रचारांत आला व जो पुढें सर्व देवतांचें सामान्यनाम होऊन बसला, अशा प्रकारचा हा 'देव' शब्द एकच आहे असें नाहीं, तर आणखींही दुसरे पुष्कळ शब्द असे आहेत.

वेदांत 'वसु' ह्मणून एका प्रकारच्या देवांचें सामान्य नांव आहे; त्याचा देखील मूळ अर्थ 'तेजस्वी,' 'चकचकीत,' असा होत असे. बाकीचे सर्व पदार्थ क्षय पावून नष्ट होतात. परंतु कांहीं पदार्थ निर्विकार व अविनाशी आहेत असें पाहून प्राचीन कवींनीं त्या पदार्थांस अमर्त्य=( न मरणारे ), अजर=( वृद्ध—नष्ट न होणारे ), अशीं नांवें दिलीं.

मनुष्यें व इतर प्राणी विकार पावतात, क्षीण होतात व नाश पावतात. परंतु सूर्य व आकाश हे पदार्थ निर्विकार, अविनाशी व अमर आहेत, एवढेंच नाहीं तर, खरोखर त्यांस जीवही आहे व ते सचेतन आहेत असा विचार अथवा भाव दर्शविणें जेव्हां अवश्य वाटलें, तेव्हां 'असुर' या शब्दाचा प्रयोग त्यांनीं केला, व हा 'असु' =(श्वास) या शब्दापासून बनविला, यांत मला काडीमात्र संशय वाटत नाहीं. सृष्टींतील तेजस्वी व उपकारी असे दृश्य पदार्थ दर्शविण्यास मात्र 'देव' शब्दाचा उपयोग झाला! तेव्हां 'असुर' शब्दाची व्याप्ति 'देव' शब्दापेक्षां अधिक असल्यामुळें तो ( असुर शब्द ) प्राचीन कालापासून

---

* एक प्राचीन ग्रीक ग्रंथकार.

उपकारी व अपकारी अशा दोनही शक्तींस लावतां आला. या 'असुर' शब्दाचा मूळ अर्थ 'श्वासवान्' व नंतर 'देव' असा झाला. या शब्दांत अर्वाचीन धर्मांतल्या ज्या मतास 'ऍनिमिझम् (ह्मणजे प्राणिमात्रांचे सर्व चमत्कार प्राणशक्तीनें होतात असें मत) ह्मणतात, त्याचीं कांहीं प्रथम चिन्हें दिसतात. दुसरें विशेषण 'इशिर' असें आहे. याचा प्रथम अर्थ बहुतेक 'असुर' या शब्दासारखाच होता. 'इश्' ह्मणजे झाडाचा रस, शक्ति, वेग, तेज, प्राण. या 'इश्' शब्दापासून उत्पन्न झालेला 'इशिर' शब्द, वेदांतील कांहीं देवतांस—त्यांत मुख्यत्वेंकरून इंद्र, अग्नि, अश्विदेव, मरुत्, आदित्य इ०; तसेच वायु, मन व रथ यांसारख्या वस्तूंसही लावीत. त्याचा मूळ अर्थ 'वेगवान्,' 'तेजस्वी' असा होता. हा अर्थ ग्रीक शब्द ऐरॉस्, इक्थस् व आरॉन्भिनॉस् यांत दिसून येतो. याचा ग्रीक भाषेंत साधारण अर्थ 'ईश्वरी' किंवा 'पवित्र' असा होतो. संस्कृतांतील 'असुर'=देव, याच्या अर्थाची जी उपपत्ति सांगितली तीच उपपत्ति या शब्दाचीही होय असें समजावें.

## वैदिक देवतांत स्पृश्य पदार्थ.

स्पृश्य, अर्धस्पृश्य, व अस्पृश्य, अशा या पदार्थांच्या तीन वर्गांचा विचार करूं लागलों, ह्मणजे त्यांतला प्रथम वर्ग ऋग्वेदांत येणाऱ्या देवतांत क्वचित् दृष्टीस पडतो. पाषाण, हाडें, शिंपले, वनस्पति व पदार्थपूजेंत येणाऱ्या इतर वस्तु, प्राचीन सूक्तांत अगदीं दृष्टीस पडत नाहींत. अर्वाचीनकालच्या कांहीं मंत्रांत व मुख्यत्वेंकरून अथर्ववेदांत ते पदार्थ आढळतात. मनुष्यकृतीनें घडलेल्या वस्तूंची स्तुति ऋग्वेदांत केली आहे. तशी स्तुति वर्ड्स्वर्थ* किंवा टेनिसन्* हेही कवितारूपानें करूं शकतील. त्या वस्तु कोणत्या ह्मणाल तर रथ, धनुष्य, बाणांचा भाता,

---

* हे दोन इंग्रजी नामांकित कवि आहेत. यांपैकीं पहिल्या कवीचे नातु **प्रोफेसर वर्ड्स्वर्थ** हे आपल्याइकडे 'एल्फिन्स्तन्' पाठशाळेंतील मुख्य गुरु सर्वांस महशूर आहेतच. दुसरा कवि अद्यापि इंग्लंडांत जीवमान आहे व त्यास 'पोएट् लॉरिएट्' अथवा 'राजकवि' असा हुद्दा आहे.

परशू, दुंदुभी, यज्ञांत लागणारीं भांडीं व अशाच दुसऱ्या वस्तु. या वस्तूंनीं कधींही स्वतंत्र देवतास्वरूपें धारण केलीं असावीं असें दिसत नाहीं. तर त्यांस केवळ उपयुक्त व मूल्यवान् मानीत व कदाचित् फार झालें तर पवित्र मानीत.

## वैदिक देवतांत अर्धस्पृश्य पदार्थ.

पण दुसऱ्या वर्गाकडे आपण लक्ष दिलें असतां फारच निराळी गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते. अर्धस्पृश्य ह्मणून ह्मटलेल्या वस्तूंपैकीं बहुतकरून प्रत्येक वस्तु वेदांत आढळणाऱ्या देवतांत दिसून येते. ऋग्वेद १.९०. ६-८ या ठिकाणीं असें आढळतें:—

'सत्यनिष्ठ मनुष्यांवर वायु मधुवृष्टि करितात. नद्याही मधुवृष्टि करितात. आमच्या वनस्पति मधु होवोत' (६) रात्र व पहांट या मधु होवोत. पृथ्वीवरचें आकाश मधानें परिपूर्ण होवो. आमचा पिता द्यौः (आकाश) मधु होवो' ( ७ ).

' आमचे वृक्ष मधानें परिपूरित होवोत. सूर्य मधुमान् असो. आमच्या गाई ( माध्वी ) मधुपरिपूरित होवोत.' ( ८ ).

वरील ऋचेचें मी शब्दशः भाषांतर केलें आहे. यांत ' मधु ' श-

---

१. पात्रें किंवा शस्त्रें कधींही पूज्य पदार्थ नव्हते. पण H. Spencer's Principles of Sociology या पुस्तकाचा भाग १, पृष्ठ २४२, या स्थळीं ग्रंथकार ह्मणतात:— 'टोपलींत उपयोगाच्या वस्तु आणतां येतात, किंवा टोपलीच उपयोगीं पडते ह्मणून हिंदुस्थानांतील स्त्री टोपलीची पूजा करिते व तीस नैवेद्य दाखविते. तसेंच दळावयाचें जातें किंवा दुसरा जो काहीं पदार्थ घर कामांत उपयोगी पडतो त्यासही ती पूज्य मानिते. सुनार आपली फरशी, चिमणें इत्यादि पदार्थांची अशीच पूजा करून नैवेद्य दाखवितो. ब्राह्मण ज्या बोरूनें लिहितो त्या लेखणीची, शिपाई लढाईत कामीं पडणाऱ्या शस्त्राची, गंवडी आपल्या थापीची पूजा करितो. **मि. लायल्** या नांवाच्या एका विद्वान् व शोधक ग्रंथकारानें ' **हिंदुस्थानांतील** एका प्रांताचा धर्म' या नांवाचें पुस्तक केलें आहे. तो त्यांत असें लिहितो. ' शेतकरी आपल्या नांगराची, भोई आपल्या जाळ्याची, व साळी किंवा कोष्टी आपल्या मागाची पूजा करितो; इतकेंच नव्हे तर, कारकून आपल्या लेखणीची, पेढीवाला आपल्या वह्यांची पूजा करितो.' आतां येथें प्रश्न असा निघतो कीं, पूजा करणें ह्मणजे काय ?

[library stamp with handwritten accession number]

ब्दाचा अर्थ ' मध ' असा होतो. तो शब्द जशाचा तसाच ठेविला आहे. ' मधु ' या शब्दाचा अर्थ अन्न व पान, गोड अन्न व गोड पान, असा होतो. याचमुळें पुढें ' मधु ' शब्दाचा अर्थ ' टवटवीतपणा आणणारे पदार्थ. ' ह्मणजे, पर्जन्य, उदक, दुग्ध इत्यादिक होऊन, शेवटीं मनास आनंद देणाऱ्या हरएक वस्तूस ' मधु ' हें नाम प्राप्त झालें. ' मधु ' या शब्दासारख्या प्राचीन शब्दांचा संपूर्ण अर्थ आपणांस कधींही कळणार नाहीं. प्राचीन कवि व वक्ते यांच्या मनांत या पुरातन शब्दांनीं कसकसे तरंग उत्पन्न केले, ही गोष्ट केवळ अनुमानानें कळण्यास बहुतकालपर्यंत आस्थापूर्वक त्या शब्दांचा अभ्यासच केला पाहिजे. दुसरा मार्ग नाहीं.

ऋग्वेद १०. ६४. ८. यांत याप्रमाणें आहे:—

' आह्मी आमच्या साहाय्यास त्रिःसप्त (एकवीस) महान् उदकें, वृक्ष, पर्वत, व अग्नि यांस बोलावितों.'

ऋग्वेद ७. ३४. २३. ' पर्वत, उदकें, परोपकारी वनस्पति, आकाश व पृथ्वी ( द्यावापृथ्वी ) आपल्यावरील झाडांपानांसह आमच्या संपत्तीचें संरक्षण करोत. '

ऋग्वेद ७. ३५. ८. ' दूरदर्शी सूर्य शुभलक्षणयुक्त उगवो. चारी दिशा शुभलक्षणयुक्त होवोत. दृढ व शक्तिमान् असे पर्वत शुभलक्षणयुक्त होवोत. '

ऋग्वेद ३. ५४. २०. ' शक्तिमान् पर्वत आमचें संरक्षण करोत. '

ऋग्वेद ५. ४६. ६. 'सुप्रकीर्तित[१] पर्वत व प्रकाशमान् नद्या आमचें रक्षण करोत.'

ऋग्वेद ६. ५२. ४. ' वर येणाऱ्या उषा( प्रभात समय ) माझें संरक्षण करोत. उदकानें भरून वाहणाऱ्या नद्या माझें संरक्षण करोत. जेव्हां देवांस आह्मी बोलावूं तेव्हां ते पितर आमचें संरक्षण करोत.'

ऋग्वेद १०. ३५. २. ' आकाश व पृथ्वी यांणीं आमचें संरक्षण करावें असें आह्मी प्रार्थितों. आह्मांस पापापासून दूर ठेवण्यास या नद्या, या

१ सुप्रकीर्तित=ज्यांची उत्तम स्तुति केली आहे असे.

माता व हे तृणाच्छादित पर्वत, हा सूर्य व ही उषा यांची आह्मी प्रार्थना करितों. सोमरस हा आज आह्मांस आरोग्य व संपत्ति देवो.'

वैदिक इतिहासाची जी थोडी माहिती आपणांस आहे त्यापैकीं ही एक महत्वाची गोष्ट आहे. ती कोणती? तर ऐका. पंजाबांतील नद्यांच्या कांठांवर ज्या गोष्टी घडल्या, त्यांचें अल्प वर्णन ज्यांत आहे असा हा त्या नद्यांस उद्देशून केलेला एक मंत्र आहे:—ऋग्वेद १०.७५.

'हे नद्यांनो! या वैवस्वत भूमीवर तुमचा महान् गौरव कवीच्या मुखानें प्रसिद्ध होईल असें करा. सात सात जमून त्या तीन मार्गानें आल्या आहेत. परंतु सर्व प्रवाहांमध्यें (नद्यांमध्यें) सिंधु आपल्या बळाच्या योगानें वरिष्ठ आहे!' १.

'हे सिंधुनदी! जेव्हां तूं पारितोषिकास्तव[१] थांबलीस, त्यासमयीं तुला वाट मिळावी ह्मणून वरुणानें एक वाट खणून दिली. सर्व वाहणाऱ्या प्रवाहांत तूं मुख्य दिसतेस. कारण, पृथ्वीवरील एका उंच कड्यावरून तूं धों धों उड्या टाकीत येत आहेस!' २.

'तुझ्या त्या उड्यांचा आवाज उंच आकाशापर्यंत पोंचत आहे. तुझा तो धों धों असा प्रचंड शब्द होतो तेव्हां मोठी मौज वाटते. ज्याप्रमाणें गर्जना झाल्यावर मेघांतून वृष्टि होते त्याप्रमाणें ही सिंधु तरुण बैलासारख्या डुरकण्या देत देत येते व तिचे तुषार सर्वत्र पसरतात.' ३.

'ज्याप्रमाणें माता आपल्या वत्सांकडे जातात, त्याप्रमाणें या गाईसारख्या उड्डाण करीत करीत येणाऱ्या नद्या तुजकडे आपलें दुग्ध घेऊन येतात. जसा युद्धांत एखादा राजा तशी तूं सैन्याचीं दोन्हीं अंगें नेतेस. तूं या अपगांचे (खालीं वाहत जाणाऱ्या नद्यांचे) सन्मुख येऊन पोंचतेस.'४.

'हे गंगे, यमुने, सरस्वती, सुतुद्री[२], परुष्णी[३], मी तुमची स्तुति करितों ती मान्य करा. असिक्नी (अकेसूनीस्) सहित ऐका. हे मरुद्वृधा व वितस्ता (हाइदास्पिस्) सुद्धां ऐका. हे आर्जिकीये सुशोमे सहित ये!' ५.

१ पारितोषक=बक्षिस. २ सतलज. ३ रावी.

तुझ्या प्रवासासाठीं तृष्टामे बरोबर प्रथम संयोग पावून हे सिंधु, तूं सुसर्तु, रासा व स्वेती यांस बरोबर घेऊन कुभेसह ( कोफेन्, काबूलनदी ), गोमती ( गोमल् ) पर्यंत, मेदत्नुबरोबर क्रुमु ( कुरम ) पर्यंत, त्याच मार्गानें तूं गमन करतेस.' ६.

'ती अजिंक्य सिंधु, प्रकाशमान्, तेजस्वी, महच्छोभेसहवर्तमान स्वकीय अभ्रांस मैदानांतून घेऊन जाते. ती इतर वेगवानांहून वेगवान्, सुंदर, अश्विनीप्रमाणें पाहाण्यालायक वस्तु होय.' ७.

'अश्व, रथ, वस्त्रें, हिरण्य, लोंकर, तृण इत्यादिकांनीं परिपूर्ण अशी ही सुंदर व तरुण सिंधुनदी, ज्या देशांतून मध वाहतो अशा प्रदेशांतून जात आहे.' ८.

सिंधूनें आपल्या हलक्या रथास घोडे जोडिले आहेत. आमच्यासाठीं या युद्धांत ती ऐश्वर्य हरण करो; कारण, तिच्या त्या अनिवार्य, प्रख्यात व तेजस्वी अशा रथाची कीर्ति फार मोठी आहे.' ९.

सहस्र मंत्रांतून हे वेंचे मीं निवडून काढिले आहेत. कारण, हे मंत्र अद्यापि पूर्णपणें समजण्यासारखे असून ते सर्व अर्धस्पृश्य पदार्थपर —अर्धदेवतापर आहेत.

ज्या प्रश्नाचें आतां आपणांस उत्तर द्यावयाचें आहे तो प्रश्न हा :—

या पदार्थांस देव असें ह्मणावें कीं नाहीं ? कांहीं मन्त्रांचा विचार केला तर या प्रश्नाचें उत्तर साफ 'नाहीं' असें देतां येईल. आपण जरी अनेकेश्वरवादी नाहीं, तथापि आपणही असें ह्मणूं कीं, वृक्ष, पर्वत, नद्या, पृथ्वी, आकाश, अरुणोदय, व सूर्य आह्मांवर कृपाशील व संतुष्ट असोत.

आपल्या संरक्षणार्थ जेव्हां पर्वत, नद्या, व इतर पदार्थांची आराधना लोक करूं लागले, तेव्हां ते लोक एक पायरी अधिक चढले असें दिसतें. पण याचेंही कारण स्पष्टच आहे. मिसरदेशवासी प्राचीन लोकांचा नीळ नदीविषयीं किती पूज्यभाव असे, हें हल्लीं आपण जाणतों. आजकाल देखील स्वित्झर्लंड या डोंगराळ देशांतील एखादा देशाभिमानी पुरुष शत्रूपासून आपलें स्वतांचें व आपल्या गृहाचें संरक्षण करण्याचे कामीं आपल्या पर्वतांचें व नद्यांचें साहाय्य मागेल यांत संशय नाहीं.

या प्रमाणें एका मागून एक गोष्टी सहजरीत्या घडत जातात. ' पर्वतहो, ऐका ! ' अशी ते पर्वतांची प्रार्थना करीत, याचें कारणही स्पष्टच आहे. जर ते पर्वत ऐकत नाहींत असें त्यांस वाटतें, तर त्यांना बोलाविलें असतें तरी कशाला ?

सूर्यास 'दूरचें पाहणारा' असें ह्मटलें आहे. कां न ह्मणावें ? उगवणाऱ्या सूर्याचीं प्रथम किरणें अंधकारांतून आरपार प्रवेश करून प्रत्यहीं आपल्या आश्रमाकडे बघतात हें आपण पहात नाहीं काय? हींच किरणें आपणांस पाहावयास शक्तिमान् करितात, नव्हे काय ? तर सूर्याला 'दुरून प्रकाश देणारा,' 'दूरदृष्टी,' 'दूर पाहणारा' असें कां ह्मणूं नये ?

नद्यांस ' माता ' असें ह्मटलें आहे, कां न ह्मणावें ? गवत व त्याजवर चरणाऱ्या पशूंस नद्याच अन्न पोंचवीत नाहींत काय ? ऋतुऋतूचे ठाईं नदीचें पाणी योग्य रीतीनें मिळावें अशी आपणांस आशा असते, व त्याप्रमाणें तें प्राप्तही होतें. अशा नद्यांवर सर्वथा आपलें जीवित अवलंबून राहिलें असतें नव्हे काय? आणखी आकाशास ' बाप नव्हे ' ह्मणजे ' बापासारखा,' किंवा शेवटीं ' बाप ' असें ह्मटलें आहे; तर तें आकाश आपलें व या सर्व पृथ्वीचें संरक्षण करीत नाहीं काय ? †आकाशासारखें

---

†एक देव मानण्याऱ्यांच्या आक्षेपापुढें टिकाव धरणारे व ईश्वरी शक्तीवर विश्वास ठेवणारे ग्रंथकर्ते फार थोडे सांपडतील; इतकेंच नव्हे, तर एकच देव खरा असें मानिल्यानंतर भिन्न भिन्न देवतांची कल्पना कशी सुचली याचा विचार करणें हें परम कठीण काम आहे. तरी असेही कांहीं वेंचे आह्मापाशीं आहेत. **सेल्सस्** (मग तो कोणीका असेना ) हा **' खरी गोष्ट '** नामक पुस्तकाचा कर्त्ता असून त्याचा सारांश **आरिजेन्** यानें दिलेला आहे. हा ग्रंथकार **ग्रीक** लोकांच्या अनेकेश्वर मतांस **याहुदी** किंवा **ख्रिस्ती** एकेश्वर मताच्या आक्षेपापासून संरक्षण करतो. तो ह्मणतो:— ' यहुदी लोक आकाश व आकाशवासी देवांस मान देतात. परंतु ते उंच आकाशांतील सर्वांहून थोर व सर्वांहून प्रौढ अशा सृष्टिचमत्कारांस मान देत नाहींत. ते अंधकाराच्या छायेची व स्वप्नांतील मिथ्या भासांचा आराधना करतात. परंतु ज्या उपकारी, देदिप्यमान, तेजस्वी, अशा मेघ, विद्युत्, व गर्जना या श्रेयस्कर पदार्थांपासून वर्षांऋतूंत वर्षाव होतो, उन्हाळ्यात ऊष्मा होतो, पृथ्वीवरील फळें व सजीव पदार्थ, उत्पन्न होऊन रक्षण पावतात; ज्यांच्या द्वारें ईश्वर सदा आविर्भूत होत आहे, असे जे देवदूत त्याकडे कांहींच लक्ष देत नाहींत.'

पुरातन, उंच, प्रसंगविशेषीं दयावान्, किंवा भयंकर दुसरें काय आहे?

आपल्या भाषेंत ज्यांस आपण 'अस्थित्वें' (Beings) असें ह्मणतों, त्यांस आपल्या पूर्वजांच्या भाषेंत 'देव'* किंवा 'द्युतिमान् पदार्थ' ह्मणून वर्णिले आहेत, त्यांची आराधना जर मधुप्राप्त्यर्थ, ह्मणजे आनंद, अन्न, व सुख यांच्या प्राप्तीसाठीं केली, तर यांत आपणास कांहीं नवल वाटण्यासारखें नाहीं. कारण, या सर्वांपासून आपलें कल्याण होतें हें आपणही जाणतों.

'दोषापासून किंवा पातकापासून आह्मांस दूर ठेव' अशी जी त्यांनीं प्रथम प्रार्थना केली ती पाहून आह्मांस आश्चर्य वाटतें. हा विचार अर्वाचीन असावा असें स्पष्ट दिसून येतें. ही कल्पना वेदांत आढळते एवढ्यावरून वेदांत जें कांहीं आहे तें सर्व एकाच काळीं लिहिलेलें असावें असें अनुमान करणें बरोबर नाहीं. जर इ० स० पूर्वीं सुमारें १००० वर्षांमागें वेदमंत्र एकत्र केले ही गोष्ट खरी आहे, तर ते एकत्र व्हावयाच्या अगोदर बरेच दिवस विद्यमान असले पाहिजेत, हें स्पष्टच आहे.

वृद्धिंगत होऊन श्रेष्ठत्वास चढण्यास वेदसूक्तांस बराच अवकाश मिळाला होता. खेरीज आपणांस इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं प्रत्येक बुद्धिमंताचे विचार जे या सूक्तांतून दृष्टीस पडतात ते केवळ व्यक्तिविशिष्ट होत. सत्य शोधण्याच्या कामीं साधारण लोकांस जर शंभर वर्षें लागत असलीं तर बुद्धिमंतास थोडींच पुरून त्यांचे यत्न त्वरित सफल होतात.

आपण बरेच पुढें आलों, येथपर्यंत आपण क्रमाक्रमानें आलों— पायरी पायरीनें चढलों. पण आतां अशी कल्पना करूं कीं आपण वेदकवींच्या पुढें उभे आहों, व त्या कवींनीं नदीला 'मा' व आकाशाला 'पिता' हीं नांवें दिलीं, आणि ज्यांनीं स्वकीयपापविमो-

---

* उपनिषदांत देव शब्द शक्तिवाचक किंवा बुद्धिवाचक आहे. इंद्रियांसही जागोजाग 'देव' अशी संज्ञा दिली आहे. तशीच त्यांस पुनः 'प्राण' अशीही संज्ञा दिली आहे, समयविशेषीं 'देवता' शब्दाचाही 'शक्ति' असा अर्थ केला आहे.

चनार्थ व स्वसंरक्षणार्थ नद्या व आकाश यांचीं स्तोत्रें गाइलीं. आतां त्यांस जर आपण असा प्रश्न केला कीं, ‘ नद्या, पर्वत, व आकाश यांस तुह्मीं आपले देव मानीत होतां काय?’ तर ते उत्तर काय देतील ? मला वाटतें कीं, आपला प्रश्न काय आहे हेंच मुळीं त्यांस समजणार नाहीं. कारण, असें विचारणें ह्मणजे आपण लहान मुलांस विचारणें कीं, ‘ मुलांनो ! माणसें, घोडीं, माशा व पाण्यांतले मासे हे प्राणिवर्गांतले पदार्थ आहेत काय? वड, पिंपळ, गुलाब, हीं झाडें वनस्पतिवर्गांतील आहेत काय ?’ त्याप्रमाणें होईल. ते खचीत ‘ नाहीं ’ असें उत्तर देणारच! कारण, अद्यापि त्यांच्या अंगीं इतकी तर्कशक्ति व बुद्धीची प्रौढता आली नाहीं. जे पदार्थ दिसण्यांत अगदीं निरनिराळे दिसतात त्यांत कांहीं प्रकारचा सारखेपणा किंवा एक सामान्य धर्म पाहून त्यांचें वर्गीकरण करणें व त्यांस एकत्र ठेऊं पहाणें या गोष्टीला बुद्धीची बरीच प्रौढदशा लागते. जसजशीं मनुष्यें अर्धस्पृश्य व अस्पृश्य पदार्थांकडे अधिकाधिक वळूं लागलीं, तसतसा देवताविषयक विचार त्यांच्या मनांत अधिकाधिक उत्पन्न होऊं लागला. ज्या दिवसापासून आपल्या एक दोन किंवा अधिक इंद्रियांस स्वेच्छेनुरूप अशी वस्तू शोधून काढण्यांत केलेले आपले सर्व प्रयत्न निष्फळ झाले, त्या दिवसापासून या सर्व अर्धस्पृश्य पदार्थांत गुप्त असणाऱ्या अज्ञात—अस्पृश्य—वस्तूचा शोध सुरू झाला. ज्या पदार्थाचें संपूर्ण ज्ञान होत नाहीं असें वाटलें, ह्मणजे पांचही इंद्रियांस त्या गोष्टीचें ज्ञान होत नाहीं असें समजलें तर, तेवढ्यापुरतें ज्ञान गृहीत धरून चालावें लागे किंवा तें ज्ञान अन्य मार्गानें किंवा अन्यत्र प्राप्त करून घेण्याचा यत्न करावा लागे. याप्रमाणें कांहीं गोष्टींचें ज्ञान दोनच इंद्रियांनीं व्हावें, कांहींचें एकाच इंद्रियानें व्हावें, असा प्रकार होतां होतां कांहीं वस्तूंचें ज्ञान आपल्या इंद्रियांपैकीं कोणत्याही इंद्रियास झालें नाहीं, तथापि अशा प्रकारच्या पदार्थांच्या अस्तित्वाबद्दल किंवा खरेपणाबद्दल त्यांस बिलकूल संशयच येत नसे. एवढेंच नव्हे, तर झाडें, नद्या व पर्वत यांच्याप्रमाणेंच मनुष्यांवर उपकार करणारे ते पदार्थ आहेत, अशी त्यांची समजूत असे. आतां

ज्या क्रमानें आपण अर्धस्पृश्य पदार्थांपासून अस्पृश्य पदार्थांकडे व सृष्ट किंवा लौकिक पदार्थांपासून सृष्ट्यतीत किंवा अलौकिक पदार्थांकडे वळतों तो क्रम कसा व कोणचा याचा अधिक सूक्ष्म विचार करूं: प्रथम अग्नि घेऊं.

## अग्नि.

आतां अग्नि ह्मणजे विस्तव, हा अत्यंत दृश्य आहे, ह्मणजे सर्वांस स्पष्ट दिसणारा पदार्थ आहे. फार काय, स्पृश्य देखील आहे असें वाटतें. आणि वस्तुत: हें वाटणें खरें आहे. पण क्षणभर हल्लीं आपली अग्नीविषयीं जी कल्पना आहे ती विसरून पृथ्वीवरील प्राचीन मनुष्यांची कल्पना त्याजविषयीं कशी असे याचा विचार आपणांस केला पाहिजे. विस्तव पेटविण्याची युक्ति मनुष्याच्या ध्यानांत येण्याच्या अगोदर भाषारचना व विचार या दोन गोष्टी संपादन करण्यास मनुष्य लागला असेल असा संभव आहे. आणि अशा अज्ञान अवस्थेंत त्यानें बराच काळ घालविला असेल, व विस्तव पेटविण्याची युक्ति साधल्यानंतर मनुष्याच्या आयुष्यक्रमांत मोठाच फेरफार होऊन गेला असेल. अग्नि प्रज्वलित करण्याची ही युक्ति समजण्यापूर्वीं त्याणें विद्युल्लतेचा प्रकाश पाहिला असेल, सूर्याचें तेज व उष्णता त्यांस पक्कीं माहीत झालीं असतील, विजेनें किंवा उन्हाळ्यांत झाडांच्या घर्षणानें अरण्यास आग लागून तीं भयंकर रीतीनें नाश पावत आहेत हें पाहून त्यांस विलक्षण आश्चर्य व भीति वाटली असेल. हे चमत्कार कांहीं वेळ दिसतात व पुन्हा नाहींसे होतात असें पाहून त्याचें मन अगदीं गांगरून गेलें असेल. एका क्षणांत या ठिकाणीं पाहतो तों अग्नि मारून भडकला आहे, तोच दुसऱ्या क्षणांत पहावें तों विझून गेला आहे! तो आला कोठून व गेला कोठें? ज्यास आपण हल्लीं भूत किंवा पिशाच असें ह्मणतों, तें पूर्वीं या जगतांत कधीं जर असलें तर प्राचीनकाळीं असेल; कारण, त्या वेळेस अग्नीच भुतासारखा लोकांस भासत असे! हा अग्नि ढगांतून तर येत नसेलना? समुद्रांत जाऊन

गुप्त तर होत नसेलना? तो सूर्यमंडळांत तर रहात नसेलना? नक्षत्रगणांतून तर तो येत नसेलना? असले हे प्रश्न हल्लीं आपणांस अगदीं पोरकट वाटतील खरे. परंतु अग्नीला वश करून घेण्याच्या पूर्वी असे विचार मनुष्याच्या मनांत येणें हें सहज आहे. घर्षणानें अग्नि उत्पन्न करण्याची युक्ति लोकांस ठाऊक झाल्यानंतरही कार्यकारणभाव त्यांस कळून आला नाहीं. ज्यास आपण प्रकाश व उष्णता ह्मणतों, ते दोन्ही धर्म त्यांच्या नजरेस एकदम पडत हें पाहून त्यांस मोठा चमत्कार वाटे. हल्लीं सुद्धां जशीं मुलें विस्तव किंवा जाळ पाहून कितीही त्यांचें निवारण केलें तरी विस्तवाशीं मोठ्या हौसेनें खेळूं पाहतात, त्याचप्रमाणें प्राचीन मनुष्यांची स्थिति होती. आणि अशा प्रकारें जेव्हां ते अग्निविषयीं बोलण्याचा किंवा कल्पना करण्याचा यत्न करूं लागले असतील, तेव्हां त्यांणीं काय काय केलें असावें? अग्निपासून जें जें कांहीं घडे, ह्मणजे अग्नीचीं जीं जीं कार्यें त्यांच्या नजरेस पडत त्यांवरून त्यांनीं तसतशीं त्यास नांवें दिलीं. अर्थात त्यांनीं त्यास तेव्हां 'प्रकाश देणारा' किंवा 'जाळणारा' असें ह्मटलें त्याचें कारण, विद्युत्ज्योतींत जाळण्याचा गुण किंवा सूर्याच्या अंगीं जो प्रकाश देण्याचा गुण आहे तोही अग्नि आहे, असें त्यांस वाटे. त्याचा शीघ्र वेग, त्याचें अकस्मात् प्रकट होणें व क्षणांत अंतर्धान पावणें, हे प्रकार पाहून मनुष्यास आश्चर्य वाटत असे. आणि यावरूनच त्यास 'वेगवान्' किंवा 'चपळ', संस्कृतांत 'अग्नि' व ल्याटीन् भाषेंत त्याच अर्थाचें 'इग्निस्' हें नांव मिळालें.

अग्निविषयीं अनेक गोष्टी सांगतात. तो लांकडाच्या दोन तुकड्यांपासून पुत्राप्रमाणें उत्पन्न होतो. जन्मास आल्याबरोबर आपल्या मातापितरांस, ह्मणजे ज्या दोन तुकड्यांपासून तो उत्पन्न झाला असेल त्या काष्ठासच तो भक्षितो! उदकाचा स्पर्श होतांच शांत किंवा गुप्त होतो. या पृथ्वीवर मित्राप्रमाणें तो असतो. संपूर्ण अरण्याचीं अरण्यें जाळून टाकून नाहींशीं करितो. पृथ्वीवर त्यास अर्पण केलेलीं हवनद्रव्यें तो पूर्वी पृथ्वीपासून स्वर्गाप्रत नेऊन पोंचवीत असे व देव आणि मनुष्यें

या उभयतांमध्यें दूताप्रमाणें किंवा मध्यस्थाप्रमाणें वागत असे. अशा या गोष्टी ऐकल्या ह्मणजे आर्यलोकांनीं अग्नीस जीं अनेक नांवें व विशेषणें दिलीं आहेत व अग्निविषयींच्या ज्या अतिप्राचीन व पौराणिक आख्यायिका किंवा गोष्टी आढळतात त्यांत आपणांस मोठेंसें आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं, असें ह्मणावें लागतें. सर्वांत प्राचीन अशी एक अग्निविषयक दंतकथा आहे ती ही कीं, अग्निमध्यें अदृश्य व अज्ञात–जो आपणांस मान्य करावाच लागतो–असा कांहीं अंश आहे. ह्मणजे, अग्नि साक्षात् ईश्वरस्वरूपच आहे, अशाप्रकारचा जो भावार्थ पुरातन कथांमध्यें आपल्या दृष्टीस पडतो त्यांत विचार करून पाहतां आपणांस नवल वाटण्यासारखें कांहीं दिसत नाहीं.

## सूर्य.

अग्नीनंतर सूर्य येतो. यास कांहीं ठिकाणीं अग्निस्वरूपच मानिलें आहे. त्यास जाणणें हें इतर सर्व इंद्रियांच्या शक्तिबाहेर असून केवळ नेत्रेंद्रियासच तो गोचर होतो; यामुळेंच तो इतर पदार्थांहून अगदीं निराळा असा भासतो. या पृथ्वीवर वास करणाऱ्या अगदीं पूर्वींच्या लोकांस सूर्य दृष्टीस पडतांच त्यांच्या मनांत काय काय विचार सुचले असतील याचें पूर्ण ज्ञान होण्याची शक्ति आपल्या अंगीं कधींच येणार नाहीं. टिंडॉल् ह्मणून एक इंग्रजी पदार्थशास्त्रज्ञ आहेत, त्यांनीं सूर्याचें वर्णन अगदीं नूतन शोधांच्या आधारानें मोठ्या चित्तवेधक शब्दांनीं केलें आहे. त्यांत आपण जीवजन्तु सूर्यप्रभावानें वांचतों कसे, हिंडतों फिरतों कसे, त्याच्यामुळें आपलें जीवन होत आहे कसें, त्याच्या दाहकशक्तीचा संसारांत आपणांस किती उपयोग होतो, फार काय–त्याजवर आपले श्वासोच्छ्वास कसे अवलंबून आहेत, सर्वथा आपली उपजीविका त्याच्याचमुळें कशी होते, इत्यादि प्रकार वर्णिला आहे. हें सर्व खरें आहे. तथापि हा एखाद्या मौन पांथस्थाप्रमाणें मुकाट्यानें आकाशपर्यटन करणारा महाप्रतापशाली राजा –हा संध्याकाळीं मरणोन्मुख होणारा वीर व आपणांस सोडून जाणारा मित्र–जो सूर्य, त्याच्याविषयीं आणि त्याच्या दैनंदिन व वार्षिक अशा

द्विविध गतींविषयीं, पूर्वकालीन मानवजातीची अगदीं प्रथमारंभीं काय कल्पना असेल ती आपणांस टिंडॉल् साहेबांच्या सुंदर वर्णनानें देखील समजणार नाहीं. सूर्याच्या प्रथमदर्शनेंकरून त्या लोकांच्या मनांत काय विचार आले असतील याची आपणांस कल्पना होणें खरोखर अशक्य दिसतें. कांहीं लोक मोठ्या आश्चर्यानें असा प्रश्न करितात कीं, अहो, ज्या प्राचीन पुराणोक्त इतिहासांतून आर्यलोकांच्या नित्य संवादांचा व नित्य क्रमांचा उल्लेख आहे, तो सर्व इतिहास सूर्यपरच कां असावा? मी ह्मणतों, सूर्यपर नसावा, ह्मणजे सूर्याला उद्देशून नसावा, तर असावा तरी कोणाला उद्देशून? सूर्याचीं नांवें जशीं अनन्त, तशाच त्याच्या कथाही अनंत आहेत. पण सूर्य हा आहे कोण, येतो कोठून व जातो कोठें, हें आरंभापासून अखेरपर्यंत एक मोठें गूढच बनून राहिलें होतें हें लक्षांत आणा. जरी इतर पदार्थांपेक्षां सूर्य हा विशेष परिमित किंवा ज्ञानगम्य पदार्थ असे, तरी त्याच्यांत कांहीं अज्ञात अथवा गुप्त असा भाग राहिलाच होता. जसा एखादा मनुष्य दुसऱ्याच्या डोळ्यांकडे पाहून त्याच्या गुप्त विचारांची अटकळ करण्याचा व त्याच्या हृदयांतील इंगित जाणण्याचा यत्न करितो व शेवटीं त्याचें अंतःकरण—त्याचा अंतरात्मा—खास आपल्या हातांत आला आहे अशी मोठी आशा बाळगितो, तथापि ती गोष्ट त्याच्या हातून घडत नाहीं—त्याचें अंतःकरण त्यास दिसत नाहीं—त्याच्या अंतरात्म्यास त्याला स्पर्श करितां येत नाहीं, असें होतें; पण त्याच्या अस्तित्वाविषयीं कधींही त्याच्या मनांत संशय येत नाहीं. फार तर काय, त्यास तो पूज्य मानितो व त्याजवर प्रेम ठेवितो. त्याचप्रमाणें वेदकाळीं मनुष्य आभाळांत उंच सूर्याकडे पाही तेव्हां त्याला वाटे कीं, हा आपल्याशीं बोलेल, आपल्या प्रश्नास उत्तर देईल! सूर्य बोलत चालत नाहीं, उत्तर देत नाहीं व उलटा त्याजकडे पहाणाराचे डोळे दिपवून टाकितो व दृष्टीस अंधत्व आणितो, असें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटे. तथापि सूर्याचे अंगीं अदृश्य असें कांहीं तरी आहे, याविषयीं त्याच्या मनांत संशय देखील येत नसे. जरी सूर्याचें ज्ञान करून घेण्यास त्याच्या इंद्रियांनीं केलेले यत्न निष्फळ होत, जरी सूर्य असा स्तब्ध कां राहतो याचें कारण त्याला समजत नसे,

हें आहे तरी काय याची कल्पनाच त्याला होत नसे, तरी देखील मनुष्य डोळे झांकून त्यावर विश्वास ठेवी व साष्टांग प्रणिपात करून त्याची पूजा करी. असें सांगतात कीं, आर्यावर्तांतील सांथल नांवाचे फार निकृष्ट जातीचे रानटी लोक आहेत ते सूर्यपूजक आहेत. ते सूर्यास ' चंदो ' ह्मणजे देदीप्यमान, असें ह्मणतात. त्यांच्या भाषेंत हें नांव चंद्रासही लावतात. या सांथल लोकांत कांहीं ख्रिस्ती धर्मोपदेशक जाऊन राहिले होते. त्यांस तेथील लोकांनीं असें सांगितलें कीं हें जगत् ' चंदोनें ' उत्पन्न केलें आहे. मिशनरी लोक जेव्हां त्यांची समजूत घालूं लागले कीं, ' चंदोनें ' जगत् उत्पन्न केलें हें तुमचें ह्मणणें अगदीं मूर्खपणाचें आहे, तेव्हां त्या सांथल लोकांनीं त्यांस प्रत्युत्तर दिलें कीं 'साहेब ! आह्मी ज्या चंदोबद्दल बोलतों तो दृश्य नाहीं, तर तो आमचा चंदो अदृश्य आहे !'

## उषा.

अगदीं प्राचीनकाळीं, प्रभातसमयीं उगवणारा सूर्य किंवा पहांट व अस्तास जाणारा सूर्य, या दोन्ही सृष्टिचमत्कारांस ' उषा ' असें ह्मणत. पण कांहीं काळानंतर हे दोन प्रकार भिन्न झाले, व असें होतां होतां पुढें अनेक गोष्टींचा व पौराणिक कथांचा संग्रह होत गेला. प्रभातसमय व संध्यासमय या युग्माबरोबरच थोड्या काळांत दिवस व रात्र यांचें युग्म आणि त्यांचे वेगळाले दोन प्रतिनिधि, संस्कृतांत ज्यांस ' अश्विनी कुमार ' असें ह्मणतात ते व तसेंच 'द्यावापृथ्वी' व त्यांचा अनेक परिवार, हे आले. सारांश, आपण आतां ज्या ठिकाणीं प्राचीन कथा व धर्म यांची अगदीं गर्दी होऊन राहिली आहे, अशा स्थळाप्रत येऊन पोहोंचलों आहों !

## वैदिक देवतांपैकीं श्राव्य पदार्थ; ह्मणजे ज्यांचें ज्ञान कर्णेंद्रियानें मात्र होतें असे पदार्थ.

येथपर्यंत आपण ज्या ज्या अस्पृश्य पदार्थांविषयीं विचार केला ते सर्व पदार्थ आपल्याजवळ असणारे होते. ह्मणजे, त्यांचें व आपलें सा-

त्रिध्य असून नेत्रेंद्रियानें त्यांची प्रतीति करतां येत होती. केवळ आपल्या श्रवणेंद्रियालाच गम्य व इतर सर्व इंद्रियांना अगम्य असे जे पदार्थ, त्यांजविषयीं आतां आपणांस विचार करणें आहे.

### मेघगर्जना.

मेघध्वनि आपणांस ऐकूं येतो तरी तो डोळ्यांनीं दिसत नाहीं, हातांनीं त्याला स्पर्श करितां येत नाहीं, त्याचा वास घेतां येत नाहीं किंवा जिव्हेनें त्याची रुचि कळत नाहीं. अशा या स्वयंभू, अपुरुष-जन्य ध्वनीची कल्पना आपणांस करितां येते. पण त्याची एतत्प्रकारक कल्पना प्राचीन आर्यांस करतां येत नव्हती. जेव्हां त्यांच्या कानीं मेघध्वनि पडे, तेव्हां ज्याप्रमाणें अरण्यांतून गर्जना ऐकूं आली ह्मणजे तो कोणी तरी गर्जना करणारा अथवा सिंह किंवा दुसरा कोणी एकादा प्राणी असावा, अशी कल्पना ते करीत; तशीच मेघध्वनि करणाऱ्याविषयींही त्यांची अशीच कांहीं विलक्षण कल्पना असे. आकार-शून्य, अपौरुष अशा ध्वनीची कल्पना त्यांस होतच नसे. तेव्हां 'गर्जना करणारा' किंवा 'ओरडणारा' हें नांव अदृश्य अशा कोणा व्यक्तीस किंवा पुरुषास दिलें असून तो पुरुष त्यांस दिसत नसतांहि ज्याच्या अस्तित्वाबद्दल किंवा ज्याच्या बरेंवाईट करण्याच्या सामर्थ्याबद्दल त्यांच्या मनांत संशयच येत नसे. अशाप्रकारच्या नांवाचें हें उदाहरण येथें आपणांस प्रथमतःच आढळलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

१ **झेनोफॉन्** या नांवाच्या एका **ग्रीक** इतिहासकाराचा आशय खालीं लिहिल्याप्रमाणें आहे :— 'सूर्य सर्वांस दृश्य आहे, असें वाटतें मात्र. पण तो आपल्याकडे मनुष्यास पाहूं देत नाहीं. जर कोणी त्याच्याकडे टक लाऊन पाहूं लागला, तर तो त्याच्या दृष्टीस अंधत्व आणतो. तुह्मांला माहीत असेलच कीं, देवांनीं पाठविलेल्या विभूती अदृश्य असतात. कारण, हें सर्वांस मशहूर आहे कीं विद्युल्लता वरून येते व मार्गांत कांहीं आडवें आलें, तरी त्यांतून पार निघून जाते. परंतु ती जाते, येते, कोणावर पडते हें कांहींच समजत नाहीं. तसाच वायुही दिसत नाहीं. तरी वायूपासून काय काय चमत्कार होतात तें आपणा सर्वांस चांगलें माहीत आहे व तो वायु आपल्या जवळ येत आहे असें आपणास कधीं कधीं स्पष्ट कळतें.'

वेदांत गर्जना करणाऱ्यास रुद्र ह्मणत. एकदां असें नांव पड-ल्यानंतर 'रुद्र' किंवा 'ध्वनि करणारा,' 'वज्रधारी', 'धनुष्य व बाण घेऊन फिरणारा', 'पापीजनांचा संहार करणारा', 'पुण्यवंतांचा संरक्षणकर्ता', 'अंधार पडल्यावर प्रकाश देणारा', 'पृथ्वी तप्त झाल्यानंतर तिला थंडगार करून सोडणारा', 'रोगानंतर आरोग्य देणारा', अशा प्रकारचीं विशेषणें कां दिलीं हें आपणांस चांगलें समजतें. तात्पर्य काय कीं, झाडास एकदां नवे अंकूर फुटूं लागले ह्मणजे मग त्याच्या फांद्या हव्या तितक्या जोरानें वाढूं लागल्या तरी त्या पाहून आपणांस आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

## वायु.

मुख्यत्वेंकरून आपल्यास ज्याचें ज्ञान त्वगिंद्रियानें होतें व कधीं कधीं कर्णेंद्रियाच्या साहाय्यानें व कधीं कांहीं अन्य प्रकारानें नेत्रेंद्रियास होतें असा दुसरा स्पृश्य पदार्थ वायु होय. हल्लीं 'फुंकणारा' व 'फुंक' यांमध्यें जसा आपण भेद मानितों तसा हा वायुसंबंधीं भेद प्राचीन विचारांत व भाषेंत नव्हता. त्यांच्या दृष्टीनें दोन्ही एकच. आपण जशीं माणसें आहों तशाचपैकीं वायु हा एक आहे असें त्यांस वाटे. वेदांत वायूची स्तुति निराळी आहे, आणि वाताची स्तुति निराळी आहे. वायु ह्मणजे 'फुंकणारा' व वात ह्मणजे 'फुंक' किंवा 'वाऱ्याचा सोसाटा'. जरी वायूची स्तुति पुष्कळ ठिकाणीं आढळत नाहीं, तरी जेथें जेथें ती आहे तेथें तेथें वायूला मोठें उच्च स्थान दिलें आहे व त्याचा बहुत गुणानुवाद केला आहे. 'सर्व सृष्टीचा राजा, प्रथम उत्पन्न झालेला, देवांचा श्वास, जगदुत्पत्तीचें बीज किंवा जगत्कारण, ज्याचे शब्द आपणांस ऐकूं येतात परंतु जो प्रत्यक्ष कधींही आपल्या दृष्टीस पडत नाहीं', अशा प्रकारचें त्याचें वर्णन केलें आहे.

## मरुद्देव ( वादळें ).

वायु खेरीज दुसरे देव आहेत त्यांस वेदांत 'मरुत्' ह्मणजे 'चूर्ण करणारे' किंवा 'ठोकणारे,' 'हणणारे' देव, अशा अर्थाची संज्ञा

दिली आहे. हे 'मरुत्' देव वेड लागलेल्या किंवा पिसाळलेल्या माणसां-सारखे विजेला घेऊन गडगडत धूळ उडवीत येतात, त्या वेळेस ते मोठमोठीं झाडें लववून मोडून टाकतात, गृहादिकांचा नाश करितात, मनुष्यांचे व पशूंचे प्राण घेतात, पर्वतांचें विदारण करून पाषाणांचे तुकडे तुकडे करितात, अशी अगदीं गर्दी करून सोडतात. येतात व जातात, परंतु कोणाच्यानेंही त्यांस धरववत नाहीं, व ते कोठून आले व कोठें गेले हें सुद्धां कोणाच्यानें सांगवत नाहीं! असें असूनही या वायु देवाच्या अस्तित्वाविषयीं कोणी संशय घेईल काय? त्यांच्यापुढें नम्र होऊन त्यांस कोण नमस्कार करणार नाहीं? किंवा चांगल्या शब्दांनीं, चांगल्या विचारांनीं व चांगल्या कृत्यांनीं कोण त्यास प्रसन्न करून घेणार नाहीं? 'हे देव आपलें चूर्ण करून टाकतील, पण आपल्या हातून बरीक त्यांचें कांहीं वांकडें होणार नाहीं!' अशा प्रकारच्या उद्गारांतही धर्मतत्वाचा बराच अंश दिसतो. श्लियरमेकर्* यांचा जो सिद्धांत आहे कीं 'आपण सर्वथा कोणा एकावर अवलंबून आहों, तो जरी आपणांस जाणतो तरी आपण त्यास जाणत नाहीं.' शार्मण्य पंडिताच्या या आधुनिक सिद्धांतांतील प्रमेयापेक्षां वर सांगि-तलेल्या वाक्याचा आशय बहुत लोकांस सुगम वाटेल यांत संशय नाहीं. तर मग जी एक दुसरी प्राचीन कथा आहे कीं, जसा अग्नींत तसा वायूंतही कांहीं अदृश्य, अज्ञात, तथापि जो आपणांस नाहीं ह्मणतां येत नाहीं, असा कांहीं अंश आहे—ह्मणजे साक्षात् ईश्वरस्वरूपच आहे—या कथेंत आश्चर्य मानण्यासारिखें कांहीं आहे काय?

## वृष्टि व वृष्टि करणारा.

शेवटीं आतां आपणांस पर्जन्याचा विचार केला पाहिजे. अस्पृश्य पदार्थांच्या वर्गांत याची योजना क्वचितच करितां येईल. खरोखर वृष्टि ह्मणजे पाणी अशी कल्पना केली व नांवही तदनुरूप दिलें, तर

---

* एक प्रख्यात जर्मन् धर्मवेत्ता व भाषाशास्त्रज्ञ.

स्पृश्य ही संज्ञा वृष्टि किंवा पर्जन्य या पदार्थाला सर्वथा शोभते. पण प्राचीन विचारांची प्रवृत्ति, पदार्थांचें साम्य शोधून काढण्यापेक्षां भिन्नत्व शोधून काढण्याकडेच विशेष होती असें दिसतें. प्राचीन काळच्या मनुष्याच्या मनांत पर्जन्य ह्मणजे केवळ पाणी असा अर्थ येत नव्हता; तर जें येतें कोठून याचें ज्ञान अद्यापि त्यास झालें नाहीं, ज्या पाण्याचा फार दिवस अभाव झाला असतां वनस्पति, प्राणी व मनुष्यें मरून जातात व जें पडलें असतां सृष्टीभर आनंदच आनंद करून सोडतें, असा ज्या पाण्याचा अनुभव त्यास येई त्या पाण्यास तो पर्जन्य असें ह्मणे. कांहीं देशांत तर गर्जना करणाऱ्यास ( रुद्रास ) किंवा फुंकणाऱ्या ( वायू ) सच पर्जन्यदाता असें ह्मणत. परंतु अन्यत्र ह्मणजे जेथें पर्जन्याच्या वार्षिक वृष्टीवर मनुष्याचें जगणें किंवा मरणें अवलंबून असतें, त्या ठिकाणीं गर्जना करणारा ( रुद्र ) व फुंकणारा ( वायु ) या दोघांच्या बरोबर 'वृष्टि देणारा,' ह्मणजे सिंचन करणारा, एक तिसरा उत्पन्न झाला. या गोष्टींत आपणांस आश्चर्य वाटण्याजोगें काय आहे? संस्कृतांत पर्जन्यबिंदूस 'इंदु' (इंद्–उ) अशी संज्ञा आहे व तो शब्द पुल्लिंगी आहे. जो कोणी ते बिंदु पाडतो त्यास 'इंद्–र'=वृष्टि देणारा, सिंचन करणारा, असें ह्मणतात. इंद्र ही संज्ञा वेदांतील मुख्य देवतेस आहे. आर्यावर्तांत किंवा सप्त सिंधु ह्मणजे सात नद्या ज्या देशांतून वाहात आहेत त्या देशांत, येऊन राहिलेले प्राचीन आर्यलोक मुख्यत्वें या इंद्रदेवतेची पूजा करणारे होते.

## वेदांतील देवमंडळ.

ज्याच्या ठिकाणीं प्रथमतः उजेड दिसतो व ज्याच्यापासून या जगतास प्रकाश मिळतो असें जें आकाश, त्याला त्याच्या प्रकाशकत्वामुळें 'द्यौः' किंवा 'झ्यूस्' किंवा 'ज्युपितर' अशी संज्ञा प्राप्त झाली, हें आपणांस समजलें. पुढें असेंही समजलें कीं मेघगर्जना, पर्जन्य व वादळ इत्यादि जे आकाशांतील बहुविध चमत्कार, त्यांस अनेक

देवांचें स्वरूप प्राप्त झालें व त्यांनीं 'द्यौ' देवाला मागें सारून त्याची जागा आपण बळकाविली. या देवांखेरीज आकाशाच्या ठाईं सर्व जगतास आच्छादून त्याचें संरक्षण करण्याची जी शक्ति, तिच्या योगानें आकाशाचा केवळ आकाशपणा जाऊन आर्यजनांस असें वाटूं लागलें कीं आकाशही सर्वव्यापी व सर्वांस आच्छादून टाकणारा एक देवच आहे. 'आच्छादक देव' या कल्पनेपासून सहजच 'रात्रीचा देव' ही कल्पना सुचली. तेव्हां त्या 'आच्छादक देवाचें' रूपांतर होऊन जो एक 'रात्रीचा देव' बनला तो अर्थात् 'दिवसाच्या देवाहून' निराळा राहिला. याचप्रमाणें रात्र व दिवस, सायंकाल व प्रात:काल, आकाश व पृथ्वी, असे निरनिराळे संबंध दर्शविणाऱ्या देवांची कल्पना सिद्ध झाली. या अनेक रूपांतरांपैकीं प्रत्येक प्रकार वेदांत आपल्या दृष्टीस पडतो. या रूपांतरांपासूनच पुढें देवांचीं युग्में उत्पन्न झालीं. उदाहरण, वरुण ह्मणजे सर्वव्यापी किंवा सर्वांस झांकणारा देव. त्यास ग्रीक भाषेंत युरेनॉस् ह्मणतात. मित्र ह्मणजे दिवसाचा प्रकाशमान् सूर्य; अश्विनौ, प्रात:काल व सायंकाल; द्यावा–पृथिवी=आकाश व पृथ्वी, इत्यादि.

याप्रमाणें वेदकवींचें बहुतेक सारें देवमंडळ, ह्मणजे अर्थात् पृथ्वीवरील एकंदर प्राचीन आर्यप्रजेचा देवसमूह, वेदाचें पर्यालोचन करीत असतां आपल्या डोळ्यांसमोर येऊन जणों मूर्तिमंत उभा आहे असें वाटतें. आपण हीं तर केवळ मुळें पाहिलीं, पण या मुळांवर काव्यरूप किरणें पडलीं व त्यांस तत्वविज्ञानरूप उष्णता लागली तर तीं किती जोरानें वाढत जातील व त्यांचा केवढा प्रचण्ड वृक्ष बनेल याचा आपणांस सहज तर्क करतां येईल. देवता व देव यांचे तीनच वर्ग आपणांस ठाऊक आहेत. मी देवता किंवा देव ( Gods ) हा शब्द योजितों याचें कारण हें कीं, मला यापेक्षां दुसरा चांगला शब्द आठवतच नाहीं. सत्वें ( Beings ), गुण ( Powers ), शक्ति ( Forces ), जीव (Spirits), यांपैकीं एकही शब्द मला पसंत पडत नाहीं. कारण हे सर्व शब्द अत्यंत भाववाचक आहेत. हे तीन वर्ग येणेंप्रमाणें:—

( १ ) अर्धदेवता=(वृक्ष, पर्वत, नद्या, पृथ्वी व समुद्र)=(अर्धस्पृश्य पदार्थ).

( २ ) देवता=आकाश, सूर्य, चंद्र, अरुणोदय, अग्नि. ( अर्धस्पृश्य पदार्थ ). तसेच गर्जना, विद्युत्, वायु व वृष्टि. कदाचित् या शेवटल्या चार पदार्थांचा त्यांच्या अनियमित स्वरूपावरून व त्यांच्या अंगीं विशेषतः चांचल्यादि अत्यंत क्रियाशक्तिदर्शक जे गुण दिसतात त्यांवरून एक निराळाच वर्ग करितां येईल.

## देव.

या सर्व पदार्थांस 'देव' हा संस्कृत शब्द सर्वांत उत्तम दिसतो तोच कायम ठेवावा. याला इंग्रजींत शब्दच नाहीं असें माझें मत आहे. ' देव ' शब्दाचा प्राचीन अर्थ ' प्रकाशणारा ' असा होई, हें मी मागें सांगितलेंच आहे. हा शब्द आकाश, अग्नि, अरुणोदय, सूर्य, नद्या, वृक्ष, पर्वत, या स्थूळ पदार्थांस लावीत. याप्रमाणें हा शब्द एक सामान्यनाम बनून राहिला. वेदांत इतका प्राचीन मंत्रच आढळत नाहीं कीं त्यांत ' देव ' या शब्दाचा मूळ अर्थ=' चकचकीत आकाशांतील पदार्थ ' हा दिसून येतो.

रात्रींच्या व हेमंतऋतूच्या अंधारमय व तमोगुणविशिष्ट शक्तिविरुद्ध वर्तणारे जे आकाशवासी दैदिप्यमान पदार्थ त्यांविषयींची सामान्य कल्पना ' देव ' या शब्दानें ध्वनित होई. या शब्दाच्या मूळ अर्थाचा विसर पडल्यामुळें पुढें ' देव ' हा शब्द आकाशांतील तेजोमय शक्तीचें केवळ एक साधारण नांव होऊन राहिला, व हाच आशय ल्याटिन् ' डेयुस् ' व इंग्रजी ' डीइटी ' ( Deity ) शब्दांतही दिसून येतो. वेदांतील ' देव ' हा शब्द व प्रस्तुतचा इंग्रजींतील 'डिव्हिनिटी' (ईश्वर) हा शब्द या दोहोंत केवळ ध्वनिसातत्य आहे, एवढेंच नव्हे, तर विचारसातत्य किंवा अर्थसंबंधही आहे.

## दृश्य व अदृश्य.

मी जें तुह्मांस सांगणार होतों तें हें कीं, आर्यांच्या धर्मविषयक कल्पनेचा प्रवाह दृश्य पदार्थांपासून निघून शेवटीं अदृश्य पदार्थांपर्यंत किंवा ' देव ' ह्मणजे चकचकीत पदार्थांपर्यंत पोंचला.

स्पृश्य अशा नद्या, श्राव्य अशी मेघगर्जना व दृश्य असा सूर्य अशा पदार्थांपासून निघून अस्पृश्य, अश्राव्य व अदृश्य असे जे 'देव' त्यांच्या-पर्यंत तो प्रवाह येऊन पोंचला.

आपल्या पूर्वजांचें लक्ष प्रथमतः इंद्रियगम्य वस्तूंच्या वर्गाकडे गेलें एवढी गोष्ट संस्कृत 'देव' किंवा लॅटिन् 'देयुस्' या शब्दांवरून स्पष्ट दिसून येते. सृष्टीनें स्वतांच जी वाट त्यांस दाखविली त्याच वाटेनें ते गेले. किंवा सृष्टी ही जर स्वतां एक वेषधारी देवीच असली, तर तिच्याहूनही ज्याचा अधिकार व शक्तीनें जो श्रेष्ठ त्या सृष्टिविनायकानेंच त्यांस मार्ग दाखविला, असें ह्मटलें पाहिजे. याच जुन्या मार्गानें हल्लीं आपणही जात आहों. आपणही ज्ञातावरून अज्ञाताप्रत जातों. ह्मणजे आपणांस जें ठाऊक असतें त्यावरून ठाऊक नसणाऱ्या गोष्टींची कल्पना करितों. प्राचीन आर्य लोकांनींही असेंच केलें व ते सृष्टीपासून सृष्टिकर्त्याप्रत गेले. ह्मणजे, जें दृश्य व ज्ञेय त्यावरून जें अदृश्य व अज्ञेय त्याविषयीं त्यांनीं अनुमान केलें.

पण तुह्मीं ह्मणाल कीं 'ही वाट भलत्याच ठिकाणीं आपणांस नेऊन सोडील. प्रथम आपणांस अनेकेश्वर व एकेश्वर मताकडे घेऊन जाऊन शेवटीं, जर आपण सत्यनिष्ठतेनें अखेरपर्यंत राहिलों, तर आप-णांसही ती वाट नास्तिक मताकडे घेऊन जाईल. मनुष्यास कर्ता किंवा निर्मिता अशा संबंधानें बोलण्याचा बिलकूल अधिकार नाहीं. त्यास कार्य व घडून येत असलेल्या गोष्टी यांजबद्दल मात्र बोलण्याचा अधिकार आहे.' मी ह्मणतों, हें खरें आहे कीं त्या मार्गानें वैदिक आर्यांस प्रथम अनेकेश्वर, मग एकेश्वर, व शेवटीं नास्तिक मताकडे नेलें. परंतु प्राचीन देव किंवा देवता यांजवरची त्यांची श्रद्धा उडा-ल्यावर त्यांहूनही अति श्रेष्ठ जो जगदात्मा, ज्याचें सत्स्वरूप प्रत्येका-च्या अंतरात्म्यांत आहे, तो जोंपर्यंत त्यांस उपलब्ध झाला नाहीं ताव-त्कालपर्यंत ते उगीच मुकाट्यानें बसले नाहींत. या संबंधानें आपली-ही स्थिति प्राचीन आर्यांच्या स्थितिपासून फारशी भिन्न नाहीं. आप-णही जेव्हां एखादें कार्य पहातों, तेव्हां कार्य करणारा कोणी कर्ता

मानतोंच. एखादी घडलेली गोष्ट पाहून ती गोष्ट ज्यानें घडवून आणिली त्याचें अनुमान आपणही करतों. हा कर्ता व हा घडविणारा जो कोणी आपण मानतों, तो काढून टाका, ह्मणजे लागलाच प्रत्यक्ष घडून आलेल्या खऱ्या गोष्टींतही खरेपणा राहणार नाहीं व कार्यांत कार्यपणा राहणार नाहीं. आपली समग्र भाषा,—ह्मणजे आपले सर्व विचार—व आपलें जीवित या सिद्धांतावर, किंवा कल्पनेवर अवलंबून आहे. तो कर्ता, भोक्ता, ज्ञाता काढून टाका—कीं लागलेच आपल्या इष्टमित्रांचे डोळ्यांतील जें तेज किंवा जी चित्शक्ति ती नाहींशी होईल; नेत्र केवळ कांचमय बनतील, त्यांतील खरें तेज नष्ट होईल. तो कर्तेपणा काढून टाकला कीं, लागलेच आपणही स्वयमेव अंतर्धान पावूं. आमचे आह्मींच झटकर नाहींसे होऊं. आमचा आत्मा नाहींसा होईल. कारण आपण ह्मणजे कोणीच नसून केवळ कार्य बनून राहूं. कर्तृत्वशक्तीवांचून जशीं यंत्रें व आत्म्यावांचून जसे प्राणी तशी गत आपली होणार. छेः! असें नव्हे. तर तो जुना मार्ग, ज्यानें आर्यलोक दृश्यापासून अदृश्याकडे व सान्तापासून अनंताकडे गेले तो मार्ग फार लांबणीचा असून त्याची चढण फार कठीण खरी; पण तो मार्ग खरा होता व जरी त्या मार्गानें, आपण जोंपर्यंत या पृथ्वीतलावर वास करीत आहों तोंपर्यंत थेटच्या मुक्कामाला खास पोंचणार नाहीं असें आहे, तरीही आपण त्यावर आपला सर्व भरंवसा व सर्वथा आपली शिस्त ठेवावी हें बरें, कारण कीं दुसरा मार्गच नाहीं,—दुसरें गत्यंतरच नाहीं. आपण पडलों अनन्यगतिक. मजल दरमजल करून मनुष्यजाति आजपर्यंत याच मार्गानें पुढें गेली आहे. जसजसे आपण वर चढत जातों तसतशी ही पृथ्वी लहान लहान दिसूं लागते व स्वर्ग जवळ जवळ येत आहे असें वाटतें. एकेक नवें नवें क्षितिज दृष्टीस पडल्यानें आपली नजर फांकत जाते, आपली दृष्टी विस्तृत होते, आपलें हृदय उन्नत होत जातें व आपल्या शब्दांतील अर्थगांभीर्य वाढत जातें. प्रस्तुतस्थळीं माझ्या एका परमप्रिय मित्राचे शब्द मला आठवतात. त्या माझ्या मित्राची मधुरवाणी थोड्याच दिवसांपूर्वी 'वेस्टमिंस्टर् एबे'

च्या दिवाणखान्यांत ऐकूं येत असे. त्याची हुबेहूब तसबीर त्याच्या दुसऱ्या एका मित्रानें अत्यन्त प्रेमपूर्वक आपल्या हातानें काढलेली असल्यामुळें ती व्यक्ति श्रोतेजनांच्या मनांत मूर्तिमंत उभी राहात असेल यांत संशय नाहीं. ते शब्द कोणचे ह्मणाल, तर ऐका. माझा मित्र चार्ल्स् किंग्स्ले ह्मणाला कीं, " ते साधे, भोळ्या अंतःकरणाचे आपले पूर्वज या पृथ्वीवर सर्वत्र दृष्टी फेकून आपल्या ठिकाणीं ह्मणत कीं, ' तो सर्वपिता, तो सर्वात्मा, जर कोठें असला तर कोठें बरें असेल ? या पृथ्वींत तर नाहींच. कारण, या पृथ्वीचा तर नाश होणार. सूर्य, चंद्र, नक्षत्रें यांतही तो नाहीं. कारण त्यांचाही नाश होणार. तो चिरंतन भगवान् कोठें आहे बरें ? ' असें ह्मणून ते दृष्टी वर करीत, आणि सूर्य, चंद्र, नक्षत्रें, व जें कांहीं विकार पावतें किंवा पुढें पावणार त्याच्या पलीकडे जें स्वच्छ, नीलवर्ण आकाश तें त्यांनीं पाहिलें व त्याचा तो अपार विस्तीर्ण घुमटही त्यांनीं पाहिला. तेव्हां त्यांस वाटलें—

"हा घुमट, हें आकाशमंडल कधींही बदललें नाहीं. तें निरंतर जशाच्यातसेंच राहतें. ढग, वारे व या जगांतल्या उलाढाली इत्यादि प्रकार खालीं चाललाच आहे; तरी तें आकाश नित्याप्रमाणें शांत व सुप्रकाशित असतें. तो निश्चल, निर्विकार 'विश्वपिता' आकाशांतच असला पाहिजे ! आकाशासारखाच प्रकाशमान्, पवित्र, आणि अनंत; व आकाशाप्रमाणेंच शांत, स्तब्ध व अत्यंत दूर असला पाहिजे. " त्या विश्वपित्यास कोणत्या नांवानें बरें ते हाक मारीत ?

आर्यलोक पांच हजार किंवा अधिक वर्षांपूर्वी ह्मणजे संस्कृत, ग्रीक, किंवा लॅटीन, हा भाषाभेद जेव्हां मुळींच नव्हता तेव्हां, त्याला ' दियु –पेतर '=आकाशपिता, असें ह्मणत.

जे आर्य चार हजार किंवा त्याहूनही अधिक वर्षांच्या पूर्वी, पंजाबांतील नद्यांच्या दक्षिणेस येऊन बसले, ते त्यास 'द्यौः+पिता' किंवा आकाशपिता असेंच ह्मणत.

तीन हजार वर्षांपूर्वी किंवा त्याच्याही पूर्वी, हेलेस्पांट्च्या किनाऱ्यावर वसलेले आर्य त्यास ' झ्यूस्+पेतर '=आकाशपिता, असें ह्मणत.

दोन हजार वर्षांपूर्वी इटलींतील आर्यांनीं उंच, प्रकाशमान्, उज्वल आकाशाकडे पाहून त्यास ' ज्यु+पितर '=आकाश पिता, असेंच ह्मटलें— आणि एक हजार वर्षांपूर्वी याच आकाशपित्याची व विश्वपित्याची प्रार्थना, जर्मनींतील निबिड घोर अरण्यांत आपल्या स्वतांच्या पूर्वजांनीं, ह्मणजे ट्युटॉनिक् आर्यांनीं केली, त्यावेळीं त्यांनीं उच्चारलेलें त्याचें प्राचीन नांव ' तिगु ' किंवा ' झियो ' हेंच होतें.

पण कोणचीही कल्पना किंवा कोणचेंही नांव अगदीं नाहींसें होत नाहीं. येथेंच पहा, हा वेस्टमिंस्टर्चा प्राचीन मंडप तो त्याहूनही प्राचीन अशा रोमन् मंदिराचा उच्छेद ज्या ठिकाणीं झाला,त्याच ठिकाणावर बांधलेला आहे. ह्या मंदिरांत आसपास सर्वत्र असणारा, अदृश्य, अनंत, अज्ञात जो जगदात्मा, जो आपणा सर्वांचें आदिकारण, त्याचें नांव जर आपणांस घ्यावेंसें वाटलें व आपल्या बाल्यदशेंतील निर्मल भाव आपण धारण करून एका लहानशा अंधार कोठडींत गुडघे टेंकून प्रार्थना करूं लागलों, तर आपण देखील ' हे आकाशांतील बापा !' यापेक्षां अधिक चांगल्या व गोड अशा दुसऱ्या कोणच्या नांवानें देवास हाक मारणार आहों ?

# व्याख्यान पांचवें.

## अनंतत्व व सृष्टिनियम या दोन कल्पना.

' श्रद्धा ह्मणजे केवळ भ्रम होय. ती इंद्रियजन्य नाहीं.'

सांप्रत दररोज, दर आठवड्यास, दर महिन्यास, व दर तीन तीन महिन्यांनीं प्रसिद्ध होणारीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें पुष्कळ निघतात व शेंकडो लोक तीं वाचतात. तीं आपल्या वाचकांस ज्ञानामृत पाजण्याच्या कामीं एकमेकांशीं जणों स्पर्धा करीत असतात. त्या सर्वांचा झोंक असें ह्मणण्याचा असतो कीं धर्माचा काळ निघून गेला—धर्मावर श्रद्धा ठेवणें हा एक आपल्या बुद्धीचा भ्रम आहे—किंवा धर्म हा मनुष्याच्या बाल्यावस्थेंत जडलेला एक रोग आहे; देव व देवता आतां नाहींशा होऊन खोट्या ठरल्या आहेत व इंद्रियांच्या द्वारानें जें ज्ञान प्राप्त होतें त्याच्या पलीकडे दुसरें कांहीं एक जगांत असण्याचा संभव नाहीं; सान्त पदार्थ व जगांत प्रत्यक्ष घडून येणाऱ्या गोष्टी यांवर पूर्ण भरंवसा ठेऊन त्यांजपासूनच आपणांस संतोष मानून घेतला पाहिजे. अर्थात् इहलोक तेवढा खरा, परलोक ह्मणजे निवळ भ्रम आहे असें मानिलें पाहिजे, व ' अनंत,' ' अद्भुत,' किंवा ' ईश्वरी ' हे शब्द यापुढें प्रसिद्ध होणाऱ्या शब्दकोशांतून अजीबात गाळले पाहिजेत. असो. आतां माझ्या या व्याख्यानांत कोणत्याही धर्माचें, कोणत्याही प्रकारानें खंडण किंवा मंडण करण्याचा हेतु बिलकूल नाहीं. हीं कामें करणाऱ्या माणसांचा आजकाल तोटा नाहीं. माझें काम मी स्वतांच निवडलें आहे. आणि मला वाटतें, तें काम या व्याख्यानांचा स्थापक रॉबर्ट हिबर्ट, या थोर पुरुषानेंच माझ्यासाठीं मुद्दाम निवडलें आहे. तें अगदीं निराळ्या प्रकारचें आहे. माझ्या कामाचा संबंध इतिहास किंवा मानसशास्त्र यांच्याशीं आहे. अमुक एक निर्दिष्ट धर्म संपूर्ण किंवा असंपूर्ण, खरा किंवा खोटा, असें ह्मणणें किंवा ठरविणें हें काम ब्राह्मण

किंवा श्रमण, मोबेद किंवा मुल्ला, राबी* किंवा डॉक्तर ऑफ् डिव्हि-निटी (ईश्वरशास्त्रज्ञ) ही पदवी धारण करणारा, यांच्यासारख्या परमार्थज्ञांनींच करावें व आपणही त्यांचेकडेसच तें सोंपवावें हें फार बरें. तो विषय आपला नाहीं. आपला विषय दुसराच आहे. आपणांस जो विचार कर्तव्य आहे तो इतकाच कीं धर्म हा कोणत्या रीतीनें संभवतो? आमच्यासारख्या माणसांस धर्म ह्मणून कांहीं एक प्रथम प्राप्त झालें कसें? धर्म ह्मणजे आहे काय? आणि सांप्रत धर्म या नांवा-खालीं जें जें कांहीं आढळतें, त्याची उपपत्ति करावी कशी व तें बन-लें कसें? जेव्हां आपण भाषाशास्त्र शिकत असतों, तेव्हां आपला मूळ उद्देश एक भाषा दुसऱ्या भाषेहून अधिक परिपूर्ण आहे अथवा एका भाषेंत दुसरीहून कांहीं विलक्षण नामें, किंवा कांहीं चमत्कारिक क्रिया-पदें अधिक आहेत हें शोधून काढण्याचा नसतो. आपण आरंभ करि-तांना, 'प्रथमारंभीं एकच भाषा होती व त्या भाषेला अमुकच नांव योग्य होतें, हल्लीं आहे किंवा पुढें होईल'–अशी आपणांस खात्री नसते. तर आपण काय करतों? अनेक शब्द एकत्र करतों व ते निरनि-राळ्या वर्गांत घालून त्यांचा अर्थ समजण्याचा यत्न करितों; आणि अशा प्रकारें सगळ्या भाषांची पूर्वींची खरी स्थिति व मनुष्यवाणीची वृद्धि आणि नाश, हे ज्या ज्या नियमांवर अवलंबून असतात ते नियम, आणि भाषेचा प्रवाह ज्या उद्दिष्ट स्थळापर्यंत पोहोंचण्याचा कल दिसतो तें स्थळ, हीं अधिक अधिक शोधून काढण्याची उमेद आपण बाळगीत असतों.

धर्मविज्ञानाचीही गोष्ट अशीच आहे. आपणांपैकीं प्रत्येकजणास आपली स्वभाषा किंवा आपला स्वधर्म यांविषयींची कांहीं निरनिराळी कल्पना असेल. पण इतिहासकर्ते या नात्यानें आपणांस चोहींकडे सा-रखी नजर दिली पाहिजे. धर्माच्या इतिहासाचीं जीं प्रमाणें सर्व भूमं-डळावर सांपडतात तीं सर्व एकत्र करून त्यांचा बारकाईनें शोध लावणें व त्याचे निरनिराळे वर्ग करणें हें मात्र आपलें काम आहे. त्याप्रमाणेंच सर्व धर्मांची पूर्वस्थिति काय असेल, मनुष्यधर्मांची वृद्धि आणि नाश

* राबी=यहुदीधर्मवेत्ता, यहुदीधर्मशास्त्री, किंवा पंडित.

ज्या नियमांवर अवलंबून असतात, ते नियम कसकसे आहेत, त्याप्रमाणेंच सर्व धर्मांची प्रवृत्ति ज्या ईश्वराकडे दिसून येते तो ईश्वर कसा आहे, या गोष्टींचा शोध लावण्याचा यत्न करणें एवढेंच आपलें कर्तव्य आहे. साऱ्या जगांत एकच सर्वोत्कृष्ट अशी सार्वजनिक भाषा होण्याचा संभव आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचें उत्तर देणें जसें कठीण आहे, त्याप्रमाणें साऱ्या जगांत एकच सर्वोत्कृष्ट सार्वजनिक धर्म होणें संभवेल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचेंही उत्तर देणें तितकेंच कठीण आहे. एकाद्या अगदीं अडाणी भाषेची रचना सुद्धां जशी अत्यंत चमत्कार वाटण्यासारखी असते तशींच एखाद्या अगदीं अडाणी धर्माचीं मूलतत्वेंही अत्यंत चमत्कृतिजनक असतात, इतकें जर आपल्यास कळलें तर हा धडा असा आहे कीं तो शिकल्यानें अनेक तत्वविचारांच्या शाळेंत अनेक धडे शिकल्याचें श्रेय त्यांत आहे.

अशी एक फार जुनी ह्मण आहे कीं कोणच्याही वस्तूची उत्पत्ति कळल्याशिवाय, आपणांस तिचें खरें ज्ञान होत नाहीं. आपणांस धर्माविषयीं बरीच माहिती असेल, आणि जगांतील बहुतेक धर्मग्रंथ, पंथ प्रश्नोत्तरावळी, व अनेक प्रार्थनाविधी अवगत असतील, तरी जोंपर्यंत धर्माच्या अत्यंत खोल गेलेल्या मुळ्या, आपणांस सांपडल्या नाहींत तोंपर्यंत खुद्द धर्म ही काय वस्तु आहे हें कळणें परम दुर्घट होय.

हें करीत असतां, ह्मणजे धर्माचे स्वाभाविक व जिवंत असे झरे शोधून काढण्याचा यत्न करीत असतां, आस्तिकवादी किंवा नास्तिकवादी या दोघांसही जितक्या गोष्टी कबूल असतील त्यांच्याबाहेर आपणांस कांहीं एक गृहीत घेतां कामास नाहीं. मी आपल्या प्रथम व्याख्यानांत स्पष्ट सांगितलेंच आहे कीं, विद्वानांस जेवढें खरोखर मान्य असेल, तितकेंच घेऊन मीं चालणार. आणि माझें काम शेवटास जाईल तोंपर्यंत मी ती प्रतिज्ञा मोडणार नाहीं. मी आपणांस सांगितलेंच आहे कीं कोणत्याही गोष्टीचें यथार्थ ज्ञान होणें तर तें ज्ञान दोनच द्वारांनीं झालें पाहिजे. तीं दोन द्वारें कोणतीं ह्मणाल, तर एक इंद्रियद्वार व दुसरें विवेकद्वार. तेव्हां आतां धर्मज्ञानापैकीं कोणचाही भाग

खरा किंवा खोटा ठरविण्यास आपण या दोन द्वारांवर चौकी बसवून पाहरा करीत राहूं. जें ज्ञान या दोन दरवाज्यांखेरीज दुसऱ्या कोणच्या दरवाज्यांतून जाण्यास पाहील—मग तो दरवाजा आद्यप्रेरणा या नांवाचा असो, किंवा धर्मबुद्धि या नांवाचा असो—तें ज्ञान, विवेक किंवा बुद्धि यां विरुद्ध आंत येत आहे, असें पाहून त्यांस बाहेरच्या बाहेर हाकून दिलें पाहिजे. आणि जें ज्ञान इंद्रियांच्या पहिल्या दरवाज्यांतून बाहेर पडल्या-खेरीज एकदम विवेकाच्या दरवाज्यापर्यंत येऊन ठेपेल, त्यास येण्याचा अधिकार नाहीं, ह्मणून त्यास परतविलें पाहिजे. निदान त्यानें पहिल्या दरवाज्यापर्यंत जाऊन तेथें, आपल्या योग्यतेचा पुरावा करून, मग आंत येण्यास पहावें, असें केलें पाहिजे.

या अटी मान्य करून मी माझ्या व्याख्यानाचा मुख्य उद्देश असाच ठेविला आहे कीं, धर्मसंबंधीं विचारांस प्रथम आपल्या इंद्रियद्वारांतून जातांनाच तत्काळ पकडावें. ह्मणजे काय करावें, तर ज्या कल्पनांवर धर्मविचारांची सर्व इमारत बांधिली आहे, त्या कल्पनांचें ज्ञान प्राप्त करून घ्यावें. तात्पर्य, इंद्रियसंबंधाचीं व त्या कल्पनांचीं भौतिक मुळें शोधून काढावीं.

मी प्रथमतः असें दर्शविण्याचा यत्न केला कीं, जी अनंताची कल्पना एकंदर धर्मविचारांचें मूळ होय, ती तर्कशक्तीनें केवळ शून्यांतून उत्पन्न झाली नाहीं, ह्मणजे ती निर्मूलक नाहीं. तर, तिचें मूळस्वरूप आपणांस इंद्रियांपासूनच उपलब्ध होतें. जर अनंतविषयक कल्पना इं-द्रियजन्य ज्ञानापासून न निघेल, तर आपणांस आपल्या अटीप्रमाणें ती कबूल करावी लागेल. सर् डब्ल्यू. ह्यामिल्टन् यांच्यासारखेंच जर आपणही ह्मणूं लागलों कीं, अनंतविषयक कल्पना केवळ तर्कसिद्ध आहे व आपल्या मनाची ईश्वरानें अशी कांहीं रचना केली आहे कीं जेथें जेथें अवकाश व काल या दोहोंची मर्यादा आपण निश्चित करतों, तेथें तेथें त्या मर्यादेपलीकडे, अवकाश व काळ आहेतच, असें आपणांस वाटतें. पण अशा या बोलण्यानें आमचा निर्वाह लागत नाहीं. सर वु. ह्यामिल्टन् यांच्या बोलण्यांत सत्याचा अंश नाहीं असें मी ह्मणत नाहीं. परंतु आ-

मच्या प्रतिपक्षानें हें त्यांचें बोलणें मान्य केलेंच पाहिजे असें नाहीं. तर मग त्या बोलण्याचा काय उपयोग? असो. तर या कारणाकरितां मी असें दाखविण्याचा यत्न केला आहे कीं, सान्ताच्या (Finite) मागें, पुढें, वर, खालीं, आंत, बाहेर, सर्वत्र अनंताचा अनुभव निरंतर आपल्या इंद्रियांस होतो. अनंत जणों आपणांस येऊन लपेटून टाकतें, व चोहों बाजूंनीं आपणांस व्यापून टाकतें. ज्यास आपण स्थलानें व कालानें, आकारानें व भाषेनें, सान्त किंवा परिच्छिन्न असें ह्मणतों, तें एखाद्या जाळ्यासारिखें किंवा पडद्यासारिखें अनंतावर घातलेलें आहे; दुसरें कांहीं नाहीं. जशी सान्तावांचून अनंताची कल्पना होत नाहीं, तशीच अनंतावांचून केवळ सान्ताचीही कल्पना होणार नाहीं. सान्त पदार्थांचें ज्ञान जसें बुद्धि व इंद्रियें यांपासून होतें, त्याप्रमाणेंच श्रद्धा किंवा दुसरें पाहिजे तें नांव त्या शक्तीस द्या, त्या शक्तीपासून सान्ताचा समावेश ज्यांत होतो असें जें अनंत, त्याचें ज्ञान होतें. ज्यास आपण इंद्रियें, बुद्धि व श्रद्धा ह्मणतों, ती हीं तीनही एकाच आत्म्याचीं, एकाच द्रष्ट्याचीं तीन कार्यें आहेत, असें ह्मटलें पाहिजे. पण विशेषतः इंद्रियांवांचून तर आपणासारख्या मानवी प्राण्यास बुद्धि व श्रद्धा या दोन गोष्टी केवळ अशक्य आहेत.

आर्यावर्तांतील प्राचीन धर्माच्या इतिहासाचा जितका आजपर्यंत आपणांस शोध लागला आहे, तेवढ्यावरून सान्तरूप जाळ्याच्या किंवा पडद्याच्या पलीकडे झांकून ठेविलेल्या अनंतास नांव देण्याचा जो अप्रतिहत यत्न आपल्या पूर्वजांनीं केला, त्याचाच जणों इतिहास आपणांस कळून येतो.

आर्यावर्तांतील प्राचीन आर्यांस, ह्मणजे वेदकवींस, प्रथमतः तो अदृश्य, अज्ञात, किंवा अनंत,–वृक्ष, पर्वत, नद्या, अरूणोदय, सूर्य, अग्नि, मरुद्देवता व मेघगर्जना, यांच्याठाईं कसकसा दृष्टीस पडला–त्या सर्वांत एक आत्मा, एक सत्व, एक ईश्वरी अंश, किंवा दुसरें काय वाटेल तें त्याला ह्मणा–पण आहे, अशी कल्पना त्यांनीं कशी केली; आणि अशी कल्पना करितांना जें त्यांस दिसे त्याच्या पलीकडे न दिसणारें

कांहीं तरी आहे, सृष्टिस्वभावा पलीकडे स्वभावातीत असें कांहीं तरी व सान्ताच्या आंत किंवा पलीकडे अनंत किंवा अंतातीत असें कांहीं तरी आहे, असा अनुभव कसा येत गेला, या सर्व गोष्टींचा विचार मागें झालाच आहे. त्यांनीं दिलेलीं नांवें खोटीं अथवा अयोग्य असतील. परंतु जें निर्दिश्य, जें धुंडून काढण्याचें, त्याच्याकरितां त्यांनीं केलेले जे शोध त्यांची दिशा खरी होती. फार काय, आजकाल आपणांतील बहुतेक पंडित किंवा विचार करणारे लोक ज्या दिशेनें गेले आहेत, किंवा जितकी मजल त्यांनीं मारिली आहे, तितकीच मजल त्याच दिशेनें प्राचीन आर्यांनींही कशी मारिली, हें आपण पाहिलें.

आपली मजल फार ह्मणजे 'आकाशाच्या बापा' पर्यंत पोंचली आहे, तेवढी त्यांचीही पोंचली होती. इतकेंच नव्हे, तर आपले असेंही लक्षांत येईल कीं, त्यांनीं यापेक्षांही फार पुढें मजल मारिली होती. ईश्वर प्रथम पितृस्थानीं ह्मणजे बापासारखा व मागाहून बापच आहे, असा विचार वेदांत फार प्राचीनकाळीं दृष्टीस पडतो. ऋग्वेदांतील प्रथम सूक्त जें अग्नीविषयीं आहे, त्यांत याप्रमाणें आहे:— 'जसा बाप आपल्या मुलावर लोभ करतो, तसा तूं आह्मांवर कर!' हेच विचार पुनः पुनः वैदिक मंत्रांत आढळतात. (ऋग्वेद, १. १०४. ९.) 'बाप जसें मुलाचें ह्मणणें ऐकतो, तसा हे इन्द्रा! तूं आमचें ह्मणणें ऐक!' (ऋग्वेद, ३. ४९. ३.) या ठिकाणीं कवि ह्मणतो कीं, 'इन्द्र एखाद्या बापाप्रमाणें अन्न देतो व आह्मांवर ममता करतो.' (ऋग्वेद, ७. ९४. २.) या ठिकाणीं 'बाप जसा मुलावर ममता करितो, तशी ममता आह्मांवर तूं कर!' अशी इन्द्राची प्रार्थना केली आहे. आणखीं एक ठिकाणीं (ऋग्वेद, ८. २१. १४.) तोच भाव प्रदर्शित केला आहे. 'जेव्हां तूं गर्जना करतोस व मेघ एक ठिकाणीं जमवितोस, त्या वेळेस तुला बाप असें ह्मणतात.' (ऋग्वेद, १०. ३३. ३.) 'जसे उंदीर आपलीं स्वतांचीं शेपटें कुरतुडून खातात, तसा हे सर्वशक्तिमान् देवा! तुझा भक्त जो मीं, त्या मला दुःखें तोडतोडून खातात. हे बलवंता इंद्रा, एक वेळ आह्मांवर दया कर आणि आह्मांस

तूं बापासारखा हो. ' (ऋग्वेद, १०. ६९. १०.) ' जसा एखादा बाप आपल्या मुलास मांडीवर बसवितो, तसें त्याला त्वां मांडीवर बसविलेंस. ' (ऋग्वेद ३. ५३. २.) ' जसा एखादा मुलगा धोतराचा पदर धरून आपल्या बापाला ओढतो, त्याप्रमाणें या अतिमधुर गायनानें मी तुझें आकर्षण करितों. ' आपल्या देवास किंवा देवतांस ' बाबा ' या नांवानें हाक न मारणारे लोक खरोखर जगांत थोडेच आढळतील. तात्पर्य, सर्व पृथ्वीवर बहुतेक देशांतील लोकांत ईश्वर संबंधानें पितापुत्रभाव दृष्टीस पडतो, यांत आश्चर्य मानण्या सारिखें कांहीं नाहीं. परंतु आपण लहान असतां देवावर जसा आपला भरंवसा असतो, देवाला ' देवबापा' ह्मणण्याची जशी बालपणीं आपणांस हौस वाटते, तसेंच जरी प्राचीन आर्यांस त्यांचे विश्वासाचे बाल्यावस्थेंत झालें असेल असें मानिलें तरी त्यांस थोड्याच दिवसांत असें वाटूं लागलें कीं, बाप हें नांव माणसांस मात्र देणें योग्य आहे. माणसांस दिलेलीं जीं नांवें त्यांपैकींच ज्या अर्थीं हें एक आहे त्या अर्थीं तें देवास लावणें योग्य नाहीं. लहान मुलाचा जसा पूर्ण भरंवसा असतो कीं, आपण हा लोक सोडून परलोकीं जातों, ह्मणजे आपल्या आईबापांचें घर सोडून देवबापाकडे आपण जातों; हा शुद्ध भाव पाहून आपल्यास त्याचा मोठा हेवा वाटून बालकाचा तो शुद्ध भाव आपले ठिकाणीं असावा, अशी आपण इच्छा करितों, तशीच आपल्या प्राचीन पूर्वजांच्या स्थितीची आपणास इच्छा होणें हेंही अगदीं स्वाभाविक आहे. मुलगा जसजसा मोठा होऊं लागतो, तसतसें त्याला समजूं लागतें कीं, माझा बाप हा देखील मुलासारखा असून त्यालाही बाबा आहे. जसें बहुतेक बालकांच्या मनांत लहानपणीं पितृत्वगुणांचें जें मुख्य तत्व ह्मणून वाटत असतें त्याचा अंश त्याच्या मानसिक पटावरून दिवसानुदिवस कमी कमी होत जातो, व प्रौढपणा येऊं लागला ह्मणजे ते विचार एकामागून एक सोडून द्यावे लागतात, तसाच आपले पूर्वजांस असा बोध झाला व तो बोध आपणा सर्वांस झाला पाहिजे. तो हा कीं, जर आपले धर्मविषयक किंवा ईश्वरविषयक विचार बदलत जात असतांही 'पितृ' शब्द ईश्वरास

लावणें आहे, तर त्याच्या वाच्यांशांतून बराच भाग काढून टाकला पाहिजे; ह्मणजे, यांत वास्तवांश तेवढा राहील. हा 'पितृ' शब्द ज्या अर्थानें मनुष्यास लावतां येतो, त्याच अर्थानें तो ईश्वरास लावितां येत नाहीं. ज्या अर्थानें ईश्वरास लावतां येतो, त्याच अर्थानें मनुष्यास लावितां येत नाहीं. 'पृथ्वीवरील कोणाही मनुष्यास तूं पिता ह्मणूं नको; कारण कीं, तुझा पिता एकच आहे. तो आकाशांत आहे.' (मात्थी, अ० २३, ९.) तारतम्याचा किंवा तुलनेचा प्रथमारंभ जसा निषेधात्मक असतो तसा त्याचा उपसंहार किंवा शेवटही निषेधात्मकच असतो. ज्या अनंताचें अस्तित्व, ज्याचा प्रभाव, मनुष्यास सर्व ठिकाणीं दिसून आला, त्यास दिलेलीं अग्नि, मरुत्, आकाश, स्वामी, किंवा अशींच इतर जीं जीं नांवें माणसांनीं त्या अनंतास देण्याचा यत्न केला, त्या नांवांपेक्षां 'पिता' किंवा 'बाबा' हें नांव फारच चांगलें आहे. परंतु पिता हेंही एक दुर्बल मानवजातीचें नाम आहे. वेदकवींस जितकीं नांवें सुचलीं, त्यांतल्या त्यांत पाहतां कदाचित् हेंच उत्तम असेल. तथापि ज्यास ते धुंडित होते त्यांत व पितृशब्दवाच्य जो अर्थ या दोहोंमध्यें जमीन अस्मानाचें किंवा पूर्व पश्चिम या दोन दिशांचें अंतर होतें.

प्राचीन आर्यांनीं सृष्टींतील प्रत्येक भागांत अनंताला धुंडून काढण्याचा यत्न कसा केला, हें आपण पाहिलें. वृक्ष, नद्या, पर्वत, यांपासून आरंभ करून शेवटीं 'द्यौः पिता' किंवा 'आकाशांतील बाबा' अशीं अनेक नांवें त्या अनंतास त्यांनीं दिलीं. तीं समजून घेण्याचा यत्न केल्यानंतर, आतां आपण दुसऱ्या कांहीं धर्मविषयक कल्पनांच्या उत्पत्तीचा विचार करूं. त्या कल्पना जरीं प्रथम आपल्या इंद्रियमर्यादे बाहेरच्या आहेत असें वाटलें, तरी त्यांचीं अत्यंत खोल गेलेलीं मुळें व त्यांचा प्रथमारंभ, हीं त्या सान्त ह्मणजे दृश्य सृष्टींतूनच आहेत असें दाखवितां येईल. हें विश्व हाच एक राजमार्ग सर्वांस मशहूर होता व हल्लींही आहे. हा राजमार्ग आपणांस सान्त पदार्थांपासून अनंताप्रत, स्वभावापासून स्वभावातीताप्रत व सृष्टीपासून सृष्टीच्या नायकाप्रत नेणारा

आहे. असें असतां या सान्त, मर्यादित, बाह्य सृष्टीस आपण इतके तुच्छ कां मानितों हें सांगणें खरोखर कठीण आहे !

## वेदांत वर्णिलेल्या देवांची उत्पत्ति.

या अद्भुत विश्वांत आपणांस कोणी एकदम आणून सोडिलें आहे, अशी कल्पना करून आपल्या अति प्राचीन काळच्या पूर्वजांस या सृष्टींतील कोणकोणचे पदार्थ पाहून आश्चर्य वाटलें असेल, भीति वाटली असेल व मोह पडला असेल, हें पाहण्याचा आपण येथपर्यंत यत्न केला. पुढें मोह, आश्चर्य, भीति इत्यादि प्रथमदर्शनीं मनुष्याच्या मनांत उत्पन्न होणारे विकार शांत होऊन जे जे सृष्टिचमत्कार त्यांच्या समोर नित्य घडून येत, त्यांच्याविषयीं विचार करण्यास ते केव्हां लागले व या तत्वचिन्तेला कोणकोणते पदार्थ कारणीभूत झाले, या गोष्टीचाही आपण विचार केला. एवढें झाल्यानंतर आपलीं अनुमानें व आपले सिद्धांत, वेदकवींच्या काव्यांत वर्णिलेल्या गोष्टींशीं ताडून पाहून खरें खोटें जाणण्याचा आपण यत्न केला. कारण, या कवींच्या कवनांत फार प्राचीन काळच्या धर्मविषयक कल्पनांचे उल्लेख आहेत व हे उल्लेख जरी एकंदर मानवजातीस अनुलक्षून नसले, तथापि त्या मानवजातीच्या ज्या शाखेंतले आपण आहोंत त्या शाखेच्या संबंधाचे हे लेख आहेत, हें निर्विवाद आहे.

खरोखर मनुष्यवाणीचा किंवा विचाराचा जेव्हां अगदीं प्रथमारंभ व ज्या काळीं अत्यंत शुद्ध आणि परिपूर्ण अशा छंदांत व अत्यंत संस्कारसंपन्न अशा भाषेंत हे आद्य स्तुति मंत्र रचले गेले तो काल, या दोहोंच्या मध्यें पिढ्यांच्यापिढ्या होऊन गेल्या असतील व शेंकडों, किंबहुना हजारों, वर्षे गेलीं असतील. तथापि मानवी विचाराच्या गळ्यांत एकदां मानवी भाषेची लगाम अडकविली, ह्मणजे त्याचें असें नैरंतर्य आहे कीं, वैदिक मंत्र जेव्हां आह्मी लक्षपूर्वक वाचिले, तेव्हां आमचे बहुतेक तर्क आह्मांस वाटलें होतें किंवा आशा होती, त्यापेक्षांही खरे ठरले. दृश्य किंवा श्राव्य किंवा स्पृश्य अशा पदार्थांत आपल्या अनु-

भवापलीकडचा कांहीं भाग आहे असा मनावर ठसा उठतो, असें मानून आपण ते पदार्थ केवळ तर्कानें निराळे काढले होते. पुढें पाहतों तों वेदाचाही अनुभव तसाच पटला! ह्मणजे, आह्मी निराळे काढलेले पदार्थ, याच कोणी खिडक्या व त्या खिडक्यांच्या द्वारानें प्राचीन आर्यांस अनंतत्वाचें प्रथमतः दर्शन घडलें, ही गोष्ट सिद्ध झाली!

## अनंतविषयक अत्यंत प्राचीन भावना.

मी 'अनंत' असें ह्मणतों, तरी 'अनंत' हा शब्द त्याच्या प्रमाणार्थानेंच ह्मणजे अतिसूक्ष्म किंवा अतिस्थूळ अशा अर्थानें मी घेत नाहीं. जरी बहुतेक लोकांची 'अनंत' शब्दाची कल्पना अशीच असते, किंवा ते 'अनंत' शब्दाचा अति सूक्ष्म किंवा अति स्थूळ असाच अर्थ करितात, तरी त्या शब्दाचा एवढाच अर्थ करणें बरोबर नाहीं, असें मला वाटतें. प्राचीन आर्य लोक अनंताचें स्वरूप, प्रत्येक सान्त पदार्थाच्या भिन्न भिन्न आकृतीप्रमाणें भिन्न भिन्न मानीत असत. कारण त्या सान्त पदार्थाचा आधार किंवा पायाच सर्वव्यापक अनंत आहे, असें ते मानीत. पदार्थ जितका जितका अधिक दृश्य, अधिक श्राव्य, अधिक स्पृश्य अधिक सान्त अथवा मर्यादित असेल तितका तितका मनुष्याच्या अनुभवाला तो कमी अदृश्य, कमी अश्राव्य, कमी अस्पृश्य, किंवा कमी अनंत असा वाटे. इंद्रियांच्या ग्राहकशक्तीची मर्यादा जसजशी कमी जास्त होई, तसतसा त्या मर्यादेपलीकडे जो कांहीं भाग असेल, तद्विषयक त्यांचें ज्ञान, अथवा त्यांच्या मनांतील स्फूर्ति कमी जास्त होत जाई. उदाहरणार्थ, उषा ( प्रातःकाल ) किंवा वादळ या दोन सृष्टिचमत्कारांच्या कल्पनेपेक्षां, एखाद्या नदीची किंवा पर्वताची कल्पना घेतली तर तिच्यांत अदृश्याचा भाग फारच थोडा असतो असें समजावें. उषा प्रति दिवशीं सकाळीं येते. परंतु ती आहे काय व येते कोठून हें कोणी सांगूं शकत नाहीं. 'वायु त्याला वाटेल त्या दिशेला वहातो व तुला त्याचा शब्द ऐकूं येतो, तरी तो कोठून आला व कोठें जातो, हें तुझ्याच्यानें सांगवत नाहीं!' नदीस पूर आल्यामुळें किंवा डोंगर कोसळून

पडल्यामुळें जें नुकसान होतें व जो अनर्थ होतो, त्याची कल्पना करणें हें काम सोपें आहे. पण आकाशांत प्रचंड वादळ सुटून त्या काळीं मोठमोठीं झाडें मोडून जाऊन धाडदिशीं भूमीवर पडतात तें कशानें होतें, अथवा एकाएकीं जिकडे तिकडे अंधार होऊन वीज चमकते व भयंकर गडगडाट होतो, अशा काळीं पर्वतांचें चूर्ण करून टाकणारा व घरें दारें उद्वस्त करून टाकणारा हा आहे तरी कोण, हें समजणें अधिक कठीण आहे. याचकरितां 'अर्ध–देवता' ह्मणून निराळ्या काढलेल्या देवता बहुतकरून इंद्रियगम्य असल्यामुळें त्यांस अन्य देवतांप्रमाणें नाटकीय स्वरूप प्राप्त झालें नाहीं. असें नाटकीय रूप धारण करणाऱ्या या देवतांमध्येंही कांहीं देवता अगदीं अदृश्य असून ज्यांची कृति या सृष्टींत कोठेंच आढळण्यांत येत नाहीं अशा होत्या. उदाहरण, वृष्टी करणारा इंद्र, गर्जना करणारा रुद्र, चूर्ण करणारे मरुत्, किंवा वायु–देव, त्याचप्रमाणें सर्वांस आवरण करणारा वरुण, या सर्व देवांनीं प्रकाशमान् आकाश, पहाट, किंवा सूर्य, यांच्यापेक्षां अधिक साकार व पुराणप्रसिद्ध रूपें थोड्याच कालांत धारण केलीं असतील. शिवाय या सर्व पदार्थांचें जें कांहीं अनंत, अद्भुत किंवा दिव्य स्वरूप तें बदलून त्यांस लागलेंच केवळ मानवस्वरूप प्राप्त झालें. त्यांस प्रथमच 'अनंत' हें विशेषण न मिळतां बहुधा दुर्जय, अविनाशी, अक्षय, अमर, अजात, सर्वव्यापक, सर्वज्ञ, सर्वक्षम अशीं विशेषणें मिळून शेवटीं कदाचित् 'अनंत' या विशेषणासारखें शुद्ध भाववाचक विशेषण त्यांस मिळालें असेल अशी आपण कल्पना करावी.

'आपण कल्पना करावी' असें ह्मणतों खरें. परंतु त्याच वेळीं मी असेंही ह्मणतों कीं, अशी कल्पना करण्याची संवय लागणें फार अहितकारक होय. अश्रुतपूर्व अशा गोष्टींचा विचार करतांना केवळ कल्पनेच्या जोरावरच आपण कोणचीही गोष्ट ग्रहण करूं नये. तर योग्य पुरावा मिळेल तेवढा मिळवून जी गोष्ट सिद्ध होईल, तिचाच अंगिकार करावा व तिचें मनन करून ती हृदयांत बिंबविण्याचा यत्न करावा हाच मार्ग उत्तम.

## अदिति=अनंत.

संस्कृत अदिति या शब्दांत, 'अपरिच्छिन्न' किंवा 'अनंत' अशा अर्थाचें नांव जिला दिलें आहे, अशी देवता वेदांत खचित असावी, ही गोष्ट जेव्हां अगदीं पहिल्या प्रथम माझ्या स्पष्ट लक्षांत आली, त्या वेळेस मला खरोखर फारच आश्चर्य वाटलें. तुह्मांलाही त्या गोष्टीचें माझ्यासारखेंच आश्चर्य वाटेल यांत संशय नाहीं.

अदिति हा शब्द प्रतिषेधदर्शक प्रत्यय अ व दिति या दोन अवयवापासून झाला आहे. तसाच दिति हा दा ( द्यति )=बांधणें या धातुपासून व्याकरणाच्या नियमानुरोधें झाला आहे. याच धातूपासून धातुसाधित विशेषण दित=बांधलेला व नाम दिति= बांधणें किंवा बधन, हे शब्द झालेआहेत. यावरून 'अदिति' शब्दाचा अर्थ प्रथम 'बंधनरहित,' 'उच्छृंखल,' किंवा 'न वेष्टिलेला,' 'अपार' 'अपरिच्छिन्न,' 'अनंत,' 'अनंतता' असा असला पाहिजे. हाच धातु ग्रीक भाषेतील दियु ह्मणजे बांधतों, दिआदनुअ= मुकुट किंवा मस्तका सभोंवती असणारें वेष्टण, या शब्दांत आढळतो. दिति हें सामान्यनाम आहे, त्याचें ग्रीक भाषेंत दितिस् असें रूप होतें, व अ–दिति याचें अ–दितिस् असें होतें.

अदिति ह्मणजे 'अनंत' असें नांव धारण करणारी कोणी देवी अर्वाचीन काळची असावी, प्राचीन काळची नव्हे, असें नुस्तें ह्मणणें सोपें आहे. परंतु असावी असा अदमास करीत बसण्यापेक्षां काय आहे या गोष्टीचीं माहिती मिळविण्याचा यत्न करणें, हें काम अधिक शहाणपणाचें होय. अनंताची शुद्ध, मानसिक भावना, अर्वाचीन काळची आहे असें वाटल्यावरून विद्वान वेदार्थवेत्त्यांपैकीं कित्येकांनीं अदिति ही अगदीं आलीकडली कल्पना आहे, असें ठरविलें. ही अदितीची कल्पना उत्पन्न होण्याचा हेतु ते असा सांगतात कीं, अदितीचे पुत्र जे विख्यात आदित्य किंवा सौर्य देव त्यांच्या नांवाची उपपत्ति करितां यावी, एकट्या अदितीचीच स्तुति ज्यांत गाइली आहे असे मंत्र वेदांत, उपलब्ध नाहींत, या गोष्टीवरून त्यांनीं असें अनुमान केलें कीं, अदितीनें

देवीचे स्वरूप वैदिक काव्यरचनेच्या शेवटीं शेवटीं धारण केलें असावें.

ग्रीक 'झ्यूस्' (संस्कृत 'द्यौस्') या नामाविषयींही असेंच ह्मणतां येईल. वेदांत जे अनेक देवतांस उद्देशून लांब लांब मंत्र केले आहेत, त्यांत अदितिपेक्षांही 'द्यौस्' हें नांव फार थोडें आढळतें. असें असतां आजकाल ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, 'द्यौस्' हा शब्द अर्वाचीन काळचा नसून आर्यावर्तांत जेव्हां संस्कृत भाषेचा व ग्रीक देशांत ग्रीक भाषेचा, एकही शब्द उच्चारला नव्हता, तेव्हांचा हा 'द्यौस्' शब्द आहे, या विषयीं आतां मुळींच संशय राहिला नाहीं. वैदिक देवांपैकीं 'द्यौः' हा अत्यंत प्राचीन देव आहे. आर्यांच्या देव-मंडळांत त्याच्या इतका जुना देव दुसरा नाहीं. पण पुढें या द्यौ देवास इंद्र, रुद्र, अग्नि, इत्यादि इतर आधुनिक देवांनीं गर्दी करून हांकून लाविलें असें दिसतें.

## अदिति ही अर्वाचीन किंवा आधुनिक देवी नव्हे.

मला वाटतें कीं, अदितीचीही गोष्ट अशीच आहे. द्यौस् (आकाश), पृथ्वी (भूमि) सिंधु (नद्या), व इतर प्राचीन देवतांच्या मंत्रांत व आवाहनांत हिचें नांव येत असतें. आणि अदिति ही *आदित्यांची माता आहे, ही केवळ कल्पना नसून ती एकंदर देवतांची माता आहे, असा वेदकवीही तिचा महिमा वर्णितात.

ही गोष्ट समजण्यासाठीं, या देवीची जन्मभूमी कोणती होती, अ-दिति ह्मणजे अपार, अनंत असें नांव कोणी सुचविलें असेल, व हें नांव प्रथम सृष्टींत दिसून येणाऱ्या कोणत्या चमत्कारांस दिलें असेल, वगैरे गोष्टी समजण्याचा यत्न आपणास केला पाहिजे.

## अदितीची स्वाभाविक उत्पत्ति.

अदिति ह्मणजे अपार हें नांव उषेच्या किंवा अरुणोदयाच्या अति

---

* ऋग्वेद संहितेच्या माझ्या भाषांतरांत त्या अदितीविषयीं मी पूर्ण माहिती दिली आहे भाग १ ला.–पृष्ठ २३०–२५१. या विषयावर डा० **आल्फ्रेद् हिलेब्रेंद** यांणीं एक उत्कृष्ट निबंध लिहिला आहे. पृष्ठ ११ या ठिकाणीं तेदा=बांधणें, या क्रियापदापासून 'अदिती' शब्दाची उत्पत्ति सांगतात व त्याचा अर्थ अविनस्वर असा करितात.

प्राचीन नांवांपैकींच एक असावें. किंवा वास्तविक पाहूं गेलों तर, तेजोराशि जगताचें केवळ जीवन असा जो सूर्य, तो ज्या आकाशाच्या भागांतून प्रातःकाळीं निघतो, त्या भागाचें नांव असावें, यांत संशय नाहीं. पहांटेच्या वेळीं आकाशाकडे दृष्टि फेंकावी व क्षणभर आपलें ज्योतिषशास्त्रही विसरावें. अशा वेळीं जेव्हां रात्रीचा अंधकाररूपी पडदा हळू हळू उचलत जातो, आणि वातावरण पारदर्शक होत जाऊन हवेंत एक प्रकारचा ताजेपणा भासतो, व उजेड पडतो. पण तो कोठून येतो हें आपल्यास कळत नाहीं, आपली दृष्टि कितीही दूर फेंकली व आपण कितीहि टक लाऊन दूरपर्यंत पाहण्याचा यत्न केला, तथापि तो आपला यत्न व्यर्थ जातो आहे असें आपणास वाटणार नाहीं काय? अशा-वेळीं आपण जणों अनंताच्याच नेत्राकडे पाहत आहों. प्राचीन काळच्या ऋषींस असें भासे कीं, देवी उषा ( अरुणोदय ) हीं दुसऱ्या जगताचें सोनेरी द्वार उघडीत असते व प्रातःकाळीं जेव्हां सूर्याची स्वारी मोठ्या थाटानें त्या दारांतून जावी ह्मणून तें दार उघडें होतें, तेव्हां त्यांचें मन व त्यांचे नेत्र या सान्त जगताच्या मर्यादे पलीकडे धांवण्याचा व्यर्थ यत्न करीत. उषा तर येई व जाई. परंतु ज्या तेजाच्या किंवा अग्नीच्या उचंबळलेल्या समुद्रांतून ती निघे त्याच्या लहरी तिच्या मागें रहात. तेंच अनंताचें दृश्य स्वरूप नव्हे काय? वैदिक कवींनीं या सृष्टिचमत्कारास अदिति, ह्मणजे 'अपार,' 'पलीकडच्या आंगचा,' 'पदार्थमात्राच्या पलीकडचा,' असें जें नांव दिलें त्यापेक्षां त्यांस दुसरें अधिक चांगलें नांव तें कोणतें बरें सुचण्याचा संभव होता?

यावरून ही गोष्ट आपल्या ध्यानांत येईल कीं, ज्या देवतेचें जन्मस्थान सृष्टींत कोठें असेल अशी कल्पना सुद्धां प्रथम आपणांस करितां येऊं नये इतकी जी अत्यंत भाववाचक वाटली व जिचा उल्लेख वेदांत कोठें असेल अशाविषयीं आपणांस फार संशय वाटत होता, त्या देवतेची कल्पना अत्यंत प्राचीन काळीं आर्यजनांच्या मनांत येऊन चुकली होती कांहीं काळानें अमर्याद अशी जी अदिति, तिचें स्वरूप आकाश व पृथ्वी यांस प्राप्त झालें. परंतु मूळ प्रथम 'अदिति' शब्दाची

व्याप्ति 'आकाश' व 'पृथ्वी' यांच्या फार पलीकडची होती. दिवस व रात्र यांचे प्रतिनिधि जे मित्र व वरुण यांस उद्देशून रचिलेल्या मंत्रांत असें आढळतें: 'हे मित्रावरुण हो! तुह्मीं प्रातःकाळीं सुवर्णवर्णाचा व सूर्यास्तसमयीं लोखंडाच्या रंगाचा पोल (दांडा) असणाऱ्या आपल्या रथांत बसतां व तेथून तुह्मी अदितीस व दितीस पहातां, ह्मणजे याचा अर्थ हा कीं जें पलीकडे आहे व जें येथें आहे, जें अनंत आहे व जें सान्त आहे, जें मर्त्य आहे व जें अमर आहे तें तुह्मीं पाहतां. दुसरा एक कवि ह्मणतो कीं, उषा ही अदितीचें मुख आहे. या ह्मणण्यांत त्याचा आशय इतका दिसतो कीं, अदिति ही प्रत्यक्ष उषा नव्हे, तर उषेच्या पलीकडे असणारा कांहीं पदार्थ आहे. सूर्य व इतर सौर्यदेव ज्या अर्थीं पूर्व दिशेंतून निघतात, त्या अर्थीं अदितीला 'प्रकाशमान् देवांची माता' असें कां ह्मटलें व विशेषेंकरून मित्र व वरुण[1], अर्यमा आणि भग व शेवटीं सात किंवा आठ आदित्य नांवाचे सौर्यदेव, पूर्व दिशेंतून निघणारे, यांचीही माता अदिति आहे असें कां ह्मटलें, हें आपणांस चांगलें समजतें. सूर्याला केवळ आदित्य[2] एवढेंच नांव दिलें आहे असें नाहीं; तर त्याला आदितेय[3] असेंही ह्मटलें आहे.

या अदितीच्या पुत्रांचा जो वारंवार उल्लेख दृष्टीस पडतो, त्यावरून पूर्वींपासूनच तिला स्त्रीचें स्वरूप देण्यांत आलें आहे यांत संशय नाहीं. शक्तिमान्, भयप्रद व राजकुलोत्पन्न अशा मुलांची अदिति ही माता होय. परंतु अशींही कांहीं वाक्यें आहेत कीं, ज्यामध्यें 'अदिति' हा शब्द पुरुषवाचक आढळतो. कोठें कोठें लिंगरहित, अपौरुष व्यक्तीचीही कल्पना आढळते. अदितीचा जरी उषेबरोबर फार निकट संबंध दिसतो, तरी कोठें कोठें प्रातःकाळींही तिचें आवाहन केलेलें आढळतें. कोठें कोठें मध्यान्हकाळीं व संध्याकाळींही तिचें आवाहन केलेलें

---

१ ऋग्वेद. १०, ३६, ३.

२ ऋ० ८, १०१,११.

'बत महान असि सूर्य बत आदित्य महान् असि'

अर्थः—हे सूर्या! तूं मोठा आहेस. हे आदित्या तूं खरोखर मोठा आहेस.

३ ऋ० १०, ८८, ११.

दृष्टीस पडतें ( ऋ० ५.६९.३ ). अथर्ववेद १०.८.१६ या स्थळीं खालीं लिहिल्याप्रमाणें आढळतें. 'ज्या स्थळापासून सूर्य उगवतो तें व ज्या स्थळीं तो मावळतो तें प्राचीनतम (अत्यंत पुरातन) आहे, आणि त्याच्या पलीकडे कोणीही जात नाहीं असें मला वाटतें.' या वाक्यांत 'प्राचीनतम' या शब्दाच्या ठिकाणीं 'अदिति' हा शब्द घातला तरी भावार्थ एकच होईल. अदिति लवकरच परमपूज्य व बहुमान्य झाली. तिची प्रार्थना, अंधकार व अंधकारांत लपून राहणारे शत्रु, यांचा नाश व्हावा ह्मणून करीत. एवढेंच नव्हे, तर मनुष्यांनीं केलेल्या पापापासून त्यांची सुटका व्हावी, ह्मणून तिची प्रार्थना करीत.

## अंधकार व पाप.

अंधकार व पाप या दोन कल्पना आपणांस फार वेगळ्या दिसतात. तथापि प्राचीन आर्यांच्या बुद्धीस या दोहोंत फार निकट संबंध आहे असें वाटे. मी तुह्मांस कांहीं वाक्यें दाखवितों त्यांवरून 'शत्रूची भीति' या एका कल्पनेपासून 'पापाची भीति' ही दुसरी कल्पना कशी उत्पन्न होते हें तुह्मांस कळेल. पाप आपला हाडवैरी असें ह्मणण्याची वहिवाट आहेच. 'हे आदित्यांनो ! हे अदिति ! बांधून ठेवलेल्या चोरांप्रमाणें तुह्मी आह्मांस लांडग्याच्या तोंडांतून सोडवा.'[1]

'आमच्या गाईंचें रक्षण दिवसा अदिति करो. जी अदिति कधींही फसवीत नाहीं, ती रात्रीं त्यांचें रक्षण करो. आमची निरंतर अभिवृद्धि करून ती आह्मांस पापापासून सुरक्षित ठेवो.' ('अंहसः' या संस्कृत शब्दाचा मूळ अर्थ उत्कंठा किंवा काळजी असा आहे. यामुळें 'पापाच्या ज्ञानानें उत्पन्न होणारा जो अनुताप त्यापासून सोडीव' असा अर्थ केला पाहिजे.) 'आणि ती शहाणी अदिति दिवसा साहाय्य घेऊन आह्मांप्रत येवो. ती कृपाकरून आह्मांस सुख देवो, व आमच्या सर्व शत्रूंचा विध्वंस करो.' पुढें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे, 'हे अदिति, मित्र आणि वरुण देवहो ! आह्मीं तुह्मांविरुद्ध जर कांहीं पाप केलें अ-

१ ऋग्वेद. ८, ६७, १४.

सेल तर त्याची आह्मांस क्षमा करा. हे इंद्र ! मला विशाळ व निर्भय असा प्रकाश प्राप्त होवो. आमच्या मस्तकावर तो दीर्घ अंधकार न येवो. अदिति आह्मांस पापरहित अशी स्थिति देवो.' अदितीच्या कल्पनेपासून दुसरी एक कल्पना सहजरीत्या उत्पन्न झालेली आढळते. जेथें पहावें तेथें जन्मांतराविषयींची कल्पना ही अति प्राचीन कल्पनांपैकींच आहे, असें आढळतें. ही कल्पना सूर्य व आकाशांतील इतर ग्रह यांच्या उदयास्ताचा विचार केल्यामुळें उत्पन्न झाली आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें. हल्लीं आपण जसे बोलतांना 'अमक्याचा सूर्य मावळला' असें ह्मणतों, त्याचप्रमाणें ते आपले पूर्वज ह्मणत कीं, 'जे पुरुष हा संसार सोडून जातात, ते पश्चिमेकडे, ह्मणजे जेथें सूर्य मावळतो तेथें, जातील. सूर्य प्रात:काळीं जन्मून सायंकाळीं मृत्यु पावतो, अशी त्यांची समजूत असे. किंवा सूर्याच्या जीविताची मर्यादा एक वर्षभर आहे अशी कल्पना केली, तर सूर्याचें अल्प जीवित एक वर्ष पर्यंतच आहे, असें ते समजत. ती मुदत संपतांच सूर्य मरण पावतो असें ह्मणत. आपणही आपल्या भाषेंत हल्लीं असेंच ह्मणतों. 'जुनें वर्ष मरण पावतें' ही ह्मण आपल्या ( इंग्रजी ) भाषेंतही आहेच !

## अमृतत्व.

पण याच कल्पनेबरोबर दुसरीही एक कल्पना उत्पन्न होते. प्रकाश व चैतन्य हीं ज्याअर्थी पूर्वेकडून येतात त्या अर्थी पूर्व दिशा ही प्रकाशमान देवांचें वसतिस्थान व अमर देवांचें चिरकाल रहाण्याचें ठिकाण आहे. अशी कल्पना बहुतेक प्राचीन लोकांमध्यें आढळते. आणि जेव्हां मनुष्यदेह सोडून सद्गतीप्रत पावलेले प्राणी देवमंडळांत जाऊन वास करितात अशी कल्पना उत्पन्न झाली, तेव्हां देह सोडून गेलेले प्राणीही पूर्वदिशेस जातात असें ह्मणणें सहज आलें.

अशाच कांहीं दृष्टीनें अदिति ही अमरांची जन्मभूमि होय असें ह्मटलें आहे. वेदकवींपैकीं एकजण अशाच अर्थाचा उद्गार दर्शवून ह्मणतो, 'आह्मांस पुन्हा त्या महान् अदितीच्या स्वाधीन कोण करील,

कीं जेणेंकरून आह्मी आपल्या मातापितरांस पाहूं!' अमरत्वाचें हें स्वल्प, अत्यंत स्वाभाविक व सुंदर, असें निदर्शन नव्हे काय? हें निदर्शन संसारांत नित्य घडून येणाऱ्या गोष्टींपासून उत्पन्न होऊन मनुष्याच्या अकलुषित अंतःकरणाची जी प्रवृत्ति तिचें हें फळ नव्हे काय?

वेदापासून शिकण्यासारखी व मोठ्या महत्वाची गोष्ट ती हीच. आपले सर्व विचार, फार काय, आपले अत्यंत सूक्ष्म असे मानसिक विचारही, आपल्या इंद्रियांसमोर प्रत्यहीं घडून येणाऱ्या ज्या गोष्टी, तन्मूलक होत. श्रद्धा ह्मणून स्वतंत्र असा कांहीं पदार्थ नाहीं, तिची उत्पत्ति इंद्रियज्ञानापासूनच आहे. मनुष्य कांहीं काळ पर्यंत सृष्टीच्या या प्रेरणेकडे दुर्लक्ष करील. परंतु या प्रेरणेकडे, या उपदेशाकडे मनुष्याचें लक्ष पोंचेपर्यंत प्रतिदिनीं व रात्रंदिवस हें उपदेशाचें काम सृष्टी करीतच राहते. आणि एकदा मनुष्याचें लक्ष तिकडे पोहोंचलें ह्मणजे त्या उपदेशाचा भावार्थ अधिकाधिक स्पष्ट होत जातो. प्रथमतः सूर्याचा केवळ उदयच मनुष्याच्या मनांत अनंताच्या स्वरूपाची कल्पना उत्पन्न करण्यास कारणीभूत होतो. आणि सूर्याचा अस्त अमृतत्वाची पूर्व स्फूर्ति किंवा आद्यस्वरूप दाखविण्यास कारणीभूत होतो.

## वेदांतील धर्मविषयक अन्य कल्पना.

कांहीं कल्पना आपणांस इतक्या उदात्त व इतक्या अलौकिक वाटतात कीं, मनुष्यविचाराच्या बाल्यावस्थेंत किंवा अतिप्राचीन स्थितींत त्या त्यास सुचल्या असतील असें मानणें फार कठीण पडतें. पण वेदाच्या अंतःप्रमाणावरून पाहिलें तर असें ह्मणतां येईल कीं, मानवबुद्धीचा जेव्हां प्रथमतः उदय झाला, तेव्हांच त्या कल्पना मनुष्याच्या हृदयांत भरून राहिल्या होत्या. त्यांतली एखादी दुसरी कल्पना तपासून पाहूं. वेद खरोखर जितका प्राचीन असेल त्याहून तो अधिक प्राचीन आहे असें दाखविण्याचा माझा हेतु नाहीं. त्याच्यांत भानगड व गुंतागुंत पुष्कळ आहे हें मी पक्कें जाणतों. त्यांत एकांतएक अडकविलेल्या कड्या इतक्या आहेत कीं, त्या आपल्याच्यानें मोजवत नाहींत. आणि मनु-

ष्याच्या विचारशक्तीची प्रचण्ड पण हळू हळू झालेली वृद्धि व उन्नतदशा पाहून आपण विस्मयानें अगदीं गांगरून जातों. पण आपणांस त्यांत जें फार अर्वाचीन असें वाटतें त्याच्याच शेजारीं कांहीं प्राचीन व पूर्वकालीन असेंही पहाण्यांत येतें. मला वाटतें कीं आपण पदार्थविज्ञानापासून ( Arch & ology ) एक गोष्ट शिकावी. ती ही कीं प्रथमतांच विचारांचीं भिन्न भिन्न युगें कल्पीत बसूं नये. बरेच दिवसपर्यंत प्राचीन पदार्थविज्ञानवेत्ते असें शिकवीत असत कीं, पहिलें युग दगडाचें होतें. या पहिल्या युगांत कांशाचीं किंवा लोखंडाचीं शस्त्रें किंवा भांडीं मुळींच नवतीं. दगडाच्या युगानंतर कांशाचें युग आलें. त्या युगांत थडग्यांतूनही कांशाचीं व दगडाचीं हत्यारें पुष्कळ सांपडलीं. पण लोखंडाचें ह्मणाल तर खुणेसाठीं एकही सांपडलें नाहीं. शेवटीं आपणांस समजलें कीं तिसरें युग आलें. तेव्हां लोखंडाच्या जिनसांचा झालेला प्रसार चांगला दिसण्यांत आला. लोखंडाच्या जिनसांचा उपयोग होऊं लागण्याबरोबर दगडाच्या व कांशाच्या जिनसांपेक्षां त्यांची उपयुक्तता अधिक वाटली. या युगत्रयांच्या व त्यांसच लागून असणाऱ्या दुसऱ्या लहान विभागांच्या मानानें केलेल्या कल्पनेंत खचित कांहीं सत्य होतें. पण हें प्राचीन पदार्थविज्ञानांत प्रकट केलेलें मत गृहीत केल्यामुळें, जसा प्रत्येक प्रकारच्या ठरींव मतानें स्वतंत्र शोधाच्या मार्गांत अडथळा येतो, तसाच या मतानेंही आजपर्यंत अडथळा करण्याचा क्रम ठेविला होता. सरतेशेवटीं असें ठरलें कीं, या धातूंचा उपयोग एकीमागून एकीचा, किंवा एकाच काळीं दोघींचा होणें हें त्यांच्या स्थानिक स्थितीवर अवलंबून आहे व जेथें लोखंड खनिज ( Palustric ) किंवा औल्किक (Meteoric ) स्थितींत सहज मिळत असे, तेथें दगडाचीं शस्त्रें असून त्याच काळीं, कांशाचे पदार्थ होण्यापूर्वीं लोखंडाच्या जिनसाही मिळत होत्या.

यावरून सिद्ध होतें कीं, बुद्धीचीं स्थित्यंतरें एकामागून एक झालीं असावीं किंवा सरसनीरस विचार नियमित काळींच उत्पन्न होतात असें पूर्वीपासूनच निश्चित करून ठेऊं नये. कांहीं (Paliolithic)

दगडाच्या जुन्या शस्त्रासारखे आबडधोबड व कोते विचार वेदांत दृष्टीस पडतात खरे. परंतु त्यांच्याच सन्निध लोखंडाप्रमाणें दृढ व कांशाप्रमाणें सुप्रभ, चकचकित असे विचार दृष्टीस पडतात. हे थोर व उदात्त अशा विचारांच्या संन्निध वेडेवांकडे कापलेले जे चकमकीचे तुकडे सांपडतात ते त्या विचारांपेक्षां अधिक प्राचीन आहेत असें आपल्याच्यानें ह्मणवेल काय? मी ह्मणतों, कदाचित् असतील असें जरी धरून चाललों, तथापि त्यांचा कर्ता कोण आहे, ज्याच्या डोक्यांत असल्या उदात्त कल्पना आल्या तो कोण कसा असावा, हा तर विचार कराल? या जगांत विलक्षण किंवा अलौकिक बुद्धीचे पुरुष निपजतात व अशा पुरुषांस वर्षांची, काळाची किंवा स्थलाची, अशी कोणतीही मर्यादा कोणत्याही रीतीनें प्रतिबंधक होत नाहीं ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. ज्यांचा आपल्या ठिकाणीं व आपल्या आसपासच्या जगताच्या ठिकाणीं पूर्ण विश्वास आहे व भाव आहे अशा व्यक्तींच्या—अशा माणसांच्या मनांत एक वेळ जी गोष्ट येते ती अशी वज्रलेप व दृढ असते कीं, हजारों वेळां शोध करून निर्णय केलेल्या गोष्टींची बरोबरी तिला असते, असें ह्मटलें पाहिजे.

सृष्टींतील चमत्कार, त्या चमत्कारांस दिलेलीं नांवें व त्या चमत्कारांचे प्रतिनिधि ह्मणून कल्पिलेले देव, इत्यादि प्रकारचे अनेक भेद जो खरा तत्ववेत्ता आहे त्याच्या मनांतून प्रातःकाळच्या धुक्याप्रमाणें एकाच कल्पनेच्या प्रभावानें नाहींसे होतात. आणि वेदगत काव्यांत उपलब्ध होणाऱ्या भाषेनें तो असें ह्मणतोः 'जरी कवि त्यास (परमेश्वरास) अनेक नांवांनीं हांका मारितात तरी तो वस्तुतः एकच आहे!' (एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति).

कवींनीं दिलेलीं जीं अनेक नांवें त्यांचा परित्याग विद्वानांकडून व तत्ववेत्त्यांकडून होण्यापूर्वीं तीं प्रचारांत आलीं असतील एवढें आपणांस कबूल केलेंच पाहिजे. ठीक आहे. पण कवींनी इंद्र, मित्र, वरुण, किंवा अग्नि यांची आराधना करण्याचें काम युगाचीं युगें जेव्हां चालूं असेल, त्याच कालीं आर्यावर्तांत कांहीं तत्वज्ञ पुरुषांनीं देवांचीं अनेक

नांवें, अनेक मंदिरें व अनेक कथा यांजविरुद्ध हिरॉक्लिटॉस्* यासारखा मोठ्या निकरानें वाद केला असेल व तो वाद बहुत काळपर्यंत अगदीं निष्फळ झाला असेल.

## सृष्टिनियमाची कल्पना.

पुष्कळ लोकांचें असें ह्मणणें आहे कीं अगदीं प्राचीन काळच्या जंगली व अडाणी लोकांस सृष्टिक्रमाची किंवा सृष्टिनियमाची कल्पना खचित नव्हती. ड्यूक ऑफ् आर्गाइल् यांनीं ‘सृष्टिनियमांचें साम्राज्य’ किंवा ‘नियमांचें राज्य’ अशा नांवाचा एक अत्यन्त उपयुक्त ग्रंथ केला आहे. या ग्रंथाच्या नांवाचें भाषांतर ग्रीक व लॅटिन् या दोन भाषांत करणें फारच कठिण आहे. असें आहे, तथापि विचार करितां सृष्टिनियमाची किंवा सृष्टिक्रमाची ही कल्पना जितका वेद प्राचीन आहे तितकीच ती प्राचीन आहे असें दिसून येईल.

‘असंवेद्य मेंदूचे व्यापार’ (Unconscious cerebration) ह्मणजे, कांहीं उत्तम विचार आपोआप यदृच्छेनें सुचणें, या विषयावर आलीकडे पुष्कळ भारूड लिहिलें असून या मानसिक चमत्काराचें किंवा मनोव्यापाराचें अतिशयोक्तिपूर्वक वर्णन केलें आहे. एका दृष्टीनें पहातां या गोष्टींतील तथ्य आजकाल देखील आपल्या आढळण्यांत येतें. अद्यापिही भाषेच्या साधनानें अथवा द्वारानें बोलून दाखवितां येत नाहींत असे पुष्कळ मनोधर्म किंवा मानसिक क्रिया उपलब्ध होतात.

त्यांस आपण ‘असंवेद्य’ किंवा ‘अपरिज्ञात’ असें ह्मटलें असतां चालेल. आपल्या इंद्रियांवर निरंतर हजारों ठसे वठत असतात. त्यांपैकीं बहुतेक आपणांस नकळत निघून जातात व आपल्या स्मृतिरूप पटावरून अगदीं पुसून गेल्यासारखे वाटतात. परंतु एकदां ज्याचा छाप बसला, एकदां ज्याचा ठसा वठला, तें अगदीं साफ पुसून जाणें ही गोष्ट

---

* एक युनानी (ग्रीक) तत्ववेत्ता. तो हें जगत् अग्नीनें बनविलें आहे असें ह्मणे व अग्नीला आपला ईश्वर मानी.

सृष्टींत घडतच नाहीं. कारण 'शक्तिसंचया'[१] चा नियम ह्या गोष्टीस प्रतिबंधक होतो. प्रत्येक छाप, प्रत्येक ठसा, आपली कांहीं तरी खूण मागें ठेवतोच ठेवतो. आणि याप्रमाणें एकसारखें सतत घडत गेल्यामुळें या खुणांचे पुसट पुसट ठिपके एकत्र होऊन शेवटीं एक स्पष्ट ओळ बनते. अशा ओळी होतां होतां शेवटीं आपल्या मनाच्या नकाशाचा पृष्ठभाग व त्यावरील स्पष्ट व अस्पष्ट वर्ण दृश्यमान होऊन स्मृतिपटावरील समग्र चित्र दिसूं लागतें!

असो. याप्रमाणें सृष्टीचे ते प्रचण्ड व मनावर विलक्षण ठसा उठविणारे आद्यचमत्कार आपल्या महत्वानें व प्रभावानें मनुष्याच्या अंतःकरणांत विस्मय, भीति, आश्चर्य व आनंद इत्यादि विकार उत्पन्न करीत असतां नित्यशः तेच तेच पदार्थ वारंवार दृष्टीस पडल्यानें, रात्रंदिवस त्यांच्या त्या पुनः पुनः येण्यानें, वद्य पक्ष व शुद्ध पक्ष यांतील चंद्राच्या क्षयवृद्धीनें, भिन्न भिन्न ऋतूंच्या यथाक्रम आगमनानें, नक्षत्रांच्या तालांत असणाऱ्या अविश्रान्त एकसारख्या गतीनें, त्यांच्या मनावर एक दृढ ठसा वठला व चित्तास विश्रान्ति, आनंद व धैर्य देणारी एक उत्तम कल्पना त्यांस सुचली. हा भाव, ही प्रतीति, किंवा ही कल्पना आधुनिक भाषेच्या द्वारानें दर्शविणें फारच कठीण आहे. 'Our feeling at home' या इंग्रजी वाक्याचा बरोबर अर्थ फ्रेंच किंवा इटालियन् भाषेंत दर्शविणें हल्लींही जसें अत्यंत कठीण आहे, तशीच ही वर सांगितलेली वेदकालीन कल्पना, किंवा विचार आजकाल आमच्या भाषेच्या द्वारें दुसऱ्यास समजविणें परम दुर्घट आहे. आपणांस रुचेल तर आपण या कल्पनेस 'मेंदूचा अनभिज्ञात व्यापार' (Unconscious cerebration) असें नांव द्या. ही क-

---

१ पदार्थविज्ञानशास्त्राचा आलीकडे असा एक सिद्धांत ठरला आहे कीं सृष्टींत जे अनेक चमत्कार घडतात त्यांचीं कारणें निरनिराळ्या शक्ति होत. या शक्तीची बेरीज ठरींव असून त्यांत कांहीं कमी जास्त होत नाहीं. हा 'शक्तिसंचय' परिमित आहे व त्याचा नाश होत नसून स्वरूपान्तर मात्र होतें. 'शक्तिसंचया' ची मुद्दल रकम जशीचे तशीच नित्य कायम रहाते. भा. कर्ता.

ल्पना अशी आहे कीं, जे अनेक प्रकारचे बारीकसारिक विचार एकत्र होऊन ती बनली आहे ते विचार एकदां आपल्या ध्यानांत येऊन चुकले व समजण्याजोग्या शब्दांनीं ते दर्शवितां आले कीं लागलीच ती कल्पना आपल्या मनांत मूर्तिमंत उभी राहते.

**ग्रीस** व **रोम** येथील प्राचीन विद्वानांनीं ही कल्पना अनेक प्रकारच्या शब्दांनीं दर्शविली आहे असें आढळतें. **हिरॅक्लिटस्** ह्मणतो कीं, 'हेलियोस् ( सूर्य ) आपली मर्यादा उल्लंघून जाणार नाहीं ! ह्मणजे सूर्याला जो मार्ग लाऊन दिला आहे त्याचें अतिक्रमण करून तो जाणार नाहीं.' या त्याच्या बोलण्याचा अर्थ काय? याच तत्ववेत्त्यानें दुसरे एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'सूर्य आपल्या मर्यादे बाहेर गेलाच तर ही गोष्ट एरिनिस् ( सत्याला साहाय्य करणारा देव ) याला समजेल !' या वाक्याचा तरी काय अर्थ समजावा बरें? मला वाटतें कीं त्या **ग्रीक** तत्वज्ञाच्या मनांत सृष्टिक्रमाची अथवा सृष्टिनियमाची कल्पना पूर्ण बिंबून राहिली असावी. सृष्टीच्या समग्र व्यवस्थेंत एक अस्खलित नियम दृष्टीस पडतो. त्या नियमाअन्वयें हेलियॉस् ( सूर्य ) याला चालणें भाग आहे. मग हा प्रत्यक्ष सूर्य असो किंवा सूर्यमण्डलान्तर्गत कोणी देव असो! हीं सृष्टिनियमाची कल्पना **ग्रीक** लोकांच्या तत्वविज्ञानांत जिकडे तिकडे भरून राहिली आहे. धर्माविषयीं विचार करितां मला वाटतें कीं ही कल्पना **ग्रीक** 'मोइरा' ('नशीब,' 'दैव') या शब्दाच्या उत्पत्तीचें मूळबीज असावें. **रोमन्** तत्वज्ञांच्या ग्रंथांत प्राचीन व स्वतंत्र असे विचार सांपडण्याचा फारसा संभव नाहीं. तथापि सिसरोचें[१] एक प्रख्यात वाक्य आहे, त्यांत **हिरॅक्लिटॉस्** यानें प्रदर्शित केलेल्या विचाराची फार चांगली योजना केली आहे. तें वाक्य येणेंप्रमाणें:— 'मनुष्याच्या जीविताचा हेतु अंतरिक्षांतील पदार्थांच्या नित्यक्रमाचें व नियमित गतींचें मनन करणें एवढाच नव्हे; तर त्या नित्यक्रमाचा व स्थिरतेचा कित्ता पाहून आपलें वर्तन त्याप्रमाणें त्यानें स्थिर व नियमित ठेवावें हा आहे.' वेद-

---

१ एक विख्यात **रोमन्** पंडित व वक्ता.

कवींनींही हाच विचार अत्यंत सरळ व सुबोध भाषेनें प्रदर्शित करण्याचा यत्न केला आहे, असें आपणांस पुढें दिसून येईल.

'अनन्तत्व' या कल्पनेच्या मूळ उत्पत्तीचा शोध करीत असतां जो प्रश्न उत्पन्न झाला होता तोच प्रश्न आतांही येथें उत्पन्न होतो. तो कोणचा? तो हा. सृष्टींत दिसून येणारी व्यवस्था, क्रम, किंवा नियम अशा संबंधाची कल्पना मूळ उत्पन्न झाली कशी? तिला कोणतें नांव दिलें असावें? व तिजविषयीं सर्वांस समजण्याजोगा शब्द कोणता योजिला असावा? मला वाटतें तो शब्द संस्कृत 'ऋत' हा असावा. हा शब्द फार महत्वाचा असून आर्यावर्तांतील धर्मविषयक काव्यरूप जी वीणा तिचा हा आद्यस्वर किंवा षड्ज्य होय. असें असतां ब्राह्मणांच्या प्राचीन धर्माविषयीं ज्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत त्यांनीं या शब्दाबद्दल एक अक्षरही लिहिलें नाहीं.

## संस्कृत ऋत.

बहुतेक सर्व देवांस ऋत शब्दापासून निघालेलीं गुणदर्शक विशेषणें देण्यांत आलीं आहेत. या शब्दाचे दोन अर्थ आहेत. पहिला हा आहे कीं, देवांनीं सृष्टीस नियम लावून दिले आहेत व सृष्टि त्यांची आज्ञा मानिते; ह्मणजे, त्या नियमांस अनुसरून चालते. दुसरा अर्थ हा आहे कीं, सृष्टींत कांहीं निश्चित व्यावहारिक नियम असून ते मनुष्यांनीं मानिले पाहिजेत. जे त्यांचें उलंघन करितात त्यांस देव शिक्षा करितात. देवांचीं केवळ नांवें व सृष्टींतील विवक्षित चमत्कारांशीं त्या नांवांचा संबंध, याचें ज्ञान होण्यापेक्षां अशीं गुणदर्शक विशेषणें, धर्माविषयीं परिज्ञान करून देण्याचे कामांत फार उपयुक्त आहेत. परंतु त्यांचा खरा अर्थ समजणें हें फार कठीण काम आहे.

ऋत सारख्या शब्दांचे अनेक अर्थ कित्येक वेळां एकाच मंत्रांत दृष्टीस पडतात. मंत्रकर्त्या कवीसही त्या अर्थांमधील भेद चांगला स्पष्ट रीतीनें सर्वत्र समजला असेल असें दिसत नाहीं. मग जें काम कवींनीं स्वतां केलें नाहीं, तें करण्यास थोडेच टीकाकार धजतील!

ज्यावेळेस आपण नियमाविषयीं बोलत असतों, त्यावेळेस नियम शब्दानें जो अर्थ दुसऱ्यास समजविण्याची आपण इच्छा करीत असतों, तो खुद्द आपण तरी नेहेमीं समजत असतों काय? हल्लींच्या विद्वानांपेक्षां प्राचीन कालचे कवि अधिक निश्चयात्मक बोलणारे व अधिक विचार करणारे होते, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

इतकी गोष्ट खरी कीं, ज्या ज्या ठिकाणीं 'ऋत' शब्द आढळतो त्या त्या ठिकाणीं त्याचा अर्थ स्पष्ट रीतीनें दर्शविलेला नसतो. 'नियम,' 'व्यवस्था' किंवा 'पवित्र रूढि,' 'यज्ञ,' इत्यादि अनेक अर्थ या 'ऋत' शब्दाचे भिन्न भिन्न स्थळीं आढळतात. पण वेदमंत्रांचीं जेवढीं भाषान्तरें झालीं आहेत, त्यांतून या प्रचण्ड व अर्थप्रचुर शब्दाचा निश्चयात्मक अर्थ काय करावा, असा विचार केला तर निराशा होऊन तें भाषांतराचें पुस्तक मिटून स्वस्थ बसण्याचाच प्रसंग येतो. त्रिस्तवाचा देव जो 'अग्नि' तो किंवा दुसरा एखादा सौर्य देव घ्या आणि त्या शब्दाचा अर्थ करूं लागा. 'दिव्य सत्यापासून प्रथम उत्पन्न झालेला' असा अर्थ केला, तर या भाषान्तरापासून वाचकांस काय कल्पना होईल तें मला समजत नाहीं. आमच्या सुदैवानें ऋत शब्द ज्यांत आला आहे अशीं बरींच वाक्यें वेदांत उपलब्ध आहेत. त्यामुळें त्या शब्दाचे अनेक अर्थ हळू हळू कसे होत गेले, हा इतिहास समजण्यास एक मोठें साधन आहे.

आतां या प्राचीन शब्दरूप ज्या मोडक्या इमारती, त्यांची पुनः उभारणी करणें व त्यांचें पूर्वस्वरूप दाखविणें, या कामीं आपणांस बऱ्याच अंशीं कल्पनेवर अवलंबून राहिलें पाहिजे. तेव्हां मी आतां या ऋत शब्दाचा मूळ अर्थ काय होता व कालवशात् त्याचे अर्थ कसकसे बदलत गेले, तें दाखविण्याचा यत्न करितों. अर्थात् हा केवळ यत्न असून बहुतेक तर्कांच्या बळावर याची रचना करायाची आहे.

### ऋत या शब्दाचा मूळ अर्थ.

सूर्य व आकाशांतील अन्य स्थूळ पदार्थ यांची निश्चित गति दर्श-

विण्याकरितां मूळ ऋत शब्द उत्पन्न झाला असा माझा समज आहे. ऋ=जाणें, या धातुपासून ऋत हें धातुसाधित विशेषण झालें आहे. त्याचा अर्थ 'जोडलेलें,' 'योजिलेलें,' 'ठरलेलें,' असा आहे. किंवा 'गेलेला,' 'जाणारा' अथवा 'जाण्याचा मार्ग' असाही होईल. मला स्वतांला हा दुसरा अर्थ बरा वाटतो व ह्याच धातुपासून 'निर्ऋति' हा शब्द झाला आहे असें माझें मत आहे. 'निर्ऋति' या शब्दाचा अक्षरशः अर्थ पाहूं जातां 'निघून जाणें' असा मूळ असून पुढें 'क्षण,' 'नाश,' 'मृत्यु' असा अर्थ झाला. त्यानंतर बऱ्याच काळानें 'नाशाची जागा,' 'खाडा,' असा होऊन शेवटीं 'नरक' असा झाला!

सूर्य उदयास येऊन अस्तास जाण्याचा जो त्याचा नित्यक्रम किंवा मार्ग, ज्या मार्गानें उषा, दिवस व रात्र, आणि त्यांचे अनेक प्रतिनिधी जातात, व जो मार्ग रात्र व अंधकार यांच्या संबंधाच्या ज्या देवता त्यांस अडवितां येत नाहीं; तोच खरा मार्ग, तेंच खरें व चांगलें कर्म, तीच खरी गति*, अशा प्रकारची कल्पना सहजच अल्प काळांत उत्पन्न झाली.

सूर्याची दैनंदिन गति, किंवा सूर्य आकाशांत ज्या मार्गानें जातो तो मार्ग, याचा बोध ऋत शब्द करीत नव्हता. तर सूर्याला लाऊन दिलेला मार्ग किंवा ज्या स्थळापासून निघून पुनः त्या स्थळीं तो येतो तें स्थळ असा अर्थ, वैदिक कवि ऋत शब्दाचा उपयोग करीत असतां त्यांच्या मनांत असावा असें वाटतें. आणि ह्मणून ते 'ऋताचा मार्ग' अशा ह्मणींचा उपयोग करितात. त्या ह्मणीचें भाषांतर 'योग्य मार्ग' असेंच आपणांस केलें पाहिजे. तथापि त्यांच्या मनांतला खरा अर्थ पाहतां असा दिसतो कीं, अज्ञात अशा ज्या शक्तीनें किंवा सत्तेनें सूर्याला नियमित मार्ग लाऊन दिला, त्या शक्तीला किंवा सत्तेला 'ऋत' असें नांव त्यांनीं दिलें.

अदिति= अनंत, अपरिमित, हें नांव प्रथमतः पूर्व दिशेला दिलें

---

* ऋग्वेद, ७, ४०, ४.

होतें; कारण प्रत्येक दिवशीं सकाळीं ही पूर्व दिशा आकाशा पलीकडे अनंत असा प्रान्त प्रकट करिते व त्या प्रान्तांतून सूर्य आपल्या नित्य-क्रमणासाठीं बाहेर पडतो. ही गोष्ट जर तुह्मी ध्यानांत ठेवाल तर 'ऋत' ह्मणजे जें स्थळ किंवा जी सत्ता सूर्याच्या मार्गाचें नियमन अथवा निरूपण करिते, तिला वेदांत अनेक प्रसंगीं अदिति असेंही ह्मटलें आहे, याचें आपणांस आश्चर्य वाटणार नाहीं. ज्याप्रमाणें उषा ही अदितीचें मुख होय असें ह्मटलें आहे, त्याप्रमाणें सूर्य हा ऋताचें तेजस्वी मुख होय असें ह्मटलेलें आढळतें. फार काय, कांहीं ठिकाणीं महान् ऋत याची योग्यता 'द्यावा पृथ्वी' व 'अदिति' यांच्या जवळ जवळ आहे असें सांगितलें आहे. ऋत याचें वसतिस्थान अर्थात् पूर्व दिशा होय. या संबंधानें एक दंतकथा वेदांत उपलब्ध आहे. ती अशी. 'उजेड आणणारे देव रोज सकाळीं जिच्यांत चोर लपून बसतो अशी ती अंधकारमय गुहा फोडून टाकतात व गाई सोडवून आणितात.' तुमच्या लक्षांत येईल कीं, ही दंतकथा ह्मणजे एक सुंदर रूपक आहे.

या रूपकांत 'गाई' ह्मणजे 'दिवस' व अंधकार किंवा रात्र हीच गुहा. या गाई आपल्या अंधकारमय गोठ्यांतून निघून हळू हळू आकाशरूप जें सुप्रकाशित मौजेचें कुरण तेथें चरण्याकरितां येतात. असो. हेंच रूपक पुढें पहावें तों थोडें बदललेलें आढळतें. रोज सकाळीं सूर्य आपले घोडे रथाला जोडतो व साऱ्या विश्वावर प्रवास करितो, अशी कल्पना करून ज्या ठिकाणीं त्याचे घोडे सुटतात तें ठिकाण ऋताचें आहे असें ह्मटलें आहे.

कोठें कोठें असें ह्मटलें आहे कीं उषा या ऋताच्या गुहेंत रहातात. उषारूप गाई कशा परत आणिल्या, उषेनें स्वतां इंद्र व इतर देव यांस, चोरून नेलेल्या गाई, किंवा चोरून नेलेलें भांडार, रात्रिरूप अंधार-

---

१ ऋ० ६, ५१, १. ३ ऋ० १०, ६८, ४.
२ ऋ० १०, ६६, ४. ४ गाई ह्मणजे क्षितिजा पलीकडे वहात जाणारे ढग, असाही अर्थ होतो.
५ ऋग्वेद, ५, ६२, १. ६ ऋ० ३, ६१, ७.

कोठडींत किंवा गोठ्यांत कोंडून ठेविलें असतां, कसें परत आणिलें, वगैरे संबंधाच्या पुष्कळ गोष्टी वेदांत सांगितल्या आहेत.

## शरमा हिची गोष्ट.

यापैकीं साऱ्यांत लोकप्रिय अशी एक गोष्ट आहे ती ही कीं, एके दिवशीं इंद्रानें शरमेला ( ह्मणजे उषेला ) गाई जिथें कोठें लपून राहिल्या असतील तेथें जाऊन त्या हुडकून काढण्यास पाठविलें. जेव्हां शरमेनें गाईंचा शब्द ऐकला तेव्हां तिनें येऊन इंद्रास तें वर्तमान कळविलें. इंद्रानें त्या चोरांशीं युद्ध केलें आणि त्या प्रकाशमान् गाई सोडवून आणिल्या.

या शरमेला पुढें इंद्राच्या कुतरीचें स्वरूप प्राप्त झालें. या कुतरीच्या पुत्रांस सारमेय असें नांव पडलें. प्रोफेसर् कुहन् यांनीं हें सारमेय नांव व ग्रीक भाषेंतील ज्युपितराच्या कुतऱ्यांचीं नांवें हरमेयॉस् किंवा हरमीस् हीं दोन्ही मूळ एकच आहेत असें सिद्ध केलें. यावरून प्राचीन आर्यांच्या पौराणिक दंतकथांचा परस्पर संबंध समजण्यास एक योग्य मार्ग सांपडला व तेणेंकरून या परम गूढ विषयाचें विवेचन करण्यास एक मोठें साधन मिळालें. असो. ही उषेचा मार्ग दाखविणारी पुरातन शरमा हिला त्या गाई सांपडल्या कशा ह्मणाल, तर एक वेदकवि सांगतोः–'ती ऋताच्या मार्गानें गेली; ह्मणजे, योग्य मार्गानें गेली. अथवा ऋताप्रत गेली; ह्मणजे योग्य स्थळाप्रत गेली.'[1] दुसरा एक कवि ह्मणतोः 'जेव्हां शरमेला ती खडकांतील गुहा सांपडली तेव्हां जो जुना मोठा रस्ता त्याच रस्त्यानें थेट सरळ गेली. चपळ पायांची ती शरमा ती त्या रस्त्यानें एकसारखी पुढें जाऊं लागली आणि त्या अमृत व अक्षय्य अशा गाईंचा ध्वनि ऐकून प्रथम ती त्यांच्याकडे गेली [ ऋग्वेद. ३,३१,६.]

या ऋचेंत देव व त्यांचे सहचर जे प्राचीन कवि त्यांनीं गाई ( दिवसाचा प्रकाश ) परत मिळण्याविषयीं यत्न करीत असतां अनुसरलेला

---

१ ऋ०, ५,४५,७. 'ऋतं यती शरमा गाः अविन्दत्'; ५,४५,४.

जो मार्ग त्यालाच 'ऋताचा मार्ग' असें ह्मटलें आहे. परंतु दुसऱ्या एका ठिकाणीं इंद्रानें व त्याच्या मित्रांनीं एकत्र होऊन वल नांवाचा जो गाई हरून नेणारा चोर, त्याला त्याच्या गुहेंतच फाडून त्याचे तुकडे तुकडे केले. पण हें करण्याच्या अगोदर, ऋताचा किंवा योग्य स्थळाचा शोध त्यांनीं लाविला होता[1]'.

तें सत्य, अचल, चिरंतन असें स्थळ कोणचें असावें बरें? अर्थात् ज्या स्थळापासून देवांनीं आकाश व पृथ्वी यांची दृढ स्थापना केली तेंच स्थळ.

वरुण एका ठिकाणीं असें ह्मणतो कीं 'ऋत या बैठकीवर मी आकाश सांवरून धरिलें आहे.[2]' पुढें ऋत याचा 'सत्य' असा अर्थ होऊन हें ऋत, जें जें कांहीं जगांत आहे त्या सर्वांचा अखण्ड पायाच आहे असें मानूं लागले.

'ऋताचा मार्ग' ही ह्मण वेदांत वारंवार आढळते. आणि उषा, सूर्य, रात्र व दिवस हे हाच मार्ग अनुसरतात असें ह्मटलें आहे. तेव्हां या वाक्याचा सरसकट अर्थ करण्याचा एक मार्ग दिसतो तो हा कीं, 'सत्याचा मार्ग किंवा सत्यमार्ग'.

उषेस[3] अनुलक्षून ह्मटलें आहे:—

'ती (उषा) ऋताचा मार्ग अनुसरते, ह्मणजे योग्य मार्गानें जाते. आणि ज्या प्रांतांतून ती जाते ते तिच्या पक्क्या माहितीचे आहेत असें वाटतें. कारण, ती त्यांस सोडून जातच नाहीं.—रस्ता चुकतच नाहीं.

'आकाशांत उत्पन्न झालेली जी उषा[4] तिचा उदय योग्य मार्गावर झाला. ती आपलें वैभव प्रकट करून जवळ आली. दुष्ट पिशाचांस तिनें हांकून लावलें व दुष्ट अंधकारही तिनें नाहींसा केला.'

सूर्यास[5] उद्देशून ह्मटलें आहे:—

---

१ ऋग्वेद, १०,१२८,१. २ कित्ता. ४,४२,४. ३ कित्ता. १,१२४, ३४,८०,४.
४ ऋग्वेद, ७,७५,१. ५ कित्ता. ६,८६,५.
,, १०,९२,४.
,, ७,४४,५.

'सवितृ देव योग्य मार्गावर परिश्रम करतो. ऋताचें शिंग पुष्कळ लांबपर्यंत ऐकूं जातें. मोठमोठ्या कुशल योद्ध्यांशींही ऋत टक्कर मारतो.' जेव्हां सूर्य उगवतो, तेव्हां ऋताचा मार्ग सूर्यकिरणांनीं परिवेष्टित होतो असें सांगतात. आणि 'हीलियॉस् (सूर्य) आपली मर्यादा सोडणार नाहीं' असा उद्गार हिरॅक्लेटास् नांवाच्या एका ग्रीक ब्रह्मज्ञानी पंडितानें काढिला होता, तसाच उद्गार ऋग्वेदांतील एका ऋचेंत आढळतो. तो असाः—'सूर्य आपल्या नेमिलेल्या स्थळांस किंवा मर्यादांस दुखवीत (उल्लंघित) नाहीं.'

या ठिकाणीं ज्याला ऋताचा मार्ग असें ह्मटलें आहे त्याला अन्य स्थळीं 'रुंद मार्ग' (जातु), असें ह्मटलें आहे. ऋताप्रमाणें हा जातु (मार्ग, रस्ता) प्रातःकालदर्शक ज्या प्राचीन देवता होत्या त्यांमध्यें गणिला आहे. रात्र व दिवस, हे ज्या मार्गानें एकामागें एक असे प्रवास करितात ह्मणून सांगितलें आहे, तोच हा मार्ग होय. आणि ज्याअर्थी हा मार्ग दिवसानुदिवस कमी जास्त होत जातो, त्याअर्थी दिवस व रात्र, अश्वी देवांची जोडी, व याच सारख्या इतर देवता, ज्या मार्गांनीं प्रवास करितात असे अनेक मार्ग आहेत, ह्मणून ह्मटलें आहे.

या संबंधानें दुसरी एक गोष्ट मोठ्या महत्वाची व ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती हीः 'ऋतस्य पन्था,' ह्मणजे ऋताचा मार्ग असें ज्यास ठिकठिकाणीं ह्मटलें आहे हा मार्ग, वैदिक देवांपैकीं जो अत्यंत प्राचीन देव राजा वरुण त्यानें सूर्याकरितां मुद्दाम केला आहे, असें सांगितलें आहे (१,२४,८.). कारण, यावरून कांहीं ठिकाणीं 'वरुणाचा नियम' असें ज्यास ह्मटलें आहे, त्यासच अन्यस्थळीं 'ऋताचा नियम' असें ह्मटलें आहे. सारांश, सर्वव्यापक किंवा सर्वांचें

१ ऋग्वेद १,१३६,२.
,, १,४६,११.

२ किता ३,३०,१२.१,१२३,९.
,, १२४,३.

३ ऋ०, १,१३६,२.

४ ऋ०, ३,३१,१५.

५ ऋ०, १,११३,३.

६ ऋ०, ८,२२,७.

७ ऋग्वेद, १,१२३,८–९, 'वरुणस्य धाम, ऋतस्य धाम.'

आवरण जें आकाश, त्यानें ऋत हें नांव पावलेली जी स्वतंत्र शक्ति तिला नियमित व मर्यादित करून टाकिलें, असा भाव दर्शविला आहे.

देवांनीं 'अंधकारात्मक शक्तींस' किंवा पिशाचांस 'सरळ मार्ग' किंवा 'सत्याचा मार्ग' अनुसरून पराजित केलें, अशी एकदां समजूत झाल्यावर मग अर्थात् त्या देवांच्या स्तावकांनीं किंवा पूजकांनीं 'आह्मांस तो सत्यमार्ग अनुसरूं द्या' अशी प्रार्थना देवाजवळ केली. एका स्थळीं असें ह्मटलें आहे: 'हे इन्द्रा! आह्मांस ऋताच्या मार्गाप्रत ने. सर्व विघ्नांस उल्लंघून जाण्याचा जो सरळ मार्ग तो आह्मांस दाखीव.' 'हे मित्रावरुणहो! जसा कोणी नौकेंत बसून पाण्याचा मार्ग आक्रमितो, त्याप्रमाणें तुमच्या सत्यमार्गावर सर्व विघ्नें पार पडून आह्मी जाऊं असें करा.'[२]

मित्रावरुण हे देव, महान् ऋत याची स्तुति गातात असें[३] एका ठिकाणीं ह्मटलें आहे. दुसरा एक कवि ह्मणतोः 'मी ऋताचा मार्ग योग्यपणें अनुसरितों'[४] दुष्ट आचरण करणारे लोक ऋताचा मार्ग कधींही अनुसरत नाहींत.

### ऋत=यज्ञ.

प्राचीन यज्ञयागादि सूर्याच्या गतीवर कसे अवलंबून असत; सूर्योदय, मध्यान्हकाळ व सायंकाळ अशा निरनिराळ्या काळीं करावयाचे नित्ययाग कसे नियमानें करावे लागत; अमावास्या व पौर्णिमा, तीन ऋतु, सूर्याच्या वार्षिक व अर्धवार्षिक गति, अशा अनेक संबंधांचे याग कसे करावे लागत; या गोष्टी लक्षांत आणिल्या असतां प्रत्यक्ष यज्ञाला हळू हळू 'ऋताचा मार्ग' असें कां ह्मणूं लागले तें सहज आपल्या ध्यानांत येईल.

---

१ ऋग्वेद, १०,१३३,६.
२ ऋ०, ७,६५,३.
३ ऋ०, ८,२५,४.
४ ऋ०, १०,६६,१३.
किंवा १,१५१,४-६.
५ ऋ०, २,३,६.
६ मनु, ४,२५,२६.
७ ऋ०, १,१२८,२.
— १०,३१,२.

शेवटीं ऋत या शब्दाचा अर्थ 'नियम' किंवा 'कायदा' असा झाला. कांहीं स्थळीं ज्या नद्या ऋताचा मार्ग अनुसरितात, असें ह्मटलें आहे त्याच अन्यस्थळीं 'ऋतास अनुसरतात' किंवा 'वरुणाचा नियम पाळतात' असें ह्मटलें आहे. याप्रमाणें ऋत शब्दाचे आणखी अनेक अर्थ आहेत. परंतु त्या सर्वांचा विचार करण्याची आपणांस जरूर नाहीं. तथापि इतकें सांगणें जरूर दिसतें कीं, जसा ऋत या शब्दाचा हळू हळू 'सरळ, योग्य, खरें, चांगलें' असा अर्थ झाला, तसाच 'अनृत' या शब्दाचा अर्थ 'खोटें, वाईट, अयोग्य' असा झाला.

## ऋत शब्दाचा अर्थ.

वेदांतील या ऋत शब्दाची यथार्थ कल्पना आपणांस करितां यावी ह्मणून मी एवढा वेळ यत्न केला तो कितपत सफळ झाला असेल तो असो! प्रथमारंभीं त्या शब्दाचा अर्थ, या विश्वाची नियतगति; ह्मणजे, सूर्य, प्रातःकाळ व सायंकाळ, रात्र व दिवस यांचा अस्खलित क्रम, असा असून या गतीची मूळ किल्ली दूरच्या पूर्व दिशेंत आहे असें त्यांस कसें वाटूं लागलें—ऋताची मूर्ति त्यांस आकाशांतील पदार्थांच्या मार्गांवर कशी दिसून आली व ज्या सरळ मार्गावर देवांनीं अंधकारांतून प्रकाश आणून सोडिला तोच मार्ग मनुष्यानें अनुसरावा, तो अंशतः यज्ञयागादि करण्याच्या संबंधानें व अंशतः आपल्या एकंदर वर्तणुकीच्या संबंधानें अनुसरावा—अशी कल्पना कशी बनली, या गोष्टींचा आपण विचार केला.

..या प्राचीन कल्पनांचा विचार कारितांना त्यांत फारशी व्यवस्था किंवा नियमितपणा आढळणें कठीण आहे. कारण, त्या स्थितींत असा कांहीं प्रकार असण्याचा संभवच नव्हता.

त्यांच्या त्या कवित्वविशिष्ट कल्पना एकदां वाढूं लागल्या ह्मणजे पाहिजे तिकडे वाढत जात. त्यांचा परस्पर संबंध अतिनिकट नसून पक्षांच्या उड्डानाप्रमाणें त्यांत प्रकार होता. तेव्हां या जुन्या शब्दांच्या

अनेक अर्थांची उपपत्ति करणें ती अशा दृष्टीनेंच केली पाहिजे, एवढी गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

### भाषान्तर करण्याच्या अडचणी.

अशा प्रकारच्या विवेचनामध्यें मुख्य अडचण येते ती अशी असते कीं, आपणांस प्राचीन विचार अर्वाचीन भाषेनें प्रदर्शित करावे लागतात. तेव्हां, हें काम करीत असतां ज्या अनेक अडचणी येतात, त्या अपरिहार्य व स्वाभाविक आहेत, एवढी गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

ऋत या शब्दाचा अपभ्रंश झेंद भाषेंत 'अश' असा झाला.

परंतु या वैदिक ऋत शब्दाच्या तोडीचा व योग्यतेचा शब्द दुसऱ्या कोणत्याही आर्यभाषेंत आढळत नाहीं; त्यामुळें तो द्यौस् व झ्यूस् या शब्दांप्रमाणें आर्य प्रजांची प्रथमच तुटातूट होण्यापूर्वींचा असावा असें अनुमान करितां येत नाहीं. तो इतका पुरातन असेल असें मानण्यास कांहीं सबळ प्रमाण दिसत नाहीं. असें आहे, तथापि, ज्यांचा धर्म झेन्द अवेस्ता नांवाच्या ग्रंथांत आपणांस आढळतो असे इराणी लोक, व ज्यांचे पवित्र पुरातन मंत्र वेदग्रंथांत अद्यापि उपलब्ध होतात असे आर्यावर्तांतील लोक, ज्याकाळीं एकमेकांपासून विभक्त झाले, त्याच्या अगोदरचा हा ऋत शब्द असून त्याचा अर्थ त्या काळच्या लोकांस चांगला कळत होता, हें आपणांस सिद्ध करितां येईल. मूळ आर्य भाषेच्या या दोन शाखा—ह्मणजे, संस्कृत व झेन्द—आग्नेयी दिशेकडे पसरत जाऊन वायव्य दिशेकडे वळलेल्या इतर सर्व भाषांपासून विभक्त झाल्यानंतरही बरेच दिवस एकत्र राहिल्या असाव्या, असें अनुमान बरेच दिवसांपूर्वीं इतिहासज्ञांनीं करून ठेविलें आहे. कित्येक शब्द व कित्येक विचार आर्य भाषेच्या या दोन्ही शाखांस सामान्य आहेत—ह्मणजे, दोहोंतही तेच शब्द व तेच विचार आढळतात. हा चमत्कार दुसऱ्या कोणच्याही ठिकाणीं आढळत नाहीं. विशेषेंकरून धर्म व संस्कार, या संबंधानें येणारे शब्द बहुधा पारिभाषिक असतात, तथापि संस्कृत व झेन्द या दोन्ही भाषांत ते आढळ-

तात. संस्कृतांतील ऋत शब्दाशीं मिळणारा शब्द झेन्द भाषेंत 'अश' हा आहे. केवळ उच्चारावरून साम्य पाहूं जातां ऋत व अश हे दोन शब्द अगदीं निराळे दिसतात. परंतु ऋत शब्दाचें पूर्व स्वरूप खरो-खर 'अर्त' असें आहे व संस्कृत र्त (ऋ) या अक्षराचा झेन्दांत श असा अपभ्रंश होतो.*

झेन्द भाषेंतील अश शब्दाचा अर्थ पंडित लोक 'पवित्रता' असा करितात व हल्लींचे पारशी लोकही तो अर्थ मान्य करितात. परंतु थोड्याच दिवसांपूर्वी मॉन्शूर दॉरमेस्तेतर या नांवाच्या एका अति विद्वान् फ्रेंच पंडितानें असें सिद्ध केलें कीं, अश शब्दाचा मूळ अर्थ 'पवित्रता' असा नसून वेदांतील ऋत या शब्दाचा होणारा अर्थ अश या झेंद शब्दाचा केला असतां अवेस्तांतील कित्येक वाक्यांचा फार चांगला अर्थ लागतो व तोच अर्थ खरा असावा अशी खात्री होते. अश म्हणजे 'चांगले विचार, चांगले शब्द, चांगलीं कामें' येथें 'चांगले' या शब्दाचा अर्थ 'यथाविधि,' 'यथाशास्त्र,' 'ज्याच्यांत उच्चार बरोबर केला जातो व ज्यांत कोणतीही चूक होत नाहीं असा' होय. परंतु अवेस्ता या ग्रंथांत अशीं कांहीं वाक्यें आढळतात कीं, त्यां वाक्यांवरून पारशी धर्मसंस्थापक जो झोरोआस्टर किंवा झरतुश्त्र त्याच्या मनांत ऋत किंवा सृष्टिनियम याची कल्पना येऊन चुकली होती असें दिसतें. झोरोआस्टर यानेंही प्रातःकाळ, मध्यान्हकाळ व सायंकाळ, यांचा अनुक्रम कसा आहे व त्यांच्याकरितां ठरविलेला नियम ते कसा पाळितात, हें सांगितलें आहे.

---

* **अर्त** (ऋत) व **अश** हे दोन्ही शब्द मूळचे एकच आहेत, असें **डी. लागरडे** व **ओपर्ट** या दोघां विद्वानांनीं सिद्ध करून दाखविलें. **डा. हौग** यांचाही अभिप्राय असाच आहे. व **डा. ह्युब्श्मान्** यांचेंही मत माझ्या म्हणण्यास अनुकूल आहे. याचप्रमाणें **संस्कृत** 'मर्त्य'=**झेन्द** 'मश्य;' सं. 'मृत'=**झेन्द** 'मेश;' सं. 'पेरेतु'=झें. 'पेशु;' सं. 'पृतना'=झें. 'पेशन;' सं. 'भर्तर्=झें. 'भाशर्' **स्पीगल** नांवाचा पंडित यांपैकीं कित्येक शब्दांचें साम्य नाकबूल करितो. तथापि संस्कृत र्त, हें अक्षर **झेन्दमध्यें श** असें होतें, एवढी गोष्ट त्यासही मान्य आहे.

सूर्य व चंद्र यांचा परस्पर स्नेहसंबंध; सजीव सृष्टि, किंवा जीवलोक; निरंतर जन्मास येणाऱ्या प्राणिमात्रांचे चमत्कार व बाळकाच्या पोषणार्थ योग्य काळीं मातृस्तनांत उत्पन्न होणारें अन्न, ह्मणजे दूध; इत्यादि गोष्टी जगांत पाहून झोरोआस्टर यानें परम आश्चर्य दर्शविलें आहे. वेद ग्रंथाप्रमाणें **अवेस्ता** या ग्रंथांतही ' हें विश्व **अश** यास अनुसरतें व हे असंख्य लोक **अश** यानें निर्माण केले ' असें सांगितलें आहे. भगवत्परायण व भाविक असे पुरुष इहलोकीं आपलें वर्तन अश याचे इच्छेनुरूप असावें, ह्मणून त्याची प्रार्थना करितात व मृत्यूनंतर अश याच्या निजधामीं, ह्मणजे स्वर्गामध्यें, **ऑरमझ्द** याचा समागम आपणांस होईल, अशी आशा बाळगितात. जो खरा भक्त तो अश यास योग्य सन्मान देतो. हें जगत् **अश** याचे योगानें वृद्धि व उत्कर्ष पावतें. जगाचा सर्वांत मोठा नियम ह्मणजे **अश** होय. श्रद्धावान् पुरुषाची सर्वांत मोठी इच्छा ' मी अशवान् व्हावें; ह्मणजे, सदाचारसंपन्न व सन्मार्गगामी व्हावें ' ही असते.

एवढ्यावरून इतकी गोष्ट सिद्ध होते कीं, **आर्य** लोक व **इराणी** लोक यांचा परस्पर वियोग होण्यापूर्वी सृष्टिक्रमाची कल्पना उत्पन्न झाली होती. त्या काळच्या धर्मविषयक कल्पनांमध्यें ही एक असून वेदांतील अत्यन्त प्राचीन मन्त्र घेतला किंवा अवेस्ता या ग्रंथांतील अगदीं जुनी गाथा घेतली, तरी त्याच्याही पलीकडच्या काळीं ही सृष्टिक्रमाची कल्पना होती असें स्पष्ट दिसतें. ही कल्पना क्रमाक्रमानें व विचार करितां करितां सुचलेली आहे, असें दिसत नाहीं. ते अनेक देव व जगांत दिसून येणारी त्यांची ती कमी जास्त जुलमी सत्ता, यांवरील त्यांचा भरंवसा नाहींसा झाल्यावर ही सृष्टिनियमाची कल्पना आपल्या पूर्वजांस सुचली, असें नाहीं. तर ही कल्पना दक्षिणदिग्वासी आर्यांच्या अत्यंत पुरातन धर्माचें मूळतत्व असून ती सर्वत्र पसरलेली दिसते. आणि आर्यधर्माचें यथार्थ परिज्ञान व्हावें अशा संबंधानें पाहतां उषा, अग्नि, इन्द्र, रुद्र इत्यादि देवतांच्या कथांपेक्षां या कल्पनेचेंच महत्व अधिक आहे, असें मला वाटतें.

ऋत ह्मणजे 'सृष्टिक्रम' अथवा 'सृष्टीस बंधन करणारे नियम' अशी कल्पना मूळ होती. ह्मणजे 'सूर्य हा आपली मर्यादा कधीं उल्लंघन करणार नाहीं' या कल्पनेपेक्षां त्यांत अधिक कांहीं नव्हतें. ऋत शब्दाचा हा अर्थ मनुष्याच्या मनांत येणें व न येणें, या दोन गोष्टींत अंतर किती आहे ह्मणून सांगावें! फारच अंतर आहे. जितका भेद अव्यवस्था व व्यवस्था या दोन शब्दांच्या अर्थांत आहे, जितका भेद अंधळें, पंगु दैव व ज्ञानमूर्ति सृष्टिविनायक या दोघांत आहे, तितकेंच अंतर ऋत शब्दानें स्फुट होणाऱ्या अर्थाचा सद्भाव व अभाव यांत आहे. असा विचार करा कीं, आजकाल सुद्धां जेव्हां इतर सर्व गोष्टींविषयीं माणसाची निराशा होते; लहानपणचे गोड गोड विचार प्रौढदशेंत पाण्याच्या तरंगाप्रमाणें विरून जातात; माणसांचा परस्परांविषयीं सर्व भरंवसा तुटतो; अधम व आपस्वार्थी अशा लोकांचा या संसारांत जयजयकार व उत्कर्ष पाहून सत्य, सदाचार व साधुवृत्ति या गुणांचा पक्ष घेऊन भांडणें निदान या इहलोकीं तरी व्यर्थ आहे, अशी उत्साहभंग करणारी प्रतीति होऊन सत्पक्षाचा अभिमान सर्वथा सुटतो; अशा प्रकारच्या उदासीन स्थितींत या ऋताचें—या विश्वव्यवस्थेचें—या सृष्टिक्रमाचें—मग तो सृष्टिक्रम आकाशांतील ताऱ्यांची विकाररहित, अस्खलित गति पाहून ध्यानांत येवो, किंवा अगदीं लहान अशा फुलाच्या बारिक बारिक पाकळ्या, पराग व तंतु, यांची नियत संख्या पाहून ध्यानांत येवो—मनन केल्यापासून किती लोकांच्या मनास सुख, समाधान व शांति प्राप्त झाली आहे? कित्येकांस असें वाटतें कीं, या दुःखी कष्टी जीवास कोठें कांहीं जरी आधार नसला, तरी ही विश्वव्यवस्था, ही सृष्टीची सुंदर रचना, हिचा आपण एक अंश आहों, असें मानणें हें मोठें समाधानास कारण आहे! आपणांस या ऋताची, या सृष्टिक्रमाची, या सृष्टिनियमाची कल्पना कदाचित् फार क्षुल्लक वाटेल. परंतु या पृथ्वीवर वस्ती करणाऱ्या फार प्राचीन काळच्या लोकांस दुसऱ्या कशाचाही आधार नसल्यामुळें ही ऋतशब्दांतर्गत कल्पना ह्मणजे त्यांचें सर्वस्व होतें. त्यांचा सर्व आधार, सर्व भरंवसा, सर्व

आश्रय काय तो ही कल्पना! फार काय, देव, अग्नि व इंद्र यांच्याही पेक्षां या ऋतशब्दबोधित कल्पनेची योग्यता त्यांस अधिक वाटे. कारण, जेव्हां ही ऋत शब्दाची कल्पना एकदां त्यांच्या ध्यानांत येऊन चुकली, एकदां तिचा बळकट ग्रह त्यांच्या मनावर झाला त्यानंतर ती त्यांच्या मनांतून कांही केल्यानें नाहींशी होईना.

तर मग आतां आपणांस वेदावरून इतकें खास कळलें कीं, आर्यावर्तांत आपले पूर्वज नद्या व पर्वत, आकाश व सूर्य, पाऊस व विजांचा गडगडाट, या सृष्टिचमत्कारांवरून त्यांच्या इंद्रियांस अभिव्यक्त होणाऱ्या ज्या दैविक व अमानुष शक्ति, त्यांजवर त्यांची विलक्षण श्रद्धा बसली, इतकेंच नव्हे; तर, सर्व धर्मांत अत्यंत आवश्यक अशीं जीं दोन तत्वें त्यांचीही दृढ प्रतीति त्यांस इंद्रियांनीं झाली. तीं दोन तत्वें हीं:–१, अनंतत्वाची कल्पना; आणि २, ज्यास ते ऋत असें ह्मणत, त्या सृष्टिनियमाची किंवा सृष्टिक्रमाची कल्पना.

या दोन तत्वांपैकीं पहिलें तत्व, ह्मणजे अनंतत्व, त्यांस अरूणोदयाच्या किंवा उषेच्या पाठीमागें दिसणाऱ्या सुवर्णवर्ण समुद्रांत दृष्टीस पडलें व दुसरें सूर्याच्या दैनंदिन गतीवरून त्यांच्या ध्यानांत आलें. हे इंद्रियगम्य दोन सृष्टिचमत्कार पाहून वर सांगितलेल्या दोन कल्पना अल्पकाळांतच प्रत्येक माणसाच्या मनांत येण्यासारख्या आहेत. ही एकप्रकारची ईश प्रेरणाच होय. या कल्पनेच्या किंवा प्रेरणेच्या ठायीं पुढें येतां येतां इतकें सामर्थ्य आलें कीं, शेवटीं आपल्या पूर्वजांच्या मनावर 'ही विश्वरचना सर्व ठीक, व्यवस्थित आहे' असा दृढ, वज्रलेप ठसा उठला व त्यामुळें आणखी अशी पूर्ण आशाही त्यांस वाटली–केवळ आशा एवढीच नाहीं तर खरोखर त्यांची अशी पक्की भावना झाली–कीं, भविष्यकालींही 'सर्व कांहीं ठीक, व्यवस्थित होईल!'

# व्याख्यान सहावें.

## इष्टेश्वरमत, अनेकेश्वरमत, एकेश्वरमत व निरीश्वरमत.

### [ धर्माचें आद्यस्वरूप एकेश्वर मत आहे काय ? ]

वेदांत ज्या मुख्य मुख्य देवता आहेत, त्यांचें मूळ व त्यांची वृद्धि हीं दोन्ही किती स्वाभाविक व सहज ध्यानांत येण्यासारखीं आहेत, याचा जर आपण विचार कराल तर आपलीही माझ्यासारखीच समजूत होईल. ती ही कीं, मनुष्यजाति अगदीं पूर्वी एकच ईश्वर मानीत असे किंवा अनेक ईश्वर मानीत असे, हा प्रश्न आर्यावर्तांतील आर्य लोकांच्या व युरोपांत जाऊन राहिलेल्या आर्य प्रजेच्या संबंधानें, मुळींच महत्वाचा नाहीं. म्हणजे, या गोष्टीबद्दल वाद करण्यासारखें तिचें वजनच नाहीं. हा प्रश्न मुळीं कधींतरी उत्पन्नच झाला असता किंवा नसता, याचाच मला संशय आहे.

ईश्वरानें प्रथमतः माणसास धर्माचा जो बोध केला तो आद्य बोध होय. ज्या धर्माचा बोध देवानें केला तो धर्म एकच असून सर्वगुणसंपन्न व सत्य असला पाहिजे; इतकेंच नव्हे, तर एकेश्वरविषयक असला पाहिजे, ही समजूत एकदेशीय असून अत्यंत भ्रमात्मक आहे!

धर्म ईश्वरप्रणीत असल्यामुळें प्रथमारंभापासून पूर्ण व आयता अगदीं तयार केलेला अशा स्थितींत तो माणसास मिळाला, असें मत युरोपांत पूर्वी फार लोकांचें होतें. या आद्यनिर्मित एकेश्वरमताविषयीं पुष्कळ पंडितांची अशी समजूत आहे कीं, हें एकेश्वरमत एक याहुदी लोकांनीं मात्र अंगिकारिलें होतें. दुसऱ्या सर्व मानवप्रजा त्या मताचा त्याग करून अनेक देव मानून व मूर्तिपूजा स्वीकारून बसल्या. आणि अर्वाचीनकालीं पुनः त्याच प्रजांनीं ती स्थिति सोडून देऊन

धर्मास किंवा तत्वशास्त्रास अनुसरून असणाऱ्या एकेश्वरमताचा अधिक स्वच्छ व उज्वल मार्ग धरिला.

असल्या या केवळ निराधार मताचें खंडण होऊन त्याचें अगदीं निर्मूलन होण्यास बहुत काळ लागतो, हें पाहून खरोखर आश्चर्य वाटतें. या मताचें आजपर्यंत अनेक वेळां खंडण झालें असेल. आतां या मताला जर खरा आधार पाहिला तर कांहीं एक नाहीं, असें धर्मवेत्त्यांनीं व पंडितांनीं अनेक प्रसंगीं कबूल केलें असेल. तरी देखील हीं मतें ज्या ज्या ठिकाणीं त्यांचा उल्लेख असण्याचा मुळींच संभव नाहीं, किंवा तीं मतें बोलून दाखविण्याचा प्रसंगही नाहीं, अशा ठिकाणीं, ह्मणजे नेहमीं वाचण्यांत येणाऱ्या यःकश्चित् पुस्तकांतून—फार काय, मला मोठें नवल वाटतें तें हें कीं, शाळेंतल्या लहान मुलांच्या अभ्यासाच्या पुस्तकांतून सुद्धां—आढळतात. अस्तु. याप्रमाणें बागेंत जशीं रानटी, दुष्ट व निरूपयोगी कांटेरीं झाडें चारी दिशा व्यापून चांगल्या झाडांस मारून टाकितात; त्याप्रमाणें अनेक वेडगळ वेडगळ मतें लोकांत चोहींकडे दाट पसरल्यामुळें खऱ्या मतांचा तीं अगदीं लोप करून टाकितात.

## भाषाविज्ञान व धर्मविज्ञान.

या बाबतींत भाषाविज्ञानाचें धर्मविज्ञानाशीं पुष्कळ गोष्टींत सादृश्य आहे. बैबल किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या मूळ लेखाच्या आधारावांचून, इतकेंच नव्हे तर ईश्वराचा आद्य उपदेश किंवा बोध ह्मणजे काय समजावें, या गोष्टीचा खुलासा करण्याचें कांहींएक साधन नसतां—फार प्राचीन काळचे व अर्वाचीन काळचेही ग्रंथकर्ते असें निश्चयात्मक मत देऊन गेले आहेत कीं, धर्माप्रमाणें भाषा देखील ईश्वरप्रणीत आहे. ह्मणजे, धर्म जसा देवानें आपण स्वतां आयता तयार करून माणसांच्या हवालीं केला, तशीच भाषा देखील देवानें माणसांस, आयती तयार करून शिकविली. आणखी पुढें त्या लिहिणाराचें सांगणें असें असतें कीं, आद्यकाळची भाषा ही हिब्रीच (यहुदी)

असली पाहिजे व इतर सर्व भाषा हिब्रींतूनच निघाल्या असाव्या. ग्रीक व लॅटिन्, फ्रेंच व इंग्रजी या सर्व भाषा हिब्रींतूनच निघाल्या आहेत हें सिद्ध करण्यासाठीं लिहिलेल्या मोठमोठ्या ग्रंथांतून पुष्कळ विद्वत्ता व विलक्षण चातुर्य खर्च केलें आहे. तथापि, जेव्हां त्या पंडितांस असें पक्कें कळलें कीं, कितीही ओढाताण केली तरी हिब्रीच्या मुखांतून 'इतर सर्व भाषा या माझ्या कन्या आहेत व मी त्यांची आद्यमाता आहें!' अशीं अक्षरें निघत नाहींत व या कामीं पुनः पुनः केलेल्या यत्नांपासून कांहींच फळ निष्पन्न होत नाहीं, असें पाहून अखेरीस मानवी भाषेचा आरंभ व वृद्धि या संबंधानें जी जी माहिती मिळेल ती ती मिळवून तिजपासून कांहीं एक अनुमान काढण्याचा यत्न करावा हें बरें, अशी पंडितांची खात्री झाली. याप्रमाणें भाषेच्या संबंधानें अनेक गोष्टींचा संग्रह निःपक्षपातबुद्धीनें केल्यावर, अनेक भाषांची ऐतिहासिक माहिती लोकांस झाली. मुख्य मुख्य भाषांचें वर्गीकरण होऊन त्यांची उत्पत्ति व परस्पर संबंध चांगला कळूं लागला. असें झाल्यानंतर हिब्रीस तिची खरी जागा दुसऱ्या सेमेटिक् भाषांच्या शेजारीं मिळाली. भाषा मूळ उत्पन्न झाली कशी? या प्रश्नाचें समाधान धर्मशास्त्रवेत्त्यांनीं भाषाशास्त्राचें उदाहरण पाहून बहुतेक त्याच प्रक्रियेनें केलें. जगतांतील भिन्न भिन्न धर्म यहुदी धर्माचा अपभ्रंश किंवा त्याचें रूपांतर होऊन उत्पन्न झाले असावे, अथवा ते यहुदी धर्मासारखेच मुळारंभीं देवानें प्रकट केलेल्या एका धर्मापासून निघाले असावे; म्हणजे, धर्मज्ञान ईश्वरापासून प्रथम कोणत्या तरी द्वारानें प्रकट झालें असावें, असा अगोदरच तर्क बांधून धर्माविषयीं कांहीं तरी एक सिद्धांत करणें, ही दुष्ट पद्धति सोडून देऊन पूर्वनिर्दिष्ट पंडितांस असें वाटलें कीं, जगतांतील धर्मपुस्तकांतून, किंवा भिन्न भिन्न मनुष्यजातीचे पुराणोक्त इतिहास, रीतिभाति किंवा भाषा, यांतूनही धर्मविचाराचे प्राचीन इतिहास आज जे मिळण्याजोगे असतील ते सर्व एकत्र करून तत्संबंधीं सर्व पुराव्याचा संग्रह करणें, हें आपलें कर्तव्य होय. त्यानंतर आजपर्यंत जितक्या पुराव्याचा किंवा साहित्याचा संग्रह झाला

आहे, तितक्यांची त्यांनीं अनुक्रमपूर्वक व्यवस्था करून एक वंशावळी केली. नंतर एकेका धर्माचीं मुळें, ह्मणजे ज्या प्राचीन कल्पनांवर किंवा विचारांवर त्या धर्मांचा मूळपाया रचला असेल त्या कल्पना अथवा ते विचार, व त्या सर्वांच्याही अगोदरचें जें अनंत त्याचा, अथवा अनंत-विषयक जी कल्पना तिचा, व इतर सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून धर्मांचें मूळ कोणतें, या प्रश्नाचें उत्तर देण्याचा यत्न ते करूं लागले. आणि असा हा विचार करितांना त्यांनीं दोनच गोष्टींकडे लक्ष दिलें. एक, इंद्रियजन्य ज्ञान. दुसरें, आसपासची बाह्यसृष्टि. या खेरीज तिसरी कोणतीही गोष्ट त्यांनीं ग्रहणच केली नाहीं. या दोन्हीं शास्त्रांत दुसरें एक साम्य आहे. भाषेच्या अंगीं वाढण्याचा व विस्तार पावण्याचा, असे दोन गुण सतत असतात ही गोष्ट प्रसिद्ध आहे. विस्तार पावतांना ही गोष्ट अवश्य झाली पाहिजे कीं, भाषेंत जें जें निरुपयुक्त व विनष्ट झालेलें असेल त्या सर्वांचा उत्सर्ग झाला पाहिजे. याप्रमाणेंच धर्माच्या इतिहासावरून धर्माची सतत वृद्धि होणें व विस्तार होणें हे दोन गुण दिसून येतात. धर्मांचें सर्व सामर्थ्य, नष्ट व निरुपयुक्त झालेल्या तत्वांचा निस्तोष करण्याखालींच जातें. आणि असें होणें हें अवश्य आहे; कारण, त्यांतला जेवढा भाग निरोगी व सजीव असेल त्याचें उत्तम प्रकारें संरक्षण होऊन, त्याच कालीं ज्या अक्षय्य उगमापासून सर्व धर्म निघतात, त्यांतून नव्या अंकुरांस वर येण्यास मार्ग मिळावा, हेंच इष्ट आहे. ज्या धर्मांत कांहींच बदल होत नाहीं तो धर्म एखाद्या प्राचीन भाषेप्रमाणें होय. ह्मणजे, ती जशी कांहीं दिवस उत्कर्ष पावून पुढें व्यवहारांतून जाते, त्याप्रमाणें तो धर्मही कांहीं दिवस चालून पुढें नष्ट होतो. ह्मणजे, कांहीं काळपर्यंत ती भाषा आपला पूर्ण अमल चालवून शेवटीं अनेक उपभाषांचें किंवा प्रान्तभाषांचें प्राबल्य झाल्यामुळें नष्ट होते.

हल्लीं कोणीही "जन्मस्फूर्त भाषा"* असें नांव कधींही काढीत ना-

---

* लहान मूल उपजतांच त्यास कान, नाक, तोंड, हात, पाय, इत्यादि अवयव देवानेंच निर्माण केलेले असतात. त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्यप्राणी जन्मास येतांच त्याची

हीं–कारण, या शब्दाचा कोणता अर्थ करावा हें आपणांस क्वचितच समजतें.–याचप्रमाणें असाही प्रसंग येईल कीं, "जन्मस्फूर्त धर्म" या ह्मणण्याचाही कोणास अर्थच कळणार नाहीं. आपणांस आतां हें पक्कें कळलें आहे कीं, प्रत्येक मनुष्यास स्वकष्टानें हरएक वस्तु प्राप्त करून घ्यावी लागते. आपणांस असेंही माहीत आहे कीं, जो खरोखर मेहनत करतो, त्यास त्यापासून पोटांत भरण्यास केवळ कांटेच मिळत नाहींत, तर चरितार्थ चालण्यापुरतें अन्न मिळूनही सर्व जन्मभर औदासिन्याचा आश्रय करून भोजन करावें लागतें.

घटकाभर असें समजा कीं, संपूर्ण व्याकरण व शब्दकोश अकस्मात् स्वर्गांतून उतरून माणसांच्या हातीं आले. तरी ज्या प्राण्यास आपल्या इंद्रियजन्य ज्ञानापासून जगाचा अनुभव प्राप्त झाला नाहीं व ज्यांस एका कल्पनेचा किंवा भावनेचा दुसरीशीं काय संबंध आहे तो माहीत नाहीं, अशा प्राण्यास वर सांगितलेले ईश्वरदत्त व्याकरण व कोश यांचा कांहींच उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे. देवानें आयती तयार करून दिलेली भाषा त्या लोकांस परभाषेप्रमाणें वाटेल यांत संशय नाहीं. आणि ज्यांस स्वतांची भाषा ह्मणून मुळींच ठाऊक नाहीं त्यांस परकीय भाषा कोठून समजणार? आपणांस बाहेरील साधनांनीं परभाषा समजते; ह्मणजे, पोपटपंचीप्रमाणें होतें. तसें न व्हावें असें असेल तर भाषा व भाषेचा अर्थ, हीं आपल्या बुद्धीस प्रथम ग्रहण करतां आलीं पाहिजेत. धर्माचीही गोष्ट याचप्रमाणें आहे. एखाद्या ख्रिस्ती धर्मोपदेशकास विचारा कीं 'ज्या लोकांस धर्म ह्मणजे काय याची मूळ कल्पनाच नाहीं, अशा लोकांना ख्रिस्ती धर्माचे महा सिद्धांत त्यास शिकवितां येतील काय?'-खचित येणार नाहींत. त्या धर्मोपदेशकाच्या हातून फार झालें तर एवढेंच होईल, कीं अगदीं अडाणी माणसाच्या हृदयांत जीं थोडीं बहुत धर्माचीं मुळें असतात, तीं तो

भाषा व त्याचा धर्म देवानें त्याचे जन्माबरोबरच निर्माण केलेले असतात, अशी समजूत आजपर्यंत पुष्कळ तत्ववेत्यांची होती. परंतु ही आलीकडे नाहींशी होत चालली आहे. [ इंग्रजी शब्द Innate यांचे भाषान्तर 'जन्मस्फूर्त' असें केलें आहे. ] भा. कर्ता.

शोधून काढील व त्यावरचे मातीचे ढीग उकरून काढून त्या धर्मरूप वृक्षाचीं मुळें तो मोकळीं करील व त्या मुळांसभोंवतीं जें रान माजलें असेल, तें कापून टाकून त्यांस पुन्हा जीव आणण्याचा यत्न करील. नंतर ज्या भूमींतून धर्माचे केवळ स्वाभाविक अंकुर उत्पन्न होतात, असें त्यास वाटेल, त्या भूमींत श्रेष्ठ प्रकारच्या धर्माचें बीं पेरून त्या बीजांस फळें येत तोंपर्यंत त्यास स्वस्थ वाट पाहात बसावें लागेल.

## ईश्वराविषयींची कल्पना.

या रीतीनें आपण धर्माचा विचार करूं लागलों ह्मणजे, धर्म प्रथम एकेश्वर मताचा होता किंवा अनेकेश्वर मताचा होता हा प्रश्न मुळीं अगोदर उत्पन्नच होणार नाहीं. मनुष्याला एका पदार्थास किंवा अनेक पदार्थांस ईश्वर ह्मणतां आलें, ह्मणजे, ईश्वर ही संज्ञा देण्यापुरता विचारमार्ग मनुष्यानें एकदां आक्रमिला, कीं अर्ध्याहून अधिक मजल त्यानें मारिली असें समजावें. त्याला ईश्वर हें नांव एकदां सुचलें, मग हें विशेषण किंवा हा शब्द कोणत्या वस्तूस यथार्थतेनें लावतां येईल, याचा केवळ शोध करणें एवढीच गोष्ट राहते. पण प्रथम आपणांस हेंच समजलें पाहिजे कीं, मनुष्याच्या मनांत अगोदर ईश्वराविषयीं कल्पना आली कशी, आणि ही कल्पना कोण कोणत्या कारणांनीं आली. यानंतर एका वस्तूला ह्मणा किंवा अनेक वस्तूंला ह्मणा ‘ईश्वर’ ही संज्ञा द्यावी, असें मनुष्यांस कां वाटूं लागलें, असा दुसरा प्रश्न निघतो. धर्माविषयीं लिहिणारे ग्रंथकार असें ह्मणतात कीं, सृष्टींतील जे महान् महान् पदार्थ अगदीं प्राचीन मनुष्यांच्या आसपास पसरलेले असत त्यांसच ते ईश्वर असें मानीत.* वरील लिहिणारा बिचारा

---

* प्राचीन आर्यांची धर्मविषयक बुद्धि किती जरी तीव्र असली, अद्भुत गोष्टींवर कितीही जरी त्यांचा भरंवसा असला, महान् महान् ईशसृष्टपदार्थ त्यांच्या आसपास पसरलेले असतील ते पहातांच थक्क होऊन त्यांवर ईश्वरत्वाचा आरोप करण्याची त्यांना कितीही उत्कंठा असली, तरी एवढें स्पष्ट आहे कीं—त्या पदार्थांच्या अवलोकनापासून त्यांच्या मनामध्यें जो ऐंद्रिय विकार उत्पन्न होत असे तो, ते पदार्थ जसजसे त्यांच्या अधिक अधिक दृष्टीस पडत, त्या त्या मानानें अधिक अधिक होत असे. याचमुळें

असेंही ह्मणेल याचें आश्चर्य नाहीं—कीं, प्राचीन लोकांस सुगंधी मसाला किंवा मेण मिळविण्याची युक्ति समजण्यापूर्वींच ते आपल्या प्रेतांस मेणांत किंवा मसाल्यांत घालून संभाळून ठेवीत! ह्मणजे खपुष्पाच्या कल्पनेसारखीच या कल्पनेची योग्यता समजावयाची!

## वेदापासून मिळणारीं नवीं साधनें.

धर्मसंबंधीं विचार करितांना या वर सांगितलेल्या ज्या अनेक अडचणी येतात, त्या वेदाच्या साहाय्यानें सर्व दूर होतात, असें मानणाऱ्यांपैकीं मी नाहीं. आर्यावर्तांत धर्म जितका विस्तार पावला, तितक्याच मानानें इतर सर्व प्रजांमध्येंही धर्म विस्तार पावला असेल असें मानणें, याहून दुसरी कोणतीही मोठी चूक नाहीं असें ह्मटलें पाहिजे. एका धर्माची दुसऱ्या धर्माशीं तुलना करून धर्मशास्त्राचा अभ्यास केल्यानें जो फायदा होतो तो हा कीं, असें केल्यानें भिन्न भिन्न मार्गानें गेलेले पंडित शेवटीं एकाच स्थळीं पोहोंचतील असा संभव आहे. मी एवढें खात्रीनें सांगतों कीं, प्रत्येक धर्माच्या प्रसाराचा वेद हा एक प्रवाह आहे व तो प्रवाह फार महत्वाचा आहे. जर अगोदरच कोणताही सिद्धांत न करितां आपण निरभिमानबुद्धीनें व कोणत्याही गोष्टीचा केवळ आग्रह न धरितां या विषयाचा विचार केला, तर आर्यावर्तांतील आर्य लोकांच्या धर्माचें पूर्वस्वरूप एकेश्वर मताचें होतें हें ह्मणणें अगदीं निर्मूलक आहे व अशा ह्मणण्यांत फारसा अर्थ नाहीं, हें सिद्ध होईल असें मला वाटतें.

## इष्टेश्वरमत.

वैदिक आर्यलोकांत वेदकाळची जी अतिप्राचीन अशी एक विचा-

---

आकाश, पृथ्वी, सूर्य इ० स्थूळ पदार्थांस जरी देवांप्रमाणें ते मानीत अशी कल्पना केली, तरी त्या पदार्थांस त्यांनीं जीं नांवें दिलीं असतील तीं त्या दैविक गुणांस अनुलक्षून दिलीं असावीं अशी कल्पना करण्यापेक्षां ती नांवें किंवा विशेषणें त्यांच्या बाह्य धर्मावरून किंवा गुणावरून त्या पदार्थांस दिलीं असावीं, असें मानणें अधिक सयुक्तिक दिसतें.—जे. म्युअर्.

राची सरणी किंवा पद्धति होती, तिला जर एखादें सामान्य नाम द्यावें असें आपण मनांत आणलें, तर तिला 'एकेश्वर मत' असेंही ह्मणतां येणार नाहीं व 'अनेकेश्वर मत' असेंही ह्मणतां येणार नाहीं. तर त्याला 'इष्टेश्वर मत' हेंच नांव योग्य दिसतें. 'इष्टेश्वर मत' ह्मणजे, अर्धस्पृश्य किंवा अस्पृश्य वस्तूंपैकीं भिन्न भिन्न प्रसंगीं एक एक वस्तु अमानुष मानून त्यांत ईश्वराचा अंश आहे असें समजून त्या वस्तूची श्रद्धापुरःसर पूजा करणें; एकेकावेळीं एकेक पदार्थांत अदृश्य व अनंत असा कांहीं अंश आहे अशी भावना मनांत उत्पन्न होणें. मागें सांगितलेंच आहे कीं, वेदकवि स्थूळ सृष्टपदार्थांपैकीं प्रत्येक पदार्थांत कांहीं तरी अमानुष, अनंत, अलौकिक व कल्पनातीत असा भाग आहे असें मानूं लागले. पुढें त्यांनीं याच दृष्टीनें एकेका पदार्थास असुर 'जिवंत'; देव* ह्मणजे 'चकचकणारे' किंवा 'तेजस्वी'; व अमर्त्य ह्मणजे 'न मरणारे', 'नाश न पावणारे', 'पुष्कळ दिवस टिकणारे'; अशीं विशेषणें दिलीं. शेवटीं 'एक अमर व अनादि आत्मा' अशी संज्ञा प्रत्येक पदार्थास मिळाली. असें होतां होतां अगदीं शेवटीं 'अनाद्यनंत, अविनाशी आत्मा' ही कल्पना उत्पन्न झाली. आतां या कल्पनेंत कोण कोणच्या गुणांचा समावेश झाला आहे असें पाहूं गेलों तर हें उघड आहे कीं, मनुष्याची कालवशात् जसजशी स्थिति बदलत गेली, त्या त्या मानानें व त्या त्या स्थितींत जे उत्तम उत्तम गुण त्याच्या ध्यानांत आले, ते ते सर्व गुण एकत्र करून त्यांचा अध्यास किंवा त्यांची योजना तो आपल्या पूज्य किंवा इष्ट दैवताच्या ठिकाणीं करूं लागला.

## सूर्य व त्याचीं निरनिराळीं रूपें.

विश्वांतील स्थूल व दिव्य पदार्थ या रीतीनें बदलून प्रथम अलौकिक व अमानुष कसे झाले, आणि पुढें त्यांच्या ठिकाणीं ईश्वरी अंश आहे अशी लोकांची भावना कशी झाली, या गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ

---

* दिव्=प्रकाशणें, या धातूपासून 'देव' हा शब्द झाला आहे, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

प्रथम आपण सूर्याचें उदाहरण घेऊं या. सूर्याचीं नांवें पुष्कळ आहेत. सूर्य, सवितृ, मित्र, पूषन्, आदित्य इत्यादि. यांपैकीं प्रत्येक नांव मूळचें केवळ एकच विशेष गुण दाखविणारें असून, पुढें त्याच्यापासून क्रियासमर्थ अशा व्यक्तीचा बोध कसा होऊं लागला, याचा विचार केला ह्मणजे मोठें नवल वाटतें. त्यांतून वेदधर्माची मीमांसा करते-वेळीं प्रत्येक नांवाचा मूळ अर्थ शोधून काढून तें नांव दुसऱ्यांपासून निराळें ठेवणें हें फारच अगत्याचें आहे. त्यांत विशेषेंकरून एवढी गोष्ट नीट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हीं सर्व नामें जेथून निघालीं तें मूळ एक असून त्यास पुष्कळ फांटे फुटले आहेत. प्रथमारंभीं हीं नांवें एकवस्तुवाचक असून एकाच वस्तूच्या भिन्न भिन्न स्थळांवरून दिसणाऱ्या ज्या आकृति, त्यांचा बोध व्हावा, अशी योजना या निर-निराळ्या नांवांत दिसते.

सूर्याला तुह्मी **सूर्य, सवितृ, मित्र**, पूषन्, किंवा **आदित्य** यांतून पाहिजे तें नांव द्या. पण इतकें खरें कीं, त्यांत या तेजोराशीचें स्वभाव-वर्णन दृष्टोत्पत्तीस येतें. मनुष्यास थोडी तरी जर कल्पनाशक्ति असेल, व साधारण सृष्टिसौंदर्य अनुभवण्यापुरती त्याच्या अंगीं जर रसिकता असेल तर त्यास हीं वर्णनें सहज समजतील अशीं आहेत. सूर्यास 'आकाशाचा पुत्र' ह्मटलें आहे; **अरुणोदय**, ऊर्फ **उषा**, ही सूर्याची कधीं कधीं स्त्री व कधीं कधीं मुलगी, असें मानिलें आहे. कोठें कोठें उषा ही आकाशाची कन्या ह्मणून ह्मटलें आहे; या कारणानें, उषा ही सूर्याची बहीण होय, असेंही वर्णन आढळतें. कांहीं कांहीं प्रसंगीं असेंही दर्शविलें आहे कीं, इंद्रानें **सूर्य** व **अरुणोदय** ( उषा ) या दोघांसही जन्म दिलें.

---

१ ऋग्वेद १०. ३७. १. दिवः पुत्राय सूर्याय शंसतः=सूर्य जो द्यौः=(आकाश)चा पुत्र आहे त्याची स्तुति करा.

२ ऋग्वेद ७. ७५. ५. सूर्यस्य योषा=सूर्याची पत्नी.

३ ऋग्वेद ४. ४३. २. सूर्यस्य दुहिता=सूर्याची कन्या.

४ ऋग्वेद ५. ७९. ८. दुहिता दिवः=आकाशाची कन्या.

५ ऋग्वेद ५. १२. ७. यः सूर्यं यः उषसम् जजान=ज्यानें सूर्यास जन्म दिलें व ज्यानें अरुणोदयास जन्म दिलें.

असें असून दुसऱ्या दृष्टीनें एका वेदकवीनें असेंही ह्मणून दाखविलें आहे कीं 'उषांनीं सूर्यासही जन्म दिलें.'[1] यावरून आतां पहा, कीं या वेदकवींच्या उक्तींतच पुराणास, इतिहासास व करुणरसप्रधान काव्यास हवी तेवढी साधनसामग्री कशी भरपूर आहे ! असो, प्रस्तुत या विषयाशीं आपला संबंध नाहीं. तेव्हां त्याविषयीं अधिक विचार करण्याची येथें जरूर नाहीं.

ग्रीक कवींच्या कल्पनेप्रमाणें वैदिक कवींचीही सूर्यविषयक अशी कल्पना आहे कीं, 'सूर्याचा एक रथ आहे व त्यास एक[2] किंवा सात[3] घोडे ओढीत असतात.' त्या सात हरितांस ह्मणजे तेजस्वी अश्वांस जरी भिन्न भिन्न नांवें आहेत, तरी ग्रीक शब्द (Charites) "चारितीझ्" व संस्कृत 'हरितस्' या दोन शब्दांचा निकट संबंध आहे, असें आपणांस कबूल करावें लागतें. या सूर्यास देवांचें मुख[4] असें नांव दिलें आहे. मित्र, वरुण, आणि अग्नि यांचा हा नेत्र[5] आहे असें कल्पिलें आहे. जेव्हां सूर्य आपले घोडे रथापासून सोडतो, त्यावेळेस रात्र आपलें वस्त्र पसरिते[6], असें ह्मणतात. ही सूर्याची गोष्ट चोहींकडे एकसारखीच आपल्या दृष्टीस पडते.

जरी सूर्यास प्रसवितृ, ह्मणजे उत्पन्न करणारा, असें नांव दिलें[7] आहे, तरी सवितृ हें जें सूर्याचें नांव आहे त्यांत त्याचें वर्णन, 'सवितृ देव हा सोन्याच्या रथावर[8] उभा राहतो, त्याचे केश पिंवळे[9] आहेत,

---

१ ऋग्वेद ९. ७८. ३ अजीजनन् सूर्यं यज्ञं अग्निं=त्यांनीं सूर्य, यज्ञ व अग्नि यांस उत्पन्न केलें.

२ ऋ० ७,६३,२. यत् एतसः वहति.

३ ऋ०१०,११९, ३. अश्वाः हरितः सूर्यस्य. ऋ०७, ६०, ३, अयुक्त सप्त हरितः.

४ ऋ० १, ११५, १. चित्रं देवानां उदगात् अनीकम्.

५ 'चक्षुर्मित्रस्य वरुणस्य अग्नेः'

६ ऋ०१, ११५, ४ 'यदा इत् अयुक्त हरितः सधस्थात् आत् रात्रीवासः तनुते सिमस्मै.'

७ ऋ० ७,६३,२. 'प्रसविता जनानाम्'.

८ ,,—१,३५,२. 'हिरण्येन सविता रथेन'.

९ ,,—१०,१३९,१. 'हरिकेशः'

त्याचे बाहु,[1] हात,[2] डोळे,[3] जीभ,[4] हे सोन्याच्या रंगासारखे आहेत, व त्याच्या दाढा लोखंडाच्या आहेत; तो एक कवच किंवा भगव्या रंगाचा चकचकीत झगा घालतो व तो ज्या रस्त्यांत धूळ नाहीं अशा रस्त्यानें जातो.'

मित्र[5] हें सूर्याचें दुसरें नांव आहे. एकच पदार्थ निराळ्या प्रसंगीं निराळा दिसला ह्मणून त्याचें नांवही निराळें पडलें. मित्र ह्मणजे बहुतकरून प्रातःकाळचा व दिवसाचा सतेज, आनंददायक सूर्य होय. कारण कीं, सूर्य व दिवस हे दोन्ही शब्द अलीकडच्या भाषेंत एका अर्थानेंच योजिले आहेत. उदाहरण इंग्रजींत कालचा दिवस 'Yesterday' याबद्दल Yestersun=कालचा सूर्य, असेंही ह्मणतात. कांहीं कांहीं प्रसंगीं कवीनें असें वर्णिलें आहे कीं, सवितृ हा मित्रच होय व मित्र जें काम करितो तेंच सवितृ ही करितो. *मित्र* व *वरुण* या दोघांची जोडी आहे. *मित्राची* आठवण झाली कीं *वरुणाची* होतेच. या दोन्ही देवता एकाच रथावर उभ्या रहातात. हा रथ प्रातःकाळीं सुवर्णवर्ण असतो व सूर्यास्तसमयीं त्याचे स्तंभ लोहमय दिसतात.

सूर्याचें दुसरें नांव विष्णु असें आहे. विष्णु हें नांव पूर्वी सूर्याचें होतें. कारण तो ' तीन पाउलें टाकतो, ' किंवा तीन ' उड्या मारितो ' असें त्याचें वर्णन आहे. प्रातःकाल हें पहिलें पाऊल; म-

---

१ ऋ०—१. ३५. १०. 'हिरण्यहस्तः'

२ ,,—१. २२. ५. 'हिरण्यपाणिः'

३ ,,—१. ३५. ८. 'हिरण्याक्षः'

४ ,,—६. ७१. ३. 'हिरण्यजिव्हः'

५ मित्र ह्मणजे स्नेही ( मितृ + त्र ). वैय्याकरणांच्या ह्मणण्याप्रमाणें मित्र शब्द, '**मिद्**' धातूपासून उत्पन्न झाला असावा. या धातूचा अर्थ 'पुष्ट होणें,' 'पुष्ट करणें,' 'प्रकाशित करणें,' 'आनंद करणें,' 'प्रीति करणें' असा होतो. अशाच प्रकारचा अर्थाचा फेरफार 'स्निह्' धातूंत आढळतो. '**मिद्**' पासून **मेद** (चरबी) व मेदिन् आनंददायक मित्र, जोडीदार, हे शब्द निघाले आहेत. अथर्ववेद १०, १, ३३ 'सूर्येण मेदिना.' **ऋग्वेद** ७. ३७. २४. यांत 'इंद्रसखा' शब्दाचा ज्या अर्थानें प्रयोग केला आहे त्याच अर्थानें **अथर्ववेद** ५,२०,८. यांत 'इंद्र मेदिन्' याचा केलेला आढळतो.

ध्यान्हकालचें हें दुसरें पाऊल, व सायंकालचें हें तिसरें. परंतु हें त्याच्या बाह्य स्वरूपाचें वर्णन मागुन मागून त्याच्या अमानुष अलौकिक अशा पराक्रमाचें जें वर्णन केलें आहे त्यापुढें खरोखर फिकें पडतें.

पूषन् याचें स्वरूप सौम्य, नम्र अशा प्रकारचें वर्णिलें आहे. 'पूषा' हें पूर्वी धनगरांस दिसणाऱ्या सूर्याचें नांव असे. वेदकवींचें अनुकरण करून आपणही त्याच पद्धतीनें वर्णन करूं लागलों तर खालीं लिहिल्याप्रमाणें करूं. ' बकरे हे पूषन् याचे घोडे होत; त्याच्या हातांत राजदंडाऐवजीं पराणी किंवा बैल हांकण्याची काठी असते, व एक सोन्याची वाघी ( खंजीर किंवा कट्यार ) असते.' सूर्या ह्मणजे प्रातःकाळची किंवा अरूणोदयाची अधिदेवता, जिला उषा असेंही नांव आहे, ती त्याची भगिनी किंवा प्रिया होय. सूर्यमंडळांतील इतर देवतांप्रमाणें विश्वांतील सर्व कांहीं त्याला दिसतें.

आदित्य हें जें पुढें पुढें सूर्याचें एक साधारण नांव होऊन राहिलें, तें वेदांत मुख्यत्वेंकरून सौर्य देवतांचें सर्वसाधारण नांव होतें असें दृष्टीस पडतें. त्यांस मी सौर्य देवता ह्मणतों याचें कारण हें कीं, जरी प्रोफेसर रॉथचें ह्मणणें आहे कीं तीं वर्णनें केवळ नीत्युद्बोधक किंवा तत्कालीन मनोविकारदर्शक आहेत, तरी कित्येक वैदिक सूक्तांतून त्यांचा सूर्याशीं असणारा संबंध स्पष्टपणें दृष्टीस पडतो. या दृष्टीनें पहातां सूर्य हा आदित्य आहे, सवितृ हा आदित्य आहे, व मित्र हा देखील आदित्यच आहे. आदित्य हा शब्द जेव्हां एकटाच आढळतो आणि मुख्यत्वेंकरून ऋग्वेदाच्या उत्तरभागांत जेथें जेथें आढळतो, तेथें तेथें बहुतकरून त्याचा अर्थ केवळ सूर्य इतकाच करितां येतो. येथपर्यंत सर्व सुलभ आहे व इतर धर्मांची व आर्य धर्मांतील दंतकथांची जी माहिती आपणांस आहे त्यावरून हा बहुतेक भाग आपणांस बराच समजतो, असें ह्मटलें पाहिजे.

## सूर्याची अलौकिक शक्ति.

तथापि प्रसंगविशेषीं वैदिक कवींची विचारसरणी बदलत गेली

आहे असें आढळतें. सूर्य हा केवळ आकाशांत आपलें नित्यकर्म नियमितपणानें करीत असणारा एक तेजस्वी देव आहे इतकेंच नव्हे, तर याहूनही फार श्रेष्ठ अशा प्रकारचें काम तो करितो. फार काय, तो या जगताचा नियंता, स्थापनकर्ता, आणि निर्मिता किंवा स्रष्टा आहे, असें ह्मटलें आहे.

ज्या प्रकारानें सूर्याचें स्वरूप बदलून टाकिलें व सूर्य हा केवळ एक तेजस्वी गोल आहे असें न मानितां तो जगताचा उत्पादक, रक्षक, नियंता व लोकांच्या पापपुण्यानुसार त्यांस फल देणारा आहे अशी कल्पना लोकांनीं केली—ह्मणजे त्यास दिव्य परमात्मस्वरूप प्राप्त झालें—तो एकंदर प्रकार सर्व क्रमशः आपणांस वेदांत दृष्टीस पडतो.

प्रथमारंभीं आपण असा विचार करूं कीं, जो हा सूर्यप्रकाश नित्य प्रातःकाळीं निद्रावश झालेल्या मनुष्यांस उठवितो आणि केवळ मनुष्यांसच काय तर सर्व बाह्य सृष्टीस चेतना देतो, व तिचें जणों पुनरुज्जीवन करितो असें भासतें, त्यास थोड्याच कालांत ‘ प्रतिदिनीं प्राणदाता ’ अशी संज्ञा प्राप्त झाली.

दुसरें असें कीं पुढें पुढें याच्या ही पलीकडे लोकांची कल्पना वाढत गेली. जो रोज उजेड देणारा व जो रोज चेतना देणारा तो एकंदर प्रकाशाचा व चैतन्याचा दाता होऊन राहिला. जो आज प्रकाश व चैतन्य घेऊन येत आहे तोच अगदीं प्रथमारंभीं ह्मणजे सृष्टीची उत्पत्ति झाल्यावर अगदीं पहिल्या दिवशीं प्रकाश व चैतन्य घेऊन आला. प्रत्येक दिवसाच्या आरंभीं जसा प्रकाश असतो त्याचप्रमाणें सृष्टीच्या आरंभींही प्रकाश होता. सारांश, जो सूर्य प्रथम केवळ प्रकाश घेऊन येणारा व चैतन्य देणारा होता तोच कांहीं वेळानें या जगताचा स्रष्टा व थोड्याच कालानें जगाचा नियंताही झाला.

तिसरें. सूर्य रात्रीचा भयंकर काळोख हांकून लावितो व पृथ्वीस फलवती करितो यामुळें ‘ सर्व सचेतन वस्तूंचा रक्षणकर्ता व पालनकर्ता ’ असें नांव सूर्यास मिळालें.

चौथें. सूर्यास बरें वाईट सर्व कांहीं दिसतें. मानवांच्या पापपुण्याचें

ज्ञान त्यास होतें. तेव्हां दुष्कर्म करणाऱ्यास ' अरे ! इतर मानवी नेत्रांस जें दिसत नाहीं तें सूर्याला दिसतें!' असा उपदेश करणें व सत्कर्म करणाऱ्यास व निर्दोष मनुष्यास ' बाबा ! तुजवर कांहीं वाईट प्रसंग गुदरल्यास तुझी जेव्हां दुसरीकडची आशा सर्वथा तुटेल तेव्हां तूं आपल्या निर्दोषीपणाबद्दल साक्ष देण्याविषयीं सूर्यास विनंति कर ! ' अशी उक्ति या दोन्ही गोष्टी किती स्वाभाविक आहेत? ' जे प्रातःकाळाची वाट पहात बसतात त्यांपेक्षां अधिक उत्साहानें माझा जीव त्या प्रभू-साठीं वाट पहात बसला आहे ! ' ( बैबलांतील भजन १३० वें ).

या अत्यंत स्वाभाविक विचारांपैकीं प्रत्येकाविषयीं स्पष्टीकरण करणाऱ्या अशा कांहीं वाक्यांचें आतां आपण पर्यालोचन करूं. सूर्यास जें 'सवितृ' हें नांव दिलें आहे, त्या नांवाचा अर्थच ' जिवंत करणारा ' होतो. ह्मणूनच सूर्याला ' प्रसविता जनानाम् ' ह्मणजे मनुष्यांस सचेतन करणारा हें विशेषण दिलें आहे.

ऋग्वेद ७ । ६३ । १ यांत असें ह्मटलें आहेः– सुखदाता, सर्व-चक्षु, सूर्य मनुष्यमात्रांचा जो एकच आधार होय, तो उगवतो; जो मित्र, वरुण, यांचा नेत्र आहे, व चर्माची जशी कोणी गुंडाळी करतो, तसें अंधकारास त्यानें गुंडाळून ठेविलें आहे.

ऋग्वेद, ७।६३।४ यांत ह्मटलें आहेः– तो अपार प्रकाश देणारा तेजस्वी सूर्य आकाशांत उगवतो; व प्रकाशपूर्ण होत्साता दूर पर्यंत स्वतांच्या कामाकरितां जातो. आतां मनुष्यांनींही सूर्याचें उदाहरण पाहून हुशार व्हावें, व आपापल्या ठिकाणावर जाऊन आपापल्या कामास लागावें हें योग्य आहे.

तसेंच दुसऱ्या मंत्रांत ( ७।६०।२ ) सूर्याची आराधना याप्रमाणेंच करतात, असें दिसतें:–ज्या जंगम किंवा स्थावर वस्तु आहेत किंवा ज्या ह्मणून (पृथ्वीवर) आहेत, त्यांचा रक्षणकर्ता हा ( सूर्य ) होय.

सर्व वस्तु पहाण्याची ही जी सूर्याची शक्ति तिजविषयीं जागोजाग उल्लेख दृष्टीस पडतात. सर्वव्यापक सूर्यास पाहून नक्षत्रें तर चोरा-प्रमाणें पळून जातात. मनुष्यवस्तींतील भल्यांस व वाइटांस तो

पाहतो. जो जगतास पाहतो, तो मनुष्याचे मनांत जे जे विचार उत्पन्न होत असतील ते ही जाणतो.

सूर्यास प्रत्येक वस्तु दिसते, व समजते. ह्मणून त्याला एकट्यालाच जें जें दिसलें आहे व समजलें आहे, त्याजबद्दल क्षमा करण्यासाठीं, व तें विसरून जाण्यासाठीं, त्याची प्रार्थना केलेली आढळते.

त्याचप्रमाणें ( ४. ५४. ३. ) या मंत्रांत ह्मटलें आहे. आकाशांतील देवसमूहाविरुद्ध आमचेकडून मनुष्यस्वभावामुळें किंवा अविचार, दौर्बल्य, गर्व, यांच्यामुळें जें विपरीत वर्तन झालें असेल, त्या ( पापाच्या परिणामा ) पासून, हे सवितृ, तूं आह्मांस देव व मनुष्यापुढें सोडीव.

व्याधी व दुस्वप्नें दूर करण्याविषयीं, सूर्याची प्रार्थना केली आहे. सूर्योदयीं मनुष्यास पाप व बोलून दाखवितां येत नाहीं अशा कामापासून सोडविण्याविषयीं, अन्य देवांचीही स्तुति केली आहे.

सूर्यास एकदां नव्हे तर अनेक प्रसंगीं ' जीवन किंवा चैतन्य आणणारा ' असें ह्मटल्यावर त्यास स्थावरजंगमात्मक वस्तूंचा जीव, किंवा प्राण असेंही नांव दिलें आहे. व शेवटीं तो ( सूर्य ) विश्वकर्मन्, ह्मणजे सर्व वस्तूंचा कर्ता, सर्व लोक एके ठिकाणीं करणारा व प्रजापति, ह्मणजे मनुष्यादि सर्व जीवजंतूंचा स्वामी, असेंही ह्मटलें आहे. एक कवि ह्मणतो कीं, सवित्यानें या पृथ्वीस दोऱ्यांनीं बांधिलें आहे, व आकाश आधारावांचून सांवरलें आहे. आकाशास सांवरून धरणारा भुवनाचा प्रजापति, अशीं विशेषणें दिलीं आहेत. या वर्णनांतच त्याणें पिंवळट रंगाचें कवच, किंवा वस्त्र, परिधान केलें आहे, व सुवर्णवर्ण केश धारण केले आहेत. खरोखर हें वर्णन सुवर्णवर्ण केसांच्या सूर्य देवास फारच शोभतें.

दुसरा कवि ह्मणतो कीं ' आकाश सूर्याच्या आधारें उभें आहे, व ही पृथ्वी सत्याच्या आधारानें राहिली आहे. शेवटीं सूर्यास अत्यंत उदात्त विशेषणें दिलीं आहेत. फार काय, तो देवांचाही देव आहे. तो सर्व देवतांचा दिव्य अग्रणी ह्मणजे पुढारी आहे.

सवितृच्या अवतारांत हा व्यक्तिवाचक, व ईश्वरी अंश अधिकाधिक वृद्धिंगत होत गेलासा दिसतो. वरती दिलेल्या कित्येक अवतरणांवरून हें बहुतेक आपल्या लक्षांत आलेंच असेल, पण दुसरीं अशीं कांहीं वाक्यें आहेत त्यांवरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते. सवितृ एकटाच सर्व सृष्टीचें राज्य करतो. त्यानें जे जे नियम घालून दिले आहेत, ते कायम राहिले आहेत. इतर देव याची स्तुति करतात, इतकेंच नव्हे, तर हा आमचा अग्रणी अथवा पुढारी असें मानून त्यांनां याच्या अनुसंगानें चालावें लागतें. एका वाक्यांत तर सांगितलें आहे कीं सवितृनें इतर देवांस अमृतत्व दिलें आहे, व एकामागून एक उत्पन्न होणारे जे मानवप्राणी त्यांस जीवदान सवितृनेंच दिलें आहे. या सर्वांचा अर्थ तर असाच करितां येईल कीं, देवांचें अमरत्व व मनुष्यांचें आयुष्य हीं सवितृ ह्मणजे जीवनदाता जो सूर्य, त्यावर अवलंबून आहेत. शेवटीं आपण हें ध्यानांत अवश्य ठेवावें कीं, वेदांत अति पवित्र मानिलेला मंत्र गायत्री आहे, व त्यांत सवितृची आराधना केली आहेः– 'सवितृ देवाचें जें वर्णनीय तेज तें आपण मिळवूं, किंवा त्याचें आपण मनन करूं. तो आमच्या बुद्धि जागृत करो.'

सूर्याच्या तोडीचाच असा पूषन् देव ही, कांहीं ठिकाणीं केवळ एखाद्या धनगराचा देव नसून, ह्मणजे त्याचें वर्णन ग्राम्य नसून त्याच्या वर्णनांत कांहीं एकाप्रकारचें गांभीर्य आढळतें. जरी एका प्रसंगीं त्याचें वर्णन मर्त्यजनांहून श्रेष्ठ व देवांच्या बरोबरीचा असें केलें आहे, तथापि अन्यत्र कांहीं ठिकाणीं स्थावरजंगमाचा स्वामी, असें नांव त्यास दिलें आहे. सूर्यमंडळांत इतर सर्व सौर्य देवतांप्रमाणें तो सर्व पदार्थांस पाहतो, व सवितृप्रमाणेंच परलोकास गेलेल्यांच्या जीवांस स्वर्गवासी जनांच्या सुखधामाप्रत घेऊन जातो, ह्मणजे पितृलोकाप्रत पोंचवितो, अशी कल्पना केली आहे.

मित्र, व विष्णु, यांस परमपदवी प्राप्त झाली होती, हें प्रसिद्धच आहे. "मित्र हा पृथ्वी व आकाश, यांपेक्षां श्रेष्ठ आहे व सर्व देवांचाही आधार आहे. विष्णु तर समग्र लोकांचा आधार आहे. युद्धसंग्रामांत इंद्राचें साहाय्य करणारा विष्णु असतो व त्याच्याहून थोर दुसरा कोणीच नाहीं."

## सूर्याचें गौणत्व.

वेदांतील धर्मविषयक कवितांविषयीं आपणांस याच्या पलीकडे दुसरें कांहीं माहीत नसतें, तर वर दिलेले सूर्याचे धन्यवाद वाचून आपली अशी समजूत झाली असती कीं प्राचीन ब्राह्मण सूर्य देवास भिन्न भिन्न नांवानें पूजीत असत व या कारणाकरितां ते केवळ एकच ईश्वरावर विश्वास ठेवणारे ह्मणजे एकेश्वरी मताचे असावेत. तथापि ही कल्पना सत्य नसून अगदीं भ्रांतिमूलक आहे. हें खरें आहे कीं, प्रसंगवशात् सूर्यावर सर्वांत श्रेष्ठ देवाचा आरोप केला आहे, असें वाटतें. परंतु ज्या मंत्रांचा उल्लेख मी वर केला आहे, त्यांतही सूर्याच्या श्रेष्ठत्वाविषयीं निश्चयपूर्वक कोठेंही सांगितलेलें आढळत नाहीं. शिवाय तसाच प्रकार दुसऱ्या देवांस अनुलक्षून केलेल्या मंत्रांत नाहीं, असेंही नाहीं. या संबंधानें ग्रीकलोकांचा झेयुस व रोमन लोकांचा जुपितर यांहून सूर्य अगदीं निराळाच आहे. व वेदकर्ते कवि ही ज्या सूर्यदेवास एके प्रसंगीं सर्व वस्तूंचा कर्ता व आधार असें मानितात, ते त्यासच दुसऱ्या प्रसंगीं " समुद्राचें बालक, जलाचें अपत्य, उषांनीं उत्पन्न केलेला, इतर देवांपैकींच एक देव, व त्यांच्याहून कमी नव्हे व जास्त नव्हे, असें वर्णन करण्यास मुळींच मागें पुढें पहात नाहींत.

प्राचीन वेदधर्माचें हें एक विशेष लक्षण आहे व तें ध्यानांत येण्यासाठीं, मी त्या प्रकारास ( इष्टेश्वरमत ) असें नांव दिलें आहे. इष्टेश्वरमत ह्मणजे एकामागुन एक मानण्यांत आलेल्या श्रेष्ठ देवांतून एकेकालाच एकाकालीं श्रेष्ठ मानणें. हें नांव देण्याचा माझा हेतु हा आहे कीं, ज्या धर्मविचाराच्या स्थितीस सामान्यतः अनेकेश्वरमत ह्मणतात, ज्यांत एक देव सर्वांत श्रेष्ठ असून इतर देव कमी योग्यतेचे आहेत, अशी कल्पना असते, ज्या मतानें एक सर्वोत्कृष्ट ईश्वर प्राप्त करून घेण्याची आपली इच्छा पूर्णपणें तृप्त होते, त्या मताहून हें वरील मत निराळें रहावें. वेदांत सर्वत्र एकामागून एक देवतेची स्तुति केलेली दिसते. एकाच ईश्वराला अनलक्षून ज्या ज्या गुणांचा

उल्लेख करितां येईल त्या सर्व गुणांचा आरोप प्रत्येक देवतेच्या ठायीं केला आहे असें आढळतें. कवि ज्यावेळेस एखाद्या देवाची आराधना करतो, त्यावेळेस दुसरे इतर देव नाहींतच अशी त्याची समजूत आहे, असें वाटतें. परंतु एकाच मंत्रसंग्रहांत व एकाच मंत्रांत कोठें कोठें तर दुसऱ्या देवांचींही नांवें आढळतात व त्या सर्वांस दैविक, स्वतंत्र, व श्रेष्ठ अशा गुणांचा अध्यास केलेला दिसतो. पूजकाचा ( भक्ताचा ) भाव एकाएकीं बदलला असें दिसतें, व एका कालीं जो कवि, द्यावापृथ्वीचा नियंता सूर्यावांचून इतर कोणी नाहीं असें मानीत होता, तोच कवि अन्य कालीं त्या द्यावापृथ्वीस सूर्याची व इतर सर्व देवांचीं मातापितरें मानितो.

धर्मसंबंधी विचाराचें हें स्वरूप ध्यानांत येणें फार कठीण आहे असें वाटेल, परंतु हा सर्व प्रकार नीट समजण्याकरितां आपणांस एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ईश्वरविषयक कल्पना जशी आपणांस आतां करितां येते, तशी त्यावेळेस ती दृढ किंवा निश्चित झालेली नव्हती, तर पुढें हळू हळू दृढ होत गेली. ही गोष्ट लक्षांत ठेविली असतां ती खरोखर लक्षांत येईलच अशी माझी खात्री आहे. कवि तर सूर्य पराक्रमी आहे, अशी कल्पना करून चुकले, पण सृष्टींतील इतर चमत्कारांचें गौरव व सामर्थ्य ही त्यांणीं तसेंच वर्णिलें आहे. पर्वत, वृक्ष, नद्या, पृथ्वी, आकाश, वायु, अग्नि, या सर्वांचें होईल तितकें उदात्त वर्णन करावें, हा त्यांचा हेतु स्पष्ट दिसतो. याप्रमाणें एकेकाचा महिमा पूर्ण प्रकारें त्यांनीं गाइला. गातां गातां प्रत्येकजण पाळीपाळीनें श्रेष्ठ, उत्कृष्ट, व सर्वशक्तिमान् देव होऊन बसला, परंतु कवींनीं त्यांतून प्रत्येकास ईश्वर, किंवा देव, असें नांव दिलें, हें ह्मणणें ह्मणजे अगदीं चुकीचें आहे. कारण कीं, ज्यासमयीं त्यांनीं या ऋचा रचिल्या त्यासमयीं ईश्वर, किंवा देव, किंवा अशी कांहीं अन्य कल्पना त्यांच्या मनांत सुद्धां बिलकूल नवती. या सर्व चमत्कारांत ईश्वरी अंश कांहीं तरी असावा, असें त्यांस वाटलें, हें खरें. पण मागाहून त्यांनीं त्या अंशास दैविक किंवा दिव्य असें नांव दिलें, ही गोष्ट फार पुढची. प्रथमतः तर ज्या निरनिराळ्या

पदार्थांचें वर्णन ते करीत त्यांच्या गुणाचा करवेल तितका प्रस्ताव करून ते संतोष पावत. इतकें झाल्यानंतर किंवा कदाचित् हा प्रकार होत असतांच या वर्णिलेल्या पदार्थांपैकीं सर्वांस किंवा बहुतेकांस लावतां येतील अशा विशेषणांचा एक स्वतंत्र वर्गच बनला. याप्रमाणें ज्यास आपण दिव्य किंवा दैविक अंश ह्मणतों, त्याचीं मूलतत्वें उत्पन्न झालीं. पर्वत, नद्या, आकाश व सूर्य जर सजीव व कार्यक्षम (असुर) नाश न पावणारे असे (अजर) न मरणारे असे (अमर्त्य) किंवा प्रकाशमान (देव) अशा नावानें ओळखूं येऊं लागले, तर यांतून प्रत्येक विशेषण थोड्या वेळानंतर अशा आत्म्यांच्या वर्गाचें नांव होऊन राहिलें असावें. हें नांव त्यांची अविकारी जीवनशक्ति, त्यांची क्षयापासून सुटका किंवा त्यांचा प्रकाश दर्शवितें असें नव्हे, तर या शब्दांपासून जो दुसरा विचार कळवितां येतो, तो ही दर्शवितें. ह्मणून अग्नि किंवा विस्तव, हा प्रकाशित आहे असें ह्मणणें अग्नि देव, किंवा प्रकाशित आत्म्यांच्या वर्गात आहे असें बोलण्याहून फारच निराळें आहे. तसेंच द्यौस्, आकाश, किंवा सूर्य, हे असुर, (जिवंत प्राणी) आहेत किंवा अमर्त्य (अमर प्राणी) आहेत अशा ह्मणण्यानें जो अर्थ उत्पन्न होतो, तो, आकाश नाश पावत नाहीं किंवा सूर्य क्रियाशक्त व हलणारा चालणारा आहे, याहून फार विस्तृत आहे. असुर ह्मणजे शरीरसंपत्तियुक्त, अजर ह्मणजे नाश न पावणारें असें, व देव ह्मणजे प्रकाशित, अशीं जीं साधारण विशेषणें आहेत तीं सदोदित सर्व वस्तूंचा एकटा एकच गुण दर्शविण्यासाठीं योजीत असतात परंतु मूळ एकेश्वरमत होतें अशा मताच्या पक्षकारांचें ह्मणणें जर यापेक्षां कांहीं अधिक नसलें कीं ईश्वर हा विशेष्य असून त्याचा शोधही लागला आहे, हळू हळू समजण्यांत येतो, व ऐश्वर्याच्या विशेषणार्थ (ईश्वराची धारणा) मूळ जात्याच एक आहे, तर अशा मताविषयीं कांहीं बोलावें लागेल.

परंतु आपणांस मुख्यत्वेंकरून हें पाहणें आहे कीं ही धारणा सफल झाली कशी; किती पायऱ्या चढून गेल्यानंतर व किती नांवें दिल्यानंतर अनंताविषयींची कल्पना झाली? अज्ञातास नांव देतां आलें? व शेवटीं

दैविक रूपास प्राप्त होतां आलें? वेदांत ज्या आत्म्यांस देव अशी संज्ञा दिली आहे ते पुष्कळ प्रसंगीं ग्रीक भाषेंत ज्यांस दीओई संज्ञा दिली आहे त्यांचे बरोबरीचेही नाहींत. कारण कीं ग्रीक लोकांस थेट होमरच्या कालापासून संशय च आहे कीं, देव या नांवानें प्रसिद्ध आत्म्यांची संख्या व त्यांचे स्वभाव, कसे कां असतना, तरी कोणी एक श्रेष्ठ तर असला पाहिजे. मग त्याला देव ह्मणा किंवा दैव ह्मणा, व देवांचा व मनुष्यांचा कोणी तरी एक पिता असला पाहिजे. पुन्हां वेदांतील कित्येक भागांतही वरील विचार आढळतो खरा, व आपणांस असा विचार होतो कीं जशी ग्रीस, इटली, जर्मनी व अन्य देशांत तशीच आर्यावर्तांत एक देव प्राप्त करून घेण्याची जी धर्मसंबंधीं अभिलाषा आहे ती एका अधिराजाची सत्ता मानणारे अनेक देव असावेत या मतानें परिपूर्ण होईल. परंतु आर्यांची कल्पना थोड्या कालानंतर याहूनही पुढें धांवली व शेवटीं सर्व देव नाकबूल करणें त्यांस भाग पडलें. व सर्व देव त्यांमध्यें द्यौः स्वतां किंवा वरुण किंवा इंद्र किंवा प्रजापति ही टिकले नाहींत. या सर्वांपेक्षां कोणी तरी अधिक श्रेष्ठ देवाच्या शोधार्थ लागण्याची यांनां जरूर कशी पडली तें आपण पाहूं. हल्लीं तर वेदांत येणाऱ्या देवांच्या उत्पत्तीविषयीं विचार करतांना, मला जें मुख्यत्वेंकरून सांगावयाचें आहे, तें हें कीं, हे सर्व देव भिन्न भिन्न मूळांपासून निघालेले असल्यामुळें एकमेकांशीं कांहीं एक संबंध न ठेवितां प्रथम तर एकेकाच्या संगतीनें बाहेर पडले, ह्मणजे प्रत्येक देव आपआपल्या मंडळांत परिपूर्ण झाला, व अशा प्रत्येक मंडळानें कांहीं कालपर्यंत तर आपल्या भक्तांच्या दृष्टीची सर्व मर्यादा व्यापून टाकली. हें सर्व स्वाभाविक आहे. वैदिक मंत्राचें मुख्य महत्त्व व रसिकता याच गोष्टींत सामाविशी झालीं आहेत, परंतु हे सर्व विचार अर्वाचीन भाषेंत स्पष्टपणें समजाऊन देणें हें काम बहुतेक अशक्य आहे. ज्या कालीं वेदकालचे कवि स्वतांच्या रक्षणार्थ पर्वतांची आराधना करीत, किंवा नद्यांस तुमचें पाणी द्या अशी विनंति करीत त्याकालीं नदी व पर्वतांस देव ह्मणून ते मानीत असतील; परंतु असें मानीत असले तरी

देव याचा अर्थ प्रकाशित यापेक्षां कांहींसा जास्त होईल. परंतु ज्यास आपण दैविक ह्मणतों त्यापासून तर देव याचा अर्थ फार दूर असला पाहिजे. तर मग या प्राचीन भाषेचें निश्चित अर्थवान अर्वाचीन शब्दांनीं भाषांतर करून तिचा यथार्थ भाव कसा जाणवितां येईल? नद्या व पर्वत हे जसे या कालीं आपल्यास गोचर आहेत तसेच वेदकालच्या कवींस ही ते गोचर होते यांत संशय नाहीं. परंतु ते त्याविषयीं जो विचार करीत तो बहुतकरून त्यांस क्रियाशक्त पदार्थ मानून करीत, कारण त्यांच्या भाषेतील एका पदार्थाच्या नांवानें जें परिज्ञान होत असे तें केवळ इतकेंच कीं, कार्यशक्ति मजमध्यें आहे असें मानणाऱ्या मनुष्यास त्याचें परिज्ञान कार्यशक्तिदर्शकच होत असे. जोंपर्यंत कोणतीही वस्तु कार्यशक्त अशी वेदकवींच्या मनास उतरली नाहीं तोपर्यंत तींत कांहीं त्यांस माल दिसत नसे व तिचें अस्तित्वही त्यांच्या ध्यानांत येत नसे. परंतु सृष्टीचे अमुक भाग गतिशक्त असावेत अशा तर्कामध्यें, व ज्या कृत्यांस सजीवारोपण किंवा देवपदधारण असें आपण ह्मणतों याच्यामध्यें एक मोठें भगदाड आहे. जेव्हां ते कवि सूर्याविषयीं असेंही ह्मणत, कीं, तो एक रथावर उभा, कांचनकवच घातलेला व हात पसरलेला असा आहे, तेव्हां देखील या सर्व बोलण्याचा अर्थ तर जीं कार्यें ते स्वतां करीत असत त्यांचें स्मरण करविणाऱ्या अशा सृष्टींतील पदार्थाविषयींची कल्पना यापेक्षां कांहीं एक अधिक नव्हती. आपल्या मनास जी भाषा अतिशयोक्त (काव्य अशी) वाटते तीच त्यांच्या मनास सरळ साधी भाषा भासत असे. जें एक आपणास विद्रूप भाषांतरसें दिसतें तें तसें श्रोतेजनास केवळ रमविण्याकरितां किंवा विस्मयांत पाडण्याच्या हेतूनें झालें नाहीं तर पुष्कळदां सृष्टीचें परिज्ञान करून घेण्याच्या कामीं अशक्तता व तीस संज्ञिक नांव देतां न आल्यानें झालें. जर आपणांस वसिष्ठ, विश्वामित्र किंवा दुसऱ्या एखाद्या आर्य कवीस विचारतां आलें असतें कीं, सूर्य जो तुह्मांस सोनेरी रंगाच्या गोळ्याप्रमाणें दिसतो तो हस्तपाद, हृदय व फुफ्फुसयुक्त मनुष्य आहे असें तुह्मी खरोखर मानितां कीं काय? तर ते खचित आपणांस हंसतील, व ह्मण-

तील कीं, तुह्मांस आमची भाषा तर समजली आहे परंतु आमचे विचार तुह्मांस कळले नाहींत.

सवितृ ह्मणजे सूर्य, या शब्दाचा जो पहिल्यानें अर्थ होत असे तो त्याच्या मतलबापेक्षां अधिक नसे. तो 'सू' धातूवरून निघाला. त्याचा अर्थ 'जन्म देणें' किंवा 'आयुष्य देणें' होय. यामुळें जेव्हां हा शब्द सूर्यास लागू करण्यांत आला तेव्हां त्याचा अर्थ केवळ एवढाच होत असे कीं चैतन्य देण्याच्या किंवा फलद्रूप करण्याच्या कामीं सूर्याची जितकी दृश्य शक्ति तितकीच, दुसरें कांहीं नाहीं. यानंतर एका आंगास सवितृ हें एक कथायुक्त आत्म्याचें नांव झालें व त्याजविषयीं जीवनदात्या सूर्यास शोभणाऱ्या अशा कथा सांगण्यांत आल्या, व दुसऱ्या आंगास सवितृ शब्दाचा अर्थ दंतकथेस शोभणारा व अर्थरहित सूर्यास लावतां येणारा एक पोकळ निर्जीव शब्द होऊन राहिला.

सूर्याच्या संबंधानें ज्या ज्या क्रिया आपण पाहात आलों त्याच क्रिया तशाच पुन्हा पुन्हा वेदांतील बहुतेक देवतांच्या संबंधानें आपणास आढळतील. तरी सर्वच देवतांच्या संबंधानें आढळणार नाहींत. अर्धदेव या नांवानें प्रसिद्ध असे नद्या, पर्वत, मेघ, समुद्र, पहाट, रात्र, वायु व मोठें वादळ यांतून कोणतेंही श्रेष्ठ देवाच्या पदवीस प्राप्त झाले नाहींत; तर अग्नि ह्मणजे विस्तव, वरुण ह्मणजे आवरण करणारें आकाश, इंद्र, विष्णु, रुद्र, सोम, पर्जन्य इत्यादिकांस अशा अशा संज्ञा दिल्या आहेत, व प्रत्येकाचें असें असें मोठें वर्णन केलें आहे कीं, त्या संज्ञा व तें वर्णन योग्य रीतीनें तर केवळ एका श्रेष्ठ देवतेलाच शोभेल असें आपणांस वाटतें.

## द्यौस् ह्मणजे प्रकाश देणारें ( आकाश. )

आतां आपण एका दुसऱ्या देवाच्या उत्पत्तीचा व इतिहासाचा विचार करूं. हा देव केवळ वेदकालीन आर्यलोकांचाच नव्हता, तर एकंदर आर्यप्रजेच्या देवांपैकीं हा अति प्राचीन देव आहे. ह्मणजे वेदांतील द्यौस् व ग्रीक भाषेंतील झियुस याविषयीं मीं आतां बोलणार.

वेदांत द्यौस् नांवाचा देव होता, याविषयीं कांहीं विद्वानांस अजूनही संशय आहे, आणि वस्तुत: आर्यावर्तातील अर्वाचीन ग्रंथांत द्यौस् नांवाचा एकही देव नाहीं, एवढेंच नव्हे तर कितीही शोध केला तरी द्यौः शब्दाचें पुरुषवाचक नाम सुद्धां मिळत नाहीं. अर्वाचीन ग्रंथांत द्यौस् हें एक स्त्रीलिंगी नाम झालें आहे, व त्याचा अर्थ केवळ आकाश असा होतो. आतां वेदाचें परिशीलन करणाऱ्यांनीं केलेल्या शोधांतून हा शोध मला फार आश्चर्यकारक वाटत आहे. कारण एक देव जो ग्रीस देशांत झियुस–पेतर नांवानें होता, जर्मनींत झियो नांवानें होता, इटलींत ज्युपिटर, व एड्डा येथें 'टिर' अशा नांवानें प्रसिद्ध होता, व जो संस्कृतांतही असला पाहिजे असें वाटे पण अद्यापि आढळला नव्हता असा तो द्यौस् शब्द एकाएकीं वेदांतील या प्राचीन मंत्रांत सांपडला ! वेदांत द्यौस् शब्द येतो तो केवळ पुल्लिंगी रूपानेंच असतो असें नाहीं, तर पिता ह्मणजे बाप या शब्दाशीं निकट संबंध धारण करणारा असा आढळतो. याप्रमाणें द्यौस्पिता हाही पुन्हा लाटिनमध्यें ज्युपितर या रूपानें आढळतो. हा 'द्यौस् पिता' या शब्दाचा जो शोध लागला आहे, तो जणों मोठ्या दूरदर्शक यंत्राच्या साहाय्यानें गणितानें सिद्ध केलेल्या स्थानींच तो आकाशांतील तारा जसा सांपडावा तसाच सांपडला आहे, असें वाटतें.

परंतु वेदांत ही द्यौस् तेव्हांपासूनच एका निस्तेज ताऱ्याप्रमाणें होऊन राहिला. या शब्दाचा साधारण अर्थ तर आकाश हाच करितात, परंतु याचा आणखीं खरा अर्थ तर प्रकाशित किंवा तेजस्वी असा होईल. कारण हा 'दिव्' किंवा 'द्यु' धातूपासून निघाला आहे, व याचा अर्थ प्रकाशणें किंवा प्रकाशित करणें असा होतो; व हा प्रकाशण्याचा व जगतास प्रकाश देण्याचा गुण द्यौस् नांवावरून स्पष्ट होतो. प्रकाशित असा कोण, ही गोष्ट एकट्या या शब्दानेंच कळत नव्हती. तो एक असुर ह्मणजे जिवंत प्राणी होता, बस इतकेंच. व या नंतरच द्यौस् हा शब्द पौराणिक कथांपैकीं मुख्य झाला. सामान्य भाषेंत जसा सवितृ हा जीवन देणारा या अर्थाच्या संबंधानें झाला होता, त-

याच हा द्यौस् शब्द आकाशांतील बहुतेक दंतकथांसंबंधी व अर्थरहित शब्दांपैकींच एक झाला.

तर मग आतां द्यौस् ह्मणजे प्रकाश किंवा प्रकाशित करणारा प्रथमपासूनच देव किंवा प्रकाशित प्राण्यांत कांहीं प्रकारचीं श्रेष्ठता धारण करण्यास अतियोग्य होता; व ही श्रेष्ठता ग्रीक झियुस व लाटिन ज्युपितर या शब्दांत कशी पूर्णत्वानें साम्यतेंत आढळते हे आपणास समजतें. वेदांतील द्यौस् शब्दांतही आपणास असेंच एक वळण दृष्टीस पडतें; परंतु त्यांत या वळणा विरुद्ध प्रत्येक देवांत अति उत्तम लक्षण धारण करण्याचें जें आंगचेंच स्वाभाविक वळण आहे तें आड आलें.

द्यौस्–आकाश, याचीं आराधना पृथ्वी व अग्नि यांच्याबरोबरच के-लेली आढळते. उदाहरण, ( ऋग्वेद, ७. ५१. ५. ):

'द्यौस्' (आकाश) पिता, व पृथ्वी ( भूमी ) माता, अग्नि ( विस्तव ) बंधु, व अहो तुह्मी वसूनों, हे तेजस्वी देवतानों, आह्मांवर दया करा."

यांत आपल्या दृष्टीस पडतें कीं, द्यौस् नें आद्यस्थान घेतलें आहे, व या प्राचीन आराधनांतून तर या शब्दास बहुतकरून पहिलेंच स्थान दिलेलें आहे. सदोदित त्यास पिता या नांवानें संबोधन होत असतें. उदाहरण, (१.१९१.६) 'द्यौस् पिता आहें, व पृथ्वी, भूमी तुमची माता आहे, सोम तुमचा बंधु आहे, अदिति तुमची बहीण आहे.' तसेंच ( ऋग्वेद, ४.१.१० त ) द्यौस्पिता, स्रष्टा; द्यौस्पिता, जनिता; झियुस पितर जुपितर.

द्यौस् ( आकाश ) ही देवता पुष्कळ ठिकाणीं एकटीच वर्णिलेली आढळत नाहीं. पृथिवी ( पृथ्वी ) व द्यौस् यांचें एकत्र वर्णन आढळतें. हे दोन शब्द एके ठिकाणीं जोडले ह्मणजे वेदांतील जोड देवता होते. तिचें नांव द्यावापृथिवी ( पृथ्वी व आकाश ).

आतां वेदांत तर अशीं पुष्कळ वाक्यें आहेत कीं त्यांत आकाश व पृथ्वीची श्रेष्ठ देवतेप्रमाणें आराधना होत असते. पुन्हा देव हे त्यांचे पुत्र आहेत असेंही वर्णिलें आहे. मुख्यत्वेंकरून वेदांतील फारच लोक-

प्रिय दोन देव, इंद्र, व अग्नि, हे दोघेही त्यांचीं मुलें असें मानण्यांत आलें आहे, तींच हीं ( मातापितरें ) जग उत्पन्न करितात, त्याचें रक्षण करितात, व अस्तित्व ज्यांस आहे अशा ह्मणून जितक्या वस्तु आहेत तितक्यांस आपला टेका देतात.

तरी पण आकाश व पृथ्वीस, त्यांचा अमरपणा, त्यांची सर्वकार्यशक्ति, व त्यांचें आनंत्य दर्शविण्यासाठीं नव्या काढतां आल्या तितक्या उपमा मिळाल्यानंतरही आपण एकाएकीं ऐकतों कीं कोणी एक हुशार कारागीर देवांतूनच उत्पन्न झाला व त्याणें आकाश व पृथ्वी या दोहोंसही उत्पन्न केलें, मग त्यांस द्यावापृथिवी ह्मणा अगर रोदसी ह्मणा. कित्येक ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं आकाश व पृथ्वीस उत्पन्न करणारा व आधार देणारा इंद्र होय; त्याच इंद्रास दुसऱ्या ठिकाणीं द्यौस् चा किंवा आकाश व पृथ्वीचा पुत्र असेंही कल्पिलें आहे.

## द्यौस् व इंद्र यांच्यामध्यें श्रेष्ठत्वासाठीं झगडा.

खचित, आपणास वेदांत या दोन प्रमुख दैवतांमध्यें कांहीं एक प्रकारची ईर्षा उत्पन्न झालेली प्रथमच दृष्टीस पडते. हा झगडा त्या प्राचीन व आद्य काळचा देव व देवी ( आकाश व पृथिवी ) व त्यांच्याहून अधिक अर्वाचीन व शरीरवान इंद्र यांच्यामध्यें झालेला आढळतो. इंद्र हा प्रथम वृष्टि करणारा ज्युपितर प्लुवियस होता. मुख्यत्वेंकरून ज्या चोरानें पर्जन्याचीं अभ्रें बळकाविलीं होतीं, तीं गर्जना व वीज यांच्या योगेंकरून जिंकून पुन्हा सोडवून आणी तोंपर्यंत त्यांस ओढून नेणारे चोर अंधकार, रात्र, व हिंवाळ्याच्या शक्तिविरुद्ध रोजचे रोज व वर्षावर्षानें युद्ध इंद्रानें चालविल्यामुळें त्यास ही उपमा मिळाली असेल. हा इंद्र जरी प्रथमतः आकाश व पृथ्वीचा पुत्र होता, तरी त्याच्या जन्मकाळीं आकाश व पृथ्वी हीं कंपित झालीं असें ह्मणण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. पुन्हा ( ऋग्वेद, १.१३१.१ ) यांत आपणास असें आढळतें कीं: ‘ इंद्रापुढें त्या दैविक द्यौस् ( आकाशानें ) नमस्कार केला, इंद्रापुढें त्या महान् पृथ्वी ( भूमी ) नें नमस्कार केला, हे इंद्रा !

तूं आकाशाचें शिखर कांपविलेंस, गर्जना व विद्युत् यांचा देव जो इंद्र त्याच्यापुढें 'पृथ्वी कंपायमान होईल, आकाश कंपायमान होईल, सूर्य व चंद्र निस्तेज पडतील, व नक्षत्रगण आपला प्रकाश आटोपून धरतील.' अशीं वचनें जीं सृष्टींतील विश्वनियमानुसार वास्तविक आहेत, व जीं त्यास लागू करतां येतात, त्यांचा थोड्या कालानें विवेकास अनुसरून अर्थ करितां येईल, व पुन्हा इंद्राचें महत्व व श्रेष्ठतेबद्दल विचार करतां येईल. एक कवि याप्रमाणें सांगून जातो कीं 'इंद्राचें महत्व तर खचित गगना ( द्यौस् ) हून श्रेष्ठ आहे, पृथ्वीहून श्रेष्ठ आहे, व आकाशाहून श्रेष्ठ आहे. दुसरा कवि ह्मणतो कीं आकाश व पृथ्वीहून इंद्र श्रेष्ठ आहे. इंद्राबरोबर यांची तुलना केली तर हे त्याचे अर्थ होत.

यानतर ह्या देवांच्या पिता व पुत्राच्या अन्योन्य सापेक्ष पदवीविषयीं मनन करावें लागेल, व शेवटीं असें कबूल करावें लागेल कीं, तो पुत्र, ह्मणजे शौर्यसंपन्न इंद्र, त्याच्या विद्युत् व विद्युद्बाणामुळें, त्याच्या पित्याहून, ह्मणजे त्या स्थिर आकाशाहून श्रेष्ठ होता, त्याच्या मातेहून, ह्मणजे त्या अचल पृथ्वीपेक्षां मोठा, व दुसऱ्या देवांपेक्षांही मोठा होता. एक कवि असें ह्मणतो कीं:—' जीर्ण झालेल्या वृद्ध मनुष्याप्रमाणें इतर देवांस हाकून लावतां आलें, परंतु, हे इंद्रा, तूं तर राजा झालास.'

या रीतीनें आपणांस समजलें कीं, इंद्रही असाच श्रेष्ठ देव होऊन बसला. एक कवि ह्मणतो कीं, 'तुझ्या पलीकडे कोणी नाहीं, तुझ्याहून श्रेष्ठ कोणी नाहीं, तुझ्या समानही कोणी नाहीं ' वैदिक मंत्राच्या मोठ्या भागांत इंद्र मुख्यत्वेंकरून श्रेष्ठ देव आहे; तथापि त्या श्रेष्ठत्वाची सीमा इतकी नाहीं, कीं तिनें झियुसच्या पदवीबरोबर या इंद्राच्या पदवीची तुलना करितां येईल. तसेंच अन्य देवही सदोदित या इंद्राहून कांहीं हलके ( उतरते ) नसतात, व पुन्हा असेंही ह्मणतां येत नाहीं कीं, ते सारे सारख्या पदवीचे आहेत. जरी कित्येक प्रसंगीं कांहीं देवांस सारख्या पदवीचे मानिले आहेत, व कित्येक, त्यांत मुख्यत्वेंकरून इंद्र, इतरांपेक्षां श्रेष्ठ मानिले आहेत, तथापि या इतर देवांची

ही एखादे दिवशीं अशी पाळी येते कीं त्या काळीं आह्मांस आशीर्वचन द्या अशी त्यांनां प्रार्थना होत असते. अशा काळीं या देवतांच्या शक्तीचें व शहाणपणाचें वर्णन अशा मोठमोठ्या शब्दांनीं केलेलें असतें, कीं त्याहून हवे लागले तर अधिक बलवत्तर शब्द मिळणारच नाहींत.

## एका श्रेष्ठ देवा दाखल इंद्राची स्तुति.

इंद्रपर अशा एका मंत्राचें व वरुणपर अशा दुसऱ्या एका मंत्राचें भाषांतर मी तुह्मास करून दाखवितों. हें दाखविण्यांत माझा हेतु इतकाच आहे कीं इष्टेश्वरमत हें नांव कोणत्या धर्मास द्यावें. इष्टेश्वर मत ह्मणजे ज्या एखाद्या धर्मांत देव अनेक असून वेगवेगळ्या प्रसंगीं वेगवेगळ्या देवतेचें श्रेष्ठत्वानें वर्णन केलेलें असतें व त्या त्यावेळीं ती ती देवता आपलें इष्ट देवत मानली जाते तें मत किंवा तो धर्म. ज्या अर्थानें आपण हा शब्द घेत आहों त्यांत तुह्मांस कांहीं काव्यचातुर्य पहावयाचें नाहीं. त्या प्राचीन कवींनां काव्यरचनेंत टापटीप ठेवण्याला, किंवा केवळ शोभायमान निरर्थक शब्द योजण्याला फुरसद नव्हती. जें कांहीं ह्मणावयाचें असे त्याला अवश्य असे जे शब्द असतील ते शोधून काढण्याच्या कामीं ते फार मेहनत घेत. बरोबर यथार्थ वाक्यरचना करितां आली कीं जणों त्यांच्या जीवास विसावा मिळे. प्रत्येक मंत्र आपणांस किती कां निर्जीव व विरस वाटला तरी त्यांच्या कर्त्याच्या मनास हा आपण एक मोठा पराक्रम केला किंवा एक महायज्ञ केला असें वाटे. या मंत्रांतला प्रत्येक शब्द अर्थाच्या संबंधानें वजनदार आहे असा अनुभव येतो व त्यापासून कांहीं एक प्रकारचा ठसा ही मनावर उठतो. परंतु त्याचें आपण अर्वाचीन भाषेंत भाषांतर करण्याच्या खटपटींत पडलों कीं, आपल्या मनाची निराशा झाल्यामुळें हें काम सोडून द्यावें असें कित्येक वेळां वाटूं लागतें.

ऋग्वेद, ४.१७:–'हे इंद्रा! तूं मोठा आहेस. पृथ्वीनें व आकाशानें तुझ्या एकट्यावरच खुषीनें हें आपलें राज्य सोंपविलें आहे. ज्यावेळीं तूं

त्या शूर वृत्राला मारिलेंस, त्यावेळीं त्या असुरानें गिळून टाकिलेले जे उदकाचे झरे होते, त्यांस तूं सोडवून आणिलेंस. ( १ ).

'तुझें ऐश्वर्य उदयास येतांच तूं जो पुत्र त्याच्या क्रोधास भिऊन आकाश कांपलें, पृथ्वी ही कांपली. स्थैर्यविशिष्ट पर्वत नाचले. अरण्यास व मैदानास ओलावा आला व पाणी वाहिलें. ( २ ).

'शौर्यानें वज्रप्रहार करणाऱ्या व एकसारखी आपली शक्ति प्रदर्शित करणाऱ्या त्वां पर्वतांचें विदारण केलेंस, आनंदानें तूं वृत्रास वज्रानें मारिलेंस. व तो उदकास अडविणारा दुष्ट मेल्यानंतर उदक मोठ्या वेगानें वाहूं लागलें. ( ३ ).

'तुझा पिता जो द्यौस् त्यास (तुझ्याचमुळें) पराक्रमी मानितात. ज्यानें इंद्रास उत्पन्न केलें तो अति चतुर कारागिर होता. कारण त्याणें अशा देवास जन्म दिलें कीं जो प्रकाशित असून ज्याची वज्रशक्ति थोर आहे, पृथ्वीप्रमाणें जो आपल्या स्थानापासून कधीं च्युत होत नाहीं, ह्मणजे डगमगत नाहीं. ( ४ ).

'ज्याची पुष्कळ लोक आराधना करितात, जो एकटाच पृथ्वीला हालवूं शकतो, तो इंद्र प्रजांचा राजा आहे. सर्व प्राण्यांस आनंदकारक गोष्ट तर हीच कीं तो सत्यवान् आहे. सर्व प्राणी या पराक्रमी देवाचें औदार्य वर्णितात. ( ५ ).

'सर्व सोमपान सदोदित याचेंच होतें; सर्वांहून प्रबल आनंद या महान् देवाकारणेंच होता; तूं सदोदित सर्व भांडारांचा निधि होतास; हे इंद्रा, तूं सर्व मनुष्यांस त्यांचें त्यांचें भाग्य निर्माण करून देतोस ( ६ ).

'हे इंद्रा! ज्याकाळीं तूं जन्मलास त्यावेळीं सर्व मनुष्यें तुला भिऊं लागलीं. हे वीरा, खालीं महावेगानें तुटून कोसळणाऱ्या उदकप्रवाहाच्या आड जो सर्प बसला होता त्यास त्वां कापून टाकिलेंस. (७).

'इंद्र हा सदा हंता, धैर्यवान, विक्राळ, महान, अपार, असा असून प्रचंड गडगडणारा, वीज धारण करणारा, शौर्यशाली, योद्धा आहे, त्याची स्तुति करा. तो वृत्रास मारतो, लूट जिंकून आणितो, संपत्ति देतो, तो संपत्तिमान आहे, तो उदार आहे. ( ८ ).

'जे शत्रु एकत्र झाले आहेत त्यांची तो दाणादाण करून सोडितो. तोच मात्र एकटा युद्धांत शूर ह्मणून प्रख्यात आहे. त्यानें जी लूट संपादिली आहे ती तो घरीं आणितो. त्याच्या मैत्रीनें आपण त्यास प्रिय होऊं. ( ९ ).

'शत्रूंस जिंकण्याचा व त्यांचा समूळ नाश करण्याचा गुण त्याचे आंगीं आहे. तसाच तो युद्धांत ढोरें आणितो. ज्या काळीं इंद्र खरोखर क्रोधायमान होतो, त्या काळीं दृढ असणारा पदार्थही त्याला भिऊन कंपायमान होतो. ( १० ).

'इंद्रानें पशू जिंकिले, त्यानें सोनें व घोडे जिंकून आणिले, मोठमोठ्या किल्ल्यांचेंही तो कंदन करितो. इतर सर्व बलवान पुरुषांहून तोच गृहस्थ बहुत लोकांस संपत्ति वांटून देणारा व संपत्तीचा संग्रह करणारा आहे. ( ११ ).

'इंद्रास ज्या मातापितरांनीं जन्म दिलें, त्यांची तो अगदीं पर्वा करीत नाहीं. जसा तुफान वारा गडगडणाऱ्या ढगांस घेऊन झपाट्यानें जातो, तसा इंद्र एका क्षणांत आपला आवेश प्रकट करितो. (१२).

'ज्याला घर असेल त्याला हा घरावांचून दीनवाण्यासारखा करून सोडतो. तो बलवान देव धूळ उडवून धुळीनें आकाश भरून टाकितो. विद्युल्लतेस धारण करणारा तो द्यौस् प्रमाणें पदार्थांस तो फोडून टाकतो. तो आपले मंत्र गाणाऱ्या कवीस संपत्तींत बसवील काय? ( १३ ).

'त्यानें सूर्याचें चक्र पुढें लोटलें, नंतर 'एतश' यास त्याच्या मार्गांत अडकविलें. पुन्हा त्यानें त्यास या आकाशाच्या जन्मभूमींत, ह्मणजे रात्रीच्या तमोमय डोहांत बुडविलें. (१४).

'एखाद्या विहिरींतून जसे आपण कळशी भरून काढितों, त्याप्रमाणें आह्मां कवींस जेव्हां गाई पाहिजे असतील, घोडे पाहिजे असतील, लूट पाहिजे असेल, किंवा स्त्रिया हव्या असतील तेव्हां आह्मांस तो शक्तिमान देव स्त्रिया देतो. त्याचें साहाय्य कधींही व्यर्थ जात नाहीं, अशा त्या इंद्रास मित्राप्रमाणें आह्मीं आपलेजवळ आणितों. ( १६ ).

'आमच्या मित्राप्रमाणें येऊन तूं आमचा रक्षणकर्ता हो. तूं यज्ञ-

दान करणाऱ्याचा शांतिदाता आहेस, मित्र आहेस, पिता आहेस, अत्युत्तम पिता आहेस, तूं स्वातंत्र्यदाता आहेस, मागणारास तूं आयुष्य देतोस, तो तूं आह्मांकडे पहा ! ! ! ( १७ ).

'जे कोणी तुझी मैत्री इच्छितात, त्या सर्वांचा तूं मित्र व रक्षणकर्ता हो. ज्याकाळीं तुझी स्तुति झाली असेल, त्याकालीं तुझी कीर्ति गाणाऱ्यास तूं जीवित दान दे. आह्मी सर्वांनीं एकत्र जमून तुला बलिदानें दिलीं आहेत, व हे इंद्रा ! या कर्मामुळें आह्मीं तुझें महत्व वाढविलें आहे.(१८).

'इंद्रास बळवानाप्रमाणें वर्णिलेला आहे, कारण कीं जरी तो एकटा असला तरी तो पुष्कळ अनुपम शत्रूंस मारितो. त्याच्या आश्रयाखालीं त्याचा मित्र व कवि असा होत्साता मी उभा आहें. मनुष्य असो किंवा देव असो, कोणाच्यानेंही त्याच्या विरुद्ध जातां येत नाहीं. ( १९ ).

'इंद्र जो सर्वशक्तिमान, बलवान, मनुष्यांचा पालक, वज्रदेही, अयोध्य, असा आहे तो हें सर्व खचित आपणासाठीं वास्तविक करो. तूं जो सर्व वंशांचा राजा आहेस, तो तूं श्रेष्ठ कवीची जी कीर्ति असते ती आह्मांस दे. ( २० ).

## इष्ट व श्रेष्ठ दैवत अशा संबंधाचें वरुणाचें स्तोत्र.

हें पुढील स्तोत्र वरुणाचें आहे. ( ऋग्वेद २. २८. ) :—ही ( सृष्टि ) शहाणा राजा असा जो आदित्य त्याची आहे. तो आपल्या स्वतांच्या पराक्रमानें इतर प्राण्यांचा पराजय करो. मी त्या देवाप्रीत्यर्थ एक स्तोत्र रचिलें आहे. या स्तोत्रांत त्या उदार वरुणाविषयीं बरीच भक्ति प्रदर्शित होते. ( १ ).

'हे वरुणा, आह्मीं सदोदित तुझें वर्णन करीत असतों, व तुझी स्तुति गात असतों. यज्ञकुंडांत असलेल्या निखाऱ्यांप्रमाणें सुंदर उषेच्या आगमनसमयीं तुला आह्मीं प्रत्यहीं नमस्कार करीत असतों. तूं आपल्या चाकरीस आह्मांस ठेवून आशीर्वाद देऊन सुखी कर. ( २ ).

'हे वरुणा, तूं आमचा मार्गदर्शी आहेस. तुझ्या आश्रयाखालीं आह्मांस राहूं दे. तुझ्याजवळ शौर्यसंपन्न वीर पुष्कळ आहेत, व त्यांची कीर्ति पृथ्वीभर चारी दिशांत होत आहे. हे देवांनों ! हे अदितीच्या

अजिंक्य पुत्रांनों ! आह्मांस तुमचे मित्र असें समजून आह्मांवर कृपा करा व आह्मांस पदरांत घ्या. ( ३ ).

' राज्यकर्त्या आदित्यानें या नद्या पाठविल्या आहेत. त्या वरुणाच्या नियमाप्रमाणें चालल्या आहेत. त्या थकत नाहींत व बंदही पडत नाहींत. पक्ष्यांप्रमाणें त्या सर्व दिशांकडे मोठ्या त्वरेनें उड्डान करितात.

' माझें पाप शृंखलेप्रमाणें आहे. ती पापरूप शृंखला मजपासून तोडून टाक. आणि हे वरुणा ! आह्मी तुझ्या नियमाचा प्रभाव वाढवूं. मी माझें कवन रचीत आहें, तोंपर्यंत तारा तुटूं देऊं नको. योग्यकाल येण्या पूर्वी या ऋचा रचणाऱ्या कवीच्या स्थूल देहाचा भंग होऊं देऊं नकोस. ( ५ ).

' हे पुण्यवान वरुण राजा ! मजपासून हा त्रास दूर कर, मजवर दया कर. जसें एखाद्या वांसराचें दावें सोडतात, तसें आह्मांस आमच्या पापापासून तूं मुक्त कर; कारण ज्या समयीं तुजपासून मी दूर असतों, त्या समयीं मला माझ्या नेत्राचें एक निमेषही माझ्या स्वाधीन ठेवतां येत नाहीं ! ( ६ ).

' हे वरुणा, शस्त्रांनीं तूं दुष्टकर्मं करणाऱ्यांस यथेच्छ मारतोस, त्या शस्त्रांनीं आह्मांस मारूं नकोस. ज्या जागेंतून प्रकाश नाहींसा झाला आहे, त्या जागीं आह्मांस जाऊं देऊं नकोस. आमच्या शत्रूंची दाणादाण करून टाक ह्मणजे आह्मीं वांचूं. ( ७ ).

' हे बलवान देवा वरुणा ! आह्मीं तशी स्तुति पूर्वी गाइली होती, हल्लीं गात आहों, व पुढेंही गाऊं. कारण कीं हे अजिंक्य वीरा ! तुजवरच सर्व अचल नियम एखाद्या खडकावर ठेविल्याप्रमाणें अवलंबून राहिले आहेत ! ( ८ )

' सर्व आत्मकृत पापापासून मला अगदीं दूर कर. व हे राजा ! इतरांनीं केलेल्या पापाबद्दलची शिक्षा मला भोगावी न लागेल असें कर. अद्यापि तर मजवरून पुष्कळ उषा गेल्या नाहींत. ह्मणून हे वरुणा ! त्या आहेत तोंपर्यंत आह्मांस जगूं दे ! ( ९ ).

' हे वरुणा ! कोणी माझा स्नेही किंवा मित्र असून, मी निद्रावश

असेन अशाकाळीं त्यानें मजविरुद्ध भयंकर मारण मंत्राचें जर साधन केलें असेल, किंवा एखादा चोर अथवा लांडगा मजला इजा करण्यास इच्छित असला, तर अशांपासून आमचें रक्षण कर. ( १० ).

एखादा ग्रीक कवि झेयुस ( ज्युपितर ) ची स्तुति गाऊं लागला असतां त्यास यापेक्षां जास्त कांहीं बोलतां येणार नाहीं. मला आपणांस दुसऱ्या स्तोत्रांमधून सहज निवडून काढिलेल्या कांहीं वाक्यांचा उतारा देतां यईल. त्यांत अग्नि, मित्र, सोम व इतर देवांविषयीं, अशाच किंवा याहून ही अधिक सुंदर शब्दांनीं स्तुति केलेली आहे.

## इष्टेश्वर मत, धर्माचें देशभिन्नत्वें करून किंवा स्थलभिन्नत्वें करून स्वरूप.

तेव्हां इष्टेश्वर मताचा अर्थ हा आहे. धर्मविषयक विचारांचा तो असा एक प्रकार आहे, कीं ज्याची ओळख आपणांस पहिल्यानें वेदद्वारानें झाली आहे. याचप्रमाणें इतर धर्मासही याच प्रकारांतून जाणें भाग पडलें होतें असें मानण्यांत कांहीं संशय नाहीं. इसवी सन १८५९ त मी ' प्राचीन संस्कृत विद्येचा इतिहास' प्रकट केला त्यांत पहिल्यापासूनच धर्माच्या या इष्टेश्वर रूपाकडेस लोकांचें लक्ष आकर्षिलें होतें. ५३२ व्या पृष्ठांत मी लिहिलें आहे कीं ' ज्या काळीं या प्रत्येक देवाची आराधना होत असे त्याकाळीं ते इतर देवांपेक्षां श्रेष्ठ किंवा कनिष्ठ आहेत, असें कल्पून त्यांच्या शक्तीची सीमा झाली असें मनांत आणूं नये. प्रत्येक देव भक्तांच्या कल्पनेंत भावांत इतर देवां इतकाच योग्य असतो. जरी आपल्या मनांत देवांच्या बहुत्वामुळें प्रत्येक भिन्न देवाच्या शक्ति अवश्य दिसण्यांत येतात असें कल्पिलें, तरी ज्या काळीं त्याची आराधना होत असते, त्याकाळीं तो एक खराच ईश्वरसा वाटतो, व पुन्हा ईश्वरा इतकाच श्रेष्ठ व स्वतंत्रसा वाटतो. कवीच्या दृष्टीपुढून इतर सर्व देव अंतर्धान पावतात, व भक्तकामपरिपूरक जो देव तोच एकटा त्याच्या डोळ्यांपुढें आपल्या पूर्ण प्रकाशासहित येऊन उभा राहतो.

" हे देवांनों ! तुमच्यांत कोणी लहानही नाहीं किंवा कोणी युवा ह्मणजे तरूण ही नाहीं; खरोखर. तुह्मी सर्वजण मोठे आहांतः कवि मनु वैवस्वतानें हा विचार जितका स्पष्टपणें प्रसिद्ध केला आहे तितका जरी कदाचित् स्पष्ट नसला, तरी वेदांत येणाऱ्या सर्व कवितांत तो व्यापून राहिलेला आहे. जरी कांहीं प्रसंगीं दैवतांची स्पष्ट रीतीनें मोठे देव व लहान देव, युवा ह्मणजे तरूण देव व वृद्ध देव ह्याप्रमाणें आराधना करीत असतात, ( ऋ, १. २७. १३ ) तरी दैविक शक्तीसाठीं अति विस्तृत वचनें शोधून काढावयाचा हा तर केवळ एक यत्न आहे, व कोणत्याही प्रसंगीं कोणत्याही देवास कोणत्या ही देवाचा दास असें मानिलें नाहीं. तथापि अनेकेश्वरमताच्या साधारण अर्थापासून निराळें ठेवण्यासाठीं ज्या मतास मी इष्टेश्वरमत असें नांव दिलें आहे, त्यावरून कोणी ही असें समजूं नये, कीं इष्टेश्वरमत केवळ हिंदुस्थानांतच होतें. ग्रीक देशांत, इटली देशांत, जर्मनींत ही हें मत होतें असा आपणास पत्ता लागतो. स्वतंत्र ज्ञातींतून ज्याकालीं प्रजा स्थापित होत असतात, त्याच्या पूर्वींच हा पत्ता आपणांस फार स्पष्टपणें लागत असतो. या विषयींचा दृष्टांत मला हाच देतां येईल कीं राजसत्तात्मक राज्यापूर्वी अराजसत्ता ह्मणजे, धर्माच्या साम्राट प्रकारापासून अगदीं भिन्न लोकाभिप्रायानुसार जो राज्यप्रकार असणें हा होय. यास अतिउत्तम नांव देणें झाल्यास हा धर्माचा वाक्काळ ( भाषाकाळ ) ह्मणतां येईल. जसें कोणत्याही भाषेच्या पूर्वीपासून जी एक भाषा प्रजेची सामान्य भाषा होऊन बसते, तिच्या पूर्वीच्या तिला उत्पादक जशा भाषा असतात त्याचप्रमाणें धर्माच्या ही बाबतींत आहे. ते धर्म प्रत्येक घराच्या चुलीशीं आविर्भूत होतात. अनेक कुटुंबें एकत्र झाल्यानें जशी जात बनते, व असें झालें ह्मणजे जी केवळ एकटी एक चुल होती, ती सर्व गांवची यज्ञवेदी होऊन रहाते, व जशा भिन्न भिन्न जाती एकत्र झाल्यानें एक राज्य होतें, त्याप्रमाणेंच त्या भिन्न भिन्न यज्ञकुंडांचें एक मंदिर ( शाळा ) होऊन राहतें, किंवा सर्व प्रजेचें तें पवित्र स्थान होऊन जातें. ही क्रिया साहजिक आहे व ह्मणूनच ती सा-

मान्य आहे. ही क्रिया थेट उत्पत्तीपासून आपणांस एकस्या वेदांत जितकी स्पष्टतेनें दिसण्यांत येते तितकी दुसऱ्या इतर ठिकाणीं कोठेंही दृष्टीस पडत नाहीं.

## भिन्न भिन्न देवांची श्रेष्ठता.

थोड्याशा उदाहरणांनीं ही गोष्ट याहूनही अधिक स्पष्ट होईल. दुसऱ्या मंडळाच्या पहिल्या मंत्रांत अग्नीस सर्व जगताचा पति, मनुष्यमात्राचा स्वामी, शहाणा राजा व मनुष्यांचा पिता, बंधु, पुत्र, व मित्र, अशीं नांवें दिलीं आहेत इतकेंच नव्हे, तर इतर सर्व देवांचीं नांवें अग्नीस देऊन त्यांच्या गुणाचा ही अध्यास अग्नीवर केला आहे. एवढें खरें आहे कीं हें सूक्त फार अर्वाचीन कालच्या काव्यांतील आहे. तथापि त्यांत जशी अग्नीस श्रेष्ठ पदवी दिली आहे, तशी इतर देवांच्या ईश्वरी लक्षणांत कांहीं न्यूनता दर्शविण्यासारखें मंत्रांतून कांहींच आढळत नाहीं.

इंद्राचें वर्णन कसकशा प्रकारानें करतां आलें हें आतांच त्याला उद्देशून रचलेल्या मंत्रांत आपण पाहिलें. मंत्रांतून व ऋग्वेदाच्या आलीकडल्या ब्राह्मण ग्रंथांतून इंद्र हा सर्व देवांत अतिशक्तिमान व अत्यंत शूर योद्धा ह्मणून त्याचें वर्णन केलें आहे. व दाहाव्या पुस्तकाच्या एका मंत्राचा मुख्य विषय तर इंद्रच आहे: 'विश्वस्मात् इंद्र उत्तर:' ह्मणजे इंद्र सर्वांत श्रेष्ठ आहे.

दुसऱ्या एका सोम देवाविषयीं असें वर्णन केलें आहे कीं हा जन्मतांच मोठा होता, व त्यानें सर्वांस जिंकिलें. सोमास विश्वपति नांव दिलें आहे, मनुष्याचें आयष्य दीर्घ करण्याची याच्या आंगीं शक्ति आहे, इतकेंच नव्हे, तर एक प्रकारें तर, देव देखील आपल्या अस्तित्वाबद्दल व अमृतत्वाबद्दल सोमाचे ऋणी आहेत. आकाश व पृथ्वी, मनुष्य व देव यांचा राजा सोम आहे, असें ह्मटलें आहे. वरुणाच्या (ऑरेनोसच्या) स्तुतिपर जे मंत्र आहेत ते वाचले तर आपल्या दृष्टीस पडेल कीं या देवाचें या कालीं स्मरण करतेवेळीं, कवीच्या बुद्धीनें तोच श्रेष्ठ व सर्वशक्तिमान असा आहे.

आपल्या कवीनें वरुणाचें जें कांहीं वर्णन केलें आहे, त्यापेक्षां दिव्य व श्रेष्ठ शक्तीची कल्पना प्रदर्शित करण्याचा यत्न करण्याच्या कामीं अधिक तें मानवी भाषेच्या हातून काय होणार आहे ? कवि असें ह्मणतो, ' आकाशाचा व पृथ्वीचा स्वामी तूं आहेस. तूं सर्वांचा पति आहेस.' ( १.२९.२०. ); किंवा दुसऱ्या एका मंत्रांत ( २.२७.१०.) ह्मटलें आहे कीं, ' सर्वांचा राजा तूं आहेस, जे देव आहेत त्यांचा व जे मानव आहेत त्यांचा तूं स्वामी आहेस.' वरुणास केवळ सृष्टीचाच पति असें नांव दिलें नाहीं; तो सृष्टीचे नियम जाणतो व तो ते चालवितो. कारण कीं, धृतव्रत अशी जी त्यास उपमा दिली आहे तिचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणेंच होतो. व्रत ह्मणजे सृष्टीचे नियम–कशानेंही न डगमगणारे नियम. जसे एखाद्या खडकावर खिळून बसविले असावे त्याप्रमाणें ते व्रत (नियम) वरुणावर स्थापित झालेले आहेत. ह्मणून वरुण बाराही महिने जाणतो. आणि तेरावा महिनाही जाणतो. वायूच्या गतीविषयीं व हवेमध्यें उडणाऱ्या पक्ष्यांविषयीं, समुद्रांत फिरणाऱ्या गलबतांविषयींही त्याला ज्ञान आहे. सृष्टींतील सर्व चमत्कार तो जाणतो. त्यास गत गोष्टी कळतात, इतकेंच नव्हे तर त्यास भावी गोष्टीही कळतात. पण या सर्वांहून विशेष गोष्ट ती ही कीं, वरुण सत्य सामाजिक नियमांवर देखरेख ठेवितो. उदाहरणार्थ, कवि एका मंत्रांत आपले दोष पदरांत घेऊन स्तुतीस आरंभ करितो : ' मी वरुणाचीं कामें विसरलों आहें, व त्याच्या नियमांचें मी अतिक्रमण केलें आहे.' कवि वरुणाची क्षमा मागत आहे, व आत्म संरक्षणाविषयीं मानवी जातीची अशक्तता दर्शवून विनंति करीत आहे. पापाचें फल मरण असें जाणून त्याजबद्दल आपला द्वेष तो प्रदर्शित करतो. जसें एखाद्या घोड्यास ममताळू शब्दांनीं माणसाळतां येतें त्याच रीतीनें एक कवि वरुणाचें समाधान आपल्या प्रार्थनेनें करण्याची आशा ठेवितो. या मंत्राच्या सरशेवटीं कवि ह्मणतो कीं; ' कृपायमान हो व पुन: माझ्याशीं बोल!' हें वाचीत असतांना ख्रिस्ती धर्मस्तोत्रांतील ' तो (देव) आमचें शरीर जाणतो. ह्मणून आपण मातीचे बनलेले आहों, हेंही तो जाणतो!' या शब्दांची कोणास आठवण होणार नाहीं?

तथापि हा वरुण देखील कांहीं श्रेष्ठ देव नव्हे. तो एक अद्वितीय असाही नाहीं. बहुधा नेहमीं तो दुसऱ्या एका मित्र नांवाच्या देवाच्या साहचर्यानें असतो. वरुण मित्राहून मोठा आहे, हें मुळींच दर्शविलेलें नसतें.

या उपासनेच्या प्रकाराचें नांव मी इष्टेश्वरमत असें ठेवितों. ह्मणजे भिन्न भिन्न एकेकट्या देवांची पूजा. ज्यांत इतर सर्व देवांचा स्पष्टपणें निषेध केलेला असतो अशा एकेश्वरमतापासून व अनेकेश्वरमत, ह्मणजे बहुत देव एकत्र मिळून एका श्रेष्ठ देवाच्या आज्ञेत राहतात व त्यांचें एक देवमंडळ होतें त्यापासून वरील इष्टेश्वरमत वेगळें मानिलें पाहिजे.

## इष्टेश्वरमताची अधिक अभिवृद्धि.

वेदांतील या इष्टेश्वरमताची जास्त वृद्धि होतां होतां शेवटीं काय झालें तें आपण आतां पाहूं. यापैकीं बहुतेक पृथक् देवांची प्रवृत्ति अशी आहे कीं, ते एकाच मुळांतून उत्पन्न होतात व थोडा वेळ आपल्या भिन्न रूपांच्या स्थितींत राहून पुनः एकरूपता पावतात. द्यौस्‌चा अर्थ आकाश, ह्मणजे सदोदित डोळ्यांपुढें राहणारा प्रकाश, असा होता. वरुणाचा अर्थ देखील आकाश, ह्मणजे सर्वांचा समावेश करणारें, असा होता. मित्र हा देखील आकाश, ह्मणजे सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित झालेलें जें आकाश त्याचा प्रतिनिधि. सूर्य ह्मणजे आकाशांतील तेजस्वी सूर्य. सवितृ ह्मणजे प्रकाशदाता व चैतन्यदाता सूर्य. विष्णु ह्मणजे तीन पावलांत समग्र आकाशाचें आक्रमण करणारा सूर्य. इंद्र हा आकाशांतील वृष्टि करणारा. रुद्र व मरुत् हे आकाशामधील गर्जना व तुफान या सृष्टिचमत्कारावरून ओळखावयाचे. वात व वायु हे वातावरणांतले वारे होत. अग्नि हा विस्तव व प्रकाश. मग तो कोठें कां दृष्टीस पडेना ? प्रातःकाळीं अंधकारांतून निघणारा व सायंकाळीं अंधकारांत गुप्त होणारा प्रकाश हाच अग्नि. हीच प्रक्रिया कित्येक दुसऱ्या लहान लहान देवांसही लागू आहे. यामुळें बहुतेक असें झालें आहे कीं, एका देवाविषयीं जें वर्णन केलें आहे तेंच अन्य देवांसही लागू करतां येतें. एकास दिलेलीं विशे-

षणें दुसऱ्या पुष्कळ देवांस दिलेलीं आढळतात. निरनिराळ्या देवांविषयीं एकच गोष्ट सांगितलेली आढळते.

आणि सौर्यमंडळांतील देव, ह्मणजे सूर्यच नव्हे तर इंद्र, ह्मणजे पर्जन्याचा देव, मरुत् ह्मणजे वायु देव, हे सर्व द्यौः (आकाश) चे पुत्र होत. आणि आकाश पृथ्वीचा पति, अशीही कल्पना आहे. ह्मणून पृथ्वी ही सर्व देवांची माता ह्मणतां येईल.

सूर्य जेव्हां उगवतो, तो कांहीं वेळ प्रकाश देण्यासाठींच उगवत नाहीं. तर आकाश व पृथ्वी यांस आपल्या डोळ्यांसमोर जणों पसरून उघडीं करण्यासाठींच उगवत असतो, अशी कल्पना करीत. अशी कल्पना जेव्हां सुचली, तेव्हां सूर्य हा आकाश व पृथ्वी यांस पुनः आपले जवळ आणितो, किंवा आपलेसाठीं त्यांस निर्माण करितो, असें ह्मणणें, ह्मणजे एक पाऊल आणखीं पुढें सहज टाकल्याप्रमाणेंच आहे. तथापि हा अशा प्रकारचा पराक्रम इंद्र, वरुण, अग्नि, ह्मणजे सूर्याचा प्रकाश, व समग्र सृष्टीस आपल्या तीन पावलांनीं उल्लंघन करणारा जो विष्णु तोही करितो, असें वर्णन केलें आहे. दुसऱ्या रीतीनें पाहूं गेल्यास अग्नि सूर्यास परत आणितो असें कल्पिलें आहे, व दुसरे वेदकवि हाच पराक्रम इंद्र, वरुण व विष्णु यांनींही केला आहे, असें वर्णन करितात.

जरी अंधकार व मेघ, यां विरुद्ध होणारें तुंबळ युद्ध मुख्यत्वेंकरून इंद्र चालवितो, तरी या युद्धांत द्यौस् आपली वीज बलानें फेंकतो, अग्नि हा अंधकाराचा संहार करितो, आणि विष्णु, मरुत् व पर्जन्य हे सर्व जण त्या आन्हिक किंवा वार्षिक युद्धांतलेच अंगभूत योद्धे होत.

हें जसें आतां आपणांस वाटतें तसेंच प्राचीन काळच्या कवींसही वाटलें. ते वारंवार असेंही ह्मणून दाखवितात कीं, जो एक अद्वितीय देव तो व इतर देव यांचें ऐक्य आहे. उदाहरणार्थ, अग्नि जो विश्वरूपी देव तोच पुनः इंद्र, विष्णु, सवितृ, पूषन्, रुद्र व अदिति होय. इतकेंच नव्हे, तर असें ह्मटलें आहे कीं, हा स्वतांच हे सर्व देव होय. अथर्ववेदाच्या एका ऋचेंत (१३. ३. १३.) ह्मटलें

आहे कीं:-'सायंकाळीं अग्नि वरुण होतो. प्रातःकाळ उगवल्याबरोबर तो मित्र होतो. सवितृ झाला म्हणजे तो आकाशांत जातो. इंद्र झाला म्हणजे तो आकाशाच्या मध्यभागाचें तपन करितो.'

सूर्य तोच इंद्र व अग्नि होय, असें म्हटलें आहे; जो सवितृ तोच मित्र व पूषन्; इंद्र तोच वरुण; द्यौस् म्हणजे आकाश, तोच पर्जन्य किंवा वृष्टि करणारा देव होय, अशी कल्पना केली आहे. स्वतंत्र देवांची संख्या कमी करण्याच्या कामीं हें सर्व फार अगत्याचें होतें हें खरें आहे; तथापि अजून एकेश्वरमतापासून आपण फारच दूर आहों.

प्राचीन कवींनीं जी दुसरी एक युक्ति काढली होती व जी केवळ वेदांत मात्र आढळते ती ही कीं, त्यांनीं संयुक्त[1] देव तयार केले. एकच कार्य करण्याची शक्ति धारण करणाऱ्या दोन देवांच्या नांवांचा एक संयुक्त शब्द करून त्याला द्विवचनाचा प्रत्यय लावीत. हा संयुक्त शब्द तिसऱ्या एका नव्या देवाचें नांव बने. याप्रमाणें झालेले मित्राविषयीं मंत्र आहेत इतकेंच नव्हे, तर मित्रा-वरुणौ अशा नांवाच्या एका देवा विषयींही मंत्र आहेत; इतकें असूनही कित्येक प्रसंगीं तर यांस दोन मित्र व दोन वरुण, असेंही म्हणतात.

तिसरी एक युक्ति ही होती कीं सर्व देवांचा एका सामान्य नांवांत समावेश करावयाचा. म्हणजे त्यांस विश्वदेव, म्हणजे 'सर्व-देव', असें नांव देऊन त्यांची एकत्र स्थानीं आराधना करीत व त्यांस बलिदानें अर्पीत.

सरते शेवटीं त्यांनीं एक निराळीच युक्ति योजिली व ती आपणास फारच सोईची वाटते. हीच युक्ति ग्रीक व रोमन् लोकांनींही काढिली होती. ती युक्ति ही कीं, सर्व देवांच्या मस्तकावर कोणी तरी एक

---

१ हे जे संयुक्त देव किंवा हीं जीं देवयुग्में, त्यांच्यापैकीं मुख्य अशांचीं नांवें सांगतों:-

| | | |
|---|---|---|
| अग्नी-षोमौ | इंद्र-बृहस्पति | पर्जन्य-वातौ |
| इंद्र-वायु | इंद्रा-वरुणौ | मित्रा-वरुणौ |
| इंद्राग्नी | इंद्रा-विष्णू | सोमा-पूषणौ |
| इंद्र-पूषणौ | इंद्रा-सोमौ | सोमा-रुद्रौ |

श्रेष्ठ देव कल्पावयाचा. पुष्कळ देवांचें अस्तित्व ग्रहण करून पुनः एकाच देवाविषयींची जी अभिरुची होती ती या युक्तीनें परिपूर्ण झाली. याप्रमाणेंच ग्रीक भाषेंतील 'ऑइस् कोइरेनॉस् अॅपॉन्' या नांवानें, एका श्रेष्ठ शक्तीविषयींची ग्रीक लोकांची मनकामना परिपूर्ण होऊन, अर्वाचीन कालच्या कपोलकल्पित कथांच्या, व सृष्टींत उपलब्ध होणारीं जीं ईश्वराचीं निरनिराळीं स्वरूपें (उदाहरणार्थ, अॅपोलॉन, अॅथिना किंवा पोसिदोन व हेडीझ् हे जे सारे झ्युस्च्या योग्यतेचे व बरोबरीचे झाले होते) त्यांच्या होणाऱ्या पूजेच्या, केवळ विरुद्धच जावें लागलें नाहीं. कित्येक पंडितांनीं अशी कल्पना काढली आहे कीं, ज्या प्रजेच्या राज्याची व्यवस्था एकसत्तात्मक होती, अशा प्रजेच्या देवमंडळांतही अशीच एकसत्तात्मक व्यवस्था कल्पिली असते. हें ह्मणणें जर खरें असलें तर, प्राचीन आर्यावर्तातल्या देवांमध्यें कोणी राजा नव्हता; यावरून आपणांस असेंही ह्मणतां येईल कीं, त्या देशांत एका राजानें चालविलेलें राज्यच नव्हतें !

## एकेश्वरमताकडे प्रवृत्ति.

तथापि वेदकाळच्या आर्यांनीं आपल्या देवांमध्यें कांहीं एक प्रकारची श्रेष्ठता स्थापित करण्याचा यत्न केला होता. हा यत्न जितका ग्रीस व इतर देशांत तडीस गेला, तितका आर्यावर्तांत तडीस गेला नाहीं. आपण मागाहून ऐकत आलों आहों कीं, सवितृ, ह्मणजे सूर्य, वरुण व इतर देव यांनीं आपल्या प्रकाशानें सर्व जगत् प्रकट केलें. इतकीच कल्पना करून ते थांबले नाहींत. तर त्या देवांनीं आकाश व पृथ्वी या दोहोंसही पसरून उघडिलें, मापिलें, व शेवटीं त्यांनीं उत्पन्नही केलें अशी कल्पना केली आहे. यामुळें त्यांस विश्वचक्षुस् ह्म० सर्वांचा पाहाणारा, विश्वव्यचस्, ह्मणजे सर्व व्यापणारा, विश्ववेदस् ह्म० सर्व जाणणारा, एवढींचा विशेषणें देऊन राहिले नाहींत. तर आणखीं विश्वकर्मन्, ह्म० साऱ्या पदार्थांचा घडणारा किंवा उत्पन्न करणारा, प्रजापति, ह्मणजे मनुष्यमात्राचा धनी, अशींही विशेषणें मिळालीं.

कांहीं काळानंतर हीं दोन्ही विशेषणें खास नव्या देवाचीं आहेत असें मानूं लागले. विश्वकर्मन् ह्मणजे उत्पन्न करणारा व प्रजापति ह्मणजे सर्वांचा धनी, या दोन देवांच्या स्तुतिपर जे कित्येक मंत्र आहेत त्यांवरून या देवांचें मूळ सूर्यांतून निघालें आहे, असें सहज लक्षांत येतें. यांपैकीं कित्येक मंत्रांवरून आपणांस ख्रिस्ती धर्माचें पुस्तक जें बैबल त्यांतलीं जीं गीतें आहेत त्यांच्या भाषेची आठवण होते, व हे मंत्र वाचून कोणासही असें वाटेल कीं, प्रजापति किंवा विश्वकर्मन् अशा एका देवानें आर्यावर्तांतील प्राचीन काळच्या एकेश्वरमतेच्छु आर्यांची मनकामना तृप्त केली असावी व त्यांच्या धर्मविचारांची वृद्धि होतां होतां अखेरीस इतर सर्व देव नाहींसे होऊन तो एकटा शिलक राहिला असावा. परंतु पुढें आपल्या लक्षांत येईल कीं, असा कांहीं प्रकार घडला नाहीं.

## विश्वकर्मा ( पदार्थमात्राचा कर्ता. )

मी आपणांस ऋग्वेदांतील कांहीं वेंचे वाचून दाखवितों. हे वेंचे बऱ्याच मागून रचलेल्या मंत्रांतून निवडून काढलेले आहेत. त्यांत सृष्टि उत्पन्न करणाऱ्या व सृष्टीचें नियमन करणाऱ्या अशा एकाच ईश्वराविषयींची कल्पना अगदीं स्पष्टपणें दर्शविली आहे.

प्रथम विश्वकर्म्यास उद्देशून केलेलीं पद्यें आहेत तीं वाचतों—ऋग्वेद ( १०, ८१. २ ) 'ज्यांस सर्व कांहीं दिसतें अशा त्या विश्वकर्म्यानें ही पृथ्वी उत्पन्न करतेवेळीं आपल्या सामर्थ्यानें हें आकाशही प्रकट केलें, त्या कालीं त्याचें स्थल होतें कोठें? त्यास आधार कोणता होता व कोणत्या ठिकाणीं उभें राहून हें सर्व त्यानें केलें असावें?

'तोच एक ईश्वर आहे. त्याची दृष्टी सर्वत्र आहे. आणि त्याचे मुख्य बाहू व पाद सर्वत्र आहेत. आकाश व पृथ्वी या दोघांची उत्पत्ति करून त्यानें आपल्या हातांनीं व पंखांनीं दोन्ही सांधून टाकिलीं!

'कोणत्या रानांतून कोणतें झाड आणून त्यानें हें आकाश व ही पृथ्वी बनविली?

'हे ज्ञातेजनहो ! या असंख्य भुवनांस आधार देतांना ज्या स्थळीं तो उभा राहिला असेल त्या स्थळाची तुह्मी आपल्या मनांत कल्पना करा.

'सर्व वस्तु उत्पन्न करणाऱ्या वाचस्पतीच्या व आमच्या मनांत प्रेरणा करणारा असा जो विश्वकर्मा, त्यानें युद्धप्रसंगीं आमचें रक्षण करावें ह्मणून आपण त्यास आज बोलावूं.

'जो सर्वांचा सुखदाता आहे व आमचें रक्षण व्हावें ह्मणून चांगलीं कार्यें करीत असतो, तो आमच्या सर्व बलिदानाचा स्वीकार करो. तो आह्मी दिलेल्या हविर्भागाचें ग्रहण करो !'

अशाच प्रकारचा विश्वकर्म्यास उद्देशून रचलेला दुसरा एक मंत्र आहे तो पहा:-( ऋग्वेद १०, ८२. )

'ज्या पित्यानें आह्मांस जन्म दिलें, ज्या नियंत्यास सर्व नियमांचें व सर्व विश्वाचें ज्ञान आहे, ज्या एकट्यानेंच साऱ्या देवांस नावें दिलीं, त्याच्याचकडे सर्व प्राणी ज्यास जें इष्ट असेल तें मागण्याकरितां जातात.

'आकाशाच्याही पलीकडे, पृथ्वीच्याही पलीकडे, देवांच्या व असुरांच्याही पलीकडे, असें बीज कोणतें होतें कीं जें पाण्याच्या पोटांत असून ज्याच्या ठिकाणीं सर्व देव लीन होते?

'जलाच्या मध्यभागीं तें बीज प्रथम उत्पन्न झालें. त्यांत सर्व देव एकत्र मिळाले. ज्या एका वस्तूंत सर्व प्राणी मावले तें वस्तु, जन्ममरणरहित जो अज त्याच्या मांडीवरती राहिलें होतें.

'ज्यानें या वस्तु उत्पन्न केल्या त्याचें ज्ञान तुह्मांस कधीं होणार नाहीं. तुमच्या व त्याच्या आड दुसरें कांहीं तरी उभें आहे. जे धुक्यांत अगदीं गढून गेले आहेत व ज्यांची वाणी क्षणोक्षणीं अडखळते आहे, अशा स्थितींत हे कवि संसारांतच आनंद मानून मार्ग पुढें पुढें आक्रमीत आहेत.'

## प्रजापति, प्रजांचा स्वामी.

ज्या दुसऱ्या देवाविषयीं आपणांस विचार करावयाचा आहे, तो प्रजापति, ह्मणजे सर्व प्रजांचा स्वामी होय. पुष्कळ गोष्टींनीं तो व वि-

श्वकर्मन्, ह्मणजे पदार्थमात्राचा कर्ता, हे एकच असे वाटतात. परंतु विश्वकर्मन् यापेक्षां प्रजापति याची व्यक्तिवाचकता जास्त आहे. त्यांत मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांत जास्त आहे.–असें जरी आहे तथापि वेदांतील कित्येक मंत्रांत प्रजापति व सवितृ यांचें ऐक्य आढळतें. उदाहरण, 'आकाशाचा आधारदाता, विश्वाचा प्रजापति, हा ज्ञाता आपलें तेजस्वी कवच धारण करितो, स्वतां तेजस्वी उत्पन्न होऊन, अति विस्तारातें पाऊन, या सर्वांस व्यापून टाकून, सवितृ उत्तमोत्तम सुख उत्पन्न करितो.'

पुनः संतानदाता असें कल्पून, त्याची आराधना केली आहे व एका ( ऋग्वेद १०–१२१, ) मंत्रांत, तो 'सृष्टिकर्ता,' 'सर्व देवांमध्यें प्रथम,' अशा शब्दांनीं स्तविला आहे, आणि त्यास हिरण्यगर्भ, ह्म० सुवर्णाचें बीज, किंवा ज्याच्या गर्भांत सुवर्ण आहे, अशीही संज्ञा दिली आहे.

'पहिल्यानें हिरण्यगर्भ उत्पन्न झाला; या विश्वाचा तो जन्मापासूनच उत्पन्न झालेला स्वामी होता. त्यानें पृथ्वी व आकाश यांची स्थापना केली. तो देव कोणता आहे? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. १.

'जो श्वास देतो, जो सामर्थ्य देतो, ज्याची आज्ञा सर्व तेजस्वी देव सन्मानपूर्वक मानितात, ज्याची छाया अमृतत्व आहे, ज्याची छाया मृत्यु आहे:– तो देव कोणता आहे? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. २.

'जो आपल्या सामर्थ्याच्या योगानें या श्वासोच्छ्वास करणाऱ्या व निद्रावश विश्वाचा एकटा राजा होऊन राहिला; जो मनुष्यपश्वादि सर्वांचा शास्ता होय. असा देव कोणचा? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. ३.

'ज्याच्या शक्तीनें हे हिमालयासारखे पर्वत व ( असें ह्मणतात कीं ) समुद्र दूरच्या नद्यां ( रसा ) सहवर्तमान राहिले आहेत, त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं ! ४.

'ज्याच्यामुळें आकाश प्रकाशित आहे व पृथ्वी सदृढ आहे; ज्यानें दृढतेनें हें उंचाहून उंच आकाशही सांवरलें आहे; आकाशाच्या वि-

२८०२५

स्ताराचेंही ज्यानें माप केलें; तो देव कोणता आहे? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. ५.

'आकाश व पृथ्वी त्याच्या इच्छेनुरूप उभीं राहून आपल्या ठिकाणीं भयभीत होत्सातीं ज्याचें अवलोकन करितात; ज्याच्यायोगानें उगवणारा सूर्य प्रकाशमान होत्साता वर निघतो—तो देव कोणता आहे? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. ६.

'ज्याकाळीं बीज धारण करणारे व अग्नीस उत्पन्न करणारे जलप्रवाह चोहों दिशांकडे वाहात गेले, त्या काळीं त्यांतून जो उत्पन्न झाला व जो एकटा देवांचा प्राण आहे:—तो देव कोणता आहे? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. ७.

'ज्यानें आपल्या शक्तीनें जलप्रवाहांत शक्ति निर्माण केली, व ज्यानें यज्ञकुंडांतील अग्नि चेतविला, जो सर्व देवांचा अधिदेव आहे:—तो कोणता? त्यास आपण आपलीं बलिदानें अर्पण करूं. ८.

'हे प्रजापते! तुजवांचून दुसरा कोणीही या सर्व उत्पन्न झालेल्या वस्तूंस आवरूं शकणार नाहीं. ज्याकाळीं आह्मीं तुजला यज्ञदान करीत असतों, त्या काळीं जें आह्मीं मागतों, तें आह्मांस मिळो. आह्मांस द्रव्याचे स्वामी होऊं दे. ९.'

असल्या प्रकारचे विचार वेदकाळच्या कवींच्या मनांत उत्पन्न होत असत हें पाहून आपणांस प्रथमदर्शनीं असें वाटतें कीं, त्यांच्या जुन्या धर्माची स्वाभाविक प्रवृत्ति केवळ एकेश्वरमताकडेसच, एका अद्वितीय देवाच्या पूजेकडेसच होत गेली असावी; व आर्यावर्तांत या प्रकारेंकरून इतर सर्व रूपें व नामें व्यर्थ झाल्यानंतर, अनंता (ईश्वरा) स जें उत्तमोत्तम स्वरूप द्यावें असें मनुष्य इच्छित असतो, त्या स्वरूपापर्यंत येऊन उभे ठाकले असावेत. परंतु असें घडलें नाहीं. मी वाचून दाखविलेल्या मंत्रांसारखे मन्त्र ऋग्वेदांत थोडे आहेत, व त्यानंतरच्या काळीं, ह्मणजे ब्राह्मणाच्या काळीं, त्यांपेक्षां अधिक निश्चित किंवा उदात्त कल्पना निघाली नाहीं. प्रजापति ह्मणजे सचेतन प्राण्यांचा स्वामी व देवांचा आणि असुरांचा पिता, यास, मंत्रांपेक्षां ब्राह्मणांत विशेष उन्नत पद देण्यांत आलें आहे,

हें खरें. परंतु ब्राह्मणांतही त्याचें पौराणिक स्वरूप कांहीं प्रसंगीं फार उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतें. उदाहरण, अग्नि, वायु, आदित्य, चंद्र, व उषा, यांचा प्रजापति हा पिता होय असें वर्णिलेलें आहे. सूर्य हा आपली कन्या जी उषा ( पहांट ), तिच्यामागें काममोहित होत्साता लागला आहे, अशी कथा सांगितली आहे. या कथेमुळें प्रजापतिच्या भक्तांस मागाहून फारच अडचण येऊन पडली.

कधीं कधीं ब्राह्मणग्रंथांतील कित्येक प्रकरणें वाचल्यापासून, वाचणाराच्या मनांत असा विचार येतो कीं, एक श्रेष्ठ देव प्राप्त करून घेण्याची जी मनुष्यास उत्कट इच्छा असते, ती अखेरीस प्रजापति, ह्मणजे जो सर्व जिवंत वस्तूंचा स्वामी, त्यापर्यंत पोंचून तृप्त झाली असावी; व या नव्या प्रकाशाच्या तेजापुढें इतर सर्व देव दिपून गेले असावे. एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे:—

'प्रथमारंभीं प्रजापतीच हें सर्व होता. प्रजापति हा भरत किंवा आश्रय देणारा आहे; कारण, तो या सर्वांचा आधार आहे. सर्व सजीव प्राणी प्रजापतीनें उत्पन्न केले. आपल्या वरिष्ठ किंवा उदात्त प्राणवायुपासून त्यानें देव उत्पन्न केले व आपल्या अपान किंवा कनिष्ठ वायूपासून मानव उत्पन्न केले. त्यानंतर त्यानें मृत्यूस उत्पन्न केलें. त्याचा हेतु हाच कीं त्या मृत्यूनें सर्व सजीव प्राण्यांचें भक्षण करावें. या प्रजापतीचा अर्धा भाग नश्वर किंवा मर्त्य होता व अर्धा भाग अमर किंवा अमर्त्य होता. आणि त्याचा अर्धा भाग मर्त्य होता, ह्मणूनच तो मरणाला भीत असे.'

## निरीश्वर मताकडे प्रवृत्ति.

येथें असें स्पष्ट दिसतें कीं, ब्राह्मणग्रंथाच्या कर्त्यांसही प्रजापतीच्या अंगीं कांहीं नश्वरता आढळली. आणि एका ठिकाणीं तर त्यांनीं असेंही ह्मटलें आहे कीं, 'अखेरीस त्या प्रजापतीचे तुकडे तुकडे झाले

---

१ शतपथ ब्राह्मण. २. २, ४, १.
२ ,, ६. ८, १, १४.

व एक मन्यु देवावांचून इतर सर्व देव त्यापासून निघून चालते झाले.' आणि खरोखरच अशी गोष्ट घडून आली. तथापि प्रजापतीच्या भक्तांस वाटत होता त्याहून अगदीं विपरीत परिणाम झाला. आर्यप्रजेची बुद्धि वृद्धिंगत होतां होतां तिच्या ठिकाणीं अधिकाधिक दृढता येत गेली. अनंताचा शोध लावण्याच्या कामांत कांहींवेळपर्यंत पर्वत व नद्या यांचा आश्रय करून व आपल्या संरक्षणार्थ त्यांची प्रार्थना करून व त्यांचा अलौकिक प्रताप व वैभव वर्णन करून त्यांनीं आपली जिज्ञासा बऱ्याच अंशानें तृप्त केली. बऱ्याच अंशानें असें ह्मणण्याचें कारण, पर्वत व नद्या यांच्याही पलीकडे जें कांहीं आहे तें आपणांस कळावें असें त्यांस वाटे. आपले पूर्वज जे आर्य त्यांस त्याकाळीं आकाश, सूर्य व उषा, यांच्या अवलोकनानें त्यांच्याठायीं कांहींएक चिच्छक्ति वसत आहे, व ती आपणांस संपूर्णत्वेंकरून कळत नाहीं, व आपल्या इंद्रियांस गोचर होणारे जे पदार्थ त्यांच्या पलीकडे कांहीं तरी खास आहे, असें वाटे.

याच्याही पलीकडे ते गेले. प्रकाशमान आकाशाच्याठायीं कोणी प्रकाशदाता त्यांस दिसे. सर्वव्यापी जें नभोमंडळ, त्याचेठायीं कोणीएक सर्वांचें आवरण करणारा आहे, असें त्यांस भासे. मेघांचा गडगडाट व वादळाचा सपाटा, यांच्याठायीं कोणी तरी गर्जना करीत आहे, व तेथें प्रचंड आणि भयंकर अशा योध्यांची झटापट चालली आहे, असें त्यांस वाटे. आणि पर्जन्याच्या ठिकाणीं त्यांस इंद्र किंवा वृष्टिदाता दिसे.

असें होतां होतां त्यांच्या मनांत प्रथम संशय उत्पन्न होण्यास आरंभ झाला. जोंपर्यंत प्राचीन आर्यांचे विचार कांहीं तरी स्पृश्य पदार्थास चिकटून होते, तोंपर्यंत त्यांची धर्मविषयक तृष्णा, वस्तुतः जितकें त्यांच्या अवलोकनांत येत होतें त्याच्या पलीकडे फार पुढें गेली असावी यांत संशय नाहीं. तथापि ज्यांस ते आपले देव असें ह्मणत व पूज्य मानीत, त्यांच्या अस्तित्वाविषयीं कधींही कोणी शंका घेण्यास धजत नसे. पर्वत व नद्या नेहमीं त्यांच्या समोरच असत. तेव्हां त्यांचीं स्तोत्रें

---

१ शतपथ ब्राह्मण १०. १, ३, १.

किंवा त्यांचीं वर्णनें जर अतिशयोक्तींनीं परिपूर्ण आहेत असें, वाटलें तर त्या पदार्थांच्या अस्तित्वाविषयींच संशय घेण्यापेक्षां त्यांच्या वर्णनांत कांहीं कमीजास्ती केलें ह्मणजे झालें. हीच गोष्ट आकाश, सूर्य व उषा यांसही लागू आहे. कारण, हे पदार्थही नेहेमीं त्यांच्या समोरच असत. आणि जरी हे सृष्टिचमत्कार केवळ भ्रम, किंवा छाया, अथवा भास आहेत असें जरी ह्मटलें, तरी मनुष्याचें मन असें कांहीं बनलें आहे कीं, कोणतीही छाया दृष्टीस पडली असतां त्यावेळीं ती ज्या पदार्थाची किंवा वस्तूची 'छाया' असेल तो पदार्थ, किंवा ती वस्तु, तें ग्रहण करितें. परंतु अस्पृश्य असून अदृश्य असा जो देवांचा तिसरा प्रकार, त्याचा आपण विचार करूं लागलों ह्मणजे गोष्ट निराळी होते. वृष्टिदाता इंद्र व गडगडणारा रुद्र हे दोन्ही देव मनःकल्पित आहेत. पर्जन्य व गडगडाट हे दोन सृष्टिचमत्कार मात्र दिसत. परंतु सृष्टीमध्यें त्या त्या देवाचें दर्शक किंवा सूचक ह्मणण्यासारखें कांहींएक स्वतंत्र चिन्ह दिसत नव्हतें. पर्जन्य व गर्जना हीं कांहीं दैविक आहेत असें मानीत नसत. तर हे चमत्कार, अदृश्यस्वरूप अशा व्यक्तींचे पराक्रम आहेत असें मानीत असत.

मनुष्यास त्यांची कृति मात्र दिसे; दुसरें कांहीं दिसत नसे. आकाश किंवा सूर्य, किंवा उषा किंवा दुसरे पदार्थ, यांच्याकडे बोट दाखवून त्यांच्यापैकीं अमुक पदार्थ इंद्र आणि रुद्र यांच्या मूळ स्वरूपाचा दर्शक आहे, असें कोणीही ह्मणत नसे. फार प्राचीनकाळीं मनुष्यजाति व तिचा विवक्षित व्यवहार, या भूतलावर होते असें सिद्ध करण्याकरितां मनुष्याच्या मस्तकाची कवटी किंवा घांसून अणीदार केलेला गारगोटीचा तुकडा पुढें करणें, यासारखाच वरील प्रकार होय. इतर देवांपेक्षां इंद्र हा अधिक व्यक्तिवाचक, नाटकप्रसिद्ध व कथाप्रसिद्ध होण्याचें कारण हेंच कीं, सृष्टींत त्याचा प्रतिनिधी पदार्थ किंवा त्याचें अस्तित्व दाखविणारी, ह्मणजे जिच्या योगानें इंद्रभक्तांच्या मनांतील इंद्रविषयक कल्पनेची वाढच खुंटेल, अशी दृश्य वस्तुच नव्हती. वेदांत उपलब्ध होणाऱ्या सर्व देवांच्या संबंधानें जितकीं युद्धें वर्णिलीं आहेत व जितक्या

कथा सांगितल्या आहेत, त्यांमध्यें इंद्राच्या इतकीं युद्धें व कथा दुसऱ्या कोणत्याही देवाच्या सांगितल्या नाहींत. तेव्हां यावरून इंद्रानें द्यौःला, ह्मणजे आर्यावर्तांतिल झ्यूस् ( ज्युपितर ) याला, स्थानभ्रष्ट किंवा पदच्युत केलें, असें जें पूर्वकालीन कवींसही वाटलें, त्याचें कारण काय तें आपल्या ध्यानांत चांगलें येतें. पण अखेरीस इंद्राच्या दुर्दैवानें आपलें वैर साधलें.

कांहीं काळपर्यंत ज्या एकट्या इंद्रानें इतर सर्व देवांस खालीं घालून त्या सर्वांवर आपला पगडा बसविला होता व ज्यास वेदांतील सर्व देवांमध्यें श्रेष्ठ देव असा जरी नाहीं, तरी लोकप्रिय देव, असें ह्मणत, त्याच्या अस्तित्वाविषयींच संशय प्रथमतः उत्पन्न झाला.

## इंद्रावरची श्रद्धा व इंद्राविषयीं संशय.

वैदिक मंत्रांत इतर देवांपेक्षां इंद्रावरच श्रद्धा ठेवण्याची अधिक अवश्यकता दर्शविली आहे. ही गोष्ट आश्चर्य वाटण्यासारखी होय. एका ठिकाणीं ह्मटलें आहे:—‘ ज्या काळीं क्रुद्ध झालेला इंद्र मोठ्या जोरानें वज्र खालीं फेंकतो, त्या काळीं लोक त्याजवर श्रद्धा ठेवितात.’[1]

पुढें आणखी एका ठिकाणीं ह्मटलें आहे:—

‘ इंद्राचा हा महान् व प्रचण्ड पराक्रम पहा ! आणि त्याची शक्ति कबूल करा.[2] ’

‘ हे इंद्रा ! आमच्या जिवलग आप्त बांधवांस दुखवूं नको. कारण, आह्मीं तुझी थोर शक्ति कबूल करितों.[3] ’

‘हे इंद्रा ! आमच्या मनांत श्रद्धा उत्पन्न व्हावी एतदर्थ चंद्र व सूर्य नियत क्रमानें फिरतात.[4]’ असल्या प्रकारचे उद्गार एखाद्या वादग्रस्त

---

१ ऋग्वेद १, ५५, ५. ‘अध चन श्रत् दधति त्विषिमते इंद्राय वज्रम् निघानिघ्नते वधम्’ पहा, ऋग्वेद. १, १०४, ७.

२ „ १.१०३, ७. ‘तदस्य पश्यत इदं भूरि पुष्टम्, श्रत् इंद्रस्य धत्तन वीराय.’

३ „ १, १०४, ६. ‘मा अन्तरम् भुजम् आरिरिषः नः श्रद्धीतम् ते महते इंद्रियाय.’

४ ऋग्वेद १, १०२, २. ‘अस्मे सूर्या चंद्रमसा अभिचक्षे श्रद्धे कमिंद्र चरतः वितर्तुरम्’

धर्मविषयाच्या प्रतिपादनासारखे भासतात. आणि इतक्या प्राचीनकाळीं असले उद्गार मनुष्याच्या हृदयांतून निघावे ही गोष्ट विस्मयकारक खरी. परंतु मनुष्याच्या मनोधर्माच्या इतिहासाचा विचार करितां त्यापासून ही एक गोष्ट शिकण्यासारखी आहे; ती ही कीं, जी वस्तु नवी असते ती जुनी होते व जुनी असते तीच नवी होते.

या जगताचा व मनुष्याच्या विचाराचा एकमेकांशीं किती निकट संबंध आहे या गोष्टीचा क्षणभर विचार करा! श्रद्धा ह्मणून जो शब्द येथें पहिल्यानें योजिला आहे व लॅटिन् भाषेमध्यें 'क्रेडो' (Credo) असा जो शब्द आढळतो, हे दोन्ही एकच होत. हल्लींचा इंग्रजी शब्द 'क्रीड' =(Creed) 'धर्मश्रद्धा' याचें मूळ, लॅटिनमधील (Credo) हेंच होय.

जेव्हां रोमन् लोक 'क्रेडीडी' (Credidi) असें ह्मणत, तेव्हां ब्राह्मण 'श्रद्दधौ' असें ह्मणत. जेव्हां रोमन् लोक 'क्रेडीडम्' (Crededum) असें ह्मणत, तेव्हां ब्राह्मण 'श्रद्धितम्' असें ह्मणत. यावरून श्रद्धा हा शब्द व ज्या अर्थाचा बोधक तो शब्द आहे तो अर्थ, आर्यकुटुंब विभक्त होण्यापूर्वीं, ह्मणजे संस्कृताला संस्कृतत्व येण्यापूर्वीं व लॅटिन् भाषेला लॅटीन्पणा येण्याच्या अगोदर, विद्यमान असले पाहिजेत. तीं पूर्वकाळचीं मनुष्यें देखील इंद्रियांस अगोचर व कल्पनेस अगम्य, अशा कांहीं वस्तूवर भाव ठेवीत. आणि अशी कांहीं तरी वस्तु जगांत आहे, असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता. इतकेंच नव्हे. तर, ही आपल्या मनाची भावना प्रदर्शित करण्यासाठीं त्यांनीं एक नवीन व स्वतंत्र शब्द योजिला होता. त्यांनीं या मनोधर्मास किंवा भावनेस श्रद्धा[1] असें नांव दिलें होतें. लॅटिन् Credo व संस्कृत श्रद्धा या दोन शब्दांच्या निकट संबंधापासून जीं अनेक

---

१ **श्रद्धा.** या शब्दाचा मूळ अर्थ किंवा त्याची सिद्धि मला कळत नाहीं. कोणी कोणी असा तर्क करितात कीं तो 'हर्द' किंवा 'हृत्' असा जो संस्कृतात शब्द आहे त्याजपासून झाला असावा व **श्रद्धा** शब्दाचा मूळ अर्थ 'हृदयांत ठेवणें' असा असावा. पण मला ही शब्दव्युत्पत्ति बरोबर वाटत नाहीं. कारण, **वेदांत** 'श्रत् कृ' अ-

अनुमानें निघतात तीं सांगण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु, हा श्रद्धा व Credo या दोन शब्दांमधील संबंध मनांत येतांच आल्प्स व कॉकेसस या दोन पर्वतांपासून तों अत्यंत दूरचा जो हिमालयपर्वत त्यापर्यंत प्राचीन काळच्या इतिहासाचें जें चित्र आपणांपुढें उभें राहतें त्याचेकडे आपली दृष्टि फेंका. माझी विनंति आपणांस एवढीच आहे.

असो. इतर सर्व देवांहून या इंद्र देवाची प्रतिष्ठा विशेष असून, ज्या काळीं दुसऱ्या देवांवर श्रद्धा ठेवण्यास कांहीं एक प्रमाणाची अपेक्षा नाहीं असें समजत, त्याच काळीं 'इंद्रावर श्रद्धा ठेवा' असें ह्मणण्याचा प्रसंग असे, आणि इंद्राच्या आस्तित्वाविषयीं प्रथम इंद्रभक्तांच्याच मनांत संशय उत्पन्न झाला. एका मंत्रात असें ह्मटलें आहे :—

'जर तुह्मांस द्रव्य पाहिजे असेल तर इंद्राची स्तुति करा. तो आहे असें तुह्मांस खास वाटत असेल तर, त्याची सत्यनिष्ठतेनें स्तुति करा. कोणी कोणी ह्मणतात कीं, इंद्र मुळींच नाहीं. त्याला कोणी पाहिलें आहे? तेव्हां, आपण स्तुति तरी कोणाची करावी ?'

वरील मंत्रांत कवीनें इंद्रच आपणापुढें उभा आहे असें कल्पून इंद्राच्या मुखानें असें वदविलें आहे:–

---

साहीं प्रयोग आढळतो. **ऋग्वेद** ८, ७५, २. हें स्थल पहा. तेथें ह्मटलें आहे. 'श्रत् विश्वा वार्या कृधि'='आमच्या सर्व इच्छा खऱ्या कर.' **बेन्फे** या पंडितानें दिलेली व्युत्पत्ति मला बरी वाटते.; तो ह्मणतो, 'श्रत् हें पद श्रु=ऐकणें या धातूपासून झालें आहे. यावरून श्रद्धा शब्दाचा मूळ अर्थ 'प्रत्यक्ष ऐकल्याप्रमाणें गृहीत करणें.' 'खरें मानणें' असा असावा. ही शब्दसिद्धि खचित बरोबर आहे असें मला अजून निश्चय पूर्वक सांगवत नाहीं.—**भट्ट मोक्षमूलर.**

१. ऋग्वेद ८, १००, ३. 'प्रसुस्तोमम् भरत वाजयन्तः **इंद्राय** सत्यम् यदिसत्यम् अस्ति। न इन्द्रः अस्ति इति नेमः उत्वः आह। कः ईम् ददर्श कम् अभिस्तवाम!'

‘ हे भक्ता ! हा मी आलों. मजकडे पहा. मी इतर सर्व प्राण्यांमध्यें सामर्थ्यानें श्रेष्ठ आहें[1]. ’

परंतु दुसऱ्या एका मन्त्रांत असें म्हटलें आहेः—

‘ त्या भयप्रद देवाविषयीं कोणी कोणी म्हणतात—तो आहे कोठें ! तो नाहींच. खेळांत जशी कोणी पैज मारावी व हार दिलेला पदार्थ घेऊन जावा, त्याप्रमाणें तो ( इंद्र ) आपल्या शत्रूची संपत्ति हरण करितो. हे मनुष्यांनो ! तुम्ही त्यावर विश्वास ठेवा. कारण, तो खचित इंद्र आहे[2]!’

याप्रमाणें त्या वृद्ध ‘ द्यौस् ’ देवास प्रथमतः इंद्रानें मागें हटविलें; पुढें प्रत्यक्ष इंद्राचाही त्याच्या भक्तांनीं तिरस्कार करून त्यास सोडून दिलें. प्रजापति हा छिन्नभिन्न होऊन भूमीवर पडला.

धर्मविषयक विचाराचा प्रवाह प्रथम पर्वत व नद्या यांजपासून उत्पन्न होऊन आकाश व सूर्य यांच्या आराधनेपर्यंत वाढत वाढत गेला व शेवटीं गर्जना, विद्युत् व वृष्टि यांस उत्पन्न करणाऱ्या अदृश्य देवाच्या पूजेचें रूप त्या प्रवाहास प्राप्त झालें. वर सांगितल्याप्रमाणें त्या प्रवाहाचा बहुतेक मार्ग संपला होता. ऐयरलंड बेटांत एड्डा येथील कवींनीं आपल्या देवांचा नाश होईल व जग बुडेल, अशाविषयीं जसें भविष्य केलें होतें,तसाच प्रकार पूर्वीं आर्यावर्तांतही धर्मविषयाच्या संबंधानें झाल्याचें दिसतें.

याप्रमाणें इष्टेश्वर उपासनेचा प्रकार झाला. त्या उपासनेचा परिणाम अनेकेश्वरमतांतही झाला नाहीं, किंवा निवळ एकेश्वरमतांतही झाला नाहीं. तर शेवटीं परिणाम हाच, दिसतो कीं एकंदर देवांच्या अस्ति-

---

१. ऋग्वेद. ८, १००, ४. ‘अयम् अस्मि जरितः पश्य मा इह विश्वा जातानि अभि अस्मि मन्हा.

२. कित्ता. २, १२, ९, ‘यम् स्म पृच्छन्ति कुह सः इतिघोरम् उत ईम् आहुः. न एष अस्ति इति एनम् । सः अर्यः पुष्टीः विजः इव आ मिनाति । श्रद् अस्मै धत्त सजनासः इन्द्रः’

त्याविषयीं संशय उत्पन्न होऊन निरीश्वर किंवा नास्तिक मताविषयींच कांहीं काळपर्यंत आर्यांच्या मनाची प्रवृत्ति झाली असावी.

## नास्तिकवादाचा एक खरा व एक खोटा असे दोन प्रकार.

आणि शेवटीं खरोखर झालें असेंच. कांहीं काळपर्यंत बौद्ध धर्माची प्रवृत्ति जरी बऱ्याच अंशानें नास्तिक मताकडे होती, तथापि निरीश्वर किंवा नास्तिक वाद हें आर्य धर्माचें पर्यवसान होय, असें ह्मणतां येत नाहीं. निरीश्वर हा शब्दच आर्यावर्तांतील धर्मास लावूं लागलों तर, मला वाटतें, तो शोभणार नाहीं. प्राचीन आर्यांमध्यें होमरासारख्या कवींचा " दिओई " शब्द नव्हता व तसाच इलियाटिक् तत्वज्ञांचाही "दियोस" हा शब्द नव्हता. त्यांच्या निरीश्वर मताला योग्य संज्ञा द्यावयाची ह्मटलें तर, त्यास आपण अ–देव मत, ह्मणजे जुन्या देवांचा परित्याग, असें ह्मणावें. तथापि, एकाकाळीं ज्या गोष्टी आपणांस मान्य होत्या, ज्यांवर आपली श्रद्धा होती, आपला भरंवसा होता, त्यांजवरचा भरंवसा जाणें, व त्यांविषयीं आपले मनांत संशय उत्पन्न होणें हेंच खरें पाहिलें तर धर्माच्या उत्कर्षाचें मूळ कारण होय. प्राचीन आर्यांस पहिल्यापासूनच वाटत होतें कीं, (सृष्टींत) कोणी तरी परात्पर आहे, व हल्लीं जो प्रकार आपल्यांत आढळतो, त्याप्रमाणें त्यांनींही एकामागून दुसरें अशीं नांवें देऊन त्या परात्पर स्वरूपाचें ग्रहण करण्याचा व त्याचें ज्ञान करून घेण्याचा यत्न केला. त्यांस वाटलें कीं, डोंगर, नद्या, उषा (पहाट) सूर्य, आकाश, द्यौः (स्वर्ग), द्यौष्पिता, यांच्याठायीं तो आहे. परंतु एकेक नांव दिल्यानंतर पुनः त्यांस वाटे, 'छे ! तो हा नव्हे. आपण ज्यास धुंडीत होतों, तो पर्वतांसारखा, नद्यांसारखा, पहांटेसारखा, आकाशासारखा, पित्यासारखा आहे खरा; परंतु तो कांहीं पर्वत नाहीं, आकाश नाहीं, पहांट नाहीं, तसाच पिताही नाहीं. या सर्वांमध्यें तो अंशत्वें तर आहेच. तथापि त्या सर्वांहून तो अधिक आहे. त्यांत भरून उरला आहे. त्यांच्या पलीकडे आहे.' असुर किंवा देव, अशा साधारण नांवांनीं पुढें पुढें त्यांच्या मनाची तृप्ति होत नाहींशी झाली. तीं नांवें त्यांस

पसंत पडेनात व गोड वाटेनात. ते ह्मणत कीं, ' देव व असुर असले तर असोत बापडे, आह्मांला तर त्यांहून कांहीं अधिक पाहिजे आहे. आह्मांला या शब्दांपेक्षां अधिक श्रेष्ठ, अधिक उदात्त असा शब्द पाहिजे आहे. याहून एखादी अधिक उदात्त कल्पना पाहिजे आहे.' त्यांनीं प्रकाशमान देवांचा त्याग केला, यावरून देवांवरची त्यांची आस्था कमी झाली, किंवा त्यांची इच्छा, त्यांची श्रद्धा, कमी झाली असें नव्हे; तर त्या तेजस्वी देवांपेक्षांही कोणी तरी मोठा देव असावा, अशी त्यांस इच्छा होऊन, त्याविषयीं त्यांची आस्था, त्यांचा भाव, व त्यांची श्रद्धा वाढली.

त्यांच्या मनांत एक नवीच कल्पना किती दिवस भरून राहिली होती. निराश होऊन ते जो करुणस्वर काढीत, त्याचा परिणाम काय झाला कीं, त्यांच्या श्रद्धेचें पुनरुज्जीवन होऊन त्यांची धर्मवासना अधिक दृढ होत गेली. जगांत निरंतर असेंच होत आलें आहे व पुढेंही असेंच होणार. नास्तिकपणा तरी दोन प्रकारचा आहे. एकाप्रकारचें निरीश्वर मत असें आहे कीं, त्यापासून श्रद्धेचा समूळ नाशच होतो व मृतावस्था प्राप्त होते. पण दुसऱ्या एका प्रकारच्या निरीश्वर मतापासून तर, सत्याची व श्रद्धेची वृद्धि होत जाते. आणि हें मत साऱ्या धर्मांचें जीवन होय. दुसऱ्या प्रकारच्या निरीश्वर मताचा प्रभाव असा आहे कीं, आपलें अंतःकरण फारच निर्मल, शुद्ध व प्रामाणिक असेल, अशा मंगल प्रसंगीं, अमुक गोष्ट खोटी आहे व अविश्वनीय आहे, असें समजल्याबरोबर, ती टाकून देण्याचें सामर्थ्य अंगीं येतें. एखादेवेळीं अशी नास्तिक बुद्धि उत्पन्न होणें अत्यंत हितकारक असतें. ह्मणजे जें जें ह्मणून अपूर्ण आहे, असत्य आहे, तें आपल्या मनाला कितीही प्रिय व पवित्र वाटत असलें, तरी त्याचा परित्याग करून, त्याजबद्दल जें पूर्ण व जें सत्य, त्याचा लोक कितीही द्वेष करीत असले, तरी त्याचा स्वीकार करण्याविषयीं तयार होणें व मनुष्यानें अंगीं धैर्य राखणें अवश्य असतें. खरा यज्ञ हाच, खरा परमार्थ हाच, खरी सत्यनिष्ठता हीच होय. यांतच खरी धर्मपरायणता व खरी श्रद्धा आहे असें निःशंक जाणावें. याप्रकारची ही नास्तिकता जगांत नस-

ती, तर धर्म ह्मणजे निवळ ढोंग, निवळ दंभ, असा प्रकार झाला असता. असलें हें निरीश्वर मत मधून मधून प्रबळ न होतें तर, कोणताही नवा धर्म, कोणतीही नवी सुधारणा, किंवा कोणताही नवा मार्ग, जगांत उत्पन्न झाला नसता. हें निरीश्वर मत नसतें, तर आपणांतून कोणा एकाचाही धर्मसंबंधानें पुनर्जन्म झाला नसता. तेव्हां मग कुमार्ग सुटून सन्मार्गास लागण्याची आशा कोणालाच नसती.

धर्माच्या एकंदर इतिहासाकडे पहा. सर्व देशांतून सर्व काळीं किती माणसांचा लोकांनीं नास्तिक ह्मणून छळ केला आहे! आणि त्याचें कारण काय ह्मणाल तर, जें दृश्य व सान्त त्याच्या पलीकडे कांहीं नाहीं असें ते समजत, ह्मणून नव्हे; किंवा ही जड, दृश्य सृष्टि कारणरहित, अहेतुक व ईश्वरावांचून आहे, असें ते ह्मणत ह्मणून नव्हे तर त्या कालच्या लोकांचीं परंपरागत चालत आलेलीं जीं मतें, किंवा ईश्वरविषयक त्यांच्या ज्या ठरीव कल्पना, तीं मतें किंवा त्या कल्पना, या नास्तिक मानलेल्या लोकांस पसंत न पडून, आपल्या बाल्यावस्थेंतील विचार टाकून देऊन, त्यांच्यापेक्षां अधिक योग्यतेचे विचार व अधिक उदात्त कल्पना मोठ्या उत्कंठेनें त्यांनीं स्वीकारल्या. ह्मणूनच त्या बिचाऱ्यांस नास्तिकपणाचा डाग लावून घ्यावा लागला.

ब्राम्हणांच्या समजुतीप्रमाणें, बुद्ध नास्तिक किंवा निरीश्वरमतवादी होता. आतां, बौद्धमताचे कांहीं पंथ किंवा शाखा निवळ निरीश्वर मताचें प्रतिपादन करीत, ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि गौतम शाक्यमुनी, ह्मणजे बुद्ध, स्वतां निरीश्वरमतवादी होता, ही गोष्ट अद्यापि वादग्रस्त आहे. आणि तत्कालीन लोकांच्या आवडत्या देवांचा त्यानें अनादर केला, तुमचे देव हे आह्मांस मान्य नाहींत असें ह्मटलें, एवढ्यावरून बुद्ध खचित नास्तिक ठरत नाहीं.

आथिनियन् न्यायाधिशांच्या दृष्टीनें सॉक्रेटीस निरीश्वरमतवादी किंवा नास्तिक होता; तथापि त्याला ग्रीक लोकांचे देव अमान्य होते असें नाहीं, तर केवळ हिफे टॉस् व ऐॅफ्रोडाईटी इत्यादि देवांवर भरंवसा ठेवण्यापेक्षां खरा देव जो परमात्मा सर्वांत श्रेष्ठ, त्याजवर विश्वास

ठेवणें विशेष सयुक्तिक आहे, असें तो ह्मणे. आणि एवढ्याचकरितां, लोकांनीं त्यास नास्तिक ठरविलें.

जो कोणी आपल्या स्वतांविषयीं असें ह्मणेल कीं, मी ईश्वराचा पुत्र आहें, तो मनुष्य यहुदी लोकांच्या समजुतीप्रमाणें धर्मनिंदक होय; जो कोणी वाडवडिलांनीं मानलेल्या देवांची पूजा 'त्या नूतन मार्गानें' करी, त्यास ते पाखंडी असें मानीत. ग्रीक व रोमन् लोक, ख्रिस्ती लोकांसच नास्तिक ह्मणत.

आणि खुद्द ख्रिस्ती लोकांतही, असलें भाषावैगुण्य किंवा शब्द-वैगुण्य मुळींच नाहीं असें नाहीं. ऍथेनेश्यस्च्या समजुतीप्रमाणें जितके एर्यन् मतवादी असतील, तितके सारे 'दैत्य, ख्रिस्तधर्मद्वेषी, भ्रमिष्ट, वेडे, यहुदी, अनेकेश्वरमती होत;' व ऍथेनेश्यस् मतवाद्यांविषयीं एर्यस्चें जें कांहीं ह्मणणें आहे, तें पाहूनही आश्चर्य मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. असें जरी होतें, तथापि ऍथेनेश्यस् व एर्यस् हे दोघेही ईश्वरविषयक उदात्त कल्पना प्राप्त करून घेण्यासाठीं, आपापल्या समजुतीप्रमाणें भिन्न भिन्न मार्गांनीं यत्न करीत होते. एर्यस् याला अशी भीति होती कीं, जे ख्रिस्ती नाहींत, त्या लोकांच्या चुकीमुळें, व ऍथेनेश्यस् याला अशी भीति होती कीं, यहुदी लोकांच्या चुकांमुळें, आपल्या मताची सत्यता व आपल्या मताचा प्रभाव, हे गुण कांहीं तरी कमी होतील.

इतकेंच नव्हे, तर याहूनही अर्वाचीनकाळीं धर्मसंबंधाच्या किंवा ईश्वरज्ञानविषयक वादांत, असेच अविचाराचे प्रकार आढळतात.

सोळाव्याशतकांत सर्व्हेटस् यानें क्यालविन् याजवर 'त्रिमूर्ती मताचा,' 'नास्तिक,' 'अनेकेश्वरवादी' असा आरोप आणिला व क्यालव्हिन् यानें, सर्व्हेटस् हा आपल्याहून भिन्न मताचा आहे, एवढ्याच कारणाकरितां तो देहांतशिक्षेस पात्र आहे, असा अभिप्राय दिला. [इ० स० १५५३.]

या नंतरच्या शतकांत दुसरें एक मोठें प्रकरण माजलें होतें. त्याज बद्दल आलीकडे फार बारीक चौकशी झाल्यावरून तें येथें सांगतों. इ. स. १६१९ सालीं प्रसिद्ध व्हॅनीनी याची जीभ उपटून टाकावी

व त्यास जिवंत जाळून टाकावें, याप्रमाणें त्यास शिक्षा देण्यांत आली. ही अशी कडक शिक्षा देण्याचें कारण खुद्द त्याची चौकशी करणारा न्यायाधीश सांगतो तें असें. तो ह्मणतो : 'पुष्कळ लोक व्हॅनीनी यास नुसता पाखंडमताचा असें ह्मणतात. पण मी त्याला निरीश्वरवादी ह्मणून अपराधी ठरवितों.'

आलीकडच्या कांहीं ग्रंथकारांनीं, व्हॅनीनी याला दोषी ठरविणार जो ग्रॅन्टि, त्याचें वर्तन यथान्याय होतें असा अभिप्राय प्रदर्शित केला आहे. यावरून त्या नास्तिकवाद्याचें ईश्वराविषयीं काय ह्मणणें असे, तें ऐकून घेणें इष्ट दिसतें.

व्हॅनीनी लिहितो कीं, 'तुह्मीं मला विचारतां, ईश्वर हें काय आहे ? जर ही गोष्ट मला माहीत असती तर मीच ईश्वर असतों कारण, एक स्वतां ईश्वरावांचून, दुसरा कोणी ईश्वरास जाणत नाहीं. जसा ढगांतून आपण सूर्य ओळखून काढतों, त्याप्रमाणें ईश्वरही थोडाबहुत त्याच्या कार्यावरून ओळखतां येतो. तरी देखील असें केल्यानें ह्मणजे ईश्वराविषयीं आपली अधिक स्पष्ट रीतीनें समजूत पडणार आहे, असें होणेंच नाहीं. तथापि आपण असें ह्मणूं कीं, ईश्वर सर्वांहून श्रेष्ठ आहे; तो आद्यप्राण सर्वांच्या आधीं उत्पन्न झाला आहे; अखंड, न्यायी, दयाळू, सुखी, व शांत आहे; आणि स्रष्टा, संरक्षक, नियामक, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् आहे; तो पिता, राजा, स्वामी, कर्मफलदाता, व शास्ता आहे; तो आदि, अंत, मध्य, चिरंतन आहे; तो कर्ता, आयुर्दाता, द्रष्टा, कुशल, कारागिर, सर्वांचा शुभचिंतक, व उपकारी, आहे. तो एकच सर्व सृष्टीचें सार होय–'

येणेंप्रमाणें लिहिणाऱ्याला लोकांनीं निरीश्वरमतवादी ठरवून, जिवंत जाळून टाकिला ! तात्पर्य, सत्राव्या शतकांत, 'नास्तिक' या शब्दाच्या खऱ्या अर्थाविषयीं लोकांच्या मनांत इतका घोटाळा होऊन राहिला होता कीं, १६९६ सालीं एडिंबरो येथें जमलेल्या पार्लमेन्ट सभेनें 'ईश्वरवादी लोकांच्या निरीश्वरमतप्रतिपादक विचारांविरुद्ध' एक कायदा पास केला व स्पिनोझा आणि आर्चबिशप् टिलॉट्सन् या

सारख्या मनुष्यांस, तेव्हां जिवंत जाळून टाकतां तर येईनाच, तथापि 'निरीश्वरमदवादी' असा सरसकट छाप त्याच्या नांवावर ठोकून त्या बिचाऱ्यांची विनाकारण अब्रू घेतली.

अठरावें शतकही, असल्या घोर पातकापासून मुक्त राहिलें नाहीं. त्यावेळींहीं पुष्कळ लोकांस निरीश्वरमतवादी असें ह्मणत असत. ज्यांनीं स्वप्नांतही ईश्वराच्या सत्तेचा अनादर करण्याचें चिंतिलें नाहीं, अशा लोकांच्याही कपाळीं नास्तिकपणाचा टिक्का लागे. ईश्वराविषयीं विचार करितांना मनुष्याकडून ज्या अतिशयोक्त्या व चुका होतात, त्या आपल्या हातून होऊं नयेत अशी त्यांची इच्छा असे. तथापि एवढ्याच करितां 'निरीश्वरवादी' असा शिक्का त्यांच्या कपाळावर बसला. हल्लींच्या काळीं आपणांस नास्तिक शब्दाचा अर्थ इतका चांगला समजूं लागला आहे कीं त्याचा इतका संकुचित अर्थ पूर्वीच्या लोकांप्रमाणें आपण करणार नाहींत. ज्या[illegible] सत्याचा अभिमान आहे तो मनुष्य गृहस्थ असो किंवा भिक्षुक ( पाद्री ) असो—जो आपल्या स्वतांशीं व इतर लोकांशीं प्रामाणिकपणानें वागण्याची उमेद बाळगील त्यानें, आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या ज्या लोकांस 'ईश्वरनिंदक' 'पाखंडी' व 'निरीश्वरवादी' अशा वृथा आक्षेपांचा आरोप करून घ्यावा लागला, ते कोणत्या प्रकारचे मनुष्य होते, या गोष्टीची निरंतर आठवण ठेवावी हें बरें. आपल्या आयुष्यांत असा एखादा तरी प्रसंग येतोच कीं, त्या प्रसंगीं आपण ईश्वराविषयीं जों जों अधिक विचार करितों तों तों ईश्वर आपणांस दूर दूर होत आहे असें वाटतें. अशा वेळीं आपणा स्वतांसच असा प्रश्न विचारण्याची छाती होत नाहीं कीं, 'अरे! तर मग ईश्वराच्या अस्तित्वावर माझा भरंवसा आहे, किंवा नाहीं?'

अशा मनुष्यांनीं निराश होऊं नये. आणि आपणही अशा माणसांविषयीं मनांत दुष्टबुद्धि धरूं नये व कठोर भाषण करूं नये. न जाणों, त्यांची ती निराशा किंवा त्यांचें तें औदासिन्य, आपण मानलेल्या आपल्या धर्मपरायणतेपेक्षां किंवा श्रद्धेपेक्षां अधिक महत्वाचें असेल!

हा विषय समाप्त करण्यापूर्वी एका महान् धर्मोपदेशकाचे विचार मी आपणांस कळवितों. हा उपदेशक परलोकवासी होऊन फार दिवस झाले नाहींत. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल व भाविकपणाबद्दल कधींही कोणास संशय आला नाहीं.

तो ह्मणतो:– ' ईश्वर हा शब्द फार मोठा आहे. ज्याला या शब्दाचा अर्थ कळतो व त्याचा अनुभव ज्याला आहे तो मनुष्य, 'ईश्वरावर आमचा भाव आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं' असें जे कोणी प्रांजलबुद्धीनें कबूल करितात, त्यांजविषयीं कठोर वाणी किंवा अपशब्द कधींही उच्चारणार नाहीं. तर तो मोठ्या स्थिरतेनें, समदृष्टीनें व यथान्याय विचार करील. आतां एवढें मी पक्कें समजतों कीं, हे जे मी आपले विचार उघडपणें बोलून दाखविले, त्यांजबद्दल कित्येक लोकांची खास गैरसमजूत होईल व कदाचित् कित्येक तर त्याचा मुद्दाम भलताच अर्थ करितील. मी निरीश्वरमताचें मंडन केलें व त्याची वाहवा केली; आणि, मनुष्याच्या धर्मसंबंधी विचाराची उत्तरोत्तर परिपक्वता होतां होतां शेवटीं ज्या अतिउच्चस्थलाप्रत तो पोहोंचतो तें हेंच, ह्मणजे नास्तिकमत होय, असें मी प्रतिपादन केलें; इत्यादि अनेक आक्षेपांचा वर्षाव मजवर होईल. हें मी पक्कें जाणतों. आणि असें झालें तरी चिंता नाहीं.

ज्यास मी प्रामाणिकपणाचा नास्तिकवाद असें ह्मणतों, तो ज्यांस समजतो व अशा नास्तिक वादांत आणि हलकट किंवा असमंजस अशा नास्तिकवादांत–फार काय, अप्रामाणिक अशा आस्तिकवादांतही जो भेद आहे तो ज्यांस कळतो, असे लोक थोडे का असेनत, पण असे जर थोडे बहुत तरी, या समाजांत हजर असतील तर एवढें मला पुरें आहे. कारण, हा भेद समजणारांस त्यापासून मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं फार उपयोग होतो. त्यापासून एक गोष्ट मोठ्या महत्वाची आपणांस शिकण्यासारखी आहे. ती ही कीं, रमणीय व सुखदायक अशा वसंतऋतूचीं पानें वाळून जेव्हां भूमीवर गळून पडतात, तेव्हां सारें वन भयाण व सौंदर्यहीन होऊन जातें. आणि थंडीचा कडाका

पडल्यामुळें वृक्ष पर्णहीन होऊन जिकडे तिकडे उजाड होतें! अशा प्रसंगीं खिन्न झालेल्या प्रेक्षकानें एक गोष्ट ध्यानांत आणून निराश होऊं नये. ती ही कीं, पुनरपि लवकरच वसंतऋतूचें आगमन होऊन वनश्री विलसित होणार आहे! त्याचप्रमाणें मनुष्याच्या हृदयाची गोष्ट आहे. ज्याच्या हृदयांत सत्यनिष्ठता वास करीत आहे, त्याच्या हृदयांत जर खरोखर संशय उत्पन्न झाला तर तोच संशय अत्यंत भाविकपणाचा, अत्यन्त श्रद्धेचा जिवंत झराच होय! दुसरी ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्याचें हरवेल त्यासच सांपडेल. जो योग्य कामीं खर्च करील तोच पुढें अधिक मिळवील. असो.

अशा या नास्तिक बुद्धीनें आर्यांचीं मनें पूर्ण ग्रासिल्यानंतर–ह्मणजे, धर्मविषयक जे एकंदर प्रश्न त्या सर्वांत हा जो अखेरचा व अत्यंत महत्वाचा तो प्राप्त झाल्यानंतर त्याचें उत्तर त्यांनीं कसें दिलें–त्या दीर्घ संशयाचें त्यांनीं समाधान कसें केलें–हा सर्वांत बिकट प्रसंग त्यांनीं कसा टाळला–सारांश, या नास्तिकवादरूपी राहूच्या ग्रहणांतून ते कसे मुक्त झाले–हें मी आपल्या पुढच्या व शेवटच्या व्याख्यानांत निरूपण करितों.

# व्याख्यान सातवें.

## तत्वविज्ञान आणि धर्म.

### देवांचा अधःपात.

आर्यावर्तांत येऊन वसलेल्या आर्यांची जेव्हां खात्री झाली कीं, आमचे सर्व देव केवळ नाममात्र आहेत, तेव्हां युगाचीं युगें ज्यांची आराधना ते करीत आले होते व ज्यांस पूजीत होते, त्या देवांकडून आपला आशाभंग होतो, असें पाहून कंटाळून त्यांनीं त्यांस सोडून दिलें असावें, अशी आपण कल्पना करावी. या कामांत त्या लोकांस कोणी तरी फसविलें असावें, अथवा ते आपण होऊनच आपल्या हातीं फसले असावेत, ही गोष्ट क्षणभर एकीकडे ठेऊं. पण इतकें तरी खरें आहे कीं, त्याकाळीं त्यांचे पुरातन देव, ह्मणजे इंद्र, अग्नि, वरुण, इत्यादि हे वास्तविक नसून, केवळ नाममात्र आहेत असें शोधाअंतीं ज्याकाळीं त्यांस समजलें, तेव्हां अशा शोधापासून त्यांच्या मनाचा विलक्षण ग्रह झाला असावा. ग्रीक लोकांनीं आपल्या पवित्र मंदिरांचा, व जर्मन् लोकांनीं आपल्या पवित्र ओक नामक झाडांचा, शत्रूकडून धडधडीत नाश होत आहे असें पाहून, जेव्हां या अघोर कर्माचा सूड उगविण्यासाठीं ऑपॉलो किंवा ओदीन् यांतून एकजणही पुढें येत नाहीं असें पाहिलें, त्यावेळेस त्यांच्या मनाची जी स्थिति झाली असेल, तीच स्थिति आर्यांच्याही मनाची झाली असावी, यांत शंका नाहीं. परंतु यापासून जें निष्पन्न झालें, तें तर आपला अदमास होता त्याहून अगदीं भलतेंच झालें. ग्रीक, रोमन, व जर्मन् लोकांविषयीं तर आपणांस माहीत आहे कीं, त्यांच्या पुरातन देवांनीं आपली सद्दी भोगून घेतल्यानंतर, त्यांपैकीं बहुतेक नाहींसे झाले. आणि कांहींकांचें जीवन जरी सर्वथा संपुष्टांत आलें नव्हतें, तरी त्यांस दुष्ट व दुःख देणाऱ्या पिशाचांची योग्यता

येऊन, ते देव जेव्हां स्थानभ्रष्ट झाले, तेव्हां त्याच वेळीं एक नवा धर्म, ह्मणजे ख्रिस्ती धर्म, हात जोडून तयारच होता! कधींही व कशानेंही न भागणारी जी मनुष्याची धर्मतृष्णा, ती भागविण्याच्या कामीं त्याकाळीं हा ख्रिस्ती धर्म समर्थ झाला!— काय चमत्कार!

आर्यावर्तांत यापेक्षां अगदीं निराळाच प्रकार घडला. आपले रक्षणकर्ते जुने देव टाकून दिल्यानंतर ब्राह्मणांस सर्वथा ग्राह्य असा बाहेरून आणण्याजोगा कोणताही धर्म नव्हता. यामुळें ग्रीक व रोमन् लोकांप्रमाणें झट्कन् दुसरीकडे वळून पुन: नवी विटी नवें राज्य करण्याच्या खटपटींत न पडतां, ते आर्यलोक आपल्यास पुढें दिसेल तोच मार्ग रेंटित चालले. आणि त्यांनीं आपल्या मनांत असा पक्का निश्चय करून ठेविला होता कीं, आमचीं इंद्रियें जागृत झाल्यापासून आमच्या मनांत जें सदोदित विद्यमान होतें, त्याचें खरें स्वरूप जरी आह्मांस कळलें नाहीं, किंवा त्याची पूर्ण कल्पना आह्मांस झाली नाहीं, किंवा त्याचा यथार्थ नामनिर्देश आह्मांस करितां आला नाहीं, असें जरी आहे, तथापि त्याचा शोध लावण्याचें काम आह्मीं न थकतां जर अप्रतिहत चालविलें तर शेवटीं खरा मार्ग सांपडून इष्ट प्रदेशास जाऊन पोहोंचूंच पोहोंचूं.

त्यांनीं तीं जुनीं नांवें सोडून दिलीं खरीं. परंतु ज्याचा नामनिर्देश करण्याचा त्यांनीं यत्न केला होता, त्याच्यावरील त्यांचा विश्वास नाहींसा झाला नव्हता. आपल्या जुन्या देवांचीं मानसिक मंदिरें, किंवा यज्ञवेदी मोडून टाकून नंतर त्या अज्ञात, अनाम, परंतु सर्वव्यापक ईश्वराप्रीत्यर्थ, त्यांनीं त्याच मोडलेल्या मंदिरांच्या किंवा यज्ञवेदींच्या जागोजाग अस्ताव्यस्त पडलेल्या विटा गोळा करून त्यांची एक नवीच यज्ञवेदी बांधिली. हा त्यांचा नवा देव पर्वतांत व नद्यांत, आकाशांत व सूर्यांत, पर्जन्यांत व गर्जनेंत, प्रकट होत असे. इतकेंच नव्हे, तर तो त्या ठिकाणीं विद्यमान असून जवळ, दूर, आजुबाजूस, त्यांच्या सभोंवतीं चारी बाजूंस व्यापून असे. तो कांहीं वरुणाप्रमाणें सर्वांस आंवरून धरणारा व सर्वव्यापी वायुरूपी पदार्थ नव्हता. तर फारच निकट संबंधाचा व फारच अंतर्भागीं विद्यमान असा होता. ह्मणजे, त्यांच्या

ह्मणण्याप्रमाणें, तो आपल्या अंतःकरणांतील वायुरूपी प्रवाह, किंवा अंतरात्मा, अथवा अंतर्साक्षी होय.'

## देवांच्या नामकरणाचा हेतु.

पण अगोदर आपणांस ही गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे कीं, प्राचीन वैदिक कवि कांहीं असें ह्मणाले नाहींत कीं, मित्र, वरुण व अग्नि, हे देव वस्तुतः नसून केवळ अर्थरहित नांवें मात्र आहेत. ते ह्मणतः 'मित्र[1], वरुण, अग्नि, अशीं अनेक नांवें विद्वानांनीं दिलीं आहेत. त्याला आकाशवासी पक्षी गरुत्मान् असेंही ह्मणतात. तो एकच आहे, पण त्यास कवि अनेक नांवांनीं हाका मारितात. यम, अग्नि, मातरिश्वन्, अशा बहुत संज्ञा ते त्यास देतात.'

आतां या वर दिलेल्या पद्यावरून तीन गोष्टींचा निर्णय होतो. पहिला हा कीं, या जगांत कांहीं तरी एक नित्य वस्तु (सत्) आहे व त्याचीं अग्नि, इंद्र, वरुण इत्यादि आणखीं दुसरीं अनेक नांवें आहेत. एतद्विषयीं कवींस संशयच नव्हता.

दुसरी. त्यांच्या समजुतीप्रमाणें हें सत् किंवा हें खरें वस्तु, एक अद्वितीय आहे.

तिसरी. जसे प्रजापति व दुसरे देव पुरुषवाचक किंवा पुल्लिंगी मानिलेले होते, तसे हें एक नसून, हें एक नपुंसकलिंगी आहे.

## पुल्लिंगी व स्त्रीलिंगी नामांहून नपुंसक नामाची अधिक श्रेष्ठता.

आतां ही गोष्ट मात्र खचित आह्मां लोकांस कर्णकठोर अशी वाटेल. ईश्वरास नपुंसक नांवानें हाक मारणें आपणांकडून तर बोवा घडणार नाहीं, असें आपण ह्मणाल! आह्मां लोकांच्या समजुतीप्रमाणें तर नपुं-

---

१ ऋग्वेद, १, १६४, ४६.

'इन्द्रं मित्रं वरुणम् अग्निम् आहुः, अथो दिव्यः सः सुपर्णः गरुत्मान्;
एकं सद्विप्राः बहुधा वदन्ति, अग्निम् यमम् मातरिश्वानम् आहुः.'

सकलिंगापासून स्थूळ, निर्जीव व क्रियाहीन अशा एकाद्या वस्तूचा बोध होतो. पण प्राचीन भाषेंत, ह्मणजे प्राचीन विचारांप्रमाणें, असें नव्हतें. आज देखील आपल्या कित्येक अर्वाचीन भाषेंत असें नाहीं. नपुंसकनाम पसंत करण्यांत प्राचीन कवींचा किंवा ज्ञात्यांचा एवढाच हेतु असे कीं, तें परात्पर वस्तु पुरुषवाचक नसावें, स्त्रीवाचक नसावें, व मनुष्याची भाषा जरी अपूर्ण आहे तरी तें जितकें होईल तितकें दुर्बळ अशा मानव कोटीहून श्रेष्ठ असावें;—असें कांहीं कीं, जें पुल्लिंगापेक्षां व स्त्रीलिंगापेक्षां श्रेष्ठ असावें. तात्पर्य, त्यांस एक, लिंगरहित (पण जीवहीन, निर्विकार, कृतिहीन असा नव्हे ) असा देव पाहिजे होता.

दुसरीं वाक्यें अशीं आहेत कीं, ज्यांमधून कवि जरी एकाच देवाचा अनेक नांवांनीं उल्लेख करितात, तरी ते त्या देवाविषयीं बोलत असतां पुरुषवाचक नांवांचीच योजना करितात. उदाहरणार्थ, सूर्यास उद्देशून केलेली एक ऋचा घ्या. यांत सूर्यास एका पक्षाची उपमा दिली आहे. त्यांत असें ह्मटलें आहे कीं:— 'विद्वान् कवि आपल्या वचनांनीं, जो पक्षी एकच आहे, त्यास अनेक नांवांनीं हाक मारितात![1]' आपल्या समजुतीप्रमाणें ही केवळ कादंबरी किंवा पुराणकालची दंतकथा होय. या खालील कवितेंत परमात्म्यावर मनुष्यधर्माचा अध्यास किंवा आरोप करून त्याचें वर्णन केलें आहे.

" ज्याला अस्थि नाहींत अशानें, ज्याला अस्थि आहेत अशाला जेव्हां जन्मास घातलें, तेव्हां जो प्रथम जन्मला त्यास कोणी पाहिलें? सृष्टीचे श्वास, रक्त, व आत्मा इत्यादि होते कुठे? हें सर्व ज्यास माहीत होतें, त्याजवळ विचारावयास गेलें तरी कोणें?[2]

या ऋचेंतील प्रत्येक शब्द अर्थपरिपूर्ण आहे. 'ज्यास अस्थि

---

१ ऋग्वेद १०, ११४, ५. 'सुपर्णं विप्राः कवयो वचोभिः एकं सन्तम् बहुधा कल्पयंति.'

२ ऋग्वेद १. १६४. ४. 'कः ददर्श प्रथमं जायमानम्, अस्थन्वंतम् यत् अनस्था बिभर्ति । भूम्या असुः असृक् आत्मा क्वस्वित् कः विद्वांसम् उपजान् प्रष्टुं एतत्' ॥

नाहींत ' या पदाचा अर्थ हाच कीं, ' ज्यास कोणताही आकार नाहीं, ह्मणजे जो निराकार आहे; ' ज्यास अस्थि आहेत ' याचा अर्थ असा कीं ' ज्याला आकार आहे, ज्यानें नाशिवंत देह धारण केला आहे तो. ' आतां 'सृष्टीचें रक्त व श्वास,' ह्मणजे अज्ञात किंवा अदृश्य अशा ज्या कांहीं शक्तीच्या योगानें ही सृष्टी चालली आहे, ती शक्ति. खरें ह्मटलें तर ' श्वास ' शब्दाच्या ठिकाणीं हल्लीं आपण ' जगदात्मा ' किंवा ' मुख्य वस्तु, ' ' मुख्य तत्व ' अशा कांहीं शब्दांची योजना करूं.

## आत्मन् ( विषयी ).

या आत्मन् शब्दाचा मूळ अर्थ पहाल तर ' श्वास ' असा आहे. या शब्दाचें इंग्रजींत बहुधा Self असें भाषांतर करितात. या शब्दाची योग्यता फारच मोठी आहे, असें पुढें आपल्या लक्षांत येईल. आरंभीं ' आत्मन् ' शब्दाचा अर्थ ' श्वास ' असा होत असे. मागाहून ' जीव ' असा झाला व कधीं कधीं ' शरीर ' असाही करीत. परंतु बहुतेक प्रसंगीं ' आत्मन् ' या शब्दाचा अर्थ ' अंश ' किंवा ' सत् ' असा होत असे. पुढें हा शब्द ग्रीक भाषेंतील ऑटॉस्, ल्याटिन् Ipse किंवा इंग्रजी Self प्रमाणें एक अहंपददर्शक सर्वनाम झाला. या शब्दाचें महत्व व्याकरणदृष्ट्याच आहे, असें नाहीं; तर हा शब्द नवें स्वरूप धारण करून आर्यावर्तांत किंवा इतर कोणत्याही देशांत सर्व ज्ञानाहून श्रेष्ट जें तत्वज्ञान त्याच्या संबंधानें अत्यंत महत्वाचा असा एक होऊन बसला. हा शब्द केवळ अहंभावाचा, अथवा ' मी ' या शब्दांत येणारा जो अर्थ त्याचाच, दर्शक नव्हता. कारण, या ' अहं ' किंवा ' मी ' या पदांत, इहलोकीं सत्वर नाश पावणाऱ्या पदार्थांचाच बहुतेक समावेश होई. ह्मणून या ' आत्मन् ' शब्दांत ' अहम् ' याच्यापेक्षां विशेष अर्थाचा समावेश झाला. या ' अहं ' ला, ह्मणजे देहाला, 'कांहीं काळ पर्यंत आश्रय देणारें असें जें वस्तु व जें कांहीं काळ लोटल्यानंतर, ह्मणजे मनुष्याची अहंरूप बेडी तुटतांच बंधमुक्त होत्सातें शुद्ध अशा स्वरूपाप्रत पावणारें' अ-

सा अर्थ या आत्मन् शब्दास प्राप्त झाला. इतर भाषांमध्यें ज्या शब्दांचा, प्रथम 'श्वास' एवढाच अर्थ असून पुढें 'जीव', 'आत्मा,' किंवा 'प्राण' असे अर्थ बदलले, त्या शब्दाहून 'आत्मन्' हा शब्द फार भिन्न आहे. अति प्राचीन काळींच 'आत्मा' या शब्दाचा 'श्वास' असा जो अर्थ होत असे, तो नाहींसा झाला; व 'केवळ जडात्मक' किंवा 'देह संबंधाचा' 'दैहिक' असा अर्थ जाऊन सर्वनामाचें रूप त्या शब्दास प्राप्त झालें. नंतर ग्रीक भाषेंतील शब्द फुके किंवा न्यूमा, ल्याटिन् मधील anima किंवा animus, संस्कृतांतील असु किंवा प्राण, या सारख्या केवळ भाववाचक नामापेक्षां अत्यंत भाववाचकता त्या शब्दास प्राप्त झाली. अस्तिकतेचें जें तत्व, जीव, प्राण, श्वास, या शब्दांवरील जी श्रद्धा उपनिषदांमध्यें उपलब्ध होते ती, आत्मन्विषयक किंवा सत्विषयक श्रद्धेपेक्षां साधारणत: तत्वज्ञानाची आणखी उतरती स्थिति दर्शविते. ज्याप्रमाणें आपल्यांत (इंग्रजींत) Self शब्द I शब्दापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे, तद्वत् आर्य लोक 'प्राण' या शब्दापेक्षां 'आत्मा' या शब्दाची अधिक योग्यता समजत व अखेरीस 'प्राण' शब्दाच्या अर्थाचा समावेश आत्मन् शब्दांतच त्यांनीं केला.

याप्रमाणें मागाहून आर्यावर्तांतील प्राचीनकाळच्या तत्ववेत्त्यांनीं तें अनंत वस्तु शोधून काढिलें. अनंत वस्तु आपल्या जीवाचा आधार मानीत, ह्मणजे आपला अंतरात्मा हा 'अहं' शब्दानें व्यक्त होणारें जें कांहीं त्याच्या पलीकडचा असा मानीत.

## आत्मन् (विषय.)

आतां त्यांनीं बाह्य सृष्टींतून तें अनंत वस्तु शोधून काढण्याचा कोणत्या रीतीनें यत्न केला हें आपण पाहूं.

कवींनीं कांहीं काळ पावेतों एकावर, ह्मणजे जो एक अद्वितीय देव असा त्यांनीं कल्पिला होता, परंतु जो अद्यापि पुलिंगी, कर्तत्वविशिष्ट व कांहींसा पौराणिक होता, त्याजवर भाव ठेविला. तो देव अहंपदरूपानें निरूपित होता. परंतु त्यास 'आत्मा' ही संज्ञा अद्यापि प्राप्त झाली

नव्हती. असें होतां होतां एकाएकीं आपणास निराळ्याच प्रकारचीं वाक्यें आढळूं लागतात. एखाद्या नव्याच जगतांत आपण फिरत आहों कीं काय असा आपणांस भास होतो. जें कांहीं नाटकप्रसिद्ध व पुराणप्रसिद्ध होतें त्याचा, व पूर्वीच्या प्रत्येक नांवाचा व रूपाचा परित्याग त्यांनीं केला. तेव्हां तें एक अद्वितीय नपुंसक विद्यमान आहे, असें मानून अनंताचें ग्रहण करण्याचा शेवटला यत्न त्यांनीं केला.

वेदकाळच्या कवींनीं यापुढें **आकाश** व **अरुणोदय** यांचा महिमा गाण्याचें सोडून दिलें. त्यांनीं इंद्राच्या चातुर्याची व **विश्वकर्मन्** आणि प्रजापति यांच्या शहाणपणाची स्तुति करण्याचें टाकलें. ते ह्मणूं लागले: 'आह्मी धुक्यांत अडकून गेलों व आमची वाणी कुंठित झाली.'[१] दुसरा कवि ह्मणतो:—'माझे कान गेले, माझे नेत्र गेले, आणखीं माझ्या ह्रदयांत जो प्रकाश वास करीत होता तो देखील नाहींसा झाला. दूर उड्डाण करणाऱ्या माझ्या मनानें मला सोडलें! मीं बोलूं काय? आणि विचार कसला करूं?'[२]

तिसरा एक कवि ह्मणतो:— 'मला स्वतःला कळत नाहीं. ह्मणून या ज्ञानी ऋषींस मी विचारितों. मी अज्ञान आहें, मला शिकवा, मला सांगा; ज्यानें या सहा लोकांची स्थापना केली, त्याचेंच हें जन्मरहित अद्वितीय परमात्मस्वरूप आहे काय?'[३]

हीं कविवचनें पुढच्या उदात्त विचारांचीं चिन्हें होत. या पुढें ईश्वरविषयक अत्यंत उन्नत कल्पना उत्पन्न झाल्या, असें दृष्टीस पडतें.

शेवटीं या विश्वांत विद्यमान असें एक अद्वितीय परमात्मस्वरूप आहे, असें मोठ्या धैर्यानें ते प्रतिपादन करूं लागले. तो स्वतःसिद्ध स्वयंभू असून, सर्व सृष्ट वस्तु निर्माण होण्याच्या अगोदरच तो होता. इंद्रादि देवांच्या

---

१ ऋग्वेद १०. ८२. ७. 'नीहारेण प्रावृता: जल्प्याच असुतृप: उक्थशास:चरन्ति.'

२ ऋ. ६. ९. ६. वि मे कर्णा: पतयत: वि चक्षु: । वि इदं ज्योति: ह्रदये आहितं यत वि मे मन: चरति दुराधी: । किं स्वित् वक्ष्यामि किमु नु मनिष्ये.

३ ऋ, १. १६४. ६. अचिकित्वान् चिकितुष: चिद् अत्र कवीन् पृच्छामि विद्मने न विद्वान् ॥ वि य: तस्तम्भ षट् इमा रजांसि अजस्य रूपे किं अपि स्विदेकम् ॥

पूर्वींचा तो आहे व त्याचें प्राचीनत्व इतकें आहे कीं, देवांसही या विश्वाची उत्पत्ति कोठून झाली हें कळत नाहीं.

ऋग्वेदाच्या एका प्रसिद्ध मंत्रांत कवि ह्मणतो :–'सृष्टींत कोणत्याही वस्तूचा भाव किंवा अभाव नव्हता; मृत्यु नव्हता किंवा अमृतत्व नव्हतें; व दिवस आणि रात्र हा भेद ज्या काळीं नव्हता; तेव्हां तें एक अद्वितीय चित्स्वरूप विद्यमान होतें. तें श्वासरहित असून जिवंत होतें.

'त्याच्या शिवाय दुसरें या विश्वांत आजपर्यंत कांहींएक नाहीं. त्यावेळीं सर्व अंधार होता. आरंभीं प्रत्येक वस्तूवर घोर अंधाराचें आच्छादन होतें. सर्व कांहीं एकाद्या महासागरासारखें होतें. परंतु प्रकाश मात्र नव्हता. मग टरफलांत दडून राहिलेलें तें बीज, ह्मणजे ती अद्वितीय वस्तु, ऊष्णतेच्या योगानें बाहेर निघाली.' नंतर तो कवि, सर्व वस्तूंचा आरंभ कसा झाला या गोष्टीच्या चिंतनेंत गढून जाऊन, त्या एकाचे अनेक कसे झाले; तें अज्ञात वस्तु ज्ञात होऊन त्यास नामरूप कसें प्राप्त झालें; जें अनंत तें सान्त किंवा अंतवत् कसें झालें; अशा अनेक विचारतरंगांत त्याचें मन गढून गेलें असतां शेवटीं ह्मणतो: 'हें गूढ कोणास ठाऊक असेल? अहा! त्याची फोड या जगीं कोणी केली असेल काय? ही चित्रविचित्र सृष्टि कशी कोठून उत्पन्न झाली? इंद्रादि देव हे फार मागून उत्पन्न झाले. ही थोर विश्वरचना कशी बनली असेल? हें कोणाला ठाऊक आहे? ज्याच्यापासून हें प्रचंड विश्व उत्पन्न झालें, त्यानें तें केवळ आपल्या इच्छेनें निर्मिलें असेल किंवा तें उदास निरिच्छ असेल. जो सर्वांहून ज्ञाता व ऋषी आहे, सर्वांपेक्षां उंच असें जें आकाश त्यांत जो वास करितो, त्यास मात्र हें सर्व ठाऊक असेल. किंवा न जाणों, कदाचित् त्यालाही ही गोष्ट ठाऊक नसेल[1]!'

---

[1] ऋग्वेद, १०. १२९. २. याचें पद्यात्मक भाषांतर मी येणेंप्रमाणें केलें आहे:—
नसे भाव जेव्हां नसे वा अभाव । नसे मृत्यु तैसा अमृत्युस्वभाव ॥
अहोरात्र हा भेद जेव्हां न ठावा । अशाकाळिं तो एक तेथें असावा ॥१॥
भरे घोर सर्वत्र हा अंधकार । असे मूळ आरंभ काळोख फार ॥

असले विचार ऋग्वेदांतील मंत्रांत, सूर्यास्तसमयीं आकाशांत नक्षत्रें जशीं थोडथोडीं व अंधुक अंधुक अशीं दृष्टीस पडतात, तसे प्रथम थोडथोडेच आढळतात. पण पुढें पुढें जावें तसतशी त्यांची संख्या व त्यांचें तेज हीं वाढत जातात व शेवटीं इतकें होतें कीं, ज्यास 'उपनिषदें' असें ह्मणतात, त्या ग्रंथांत हे विचार जशी कांहीं आकाशगंगा, ह्मणजे जिथें नक्षत्रांची अगदीं गर्दी होऊन राहिली आहे, त्या स्थानासारखे स्पष्ट दृष्टीस पडतात. उपनिषदें हा वेदांगाचाच शेवटला भाग आहे. उपनिषद्भाग वेदांग खरें; तथापि त्याची एकंदर बनावट किंवा घडण वैदिककालमर्यादेबाहेरची आहे यांत संशय नाहीं.

## उपनिषदांतील तत्वज्ञान.

आपणांस आठवत असेलच कीं, ज्यास आपण मंत्रकाल ह्मणतों त्याच्या पाठोपाठ लागलाच ब्राह्मणकाल, ह्मणजे प्राचीन कालच्या यज्ञांचें वर्णन करून त्यांची कृति सांगण्याच्या उद्देशानें रचलेल्या गद्याच्या प्राचीन पुस्तकांचा काल येतो.

या ब्राह्मणाच्या शेवटल्या भागांत बहुतकरून आपणांस एक 'आरण्यक' ह्मणून आढळतें. आरण्यक ह्मणजे वन-ग्रंथ, किंवा ज्यांनीं

---

असे मात्र तें एकटें श्वासहीन । नसे अन्य विश्वांत यत्शक्तिवीण ॥ २ ॥
समुद्रापरी धीर गंभीर होतें । प्रकाशाविणें मात्र सारें अहो तें ॥
असे बीज फोलामधें गुप्त जैसें । असे गूढ तें पूर्वींचें एक तैसें ॥ ३ ॥
जईं ऊष्णताशक्ति झाली प्रसूत । तिचें बाळ तें दृश्य होई अनन्त ॥
नसे नांव ज्याला, मिळे नांव त्यातें । जयाचें न हो ज्ञान तज्ज्ञान होतें ॥ ४ ॥
परी पाहिलें कोणि हें गूढ चित्र । कशी हो कशी सृष्टि झाली विचित्र ? ॥
अहो देव हे सर्व मागूनि झाले । कसें कोठुनि विश्व हें थोर आलें ॥ ५ ॥
जयापासुनी सृष्टि ही थोर आली । असे शांत तो ? बुद्धिनें निर्मियेली ? ॥
ऋषी थोर जो राहतो उंच नाकीं । कळे त्यास वा नाकळे गूढ हें कीं! ॥ ६ ॥

भा० कार.

आपलें घरदार सोडून अरण्यांत जाऊन एकांतांत वस्ती केली त्यांच्यासाठीं लिहिलेलें पुस्तक होय.

या आरण्यकाच्या अखेरीस किंवा त्यांतच अंतर्भूत अशीं प्राचीन उपनिषदें आढळतात. या ' उपनिषद् ' शब्दाचा अर्थ ' बैठक ' असा होतो; ह्मणजे, विद्यार्थ्यांचें आपल्या गुरूसन्मुख एकत्र जमून बसलेलें मंडळ, असा होतो. आणि या उपनिषदांत वेदकाळच्या सर्व धर्मसंबंधीं तत्वज्ञानाचा संग्रह होऊन राहिला आहे. हीं उपनिषदें ह्मणजे विचारांचें एक मोठें भांडारच आहे. प्रथम माझा संकल्प असा होता कीं, हीं माझीं सर्व भाषणें उपनिषदांतील मतांचें विवेचन करण्याच्या कामीं योजावीं. असें केलें असतें तरीही माझ्या विषयापुरती साधनसामग्री मजजवळ होती. तरी हल्लीं देखील जो अल्प काळ अवशिष्ट राहिला आहे, तितक्यांत मी तुह्मांस या उपनिषदांची साधारण तरी कल्पना करितां यावी ह्मणून थोडीशी हकीकत सांगतों.

उपनिषदांस तत्वशास्त्र ह्मणून मानितात, तें बरोबर नाहीं असें मला वाटतें. माझ्या समजुतीप्रमाणें त्यांत सत्य समजण्याच्या उद्देशानें केलेले केवळ अदमास किंवा तर्क आहेत. कोठें कोठें या उपनिषदांचा परस्पर विरोध दिसतो तथापि सर्वांचा हेतु एकच असून एकच सिद्धान्त सर्व उपनिषदें करितात. या प्राचीन उपनिषदांची किल्ली ' तूं आपल्या आत्म्यास ओळख ' ही आहे. परंतु ग्रीस देशांतील डेल्फी नांवाच्या देवळांतील देवानें सांगितलेल्या ज्ञोथीस्युटॉन् या शब्दांपेक्षां यांत अर्थ गहन आहे. उपनिषदांतील ' तूं आपल्या आत्म्याला ओळख ' याचा अर्थ असा होतो कीं, तुझ्या सत्य आत्म्यास, ह्मणजे तुझ्या अहंभावांत अंतर्धान पावलेल्या आत्म्यास जाण. तोच एक परात्पर, चिरंतन आत्मा आहे. त्याच्या सारखा दुसरा कोणीही नाहीं. तो सर्व विश्वाचा आधार आहे. त्याजमध्यें तूं आपल्या आत्म्यास शोध व ओळख.

अनंत, अदृश्य, अज्ञात, दैविक, अशा वस्तूच्या शोधाचा हा परिणाम होय. या शोधाचा आरंभ अतिशय साध्या मंत्रापासून होऊन उपनिषदें, किंवा ज्यांस मागाहून वेदांत हें नांव पडलें

त्यांत, ह्मणजे ज्यांत वेदांचा मुख्य आशय किंवा सिद्धान्त सांगितला आहे त्यांत, या शोधाची समाप्ति झाली.

या उपनिषद् ग्रंथाची बरोबरी करूं शकणारे ग्रंथ आर्यावर्ताच्या ग्रंथसाहित्यांत तर नाहींतच, पण इतकेंच नव्हे–फार काय सांगावें, जगांतील इतर कोणत्याही देशाच्या ग्रंथसाहित्यांत नाहींत. त्यांपैकीं कांहीं निवडक वेंचे वाचून आपणांस दाखवितों. यापेक्षां अधिक कांहीं करण्यास अवधि नसल्यामुळें माझा नाइलाज आहे.

## प्रजापति व इंद्र.

पहिलें अवतरण ( उतारा ) छांदोग्य उपनिषदांतून घेतलें आहे. ही एक कथा आहे. सर्व देवांचा अधिपति इंद्र, व सर्व असुरांचा अधिपति विरोचन हे दोघे प्रजापतीपासून ज्ञानप्राप्ती करून घेण्यासाठीं आले आहेत, असें या कथेंत दर्शविलें आहे.

ऋग्वेदांतील मंत्रांबरोबर याची तुलना करूं गेल्यास हा भाग अर्वाचीनकाळचा असें वाटतें. परंतु आर्यावर्तांतील इतर सर्व ग्रंथांबरोबर याची तुलना करूं गेल्यास हा भाग बराच प्राचीन आहे, असें सहज लक्षांत येतें. देव व असुर यांच्यामधील वैमनस्य फार ह्मणण्यासारखें नाहीं. परंतु या वैमनस्याचीं चिन्हें ऋग्वेदांत, त्यांत मुख्यत्वेंकरून शेवटल्या भागांत दिसूं लागतात. 'असुर' ह्मणजे जिवंत, ही संज्ञा प्रथम सृष्टींतील कित्येक शक्तींस, त्यांत मुख्यत्वेंकरून आकाशास, देत असत. कित्येक वाक्यांत 'देवाः असुराः' शब्दांचा अर्थ "जिवंत देव" असा करावा, असें कोणाही मनुष्यास वाटतें पुढें कांहीं कालानंतर असुर हें नांव कांहीं दुष्ट प्राण्यांस ( दैत्यांस ) पडलें; व शेवटीं देव ह्मणजे तेजस्वी, दयाशील व भले असे प्राणी किंवा पदार्थ. असा देव शब्दाचा अर्थ झाला. त्यांच्या विरुद्ध वर्तणारे जे दुष्ट प्राणी त्यांचें नांव असुर पडलें. ब्राह्मणांत हा भेद स्पष्टपणें स्थापित झाला आहे, व त्यांत बहुतेक स्थळीं कोणत्याही गोष्टीचा निर्णय, देव व असुर या दोघांत युद्ध होऊन तदनुसार झाला आहे, असें दिसतें.

इंद्र देवांच्या तर्फेचा आहे हें साहजिक आहे. पण विरोचन हा अर्वाचीन काळचा दिसतो. मंत्रांत हें नांव आलेलें आढळत नाहीं. विरोचन हा प्रथम तैत्तिरीय ब्राह्मणांत आढळतो (१.५.९.१.) त्या प्रसंगीं विरोचन हा प्रल्हाद व कयाधू यांचा पुत्र होय असें वर्णिलें आहे. या कथेंत प्रजापति श्रेष्ठ देवता आहे, अशी कल्पना आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (१.५.९.१.) तर त्यास इंद्राचा देखील पिता असें ह्मटलें आहे.

मनुष्याचा जो अंतरात्मा आहे त्याच्या सत्स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेण्याचे जे निरनिराळे मार्ग आहेत, त्यांचा बोध व्हावा हें या गोष्टीचें तात्पर्य आहे. प्रजापति प्रथम कांहींसा भ्रांति उत्पन्न करण्यासारखें ह्मणतो कीं, 'नेत्रांत दिसणारा जो पुरुष ( बाहुली ) तोच आत्मा !' या त्याच्या ह्मणण्याचा अर्थ एवढाच कीं, डोळ्यांहून अगदीं निराळा असा कोणी तरी पाहणारा आहे. पण त्याच्या शिष्यांनीं भलताच अर्थ केला व त्यांची भलतीच समजूत झाली. असुरांस वाटलें कीं, ज्याप्रमाणें आरशांत, त्याप्रमाणेंच डोळ्यांच्या बुबुळांत जी लहानशी बाहुली दिसते, तोच आत्मा असावा. आणि देवांस असें वाटलें कीं, आरशांत किंवा पाण्यांत जी छाया किंवा सांवली पडते, तोच आत्मा. परंतु एवढ्यानें जसा विरोचन संतुष्ट झाला तसा इंद्र संतुष्ट झाला नाहीं. त्यामुळें तो आत्म्याचा शोध लावावा ह्मणून निघाला. प्रथमारंभीं, ज्याचीं इंद्रियें स्तब्ध झालीं आहेत, जो हालत नाहीं, चालत नाहीं, पण स्वप्नाच्या घोटाळ्यांत पडला आहे, असा एक पुरुष पाहून त्यांत आत्मा आहे कीं काय, ह्मणून विचार करूं लागला. नंतर स्वप्न वगैरे पडत नसून केवळ अचेतन, ज्ञानरहित, शून्य अशा स्थितींत असलेल्या एका पुरुषाचा विचार करूं लागला. तेव्हां या शेवटल्या स्थितींत त्याला आत्म्याचा पत्ताच लागेना. 'तर मग तो नष्ट झाला !' असें त्यास वाटलें. या कारणामुळें असमाधान होऊन इंद्र अखेरीस प्रजापतीकडे पुनः गेला. तेव्हां प्रजापतीनें त्याचें समाधान केलें. तें असें: 'आत्मा ह्मणजे इंद्रियांचा उपयोग करून त्यांपासून अलिप्त राह-

णारा जो पुरुष तो. डोळ्यांत दिसणारा पुरुष ह्मणजे जो पाहतो तो. मला ज्ञान होतें असें ज्याला वाटतें तो आत्मा. ज्याला 'दिव्य चक्षु' असें ह्मणतात तें मन, वस्तुतः जो बघतो, जो जाणतो, त्याचें केवळ यंत्र किंवा साधन होय.' याप्रमाणें वनांत वास करणाऱ्या ऋषींनीं किंवा आर्यांनीं, हा जो सिद्धांत केला, हें जें महातत्व शोधून काढिलें, त्या अनंत वस्तुचें ज्ञान व्हावें ह्मणून बुद्धीशीं अतर्क्य झूज घेतां घेतां, किंवा प्रज्ञारूप जो प्रचण्ड सागर त्याचें मंथन करितां करितां जें विचाररत्न त्यांस प्राप्त झालें तेंच जणों या प्रसंगीं आपल्या हातांत आलें आहे.

## छांदोग्य उपनिषदांतील उतारा.

### सप्तम खण्ड.

'प्रजापतीनें सांगितलें: "जो आत्मा पापापासून, वार्धक्यापासून, दुःखापासून, मृत्यूपासून, क्षुधा व तृषा यांपासून मुक्त आहे; ज्याची इच्छा करणें इष्ट आहे तेंच जो इच्छितो, ज्याची कल्पना करणें योग्य त्याचीच जो कल्पना करितो, तो आत्मा आपण शोधून काढिला पाहिजे, व त्याची ओळख करून घेण्यास आपण यत्न केला पाहिजे. ज्यानें ह्या आत्म्यास शोधिला आहे व ज्याला त्याचें ज्ञान झालें आहे त्यास सर्व लोक प्राप्त होतात व त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात."' १.

'देव व असुर या दोघांनीं शब्द ऐकून ह्मटलें: "ठीक आहे. चला आपण त्यास शोधूं. जो त्याचा शोध लावील त्यास सर्व लोक प्राप्त होतात व त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात, तर आपणही त्याचा शोध करूं."

'याप्रमाणें बोलून देवांस सोडून इंद्र निघून गेला व असुरांस सोडून विरोचन निघून गेला. दोघेही एकमेकांशीं न बोलतां, (शिष्यांची आपले गुरुसन्मुख जातेवेळीं हातांत एक समिध घेऊन जाण्याची चाल असते त्या चालीप्रमाणें) आपापल्या हातांत समिधा घेऊन प्रजापतीपुढें आले.' २.

'त्या ठिकाणीं ते बत्तीस वर्षें पर्यंत शिष्यत्वानें राहिले. तेव्हां प्रजा-

पतीनें त्यांस प्रश्न केला: "तुह्मीं दोघेजण येथें कशाकरितां राहिले आहांत?"

'त्यांनीं उत्तर दिलें: "तुमचें एक वाक्य लोक वारंवार बोलत असतात कीं, 'जो पापापासून, वार्धक्यापासून, मृत्युपासून, शोकापासून, क्षुधा व तृष्णा यांपासून मुक्त आहे; ज्याची इच्छा करणें योग्य आहे तेंच जो इच्छितो, ज्याची कल्पना करणें योग्य आहे त्याचीच कल्पना जो करितो, तो आपण शोधून काढिला पाहिजे व त्याची ओळख करून घेण्यास आपण यत्न केला पाहिजे. ज्यानें त्या आत्म्यास शोधिलें आहे व ज्यानें त्याचें ज्ञान करून घेतलें आहे, त्यास सर्व लोक प्राप्त होतात व त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.' आतां आह्मीं तुझ्याजवळ राहिलों आहों, याचें कारण हें आहे कीं, आह्मांस त्या आत्म्याचें ज्ञान झालें पाहिजे."' ३.

'प्रजापतीनें त्यांस सांगितलें, "जो पुरुष डोळ्यांत[1] दिसतो तोच आत्मा होय, असें मी सांगितलें आहे. हाच अमर आहे, निर्भय आहे, हाच ब्रह्म आहे."

'त्यांनीं विचारिलें: "महाराज! जो पाण्यांत दिसतो व जो आरशांत दिसतो तो कोण?" त्यानें उत्तर दिलें, "तो प्रत्यक्ष या सर्वांत[2] दिसतो." ४.

---

१ टीकाकार याचा स्पष्ट खुलासा करितो. प्रजापतीच्या ह्मणण्याचा अर्थ हा आहे कीं, डोळ्यांत दिसणारा, ह्मणजे पहाणें या कार्याचा खरा कर्ता (खुद्द पाहणारा स्वतां) ज्यास ऋषी आपले नेत्र मिटूनही पाहूं शकतात तो. तरी देखील त्याचे (**प्रजापतीचे**) शिष्य **प्रजापतीचें** ह्मणणें उलट रीतीनें समजतात. दिसणाऱ्या मनुष्याविषयीं ते विचार करितात व पहाणाऱ्या डोळ्यांत पडलेली जी सूक्ष्म आकृति तोच डोळ्यांत दिसणारा पुरुष होय अशी त्यांची समजून होते व याच कारणामुळें ते आणखी असा प्रश्न करितात कीं, पाण्यांत किंवा आरशांत पडलेलें जें प्रतिबिंब तोच तर आत्मा नसेल ना?

२ टीकाकार फार श्रम घेऊन ठरवितात कीं, **प्रजापतीनें** कांहींएक खोटें सांगितलें नाहीं! 'पुरुष' असें ह्मणण्याचा त्याचा हेतु इतकाच कीं, जें परात्पर वस्तु तेंच पुरुषवाचक किंवा व्यक्तिवाचक महातत्व. त्याच्या शिष्यांनीं पुरुष या शब्दाचा अर्थ मनुष्य किंवा शरीर असा केला यांत त्याचा (**प्रजापतीचा**) कांहींएक दोष नाहीं!

अष्टम खण्ड.

"पाण्यानें भरलेल्या एका रुंद तोंडाच्या भांड्यांत तुह्मी आपल्या आत्म्यास पहा व तुमच्या आत्म्याविषयीं जें तुह्मांला समजणार नाहीं तें मला येऊन सांगा."

'त्यांनीं तशा पाण्याच्या भांड्यांत पाहिलें. नंतर प्रजापति त्यांस ह्मणाला: "तुह्मांस काय दिसतें?"

'त्यांनीं उत्तर दिलें: "आम्ही दोघांनीं आत्मा स्पष्ट रीतीनें पाहिला आहे, तो इतका कीं त्याच्या प्रतिबिंबांत केंस व नखेंही दिसून येतात!"'

'प्रजापति त्यांस ह्मणाला: "आपलें शरीर शृंगारिल्यानंतर आणि चांगलीं चांगलीं वस्त्रें परिधान केल्यानंतर व स्वच्छ झाल्यानंतर पुनः एकदां उदकाच्या तशा पात्रांत पाहा."

"त्यांनीं शृंगार करून आणि उत्तम उत्तम वस्त्रें परिधान करून व स्वच्छ होऊन उदकाच्या पात्रांत पाहिलें."

"प्रजापति ह्मणाले: 'तुह्मांस काय दिसतें?'" २.

'त्यांनीं उत्तर दिलें, "महाराज! उत्तम शृंगारलेले, उत्तमोत्तम वस्त्रें परिधान केलेले व स्वच्छ असे आह्मी दोघेही येथें जसे आहों, तसेच, महाराज! उत्तम रीतीचा शृंगार केलेले, आपल्या अत्युत्तम वस्त्रांसहित व स्वच्छ, असे आह्मी पाण्यांत दिसतों."

'प्रजापति ह्मणाले: "तोच आत्मा होय; हाच अमर आहे; भीतिरहित आहे; हाच ब्राह्मण आहे."'

'नंतर दोघेही आपल्या मनांत संतुष्ट होत्साते चालते झाले, आणि प्रजापति त्यांच्या मागें पाहून ह्मणाले: "हे दोघेजण ज्ञान झाल्यावांचून व आत्मस्वरूप पाहिल्यावांचून तसेच जात आहेत, या दोघांतून जो कोणी (मग तो देव असो किंवा असुर असो) या उपनिषद् मताप्रमाणें वर्तेल तो मृत्यु पावेल."

'आतां विरोचन आपल्या मनांत संतुष्ट होत्साता असुरांजवळ गेला आणि त्यांना या मताचा उपदेश करिता झाला कीं, एका आत्म्याची

( शरीराचीच ) पूजा करावी, आत्म्याचीच ( शरीराचीच ) सेवा करावी, आणि जो या आत्म्याची पूजा करितो व या आत्म्याची सेवा करितो, तो ऐहिक व आमुष्मिक अशा उभय लोकांत जय पावतो.' ४.

'ह्मणून हल्लीं देखील जो मनुष्य या जगतांत दान करीत नाहीं, ज्यास श्रद्धा नाहीं, जो बलिहरण करीत नाहीं, त्यास असुर ह्मणतात. कारण कीं, हेंच असुरांचें मत ( उपनिषद् ) आहे. ते मृत शरीरास सुगंध, पुष्पें, उत्तम वस्त्रें, इत्यादिकांनीं सुशोभित करितात, व असें केल्यानें परलोकीं आह्मी जय पावूं असें मानितात.' ५.

### नवम खण्ड.

'परंतु देवांजवळ जाण्यापूर्वींच इंद्राला ही अडचण दिसून आली. शरीर ज्या कालीं उत्तम रीतीनें अलंकृत असतें, त्या कालीं हा आत्माही (पाण्यांतील प्रतिबिंबही) उत्तम रीतीनें अलंकृत असतो. ज्या कालीं शरीरावर चांगलीं वस्त्रें असतात, त्या कालीं त्यानेंही चांगलीं वस्त्रें परिधान केलेलीं आहेत असें दिसतें. ज्या कालीं शरीर चांगल्या प्रकारें स्वच्छ केलेलें असतें, त्या कालीं तो देखील चांगल्या प्रकारें स्वच्छ झालेला दिसतो. तर मग जर शरीर आंधळें झालेलें असलें तर आत्माही आंधळा असला पाहिजे. जर शरीर लुलें असलें तर तोही लुला असला पाहिजे. आणि वास्तविक पाहिलें तर, जसें शरीर नष्ट होतें तसा आत्माही नष्ट झाला पाहिजे ! ह्मणून या मतांत मला तर कांहीं अर्थ दिसत नाहीं.' १.

'आपल्या हातांत समीध घेऊन शिष्याप्रमाणें इंद्र प्रजापतीजवळ आला. मग प्रजापति त्यास ह्मणाला: "हे मघवन् ( इंद्रा ) तूं विरोचनाबरोबर आपल्या मनांत संतुष्ट होत्साता गेला होतास तो माघारा कां बरें आलास ? "

---

१. टीकाकार या ठिकाणीं अशी टीप देतात कीं **इंद्र** व **विरोचन** या दोघांसही **प्रजापतीच्या** ह्मणण्याचा खरा भावार्थ कळला नाहीं. तर **विरोचन** हा शरीर हाच आत्मा असें समजला व **इंद्राला** तर असें वाटलें कीं, शरीराची छाया हाच आत्मा होय.

'त्यानें उत्तर दिलें : "महाराज ! जेव्हां हें शरीर चांगल्या प्रकारें अलंकृत असतें, तेव्हां हें प्रतिबिंबही अलंकृत दिसतें; जेव्हां शरीरावर उत्तम वस्त्रें घातलेलीं असतात, तेव्हां तें ( प्रतिबिंब ) ही उत्तम वस्त्रालंकृत दिसतें. जेव्हां शरीर चांगल्या प्रकारें स्वच्छ असतें, तेव्हां तें-ही ( प्रतिबिंबही ) चांगल्या प्रकारें स्वच्छ असतें. मग जर शरीर आंधळें असलें तर तेंही आंधळें असलें पाहिजे. जर शरीर लंगडें असलें तर तेंही लंगडें असलें पाहिजे. जर शरीर लुलें असलें तर तेंही लुलें असलें पाहिजे. आणि खरें ह्मटलें तर शरीर नाश पावतांच तेंही नाश पावलें पाहिजे. ह्मणून या मतांत मला तर कांहीं एक अर्थ दिसत नाहीं." २.

'प्रजापतीनें उत्तर दिलें: "हे मघवन्! खचित असेंच आहे. परंतु या खऱ्या आत्म्याविषयीं मी तुला आणखी समजावीन. आणखी बत्तीस वर्षें तूं मजपाशीं रहा."

'तो त्याजपाशीं आणखीं बत्तीस वर्षें राहिला आणि नंतर प्रजापतीनें त्यास सांगितलें : ३.

## दशम खण्ड.

"जो स्वप्नांत सुखानें हिंडतो फिरतो तोच आत्मा होय. हा अमर आहे, निर्भय आहे, हा ब्राह्मण आहे."

'नंतर इंद्र आपल्या मनांत समाधान पावून चालता झाला. परंतु पुनः देवांजवळ जाण्यापूर्वीं त्याला ही अडचण दिसून आली. हें खरें आहे कीं, यद्यपि शरीर आंधळें असलें तरी आत्मा कांहीं आंधळा नसतो; किंवा शरीर लंगडें, असलें तरी तो कांहीं लंगडा नसतो; जरी शरीराच्या दोषामुळें आत्मा कांहीं दूषित होत नसतो, किंवा जेव्हां शरीरावर प्रहार होतो तेव्हां आत्म्यावर प्रहार होत नाहीं; किंवा जेव्हां शरीर लुलें होतें, तेव्हां आत्मा कांहीं लुला होत नसतो; तरी पण, स्वप्नांत आत्म्यास कोणी मारिलें तर त्यास घाव लागतो. त्यास हाकून लाविला असतां तो पळत सुटतो. आणि असें वाटतें कीं त्यास दुःखापासून हो-

णारी पीडाही कळत असावी आणि तो अश्रूही ढाळीत असावा. तस्मात् या मतांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं. ' १.

'आपल्या हातांत समीध घेऊन तो पुनः प्रजापतीकडे शिष्यासारखा आला. प्रजापति त्यास ह्मणाले: "मघवन्! तूं आपल्या मनांत संतुष्ट होऊन गेला होतास, तो पुनः परत कां आलास?"

'त्यानें उत्तर दिलें: "महाराज! पहा कीं, जर कदाचित् शरीर अंधळें असलें, तरी पण आत्मा कांहीं अंधळा नसतो, किंवा शरीर लंगडें असलें तरी आत्मा कांहीं लंगडा नसतो, तसेंच शरीराच्या दोषामुळें आत्मा कांहीं दूषित होत नाहीं. अथवा शरीरावर कांहीं प्रहार झाला तरी आत्म्यावर प्रहार होत नाहीं, किंवा शरीर लुलें झाल्यानें आत्मा कांहीं लुला होत नसतो; तरी पण स्वप्नांत जर कोणी त्यास मारिलें, किंवा कोणी एखाद्यानें त्यास हांकून लाविलें तर त्यास दुःख वाटतें आणि तो अश्रु ढाळतो. ह्मणून या मतांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं." १.

प्रजापतीनें उत्तर दिलें, "मघवन्! खरोखर असेंच आहे; परंतु या खऱ्या आत्म्याविषयीं मी तुला आणखी समजावीन, तूं आणखी बत्तीस वर्षें मजपाशीं रहा."

'तो त्याजपाशीं आणखी बत्तीस वर्षें राहिला. तेव्हां प्रजापतीनें सांगितलें:

## एकादश खण्ड.

"जेव्हां एखादा मनुष्य झोंपीं जाऊन विश्रांति घेतो व पूर्ण शांतींत असतो व स्वप्नें वगैरे कांहीं पहात नाहीं, तेव्हां तो आत्मा होय; हा अमर आहे, निर्भय आहे, ब्राह्मण आहे."

'नंतर इंद्र आपल्या चित्तांत संतुष्ट होऊन चालता झाला. परंतु पुनः देवांजवळ जाऊन भेटण्यापूर्वींच इंद्राला ही अडचण दिसून आली: खरें ह्मटलें तर आत्मा या प्रकारें आपल्यालाच (आपण आपल्यास) ओळखीत नाहीं कीं मी अमुक आहें, तशीच कोणतीही विद्यमान वस्तु

त्यास कळत नाहीं. तस्मात् तो समूळ नाश पावतो. या ( मतांत ) मला कांहीं अर्थ दिसत नाहीं.'

'आपल्या हातांत समीध घेऊन शिष्यासारखा तो पुनः प्रजापतीपाशीं आला. प्रजापति त्यास ह्मणाला: " मघवन् तूं आपल्या मनांत संतोष पावून गेला होतास आणि परत कोणत्या कारणामुळें आलास? "

' तो बोलला: 'महाराज! त्या मार्गानें तर तो आपल्यालाच (आपण आपल्यासच ) ओळखीत नाहीं कीं मी ह्मणजे अमुक आहें. तशीच कोणतीही विद्यमान वस्तु त्यास कळत नाहीं. तस्मात् तो समूळ नाश पावतो. या मतांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं.' प्रजापतीनें उत्तर दिलें: "मघवन् खरोखर असेंच आहे. मी तुला खऱ्या आत्म्याविषयीं आणखी बोध करीन. यापेक्षां जास्त कांहीं एक नाहीं. येथें आणखीं पांच वर्षें रहा."

' तो आणखीं पांच वर्षें तेथें राहिला. त्यासुद्धां सर्व मिळून एकशेंएक वर्षें झालीं. या कारणामुळें असें सांगतात कीं, मघवन् (इंद्र) हा प्रजापतीपाशीं शिष्यत्वानें एकशें एक वर्षें राहिला. प्रजापतीनें त्यास सांगितलें:

## द्वादश खण्ड.

' "मघवन्! हा देह मर्त्य आहे व सदोदित मृत्यूच्या आधीन आहे. त्या मृत्युरहित व देहरहित आत्म्याची रहावयाची जागा हा देह होय.[१] जेव्हां आत्मा देह असतो ( ह्मणजे हा देह तोच मी व जो मी तोच हा देह असें मानीत असतो ) तेव्हां तो सुखदुःखाच्या स्वाधीन असतो. जोंपर्यंत हा आत्मा या देहांत आहे, तोंपर्यंत तो सुखदुःखापासून सुटला नाहीं. परंतु जेव्हां तो या देहापासून मुक्त होतो ( जेव्हां देहापासून आपण भिन्न आहों असें मानितो ) तेव्हां त्यास सुख किंवा दुःख कोणतेंही शिवत नाहीं." '

---

१ कित्येकांच्या ह्मणण्याप्रमाणें देह हा आत्म्याचा परिणाम होय. या देहाचीं तत्वें पृथ्वी, आप, व तेज हीं आत्म्यापासून उत्पन्न होत असून या देहांत आत्मा मागाहून प्रविष्ट होतो.

' " वायु देहरहित आहे, अभ्रें, विद्युत् व गर्जना, हीं सर्व देहरहित आहेत; ( ह्मणजे त्यांस हस्तपादादि नाहींत. ) हे पदार्थ आकाशांतील वातावरणांतून निघून जसे अतिउत्तम प्रकाशासन्मुख जाऊन पोहोंचतात आणि आपल्या स्वरूपानें ज्याप्रमाणें दृष्टीगोचर होतात[1], त्याप्रमाणें तो शांत आत्मा या देहांतून निघून उत्तम प्रकाशाप्रत (स्वस्वरूप ज्ञानाप्रत) प्राप्त होतो व स्वस्वरूपाप्रत पावतो. २. (या स्थितींत) तो सर्वांहून श्रेष्ठ पुरुष (उत्तम पुरुष) होय. तो त्या ठिकाणीं हांसतो, खातो, खेळतो, व (आपल्या मनांत) आनंद मानितो, स्त्रियांबरोबर रथांतून क्रीडा करितो, ज्ञातिजनासहवर्तमान हिंडतो, फिरतो, तरी ज्या देहांत त्यानें जन्म घेतला त्याची तो कोणत्याही प्रकारची पर्वा ठेवीत नाहीं[2].

' "जसे एखाद्या गाडीला घोडे जोडलेले असतात; तसा या देहाला प्राण ( प्रज्ञात्मा ) जोडलेला आहे." ' ३.

' " आतां त्या आकाशांत ( मोकळ्या जागेंत किंवा डोळ्यांच्या बाहुलींत ) दृष्टिरूपानें असणारा नेत्रवान् पुरुष असतो. डोळे हे केवळ त्याचें पहावयाचें साधन होय. जें वास घेतें तें कांहीं नाक नव्हे, तर तो आत्मा होय. नाक हें केवळ वास घेण्याचें साधन होय. जी बोलणारी ती कांहीं जीभ नव्हे तर तो आत्मा होय. जीभ ही केवळ

---

१ जुन्या बहुतेक उपमा जशा यथार्थ व गोड असतात तशी ही नाहीं. वायूला आत्म्याची उपमा दिली आहे त्याचा हेतु इतकाच कीं, जसा देहांत आत्मा अदृश्य असता, तसा वातावरणांत वायु थोडा वेळ गुप्त असून वातावरणांतून पुनः निघून आपलें वायुरूप धारण करितो. या ठिकाणीं मुख्य कटाक्ष 'अत्युत्तम प्रकाशा'वर आहे. हा प्रकाश एकपक्षीं उन्हाळ्यांतील सूर्य होय व दुसऱ्या पक्षीं ज्ञानरूप प्रकाश होय.

२ जी पूर्ण शांत स्थिति आत्म्यास होते, त्या स्थितींत वर लिहिलेल्या सुखांशीं किंवा दुःखांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवितां अंतरींचें पाहणाऱ्या तमासगिराप्रमाणें, ह्मणजे अंतर्साक्षित्वेंकरून, आत्मा आनंद अनुभवितो. ह्मणजे पुढें सांगितल्याप्रमाणें तो आपल्या दिव्य चक्षूनें त्यास पाहतो. सर्व वस्तूंत आपणावांचून इतर कांहीं आत्म्यास दिसत नाहीं. **तैत्तिरीय उपनिषद्** (पृष्ठ ४५) यावरील आपल्या टीकाग्रंथांत या वाक्याचें विवेचन करितांना **शंकराचार्य** त्याचा संबंध–कारणब्रह्माशीं नाहीं, तर कार्यब्रह्माशीं सांगतात.

बोलण्याचें साधन होय. जो ऐकणारा तो कांहीं कान नव्हे, तर तो आत्मा होय. कान हे केवळ ऐकण्याचें साधन होय!'' '४.

' "जें विचार करणारें तें कांहीं मन नव्हे, तर आत्मा होय. मन हें त्या आत्म्याचा दिव्य नेत्र होय[1]. आत्मा आपल्या दिव्य चक्षूनें, ह्मणजे मनानें, पुरून ठेविलेल्या सोन्याच्या निधी (ठेव्या) प्रमाणें इतरांच्या दृष्टीपासून गुप्त राहिलेलीं सुखें पाहून किंवा अनुभवून आनंद पावतो.

' "या आत्म्याविषयींचें ज्ञान **प्रजापतीनें इंद्रास** व **इंद्रानें** देवांस सांगितलें. **ब्रह्मदेवाच्या** सृष्टींत जे देव आहेत ते या आत्म्याची पूजा करितात. सर्व प्रजा व सर्व सुखें त्यांच्या स्वाधीन आहेत. जो त्या आत्म्यास जाणतो व समजतो त्यास सर्व लोक व सर्व इष्ट पदार्थ प्राप्त होतात." याप्रमाणें **प्रजापति** बोलले.'

## याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी.

हें खालीं दिलेलें अवतरण बृहदारण्यांतून घेतलें आहे. ही कथा बृहदारण्यकांतच थोडाबहुत फरक करून दोन ठिकाणीं लिहिलेली आढळते. एकदा दुसऱ्या अध्यायांत आणि एकदा चौथ्या अध्यायांत अशी दोन ठिकाणीं तीच कथा आहे.

'**याज्ञवल्क्यास** दोन बायका होत्या. एक **मैत्रेयी**, व दुसरी **कात्यायनी**. यां पैकीं **मैत्रेयी** ही ब्रह्मविद्येंत निपुण होती. **कात्यायनी** हिला स्त्रियांच्या अंगीं साधारणत: असणारें मात्र ज्ञान होतें.

' **याज्ञवल्क्य** चतुर्थाश्रम घेऊं लागले त्या काळीं ते ह्मणाले: हे **मैत्रेयी** ! मी आतां घर सोडून खचित वनांत जाणार, तरी तूं व **कात्यायनी** या दोघींची मला कांहीं व्यवस्था लाविली पाहिजे. १.

'मैत्रेयी ह्मणाली: "महाराज ! मला सांगा, कीं जरी हें सर्व जगत् द्रव्यानें परिपूर्ण असतें व तें मला मिळालें असतें तरी देखील तेवढ्यानें मी अमर झालें असतें काय ? "

---

१ कारण, दिव्य नेत्रास वर्तमानकाळ मात्र दिसतो असें नाहीं, तर त्यास भूतकाळाविषयीं व भविष्यकाळाविषयींही समजतें.

" याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें, " छे: श्रीमंतांस जीं जीं सुखें असतात तीं तीं मात्र तुला प्राप्त झालीं असतीं. परंतु संपत्तीनें कांहीं अमृतत्व ( अमरपद ) प्राप्त होत नाहीं. २.

' तेव्हां मैत्रेयी ह्मणाली: " ज्याच्या योगानें अमरपद मिळत नाहीं, अशाला घेऊन मी काय करूं? महाराज! अमृतत्वाविषयीं जें आपणास माहीत असेल तें मला सांगा– " ३.

' याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें: " तूं मला फारच प्रिय आहेस. कारण, तुझ्या या भाषणानें माझें मन फारच सुप्रसन्न झालें. ये हिकडे. बैस अशी. मी तुझी समजूत घालतों आणि जें मी सांगेन तिकडे नीट लक्ष दे बरें." ४.

' मग याज्ञवल्क्य ह्मणाले: " खरोखर, स्त्रीला पति जो प्रिय असतो तो केवळ पति ह्मणून त्यावर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून पति प्रिय असतो.

" पुरुषाला स्त्री जी प्रिय असते ती केवळ आपली स्त्री ह्मणून पुरुषाचें खरोखर तिजवर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून स्त्री प्रिय वाटते.

"खरोखर पुत्र जो पित्यास आवडत असतो तो पित्याचें पुत्रावर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून पुत्र प्रिय वाटतो.

" खरोखर, द्रव्य जें लोकांस आवडत असतें तें लोकांनीं द्रव्यावर प्रीति करावी ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रीति करावी ह्मणून द्रव्य प्रिय वाटतें.

" खरोखर, ब्राह्मणवर्ग जो प्रिय असतो तो ब्राह्मणवर्गावर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून ब्राह्मणवर्ग प्रिय असतो.

" खरोखर, क्षत्रियवर्ग जो लोकांस आवडतो तो क्षत्रियवर्गावर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून क्षत्रियवर्ग आवडतो.

" खरोखर, त्रैलोक्य जें लोकांस प्रिय वाटतें तें त्यांचें त्रैलोक्यावर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर त्यांचें प्रेम असावें ह्मणून त्रैलोक्यावर प्रेम असतं.

" खरोखर, देव जे तुह्मांस प्रिय असतात ते तुमचें देवांवर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून देव प्रिय असतात.

" खरोखर, प्राणी जे तुह्मांस प्रिय असतात ते त्यांच्यावर तुमचें प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून प्राणी प्रिय असतात.

" खरोखर, वस्तुमात्र जी तुह्मांस प्रिय असते ती तुमचें तिजवर प्रेम असावें ह्मणून नव्हे, तर आत्म्यावर प्रेम असावें ह्मणून वस्तुमात्र प्रिय असते.

" हे मैत्रेयी! खचित हा आत्मा पाहिला पाहिजे, ऐकिला पाहिजे, जाणिला पाहिजे, आणि ओळखिला पाहिजे. जेव्हां आपण आत्म्यास पाहतों, ऐकतों, जाणतों आणि ओळखतों, तेव्हां या सर्वांचें आपणांस ज्ञान होतें." ' ५.

' " आत्म्याखेरीज इतर ठिकाणीं जो कोणी ब्राह्मणवर्गाला शोधीत बसेल त्याचा ब्राह्मणवर्गानें त्याग केला पाहिजे. आत्म्याखेरीज इतर ठिकाणीं जो कोणी क्षत्रियवर्गास शोधीत बसेल, त्याचा क्षत्रियवर्गानें त्याग करणें योग्य आहे. आत्म्याखेरीज जो कोणी इतर ठिकाणीं तीन लोकांस शोधूं लागतो त्याचा तिन्ही लोकांनीं त्याग करणें योग्य आहे.

" आत्म्याखेरीज इतर ठिकाणीं जो कोणी प्राण्यांस धुंडूं लागतो त्याचा प्राण्यांनीं त्याग करणें योग्य आहे. आत्म्याखेरीज जो कोणी वस्तुमात्रास शोधूं लागतो त्याचा वस्तुमात्रांनीं त्याग करणें योग्य आहे. हा ब्राह्मण वर्ग, हा क्षत्रियवर्ग, हे लोक, हे देव, हे प्राणी, हे वस्तुमात्र, एकूणएक आत्मा होय." ' ६.

" आतां एखादी नौबत वाजूं लागली, ह्मणजे तिचा नाद बाहेरून धरून ठेवतां येत नाहीं, किंवा बंद करितां येत नाहीं. तर, जेव्हां त्या नौबतीलाच किंवा नौबत वाजविणारालाच धरून ठेवावा तेव्हां तो नादही धरून ठेवतां येतो;" ' ७.

" आणि एखाद्या शंखाचा नाद होऊं लागला ह्मणजे नुस्ता तो

नाद जसा धरतां येत नाहीं. तर, जेव्हां त्या शंखाला किंवा शंखनाद करणाऱ्याला धरून ठेवावा तेव्हांच तो नाद धरितां येतो. आणि एखादी मुरली वाजूं लागली ह्मणजे तिचा नुस्ता ध्वनि जसा धरून ठेवितां येत नाहीं. तर, जेव्हां त्या मुरलीला किंवा मुरली वाजविणाराला धरून ठेवावा तेव्हांच तो ध्वनिही धरितां येतो."

'"आणि हे **मैत्रेयी** ! ओलसर लांकडांच्या पेटलेल्या विस्तवांतून जसे धुराचे लोट आपोआप निघतात, तसेच त्या महान् आत्म्याच्या श्वासांतून आमचे हे सारे **ऋग्वेद**, **यजुर्वेद**, **सामवेद**, **अथर्वांगिरस**, **इतिहास**, **पुराण**, **विद्या**, **उपनिषद्** **श्लोक**, **सूत्र** (गद्यनियम), **अनुव्याख्यान** ( टीका ), **व्याख्यान** ( भाष्य ) हे सर्व निघाले आहेत. हे सर्व त्या एकट्याच्याच श्वासांतून निघाले आहेत."'

'"सर्व जलांचें अधिष्ठान ( जागा, ठिकाण ) जसा समुद्र होय, स्पर्शमात्राचें अधिष्ठान जशी त्वचा होय, सर्व स्वादांचें अधिष्ठान जशी जिव्हा होय, सर्व गंधांचें अधिष्ठान जसें नाक होय, सर्व रंगांचें अधिष्ठान जसे नेत्र होत, सर्व ध्वनींचें अधिष्ठान जसे कान होत, सर्व इंद्रियगम्य पदार्थांच्या ज्ञानाचें अधिष्ठान जसें मन होय, सर्व ज्ञानाचें अधिष्ठान जसें हृदय होय, सर्व कर्मांचें अधिष्ठान जसे हात होत, सर्व गतींचें अधिष्ठान जसे पाय होत, व सर्व वेदांचें अधिष्ठान जशी वाणी होय."' '"मिठाचा लहानसा खडा जसा पाण्यांत टाकला ह्मणजे विरघळतो व मग मीठ पाण्यापासून जरी निराळें काढितां येत नाहीं, तरी त्या पाण्याची चव घेतली ह्मणजे तें जसें खारट लागतें त्याचप्रमाणें हे **मैत्रेयी** ! हा अनंत, अपार, महान् आत्मा ज्ञानावांचून दुसऱ्या कशाचाही बनलेला नसून, या तत्वांतून उत्पन्न होऊन पुनः त्यांतच लीन होऊन जातो. हे **मैत्रेयी** ! मी तुला सांगतों कीं, हा ( आत्मा ) येथून ( देहांतून ) निघून गेल्यावर मग ज्ञान अगदीं नाहींसें होतें." असें **याज्ञवल्क्य** बोलले.'

'त्या समयीं **मैत्रेयी** बोलली: "भगवन् ! तो निघून गेल्यावर मग ज्ञान अगदीं नाहींसें होतें" हें तुमचें ह्मणणें मला अगदीं घोंटाळ्यांत पाडितें."

'परंतु याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें "हे मैत्रेयी! तुला घोंटाळ्यांत पाडण्याजोगें मी कांहीं देखील बोललों नाहीं. हे प्रिये! शहाणपण येण्याला इतकें पुरें आहे."'

' "कारण, विचार कर कीं, द्वैतभावना जर असती, तर अमका तमक्याला पाहतो, अमका तमक्याला हुंगतो, अमका तमक्याला नमस्कार करितो, अमका तमक्याला जाणतो, अमका तमक्याला ओळखितो, हें ठीक जुळतें. परंतु हें सारें जें कांहीं आहे तें आत्माच आहे. तेव्हां एक दुसऱ्यास पाहील कसा, एक दुसऱ्याला ऐकेल कसा, एक दुसऱ्याला नमस्कार करील कसा, एक दुसऱ्याला जाणील कसा, आणि एक दुसऱ्याला ओळखील कसा? ज्याच्या योगानें हा सर्वांस जाणतो त्यास हा कसा जाणील? हे प्रिये! जाणणाऱ्याला हा कसा जाणील?"[1]'

## यम आणि नाचिकेत.

उपनिषद्वांपैकीं कठोपनिषद् ह्मणून एक भाग फार विख्यात आहे. राममोहनराय यांजपासून प्रथम हा युरोपियन् पंडितांच्या हातीं आला. या राममोहनरायांचे स्वदेशावर अगणित उपकार आहेत. देशाची सुधारणा इच्छिणाऱ्यांपैकीं एवढेंच नव्हे पण मी असें समजतों कीं जगावर ज्या महात्म्यांनीं मोठें उपकार केले, त्यांपैकींच हे एक होत. असो. या कठोपनिषदाचीं अनेक भाषांतरें आजपर्यंत झालीं असून त्याचा वारंवार बराच उपयोग झाला आहे. धर्मसंबंधीं आणि तत्वज्ञानविषयक कल्पनांची वृद्धि व्हावी अशी ज्यांची इच्छा असेल त्यानें या कठोपनिषदाचें आस्थापूर्वक अध्ययन करावें अशी त्याची योग्यता

---

१ या ओळीच्या पुढें असाहि पाठ आढळतो:-'या आत्म्याचें वर्णन निषेधात्मक रीतीनें मात्र—ह्मणजे तो हें नव्हे, तो तें नव्हे, असें ह्मणून मात्र—करितां येतें. तो कल्पनातीत आहे. कारण, त्याची कल्पना करितां येत नाहीं. तो अविनश्वर आहे, त्याचा नाश होत नाहीं. तो स्पर्शातीत आहे; कारण, त्यास स्पर्श करितां येत नाहीं. तो अशृंखल आहे, ह्मणजे, बंधरहित आहे. कंप पावत नाहीं व पराभव पावत नाहीं. तस्मात् हे प्रिये! जाणणाऱ्याला त्यानें कसें जाणावें? याप्रमाणें हे मैत्रेयी! मी तुला उपदेश केला आहे. याप्रमाणें अमृतत्वाचें निरूपण केलें आहे.' असें ह्मणून **याज्ञवल्क्य** अरण्यांत चालते झाले.

आहे. या कठोपनिषदाचें अगदीं मूळचें स्वरूप कायम राहिलें आहे, असें मला वाटत नाहीं. कारण त्यांत मागाहून भर पडली असावी असें ह्मणण्यास उत्तम प्रमाणें आहेत. हीच कथा तैत्तिरीय ब्राह्मण ३. ११. ८ या ठिकाणीं सांगितली आहे. परंतु दोन्ही कथांत अंतर एवढेंच आहे कीं ब्राह्मणांतल्या कथेंत अमुक एक यज्ञ केल्यानें जन्ममरणापासून सुटका होते असा भाव दर्शविला आहे व उपनिषदांतल्या कथेंत सांगितलें आहे कीं, केवळ ज्ञानापासूनच मुक्ति प्राप्त होते.

नाचिकेत या नांवाचा एक बालक व मृत्युलोकाचा आधिपति यम, या उभयतांमध्यें झालेला संवाद या उपनिषदांत वर्णिला आहे. नाचिकेताच्या बापानें 'सर्वयज्ञ' नांवाचा यज्ञ आरंभिला; ह्मणजे, आपलें सर्वस्व देऊन टाकण्याचा संकल्प त्यानें केला. नाचिकेत आपल्या पित्याचा संकल्प ऐकून पित्यास विचारूं लागला कीं, तुह्मी तुमचा संकल्प खरा करतांना कांहीं तरी शिल्लक राखून ठेवणार आहां किंवा मुळीं कांहीं एक शिल्लक ठेवणार नाहींत? पहिल्यानें नाचिकेताचा बाप उत्तर देतांना आळं टाळं उत्तर देऊं लागला. पण मुलाचा आग्रह पाहून शेवटीं क्रोधायमान होऊन बोलला, 'हो, तुला देखील मी यमास देऊन टाकीन.'

बापाच्या मुखांतून तर हे शब्द एकदा निघून गेले. मग आपला संकल्प खरा करण्यास्तव प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पुत्राचा बळी यमाला देणें त्यास भाग पडलें. आपल्या बापानें अविचारीपणानें दिलेलें वचन खरें करावें ह्मणून तो उदार व धैर्यशाली मुलगा मरण्यास राजी झाला.

तो ह्मणाला: 'मी दुसऱ्या पुष्कळांच्या आधीं जात आहें, दुसऱ्या पुष्कळांच्या बरोबर मी जात आहें. यम (मृत्युलोकचा राजा आहे) माझें जं करणें असेल तें आज करील.

'जे अगोदर आले त्यांची काय दशा झाली हें मागें वळून पहा; जे पुढें येतील त्यांची कोणती दशा होणार हें पुढें नजर करून पहा;

धान्य पिकतें तद्वत् मनुष्य पिकतो; ह्मणजे वृद्ध होतो आणि धान्याप्रमाणेंच पुनर्जन्म पावतो.

परलोकाप्रत जेव्हां नाचिकेत येऊन पोहोंचला त्याकालीं यमराज तेथें नव्हते. यामुळें त्या नाचिकेताला कोणत्याही प्रकारचें आदरातिथ्य प्राप्त न होतां तसेंच तीन दिवस पर्यंत रहावें लागलें.

**यम** जेव्हां आपल्या घरीं आले तेव्हां **नाचिकेताचें** आदरातिथ्य नीट झालें नाहीं, असें पाहून **नाचिकेतास** प्रसन्न करावें या हेतूनें, 'बा **नाचिकेता** ! तूं तीन वर माग' असें ह्मणाले.

'मोझ्या[1] बापाचा मजवर अगदीं रोष होऊं नये' हा पहिला वर **नाचिकेतानें** मागितला.

'मला[2] एक चांगल्या प्रकारचा यज्ञ करण्यास शिकवावें' हा दुसरा वर त्यानें **यमाजवळ** मागितला.

आणि तिसरा[3] वर नाचिकेतानें मागितला तो हा कीं:—

"'ज्या कालीं मनुष्य मरण पावतो तेव्हां कित्येक ह्मणतात कीं तो आहे आणि कित्येक ह्मणतात कीं तो नाहीं. असे लोक संशयांत पडतात, तर या गोष्टीचें खरें इंगित काय आहे हें तुह्मांपासून मला कळावें; अशी माझी इच्छा आहे. तीन वरांपैकीं हा मी तिसरा वर मागतों."

'**यमानें** उत्तर दिलें: "या विषयाबद्दल पूर्वीं देवांना देखील संशय

---

१ **तैत्तिरीय ब्राह्मणांत नाचिकेताचें** पहिलें मागणें 'मी आपल्या बापापाशीं जिवंत परत जावें' असें आहे.

२ **तैत्तिरीय ब्राह्मणांत** दुसरें मागणें 'माझ्या सत्कर्माचा नाश होऊं नये', असें आहे. या मागण्यास अनुसरून **यमानें नाचिकेतास** एक चमत्कारिक यज्ञ किंवा हवनविधि सांगितला. त्या दिवसापासून त्या यज्ञाचें नांव '**नाचिकेत**' असें पडलें.

३. **तैत्तिरीय ब्राह्मणांत** तिसरें मागणें "**यमानें** मला मृत्यूस जिंकण्याचा मार्ग सांगावा" असें आहे. त्यावरून **यमानें** त्यास **नाचिकेत यज्ञ** करण्याविषयीं सांगितलें. टीकाकार यांच्या मताप्रमाणें या यज्ञांत ध्यान (उपासना) प्रधान असून यज्ञविधी (चयन) हा गौण भाग आहे.

होता. हें गूढ समजणें म्हणजे कांहीं स्वल्प गोष्ट नव्हे. हा विषय फार गहन आहे.

'बा नाचिकेता! दुसरा एखादा वर माग. हाच वर देण्याचें मजवर संकट घालूं नको. दुसरें कांहीं माग." '

"मनुष्यास दुष्प्राप्य असे पुष्कळ वर आहेत, त्यांतला तुला हवा तो माग. ज्या रथांत सुंदर कुमारिका व मधुर वाद्यें वाजत आहेत, असे रथ माग. त्या वस्तु इतर मनुष्यांस खचित मिळत नसतात. अरे पहा! अशा सुंदर कुमारिका तुझ्या सेवेंत तत्पर करून ठेवितों. परंतु मजला मरणाविषयीं कांहीं देखील विचारूं नको."

'नाचिकेत म्हणाला: "हे मृत्यो! त्या कोठवर टिकतील? उद्यांच नांहींशा होतील. त्या सर्व इंद्रियांचें वीर्य नष्ट करितात. हें सारें आयुष्यही अति अल्प आहे. तुझे घोडे, नाच, तमाशे, गाणें, बजावणें, हें सर्व तुजपाशींच असूं दे. नुसत्या द्रव्यानें कोणताही मनुष्य सुखी असणार नाहीं. हे मृत्यो! तुला एकदा पाहिलें म्हणजे आम्हांस द्रव्यप्राप्ति होऊन काय उपयोग? नाहीं. हे यमा! आम्ही ज्या संबंधानें असे संशयांत पडतों तें असें आहे तरी काय, तें आम्हांस सांग. या सृष्टींत जें परम गूढ तें समजून घ्यावें एवढीच इच्छा या नाचिकेताला आहे, दुसरी कोणतीही नाहीं." '

शेवटीं निरुपाय होऊन आत्मज्ञान त्याला सांगणें यमराजास भाग पडलें.

यम म्हणाले: 'जे मूढ लोक अज्ञानस्थितींत रहातात, आपणच आपल्या ठिकाणीं शहाणे समजतात व वृथा ज्ञानानें भुलून गेलेले असतात ते, आंधळ्यांच्या मागून एकमेकांचे हात धरून इतर आंधळे जसे हिकडून तिकडे आणि तिकडून हिकडे ठेचा खात भटकतात, तसेच या भवचक्रांत भटकत रहातात.

'द्रव्याच्या खोट्या मायेनें फसलेल्या मूढ बालकांच्या डोळ्यांस भविष्य कधीं दिसत नाहीं. त्यांस वाटत असतें कीं, इहलोक कायतो खरा; परलोक मुळींच नाहीं; याप्रमाणें पुन पुन: तो माझ्या तावडींत सांपडतो.'

'ज्याचें दर्शन होणें दुर्लभ आहे, ज्याचा अंधकारांतही प्रवेश होतो, जो गुहेंत लपला आहे, अगाध अशा विवरांत ज्याचा ईश्वरत्वानें वास आहे, अशा पुराणपुरुषास जो विद्वान आपल्या अंतरात्म्याच्या द्वारानें व ध्यानादिकानें जाणतो, तो खचित सुखदुःखातीत असतो.'

'ज्ञानस्वरूप आत्मा जन्मत नाहीं व मरतही नाहीं. तो शून्यापासून निघतो व शून्याचेठायीं लीन होतो. हा पुराणपुरुष अजात, चिरंतन, अक्षय आहे. देह जरी नष्ट झाला तरी तो नाश पावत नाहीं. आत्मा हा सूक्ष्माहून सूक्ष्म आहे, स्थूलाहून स्थूल आहे व प्राणिमात्राचे अंतःकरणांत गुप्त आहे. ज्या मनुष्यास कोणतीही इच्छा नसते व कोणत्याही गोष्टीचा शोक नाहीं, त्यास दुःख नाहीं, संताप नाहीं. भगवत्कृपेनें आत्म्याचा प्रभाव त्यास कळतो.'

'जरी तो स्थिर बसून रहातो तरी तो फार दूर चालणारा आहे. जरी तो निद्रिस्त आहे, तरी सर्व ठिकाणीं तो जागा असतो. ज्यास हर्ष होतो व हर्ष होतही नाहीं अशा ईश्वरास ओळखण्यास मजवांचून इतर कोण शक्तिमान् आहे ?'

'वेदानें, बुद्धीनें, किंवा फार विद्येनें हा आत्मा मिळत नसतो. ज्याला आत्मा स्वयें वरतो त्यालाच मात्र तो मिळतो. त्याला आत्मा आपला असें समजून वरतो.'

'परंतु ज्यानें आपल्या दुर्वासना सोडून दिल्या नाहींत, जो शांत व नम्र झाला नाहीं, ज्याचें मन स्थिरावलें नाहीं, अशा पुरुषाला जरी ज्ञान झालें, तरी आत्मा प्राप्त होत नाहीं.'

'आपण जे श्वासोच्छ्वास करितों तसल्या श्वासानें कोणताही मनुष्य जगणार नाहीं. दुसऱ्या एका श्वासामळें आपण जगतों व त्या श्वासावर हे दोन्ही श्वास अवलंबून आहेत.'

'बरें ! आतां मीं तुला हें गूढ व चिरंतन ब्रह्म यांविषयीं व देह मरण पावल्यानंतर आत्म्याचें काय होतें याविषयीं सांगेन.'

'कित्येकजण आपापल्या कर्मानुरोधानें व ज्ञानानुरोधानें सचेतन प्राणी होत्साते जन्म घेतात व कित्येकजण लांकूड, धोंडा इत्यादि रूपें पावतात.'

'परंतु जो परमपुरुष आपण निजलेले असलों तरी जागा असणारा, एकामागून दुसरें अशीं पुष्कळ रूपें दाखविणारा, तोच खरा तेजस्वी ह्मणावा. त्यालाच ब्रह्म ह्मणावें. त्यालाच अमर ह्मणावें. सर्व लोक वसतात ते त्यांतच याच्या पलीकडे कोणीही जात नाहीं. हाच तो आत्मा होय.

'जसा अग्नि प्रथम एक असून या जगतांत आल्यानंतर ज्या ज्या पदार्थास तो जाळितो, त्या त्या प्रमाणें भिन्न भिन्न होतो. तसाच सर्व वस्तूंत एकच असणारा आत्मा, ज्या ज्या वस्तूंत शिरतो तिच्यांत वेगळा वेगळा होऊन पुन: आपण अगदीं स्वतंत्र रहातो.'

'हा जगच्चक्षु सूर्य जसा आपल्या डोळ्यानें दिसणाऱ्या बाहेरच्या मलीन पदार्थांनीं भ्रष्ट होत नाहीं, तद्वत् वस्तुमात्रांत असणारा आत्मा जगाच्या सुखदु:खांनीं अगदीं विकार पावत नाहीं. कारण, तो स्वतां भिन्न असल्यामुळें तीं त्या आत्म्यास स्पर्श करूं शकत नाहींत.'

'अनाद्यनन्त असा विचारकर्ता एकच आहे. तो ज्या विचारांचा विचार करितो ते विचार अनित्य होत. तो एक असतां अनेकांच्या कामना परिपूर्ण करितो. जे साधुपुरुष आपल्या आत्म्याच्याठायीं त्याला पहातात त्यांस नित्य शांति प्राप्त होते.'

'जें जें ह्मणून आहे तें तें, ह्मणजे ही सर्व सृष्टि, उत्पन्न झाली तेव्हांपासून त्याच्या श्वासांत कंपायमान होत आहे. तें ब्रह्म एखाद्या नागव्या तरवारीप्रमाणें अत्यन्त भयंकर आहे. त्याचें ज्ञान ज्यांस होतें तेच अमर होतात.'

'तें ब्रह्म वाणीला, मनाला व नेत्रांला अगोचर आहे. तें 'आहे' असें जे ह्मणतात त्यांवांचून इतरांस तें कळत नाहीं.'

'अंतर्यामीं वास करणाऱ्या सर्व इच्छा ज्या कालीं नष्ट होतात त्याच कालीं मर्त्य मनुष्य अमर होत्साता ब्रह्माप्रत पावतो.'

'ज्या कालीं आपल्या अंत:करणांतील सर्व ऐहिक शृंखला तुटून जातात त्याचकालीं जो मर्त्य तो अमर होतो. आतां माझी शिक्षा समाप्त झाली.'

### उपनिषदांत उपदिष्ट केलेला धर्म.

आतां कदाचित् कोणी असें ह्मणेल कीं, उपनिषदांतील या शिक्षेस

किंवा उपदेशास 'धर्म' ही संज्ञा देतां येणार नाहीं. तर उपनिषदें ह्मणजे, असंपूर्ण, अप्रौढ अशा स्थितींत असणारें तत्वशास्त्र अथवा आत्मविद्या होय. या ह्मणण्यावरून भाषेचे आपण कसे गुलाम होऊन गेलों आहों, हें स्पष्ट दिसतें.

धर्म व तत्वविज्ञान या दोन शास्त्रांचा हा भेद, त्या त्या विषयाच्या उद्देशाकडे किंवा हेतूकडे लक्ष दिलें तर उपयुक्त होणार नाहीं, असें मी ह्मणत नाहीं. परंतु, वस्तुदृष्ट्या धर्माशीं ज्या विषयांचा संबंध आहे त्यांचा विचार करूं लागलों तर आपल्या ध्यानांत येईल कीं, तत्वविद्या ही त्याच विषयांची मीमांसा करणारी आहे—एवढेंच नव्हे, तर त्या विषयांपासूनच तत्वविद्येचा प्रत्यक्ष जन्म झाला आहे. सान्ताच्या बाहेर आणि आंत जें अनंत भरून राहिलें आहे, तद्विषयक कल्पनेवर किंवा भावनेवर जर धर्म हा अवलंबून आहे तर असल्या कल्पनेची किंवा भावनेची योग्यायोग्यता जर तत्वशास्त्र ठरविणार नाहीं, तर दुसरें कोण ठरवील? मनुष्यास आपल्या इंद्रियांच्या योगानें सान्तास ओळखण्याची जी शक्ति आहे तिचें नियमन करून त्याच्या मनावर वठणारे जे स्वल्प आणि सान्त असे ठसे, त्यांस आपल्या बुद्धिप्रभावानें अत्यंत उदात्त कल्पनेचें रूप देण्याचें काम जर तत्ववेत्ते न करतील, तर दुसरा कोण करील? इंद्रियजन्य ज्ञान व बुद्धि, या दोघांचा बहुधा नित्य विरोध असतां अनंताच्या अस्तित्वाचें निश्चयात्मक ज्ञान प्राप्त करून घेण्याचा अधिकार मनुष्यास आहे किंवा नाहीं, या गोष्टीचा निर्णय तत्ववेत्ते न करितील तर दुसरा कोण करील? धर्म हा तत्त्वविज्ञानापासून भिन्न केला, तर तो दूषित केल्याप्रमाणें होईल व अपकार पावेल. आणि तत्वविज्ञान जर धर्मापासून विभक्त केलें तर त्याचा नाश केल्यासारखें होईल!

लौकिक विषयाचे ग्रंथ व धार्मिक विषयाचे ग्रंथ, या दोहोंतील सूक्ष्म भेद राखण्याच्या कामांत, आणि आपलें धर्मशास्त्र पवित्र व ईश्वरप्रणीत आहे, असें सिद्ध करण्याच्या कामांत आपल्या ख्रिस्ती धर्माध्यक्षांहून प्राचीन काळच्या ब्राह्मणांनींच अधिक नैपुण्य दाखविलें आहे. आपल्या पवित्र पुस्तकां-

पैकीच उपनिषदें हें एक पवित्र पुस्तक होय असें ते ब्राह्मण मानीत. 'ईश्वरप्रेरित' ग्रंथांमध्यें, ह्मणजे ज्यांस श्रुति (वेद) अशी सर्वसाधारण संज्ञा आहे, त्यांतच उपनिषदांचा समावेश होतो. स्मृति व ब्राह्मणांचे इतर विद्याविषयक सारे ग्रंथ, ह्मणजे त्यांचे पवित्र कायदे, महाभारतादि वीररसप्रधान काव्यें आणि अर्वाचीन सर्व पुराणें हीं श्रुतिपासून अगदीं वेगळीं आहेत. प्राचीनकाळच्या ऋषींच्या समजुतीप्रमाणें त्यांचें जें तत्वशास्त्र किंवा वेदांतशास्त्र, त्याची योग्यता पवित्रतेच्या संबंधानें यज्ञभूमि किंवा वेदी आणि वेदमंत्र यांच्यासारखीच होती. उपनिषदांमध्यें जरी एक मत दुसऱ्या मताचें खंडण करीत आहे असें दिसतें, व ठिकठिकाणीं विरोध दृष्टीस पडतो, तरी त्यांत येणारीं सारीं मतें ब्राह्मणांच्या समजुतीप्रमाणें ईश्वरस्वरूपाचें निरूपण करणारें जें शास्त्र (Theology) त्या शास्त्रास सर्वथा अनुसरून आहेत व सत्य आहेत. हल्लींचे बहुतेक संप्रदाय फारच महत्वाच्या गोष्टींत जरी एकमेकांपासून विरुद्ध असतात, तरी देखील आपल्या मतास शास्त्राचा आधार दाखविणें असल्यास आपल्या मताच्या दृढीकरणार्थ उपनिषदांतील एखादें वाक्य घेऊन त्याजवरून निश्चितार्थ काढण्याचा यत्न कसा करीत असतात, तें पाहूं लागलों तर फारच आश्चर्य वाटतें.

## वैदिक धर्माची उत्तरोत्तर उन्नति.

परंतु प्राचीन आर्यधर्माची दृढ संस्थापना होण्याच्या कामांत विशेष लक्षपूर्वक विचार करण्यासारखा असा एक मुद्दा शिल्लक राहिला आहे. तो हा.

संहितेचा, ह्मणजे ऋषींच्या पवित्र मन्त्रांच्या संग्रहाचा, विचार करूं लागलों तर त्यांत ऐतिहासिक क्रमाचीं किंवा व्यवस्थेचीं स्पष्ट चिन्हें आढळतात, यांत अगदीं संशय नाहीं. हीं चिन्हें कोणतीं तीं दाखविण्याचा यत्न मी आपल्या कित्येक पूर्वींच्या व्याख्यानांत केला आहे. आणि त्या प्रसंगीं मी असेंही ह्मटलेलें आपणांस स्मरत असेल कीं, 'हे विचाराचे भिन्न भिन्न प्रकार केवळ कालमानानें ताडून पाहूं

लागलों तर आपले श्रम व्यर्थ होतील.' व्यक्तिविशेषाचे संबंधानें बुद्धिविशेष आढळतो. यावरून मानवी बुद्धीचा वर्षाशीं अथवा युगाशीं कार्यकारणसंबंध मुळींच नाहीं हें उघड आहे. आत्मविद्येंत अतिनिष्णात अशा बहुतेक **आर्य** तत्ववेत्त्यांचें आपणांस वारंवार स्मरण देणारा बर्क्‌[1] व परम भक्तिमान् कवि वॉटस्[2] हे दोघेही थोर पुरुष एकाचकालीं होऊन गेले ही गोष्ट आपणांस लक्षांत ठेविली पाहिजे.

तथापि, साधारणतः प्राचीनकाळीं व विशेषेंकरून वेदासारखे आद्यकालीन ग्रंथ ज्या काळीं झाले त्या काळाचा विचार केला असतां, हीं गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, उषा व सूर्य यांस उद्देशून केलेले मंत्र हे **अदितीस** उद्देशून केलेल्या मंत्रांपेक्षां अधिक प्राचीन आहेत. आणि हे मंत्रही 'सर्व सजीव वस्तूंचा धनी' जो **प्रजापति** त्याच्या प्रसादार्थ केलेले जे मंत्र त्यांपेक्षां अधिक प्राचीन आहेत. आणि त्यांच्याही मागून 'तें एक श्वासहीन होत्सातें जीवित धारण करणारे' (ज्याचें मी वर नुकतेंच भाषांतर दिलें) हा व त्याच्यासारखे आणखी कांहीं मंत्र झाले. वेदांतील सर्व मंत्रांत इतिहासपरंपरा किंवा अनुक्रम आढळतो; व हा अनुक्रम केवळ कालानुक्रमापेक्षां अधिक महत्वाचा असून अधिक विचारार्ह आहे. हे सर्व प्राचीन व अर्वाचीन मंत्र मिळून वैदिक मंत्रांचा संग्रह (किंवा हल्लीं आपण ज्यांस **संहिता** असें ह्मणतों तो) पुरा होण्यापूर्वीं होते. या **संहितेचा** काळ **ख्रिस्ती** शकापूर्वी एक हजार वर्षेपर्यंत कल्पिला, तर अशी कल्पना करण्यास फारसा प्रति-

---

१ **बर्क्‌** या नांवाचा एक प्रख्यात तत्ववेत्ता पाश्चिमात्यांमध्यें थोड्या शतकांपूर्वीं होऊन गेला. याचीं मतें बहुतेक वेदान्तदर्शनासारखीं आहेत. 'हें सर्व चराचर जगत् ज्ञानमय अशा तत्वापासून उत्पन्न झालें असून जडसृष्टीचा मनुष्यास केवळ भास मात्र आहे; वस्तुतः चैतन्याखेरीज जगांत दुसरें कांहीं नाहीं.' असें त्याचें मत होतें. आपले इकडे वेदान्तदर्शनाचे कर्त्ते जसे **व्यास** किंवा **शंकराचार्य** त्याचप्रमाणें इंग्रजींत ज्यास 'Idealistic Philosophy' ह्मणतात त्याचा व्याख्याता बर्क्‌ हा होय. [भाषान्तरकार.]

२ **वॉटस्** हा आपल्या **तुकाराम**बोवांसारखा परम भाविक **भगवत्भक्त** असा एक कवि होता. [भा० का०]

बंध दिसत नाहीं. ब्राह्मण या नांवाच्या ग्रंथांची रचना होण्यापूर्वीच संहिता या नांवानें प्रसिद्ध असणारा जो प्राचीन मंत्रांचा संग्रह तो पुरा झाला असावा. वेदमंत्रांत व त्यांहून अर्वाचीन असे जे ब्राह्मण-ग्रंथ त्यांत, व त्याच्या पुढच्याच काळांत झालेले जे ईश्वरविषयक प्रबंध त्यांत, 'जे कोणी प्राचीन यज्ञ भक्तिभावानें करितील त्यांस उत्तमोत्तम फलप्राप्ति होईल' अशा प्रकारचें अभिवचन दिलेलें आढळतें. ज्या ज्या देवांस उद्देशून यज्ञ सांगितले आहेत त्या त्या देवांस उद्देशून केलेले मंत्रही बहुधा सांपडतात. असें असतां प्रजापतिसारखे अत्यन्त भाववाचक देव वेदांहून आधुनिक अशा ब्राह्मण ग्रंथांतून हळू हळू कसे पुढें सरले ही गोष्ट स्पष्ट लक्षांत येते.

यानंतर आरण्यक ग्रंथ येतात. हे ब्राह्मण ग्रंथाच्या शेवटीं आहेत, एवढ्यावरूनच ते अर्वाचीन आहेत असें मी ह्मणत नाहीं. तर, त्यांच्या रचनेवरून ते अर्वाचीनकाळचे आहेत असें दृढ अनुमान होतें.

ब्राह्मण ग्रंथांत आणि त्यानंतर झालेल्या सूत्रांत वर्णिलेला खटाटोप आणि डामडौल केल्याशिवाय, वनवासी लोकांस कोणत्या प्रकारें यज्ञ करितां येईल हें समजाऊन देण्यासाठींच आरण्यक ग्रंथ झाले. नुसत्या मानसिक खटपटीनेंच वनौकसाचा यज्ञ परिपूर्ण होतो. त्यांस मानसयज्ञ हाच विहित आहे. त्या अरण्यवासी मनुष्यानें मनांत यज्ञाचा नुसता विचार केला ह्मणजे झालें व यज्ञसंबंधीं सर्व क्रियाकर्में केवळ मनानेंच केलीं ह्मणजे झालें. कंटाळा येण्यासारख्या कर्मकांडी खटपटीच्या यज्ञापासून जेवढें पुण्य इतरांस प्राप्त व्हावयाचें तेवढेंच पुण्य मानसिक यज्ञापासून अरण्यवासीजनास प्राप्त होतें.

शेवटीं उपनिषदें आलीं. आणि त्यांचा उद्देश काय? त्यांचा उद्देश, सारीं क्रियाकर्में व्यर्थ असून केवळ हानिकारक आहेत असें दर्शविण्याचा आहे. फलेच्छा बाळगून केलेल्या यज्ञादिक कर्मांचा परित्याग करणें व त्यांस तुच्छ मानणें; देव मुळीं नाहींतच, असें प्रत्यक्ष जरी ह्मटलें नाहीं तरी देवांच्या श्रेष्ठपणाचा आणि त्यांच्या अलौकिक सामर्थ्याचा मुळींच अंगीकार न करितां मनुष्यानें आपल्या आत्म्याच्या द्वारानें

त्या सत्य आणि विश्वव्यापक आत्म्यास ओळखावें, आणि जेथें शांति मिळण्याजोगी असेल तसल्या ठिकाणींच शांति प्राप्त करून घ्यावी. असें जर न करील तर त्याची मुक्ति किंवा संसारापासून सुटका होण्याची त्यास काडीमात्र आशा नाहीं, अशा प्रकारचा उपदेश उपनिषदांमध्यें केला आहे.

आतां हे भिन्न भिन्न विचार त्यांना कसे सुचले; ते विचार सहजरीत्या एकामागून एक त्यांस कसे सुचत गेले; त्या विचारांच्या मार्गें केवळ सत्यान्वेषणाच्या आवडीमुळें लोक कसे लागले; सत्य-प्राप्ति होईपर्यंत जितके ह्मणून मनुष्याच्या हातून होण्याजोगे यत्न आहेत, तितक्यांतला त्यांनीं एकही यत्न बाकी राहूं दिला नाहीं; इत्यादि गोष्टी या माझ्या अल्पसंख्याक व्याख्यानांत जितक्या चांगल्या रीतीनें मला समजावितां आल्या तितक्या समजविण्याचा यत्न मी केला आहे.

आतां आपण कदाचित् असा प्रश्न कराल कीं, जो धर्म अनेक विचारांनीं व अनेक भेदांनीं परिपूर्ण असून शिवाय ज्यांत निश्चयेंकरून एकमेकांशीं विरुद्ध अशीं अनेक तत्वें होतीं, तो धर्म चांगल्या रीतीनें नांदला असेल कसा? या प्रजेपैकीं कित्येक लोक देव आहेत असें मानणारे आणि कित्येक लोक देव नाहींत असें मानणारे; कित्येक यज्ञादिकेंकरून आपलें सर्वस्व खर्चून टाकणारे, आणि कित्येक यज्ञ ह्मणजे एक फसण्याची जागा किंवा जाळें होय, असें ह्मणणारे. तेव्हां असल्या प्रजेंतले लोक एकच धर्म आचरणाऱ्या प्रजा जशा एकत्र राहतात, तसे कसे बरें राहिले असतील? अहो! ज्या पुस्तकांतून एक-मेकांचें खंडण करणारीं मतें आढळतात, तीं पुस्तकें समग्र पवित्र व ईश्वरप्रणीत आहेत; एवढेंच नव्हे, तर ज्यांच्या सत्यतेबद्दल अन्य पुरा-व्याची अपेक्षाच नसावी इतकी योग्यता किंवा मान्यता त्या पुस्तकांस कशी प्राप्त झाली असेल?

हजारों वर्षें झालीं. असेंच होत आलें आहे. त्या कालापासून आज-कालपर्यंत जरी इतके फेरबदल होत आले तरी अद्यापि ज्या ज्या

ठिकाणीं पुरातन वेदधर्म चालू आहे, त्या त्या ठिकाणीं असेंच चालले आहे. याप्रमाणें गोष्ट खरोखर घडून आली आहे. आतां आपलें कर्तव्य एवढेंच आहे कीं, त्या गोष्टीचें सार काढून घेऊन तिजपासून कांहीं तरी उपदेश घ्यावा.

## चार वर्ण.

आर्यावर्तांतील प्राचीन भाषा आणि शास्त्रें युरोपियन् पंडितांच्या हातीं लागण्याच्या अगोदर असा पुष्कळ लोकांचा समज असे कीं, ब्राह्मण वर्ण इतर सर्व वर्णांतील लोकांपासून आपल्या धर्मज्ञानाचें भांडार मोठ्या युक्तीनें गुप्त ठेवीत व धर्मोपदेश करण्याचा अधिकार आपणांस मात्र आहे, अशा मिषानें आपलें वर्चस्व इतर अज्ञान प्रजेवर मिरवीत असत. हा ब्राह्मणांवरचा आक्षेप अगदीं निराधार असून केवळ मूर्खपणाचा आहे. संस्कृत भाषेचा व ग्रंथांचा अल्पही परिचय ज्यास झाला असेल त्याच्या लक्षांत ही चूक सहज येईल. फक्त शूद्र वर्णाला मात्र वेदाध्ययन वर्ज केलें होतें. बाकी राहिलेल्या क्षत्रिय व वैश्य या दोन वर्णांस वेदाध्ययन करण्याला, कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नव्हता. एवढेंच नाहीं तर वेदाचें अध्ययन करणें हें उलटें त्यांचें कर्तव्य आहे असें मानीत. वेदाध्ययन सर्वांस करावें लागे आणि वेदपाठणाचा, ह्मणजे वेद शिकविण्याचा अधिकार ब्राह्मण वर्णास मात्र असे. वंशपरंपरेनें चालत आलेले धर्मसंबंधी आचार आणि संस्कारपद्धति, या दोन गोष्टी मात्र नीच वर्णांस शिकवाव्या आणि ब्राह्मण वर्णासाठीं एका प्रकारचा गूढ धर्म, ह्मणजे उपनिषद्धर्म, निराळाच वगळून ठेवावा, असा हेतु ब्राह्मणांच्या मनांत कधींही नव्हता. स्वधर्म इतर जातीपासून गुप्त ठेवण्याचें हें मत ब्राह्मणवर्णापासून निघालें नसून उलटें नीच वर्णापासून निघालें आहे, असें कित्येक गोष्टींवरून अनुमान होतें.

वस्तुतः पहातां हा जातिभेदाचा प्रकार जो हल्लीं आपल्या दृष्टीस पडतो तो वेदकाळीं मुळींच नव्हता. जातिभेदाचा प्रकार जो वेदांत आढळतो तो मनुस्मृतींत आढळणाऱ्या प्रकारांपेक्षां अगदीं निराळा आहे,

मग सध्यां चालू असणाऱ्या जातिभेदाच्या प्रकारापासून पुष्कळच भिन्न आहे, हें सांगणेंच नको. एक आर्य, ह्मणजे श्रेष्ठ कुळांत जन्मलेल्या व सेव्य अशा लोकांचा वर्ग आणि दुसरा शूद्र ह्मणजे सेवकवर्ग. येणेंप्रमाणें प्राचीन आर्यप्रजेचे विभाग दोन प्रकारचे आढळतात.

ब्राह्मण ह्मणजे धर्माधिकारसंपन्न असे लोक. क्षत्रिय अथवा राजन्य, ह्मणजे युद्धकलाकुशल असे लोक. आणि वैश्य ह्मणजे नगरवासी लोक. अशा तीनही प्रकारच्या लोकांची गणना 'आर्य' या वर्गांत केली होती असेंही आपणांस आढळतें. प्रत्येक वर्गाकडे वेगळीं वेगळीं लावून दिलेलीं कामें व वेगळे वेगळे अधिकार, यांची व्यवस्था इतर देशांप्रमाणेंच दिसते. त्यांचा विशेष विचार करण्याचें येथें कारण नाहीं.

## चार आश्रम.

याप्रमाणें वैदिककाळच्या प्राचीन प्रजेचे हे चार वर्ण झाले. परंतु त्या प्रजेच्या संबंधानें दुसरी आणखींही एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती कोणती तर चार आश्रम ही होय. ब्राह्मणाला बहुतेक चारी आश्रम घेण्याचा अधिकार असे. क्षत्रियाला तीन आश्रमांचा, वैश्याला दोन आश्रमांचा आणि शूद्राला एकाच आश्रमाचा अधिकार असे. आर्यावर्तांतल्या कोणच्याही ठिकाणीं मूल उपजलें ह्मणजे जन्मापासून पुढें जगांत आपलें आयुष्य कोणत्या प्रकारें वाळवावें, याविषयींची एकंदर व्यवस्था करून दिलेली असे. मनुष्याच्या प्रकृतीवर धर्मसंबंधाचा पक्का अमल कधींही बसत नसतो, व तिला नेहेमीं जितकें स्वातंत्र्य मिळेल तितकें इष्ट असतें, ही गोष्ट पक्की लक्षांत बाळगिली असतां, प्राचीनकाळचे आर्य लोक आपल्या धर्मग्रंथांवर पूर्ण भरंवसा ठेवीत व कालक्षेप करण्याचे जे मार्ग स्मृतींनीं लावून दिले असतील त्यांचें अवलंबन करीत असत, असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

आर्य बालक जन्मास आलें ह्मणजे लागलेंच, किंबहुना जन्मण्या-

पूर्वींच त्याच्या मातापितरांस एका प्रकारचा संस्कार करावा लागत असे. तो संस्कार जर एखाद्या बालकाचा न झाला तर त्याला लोकांत राहण्याची योग्यता येत नसे. पुरातन ब्राह्मणांतही अशीच एक चाल असे. ती ही कीं, संस्कार न पावलेल्या मुलाला पुढें कोणत्याही देवळांत पुजारीपणा मिळत नसे. हे संस्कार एकंदर सुमारें पंचवीस तीस सांगितलेले आहेत. शूद्रांस मात्र हे संस्कार वर्ज्य असत, आणि एखाद्या आर्याच्या हातून जर चुकून हे संस्कार न झाले तर त्याची निवळ शूद्रांतच गणना होत असे.

## पहिला आश्रम.

### ( ब्रह्मचर्य किंवा विद्यार्थ्याची स्थिति. )

आर्यांच्या मुलाचा, ह्मणजे **ब्राह्मण**, **क्षत्रिय** किंवा **वैश्य** या तीन वर्णांतील मुलाचा पहिला आश्रम, तो मुलगा सातापासून अकरा वर्षांचा झाला ह्मणजे सुरू होई. मुलगा सात आठ वर्षांचा झाला ह्मणजे त्या मुलाला घरांतून काढून विद्याभ्यासाकरितां एका गुरूच्या स्वाधीन करीत. विद्याभ्यासाचा मुख्य हेतु हा कीं, एक किंवा सारे वेद त्यानें तोंडपाठ करावे. वेदाला 'ब्राह्मण' असें ह्मणत. याकरितां त्या आर्यपुत्राला **ब्रह्मचारी**, ह्मणजे वेदाभ्यासी, असें ह्मणत. हे वेद कामापुरते शिकणें झाल्यास फारच कमी ह्मटली तरी निदान बारा वर्षांची कालमर्यादा असे. आणि अधिक झाली तर ४८ वर्षांची असे. गुरूच्या घरीं शिष्या जाऊन राहिला ह्मणजे तेथें त्याला गुरूच्या अगदीं आज्ञेंत वागावें लागे. रोज सूर्योदयकाळीं, आणि सूर्यास्तकालीं दोन्ही वेळां त्यानें संध्या केली पाहिजे. रोज सकाळ संध्याकाळ सारा गांवभर फिरून भिक्षा मागून आणिली पाहिजे, आणि जें जें मिळेल तें सर्व गुरूजींच्या स्वाधीन केलें पाहिजे. गुरू जें त्यास खाण्यासाठीं देईल, त्यावांचून दुसरें कांहीं देखील त्यानें खाऊं नये. त्यानें पाणी आणावें;

---

१**यमाचें** असें मत आहे कीं, **शूद्रांसही** उपनयन (ह्मणजे विद्या शिकण्यासाठीं उमेदवारी) करण्याचा अधिकार आहे; परंतु वैदिक मंत्रांवांचून त्यांनीं हे संस्कार करावे.

यज्ञासाठीं समिधा गोळा करून आणाव्या; यज्ञकुंडाजवळची जागा झाडून निर्मळ करावी, आणि अहोरात्र गुरूच्या सेवेंत तत्पर रहावें. त्याच्या या सेवेबद्दल गुरूनें त्याला वेद शिकवावे, आणि ते त्यानें तोंडपाठ करावे. आपल्या शिष्याला दुसरा आश्रम घेण्याची योग्यता यावी, ह्मणजे त्यानें विवाहित होऊन गृहस्थाश्रमी व्हावें, ह्मणून गुरु त्याला याशिवाय दुसरे उपयुक्त विषय पुष्कळ शिकवी. या उपरांत इतर गुरूंपासून इतर विद्या शिकण्याची शिष्याची मर्जी असल्यास त्याणें त्या शिकाव्या. परंतु त्याला द्विज करणें, ह्मणजे ब्रह्मचर्यदीक्षा देणें, हें काम त्याच्या आचार्याच्याच हातून झालें पाहिजे.

विद्यार्थ्याची शिष्यावस्था समाप्त होऊन त्यानें गुरूला योग्य दक्षिणा दिली, ह्मणजे त्याजला आपल्या पित्याच्या घरीं जातां येई. त्यानंतर त्याला स्नातक ह्मणजे स्नान केलेला, किंवा समावृत्त ह्मणजे परत आलेला असें ह्मणत. आतां त्याची सनद त्याला प्राप्त झाली असेंच आपण ह्मटलें पाहिजे. कित्येक नैष्ठिक ( शिष्य ) अविवाहित राहून आमरण गुरूच्याच घरीं रहात. शिष्यावस्था समाप्त झाल्यावर मर्जी असल्यास कित्येकजण लागलेच वानप्रस्थ किंवा संन्यासी होत. परंतु सामान्य नियम असा असे कीं, आर्यांचा मुलगा १९ किंवा २० वर्षांचा झाला ह्मणजे त्यानें लग्न करावें.

## दुसरा आश्रम. ( गृहस्थाश्रम )

### ( विवाहा नंतरची अवस्था ).

पुरुषानें हा दुसरा आश्रम घेतला, ह्मणजे त्याला गृहस्थ किंवा गृहमेधिन्, ह्मणजे घराचा यजमान, असें ह्मणतात. या ठिकाणीं बायको शोधून काढण्याविषयींचे, व लग्न करण्याविषयींचे नियम देऊन गृहसंबंधाच्या फार बारीक गोष्टी सुद्धां सांगितल्या आहेत. परंतु गृहस्थाश्रमाचे धर्म कोणते आहेत, या गोष्टीचा विचार विशेष महत्वाचा आहे. विवाह होण्याच्या पूर्वींच वेदांतील मंत्र त्यास तोंडपाठ येत असत. तेव्हां अग्नि, इंद्र, वरुण, प्रजापति व वेदांतील इतर देवता, यांजवर त्याची पूर्ण श्रद्धा

असे, हें उघडच आहे. आणखी त्यास ब्राह्मण ग्रंथही येत असत. आणि त्यांत सांगितलेल्या नियमांप्रमाणें वागणें असेल तर, त्याला ब्राह्मणांत सांगितलेले यज्ञ करावेच लागत. आरण्यक व उपनिषदें हीं मुखोद्गत वागत असल्यामुळें त्यांचा अर्थही जर त्यास कळत असेल तर त्याची बुद्धि स्थिर झाली आहे असें ह्मणत. आणि हा त्याचा द्वितीय आश्रम या पुढच्या तिसऱ्या श्रेष्ठ आश्रमाच्या तयारीसाठींच आहे असेंही त्यांस ठाऊक असे. परंतु ज्यानें द्वितीय आणि तृतीय आश्रम अनुभविले नसतील त्याला हा तिसरा श्रेष्ठ आश्रम घेण्याचा अधिकार नसे. हा केवळ सामान्य नियम असे. यांतही विपर्यास घडलेले आपल्या पाहण्यांत येतात[1]. पुरुषाचें लग्न झालें ह्मणजे त्या गृहस्थाला नित्य पंचमहायज्ञ करावे लागत. ते पांच यज्ञ पुढें लिहिल्याप्रमाणें:—

( १ ) वेदाभ्यास स्वतां करावा किंवा दुसऱ्याकडून करवावा. ह्मणजे पठण व पाठण.

( २ ) पितृयज्ञ ( ह्मणजे पूर्वजांस तर्पण करणें ).

( ३ ) देवतांस बली अर्पण करणें.

---

१ 'चार आश्रम' हा विषय **वेदांतसूत्र ३, ४** या ठिकाणीं पूर्णपणें वर्णिला आहे. या संबंधानें सर्वसाधारण नियम दिला आहे तो असा:—

'ब्रह्मचर्यं समाप्य गृही भवेत्, गृही भूत्वा वनी भवेत्, वनी भूत्वा प्रव्रजेत्.'

**अर्थ**—मनुष्यानें आपलें ब्रह्मचर्य संपविल्यानंतर गृहस्थाश्रम घ्यावा; गृहस्थाश्रम संपविल्यानंतर वनामध्यें रहावें, आणि वनवास संपविल्यानंतर परिव्राज ( संन्यासी ) होऊन भटकत रहावें.

तथापि पुढें असें सांगितलें आहे:—

'यदिवेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् गृहाद्वा वनाद्वा.'

**अर्थ**—किंवा ब्रह्मचर्य संपल्यानंतर किंवा गृहस्थाश्रम किंवा वनवास संपल्यानंतर परिव्राट् होऊन भटकावें (जाबालोपनिषद्, ४) वेदांतसूत्र ३, ४, ४९, या स्थळीं **गोविंदानंदांनीं** आपल्या टीकेमध्यें एक अवतरण दिलें आहे. त्यांत चार आश्रमांपैकीं प्रत्येक आश्रमाचे चार प्रकार सांगितले आहेत: 'गायत्रः, ब्राह्मः, प्राजापत्यः, बृहन्, इति ब्रह्मचारी चतुर्विधः; गृहस्थोपिवार्तावृत्तिः यायावरः घोर सन्यासी इतिचतुर्विधः; वानप्रस्थश्चवैखानसोदुम्बरवालखिल्यफेनपप्रभेदैश्चतुर्विधः । तथा परिव्राडपिकुटीचकबहूदक हंसपरमहंसप्रभेदैश्चतुर्विधः'.

( ४ ) जिवंत प्राण्यांस अन्न घालणें.

( ९ ) अतिथींचा आदरसत्कार करणें.

गृहस्थानें अहोरात्र कोणत्या प्रकारें वर्तावें याचें गृह्यसूत्रांत ( संसारसंबंधी नियमांच्या संग्रहांत ) जसें पूर्णत्वानें वर्णन केलेलें आहे, तसें दुसरे कोठेंही नसेल. हें वर्णन जरी केवळ कल्पित असावें असें ह्मटलें, तथापि त्या कल्पित चित्रापासून संसाराचें स्वरूप डोळ्यांपुढें उभें राहातें तसें अन्यत्र कोठेंही उपलब्ध नाहीं.

उदाहरण:–आर्यावर्तातील प्राचीन संसारपद्धतींत एक अति प्राचीन कल्पना अशी होती कीं, प्रत्येक मनुष्य जन्मला ह्मणजे तो 'ऋणी' असतो.

आपल्या धर्माची स्थापना करणारे पित्याप्रमाणें जे ( ऋषी ) त्यांचा तो प्रथम ऋणी असतो. दुसरें ऋण त्याला देवांचें असतें; आणि तिसरें, त्याला मातापितरांचें ऋण असतें. त्यानें वेदाचें लक्षपूर्वक अध्ययन केलें ह्मणजे त्याला ऋषींचें जें ऋण असतें तें फिटतें. त्यानें यजमानपणानें जे लहान मोठे यज्ञ करावयाचे ते केले ह्मणजे तो देवांच्या ऋणापासून मुक्त होतो. आणि त्यानें पितृलोकाचें तर्पण केलें व त्याला स्वतांला मुलें बाळें झालीं ह्मणजे, त्याला मातापितरांचें जें ऋण असतें तें फिटतें.

मनुष्यानें हीं तिन्ही ऋणें फेडिलीं, ह्मणजे या जगांतून तो मुक्त झाला असें मानितात.

प्रत्येक धर्मशाली व श्रद्धावान् आर्याला हे सारे धर्म आचरलेच पाहिजेत. या शिवाय शक्त्यनुसार त्यानें मर्जी असल्यास, इतर पुष्कळ यज्ञ आहेत ते करावे. त्यांत कित्येक रोज करावयाचे यज्ञ असतात,

---

१ 'मनु' ६, ३५. 'ऋषि, पितर व देव या तिघांचीं ऋणें अनुक्रमे त्यानें फेडिल्यावर मोक्षसाधनाकडे लक्ष लावावें. परंतु हीं ऋणें फेडल्याखेरीज जो मोक्षसाधनाचा यत्न करील त्याचा अधःपात होईल. शास्त्रानें सांगित याप्रमाणें वेदाध्ययन झालें, पुत्रप्राप्ति झाली व यथाशक्ति यज्ञयागादिक त्यानें केलें ह्मणजे तो ऋणमुक्त झाला. नंतर त्यानें आपलें मन मोक्षसाधनाकडे लावावें.'

पहा–मनु ११–६६.

कित्येक पंधरा दिवसांनीं करावयाचे असतात, कित्येक यज्ञ तीन ऋतूं-स अनुलक्षून करावयाचे असतात; कित्येक यज्ञ शेतांतलें पीक कापून आणण्याच्या संधीस करावयाचे असतात. प्रत्येक अर्धवर्षानें व एक एक वर्षानें प्राप्त होणाऱ्या पिकाच्या संबंधानें कांहीं यज्ञ करावयाचे असतात. हे यज्ञ करणें झाल्यास याज्ञिकांत प्रवीण असणाऱ्या आचार्या-चें साहाय्य घेतलें पाहिजे. यज्ञ ह्मणजे एक मोठ्या खर्चाचें कलम असलें पाहिजे हें उघड आहे. हे यज्ञ तीन श्रेष्ठ वर्णांच्या हितासाठीं, ह्मणजे आर्यांच्याच हितासाठीं करावे लागत. या यज्ञांच्या संबंधानें क्षत्रिय व वैश्य या दोघांचीही योग्यता ब्राह्मणा इतकीच मानीत. परंतु या यज्ञयागादिकांपासून प्राप्त होणारें फळ ब्राह्मणांस मात्र मिळावयाचें असें मानीत. अश्वमेध, व राजसूय यज्ञ असे कांहीं काहीं यज्ञ केवळ क्षत्रियांच्याच कल्याणासाठीं करण्याची चाल असे. शूद्रांनीं मुळींच यज्ञ करूं नयेत, अशी पाहिल्यानें आज्ञा होती; परंतु वैदिक मंत्रांचा उपयोग न करितां यज्ञ करणें झाल्यास अर्वाचीनकालीं त्यांस ते करण्याविषयीं आज्ञा मिळाली असावी, असें आढळतें.

खिस्ती शकाच्या पूर्वी १००० पासून ५०० वर्षांच्या मधील, आर्यावर्ताच्या प्राचीनकाळाविषयीं आपणांस जी माहिती आहे, तिजवरून आपली अशी खात्री होते कीं, सालाच्या आरंभापासून अखेरी पर्यंत अहोरात्र प्रतिक्षणीं ब्राह्मणाच्या जीवितास फारच कडक शिक्षण मिळत असे. आपल्या धर्माचरणांत लहानशी जरी चूक झाली, तरी तिजमुळें परलोकीं शासन होणार, हें एकीकडे राहूं दिलें, तरी या लोकीं तिजबद्दल मला मोठें प्रायश्चित्त घ्यावें लागेल, किंवा मला बहिष्कार घालतील, याचें त्यास मोठें भय असे. आणि संध्योपासन व यज्ञ, हीं कर्में आस्थापूर्वक केलीं ह्मणजे या लोकीं चिरायु व यशस्वी होऊन, परलोकींही श्रेष्ठ सुख प्राप्त होण्याची त्याला आशा असे.

### तिसरा आश्रम.

(वानप्रस्थ किंवा एकांतवास).

परंतु आतां प्राचीन आर्यांच्या संसारपद्धतीपैकीं एका महत्वाच्या गोष्टी-

चा विचार करणें राहिलें. एखाद्या कुटुंबांतील वडील माणसानें आपले केंस पांढरे झालेले पाहिले ह्मणजे, अगर मुलांना मुलें झालेलीं पाहिलीं ह्मणजे, त्याला वाटे कीं आतां हा संसार सोडून द्यावा. आपली सगळी जिनगी मुलांच्या हवालीं करून, घर सोडून वनांत जाऊन रहावें. अशा प्रसंगीं किंवा अशा स्थितींत त्याला वानप्रस्थ ह्मणत. स्त्रियेनें त्याच्या बरोबर जाणें न जाणें, हें तिच्या मर्जीवर असे. या गोष्टींत आणि वनवास संबंधी कित्येक दुसऱ्या बाबतींत, चांगल्या चांगल्या प्राचीन ऋषींच्या मतांत जो बराच फरक आढळतो, त्याकडे आजपावेतों जितकें लक्ष पोंचविण्यांत आलें आहे, त्याहून जास्त लागणें अवश्य आहे. अशा विचाराच्या संबंधानें मोठी अडचण येते ती ही कीं, त्या ऋषींचे ग्रंथ, आर्यप्रजेची जसजशी वृद्धि होत गेली व उत्कर्ष होत गेला, तदनुसार तिजमध्यें आलेले किंवा पडलेले स्थानिक अथवा समकालीन प्रचार दर्शवितात, किंवा एकामागून एक उत्पन्न झालेले ऐतिहासिक आश्रम दर्शवितात, हें सांगणें. उदाहरण, ज्या ज्या ठिकाणीं हा संसार सोडून वनांत जाऊन रहावें असें सांगितलें आहे, त्या त्या ठिकाणीं दायविभागासंबंधीं व्यवस्था कांहीं निराळी असली पाहिजे. आणि पतीच्या बरोबर स्त्रीनें जावें किंवा न जावें हें तिच्या मर्जीवर ठेविल्यामुळें, आर्यकुटुंबाच्या गृहव्यवस्थेवर या गोष्टीचा बराच परिणाम झाला पाहिजे. परंतु हे मतभेद असले, तरी एवढी गोष्ट खरी आहे कीं, मनुष्य एकदां वनांत जाऊन राहिला ह्मणजे, त्या दिवसापासून त्याला आपल्या विचाराच्या आणि आपल्या कर्माच्या संबंधानें पूर्ण मोकळीक मिळत असे. थोडा वेळपावेतों कांहीं यज्ञादि कर्में किंवा विधि तो करी. परंतु केलीं तरी बहुतकरून सारीं मनांतच करी. आपण जसे आपल्या मनाशींच गुंगत बसतों, तशीच साऱ्या यज्ञाची कल्पना तो आपल्या मनांतच करी. आणि जें जें करावयाचें तें सारें याप्रमाणेंच करीत असे. परंतु थोड्या वेळानंतर हा मनोव्यापारही बंद पडला. असें ह्मटलें आहे कीं, वानप्रस्थ कांहीं प्रकारचे देहदंड करून घेतात, त्यास सामान्यतः तप हें नांव दिलें आहे.

स्वार्थासाठीं केलेलें प्रत्येक कर्म, आणि मुख्यत्वेंकरून आमुष्मिक-लोकीं फलप्राप्ति होण्याच्या आशेनें केलेलें प्रत्येक कर्म अगदीं व्यर्थ आहे, एवढेंच नव्हे तर, नुकसान करणारें आहे अशी कल्पना अधि-काधिक फैलावली, आणि आत्मपरीक्षा करणें एवढेंच कर्तव्य ह्मणून अवशिष्ट राहिलें. आत्मपरीक्षेचा खरा अर्थ असा आहे कीं, आपला प्रत्यक् भिन्न आत्मा आणि परम आत्मा या दोघांमध्यें जो खरा आणि निकट संबंध आहे, तो जाणणें. वनवासाचा हा खरा हेतु एकदां कळला ह्मणजे आर्यावर्ताच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांस इतर अतिमहत्वाच्या पुष्कळ विषयांची माहिती करून घेणें सुलभ पडेल--परंतु असल्या विषयांवर विस्तारेंकरून लिहिण्यास प्रस्तुत अवकाश नाहीं.

याप्रसंगीं आणखीं दोनच गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. पहिली गोष्ट ही. तिसरा आश्रम समाप्त झाला ह्मणजे, चतुर्थाश्रम ( हाच शेवटला आश्रम ) ह्मणजे संन्यासदीक्षा घ्यावी. संन्याशानें जनसमुदायाला सोडून दूर जावें, वनामध्यें एकांतांत फिरावें, आणि अखेरीस मृत्यूला शरण जावें. चांगले चांगले अनेक ग्रंथकार संन्याशालाच भिक्षु, यति, परिव्राज व मुनि, अशीं नावें देतात. संन्यासी व वानप्रस्थ या दो-होंतील भेद जाणण्याचें काम कांहीं सुलभ नाहीं. तथापि या दोघांत एक मोठा महत्वाचा भेद प्रथमारंभीं होता. तो हा कीं, पहिल्या तीन आश्रमांत असणारे पुरुष अन्यजन्मांत उपलब्ध होणाऱ्या फलांची इच्छा ठेवीत (त्रयः पुण्यलोकभाजः). परंतु सर्व इच्छांचा परित्याग क-रणारा असा संन्यासी, ब्रह्माच्याठायीं मात्र उपलब्ध होणाऱ्या अशा खऱ्या अमृतत्वाची इच्छा करितो. ( एकोऽमृतत्वभाक् ब्रह्मसंस्थः ). परिषदाशीं, ह्मणजे संसारांत रहाणाऱ्या जनाशीं वनवाशाचा संबंध चालूच असतो. परंतु संन्याशाला संसाराशीं कोणत्याही प्रकारचा संबं-ध ठेवितां येत नाहीं.

आतां दुसरी आपणांस एवढी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, तृतीय आश्रम ह्मणजे वनवास, हें एक आर्यावर्ताच्या प्राचीन विद्येचें विशेष लक्षण आहे.

मनुस्मृतींत आणि वीररसप्रधान अशा अर्वाचीन काव्यांतूनही पूर्णत्वानें स्वीकारलेला हा तृतीय आश्रम मागाहून वर्ज्य केला आहे असें आढळतें. तो वर्ज्य करण्याचें कारण असें दिसतें कीं, त्या आश्रमास उत्तेजन दिल्यापासून बौद्ध धर्माला पुष्टी प्राप्त होई ती होऊं नये. बौद्धमत हें वनवाससंबंधीं सारे नियम सिद्ध व प्रसृत करणारें असून त्याला हे प्राचीन ब्राह्मणांचे (जगत् सोडून देऊन एकांतांत जाऊन राहावयाचे) नियम मान्य आहेत. हे आश्रम यथाक्रम स्वीकारण्याविषयींची आज्ञा, ह्मणजे **ब्रह्मचर्य** व **गृहस्थाश्रम** हे दोन्ही आश्रम संपण्याच्या अगोदर वनांतील स्वतंत्र स्थितीची, ह्मणजे केवळ एकांतवासांत राहिल्यापासून होणाऱ्या सुखाची, कल्पनाही मनांत आणूं नये अशी लोकांची समजूत, जोंपर्यंत ब्राह्मणांस कायम ठेवितां आली, तोंपर्यंत सर्व ठीक होतें. महाभारतांतील [ शांतिपर्व, अध्याय १७९ ] बाप व त्याचा मुलगा, या उभयतांमध्यें झालेल्या संवादावरून ही वर सांगितलेली अडचण चांगली ध्यानांत येते. 'तुझे पूर्वज ज्या मार्गानें वागले तसाच तूं वाग. प्रथम ब्रह्मचर्यास विहित अशा नियमांप्रमाणें वागून त्वां वेद शिकावे.

---

१ नारदः—

(मृत झालेल्या मनुष्याच्या) भावाकडून पुत्रोत्पादन होणें; घरीं आलेल्या पाहुण्याच्या उपचारार्थ पशूचा वध करणें; प्रेतसंस्काराच्या प्रसंगीं मांसाहार करणें व वानप्रस्थाचा आश्रम किंवा संन्यास घेणें; (इतक्या गोष्टी चवथ्या युगांत वर्ज्य किंवा प्रतिषिद्ध केल्या आहेत.)

आदित्य पुराणः—

'पहिल्या युगांत कर्तव्य किंवा विहित अशा सर्व गोष्टी चवथ्या युगांत करितां येत नाहींत; कारण, कलियुगांत पुरुष व स्त्रिया दोघेही पापासक्त आहेत: तेव्हां या युगांत अकर्तव्य किंवा अविहित अशा गोष्टी कोणत्या? त्या या. दीर्घकालपर्यंत ब्रह्मचर्य करणें; जलपात्र नेण्याची अवश्यकता; पितृसंबंधाच्या स्त्रीशीं विवाह करणें; किंवा मातृपक्षाच्या स्त्रीशीं संबंध करणें; व बैलाचा यज्ञ करणें.'

२ आपस्तंब सूत्र (१,६,१८,३१):—

'धर्मशास्त्राला असंमत अशा रीतीनें किंवा धर्मशास्त्रानें ज्याला अनधिकृत ठरविलें आहे अशा पुरुषानें, संन्यास ग्रहण करूं नये (अविधिना प्रव्रजितः)'. टीकाकार या वाक्याचा संबंध 'शाक्यादया' ह्मणजे शाक्य (बौद्ध) व इतर, यांच्याकडे लावितात.

त्या नंतर विवाह करून मुलें बाळें संपादावीं. यज्ञकुंडें बांधून याग करावे, व आहुती वगैरे द्याव्या. नंतर अरण्यांत जाऊन रहावें व शेवटीं मुनी होण्याचा यत्न करावा. ' याप्रमाणें बापानें मुलास उपदेश केला आहे. परंतु मुलाला बापाचा उपदेश रुचत नाहीं. मुलगा ह्मणतो कीं, गृहस्थाश्रम ह्मणजे बायको, मुलें बाळें, यज्ञ वगैरे इतर सर्व खटाटोप निरर्थक आहेत. मुलगा ह्मणतो. ' बाबा! आपणांस आपल्या गांवांत राहून मिळणारे उपभोग मृत्यूच्या दाढाच आहेत; पण अरण्य पहाल तर तें देवांचें वसतिस्थान होय, असें शास्त्र शिकवितें. गांवांत राहाणाऱ्या मनुष्यास होणारें सुख हें त्याला बद्ध करावयाचें दावेंच होय. हें दावें किंवा हा पाश तोडून साधू मात्र मुक्त होतात. मूर्खांच्या हातून तें कदापि तुटत नाहीं. एकांतवास, सर्वांच्याठायीं समान अशी वृत्ति, सत्य, निष्ठा, नीति, दया, सदाचारसंपन्नता आणि कार्यांपासून प्राप्त होणाऱ्या फलेच्छेचा परित्याग, इत्यादि गुण हेंच ब्राह्मणांचें धन. याहून दुसरें नाहीं. हे ब्राह्मणा! तूं मरणोन्मुख झालास, ह्मणजे द्रव्य, इष्टजन, सुहृज्जन, आप्तबांधव, हे कोणी तरी तुझ्या कामीं पडतील काय? आपल्या अंतर्यामीं गुप्त होऊन राहिलेल्या आत्म्याचा तूं शोध कर. तुझे पूर्वज आणि तुझा पिता कोणीकडे गेले बरें?'

ही सर्व काल्पित कादंबरी किंवा कवीचें लाघव असून त्यांत तथ्यांश कांहीं नाहीं असें आपणांस वाटेल. परंतु आर्यावर्तांतील लोकांचा प्राचीनकाळचा खरा इतिहास यांत सांगितला आहे. या वनवाससंबंधीं कथा निवळ खोट्या व बनावट नाहींत, किंवा आर्यावर्तांतील प्राचीन इतिहासांत त्या मागाहून दडपून दिलेल्या नाहींत, या ह्मणण्यास आर्यावर्तांतील शास्त्रग्रंथ मात्र आधार आहेत असें नाहीं. तर ग्रीक ग्रंथकारांच्या लेखांवरूनही ही गोष्ट सिद्ध होते. आर्यावर्तांतील प्राचीन शहरांतून आणि गांवांतून उद्योगानें कालक्रमण करणाऱ्या माणसांच्या शेजारींच या मुनींचे, ह्मणजे तत्वमीमांसेंत निमग्न झालेल्या विद्वानांचे थव्यांचे थवे दूर अरण्यांत जाऊन वसलेले ग्रीक ग्रंथकर्त्यांस

माहीत होते असें दिसतें. यापेक्षां दुसरें नवल कोणतें? या मुनिवर्यांस ग्रीक लोक–उलोबिआई असें ह्मणत.

पृथ्वीवरील मनुष्यांच्या जीवनपद्धतीचें एक नवेंच स्वरूप दाखविणारा हा वनवास होय. अशा दृष्टीनें आपणांस तो फार महत्वाचा आहे. चौथ्या शतकांतल्या ख्रिस्ती साधूंच्या वनवासाशीं कांहीं बाबतींत या वनवासाचें खचित थोडेंसें साम्य आहे. इतकाच मात्र फरक आहे कीं आर्यमठांत, ख्रिस्ती साधूंस किंवा योग्यांस आवडलेल्या गुहा आणि आरामस्थानें नसून, शरीर आणि मन या दोहोंसही हितकारक अशी स्वच्छतर हवा वहात असे. ख्रिस्ती साधूंस सर्वसंगपरित्याग करून एकांतपणें वनांत जाऊन राहण्याची ही कल्पना बहुतकरून कांहीं अंशीं बौद्धमताच्या यात्रेकऱ्यांपासून सुचली किंवा कसें; व हे बौद्धमताचे यात्रेकरू आर्यावर्तांतील वनौकसांचे (वनांत राहणाऱ्या ऋषींचे) अथवा वानप्रस्थांचे परंपरेनें जन्मलेले फार दिवसांचे वंशज होते किंवा काय; बौद्धधर्माचे व्यवहार आणि क्रियाकर्में व ख्रिस्ती धर्माच्या रोमनक्याथलीक पंथाचे व्यवहार आणि क्रियाकर्में (मंडण, मठ, स्मरणी, विरक्त स्त्रियांचीं गृहें, आपण केलेल्या पापाचें आपल्याच तोंडानें उच्चारण करून गुरूपाशीं तें कबूल करणें आणि आचार्यांचें नैष्ठिक ब्रह्मचर्य,) या दोहोंत आश्चर्य वाटण्यासारखें सादृश्य दिसत असल्यामुळें तीं समकालीन असावींत किंवा नसावींत; या प्रश्नांचा समाधान वाटण्यासारखा खुलासा अजूनपावेतों करितां येत नाहीं. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक समय येतो कीं, त्या वेळीं आपल्या सर्व संसाराचा पसारा सोडून देऊन आपल्यापेक्षां वयानें जो उमेदवार असेल त्याच्या स्वाधीन तो करावा व आपण ऐहिक व पारमार्थिक जीवनसंबंधाच्या मोठमोठ्या सिद्धांतांचें मनन करून मरण्यास तयार व्हावें हें बरें, असें त्यांस वाटूं लागतें. परंतु हें वाटणें किंवा ही इच्छा, सुधारलेल्या सव लोकांपैकीं ख्रिस्ती मठवासी वैराग्यांशिवाय एक आर्यलोकांस मात्र झाली असें दिसतें. आयुष्याचा काल अशा चांगल्या मार्गानें घालविला तर त्याचें मोल काय होतें हें आपणांस समजावें, अशी इच्छा उत्पन्न झाल्यास इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे

कीं, सध्यां आपण यूरोपांतल्या गोष्टी सांगत नसून आर्यावर्ताविषयींच बोलत आहों. आर्यावर्तांत राहणाऱ्यांस कष्ट थोडेच सोसावे लागत. फार मेहनत केल्यावांचून त्यांस लागणारे सारे पदार्थ त्यांना तेथील जमिनीपासून प्राप्त होत. त्यांत आणखी आर्यावर्ताची हवा देखील अशी आहे कीं, तेथें रानांत राहतां येतें इतकेंच नव्हे, तर रानांत राहिल्यानें आनंदही वाटतो. आर्यांनीं वनाला दिलेल्या कित्येक संज्ञांचा मूळ अर्थच 'आनंद' किंवा 'सुख' असा होतो. प्राचीनकालीं युरोपखंडाच्या अनेक देशांतून राहणारे लोक आपल्या आयुष्याचे दिवस जेव्हां अतिशय कष्टानें लोटीत व सेनेटस्[१] सारख्या सभांमध्यें बसावयाची योग्यता संपादन करण्याच्या खटपटींत असत व वयांत येणाऱ्या उमेदवार पट्टयांस सन्मार्गास लावीत व बहकूं देत नसत व कारण नसूनही एखादेसमयीं त्यांचा पाणउताराही करीत, त्याचकालीं आर्यावर्तांतील वृद्ध वृद्ध लोक, आपणांस मुलें बाळें झालीं म्हणजे आपले स्व अधिकार संतोषानें त्यांच्या स्वाधीन करीत, आणि बाकी राहिलेले आयुष्याचे दिवस शांतींत आणि एकांतवासांत घालविण्यास झटत असत.

### वनांत राहणें (अरण्यवास).

ते प्राचीन आर्य लोक आपणांपेक्षां कमी शहाणे होते अशी आपण कल्पनाही करूं नये. मनुष्य वनांत जाऊन जरी राहिला तरी त्याचें अंतःकरण कामक्रोधांनीं दूषित होतें हें जसें हल्लीं आपणांस कळत आहे, तसेंच त्यांनाही चांगलें कळत असे. आणखी मनुष्य कशाही मोठ्या खटपटीच्या कामाकाजांत गढून गेलेला असला तरी आत्म्याच्या एकांत अनुसंधानानें आपलें चित्त शांत असतें हें जसें हल्लीं आपणांस चांगलें कळत आहे, तसेंच त्या प्राचीन आर्यांसही कळत असे.

याज्ञवल्क्य स्मृतींत (३-६९) असें ह्मटलें आहेः–'सद्गुणास कांहीं

---

१ सेनेटस् = वयोवृद्ध व पोक्त अशा माणसांचा समुदाय.

मठ लागत नसतो. सद्गुणानें वागलें ह्मणजेच सद्गुण प्राप्त होत असतो. आपणा स्वतांला ज्यापासून इजा होते तें दुसऱ्या कोणालाही करूं नये.' या वाक्यासारखेंच विचार मनुस्मृति (५-६६) या ठिकाणीं (सर् वुईल्यम् जोन्स यांणीं केलेलें भाषांतर) आढळतात.

मनुष्य कोणत्याही पंथांतला असो आणि तो आपल्या पंथाच्या मुद्रा वगैरे लावीत असो, किंवा नसो; कसाही असला तरी प्राणिमात्रां-वर समदृष्टी ठेऊन त्यानें स्वधर्म खुशाल पूर्णपणें आचरावा. त्या सांप्रदायिक मुद्रा वगैरे असल्या तरच धर्म चांगल्या प्रकारें चालतो असा प्रकार मुळींच नाहीं. महाभारतांत वारंवार हेच विचार दृष्टीस पडतात.

'हे भारता! आत्मनिग्रही पुरुषाला वन कशाला हवें? जो आत्मनि-ग्रही नाहीं, अशा पुरुषाला वन काय कामाचें? आत्मनिग्रही पुरुष जेथें राहील तें त्याला वनच आहे. तोच त्याचा मठ होय. ज्ञानी पुरुष आंगावर चांगला पोषाख घालून घरांतल्या घरांत कां राहीना. तो जर आमरण शुचिर्भूत राहून सदय अंतःकरणानें वर्तत असेल तर साऱ्या कुकर्मांपासून तो मुक्त होतो.'

'त्रिदंड संन्यास घेतला, मौन व्रत धरिलें, जटा वाढविल्या, मस्तक मुंडिलें, वल्कलानें किंवा कातड्यानें शरीर आच्छादिलें, संकल्प केला, स्नान केलें, अग्निहोत्र किंवा यज्ञादिक केले, वनांत जाऊन राहिलें, उन्हांत शरीर तापविलें, इत्यादि नाना खटपटी केल्या. परंतु अंतः-करण जर शुचिर्भूत नसलें, तर अवघें व्यर्थ होय.'[1]

असले विचार दिवसानुदिवस अधिक वाढत गेले व बुद्धांचें प्राबल्य होण्यास ते कारणीभूत झाले. कारण, बुद्धांच्या मताप्रमाणें

---

१ वनपर्व, १३४४५.

त्रिदंडधारणं मौनं जटाभारोऽथमुण्डणं ।
वल्कलाजिनसंवेष्टं व्रतचर्याभिषेचनम् ॥
अग्निहोत्रं वने वासः शरीरपरिशोषणं ।
सर्वाण्येतानिमिथ्यास्युर्यदिभावो न निर्मलः ॥

कर्मकांड, उपासना इत्यादि बाह्यप्रकार अगदीं निरर्थक आहेत. धम्मपद नांवाचा बौद्धांचा एक ग्रंथ आहे, त्यांत लिहिलें आहे (१४१-१४२) 'ज्या पुरुषानें आपल्या वासना मारिल्या नाहींत, ह्मणजे आत्मसंयमन केलें नाहीं, त्याची शुद्धि होणें नाहीं. मग तो नग्न राहो, जटा वाढवो, भस्माचे पट्टे आंगावर ओढो, उपास करो, जमिनी-वर पडून राहो, आंगाला धूळ लावो, निश्चळ स्तब्ध असा बसो, त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं.'

'सुंदर वस्त्रें जरी त्यानें परिधान केलीं, तरी जर तो शांत, दांत, जित, नम्र, संयत, व्रतस्थ व दुसऱ्याचे दोष न काढणारा, असा असेल, तर तोच खरा ब्राह्मण, तोच श्रमण, तोच भिक्षु, यांत संशय नाहीं.'

हे सर्व विचार जसे आपल्या मनांत येतात तसे आर्यावर्तांतील वि-द्वानांच्या मनांतही वारंवार येत व त्यांच्या धर्मविषयक आणि पौरा-णिक काव्यांत सहज सुंदर वाणीनें त्यांनीं ते प्रदर्शितही केले आहेत. प्रस्तुत स्थळीं महाभारतांतील शांतिपर्वाच्या ३२० व्या अध्यायांत राजा जनक व सुलभा यांमध्यें झालेला जो चमत्कारिक संवाद आहे त्याचें स्मरण मला होतें. सुलभा ह्मणून एक सुंदर स्त्री होती. तिनें राजा जनकास दोष देऊन ह्मटलें आहे कीं, 'राजा! जर तूं आपल्याला एकाच समयीं राजा व ऋषी कल्पीत असशील व संसारांत राहून जसा कांहीं मी संसारांत नाहींच असें समजत असशील, तर तूं आपल्या स्वतांला फसवून घेतोस असें ह्मटलें पाहिजे.'

ज्या विदेहनगरीच्या जनकराजानें एकदां असें ह्मणून दाखविलें ह्मणतात कीं, ही माझी राजधानी मिथिला नगरी जळून खाक झाली, तरी जें माझें ह्मणून मी समजतों त्यास केंसभरही धक्का पोहों-चणार नाहीं, तोच हा वर सांगितलेला राजा होय. पन्नास वर्षांच्या वयांत आपले लोक यत्नप्रिय असल्यामुळें असें समजतात कीं, हा मा-णसाच्या आयुष्याचा अतिउत्तम भाग होय. पण प्राचीन ब्राह्मणांची अशी समजूत असे कीं, या काळांत, ह्मणजे पन्नाशी उलटल्यानंतर,

अर्थात् प्रथम व द्वितीय आश्रमाची कालमर्यादा संपल्यानंतर विश्रांति घ्यावी व अंतर्बाह्याचें यथाकालीं अवलोकन करून देहविसर्जनाची सिद्धता करावी.

अशा या दोन व्यवस्था किंवा पद्धति आहेत. एक प्राचीन आर्यांची व दुसरी आपली ( यूरोपीय. ) या दोन्हींपैकीं चांगली कोणची - ह्मणजे, जिच्या योगानें खरी सुधारणा, खरी उन्नति होऊन या प्रपंचांत येऊन जन्माचें सार्थक व्हावें, खरा अर्थ साधावा, हा हेतु परिपूर्ण होण्यास कोणची पद्धति बरी, या प्रश्नाचें उत्तर या स्थळीं देण्याचें कारण नाहीं. पण इतकें मात्र या ठिकाणीं सांगणें अवश्य आहे, कीं जें आपणास परकी व अनोळखी असें दिसतें, तें निंद्य किंवा त्याज्य आहे असें मात्र समजूं नये. त्याचप्रमाणें जें आपल्या ओळखीचें किंवा संवयीचें तें सर्वथा वंद्य, ह्मणून त्यासच चिकटून रहाणें यासारखीही दुसरी चूक नाहीं. आमच्या वडिलांनीं, आमच्या पूर्वजांनीं मोठमोठ्या कामगिऱ्या बजाविल्या, यांत शंका नाहीं; पण त्यांच्या अधिकाराचा व सत्तेचा परिणाम कधीं कधीं फार दुःखावह झाला, असें इतिहासावरून लक्षांत येतें. तरूण जनाच्या अंतःकरणांतील उदार व उत्कट वासना चिरडून जाऊन थंड पडल्याचीं उदाहरणें पुष्कळ दृष्टीस पडतात. 'ह्मातारीं माणसें मूर्ख असतात, असें तरूण माणसांस वाटतें. पण तरूण माणसें मूर्ख असतात, असें ह्मातार्‍या माणसांस अनुभवावरून पक्कें माहीत असतें.' ही जी आपल्यांत (इंग्रजांत) ह्मण आहे, ती कदाचित् खरी असेल. पण ही गोष्टही खरी ह्मणून कबूल केली पाहिजे कीं, धर्म व व्यवहार या दोन्ही गोष्टींत जे निपुण, त्यांचें मन ज्या मानानें दुर्बल होत जातें, व ते पहिले तरूण विचार दिवसानुदिवस क्षीणता पावत जातात, तसतसा त्यांचा अधिकार व त्यांचें वजन, यांचा परिणाम चांगला न होतां उलटा वाईट मात्र होतो.

आणखीही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ते आर्य जो अरण्यवास पतकरीत तो स्वेच्छेनें आपण होऊन पतकरीत. त्यांच्यावर कोणी जुलूम करीत नव्हता. सरकारी नोकरास नोकरी पुरी झाल्यावर पेनशन्

मिळण्याचा जसा हक्क असतो, तसा अरण्यांत जाऊन वास करण्याचा आपला हक्क आहे असें ते समजत. पहिले दोन आश्रम ह्मणजे ब्रह्मचर्य व गृहस्थ हे ज्यांचे झाले नाहींत, त्यांस हा तिसरा ह्मणजे वानप्रस्थाचा आश्रम प्राप्त होण्याचा हक्कच नव्हता. मनुष्यांच्या प्रबळ मनोविकारांचें संयमन होण्यास हे पूर्वींचे दोन आश्रम अवश्य आहेत असें ते मानीत. मनुष्याच्या आयुष्याचा जो उत्तमोत्तम भाग तो पुढच्या तयारींत त्यानें घालविलाच पाहिजे, अशी त्यांची कल्पना असे. आणि त्या काळांत त्यांच्या आचारा विचाराच्या संबंधानें त्यांस तिळभर सुद्धां स्वतंत्रता नसे. विद्यार्थ्यास जशी शिक्षकाची आज्ञा असेल, गुरूनें जसें त्यास शिकविलें असेल तसें त्यानें वागलें पाहिजे; तेंच मानलें पाहिजे; त्यानें तेच मंत्र ह्मटले पाहिजेत; त्यानें तेच यज्ञयागादि विधि केले पाहिजेत व देवांस हविर्भाग अर्पण केले पाहिजेत. त्यांत कांहीं एक चूक होतां कामा नये. वेद हे त्याचे पवित्र ग्रंथ. आणि ते ईश्वरप्रेरित व अलौकिक आहेत असें त्यानें मानिलें पाहिजे. वेदांचें ईश्वरप्रेरितत्व सिद्ध करण्याचा व सुरक्षित ठेवण्याचा यत्न ज्याप्रमाणें आर्यांच्या धर्मग्रंथांत दृष्टीस पडतो, असा दुसऱ्या कोणत्याही लोकांच्या धर्मग्रंथांत मी पाहिला नाहीं.

आणि असें असतांही एकदम अशी गोष्ट होई कीं, हा वानप्रस्थ नांवाचा तिसरा आश्रम मनुष्यास प्राप्त झाला कीं, त्याच्या त्या सर्व बेड्या तुटत. त्यानें इच्छेस येईल तर पुढें बाह्य उपासनेचा प्रकार करावा; संध्या करावी, जपजाप्य करावें, व बालवयांत अध्ययन केलेलें शास्त्र पुढें अधिक पढावें. या सर्व गोष्टी त्यास रुचल्यास त्यानें कराव्या; पण या आश्रमाचा मुख्य उद्देश काय कीं, उपनिषद् वाक्यांत निर्दिष्ट जो अक्षत परमात्मा त्याचेठायीं आपले सर्व विचार त्यानें लीन करावे. जों जों त्या परमात्म्याचें व त्याचें एकीकरण होत जातें; पूर्वी आपलें ह्मणून जें जें तो ह्मणवीत असे तें तें जसजसें तो सोडतो; जें क्षणभंगुर व देहसंबंधीं तें तुच्छ मानून, अहंभावाचाही त्याग करून, आपलें जें सत्स्वरूप तें जों जों चिरंतन परमात्म्याच्याठायीं तो अधिकाधिक ओळखतो; तों तों शास्त्रोक्त विधिनिषेध, रूढी,

जाति, व्यवहार व एकंदर बाह्योपासना किंवा कर्मकांड, यांपासून तो निर्मुक्त होतो. या उत्तम ज्ञानाहून वेदाचें ज्ञान कमी आहे. यामुळें यज्ञयाग हे त्याच्या खऱ्या ज्ञानाच्या आड येतात. अग्नि, इंद्र, मित्र, वरुण, विश्वकर्मा, व प्रजापति हे जुने देव केवळ नाममात्रावशिष्ट होतात. एक अद्वितीय असा सत्स्वरूप परमात्मा मात्र कायम राहतो.

परात्पर जें ज्ञान तें दोन शब्दांत त्यांनीं सांगितलें. 'तत्+त्वं' = 'तूं तें आहेस.' तुझें खरें स्वरूप तें अविनाशी आहे. इतर जें जें क्षणभर तूं आपलें ह्मणून ह्मणवीत होतास, तें सर्व नाहींसें होतें. सर्व सृष्टपदार्थ पुनरपि स्वप्नवत् नाहींसे होतात. नाश पावतात. पण तुझा आत्मा, तुझें खरें स्वरुप, चिरंतन जो परमात्मा तत्स्वरूप होय. तुझा जो जीवात्मा तो ब्रह्मस्वरूप आहे. तो परमात्म्याचाच अंश असून जन्ममरणाच्या योगानें कांहीं काळपर्यंत सत्स्वरूप जें परब्रह्म त्याचा व तुझा वियोग होतो. परंतु, स्वस्वरूपाचें ज्ञान होतांच पुनरपि त्याचे ठायीं जाऊन लय पावतोस, ह्मणजे तद्रूप होतोस.

---

१ '**आत्मन्**' शब्दाच्या ठिकाणीं '**ब्रह्म**' शब्दाचा मी मुद्दाम उपयोग केला नाहीं. कारण, जर ब्रह्म शब्दाचा अलिकडचा अर्थ स्पष्टच आहे, तथापि मला येवढें कबूल केलें पाहिजे कीं, या शब्दाच्या मूळ धातूची कल्पना माझ्या लक्षांत अद्यापि चांगली आली नाहीं. इतर भाववाचक नामांप्रमाणें हा ब्रह्म शब्दही कोणत्या तरी स्पृश्य पदार्थापासून निष्पन्न झाला असावा. परंतु हा पदार्थ कोणता असावा याविषयीं माझ्या मनांत अद्यापि संशय आहे.

ब्रह्म शब्द ज्या धातूपासून उत्पन्न झाला तो धातु बृह् किंवा वृह असावा, यांत संशयच नाहीं. तद्देशीय वैय्याकरणांनीं या धातूचे 'उभारणें,' 'यत्न करणें,' किंवा 'वाढणें' असे अर्थ केले आहेत. हे तीन अर्थ मिळून 'लोटणें' किंवा 'हिसका देणें' असा एक अर्थ करतां येतो. असें असतां या धातूचे हे अर्थ व प्राचीन वैय्याकरणांनीं या शब्दाचे दिलेले अर्थ या दोहोंमध्यें पुष्कळच भेद आहे. निरुक्तकार **यास्क** यांनीं 'अन्न' व 'द्रव्य' असे दोन अर्थ केले आहेत. **सायनाचार्यांनीं** हे अर्थ स्वीकारून आणखी कांहीं दिले आहेत. ते हेः—मंत्र, स्तोत्र, यज्ञ, बृहत्. एकंदरींत या शब्दाच्या सिद्धीविषयीं फारच घोटाळा आहे.

# उपसंहार.

आपण जी लांबची सफर करण्याचा विचार केला होता, तिचे शेवटास एकदांचे येऊन पोहोंचलों ! डोंगर व नद्या; सूर्य व आकाश; अनंत अशी उषा ( प्रभात ); द्यु=ह्मणजे स्वर्ग, तेथील पिता, विश्वकर्मा=जो सर्व पदार्थांचा कर्ता; सर्व सजीव प्राण्यांचा धनी जो प्रजापति; या सर्वांमध्यें पडद्याआड असें जें अनंत वस्तु आपणांस दिसत होतें, त्याला अखेरीस आर्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावानुसार, देतां आलें तितकें निर्मल व उन्नत स्वरूप दिलें. ते ह्मणाले: 'आपणांस त्याचें वर्णन करितां येईल काय ? किंवा त्याचें आकलन आपणांस होईल काय ? ' ते ह्मणाले: ' नाहीं ! नाहीं ! आपणांस त्याचेविषयीं इतकेंच ह्मणतां येईल कीं, तो हें नव्हे, तो तें नव्हे, तो कर्ता नव्हे, तो पिता नव्हे, तो सूर्य किंवा आकाश नव्हे, तो नद्या किंवा पर्वत नव्हे. आपण ज्या ज्या नांवांनीं त्याचा उच्चार केला, तीं तीं तो नव्हे. तो आपणांस आकळत नाहीं. त्यास नांव देतां येत नाहीं. तो आपणांस अमुक आहे ह्मणून भास मात्र होतो. त्याचें ज्ञान तर आपणांस होत नाहीं; पण त्याचे जवळ जाऊन आपण पोहोंचलों, असें वाटतें मात्र. पण जर आपणांस तो एकदां प्राप्त होईल, तर बरीक आपण त्यास कधींही सोडणार नाहीं. आपण आतां शान्त झालों, मुक्त झालों, आपण सुखी झालों. ' मृत्यूच्या द्वारानें आपली सुटका होण्याच्या अगोदर राहिलेलीं थोडीं वर्षे ते मोठ्या धैर्यानें चालवीत. आपल्या वृद्धापकाळीं आयुष्य दीर्घ करण्याचा यत्न मुळींच करीत नसत. तथापि, आत्महत्या करून घेणें, हें महत् पाप आहे, असें ते समजत. इहलोकीं असतांच चिरंजीवित्व त्यांस प्राप्त होत असे आणि त्यांची अशी पक्की खात्री होत असे कीं, पुनः जन्म

---

१ **मनु**. अध्याय६, श्लोक ४५. 'मृत्यूची इच्छा त्यानें करूं नये. किंवा जगण्याची इच्छाही करूं नये. कामास लावलेला चाकर जसा आपला रोजमुरा आपणास केव्हां मिळेल ह्मणून वाट पाहतो तद्वत्, आपला नेमलेला वेळ असेल त्याची वाट पहात त्यानें बसावें.

व पुनः मृत्यु, हे आपणांस एकदां प्राप्त झालेल्या अनंत आत्म्यापासून पुनरपि वियुक्त करणार नाहींत.

इतकें असूनही आपल्या आत्म्याचा सर्वथा नाश होतो, असें त्यांस कधीं वाटत नसे. तो पूर्वीं दिलेला संवाद तुह्मांस आठवत असेल. त्यांत इंद्र स्वतां मोठ्या उत्साहानें आत्म्याचें ज्ञान प्राप्त करून घेण्याचा यत्न करीत आहे, असें दाखविलें आहे. प्रथम पाण्यांत पडलेल्या आपल्या सांवलींत जगदात्मा असेल कीं काय ह्मणून तो विचार करूं लागला. मग त्याला वाटलें, कदाचित् स्वप्नांत निमग्न असणारा जो जीव त्यांत तो असेल. यानंतर त्यास वाटलें कीं, तो गाढ निद्रेंतील जीवात्म्यांत असेल. असा विचार करितां करितां शेवटीं असंतुष्ट होऊन ह्मणतोः 'छे ! हें संभवत नाहीं. कारण, जो निजतो, तो आपण आपल्यास जाणत नाहीं. तस्मात् तो सर्वथा नष्ट होऊन गेला. यांत कांहीं अर्थ नाहीं.'

पण याजवर त्याचा गुरु काय उत्तर देतो तें पाहूं. तो ह्मणतोः हें शरीर विनाशी आहे व सदा मृत्यूच्या स्वाधीन आहे. पण तें त्या आत्म्याचें घर आहे. तो आत्मा अमर व अशरीर आहे. जेव्हां तो शरीरस्थ असतो, ह्मणजे, हें शरीर हाच मी व मी हें शरीरच आहें असें मानतो, तेव्हां तो आत्मा सुखदुःखाच्या आधीन असतो.

जोंपर्यंत तो याप्रमाणें शरीरांत असतो तोंपर्यंत सुख व दुःख हीं त्यास टळत नाहींत. पण जेव्हां तो आत्मा शरीरापासून भिन्न होतो, ह्मणजे मी या शरीराहून कोणी निराळा आहें असें समजतो, तेव्हां सुख किंवा दुःख त्यास पुनरपि शिऊं शकत नाहींत.

तर हा शांत आत्मा किंवा उत्तम पुरुष नष्ट न होतां केवळ त्याचें नाहींसें झालेलें भान मात्र त्यास येतें. तो आनंद मानतो, हंसतो, खेळतो. पण हें सर्व केवळ प्रेक्षकाप्रमाणें करितो. आपण ज्या देहांत जन्म घेतला त्या देहास विसरतो. डोळ्यांचा आत्मा तो. डोळा हें एक साधन मात्र आहे. 'मी हें बोलेन, हें ऐकेन, मीं असा विचार करीन,' असें जो जाणतो तो आत्मा. जीभ, कान, मन, हीं केवळ साधनें

आहेत. मन हें त्याचे दिव्यचक्षु होय. या दिव्यचक्षूनें तो आत्मा जें कांहीं सुंदर तें पहातो व आनंद मानतो.

यावरून असें आढळून येईल कीं, अरण्यांत रहाणारे जे आर्य त्यांचा धर्म किंवा त्यांची तत्वविद्या याचा शेवटचा निर्णय ' विनाश ' किंवा 'लय' हा खचित नव्हे. तो खरा आत्मा पुनः आपल्या भानावर अक्षय असा येऊन राहणार, हाच त्यांचा सिद्धांत. आपण अमुक आहों असें जें वाटत होतें ते आपण नाहींत. तर मग आपण आहोंत कोण? आपण अमुक आहों असें जें आपणास खरें ज्ञान होतें ते आपण आहों.

जर राजाचें पोर राजानें टाकून दिलें व त्यास म्लेच्छानें किंवा महारानें आपलें ह्मणून वाढविलें, तर तो महारच होय. पण त्यास त्याच्या एका मित्रानें सांगितलें कीं, "बाबा! तूं अमुक आहेस, अमुक नाहींस." ह्मणजे, मी राजपुत्र आहें असें ज्ञान त्यास होतें एवढेंच नव्हे, तर तो खरोखरच राजपुत्र असून आपल्या गादीवर बसतो! त्याच-प्रमाणें आपली गोष्ट होय. जोंपर्यंत आपण आपल्यास (आत्म्यास) ओळखीत नाहीं, तोंपर्यंत आपण अमुक आहों ह्मणून केवळ जें भासतें तेंच आहों. परंतु जेव्हां आपला एखादा ममतेचा स्नेही येऊन आपणांस सांगतो कीं, ' बाबा! खरोखर तूं अमुक आहेस,' तेव्हां डोळ्याचें पातें लवत आहे इतक्यांत आपण बदलून जातों. आपण आपल्या हरवलेल्या भानावर पुनः येतों. आपण आपणांस ओळखतों. आपण आत्मा आहों असें पक्कें समजतों. जसें त्या तरूण राजपुत्रानें आपल्या बापास ओळखलें व तो आपण स्वतां राजा झाला, तशीच आपलीही गत आहे.

## धर्मविचाराच्या पायऱ्या.

याप्रमाणें वैदिक धर्म पायरीपायरीनें कसा वाढत गेला हें आपण पाहिलें. अत्यंत बालिश अशा मंत्रांपासून तों अत्यंत उन्नत अशा विचारापर्यंत आपण त्याचा शोध लावला. वेदाच्या बहुतेक ऋचांमध्यें आपणांस या धर्माची बाल्यावस्था दिसते. ब्राह्मण, यज्ञयाग, गृह्यसूत्रें इत्यादिकांमध्यें उद्योगशाली तारूण्य दिसून येतें. आणि वैदिक धर्माचें

उपनिषदांमध्यें धर्माची वार्धकदशा दिसते. जर, आर्यलोकांचे विचार कालपरत्वें जसजसे अधिक उन्नत होत चालले, तसतसे केवळ बाल्यावस्थेमधील जे मंत्र त्यांचा, ब्राह्मण ग्रंथाचा पोक्तपणा त्या धर्मास प्राप्त झाला तेव्हां, त्यांनीं त्याग केला असता; आणि जर यज्ञयागाची निरर्थकता वाटून व पुरातन देवांच्या खऱ्या स्वरूपाचें अभिज्ञान होऊन, उपनिषदांचा जो अत्यंत उन्नत धर्म त्याचें वर्चस्व झालें असतें; तर हीं गोष्ट आपणांस अगदीं साहजिक वाटती. परंतु वस्तुतः अशी गोष्ट झाली नाहीं. आर्यावर्तांत एखादा धर्मविषयक विचार एकदां प्रसिद्ध किंवा प्रकट झाला, आणि कित्येक वर्षें परंपरेनें चालत गेला, म्हणजे त्याचें संरक्षण होत असे. इतिहासाच्या तीनही भागांत उत्पन्न होणारे विचार, म्हणजे आर्यराष्ट्राची बाल्यावस्था, यौवन आणि वृद्धापकाल, या तीनही दशांतील सारे विचार, प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांतील ज्या तीन स्थिति, त्यांस लागू आहेत. वेदरूप जो पवित्र ग्रंथ, त्यांत धर्मविषयक विचाराच्या भिन्न भिन्न दशांचा उल्लेख आहे इतकेंच नाहीं. तर एकमेकांशीं अत्यंत विरुद्ध अशींही मतें त्यांत सांपडतात. हीं कां, या प्रश्नाचें समाधान वर लिहिल्याप्रमाणेंच केलें पाहिजे. सजीव प्राण्यांचा धनी जो प्रजापति तो ब्राह्मणग्रंथांत शिरल्याबरोबर वेदाच्या स्वल्प अशा ऋचांमध्यें वर्णिलेले जे अनेक देव ते लय पावले. आणि उपनिषदांत ब्रह्म हें सर्व पदार्थांचें मूलकारण मानलें जाऊन जीवात्मा हा जगदात्म्याचा केवळ अंश आहे, असें मत उपस्थित झालें. तेव्हां अर्थात् एकंदर देवांचा लय झाला.

शेंकडों, हजारों वर्षें हा पुरातन धर्म जारीनें चालत आला आहे. आणि कांहीं काळपर्यंत यद्यपि त्याची हानि झाली, तथापि पुनः त्याचें पुनरुज्जीवनही झालें आहे. निरनिराळ्या प्रसंगांस त्यानें चांगली पाठ दिली आहे व त्यानें आपल्यामध्यें विलक्षण व असंबद्ध अशाही तत्त्वांचा समावेश केला आहे. पण आजच्या तारखेस ब्राह्मणांचीं शेंकडो घरें व कुटुंबें, होईल तितकें श्रुतीस अनुसरून आपलें आयुष्य घालवीत

आहेत व स्मृतींचे कायदे, ह्मणजे परंपरेनें चालत आलेली जी रूढि' तिच्या नियमांस अनुसरून वर्तन करीत आहेत.

अद्यापि अशीं कांहीं ब्राह्मणांचीं घरें आहेत, कीं ज्यांत मुलगा प्राचीन मंत्रांचें अध्ययन तोंडपाठ करितो व बाप यज्ञयागादि वैदिक विधि दररोज करितो. आजोबा जरी गावांतच राहतो, तरी यज्ञयाग व विधि हे व्यर्थ आहेत व वैदिक देव सुद्धां जो नामविरहित आत्मा त्याचींच स्वरूपें आहेत, असें मानितो; व साऱ्यांत उत्तम जें ज्ञान, साऱ्यांत उत्तम जो धर्म, ह्मणजे वेदान्त, सर्व वेदाचा अंत व पर्यवसान, त्यामध्येंच खरें सुख मानून विश्रांति पावतो.

अशा ह्या तीन पिढ्या सुखानें एकत्र राहतात. आजा जरी अधिक ज्ञानसंपन्न असला तरी आपल्यास किंवा नातवास तुच्छ मानीत नाहीं. इतकेंच नाहीं. पण हे ढोंगी किंवा दांभिक असतील, अशाविषयीं त्यास काडीमात्र संशय येत नाहीं. तो समजतो कीं, त्याचाही सुटका होण्याचा काळ येईल. त्या काळाची कल्पना त्यांचे मनांत यावी असेंही तो इच्छित नाहीं. मुलगाही आपल्या मनाच्या श्रद्धेप्रमाणेंच सर्व गोष्टी करितो व पुरातनचे विधि यथायोग्य चालवितो. तो आपल्या बापाविषयीं कांहीं प्रतिकूळ बोलत नाहीं. कारण तो समजतो कीं, आपला बाप पहिली पायरी ओलांडून गेला आहे. यामुळें त्याचें स्वातंत्र्य व त्याचे उन्नत विचार यांजविषयीं त्यास विस्मय वाटत नाहीं.

धर्माच्या इतिहासाचें ज्ञान झाल्यापासून ज्या अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आपणांस आढळतात, त्यांपैकीं या ठिकाणीं शिकण्यासारखी एक गोष्ट आहे, ती कोणची ?

पुरातनकाळीं जे अग्निदेवतेची ह्मणजे विस्तवाची पूजा करीत, ते इंद्र, ह्मणजे पाऊस देणारा, याची पूजा करणाऱ्या लोकांच्या लगत लगत राहात. पुढें कांहीं काळानें प्रजापति, ह्मणजे सर्व जिवंत प्राण्यांचा धनी, याची भक्ति करणारे लोक ते इतर लहानसहान देवतांस हविर्भाग अर्पण करणाऱ्यांस कधीं तुच्छ मानीत नसत. याच्याही पुढच्या काळीं जेव्हां लोकांची अशी समजूत झाली कीं, अनेक देव-

ता ह्मणजे केवळ एकाच परमात्म्याचीं अनेक नावें आहेत तेव्हां पूर्वीं पूजिलेल्या अनेक देवांच्या नांवांस आर्यांनीं तुच्छ मानिलें नाहीं, किंवा त्यांच्या वेदी त्यांनीं मोडून टाकिल्या नाहींत या सर्व गोष्टी लक्षांत आणून त्यापासून एवढी गोष्ट आपण शिकावी कीं, पुष्कळ बाबतींत आपण वैदिक आर्यांहून जरी अधिक चांगले, अधिक शहाणे आणि अधिक ज्ञानसंपन्न असलों, तरी त्या जुनाट लोकांपासूनही आपणांस कांहीं गोष्टी शिकल्या पाहिजेत.

आतां माझे बोलण्याचा असा भावार्थ कोणी समजूं नये कीं आपण ब्राह्मणांचें अनुकरण करावें, किंवा त्यांचे पूर्वकालीन वर्णाश्रमधर्म आपण आज अनुसरावे. आपला हा काळ निराळा; तो काळ निराळा. आजकाल आपल्या लोकांत आर्यावर्तांतील पूर्वींचे चारी वर्णाश्रमधर्म पुनः सुरू करूं ह्मणणें, ह्मणजे त्यास लोक मूर्ख ठरवितील. आपल्या सांप्रतच्या स्थितीस ते नियम सर्वथा लागू पडणें अशक्य आहे. कांहीं दिवस कर्ममार्ग अनुसरून मग सत्यधर्म ह्मणजे ज्ञानमार्ग तो धरावा, हें मत आजकाल कोणासही पसंत पडणार नाहीं. 'अहो! तुह्मी कांहीं दिवस यज्ञयाग, कर्मकांड इत्यादि खटपटी करा आणि मग जें खरें ज्ञान, जो खरा धर्म, त्याची प्राप्ति तुह्माला होईल' असें आज कोणालाही सांगितलें, तर त्यास तें रुचणार नाहीं. आर्यावर्ताच्या तरी नुसत्या पुरातन व्यवस्था व नियम मात्र आपणांस ठाऊक आहेत, पण ते अमलांत कसे आणीत असत, हें कोठें आपणांस ठाऊक आहे? फार कशाला, आर्यावर्तांत देखील ब्राह्मणांनीं घातलेल्या पुरातन शास्त्ररूप बेड्या अखेरीस लोकांनीं बंड करून तोडून टाकल्याच, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. बौद्धमत प्रबल होण्यास कारण, लोकांच्या ठिकाणीं स्वातंत्र्याची उत्कट इच्छा उत्पन्न होणें हेंच होय. प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र विचार करण्याचा हक्क जसजसा लोकांस कळूं लागला, व विशेषेंकरून लौकिक आचारविचार यांविषयीं अनभिरुचि उत्पन्न होत जाऊन अरण्यांत जाऊन बुद्धिस्वातंत्र्याचें पूर्ण अवलंबन करणें, हेंच ज्याला त्याला इष्ट

वाटूं लागलें, त्या त्या मानानें ब्राह्मणधर्माचा उच्छेद होऊन बौद्ध धर्म बळावत चालला. बौद्धधर्मानुयायी लोकांवर जुन्या धर्मनिष्ठ ब्राह्मणांचा एक मोठा जबरदस्त आक्षेप असे. तो हा कीं, ते अयोग्य काळीं अरण्यांत निघून जाऊं लागले; धर्माचें त्यांनीं बंधन तोडलें; यथोचित, यथाकाळ गोष्टी व्हावयाच्या त्या हे दुष्ट पाखंड भलत्याच वेळीं करूं लागले; निरनिराळे आश्रम, निरनिराळीं शास्त्रोक्त क्रियाकर्में करून त्या त्या साधनांनीं मनाला स्थितीवर आणणें व आत्मसंयमन करणें, तें सारें टाकून देऊन जो उठला तो निघाला अरण्यांत! अशाप्रकारें ब्राह्मण बुद्धांची निर्भत्सना करीत.

परंतु यद्यपि आर्यावर्तातील प्राचीन आर्यांच्या या उदात्त चरित्राचें (Ideal life) अनुकरण करणें आपणांस योग्य वाटत नाहीं; तथापि प्रस्तुतकाळीं आपल्या स्थितीच्या मानानें या कष्टी संसाराचा कंटाळा आल्यावर अरण्यवास करून विश्रांति घेण्याचा विचार आपणांस गोड लागला नाहीं; फार काय, आपल्या लोकांच्या स्थित्यनुसार न कंटाळतां आमरण सतत कष्ट करीत राहणें, यांतच कृतकृत्यता आहे, असें जरी आपण मानितों; तथापि त्या प्राचीन अरण्यवासी आर्यांपासून हीं एक घेण्यासारखी गोष्ट आहे. ती गोष्ट ही कीं, संसाराची धामधूम करूनही त्याविषयीं औदासिन्य ठेवणें, व्यवहारनिमग्न असतांही एकाप्रकारची निस्पृहता बाळगणें, परस्परांविषयीं सहिष्णुता असणें, एकंदर मनुष्यवर्गाविषयीं अनुकंपा, दया, प्रीति, प्रेम, या अप्रतिम गुणांचें अवलंबन करणें. खरोखर, अनुकंपा किंवा प्रेम या शब्दाचा गहन अर्थ आमच्या लोकांस बिलकूल कळत नाहीं म्हटलें तरी चालेल.

आपण आजकाल अरण्यवास न करितां व्यवहारांतच राहून आपल्या शेजाऱ्याचा व आपला मतभेद असतांही त्याशीं प्रेमभावानें वागण्याचा कित्ता आपण घेतला पाहिजे. आपल्या धर्मसंबंधाच्या विचारास्तव जे आपला द्वेष करीत असतील त्यांजवर प्रीति करणें, निदान ज्यांच्या कल्पना, ज्यांचे विचार, ज्यांचें वर्तन आपल्या दृष्टीनें गैर वाटेल त्यांचा द्वेष व छळ करणें टाकून देणें, हेंच श-

ह्मणपण आपणांस शिकलें पाहिजे. जो मनुष्य संसार ह्मणून काय आहे, मानव प्राण्याची खरी स्थिति काय आहे, या गोष्टी पुऱ्या जाणतो, चिरंतन अशा त्या परमात्म्याच्या स्वरूपापुढें स्तब्ध मौनव्रत धरून नम्रपणानें जो उभा राहण्यास शिकला आहे, त्याचा संसारवासही अरण्यवासासारखा व त्याची योग्यता प्रपंचांत असतांही वनौकस ऋषीप्रमाणें आहे, यांत शंका नाहीं. या मनाच्या स्थितीला दोष देण्याचा ज्यानें निश्चयच केला आहे तो दोष देईलच देईल. कोणी त्याला औदासिन्य ह्मणतो; कोणी ऐदीपणा ह्मणतो, कोणी ह्मणतो यांत अप्रामाणिकपणा आहे ! बाल्यदशा, तारुण्य व वृद्धापकाळ या तीन निरनिराळ्या स्थितींत निरनिराळा धर्म असणें ही कल्पनाच कांहीं लोकांस कडू वाटते.

पण बाबानो ! विचार करा. वस्तुतः स्थिति काय आहे ती पहा. आणि खरें ह्मटलें तर ती अशीच असली पाहिजे. बिशपबर्क्ले किंवा प्रसिद्ध पदार्थविज्ञानशास्त्री न्यूटन् यांच्या सारख्या एखाद्या विद्वानाचा व शेतांत नांगर धरणाऱ्या 'हैक् हैक्' करणाऱ्या पोराचा धर्म एकच असतो काय? कांहीं गोष्टींत असतो, पण एकंदरीत ह्मटलें तर नसतो, असें ह्मटलें पाहिजे. मनाला विद्येचा संस्कार जसजसा अधिकाधिक होत जातो त्या त्या मानानें धर्माची कल्पना बदलत जाणें हें अत्यंत स्वाभाविक आहे. बिशपबर्क्ले त्या अडाणी नांगऱ्याबरोबर देवळांत एकाच ईश्वरोपासनेचा बाह्य विधि करील. पण दोघांच्या डोक्यांत धर्मविषयक गोष्टींचे विचार सारखेच असतील असें कोण ह्मणेल?

फार कशाला, आपल्या स्वतांविषयींच ज्यानें त्यानें विचार करावा. बाल्यदशेपासून तों थेट वृद्धापकाळापर्यंत जो आपल्या आयुष्याचा मार्ग, त्या मार्गांतच आपलीं स्वरूपें कितीदा बदलतात तें पहा. जो लहानपणचा धर्म तोच आपल्या तारुण्यांतला धर्म आहे, किंवा तारुण्यांतला धर्म तोच वृद्धापकाळीं कायम राहतो, असें कोणी इमानानें मला सांगेल काय ? बालस्वभावाला उचित अशी धर्माच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवावी, खरी श्रद्धा, खरा भाव बालकाप्रमाणें, लहान मुलाप्रमाणें, अ-

सावा, हे नुसते शब्द नीट दिसतात. आणि ह्मणणेंही पाहिलें तर अगदीं खरें आहे. पण ते शब्द केवळ आपली फसवणूक करितात. बालभाव शिकण्यापूर्वीं दुसरी एक गोष्ट आपणांस शिकली पाहिजे. ती ही कीं, बालिश गोष्टी व पोरकटपणा अगोदर टाकून दिला पाहिजे !

अस्तकालच्या सूर्याचा प्रकाश किंवा वैभव, उदयकालच्या सूर्यासारखेंच असतें. पण दोहोंमध्यें साऱ्या पृथ्वीचें अंतर असतें. अस्तसमयींचा सूर्य साऱ्या आकाशाचा मार्ग चालून आलेला असतो व साऱ्या जगाला त्यानें प्रदक्षिणा घातलेली असते. ही गोष्ट पक्की ध्यानांत बाळगली पाहिजे.

जेव्हां लहान मूल आपल्या बापाला कोणच्या तरी नांवानें हाक मारण्याचा यत्न करितें, तेव्हां कितीही चमत्कारिक किंवा कितीही वेड्यावांकड्या शब्दानें त्यानें हाक मारिली, तरी बापाला तें कडू लागतें काय ? मुलाचे ते अगदीं कोंवळे बोबडे बोल आपणांस उद्देशून आहेत असें पाहून बापास त्याचें किती कौतुक वाटतें, किती आनंद होतो ? मोठें संभावित किंवा मोठ्या मानमान्यतेचें नांव असलें तरी तें आपणास इतकें मधुर वाटेल काय ?

बरें, आपल्या मुलांपैकीं एक मूल आपल्यास एका नांवानें हाक मारित असेल व दुसरें दुसऱ्या नांवानें हाक मारित असेल तर आपण त्यास त्याबद्दल रागें भरतों काय ?

आपल्या साऱ्या मुलांनीं आपणास एकाच नांवानें हाक मारावी असा हट्ट आपण घेऊन बसतों काय ? उलटें प्रत्येक मुलानें आपल्या लडिवाळपणाच्या रीतीनें निराळ्या निराळ्या नांवानीं आपणांस हाक मारावी असें आपणांस वाटत नाहीं काय ?

ही गोष्ट नुस्त्या शब्दांची झाली. आतां त्यांच्या कल्पनांविषयीं विचार करूं. मुलांस जेव्हां समजूं लागतें व आपल्या आईबापांच्या संबंधाच्या कल्पना जेव्हां त्यांच्या मनांत येतात, त्यावेळीं जर त्या मुलांस वाटलें कीं, आपल्या आईस व बाबास हवें तें करितां येईल, व तीं आपणास हवें तें देतील; आभाळांतील चांदण्या सुद्धां देतील; आपलीं

बारीकसारीक सर्व दुखणीं बरीं करतील; आपले लहानसहान सर्व अपराध पोटांत घालतील; तर बापास या गोष्टींत कांहीं गैर वाटतें काय? तो नेहमीं त्यांच्या चुका त्यांच्या पदरांत घालण्याच्या खटपटींत पडतो काय?

आपलीं मुलें आमचा बाप फार कडक आहे असें मानूं लागलीं तर बापास राग येतो काय? तशीच आपली आई फारच दयाळू, लाड करणारी, फार काय—अगदीं पोरासोरासारखी वागते, अशी मुलांची समजूत झाली तर तिची मर्जी नाखुष होते काय? इतकें खरें कीं, लहान मुलांस आपल्या आईबापांचे हेतु किंवा त्यांचे विचार कळत नाहींत. पण जर त्यांच्या त्या अल्लड समजुतीप्रमाणें कां होईना, पण आपल्या आईबापांवर जर तीं विश्वास ठेवितात व त्यांजवर प्रीति करितात, तर मग आपणांस याहून दुसरें काय पाहिजे?

आतां पूजाविधीच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे एवढें खरें कीं, या अनंत ईश्वरास बैलाचा बळी देऊन प्रसन्न करण्याचा यत्न करणें, ही कल्पना आपल्या सांप्रतच्या विचारास फार भयंकर किंवा तिटकारा आणण्यासारखी वाटते. पण भोंवतालच्या लोकांस कितीही वाईट वाटलें तरी आपलें बाळक आपल्या चिमुकल्या तोंडांतून मोठ्या प्रेमानें खाऊचा गोड घास काढून त्या मळक्यासळक्या हातानें आईच्या तोंडांत घालीत आहे, तर त्यास झिडकारून देईल, अशी कोण माउली असेल? जरी कदाचित् तिनें तो खाऊ खाल्ला नाहीं, तरी पण 'वा! कायरे बेट्या छान खाऊ आहे!' असें ह्मणून खाल्ल्यासारखें करून खराच खाऊ खाल्ला, अशी त्या बालकाची समजूत करण्याचा यत्न ती आई करणार नाहीं काय?

तेव्हां सिद्ध काय? शुद्ध अंतःकरण व निर्मळ प्रेम जर आहे, तर त्यांनीं उच्चारलेलीं चुकीचीं नांवें, किंवा त्यांचे ते वेडगळ विचार, किंवा त्यांच्या त्या वेडगळ कृति, यांच्याकडे आपण लक्ष पोंचवीत नसतों.

मुलांमध्यें व मुख्यत्वेंकरून लहान मुलांमध्यें आढळणाऱ्या गोष्टींपैकीं ज्या गोष्टी लक्षांत आणण्यासारख्या किंवा मनावर घेण्यासारख्या

असतात त्या ह्या कीं, त्यांस जे शब्द समजत नाहींत त्यांचा जर ते उपयोग करीत असतील; त्यांच्या मनांत नसतील अशा गोष्टी जर तीं बोलून दाखवीत असतील; आणि साऱ्यांत विशेष हें कीं, एकमेकांस लाऊन बोलत असतील; तर या गोष्टी मात्र आपण मनावर घेण्यासारख्या असतात. त्यांबद्दल मात्र आपणांस फार वाईट वाटतें.

आतां ईश्वराच्या व आपल्या संबंधानें येथपर्यंत ज्या गोष्टी सांगितल्या त्या केवळ सादृश्यसंबंधानें होत. आपणांस हें पक्कें ठाऊक आहे कीं आईबाप व त्यांचीं मुलें यांच्यामधलें जें अंतर, त्यापेक्षां आपणांमध्यें व ईश्वरामध्यें जें अंतर आहे तें फारच मोठें आहे. ह्याबद्दल तर आपली पूर्ण खातरी असतेच. पण अशी आपली खात्री असूनही ईश्वराचा व आपला संबंध व परलोकविषयक आपली आशा व उत्कंठा या गोष्टींत आपला समज, आपला भाव, लहान मुलांसारखा असावा ही गोष्ट अत्यंत स्वाभाविक आहे. आपण अनाथ, दुर्बल, असमर्थ मनुष्यप्राणी आहोंत, त्यामुळें कोणाचा तरी आश्रय धरण्याची, कोणाचें तरी अवलंबन करण्याची इच्छा बाळगणें, हें अगदीं सहज आहे.

मनुष्याचा स्वभाव हाच कोणी एक आरसा, त्यांत ईश्वराच्या स्वरूपाचें प्रतिबिंब चांगलें वठत नाहीं हें खरें. तो आरसा मलीन आहे; स्वच्छ असावा तसा नाहीं, हें आपण कबूल करूं. पण हा मलीन आरसा फोडून टाकणें कांहीं चांगलें नाहीं. तर तो आपल्याकडून जितका स्वच्छ ठेवतां येईल तितका ठेवावा. आरसा असावा तसा नसला तरी आपल्या प्रस्तुत स्थितींत तो आपणांस उत्तमच आहे. आणि कांहीं काळपर्यंत त्याजवरच भरंवसा ठेऊन आपण चाललों तर आपण फार चुकूं असेंही नाहीं.

जें अदृश्य, अज्ञात व अनंत असें स्वरूप, त्याच्याविषयीं आपल्या कल्पना, आपले विचार, हे खरे नसतील कशावरून? खरे असण्याचा पूर्ण संभव आहे. मनुष्याची दृष्टी कितीही अल्प असली, मनुष्याची अवस्था कितीही दुर्बल असली, तथापि तेवढ्यावरून अमुक गोष्टीचा संभव नाहीं, असें ह्मणण्यास मोठासा आधार आहे असें नाहीं. प्राचीन

ब्राह्मणांची समजूत अशी असे कीं, मनुष्याच्या अंतःकरणाची भावना जशी उत्कृष्ट किंवा निकृष्ट, उच्च किंवा नीच, शुद्ध किंवा अशुद्ध असेल त्याप्रमाणें त्याच्या आत्म्याला पुढें गति प्राप्त होते. त्यांच्या समजुतीप्रमाणें, ज्याच्या त्याच्या श्रद्धेप्रमाणें त्यास फळ मिळतें. त्यांस वाटे कीं, ज्यांची इच्छा केवळ ऐहिक पदार्थांवर असेल त्यांस तेच पदार्थ प्राप्त होतील. ज्यांचे विचार पारलौकिक असतील, ज्यांच्या इच्छा ऐहिक सुखाहून अधिक उदात्त असतील, त्यांस पारलौकिक सुख मिळेल. कारण, आपल्याकरितां ते पुरुष अशा रीतीनें एक स्वतंत्र जगच निर्माण करितात. परंतु जो अदृश्य व अज्ञात, तद्विषयक गोष्टींच्या संभवाची केवळ कल्पना आपण करितों. फार काय, या पृथ्वीवर-या इहलोकीं आपण जिवंत असतां एकमेकांस जसे भेटत होतों, तसेच परलोकींही आपण पुनः परस्परांस भेटूं, अशी जी आपण दृढ आशा बाळगीत असतों, ती आशा, त्या कल्पना, यद्यपि आपण इच्छितों अशा प्रकारें सफळ झाल्या नाहींत, तथापि आमचें दुर्बल मानवी हृदय जशी भावना करितें त्याप्रमाणें ती भावना फलद्रूप होणारच नाहीं, असें तरी सिद्ध कोणी केलें आहे? नाहींतच असें खात्रीपूर्वक ह्मणण्यास काय आधार आहे? जें आहे तें उत्तमच आहे, अथवा जें आपण पहातों त्याचा शेवट चांगलाच होणार, अशी जी श्रद्धा, असा जो विश्वास, तोच खरा आहे. कारण, तो स्वाभाविक आहे. अनेक ठिकाणीं व अनेक धर्मांत अशा विश्वासाचीं चिन्हें दृष्टीस पडतात. परंतु तो विश्वास नव्या व जुन्या करारांत जितक्या स्वल्प शब्दांनीं व जितक्या स्पष्टरीतीनें वर्णिला आहे, तसा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं वर्णिला असेल असें मला वाटत नाहीं.

'कारण, जो त्याची आशा धरितो, त्यासाठीं जें त्यानें तयार केलें आहे तें हे देवा! तुझ्याखेरीज जगाच्या उत्पत्तिकालापासून मनुष्यांनीं ऐकलें नाहीं व त्यांच्या कानीं पडलें नाहीं. आणि हे देवा! तुजवांचून दुसऱ्या कोणीही पाहिलें नाहीं.' ( यशाया, अ० ६४. ओंवी ४ ). 'पण असें लिहिलें आहे कीं, देवानें आपल्या भक्तांसाठीं ज्या गोष्टी तयार केल्या आहेत त्या कोणी डोळ्यानें पाहिल्या नाहींत, कानानें ऐकिल्या नाहीं-

त किंवा माणसांच्या अंतःकरणांतही आल्या नाहींत'. (करिंथकरांस पहिलें पत्र. अ० २ ओंवी ९.)

आपण कांहीं जरी केलें तरी मनुष्याची कल्पना मनुष्याच्या पलीकडे जात नाहीं. फार तर आणखी एकच पाऊल पुढें जाऊन मनुष्य ह्मणेल कीं, 'याच्या पलीकडचें जें कांहीं आहे तें निराळें असेल. पण तें प्रस्तुतकालीं जें दिसत आहे त्याच्यापेक्षां कमी अथवा वाईट खचित असणार नाहीं. भविष्यकालीं होणाऱ्या गोष्टी भूतकालीं घडलेल्या गोष्टींहून न्यून व वाईट असणें संभवत नाहीं.' 'जें आहे हेंच उत्तम आहे' अशी समजूत कांहीं माणसांची असते. 'परंतु आज जें कांहीं आहे त्यापेक्षां उद्यां होणारें वाईट असेल' अशी फार थोड्या लोकांची समजूत आहे. आणि हल्लीं 'परिणाम-(Evolution) वादाला' जरी शेंकडों लोक शिव्या देतात तरी या सिद्धांताचें प्रमेय तरी एवढेंच कीं, जग हें दिवसानुदिवस सुधरत जात आहे व मनुष्यप्राण्याची स्थिति उत्तरोत्तर अधिकाधिक उन्नत होत जाणार.

ईश्वरी अंश जर कदाचित् आपणांस दिसावा असें असेल, तर तो आपल्या, ह्मणजे मनुष्यस्वरूपानेंच अवतीर्ण झाला असतां उत्तम, हें स्पष्ट आहे. मनुष्यस्वभाव ईश्वरस्वरूपाहून कितीही न्यून असला तरी या पृथ्वीवर ईशस्वरूपाजवळजवळ असें माणसाहून दुसरें नाहीं. आणि मनुष्य जसा लहानाचा मोठा होत जातो, बाल्यावस्थेपासून वृद्धदशा होईपर्यंत वाढत जातो, तसतशी ईश्वरविषयक आपली कल्पना आपण पाळण्यांत असतों तेव्हांपासून आपल्या बरोबरच श्मशानापर्यंत वाढत जाते. जो धर्म याप्रमाणें वाढत जात नाहीं, ज्या धर्माची वृद्धि आपले बरोबर होत नाहीं, तो धर्म सजीव ह्मणतांच येत नाहीं. तो धर्म असून निर्जीव, नष्ट झाल्यासारखा आहे. धर्माचे कामांत स्थिरता व कोणत्याही प्रकारें बदल न होणें, हें सजीवतेचें व प्रामाणिकपणाचें चिन्ह नसून उलटें नेहमीं निर्जीवतेचें व अप्रामाणिकपणाचें चिन्ह असतें. विद्वान् व अविद्वान्, सज्ञान व अज्ञान, वृद्ध व

---

१ पृष्ठ ७० येथें या संबंधानें टीप दिली आहे ती पाहा.

तरुण अशा लोकांस परस्पर बंधन करणारा धर्म ह्मटला, ह्मणजे तो लवचिक, उंच, खोल, लांब, रूंद, असा असला पाहिजे. सर्व गोष्टींचा समावेश त्यांत झाला पाहिजे. त्यांत अनेक मतें व अनेक विचार असून सर्व गोष्टींवर भरंवसा ठेवणें, सर्व गोष्टी सहन करणें, अशी त्याची सहजप्रवृत्ति पाहिजे. आणि ज्या ज्या मानानें धर्माची ही प्रवृत्ति अधिकाधिक वाढते, त्या त्या मानानें त्या धर्माचें सामर्थ्य, त्याची सजीवता, त्याची आकलनशक्ति, हे गुणही वाढत जातात.

आणि ख्रिस्ताच्या धर्माचा प्रसार इतर धर्मांहून विशेष व त्वरित झाला, याचेंही कारण हेंच कीं, प्रथमारंभीं त्या धर्माच्या संस्थापकानें प्रकाशित केलेले जे उदात्त विचार, ते यहुदी सुतार, रोम शहरांतील मोठमोठे मुत्सद्दी व कारभारी, आणि त्याचप्रमाणें ग्रीस देशांतील मोठमोठे तत्ववेत्ते व पंडित, या सर्वांनीं त्यांचा एकदम स्वीकार केला व तोही मनःपूर्वक—केवळ कांहीं लोभाकरितां किंवा दंभ माजविण्याकरितां केला असें नव्हे. या आमच्या ( ख्रिस्ती ) धर्माचीं जीं बाह्य चिन्हें व मूलतत्वें किंवा मुख्य मतें गणिलीं आहेत, त्यांत मूळ आरंभापासूनच ढवळाढवळ करून त्यांचें रूपान्तर करण्याचा व भक्ति आणि श्रद्धा या दोन तत्वांस स्थानभ्रष्ट करून त्यांच्या ठिकाणीं निवळ मतवाद्यांचें बाड भरून टाकण्याचा जो यत्न महामूर्ख लोकांनीं केला, त्यामुळें ख्रिस्ती धर्माचे जे परम स्नेही झाले असते व जे त्याच्या उत्कर्षार्थ फार झटले असते, अशा पुरुषांचा स्नेह अनेक प्रसंगीं त्या धर्मास सोडावा लागला. फार काय, त्या गोष्टीचा परिणाम इतका वाईट झाला कीं, ख्रिस्ताच्या धर्माचा जो मुख्य हेतु तो कोणचा —तर ख्रिस्ती धर्म ह्मणजे साऱ्या विश्वाला व्यापून टाकणारीं जीं मुख्य दोन तत्वें—दया व भक्ति —तो हेतु सर्वथा नष्ट झाला असें ह्मणावें लागतें.

## पश्चादवलोकन.

आपला प्रवास तर संपला. तथापि, आतां पुनः एकदां मागें दृष्टी फेंकून जितका मार्ग आपण चालून आलों, तितक्याचें अवलोकन करूं.

हजारों वर्षांपूर्वी आपले पूर्वज जे आर्य ते पंजाबांतील सप्तसिंधु ह्मणजे सात नद्या ज्या प्रांतांतून वाहतात त्या प्रांतांत वसाहत करून अनंत, अदृश्य व दिव्य अशी जी वस्तु ती शोधून काढण्याच्या कामांत गुंतले असतां त्यांस कितपत यश आलें तें पाहूं.

त्यांनीं आरंभ केला, तो पदार्थपूजेपासून खचित केला नाहीं. पदार्थ पूजा फार मागून आली; आणि ती याची त्याच कालीं आली, हें निर्विवाद आहे. आर्यावर्तांतील धर्मविषयक विचार प्रदर्शित करणारे जे अत्यंत पुरातन ग्रंथ त्या ग्रंथांत पदार्थपूजेचीं मुळींच कांहीं चिन्हें दृष्टीस पडत नाहींत. त्यांत त्या प्रकारचा बिलकूल उल्लेख नाहीं. ज्यास आद्यप्रेरणा किंवा आकाशवाणी असें ह्मणतात, त्याचाही उल्लेख आर्यांच्या पवित्र ग्रंथांत कोठें सांपडत नाहीं. जें कांहीं तेथें आढळतें तें सर्व स्वाभाविक असून समजण्यासारखें, सुलभ असें आहे. त्यांत अलौकिक किंवा सृष्टिबाह्य किंवा विलक्षण असें कांहीं नाहीं. इंद्रियें व बुद्धि यांच्या व्यतिरिक्त श्रद्धा किंवा धर्मवासना, या नांवाची स्वतंत्र अशी कांहीं एक मानसिक शक्ति ह्मणून आहे, असें मानण्याची मुळींच जरूर नाहीं. आणि अशी कांहीं एक शक्ति कल्पावी अशी आपली जरी किती इच्छा असली तरी आपल्या प्रतिपक्षांनीं आपणांस तसें करूं दिलें नसतें. धर्माचें प्रतिपादन करितांना धर्मवासना किंवा श्रद्धा अशा प्रकारच्या कांहीं एका शक्तीची कल्पना करणें, ह्मणजे जी गोष्ट ठाऊक आहे, त्या गोष्टीचा पुरावा ठाऊक नसलेल्या गोष्टींनीं करण्यासारखें होणार आहे.

धर्मवासना किंवा धर्मप्रेरणा होण्याचें वास्तविक कारण ह्मटलें ह्मणजे अनंतप्रतीति किंवा अनंतानुभव होय.

तेव्हां प्राचीन आर्यांच्या तर्फेनें आह्मी आमच्या प्रतिपक्षास दोनच गोष्टी गृहीत करून चाला ह्मणून सांगितलें. त्या कोणच्या-तर, एक आपलीं इंद्रियें व दुसरी आपली बुद्धि किंवा विवेकशक्ति; ह्मणजे इंद्रिय वर्गांत दिसून येणारी अशी वस्तुग्राहकशक्ति; आणि दुसरी, शब्दांच्या योगानें अर्थांचें आकलन करण्याची शक्ति. या दोन शक्तींखेरीज म-

नुष्याच्या ठिकाणीं तिसरी शक्ति वसत नाहीं. आणखी दोहोंपेक्षां अधिक आहेत, असें मानण्यांत कांहीं लाभही नाहीं.

तथापि, आपल्या इंद्रियांपासून जसें सान्त पदार्थांचें ज्ञान प्राप्त होतें, त्याप्रमाणें जो अनंत भाग त्याशींही त्या इंद्रियांचा संनिकर्ष होतो व एकंदरींत इंद्रियांचा मुख्य हेतु किंवा उद्देश, ह्मणजे अनंताचा जो अखंड प्रसर किंवा विस्तार, त्यांतून जें सान्त तें हुडकून काढणें—जें अदृश्य त्यांतून दृश्य—जें स्वाभाविक किंवा नैसर्गिक, त्यांतून अस्वाभाविक किंवा अनैसर्गिक—जी चमत्कारप्रचुर सृष्टि; तिच्यांतून सृष्टिचमत्कारबाह्य असें जें कांहीं तें शोधणें—हा होय, असेंही आपण पाहिलें.

इंद्रियांचा अनंताशीं हा जो नित्य संबंध किंवा अखंड संनिकर्ष, त्यापासून प्रथमतः धर्माला गति मिळाली व मूल स्फूर्ति उत्पन्न झाली. इंद्रियांस जें जें ह्मणून ग्रहण करितां येतें, त्याच्या पलीकडे कांहीं तरी आहे, असा संशय प्रथम उत्पन्न झाला; व आपल्या बुद्धीला, तर्काला व वाणीला जें अगम्य, त्याच्या पलीकडल्या भागाविषयीं अनुमान करण्याची इच्छा मनुष्यांस झाली.

सर्व धर्मांचा मूळ पाया हाच होय. पदार्थपूजा, मूर्तिपूजा, प्राणिपूजा, मानवपूजा या सर्व प्रकारांच्या पूर्वींचा जो प्रकार, त्याचीच उपपत्ति अगोदर करणें अवश्य आहे. सान्त व इंद्रियगम्य जे पदार्थ त्यांच्या ज्ञानानें मनुष्याची तृप्ति कां न व्हावी ? या जगांत जें स्पृश्य, जें श्राव्य, जें दृश्य, त्याच्या पलीकडे कांहीं तरी आहे—मग ती कांहीं शक्ति असो, आत्मा असो, देव असो, त्याला काय पाहिजे तें ह्मणा—पण कांहीं तरी आहे, किंवा असावें, अशी कल्पना माणसाच्या मनांत कां शिरली ? हा प्रश्न मुख्य आहे.

वेदग्रंथ हींच कोणी एक प्रचंड व जुनी पडकी इमारत भुईंत गडून गेलेली, ती आपण खणून काढूं लागलों. खणतां खणतां आपणास वर प्राप्त झालेला प्रश्न हाच कोणी एक खडक लागला. पण अधिकाधिक खणित गेलों त्याचें कारण काय? तर, त्या खडकावर उभारलेल्या इमारतीचे अतिप्राचीन स्तंभ व कांहीं घुमट, कांहीं उघ-

ज्या केलेल्या मदिरेपा—कीं ज्यांच्या आधारावर आर्यावर्तांतील अर्वाचीन धर्ममंदिरें बांधलीं गेलीं, ते सांपडावेत. तेव्हां आपल्या असें दृष्टीस पडलें कीं, सान्ताच्या पलीकडे कांहीं तरी आहे, अशी कल्पना मनुष्याच्या मनांत एकदा ठसल्यावर तें हरप्रकारानें शोधून काढण्याचा यत्न आर्यांनीं सृष्टींत सर्वत्र केला. त्याचें ज्ञान व्हावें, त्याला नांव देतां यावें, ह्मणून पुष्कळ खटपट त्यांनीं केली. पहिल्या प्रथम अर्धस्पृश्य मग अस्पृश्य व सरतेशेवटीं अदृश्य पदार्थांत त्यांस तें अनंत वस्तु दिसलें.

एखाद्या अर्धस्पृश्य पदार्थाचें आकलन करीत असतां मनुष्याच्या इंद्रियांनीं त्यास सांगितलें 'बाबा! आह्मांस या पदार्थाचें ज्ञान अंशतः मात्र होत आहे—पण पदार्थ खास आहे असें आह्मी सांगतों!' अस्पृश्य अशा आणि शेवटीं तर अदृश्य अशा—पदार्थांचें आकलन करीत असतां मनुष्यास त्याच्या इंद्रियांनीं सांगितलें 'बाबा! आह्मांस या पदार्थाचें ज्ञान मोठ्या शर्थीनें होत आहे, किंवा मुळींच होत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल!—पण पदार्थ खास आहे!'

याप्रमाणें होतां होतां एक नवें विश्वच उत्पन्न झालें. त्यांत अर्ध—स्पृश्य, अस्पृश्य आणि अदृश्य अशा पदार्थांचा समावेश झाला. या पदार्थांमध्यें मानवी प्राण्यांच्याठायीं दिसून येणाऱ्या ज्या क्रियाशक्ति त्या अभिव्यक्त होत असल्यामुळें, मानवी प्राण्यांच्या क्रियाशक्तींस मिळालेलीं नांवें त्या पदार्थांच्या क्रियाशक्तींस देण्यांत आलीं.

अशीं नांवें त्या अदृश्य पदार्थांपैकीं अनेक पदार्थांस दिलीं. हीं नांवें शेवटीं सर्वसाधारण नामें झालीं. उदाहरण, असुर=सजीव पदार्थ; देव=चकचाकित पदार्थ; देव असुर=सजीव देव; अमर्त्य=अमर देव, इत्यादि.

आपण हेंही पाहिलें कीं, दुसऱ्या ज्या कांहीं कल्पना खरोखर धर्मसंबंधाच्या आहेत व ज्या अत्यंत भाववाचक अशा वाटतात त्या, बहुतेक सर्व भाववाचक नामांप्रमाणें इंद्रियसन्निकर्षापासून प्राप्त होणारें जें ज्ञान त्यापासूनच उत्पन्न झाल्या. फार काय—शक्ति, सद्गुण, नियम, अनंतत्व, अमृतत्व या शब्दांच्या कल्पना सुद्धां इंद्रियजन्यज्ञानमूलक होत.

या ठिकाणीं कांहीं अधिक व्याख्यानें करण्याला जर मला अवकाश असता तर बरें होतें. कारण, त्यांत प्राचीनकालीं मृत्यूचा प्रथम सन्निकर्ष किंवा मृत्यूचें प्रथम परिज्ञान होतांच त्यापासून मनुष्याच्या मनावर कसा ठसा उठला किंवा काय परिणाम झाला, हें सांगणें फार इष्ट होतें. त्याच-प्रमाणें हल्लीं आपण ज्यास श्रद्धा ( Faith ) व आकाशवाणी, आद्यशब्द, ( श्रुति ) Revelation असें ह्मणतों, त्यांत अंतर्भूत होणाऱ्या कल्पना हळू हळू, पण अप्रतिहतवेगानें, कशा वाढत गेल्या, हेंही सांगितलें असतें.

आर्यावर्तांतच दुसरीही एक गोष्ट घडली. ती ही कीं, मृत्यूनें ज्यांपासून आपला वियोग कांहीं काळपर्यंत केला, त्याच्याविषयींच्या ज्या आपल्या कल्पना व जे आपले विचार, त्यांपासून धर्माचीं अत्यन्त प्राचीन व महत्वाचीं अशीं कांहीं तत्वें उत्पन्न झालीं. आणि धर्मश्रद्धेला प्रथम चालन मिळालें तें तरी पुनर्जन्म किंवा परलोक एतद्विषयीं जी आपली कल्पना—जी आपली आशा, जिची अनिर्भेद्य, अनिवार्य सत्यता प्रस्तुत जशी आपणांस दिसते तशीच आपले पूर्वज जे आर्य त्यांसही दिसली—तिजपासूनच मिळालें.

शेवटीं आपण काय पाहिलें ? सर्वच सारख्या योग्यतेचे असे जे भिन्न भिन्न देव त्यांच्या पूजेच्या प्रकाराचा, ह्मणजे इष्टेश्वर उपासनेच्या प्रकाराचा परिणाम, अनेकेश्वर उपासना—ह्मणजे एकच श्रेष्ठ देव असून तो अन्य देवांवर अधिकार चालवितो—असा झाला. होतां होतां अखेर एकच अद्वितीय देव असून अन्य देवांची मुळींच ज्यांत कल्पना नाहीं—असा एकेश्वर उपासनेचा मार्ग सिद्ध झाला.

याच्याही पुढें असें पाहिलें कीं, जुने सर्व देव केवळ नाममात्रावशिष्ट राहिले. त्या देवांचीं अनेक नावें व्यर्थतेप्रत गेलीं. हा प्रकार झाल्यामुळें जरी कित्येक मनांची प्रवृत्ति नास्तिकमताविषयीं झाली आणि कांहीं एक प्रकारचें, निरीश्वर बौद्धमत प्रबळ झालें. तथापि, कित्येकांच्या मनाची प्रवृत्ति अगदीं निराळ्याच मार्गानें झाली, आणि अगदीं नवीनच एक पंथ निघाला. या पंथाचे अनुयायी ह्मणत कीं, 'तो परमपुरुष एक अद्वितीय आहे; तो पदार्थमात्राचें सार आहे; तो इंद्रियगम्य अशा सान्त पदा-

र्थाच्या पलीकडचा आहे एवढेंच नव्हे, तर तो आमच्या या मर्यादित व दुर्बल अशा जीवात्म्याच्या पलीकडचा आहे; तो परम आत्मा होय, ह्मणजे सर्व आत्म्यांचा आत्मा होय.' असा सिद्धांत त्यांनीं ठरविला.

येथपर्यंत पोंचल्यावर आपलें खणण्याचें काम आपणांस तेथेंच थांबवावें लागलें. आर्यावर्तांत अर्वाचीनकाळीं धर्मरूप मंदिरें ज्या खडकावर बांधलीं गेलीं, त्या खडकाचा अगदीं शेवटचा थर आपण मोकळा करून पाहिला. तेव्हां आपलें समाधान झालें.

मी वारंवार आपणांस कळविलें आहे कीं, आर्यावर्तांतील जीं अत्यन्त प्राचीन मंदिरें त्यांचे जे पाये, तेच पाये मानवी हस्तांनीं उभारलेल्या इतर सर्व मंदिरांचेही असलेच पाहिजेत असें नाहीं. तेव्हां हीं व्याख्यानें संपविण्याचे अगोदर तीच गोष्ट पुनः एकवार आपणांस सुचवितों.

आतां एवढी गोष्ट खरी कीं, धर्मरूप मंदिराच्या पायाला आधारभूत जो खडक, ह्मणजे मनुष्याचें अंतःकरण, हें सर्वत्र एक सारखेंच असलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर ज्या ज्या ठिकाणीं धर्म, श्रद्धा, भाव अथवा उपासना, हे प्रकार आहेत, त्या त्या ठिकाणीं त्या मंदिराचे स्तंभ व त्याचे अत्यन्त प्राचीन घुमट, हेही सर्वत्र एकसारखेच असण्याचा संभव आहे.

परंतु याहून अधिक, निदान प्रस्तुत तरी, कांहीं एक सांगतां येत नाहीं.

मानवी धर्मांचीं फार खोल गेलेलीं मुळें अधिकाधिक दिसूं लागतील असा काळ थोडक्याच दिवसांत येईल, अशी मी आशा करितों. आणि हीं जीं व्याख्यानें मी दिलीं आहेत त्या व्याख्यानांच्या विषयाचें प्रतिपादन करण्याचें काम माझ्यापेक्षां अधिक विद्वान् व अधिक बुद्धिमान् अशीं माणसें करितील; व तेणेंकरून धर्मविज्ञानाची जी प्रस्तुत अगदीं मूळ स्थिति आहे, ती जाऊन या विषयाचें एक शास्त्र बनून व त्याचें उत्तम रीतीनें उद्‌घाटन होऊन बहुत फायदा होईल, अशी उमेद मी बाळगितों.

आणि असा तो सुदिन जेव्हां येईल, या जगांतल्या एकंदर धर्मां-

चे खोल गेलेले पाये खणून काढल्यावर जेव्हां उघडे होतील व त्यांची पुनःस्थापना होईल तेव्हां—यज्ञयाग, होमहवन, क्रियाकर्में, तीं पुराणें, त्या दंतकथा, ते ते उपासनेचे अप्रबुद्ध मार्ग, इत्यादि जो धर्माचा नीरस व शुष्क भाग, त्यावरची ज्यांची श्रद्धा उडून गेली आहे; ज्यांना या बालिश पोरकट गोष्टी अगदीं आवडत नाहींशा झाल्या असून त्यांपेक्षां अधिक उन्नत, अधिक शुद्ध, अधिक प्राचीन, अधिक सत्य अशा गोष्टींवर आपल्या अंतःकरणांतील निर्मळ बालभाव ठेवण्याविषयीं ज्यांच्या मनाची दृढ प्रवृत्ति होत असेल; अशा प्रत्येक धर्मांतील माणसांस—पूर्वींच्या योग्यांस जसे गिरिगव्हर किंवा जशा लहानशा गुंफा, अथवा बौद्धभिक्षूंस जशीं त्यांचीं विहारें—त्याप्रमाणें हे जुने पाये आश्रयभूत होतील.

हिंदूंच्या देवळांत, बौद्धांच्या विहारांत, मुसलमानांच्या मशीदींत, यहुद्यांच्या भजनालयांत व ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनामंदिरांत प्रस्तुत जे जे उपासनेचे प्रकार होत असतात, त्यांपैकीं जरी बराच भाग मागें पडेल, तरी प्रत्येक धर्माच्या अनुयायानें, आपापल्या धर्मांत जें कांहीं त्याच्या दृष्टीनें त्यास उत्तमोत्तम वाटेल, तेवढें त्या निवांत गुंफेंत त्यानें आपल्याबरोबर आणावें.

हिंदूनें या जगाविषयीं आपला अविश्वास व परलोकाविषयीं आपला पूर्ण विश्वास;

बौद्धानें आपलें निरंतन अशा एका सृष्टिनियमाचें परिज्ञान, त्या नियमाला अनुसारी असें त्याचें तें वर्तन, त्याची सौम्यता व त्याची भूतदया;

मुसलमानानें दुसरें कांहीं नाहीं तरी आपली परिमितता;

यहुद्यानें—' मी आहें ' अशा नांवाच्या, सद्वर्तनप्रिय व बरेवाईट कसेही दिवस येवोत, ज्यावर त्याचा पूर्ण भरंवसा, अशा एका देवाच्या ठिकाणीं ठेवलेली आपली दृढ भक्ति;

आणखी ख्रिस्ती असेल त्यानें—या सर्वांत जें उत्तम—( ज्यांना याविषयीं शंका असेल त्यांनीं त्याचा अनुभव घेऊन पहावा ) त्यानें

आपलें ईश्वरविषयक प्रेम, मग त्या ईश्वराला पाहिजे तें नांव द्यां,—अनंत, अदृश्य, अमर, सतत, परमात्मा, सर्वाधिष्ठित, सर्वगत, सर्वान्तर्यामी—आपलें अविनश्वर, जीवनप्रद प्रेम;

याप्रमाणें प्रत्येक धर्माच्या मनुष्यानें ते ते पदार्थ त्या गुंफेंत आणून हजर करावे.

ही गुंफा अजून लहान असून तिच्यांत अंधार आहे. तथापि, त्या गुंफेंत आज सुद्धां वितंडवादापासून होणारा कलकल, ज्ञानप्रकाशाच्या प्राचुर्यानें डोळ्यांस होणारा त्रास, मतवैचित्र्यामुळें परस्परांशीं होणारा विरोध व कलह, या गोष्टी ज्यांस सहन होत नाहींत असे कांहीं थोडे लोक आजकाल देखील या गुंफेंत येऊन स्वास्थ्य पावतात. ही गुंफा किंवा हें गव्हर खास अधिकाधिक विस्तृत व सुप्रकाशित होऊन, ही भूतकाळची लहानशी गुंफाच भविष्यकाळीं एक विस्तीर्ण देऊळ होणार नाहीं म्हणून कशावरून ?

समाप्त.